ती० कै० वासुदेव वामनशास्त्री खरे यांच्या स्मरणार्थ
प्रसिद्ध केलेला--ग्रंथ चवथा.

# नाना फडनवीसांचें चरित्र

## [ सुधारलेली तिसरी आवृत्ति ]

हा ग्रंथ मूळ

कै० वासुदेव वामनशास्त्री खरे

यांनीं लिहिला त्याची ही नवी आवृत्ति

यशवंत वासुदेवशास्त्री खरे मिरज

यांनीं तयार करून प्रसिद्ध केली.

शके १८४९. ] [ सन १९२७.

किंमत एक रुपाया आठ आणे.
[ टपालखर्च निराळा पडेल. ]

श्रीमंत कैलासवासी

कॅप्टन सर परशुरामपंत भाऊसाहेब पटवर्धन,

के. सी. आय्. ई.



जमखिंडी संस्थानचे अधिपति.

श्रीमंत कैलासवासी

कॅप्टन् सर परशरामपंत

# भाऊसाहेब पटवर्धन

[ के. सी. आय् ई. ]

सरकार संस्थान जमखिंडी

यांच्या पुण्यस्मृतीला

हा ग्रंथ

अत्यंत नम्रतापूर्वक

आणि

भक्तिभावानें अर्पण केला आहे.

यशवंत वासुदेवशास्त्री खरे, मिरज.

# अनुक्रमणिका.


| | पृष्ठें. |
|---|---|
| प्रकरण पहिलें—कुलवृत्तांत. | १–७ |
| प्रकरण दुसरें—बाल्य व तारुण्याचा प्रारंभ. | ८–१९ |
| प्रकरण तिसरें—माधवराव बल्लाळ व नारायणराव यांच्या कारकीर्दी. | १९–२४ |
| प्रकरण चवथें—बारभाईचें कारस्थान व शिंदे होळकरांचे लपंडाव. | २४–३६ |
| प्रकरण पांचवें—इंग्रजांची पहिली मोहीम-पुरंदरचा तह. | ३७–४५ |
| प्रकरण सहावें—१ शिंदे होळकरांची समजूत. २ राज्य-स्थिति. ३ हैदर व करवीरकर यांच्या स्वाऱ्या. ४ आपापसांत द्वेष. ५ किरकोळ बंडें, दंगे, फितूर वगैरे. | ४५–६६ |
| प्रकरण सातवें—मोरोबादादांचें कारस्थान. | ६७–८७ |
| प्रकरण आठवें—१ हैदरअल्लीच्या स्वाऱ्या. १ किरकोळ दंगे व बंडें. ३ दरबारची हलमल. ४ इंग्रजांशीं लढाई–वडगांवचा तह. ५ सखारामबापूस कैद. ६ इंग्रजांशीं पुनः बिघाड–सालबाईचा तह. | ८७–११० |
| प्रकरण नववें—गंगाबाई व सवाई रावसाहेब पेशवे. | १११–११६ |
| प्रकरण दहावें—टिपूचें पारिपत्य. | ११७–१३५ |
| प्रकरण अकरावें—नाना व पाटीलबावा यांमध्यें स्पर्धा. | १३६–१५४ |
| प्रकरण बारावें—खर्ड्यांची स्वारी. | १५४–१६० |
| प्रकरण तेरावें—सवाई रावसाहेब यांचा मृत्यु. | १६१–१६६ |
| प्रकरण चौदावें—घोटाळा व तारांबळ. | १६७–१७७ |

| | |
|---|---|
| प्रकरण पंधरावें—महाडचें कारस्थान. | १७८-१८९ |
| प्रकरण सोळावें—बाजीरावींची सुरवात व कैद. | १८९-२०७ |
| प्रकरण सतरावें—कारागृहवास व सुटका. | २०७-२१७ |
| प्रकरण अठरावें—संकीर्ण माहिती व चर्चा. | २१७-२४८ |
| प्रकरण एकोणीसावें—शेवटचे दिवस व मृत्यु. | २४९-२६६ |
| प्रकरण विसावें—पुरवणी. | २६६-२७१ |
| महत्वाच्या व्यक्ति व स्थळें यांची सूची. | २७२-२८० |
| चित्रें— | |
| नाना फडनवीस. | १७ |
| नानांचें हस्ताक्षर. | ६५ |
| हरीपंत फडक्यांचें हस्ताक्षर. | १४५ |

# प्रस्तावना.

आपल्या देशांत नाना फडनवीस हा एक अद्वितीय मुत्सद्दी होऊन गेला. या देशांत मराठी ब्राम्हणांच्या शहाणपणाविषयीं जी कीर्ति गाजत आहे, तीस पुष्कळ अंशीं नाना फडनविसांचें नांवच कारणीभूत झालें आहे. आज सर्वत्र आबालवृद्धांच्या मुखीं जर त्यांचें नांव हरहमेशा निघत आहे, तर ते जिवंत असतां त्यांनीं स्वदेशीय जनांच्या हृदयमंदिरांत किती स्थळ व्यापिलें असावें! पण ही मोठ्या खेदाची गोष्ट आहे कीं, नानांस मरून पुरतीं शंभर वर्षेंही लोटलीं नाहींत तोंच त्यांचा खऱ्या इतिहासाची ओळख लोक विसरले आहेत, आणि त्या इतिहासाच्या जागीं आतां नानांच्या कांहीं क्षुल्लक व खासगी संबंधाच्या खोट्यानाट्या गोष्टी मात्र सांगण्यांत येत असतात! लोकांस वाटतें कीं, नानांच्या गोष्टी व बिरबलाच्या गोष्टी या सारख्याच महत्वाच्या! बिरबलाच्या शहाणपणापेक्षां नानांचें शहाणपण अधिक किंमतीचें होतें हें कोणाच्या स्वप्नींही येत नाहीं! जो तो नानांच्या चातुर्याची अतोनात तारीफ करीत असतो; पण जर कोणास प्रश्न केला कीं, तुम्ही नाना फडनवीस शहाणा म्हणतां तो कशावरून? तर कोणी साखरेच्या आंगठीची गोष्ट सांगेल, कोणी अनेक भाषा अस्खलित बोलणाऱ्या गुजराथ्याची गोष्ट सांगेल, कोणी एखादी कुजकीनासकी कोटी बिचाऱ्या नानांच्या बळेंच पदरीं बांधून स्वस्थ बसेल, आणि मनांत समजेल कीं, झालें, नाना फडनवीस हा कोणी अलौकिक बुद्धिमान पुरुष होता असें आपण निर्विवाद सिद्ध केलें! आपल्या लोकांत जे जुने माहितीगार गृहस्थ आहेत त्यांस जर 'बारभाईच्या कारस्थाना' बद्दल किंवा 'महाडच्या कारस्थानाबद्दल' त्रोटक त्रोटक माहिती विचारली तर ती त्यांस सांगता येईल कीं नाहीं याचा शकाच आहे।

वर लिहिलेला मजकूर जरी प्रायः जुन्या लोकांसच लागू पडणारा आहे, तथापि स्वदेशाच्या इतिहासाविषयीं अज्ञान व अनास्था हीं इंग्रजी

शिकून तयार झालेल्या नव्या मंडळींतही कमी आहेत असें नाहीं. या नव्या मंडळीस जर नानासंबंधें माहिती विचारली तर ती, तो विषयी होता, तो मत्सरी होता, तो लांच खात असे, त्याला अधिकाराची आशा अनावर होती, असल्याच तऱ्हेची मिळावयाची!

नाना फडनवीस हा कोणत्या योग्यतेचा मनुष्य होता, त्यानें काय काय कृत्यें केलीं, त्याच्या आयुष्यक्रमापासून आपणांस कांहीं घेण्यासारखें आहे कीं नाहीं, याविषयीं सर्व लोकांस माहिती मिळावी यासाठीं प्रस्तुत चरित्र लिहिण्याचा माझा प्रयत्न आहे. हा म्हणजे पूर्णपणें तडीस गेला आहे असें मी मुळींच समजत नाहीं. नाना फडनाविसांविषयीं अजून पुष्कळ माहिती मिळावयाजोगी आहे. पण ती मिळण्यास अनेक ठिकाणीं हिंडलें पाहिजे, जुनीं दप्तरें धुंडाळलीं पाहिजेत, व वर्षानुवर्ष स्वस्थपणानें शोध चालविला पाहिजे. तेव्हां असलें हें बिकट काम तडीस नेण्याचें यश मजपेक्षां अधिक उद्योगी अशा कोणातरी दुसऱ्या मनुष्याकरितां शिल्लक ठेवावें हें बरें, असें समजून मला स्वतःला जितकी माहिती मिळविली तितकी या चरित्राच्या रूपानें वाचकांस सादर केली आहे.

'काव्येतिहाससंग्रहां' त जे ऐतिहासिक लेख प्रसिद्ध झालेले आहेत, त्यांपैकीं ज्यांचा ह्या पुस्तकास उपयोग होण्यासारखा होता त्याचा उपयोग करून घेतला आहे. मुंबईस रायल एशियाटिक सोसायटीच्या लायब्ररींत एक पेशव्यांची शकावलीसारखी बखर आहे, तिजमधूनही पुष्कळ माहिती घेतली आहे. 'काव्येतिहाससंग्रहां' तील 'पंतप्रधानांची शकावली' ही वरील शकावलीचा संक्षेप आहे, असें दिसतें. या बखरीस मी 'पंतप्रधानांची शकावली, मुंबई प्रत' असें नांव दिलें आहे. पुण्यास पूर्वीं राजश्री पेंडसे नांवाचे गृहस्थ रहात होते. पेशवाईच्या इतिहासाची व दप्तराची यांजसारखी दुसऱ्या कोणासही माहिती नव्हती अशी आख्या आहे. सदरहू गृहस्थांनीं जुन्या कागदपत्रांच्या आधारानें पेशव्यांची एक शकावली तयार केली आहे. या बखरींतून कांहीं कांहीं माहिती प्रस्तुत पुस्तकांत दिली आहे. या बखरीस मी 'पेंडशांचें टिपण' असें नांव दिलें आहे.

नाना फडनवीस हे कारकुनी बाण्याचे व पराकाष्ठेचे व्यवस्थित गृहस्थ होते व त्यांच्या हातून उलाढालीही फार झाल्या. यावरून कोणी जर असें समजत असतील कीं, त्यांचे कागदपत्र त्यांच्या वंशजांजवळ पुष्कळ असतील तर ती त्यांची समजूत अगदीं चुकीची आहे. नानांच्या दप्तरावर आजपर्यंत जे प्रसंग गुजरले आहत ते ऐकले म्हणजे मराठी इतिहासाच्या भोक्त्यांस खेद झाल्यावांचून राहणार नाहीं. नानांचा मरणकाल जेव्हां समीप आला तेव्हां त्यांनीं आपल्या संपत्तीच्या व्यवस्थेबद्दल व गुप्त राजकारणांच्या संबंधाचे जे कागदपत्र आपणाजवळ होते ते जाळून टाकले. ते अशाकरितां कीं, आपणामागें आपल्या देणेदारांस व स्नेही व आश्रितमंडळीस बाजीरावाकडून कोणच्याही प्रकारें पीडा होऊं नये. नाना मरण पावल्यावर त्यांची सर्व जिनगी बाजीरावसाहेबांनीं जप्त केली. तेव्हां त्यांचें दप्तर बाळोजी कुंजर वगैरे लोकांच्या घरीं लोळत पडलें होतें! पुढें या दप्तराचा जितका भाग हातीं लागला तितका बरोबर घेऊन नानांची पत्नी जिऊबाई ही पुण्याहून लोहगडास गेली व तेथून पनवेलीस गेली. तेथें सोळा वर्षें राहिल्यावर ती पुनः परत पुण्यास आली व शेवटीं मेणवलीस जाऊन राहिली. इतक्या धामधूमींत किती कागदपत्र गहाळ झाले असतील, व पोरांनीं लिहितां ऐवजीं वाचावयास घेऊन किती फाडून टाकिले असतील याचा अजमास लागत नाहीं! नानांच्या दप्तरावर शेवटचा घाला इनाम कमिशनानें घातला. या दप्तराचें कोणीं फेरिस्त केलेलें नव्हतें व यांत काय आहे व काय नाहीं हेंही कोणास ठाऊक नव्हतें. असें सांगतात कीं, कमिशनानें नानांच्या दप्तराचे सुमारें शंभर रुमाल राहिले होते ते जप्त करून नेले व त्यांपैकीं दहा पंधरा रुमाल काय ते परत आणून दिले! कप्तान कौपर यानें बाकीच्या रुमालांची काय विल्हेवाट केली असावी, हें थोडासा तर्क चालविला असतां कोणासही सहज करून येणारें आहे! कमिशनच्या तडाक्यांतून जे कागद वांचले त्यांचीही नीटशी व्यवस्था राहिल्याचें दिसून येत नाहीं. कित्येक महत्वाच्या कागदांच्या नकला मात्र सांपडतात. अस्सल कागद कोणी उपटून नेले ते नेलेच! उदाहरणार्थ नानांनीं जें आपलें थोडेंसें चरित्र लिहिलें आहे त्याची मूळ प्रत त्यांच्याच हातची पूर्वी

मेणवलीस होती. ती कोणी ब्रुक नांवाच्या इंग्रज कामदारानें विलायतेस नेली!

या पुस्तकाबरोबर जी नानांची तसबीर दिली आहे ती श्रीमंत रा० नानासाहेब फडनवीस यांच्या ताब्यांत असलेल्या अस्सल प्रतीवरून घेतली आहे. नमुन्यादाखल नानांच्या अक्षराचा फोटो दिला आहे. हें अक्षर जरी त्यांच्या उत्तम अक्षरापैकीं नव्हे, तरी लहानशी व सबंध मजकुराची दुसरी चिठी मिळेना, याकरितां हिचाच उपयोग करून घेणें भाग पडलें. या चिठीच्याच पाठीवर हरीपंत फडक्यांचें उत्तर आहे. त्याचाही फोटो पुस्तकांत दिला आहे.

या पुस्तकांत कालनिर्देश इंग्रजी रीतीनेंच करावयास पाहिजे होता, परंतु ज्या बखरींच्या व कागदपत्रांच्या आधारानें हा ग्रंथ लिहिला आहे, त्यांतून कालनिर्देश प्रायः मराठी व क्वचित् मुसलमानी रीतीनें केलेला असतो. याकरितां या पुस्तकांत सर्वत्र मराठी रीतीचाच स्वीकार केला आहे. क्वचित् इंग्रजी व मुसलमानी तारीख मात्र मिळाली तेथें प्रोफेसर बाळाजी प्रभाकर मोडक यांच्या जंत्रीवरून मराठी तिथि पाहून घातली आहे.

हा ग्रंथ तयार करण्याच्या कामीं मला ज्या उदार गृहस्थांनीं मदत दिली त्यांत अग्रस्थान श्री. रा. बाळासाहेब पटवर्धन मिरज संस्थानचे अधिपति, यांस देणें योग्य होय. या ग्रंथासाठीं श्रीमंतांनीं नाना फडनवीस व हरीपंत फडके यांच्या अक्षरांचे फोटो स्वतः घेऊन त्यांच्या सव्वा दोन हजार प्रती तयार केल्या! या कामीं श्रीमंतांस बराच खर्च आला व यातायातही फार पडली, पण ती त्यांनीं मोठ्या आनंदानें पतकरिली. कोणत्याहि सदुद्योगास सहाय्य करण्याच्या कामीं श्रीमंतांचा पाय नेहमीं पुढें असतो, व त्यास अनुसरूनच वर निर्दिष्ट केलेलें त्यांचें औदार्याचें कृत्य आहे, व त्या योगानें या ग्रंथास मोठें भूषण प्राप्त झालें आहे. श्री. रा. बापूसाहेब कुरुंदवाडकर व धि ऑनरेबल जव्हेरिलाल उमाशंकर याज्ञिक यांनीं पुष्कळ उपयुक्त सूचना केल्या व त्यांनीं रायल एशियाटिक सोसायटीच्या लायब्ररींतील बखर मिळवून दिली; रा. रा. सखाराम रामचंद्र जोशी, श्री. रा. मेणवलीकर यांचे कारकून, यांनीं मेणवलीच्या दप्तरांतील कागद-

पत्र दिले व जुनी माहिती गोळा करण्याच्या कामीं फार श्रम घेतले; रावसाहेब काशिनाथ नारायण साने यांनीं ' काव्येतिहास--संग्रहा ' तील पाहिजे त्या लेखांचा उपयोग करून घेण्याची कृपा करून परवानगी दिली, व रा. रा. हरि कृष्ण दामले यांनीं हें पुस्तक छापून प्रसिद्ध करण्याच्या कामी सर्व प्रकारची व्यवस्था केली. या सर्व गृहस्थांचा मी फारफार आभारी आहें.

मिरज, तारीख १ }<br>जुलै सन १८९२ }

वासुदेव वामनशास्त्री खरे.

---

## दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना.

या पुस्तकाची पहिली आवृत्ती मीं तयार केली, त्यावेळीं डफ वगैरे इंग्रजांचे इतिहास, काव्येतिहास–संग्रहांतील वगैरे बखरी ' व मेणवलीच्या दप्तरांतील थोडीं पत्रें एवढ्यावरूनच ती तयार केली होती. परंतु पहिली आवृत्ति छापून झाल्यावर ऐतिहासिक लेख–संग्रहाकारितां मी पटवर्धन जहागीरदारांचीं दप्तरें चाळिलीं. त्यांतून नाना फडनवीसांच्या चरित्रास उपयोगीं पडणारी विश्वसनीय, मनोरंजक व बोधप्रद अशी आणखी पुष्कळ माहिती मिळाली आहे. परंतु तिजवरून नानांचें स्वतंत्र रीतीनें पुनः चरित्र लिहितां येण्याजोगें असूनहीं तें काम करण्यास ऐतिहासिक लेख-संग्रहाचे सर्व भाग छापून होतपर्यंत मला फुरसत मिळणें अशक्य झालें आहे. पहिली आवृत्ति खलास होऊन तर सात आठ वर्षें झालीं; वाचकांकडून पुस्तकाबद्दल मागण्या तर वारंवार येत असतात. याकरितां तूर्त पहिल्या आवृत्तींतील चुकांची दुरुस्ती करून ही दुसरी आवृत्ति छापविली आहे.

मिरज तारीख १८ }<br>सप्टेंबर सन १९०२ }

वासुदेव वामनशास्त्री खरे.

---

# तिसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना.

या चरित्राच्या प्रती आज दहा पंधरा वर्षे विक्रीसाठीं शिल्लक नाहींत. ऐतिहासिक लेख संग्रहाच्या कामाच्या गर्दीमुळें या चरित्र लेखनाच्या उद्योगाकडे लक्ष देण्यास कै. तीर्थरूपांना कधींच सवड सांपडली नाहीं. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचें हें अपुरें काम पूर्ण करावें आणि हा ग्रंथ नवीन लिहून काढावा असें आम्ही ठरविलें. व हें काम गेल्या वर्षीच्या नोव्हें-बरांत हातीं घेतलें आणि आमच्या प्रयत्नाचें मूर्त स्वरूप---ही सुधारलेली तिसरी आवृत्ति—आजरोजीं वाचकांच्या हातीं देत आहों.

मूळ ग्रंथापैकीं प्रकरण पहिलें-कुलवृत्तांत, प्रकरण दुसरें—बाल्य व तारुण्याचा प्रारंभ, प्रकरण तिसरें-पानिपतची स्वारी, प्रकरण बारावें-गंगाबाई व सवाई रावसाहेब पेशवे, प्रकरण सतरावें-राज्यकारभार, प्रकरण अठरावें--कांहीं खासगत गोष्टींविषयीं, हीं सहा प्रकरणें जागजागीं दुरुस्त करून आणि नवीन माहितीची भर घालून या आवृत्तींत होतां होईतों मूळस्वरूपांतच कायम ठेविलीं आहेत. बाकीचा सर्व मजकूर मुख्यत्वें अधिकारयोग आणि ऐ. ले. संग्रह या ग्रंथांच्या आधारानें तयार केला आहे. अधिकारयोग अथवा नानांस राज्याधिकार मिळाल्याचा इतिहास हा ग्रंथ कै. तीर्थरूपांनीं स. १९०८ सालीं लिहिला. हा ग्रंथ सर्वविश्रुत आहे. या ग्रंथांत स. १७७४ पासून स. १७७९ पर्यंतचें नानांचें चरित्र साग्र आणि तपशीलवार वर्णिलेलें असून तदनुषंगानें त्यांत सखारामबापू, महादजी शिंदे, तुकोजी होळकर, हरीपंत फडके, परशुरामभाऊ पटवर्धन वगैरे मुत्सद्दी व सरदार यांचे अनेकविध हर्षामर्षाचे प्रसंग आणि त्या योगानें त्यांच्या होत गेलेल्या हालचाली यांचाही अतिशय मार्मिक प्रपंच केला आहे. सर्वच माहिती अत्यंत मनोवेधक असून ती नाना व त्यांचे समकालीन शत्रुमित्र यांच्या चरित्रावर अपूर्व प्रकाश पाडणारी आहे. या आवृत्तीपैकीं प्रकरण तीन ते नऊपर्यंत पांच प्रकरणें आम्ही या अधिकार-योगाच्या आधारानें तयार केलीं आहेत आणि शक्य तेथें मुळांतील मजकूर जसाचा तसाच शब्दशः कायम ठेवला आहे. बाकीचा मजकूर ऐ.

ले. संग्रहांतील पत्रें व प्रस्तावना यांच्या आधारानें आम्ही तयार केला आहे. सारांश, या आवृत्तीच्या संपादनाचें अव्वल दर्जाचें काम कै. तीर्थरूपांनीं आगाऊच करून ठेविलें होतें आणि दुय्यम दर्जाचें काम मात्र आम्ही केलें आहे. पुस्तकाची भाषा व विषयाची मांडणी यांची जबाबदारी मात्र सर्वस्वीं आमचे शिरावर आहे.

नानांचे सर्व पराक्रम मंत्रसभेमधले असून ते बुद्धिवैभवाचे, वक्तृत्वाचे व कलमबहादुरीचे आहेत. समरांगणांतली अंगमेहनत, कौशल्य व तरवारबहाद्दरी यांचें या पुस्तकांत प्राधान्य नाहीं! तथापि कारस्थानें नीट समजावीं म्हणून तितक्या बेतापुरता नानांच्या कारकीर्दींतल्या सर्व मोहिमांचा तपशील आम्ही दिला आहेच. नानांच्या राजकारणाचा संबंध निजाम, भोसले, म्हैसूरकर आणि मुंबईकर इंग्रज या चार सरकारांशीं प्रामुख्यानें येतो. नानांच्या कारकीर्दींपैकीं स. १७७४ पासून पुढील सव्वीस वर्षें अत्यंत महत्त्वाचीं आहेत. पानिपत्तोत्तर मराठी इतिहासाबद्दल ऐ. ले. संग्रह हा एकच ग्रंथ प्रमाणभूत समजला जातो. सबब हें पुस्तक तयार करतांना आम्ही त्या ग्रंथाचाच मुख्यत्वें आधार घेतला आहे. पानिपतोत्तर कालासंबंधें ऐतिहासिक साधनांचे इतर ग्रंथही आतां बरेचसे छापून निघाले आहेत आणि त्यांतील माहितीचाही योग्य तो परामर्श आम्ही या पुस्तकांत काळजीपूर्वक आणि विस्तारपूर्वक घेतला आहे.

मूळ ग्रंथापैकीं प्रकरण अकरावें -नाना फडनवीसांचीं पत्रें हें प्रकरण स्थलाभावामुळें आम्ही या आवृत्तींत स्वतंत्र रीतीनें छापिलें नाहीं. या प्रकरणांत सुमारें बावीस तेवीस पत्रांचे उतारे दिले होते त्यापैकीं महत्वाचे उतारे आम्ही कायम ठेविले आहेतच आणि जीं पत्रें गाळलीं आहेत त्यांच्या जागीं त्यांपेक्षां ज्यास्त महत्वाचीं पत्रें या पुस्तकांत जागोजाग छापिलीं आहेत. अशीं पत्रें एका स्वतंत्र प्रकरणांत छापण्यापेक्षां त्यांचा समावेश विषयवारीनें त्या त्या प्रकरणांतून केला जाणें हेंच ज्यास्त सोईचें आहे असें आम्हांस वाटतें. शिवाय ऐ. ले. संग्रहांतील पत्रांचे उतारे या पुस्तकांत इतके भरपूर दिले गेले आहेत कीं, हें प्रकरण गाळल्याची उणीव वाचकांस बिलकूल भासणार नाहीं अशी आम्हांस उमेद वाटते.

' सर्वारंभास्तंडुलाः प्रस्थमूलाः ' । सुप्रसिद्ध बळवंत संगीत मंडळीनें तीनशें रुपयांची देणगी दिली म्हणूनच हा ग्रंथ इतक्या लवकर छापून बाहेर पडत आहे. बळवंत मंडळीचे मालक रा. चिंतामणराव कोल्हटकर आणि मास्टर दिनानाथ व कोल्हापुरे यांचा कै. तीर्थरूपांच्या ठिकाणीं पितृतुल्य आदर; त्यांच्या या वाङ्मयस्मारकाला हातभार लावावा याच निस्वार्थी व उदात्त हेतूनें प्रेरित होऊन त्यांनीं ही उदार देणगी दिली आहे आणि तीबद्दल आम्हांला त्यांचे सदैव ऋणीच राहिलें पाहिजे.

आमच्या इतर पुस्तकांप्रमाणें हें पुस्तक छापवितांनाही 'श्रीसिद्धेश्वर' प्रेसचे उत्साही मालक रा. रा. वासुदेव नारायण ठकार यांनीं आम्हांला अतिशय मदत केली आहे आणि त्याबद्दल आम्ही त्यांचे फार आभारी आहों.

कै. तीर्थरूपांचा आत्मा या अल्पसेवेनें संतोष पावो.

मिरज, ता. २९<br>दिसेंबर १९२७.

यशवंत वासुदेवशास्त्री खरे.

# नाना फडनवीसांचें चरित्र.

## प्रकरण पहिलें.

### कुलवृत्तांत.

रत्नागिरी जिल्ह्यांत वेळास म्हणून गांव आहे. तेथें पूर्वी महादाजी कृष्ण भानु या नांवाचे गृहस्थ रहात असत. ते त्या गांवचे वतनदार असून खाऊन पिऊन सुखी होते. महादाजीपंतास चार पुत्र होते, व त्यांचीं नांवें नारायण, हरि, रामचंद्र व बळवंत अशीं होतीं. त्यांत नारायण हा पहिल्या बायकोचा व बाकी तिघे दुसऱ्या बायकोचे होते. महादाजीपंत निवर्तल्यावर त्यांचा थोरला मुलगा नारो महादेव हा जिनगीची वांटणी घेऊन विभक्त राहिला. बाकी त्रिवर्ग बंधु म्हणजे हरि महादेव, रामाजी महादेव, आणि बाळाजी महादेव हे एकत्र राहून आपल्या वतनवाडीवर योगक्षेम चालवीत होते.

वेळास हा गांव बाणकोटच्या खाडीच्या दक्षिण तीराजवळ आहे. त्याच खाडीच्या उत्तर तीरास श्रीवर्धन हा गांव आहे. तेथें भट या उपनावाचे बाळाजी विश्वनाथ व जानोजी विश्वनाथ हे दोघे बंधु रहात होते. त्यांजकडे त्या प्रांतीच्या देशमुखीचें वतन होतें. इंग्रजी राज्य होण्यापूर्वी या महाराष्ट्रांत व विशेषेंकरून कोंकणांत देशमुख, देशपांडे, देसाई वगैरे हक्कदार लोकांचें मोठें प्राबल्य असे. कोणतीही राज्यक्रांति किंवा फंदफितुरी उपस्थित होवो, तिच्या बुडाशीं या लोकांपैकीं कोणीतरी असावयाचेच.

---

१. नाना फडनवीस यांनीं एका कारकुनाकडून आपल्या घराण्याचा वृत्तांत लिहविलेला आहे त्यावरून व पेशव्यांच्या बखरींच्या आधारानें या ग्रंथाचीं पहिलीं दोन प्रकरणें लिहिलीं आहेत.

पूर्वी सुवर्णदुर्ग व अंजनवेल हे किल्ले व त्याखालचा मुलूख हबशाच्या ताब्यांत होता. अर्थात् बाणकोटच्या खाडीवरही हबशाचाच अंमल असे. एकदां हबशी व आंग्रे यांमध्यें लढाई सुरू झाली असतां आंगऱ्यानें श्रीवर्धनच्या देशमुखांस वश करून घेऊन त्यांच्या द्वारें हबशाच्या राज्यांत फितूर करण्यास प्रारंभ केला. ही गोष्ट हबशाच्या कानीं पडतांच त्यानें या उभयतां भट बंधूंस कैद करण्याकरितां माणसें रवाना केलीं. हें वर्तमान जानोजी विश्वनाथ व बाळाजी विश्वनाथ यांस समजतांच ते जीव बचावण्याकरितां श्रीवर्धनाहून पळून गेले.

भट व भानु यांचा ऋणानुबंध पूर्वापार चालत होता म्हणून अशा समयीं भानूंचें आपणांस कांहीं सहाय्य मिळेल तर पहावें, अशा हेतूनें देशमुखांनीं वेळासेस जाऊन व त्रिवर्ग भानु यांस भेटून आपणावर आलेल्या संकटाचें सविस्तर वर्तमान निवेदन केलें.

त्या काळीं महाराष्ट्रांत मोठमोठ्या उलाढाली चालल्या होत्या. औरंगजेब बादशहा नुकताच मरण पावला होता, व त्यामुळें मोंगलांचें अवसान कमी होऊन ते जलदीजलदीनें महाराष्ट्रांतून पाय काढण्याच्या विचारांत होते. ताराबाईनें राज्याचें आक्रमण केलें असतां रामचंद्रपंत बहुतीकर, धनाजी जाधवराव, परशुराम त्रिंबक, शंकराजी नारायण वगैरे शिपाई व मुत्सद्दी यांच्या कीर्तीनें सारा देश दुमदुमून गेला होता. ज्याच्या अंगांत हिंमत व शहाणपण होतें त्यास अशी उत्कट इच्छा व्हावी कीं, घांटावर जाऊन रोजगार करावा व नांवलौकिकाला चढावें. बाळाजी विश्वनाथ असल्याच योग्यतेचे असल्यामुळें पुष्कळ दिवसपर्यंत त्यांच्या मनांत हा बेत घोळत होता. पण आतां आपण सिद्दी याच्या राज्यांत राहिल्यास खचीत प्राणास मुकूं अशी त्यांची खात्री झाल्यावर घाटावर जाण्याबद्दल त्यांचा निश्चय पक्का झाला व तो त्यांनीं त्रिवर्ग भानूंस कळविला. त्यांस देशमुखांचा बेत पसंत पडला व "आम्हीही तुम्हांबरोबर येतों, तुमच्या आश्रयानें आम्हांसही कोठें रोजगार मिळतील, आम्हांस बरोबर घेऊन चला" असें त्रिवर्गांचें म्हणणें पडलें. तेव्हां बाळाजीपंत देशमुख हे त्या त्रिवर्ग भावांस बरोबर घेऊन अंजनवेलच्या खाडीवर आले व तेथून चिपळुणास

जाऊन तिवऱ्याच्या घाटाकडे निघाले.

बाळाजी विश्वनाथ हे श्रीवर्धन सोडून अंजनवेलीकडे पळून गेले; अशी बातमी हबशास लागली तेव्हां त्यांस पकडून ठेवण्याकरितां त्यानें अंजनवेलच्या किल्लेदारास हुकूम पाठविला. त्याप्रमाणें त्या किल्लेदारानें पाठलाग करून घांटाच्या पायथ्याशीं बाळाजी विश्वनाथ यांस पकडून अंजनवेलीस नेलें. बाळाजी विश्वनाथ अंजनवेलीस वीस पंचवीस दिवस अटकेंत होते. तितक्या अवकाशांत त्रिवर्ग भानूंनीं मोठी खटपट करून शेवटीं त्यांची मुक्तता केली. ही खटपट कोणत्या तऱ्हेची होती हें बखरींत लिहिलेलें नाहीं, तथापि या कामीं भानूंनीं बहुतकरून किल्लेदारास लांच देऊन वश केलें असावें. कसेंही असो, इतकें खरें आहे कीं, भानु जर या प्रसंगीं देशमुखांच्या उपयोगी न पडते तर ते खचित प्राणास मुकते. बाळाजीपंतानीं त्यावेळीं त्रिवर्ग भानूंस वचन दिलें की, आम्हांस भाकर मिळेल तींत तुम्हांसही चतकोर मिळेल. हे वचन शेवटच्या बाजीरावांच्या कारकीर्दीपर्यंत बाळाजी विश्वनाथांच्या वंशजानीं पाळून भानूंच्या घराण्यास मोठ्या योग्यतेस चढाविलें.

नंतर बाळजी विश्वनाथ त्रिवर्ग भानूंसह घाट चढून साताऱ्यास गेले, व तेथें त्यानीं धनाजी जाधवराव सेनापति यांजकडे कारकुनीची नोकरी धरली. त्रिवर्ग भानूपैकीं रामाजी महादेव हे शंकराजी नारायण सचिव यांजकडे चाकरीस राहिले. हरी महादेव व बाळाजी महादेव हे बाळाजीपंताजवळ कांहीं दिवस रिकामेच राहिले. पुढें बाळाजी विश्वनाथ याचा भाग्यकाळ प्राप्त होऊन ते आपल्या कर्तृत्वाच्या बळावर वैभवास चढत चालले आणि शके १६३५ या वर्षाच्या माघ महिन्यांत ( जाने. स. १७१४ ) शाहु महाराजानीं त्यांस पेशवाईचीं वस्त्रें दिलीं. त्या प्रसंगीं बाळाजीपंतानीं महाराजांपाशीं विनंती करून राज्याची फडनविशी आपणाकडे मागून घेऊन तिचीं वस्त्रें हरी महादेव भानु यांस दिली. तेथपासून ज्याप्रमाणें बाळाजीपंत व त्यांचे वंशज हे मराठी राज्याचे पेशवे, त्याप्रमाणेंच भानु हे मराठी राज्याचे फडनवीस झाले.

बाळाजी विश्वनाथ यांनीं शाहू महाराजांपासून लोहगड व पुरंदर हे

किल्ले आपलीं मुलें माणसें व चीजवस्त ठेवण्याकरितां मागून घेतले. यापैकीं लोहगड आंग्र्यांकडे होता व पुरंदर सचिवांकडे होता. हे दोन किल्ले पेशव्यांच्या ताब्यांत आल्यावर, रामाजी महादेव भानु पूर्वी सचिवांकडे नोकरीस होते, त्यांजकडे पेशव्यांनीं लोहगडच्या सबनिशीचें काम दिलें, व नाणेंमावळची मुजुमदारी हरि महादेव यांस सांगितली. हरि महादेव यांनीं फडनविशी व मुजुमदारी या अधिकारांचा उपभोग फार दिवस घेतला नाहीं. कारण फडनविशीचीं वस्त्रें मिळाल्यापासून चार पांच महिन्यांनीं पेशव्यांची स्वारी जेजुरीच्या मुक्कामीं असतां हरि महादेव यांस देवाज्ञा झाली. त्यांस पुत्रसंतान नव्हतें म्हणून त्यांची फडनविशी त्यांचे दोघे बंधु रामाजी महादेव व बाळाजी महादेव यांजकडे यावयाची, पैकीं बाळाजी महादेव हे स्वारीबरोबर होते त्यांजकडे पेशव्यांनीं तो अधिकार दिला.

स. १७१८ सालीं शाहु महाराजांच्या आज्ञेवरून बाळाजी विश्वनाथ व खंडेराव दाभाडे यानीं सय्यद बधूंच्या सहाय्याकरितां दिल्लीवर स्वारी केली. या दिल्लीच्या स्वारींत मराठ्यांना दक्षिणच्या सहा पातशाही सुम्यांची चौथ सरदेशमुखीची सनद मिळाली. या स्वारींत बाळाजी महादेव भानु फडनवीस हे पेशव्यांबरोबर होते. मराठ्यांच्या फौजेचा तळ कितीएक महिनेपर्यंत दिल्लीस पडला होता. तेथं पुष्कळ धामधूम होऊन फरुक्शीर बादशहा मारला गेला व दिल्लीच्या तक्तावर महंमदशहाची स्थापना झाली. एके वेळीं पेशवे व सेनापति हे बाळाजी महादेव भानु व संताजी भोसले यांजवर छावणीचें रक्षण करण्याचें काम सोंपवून आपण सय्यदांबरोबर बादशहाच्या भेटीस गेले. इतक्यांत दिल्लीचे रहिवाशी बिथरून मराठ्यांवर तुटून पडले. तेव्हां माणिक चौकांत मोठी हातघाई होऊन(फेब्रु.स.१७१९) पंधराशें मराठे पतन पावले. त्यांतच बाळाजी महादेव व संताजी भोसले त्यांचेही जीव खर्ची पडले. फडनवीसांच्या मृत्यूबद्दल एक गोष्ट ऐकिवांत आहे ती अशीः—

" एके दिवशीं बादशहानें मोठा दरबार भरवून मराठ्यांस चौथ व सरदेशमुखी या हक्कांच्या सनदा दिल्या, तेव्हां ती गोष्ट दिल्लीच्या दरबारी

लोकांस न आवडून त्यांनीं बेत केला कीं, पेशवे सनदा घेऊन दरबारांतून निघाले म्हणजे रस्त्यानें त्यांस गांठून गर्दी करून सनदा हिसकून घ्याव्या. हा बेत पेशव्यांस समजला तेव्हां त्यांना मोठीच चिंता प्राप्त झाली. बाळाजी महादेव फडनवीस हे पेशव्यांजवळ होते, त्यांनीं विनंती केली कीं, 'ठीक आहे. मी तुमच्या पालखींत बसून जातों. तुम्हीं सनदा घेऊन दुसऱ्याच वाटेनें गांटांत जाणें.' ही मसलत पेशव्यांस पसंत पडून ते सनदा घेऊन आडवाटेनें छावणीस आले. फडनवीस पेशव्यांच्या पालखींत बसून जात असतां, हे पेशवेच आहेत असें समजून दरबारी लोकांनीं हल्ला करून त्यांस ठार मारिलें."

ही गोष्ट खरी ठरेल तर आम्हांस फार आनंद होईल. पण या गोष्टीस इतिहासांत कोठें आधार मिळत नाहीं. जनार्दन बल्लाळ फडनवीस यांस पेशव्यांनीं दिलेल्या सनदेंत, तुमच्या वडिलांनीं सरकारकामीं देह खर्चिला अशा अर्थाचे शब्द आहेत; पण वरील गोष्टीचा उल्लेख तींत नाहीं असें आम्हांस समजलें आहे. चौथ सरदेशमुखीच्या सनदा जर बाळाजी महादेव यांनीं आपला प्राण देऊन वांचविल्या असत्या तर त्याबद्दल उल्लेख वरील सनदेंत खचित् आला असता. शिवाय असा एक प्रश्न उद्भवतो कीं, सय्यद अनुकूल असल्यावर सनदा एकदां सोडून दहादां देखील मिळाल्या असत्या; मग त्या रक्षण करण्याच्या कामीं बाळाजीपंतासारख्या मातबर मनुष्याचा जीव धोक्यांत घालण्याचें प्रयोजन काय ?

बाळाजी महादेव यांचा काळ झाल्यावर पेशव्यांनीं रामाजी महादेव यांस फडनिशी दिली. स. १७२० सालीं बाळाजी विश्वनाथ पेशवे हे मृत्यु पावले. त्या मागून चार वर्षांनीं रामाजी महादेव हेही मृत्यु पावले. याप्रमाणें वेळासचे महाजन त्रिवर्ग भानु व श्रीवर्धनकर देशमुख हे घांटावर आल्यावर वीस वर्षांत एकामागून एक मरण पावले. भट व भानु यांचा

१ रामाजी महादेव फडनवीस हा स. १७५५ म्हणजे शके १६७७ या सालीं कोंकणांत सरसुभेदार होता असें डफ साहेब लिहितात तें बरोबर नाहीं. रामाजी महादेव बिवलकर या नांवाचे कल्याणचे राहणारे गृहस्थ पेशवाईंत कोंकणचे सरसुभेदार होते त्यांसच उद्देशून साहेबांचें लिहिणें असावें

परस्परांवरील विश्वास व अकृत्रिम प्रेम हें पहिली पिढी संपतांच नष्ट झालें असें नाहीं. बाळाजी विश्वनाथ यांच्या मृत्यूनंतर बाजीराव पेशव्यांनीं भानूंचे कांहींएक उणें पडूं न देतां पूर्वीप्रमाणेंच घरोबा चालविला. रामाजी महादेव यांचे पुत्र बाबूराव रामचंद्र व बाळाजी महादेव यांचे पुत्र जनार्दन बल्लाळ हे लहान पांच साडेपांच वर्षांचे होते, म्हणून त्याचें फडनविशीचें काम त्यांच्या एका आप्ताकडून पेशवे घेत असत. पुढें हे दोघे मुलगे मोठे झाल्यावर आपल्या दरकाचें काम स्वतःच पाहूं लागले. नानासाहेब पेशवे, रघुनाथराव दादा, किंवा सदाशिवराव भाऊ यांनीं जितक्या म्हणून स्वाऱ्या केल्या त्यापैकीं प्रत्येक स्वारीबरोबर बाबूराव रामचंद्र किंवा जनार्दन बल्लाळ या दोघांतून कोणास तरी नेहमीं जावें लागे.

जनार्दन बल्लाळ फडनवीस यांची स्त्री रखमाबाई ही पानिपतच्या स्वारींत तरवार गाजवून मरण पावलेले प्रख्यात शूर सरदार बळवंतराव मेहेंदळे यांची भगिनी होय. या बाईस एकच अपत्य झालें. तें अपत्य बाळाजी जनार्दन उर्फ नाना फडनवीस हे होत. नानांचा जन्म सातारा येथें शके १६६३ दुर्मति नाम संवत्सरे माघ कृष्ण चतुर्थी शुक्रवार (ता. १२ फेब्रु. स १७४२.) या दिवशीं चित्रा नक्षत्रावर झाला. नानांची जन्मपत्रिका मेणवली येथें आहे. ती एवढी मोठी आहे कीं, छापल्यास तिचें एक स्वतंत्र पुस्तक होईल. तींतून आम्ही नानांच्या जन्मकालासं-

१ स्वस्तिश्री नृपशालिवाहन शके १६६३ दुर्मति नाम संवत्सरे उत्तरायणे शिशिरर्तौ माघे मासि कृष्णपक्षे चतुर्थ्यां जन्मतिथौ भृगुवासरे घ. ४३ प. ३० चित्रा जन्मनक्षत्रे घ. ६० प. ० तृतीयचरणे राक्षसगणे शूद्रवर्णे त्वष्टादैवत्ये व्याघ्रयोनौ गंडयोग घ. १९ प. १४ वर्तमानवृद्धियोगे बालवकरणे शततारकामहानक्षत्रे कुंभस्थिते सूर्ये तुलास्थिते चंद्रे कुंभस्थिते भौमे कुंभस्थे बुधे कर्कस्थे गुरौ कुंभस्थिते शुक्रे वृषभस्थिते राहौ सिंहस्थिते शनौ वृश्चिकास्थिते केतौ एवं नवग्रहशुद्धौ सूर्यास्तादात्रौ गत घ. ११ प. १० एवं समये तुलालग्ने शुक्रगृहे चंद्रहोरायां शनिद्रेष्काणे गुरु नवमभागे शुक्र द्वादशांशे बुध त्रिंशांशे एवं षड्वर्गशुद्धौ षडंशे परषट्के सौजन्यान्वितौदार्यादिगुणसंपन्न राजश्री भानू इत्युपनाम्ना जनार्दनपंतेति व्यवहारिक नाम्नां भार्योभयकुलानंददायिनी रखुमाबाईति व्यवहारिक नाम्नी प्रथमं सगुणं

बंधीं मुजबी मजकूर मात्र जशाचा तसाच उतरून घेऊन खालीं टीपेंत दिला आहे. तो ज्याची मर्जी असेल त्यानें वाचून पाहून फलज्योतिषाची व नानांच्या चरित्राची जुळेल त्याप्रमाणें सांगड घालावी.

---

सुपुत्रमजीजनत्. तस्यावकहडाचक्रोपादिष्ट नाम रामचंद्रेति व्यवहारिक नाम......

या पत्रिकेंतील भावकुंडली व ग्रहकुंडली खालीं लिहिल्याप्रमाणें—

ग्रहकुंडलीयम्



भावकुंडलीयम्



# प्रकरण दुसरें.

## बाल्य व तारुण्याचा प्रारंभ.

नानांचे वडील जनार्दन बल्लाळ आणि चुलत चुलते बाबूराव रामचंद्र हे एकत्रच रहात असत. दोघेही नेहमीं मोहिमेवर गेलेले असत, त्यामुळें प्रपंचाचीं कामें आणि मुलांचें शिक्षण यांचा भार सर्वस्वीं घरच्या बायकांवरच होता. बाबूराव फडनवीस यांचा मुलगा मोरोबादादा हा नानापेक्षां वयानें थोडासा लहान होता. दोघेही मुलगे आपापल्या आयांचे एकूलते एक आणि लाडके होते त्यामुळें मुंजी होईपर्यंत कोणी त्यांकडे विशेषसें लक्षच दिलें नाहीं. त्यानंतर पेशव्याचे चुलतभाऊ सदाशिवराव भाऊसाहेब यांनीं नाना व मोरोबा यांस आपले पुतणे विश्वासराव व माधवराव यांजवळ ठेवून या चौघा मुलांकडून विद्याभ्यास आस्थेनें करवून घेण्याची सुरवात केली. त्यावेळचें शिक्षण हल्लींप्रमाणें विशेषसें भानगडीचें नव्हतें. वळणदार व जलद लिहितां येण्याजोगें अक्षर, दप्तरी जमाखर्च व हिशेब, स्वराज्यांतील सरकारी व जहागिरी मुलखाच्या जमाबंदीची व्यवस्था वगैरे विषयांचें ज्ञान, मराठी राज्याचा त्रोटक इतिहास, घोड्यावर बसणें आणि तरवार, भाला, बंदूक वगैरे हत्यारांचा उपयोग करण्यांत कौशल्य हेंच त्यावेळचें सर्वांत उच्चशिक्षण होय ! जोर, जोडी, कुस्ती, नमस्कार वगैरे शारीरिक व्यायाम मात्र प्रत्येक मुलाकडून सक्तीनें करवून घेण्यांत येत असे. त्याशिवाय संध्या, रुद्र, पवमान, पुरुषसूक्त वगैरे पाठांतरही ब्राह्मणांच्या मुलांना जरूर शिकावें लागे.

नाना व मोरोबा यांचे स्वभाव भिन्न भिन्न होते. मोरोबाचा स्वभाव हूड व धाडसी असून ते अंगानें चांगले घष्टपुष्ट होते. त्यामुळें घोड्यावर बसणें, दांडपट्टा, कुस्ती वगैरे शारीरिक व्यायामाची त्यांना हौस असे आणि ते त्या कलांत लवकर तयार झाले. नानांचा स्वभाव पहिल्यापासून एकलकोंडा व भिडस्त असे आणि त्यांची शरीराची काठीही मजबूत नव्हती, त्यामुळें शारीरिक व्यायामाचा त्यांस कंटाळा येई. भानूंचें घराणें

हें मुत्सद्यांचें घराणें होतें हें खरें. परंतु त्यावेळीं मुत्सद्यांनाही नेभळट मनगटें बाळगण्याची सोय नव्हती ! मराठी राष्ट्र हें एक जात लढवय्यांचें राष्ट्र होतें. तत्कालीन स्त्रियासुद्धां लढाऊपणांत प्रसंगीं पुरुषापेक्षां जास्त पौरुष दाखवित असत ! अशा त्या काळांत नानांनीं युद्धविद्या शिकण्यांत आणि शरीरसामर्थ्य कमावण्यात जी अनास्था दाखविली ती मात्र त्यांना जन्मभर भोंवली !

नानांच्या प्रकृतीसंबंधें या ठिकाणीं दुसरीही एक गोष्ट नमूद केली पाहिजे. सोळा वर्षांचें वय होण्यापूर्वींच त्यांवर विषयवासनेचा भयंकर पगडा बसला. ईश्वरोपासनेंत सर्वदा निमग्न होऊन राहिलें म्हणजे तरी कामवासनेचा आपणास विसर पडेल अशा समजुतीनें नाना पुणें सोडून गोदावरीतीरीं श्रीक्षेत्र कायगांव टोंकें येथें गेले व तेथील देवासमीप त्यांनीं अतिरुद्राचें अनुष्ठान स्वतः केलें. या आपल्या वैगुण्याबद्दल त्यांना अतीशय खंती वाटत[1] असे. जागृत सदसद्विवेकबुद्धीमुळें या बाबतींत नानांच्या हातून सौजन्य आणि सभ्यपणा यांचा अतिक्रम कधींच घडला नाहीं. इतकेंही असून नानांच्या कामुकतेबद्दल त्यांच्या शत्रूंनीं त्यावेळीं बऱ्याचशा कंड्या उठविल्या आणि त्यांपैकीं कांहीं अजूनही प्रचलित आहेत !

बुद्धिसामर्थ्यांत मात्र नाना व मोरोबा यांमध्यें जमीनअस्मानाचा फरक होता. नानांची बुद्धि कुशाग्र आणि प्रगल्भ असून कोणत्याही विषयाचें आकलन त्यांना अत्यंत जलद करतां येत असे. बारा तेरा वर्षांच्या वयांत त्यांनीं संपादिलेली विद्या, त्यांची तरतरीत बुद्धि आणि समयोचित व प्रौढपणाचें भाषण या गोष्टी पाहून नानासाहेब व भाऊसाहेब या उभयतां बंधूंची त्यांवर अत्यंत मर्जी बसली. नानासाहेब पेशव्यांची कारकीर्द म्हणजे मराठी सत्तेचा परमावधीचा काल होय. त्या कारकीर्दींत मराठ्यांचे सेनासमुद्र दिल्लीपासून रामेश्वरापर्यंत अनिरुद्ध संचार करीत असत आणि त्यांचें राजकारण तर असें सर्वव्यापी बनलें होतें कीं, हिंदुस्थानांतील

---

१ या आपल्या वैगुण्याबद्दल नानांना किती खंती वाटत असे आणि उपाय करून शेवटीं त्यांना कशी उपरति झाली हें त्यांनीं स्वतःच एके ठिकाणीं लिहून ठेविलें आहे. ( का. संग्रह पत्रे यादी नं. ५१ पहा. )

एकही सत्ताधीश त्यांच्या तडाख्यांतून धडपणें सुटला नाहीं! नानांना या सर्व गोष्टी पेशव्यांजवळ राहून सूक्ष्मपणें आणि प्रत्यक्ष पहावयास सांपडल्या आणि त्यामुळें त्यांच्या मनांत मराठी राज्याविषयीं उत्कट अभिमान व निष्ठा उत्पन्न झाली. हे दोन गुण म्हणजे नानांच्या पुढील राजकारणाचे सारसार्वस्वच होत.

नानांचे वडील जनार्दन बल्लाळ यांना पोटशूळाची व्यथा असे. इ. स. १७५६ सालीं रघुनाथराव दादासाहेब यांजबरोबर ते उत्तर हिंदुस्थानांत स्वारीवर गेले असतांना त्यांचें दुखणें एकाएकीं विकोपास जाऊन त्यांतच त्यांचें देहावसान झालें. वडिलांच्या मृत्यूनंतर पेशव्यांनीं नानांस फडनविशीचीं वस्त्रें व पालखी वगैरे इतमाम दिला. ती तिथी मार्ग० शुद्ध अष्टमी ( २९ नोव्हें. १७५६ ) ही असून त्या दिवशीं सोमवार होता.

नानांचे पहिलें लग्न दहाव्या वर्षी झालें. त्यांच्या स्त्रीचें नांव यशोदाबाई. ही रघुनाथ सदाशिव गद्रे या नांवाचे पुण्यांत कोणी गृहस्थ होते त्यांची कन्या होय. आजपर्यंत भानूंचें सर्व कुटुंब एकत्रच रहात होतें. दिवसेंदिवस घरांत बायकांचें पटेना, विशेषतः नाना व मोरोबा यांमध्यें थोडेंसें वैमनस्य आलें, त्यामुळें नानानीं चुलत्यापासून वडिलार्जित दौलतीचा निम्मा हिस्सा घेतला आणि ते आपली आई व बायको यांसह निराळे राहूं लागले.

नानांचे चुलतचुलते बाबूराव रामचंद्र यांवरही पेशव्यांची चांगली मर्जी होती. फडनवीस घराण्यांत आतां ते वडील असल्यामुळें फडणिशीच्या दरकाचीं व इतर दरबारी कामें संभाळण्याची सर्व जबाबदारी मुख्यत्वें त्यांजवरच होती. नानांचें वय लहान—त्यांतून त्यांचें शरीर अतिशय अशक्त त्यामुळें पेशव्यांच्या स्वारीबरोबर जाण्याचा प्रसंग त्यांना फारसा येत नसे. इ. स. १७५७ सालच्या श्रीरंगपट्टणच्या मोहिमेंत ते हजर होते हा नानांचा पहिलाच प्रवास होय.

सर्व महाराष्ट्रास अत्यंत अनिष्टकारक जें शके सोळाशें ब्यायशीं साल ते प्रलयकालरात्रीप्रमाणें समीप येऊन ठेपलें. त्यापूर्वीच शिंदे व होळकर यांच्या फौजांची अबदालीनें दाणादाण केल्याचीं वर्तमानें पुण्यास येऊन

पोंचलीं होतीं आणि या पराभवाचा प्रतिकार करण्याची तजवीज चालली होती. इ. स. १७६० च्या मार्चमध्यें सदाशिवराव भाऊसाहेब व पेशव्यांचे ज्येष्ठ पुत्र विश्वासराव हे साठ सत्तर हजार फौज घेऊन हिंदुस्थानास जावयास निघाले. नर्मदेपलीकडे गेल्यावर शिंदे, होळकर, गायकवाड वगैरे सरदारांच्या फौजा या स्वारींत सामील झाल्या. या स्वारीबरोबर जाऊन उत्तर हिंदुस्थानांतील क्षेत्रें पहावीं, जगत्प्रसिद्ध देवस्थानांचें दर्शन घ्यावें, गंगा यमुनादि पवित्र नद्यांच्या जलांत स्नान करावें असा नानानीं बेत केला. त्यांच्या मातुश्रींचीही तशीच इच्छा होती म्हणून ते आपली आई व बायको यांस बरोबर घेऊन स्वारीबरोबर निघाले. लांबचा प्रवास–त्यांतून अबदाली सारख्या निर्दय शत्रूशीं गांठ, याकरितां बायकामुलें तरी बरोबर घेऊं नयेत हा विचार कोणींच केला नाहीं. खुद्द भाऊसाहेब यांची पत्नी पार्वतीबाई व शिवाय दुसऱ्या शेकडों थोर थोर सरदार लोकांचीं मुलें माणसें स्वारींत होतीं. या बिचाऱ्यांपैकीं कित्येकांचे धडपणें स्वदेशास पुनः पाय लागले असतील तें भगवंतास ठाऊक !

हिंदुस्थानचें हवापाणी नानांस मुळींच मानवलें नाहीं. आमांशाच्या विकारानें ते वारंवार हैराण होत. भाऊसाहेबांचें नानांवर इतकें ममत्व असे कीं, अशी नानांची प्रकृति बिघडली म्हणजे ते आपला मुक्काम करीत व थोडा आराम पडल्यावर त्यांस बरोबर घेऊन फौजेस जाऊन गांठीत. मराठी लष्कर मथुरेजवळ जाऊन पोंचल्यावर नानांनीं त्या ठिकाणीं आठ दहा दिवस मुक्काम केला. मथुरा, गोकुळ वृंदावन हीं क्षेत्रें त्यांनीं पाहिलीं आणि तेथील पुरातन देवतांचें त्यांनीं भक्तिभावानें दर्शन घेतलें. भगवान् श्रीकृष्ण परमात्म्याची ही बाललीलेची भूमि पाहून त्यांना अत्यंत प्रसन्नता वाटली. नंतर ते दिल्लीस गेले आणि भाऊसाहेबांच्या आज्ञेवरून त्यांनीं दिल्लीश्वराचें दर्शन घेतलें. बादशहानें नानांशीं बहुत कृपायुक्त भाषण करून आपल्या अंगावरचा पोषाख उतरून त्यांस बक्षीस दिला. नंतर नाना भाऊसाहेबांच्या छावणींत जाऊन पोंचले.

पानिपतच्या मोहिमेचें सविस्तर वृत्त या ठिकाणीं देण्याचें प्रयोजन

1. का. सं. पत्रें यादी नं. ५३.

नाहीं. ही मोहीम इ. स. १७६० च्या मार्चपासून पुढील वर्षाच्या जाने-वारीअखेरपर्यंत चालू होती. नोव्हेंबरपर्यंत मराठे पठाणांना शिरजोरच होते. त्यानंतर मराठ्यांनीं पानिपताभोंवतीं खंदक खणून आंत स्वतःला कोंडून घेतलें आणि तेथून त्यांच्या विपन्न दशेला प्रारंभ झाला. एकाच ठिकाणीं अडकून पडल्यामुळें त्यांच्या लष्करांत भयंकर उपासमार होऊं लागली. शत्रूशीं प्रत्यहीं लहानमोठीं युद्धें होतच होतीं. ता. ७ दिसेंबर रोजीं नानांचे मामा बळवंतराव मेहेंदळे यांनीं पुढाकार घेऊन गिलच्यांशीं भयंकर युद्ध केलें. त्या प्रसंगीं बळवंतरा-वांनीं मोठा पराक्रम करून जयश्री मराठ्यांकडे ओढून आणली होती, परंतु ऐन वेळीं ते गोळी लागून ठार झाले, त्यामुळें शत्रूला छावणींत परत जाण्यास वाव सांपडला. बळवंरावांच्या स्त्रीनें सहगमन केलें. युद्धा-पूर्वी नवऱ्याचें आणि तिचें झालेलें संभाषण आणि तदनंतर सती जाण्या-पूर्वीचें तिचें वर्तन हें करुणरसानें परिप्लुत प्रसंग भाऊसाहेबांच्या बखरींत वर्णिले आहेत; ते वाचून ज्याच्या डोळ्यांस पाणी येणार नाहीं असा कोण आहे !

नानांना या स्वारींत बसलेला दुःखाचा हा पहिला धक्का होय. असे प्रसंग या स्वारींत त्यांजवर अजुन कितीतरी कोसळावयाचे होते ! इ. स. १७६१ च्या जाने. च्या चौदाव्या तारखेस पानिपतचा शेवटचा घनघोर रणसंग्राम झाला. या युद्धाची हकीगत जगत्प्रसिद्ध आहे. सायंकाळ-पर्यंत तुंबळ युद्ध होऊन मराठ्यांची फौज उधळून गेली त्यावेळीं हजारों लोकांची कत्तल उडाली. सकाळपासून नाना भाऊसाहेबांजवळच होते. बापूजीपंत या नांवाच्या कोणी गृहस्थानें नानांस समरभूमि सोडून जाण्या-चा बोध केला, परंतु नानांनीं तो ऐकला नाहीं. तिसरे प्रहरीं विश्वास-राव अकस्मात् गोळी लागून ठार झाले. विश्वासरावाच्या अंबारीस लागूनच भाऊसाहेबांची स्त्री पार्वतीबाई हिची अंबारी होती. विश्वास-रावाचा मुर्दा पाहून पार्वतीबाई ऊर व कपाळ बडवून घेऊन शोक करूं लागली. तिजजवळ नानांची आई बसली होती. तिनें विचार केला कीं, पार्वतीबाईच्या शोकानें विश्वासरावांच्या मरणाचें वर्तमान आतांच

चोहींकडे पसरून फौजेचा हिरमोड होईल. याकरितां तिनें धैर्य धरून पार्वतीबाईचा निषेध केला कीं, 'बाई, रडें ईश्वरें ओढूनच आणलें आहे, एवढ्यावरच मुक्त झालां असा अर्थ नाहीं. अजूनही सर्वत्र महा अनर्थापात आहे. यांत ईश्वर पार पाडील तर बरें. नाहींतर रडें लागलेंच आहे. तोंपावेतों दम खावा!"

सर्व फौज पळून जाऊन एकाएकीं आकाश कोसळल्याप्रमाणें झालें तरी तो निधड्या छातीचा पुरुष भाऊसाहेब तिळप्राय डगमगला नाहीं. तो अचाट पराक्रम करून शेवटपर्यंत लढतच होता. सायंकाळच्या सुमारास गर्दी होऊन भाऊसाहेब अकस्मात् दिसेनासे झाले, तेव्हां इतर लोकांबरोबर नाना फडनवीसही पळाले नाना कांहीं शिपाई नव्हते. होळकर व गायकवाड यासारखे फौजबंद सरदार ज्या रणांतून पूर्वींच पळून गेले, तेथून जीव बचावण्यासाठीं आपणांसही पळ काढावा लागला याबद्दल नानांच्या मनास खंती वाटण्याचें कांहीं कारण नव्हतें. तथापि भाऊसाहेब दिसेनासे झाले असतां तेथेंच लढतां लढतां प्राणत्याग करावा, तो न करून रणभूमि सोडून आपण पळून आलों याविषयीं नानांस फार पश्चात्ताप होत असे. याविषयीं त्या कृतज्ञ व थोर मनाच्या पुरुषाचे उद्गार अत्यंत हृदयवेधक आहेत. " लक्ष सैन्य, त्यांत मोठे मोठे सरदार असतां एकही त्या समयीं श्रीमंतांस आत न जाहला. बहुत दिवस अन्न भक्षिलें. ( भाऊसाहेबांनीं ) कृपा पुत्रवत् केली. तितकें चांगला काळ होता तेव्हां केशास धक्का लागल्यास प्राण दऊं अशा प्रतिज्ञा, परंतु ईश्वरघटित विपरीत काळ, त्यास सोबती कोण होतो? सर्व सुखाचे सोबती! भोजन आदरेंकरून करावें, वस्त्रें, जवाहीर, जहागिरी घ्याव्या. निदानीं इतकें असून ज्यांचे देहाचें ठिकाण कोणास ठाऊक नाहीं!"

लढाईनंतर झालेली हकीगत आम्ही नानांच्याच शब्दांनीं वाचकांस कळवितों. " मी सायंकाळचे दोन घटका दिवसास घोड्यावर पानिपतांत आलों. त्या देशाचा मार्ग अगदीं ठाऊक नाहीं. तेथें परमेश्वरें वाट दाखवावयापुरते रामाजीपंत उभे होते. सांगू लागले, घोडें वस्त्रें

१ का. सं. पत्रें नं ५३.

टाकून द्यावीं. त्यावरून सर्व टाकून शुद्ध लंगोटी लावून बसलों. रात्र जाहल्यावर चाललों. तों एका कोसांत तीनचार वेळ शरीरास हात लावून टोपीवाल्यांनीं झाडा घेतला. दर खेपेस समाममेंचे दहा वीस तोडून टाकीत, त्यांत मी राहिलों. हे सत्ता ईश्वराची. परंतु बापूजीपंत, रामाजीपंत रहातच गेले. तों तेच शत्रु येऊन बापूजीपंत, रामाजीपंत वगैरे यांस जखमी भारी केलें. पडले. मी एकटा राहिलों. तों गवतांत गेलों. ईश्वरें तृणेंकरून माझें रक्षण केलें. त्यांस मोहिनी घातली. सर्वांस मारिलें असतां मी जवळ असतां न मारिलें व गवत लांब असतां जाऊं दिलें. पुढें तें गेल्यावर जाऊं लागलों. तों पुढें मागती दोन कोसांवर दुसरे दृष्टीस पडले. तेव्हां मागती तृणांत जाऊन बसलों. तों जवळ येऊन काढूं लागले. ते समयीं त्यांतीलच एका वृद्धाचे मनांत संचार करतां झाला कीं, कशास मारतां! मग गेले. तदनंतर माझी शक्ति पानिपतावर बहुत क्षीण, आमविकारादि विकारयुक्त, अन्न चालेना, असा मी, त्याजवर दयासमुद्र सांबसदाशिव जो याणें कृपा करून शरीर अशक्त, ऊन पाहिलेंच नाहीं, व पादचारी अभ्यास नसतां सोळा सतरा कोश अन्नउदकाव्यतिरिक्त आलों. क्षुधा तिसरे प्रहरीं लागली. तेव्हां बोरीचा पाला सांपडला तो खाऊन पाहिला. तो तोंडांत जाईना. तसाच सायंकाळीं एका ग्रामाबाहेर आलों. तों एका बैराग्यानें पीठ आणून दिलें त्याची भाकर खादली. ती अमृताप्रमाणें लागली. नंतर निद्रा केली. प्रातःकाळीं गंगासहस्रनाम म्हणत ईश्वरनामस्मरण करीत चाललों."

मार्गांत एका गांवामध्यें कोणी सावकार रहात होता. त्यानें त्या दिवशीं नानांस घरीं बोलावून नेऊन त्यांचें उत्तम आदरातिथ्य केलें. तेथेंही शत्रूनें पाठलाग केला म्हणून त्या सावकारानें नानांस एका गाडींत बसवून जयनगराकडे रवाना करून दिलें. वाट चालतां चालतां त्यांस संशय आला कीं, या सावकाराच्या मनांत आपणास कांहीं तरी दगा करावा असें आहे. मग ते गाडी सोडून पायींच मार्गक्रमण करूं लागले. कांहीं अंतरावर लष्करापैकीं चार पांच दक्षिणी माणसें भेटलीं त्याबरोबर सात मजला करून नाना रेवडीस पोचले. या गांवीं बालेराव नांवाच्या चौघा बंधूंनीं आश्र

रामजीदास जोशी नांवाच्या एका गृहस्थानें नानांचें उत्तम प्रकारें आगतस्वागत केलें. याच मुक्कामीं त्यांस जिगनीस नारोपंत गोखले यांच्या घरीं आपली स्त्री खुशाल येऊन पोंचल्याचें वर्तमान कळलें.

नानांची स्त्री यशोदाबाई हिचें वय त्यावेळीं फार झालें तर सोळा सत्रा वर्षांचें असेल. पण संकट गुदरलें म्हणजे अल्पवयांत देखील मनुष्यास स्वसंरक्षणाचे उपाय सुचतात. यशोदाबाई " रणांतून बाहेर निघाल्या-वरी तिनें घोडी टाकून दिली. ती पायउतारा होऊन अंगावरील दागिने काढून फाटकें वस्त्र नेसून अंगास माती लावून दिल्लीच्या रोखें गेली. " पुढें तीस सोबत मिळून ती जिगनीस सुखरूप येऊन पोंचली.

मग नाना जिगनीस नारोपंत गोखले यांजकडे गेले. तेथें कांहीं दिवस राहिल्यावर ते बायकोस बरोबर घेऊन दिगेस गेले. तेथें पान-पतच्या अनर्थांतून वांचून आलेले हजारों दक्षिणी लोक गोळा झाले होते. नानांनीं याठिकाणीं महिनाभर मुक्काम केला. आतांपर्यंत नानांनीं चोहोंकडे माणसें पाठवून आपल्या आईबद्दल पुष्कळ शोध केला परंतु त्यांच्या प्रयत्नांना बिलकूल यश आलें नाहीं. शेवटीं अगदीं निराशा झाल्यावर नाना दिगेहून निघून धोलपुरावरून ग्वालेरीस आले आणि तेथून त्यांनीं दक्षिणेचा रस्ता धरिला. आपली आई मारली गेली असावी व ती आतां जिवंत सांप-डणें अशक्य आहे असा त्यांचा ग्रह झाला होता. अशा स्थितींत असतां ती अबदालीच्या लष्करांत कैदेंत आहे अशी अफवा त्यांच्या कानीं पड-ल्यावरून त्यांनीं शिरोंज प्रांत माळवा येथून पेशव्यांचे वकील दामोदर-राव हिंगणे दिल्लीस होते त्यांस एक पत्र लिहिलें आहे. त्यांत ते लिहि-तात -"[1] तीर्थरूप मातुश्रीची खबर अबदालीचे लष्करांत आहे म्हणून लागली आहे. आपण त्यांचे लष्करांत गेले असले तर फारच उत्तम झालें. नसले गेले तर जाऊन शोध करावा. आम्हीं द्रव्याचे किती संग्रही आहों हें तुम्हांस ठाऊकच आहे. तुम्हीं ज्याप्रमाणें गृहस्थपण व भलेपण मिळ-विलेंत, पैक्यावर नजर न दिलीत, त्याप्रमाणेंच आमचे वडिलांनीं व आम्हीही भलेपण मिळवीतच गेलों. मोठ्या घराचा पोकळ वासा याप्र-

1 अधिकारयाग पृ० २

माणें आव आहे! याकरितां माझ्या शक्तीप्रमाणें जें द्यावयास पडेल तें देऊं करून-निदान माझें सर्वस्व देऊं करून-त्यांची मुक्तता होय हेंच करावें. हें काम झालियानें करोडों कामें केलींशीं होतील. मुक्त जाह. लियावर जातीविशीं शोध पुरता करावा. जर यथास्थित प्रकार आहे तर देशास पाठवावी. नाहींतर प्रयागास (गंगेंत देहत्याग करण्यासाठीं) पर. भारेंच रवानगी करावी. जर शुद्धच आहेत आणि त्यांचा आग्रह यात्रेस जावयाचा असला तरी त्यांस पाठवावी! मनांत गोष्टी सोडविण्याच्या फारच येतात त्या किती लिहाव्या? कदाचित् ब्राह्मण्यास आंचवली असली, तथापि सर्वस्व खर्च करून प्रयागास पाठवून द्यावी म्हणजे पुत्र. धर्माचें सार्थक!"

आईची आपल्या मुलाशीं कायमची ताटातूट होणें, तीही अशा घोर प्रसंगामुळें होणें यासारखी हृदयद्रावक गोष्ट संसारांत कोणतीच नाहीं! त्यातून नानांसारख्या मातृभक्तांस ती परम दुःसह झाली असेल. तथापि अशा प्रसंगीं ते स्वधर्माच्या कर्तव्यास पराङ्मुख झाले नाहींत! मातोश्री शुद्ध असो वा नसो, सर्वस्व भरीस घालून तिची मुक्तता करावी, यांतच तिच्या पोटीं जन्म घेतल्याचें सार्थक, याप्रमाणें जरी त्यांचा संकल्प दृढ होता, तरी ती भ्रष्ट झाली असल्यास तिनें गंगेंत देह टाकावा हेंच विहित होय असाही त्यांचा निर्धार होता! पुढें दक्षिणेंत आल्यावर आपली आई मरण पावल्याची त्यांस खात्रीलायख बातमी कळल्यावर तिच्या उत्तरकार्या. करितां ते टोकें येथें गेले. तेथून त्यांनीं या मजकुराचें पत्र हिंगणे यांस लिहिलें आहे. त्यांतच आणखी मजकूर आहे कीं, "आमचे महादेवाची तसवीर [दिल्लीस] लाला बाळ गोविंद याजपाशीं आहे. ती जरूर आणून राजश्री त्रिंबक शिवदेव याजपाशीं देववावी म्हणजे आम्हांस पावेल. ही गोष्ट जरूर जाणून करावी. महादेवाचें चित्र आधीं पाठवावें." आपली रोजचें ध्यान करण्याची महादेवाची तसबीर टोंक्याहून पांचशें कोसावर एका माणसाजवळ राहिली होती ती पाठवून देण्याविषयीं निकडीनें व आग्रहानें नाना या पत्रांत लिहीत आहेत! यावरून त्यांची ईश्वरनिष्ठा उत्तम रीतीनें

१ आधिकारयोग पृ. ३.

नाना फडनवीस.



**जन्म.**

शके १६६३ माघ व० चतुर्थी
ता. १२ फेब्रुआरी सन १७४२

**मृत्यु.**

शके १७२१ फाल्गुन वद्य तृतीया
ता. १३ मार्च सन १८००

व्यक्त होत आहे. वाचकांनीं ध्यानांत धरावें कीं, हें सारें लिहिणें ज्याच्या वयास वीस वर्षें पुरतीं झालीं नाहींत अशा मुलाचें आहे!

पानिपताहून फौजेच्या हलाखीचीं पत्रें देशीं आलीं होतीं त्यामुळें नानासाहेब पेशवे समागमें पन्नास हजार फौज घेऊन भाऊसाहेबांच्या सहाय्याकरितां निघाले होते. पेशव्यांची स्वारी नर्मदा उतरल्यावर त्यांस पानिपतच्या घोर संग्रामाचें वृत्त कळलें कीं, "दोन मोत्यें गळालीं, सत्तावीस मोहरा सांडल्या, रुपये व खुर्दा किती गेला याचा पत्ताच नाहीं!" ही बातमी ऐकून पेशव्यांच्या मनास जो धक्का बसला त्यांतून ते शेवटपर्यंत सांवरले नाहींत. पेशव्यांची स्वारी परत फिरून बऱ्हाणपुरास येऊन पोंचली. तेथें नाना फडनवीस श्रीमंतांस येऊन भेटले.

नानांवर श्रीमंताची कृपा असे हें पूर्वीं सांगितलेंच आहे. भाऊसाहेबासारखा बंधु, विश्वासरावासारखा पुत्र, पराक्रमी व एकनिष्ठ सरदार व लक्षावधि फौज यांचा नाश झाल्यानें शोकविव्हल झालेल्या पेशव्यांच्या मनास नानांचेंही स्मरण झाल्याशिवाय राहिलें नाहीं. ते वारंवार म्हणत कीं, नानांची प्रकृति अशक्त, त्यांचा या भयंकर अनर्थांत परिणाम कसा लागेल! श्रीमंतानीं नानांची ममतेनें विचारपूस करून त्यांच्या मुखें सर्व वृत्तांत ऐकून घेतला. तेथें चार दिवस राहून श्रीमंतांची आज्ञा घेऊन नाना टोंक्यास गेले. मागून पेशवेही तेथें आले. पुन्हां गांठ पडली. यानंतरची हकीगत नाना लिहितात कीं, "एक दिवस प्रदोष तेथें पडला, ते दिवशीं राव ( बाजीराव ) यांचें श्राद्ध म्हणून मला भोजनास बोलाविलें. मी विनंति सांगून पाठविली कीं, प्रदोष आहे. तत्रापि यावें म्हणूनच उत्तर जालें. यावरून स्वारी देवास जातेसमयीं गुरूजीकडून विचारिलें. तेव्हां आज्ञा जाली कीं, रावसाहेबांचें श्राद्ध आहे, याकरितां जरूर जरूर यावें, यावरून गेलों. श्राद्धाचे ब्राम्हण यांचीं भोजनें जालियावर खासा भोजनास बसले. एकीकडे श्रीमंत माधवराव व एकीकडे मला बसविलें व दुसरे स्त्रीकडून वाढविलें. तिला शिक्षा वाढावयाची दाखविली, अर्थात् मातुश्रीकडून लेंकरांस वाढविलें."

१ का. सं. पत्रें यादी नं. ५३.

" नंतर श्रीमंतांस विनंति केली कीं, कांहीं दिवस गंगातीरीं राहून मन स्वस्थ करावें असें ( मनांत ) आहे. त्यावरून आज्ञा जाली कीं, कांहीं दिवस रहावें. श्रीमंत कचकरून पुण्यास गेले तों शरीर क्षीणच होतें, शेवटील समय, लवकर यावें म्हणून पत्रें आलीं. त्यांचें अन्नाचें शरीर, समर्थी जवळ असावें याकरितां पुण्यास येऊं लागलों तों पारनेराअलीकडे वर्तमान आलें कीं, कैलासवास केला. श्री. दादासाहेब यांचीं पत्रें आलीं कीं, जरूर यावें. पुढें पुण्यास आलों. श्रीमंतांस देवदेवेश्वर संन्निध कैलासवास जाला, हें ऐकून श्रम जाले."

या वेळीं नानांचें वयास विसावें वर्ष संपत आलें होतें. परंतु एवढ्याशा लहान वयांत देखील या संसारांतील सुखदुःखाचे प्रसंग जे त्यांनीं पाहिले तसे सुदैवानें फारच थोड्यांच्या दृष्टीस पडतात! येथपर्यंत नानांनीं पाहिलेल्या प्रसंगांशीं त्यांच्या पुढील आयुष्यक्रमाचा निकट संबंध आहे. पूर्ववयांतील विपत्तींच्या योगानें त्यांच्या स्वभावावर कांहींशी खिन्नतेची छाया पडून राहिली ती शेवटपर्यंत नष्ट झाली नाहीं. या जगांत मनुष्याच्या कपाळीं सुखापेक्षां दुःखाचाच वाटा मोठा आहे, याविषयीं त्यांस आठवण राहाण्यासारखा प्रत्यय पूर्ववयांतच आल्यामुळे त्यांच्या वृत्तीमध्यें गांभीर्य उत्पन्न झालें; आणि चैनी, लहरी व रंगेल स्वभावाच्या लोकांचा त्यांस तिटकारा येऊं लागला. नानासाहेब व भाऊसाहेब यांनीं आपणास पुत्राप्रमाणें ममतेनें वागविलें हें ते जन्मभर विसरले नाहींत. त्यांत नानासाहेबांविषयीं तर त्यांच्या मनांत इतकें प्रेम व पूज्यबुद्धि उत्पन्न झाली होती कीं, राज्यकारभारांत काय, पण खासगी वर्तनांतसुद्धां त्यांनीं त्यांचेंच पुष्कळ अंशीं अनुकरण केलें असें दिसतें.

राज्यकारभारांत नानांस अद्यापि म्हणण्यासारखा अनुभव नव्हता. तथापि असलें जबाबदारीचें काम शिरीं घेण्यास जी योग्यता लागते ती त्यांनीं संपादिली होती. पेशव्यांच्याजवळ नेहेमीं रहाणें असल्यानें राज्यांतील मोठमोठे मुत्सद्दी, सरदार व सावकार यांशीं अनायासानें संबंध पडून यांच्या स्वभावांचीही नानांस थोडीबहुत ओळख झाली होती. राज्य-

१ का. सं. पत्रें यादी नं. ५२.

व्यवस्थेच्या कामीं खुद्द नानासाहेब, भाऊसाहेब आणि रामचंद्रबाबा या धुरंधर मुत्सद्यांचीं उदाहरणें त्यांच्या नजरेसमोर होतीं. नुसत्या पानिपतच्या स्वारीपासून नानाफडनवीसासारख्या चौकस व समंजस मनुष्यास किती प्रकारचा अनुभव प्राप्त झाला असावा !

# प्रकरण तिसरें.

## माधवराव बल्लाळ उर्फ रावसाहेब व नारायणराव यांच्या कारकीर्दी.

नाना फडनवीस यांचा राज्यकारभारांत प्रवेश त्यांच्याच म्हणण्याप्रमाणें माधवराव बल्लाळ यांच्याच कारकीर्दीपासून झाला. रावसाहेब यांस पेशवाईचीं वस्त्रें मिळाल्यावर ते अल्पवयी असल्यामुळें त्यांच्या राज्याचा कारभार रघुनाथराव दादासाहेब व त्यांचे दिवाण सखारामबापू पाहूं लागले. परंतु ही गोष्ट पेशव्यांची आई गोपिकाबाई हीस आवडेनाशी झाली. राज्याचा सर्व कारभार आपणच आटोपून माझ्या मुलास हे दोघे भिकेस लावतील हें तिला भय होतें. आपण केलेला कारभार बाईस पसंत पडत नाहींसें पाहून दादासाहेब व सखारामबापू रागानें राजिनामे देऊन घरीं बसले. तिनें आपलीं आर्जवें करून आपणांस पुन्हां बोलवावें अशी त्यांची अपेक्षा होती. पण तसें कांहीं न घडतां तिनें बाबूराव फडनवीस व त्रिंबकराव पेठे यांस कारभारी नेमिले. बाबूराव यांची दिवाणगिरी फार दिवस टिकली नाहीं. पेशवे व त्यांची आई यांच्या पक्षाचा पाडाव करण्यासाठीं दादासाहेबांनीं मोंगलांची कुमक मिळविली व घोडनदीच्या लढाईत पेशव्यांचा पराजय करून त्यांस नजरकैदेंत ठेविलें, व त्यांच्या पक्षाचे रास्ते, पटवर्धन वगैरे सरदार होते त्यांची दाणादाण करून राज्याचा सर्व कारभार पुन्हां आपल्या हातीं घेतला. यानंतर आपल्या बाजूस बळकटी आणण्याकरितां दादासाहेबांनीं

ज्या उलाढाली केल्या त्यांत त्यांनीं आज तीन पिढ्या भानूंच्या घराण्याकडे चालत आलेली फडनविशी त्यांजकडून काढून चिंतो विठ्ठल रायरीकर यांस दिली. यावेळीं दादासाहेबांचा नानांवर तादृश रोषही नव्हता व लोभही नव्हता, त्यामुळें ते देशींच राहिले. पण बाबूराव फडनवीस यांस दादासाहेबांचा इतबार न पुरल्यामुळें ते आपला मुलगा मोरोबादादा यास घेऊन मोंगलाईंत पळून गेले. या संकटाच्या प्रसंगीं नाना व बाबूराव या दोघांही फडनवीसांनीं आपलें द्रव्य मिरजेच्या किल्ल्यांत पटवर्धनांजवळ ठेविलें होतें.

पुढें लवकरच पेशव्यांची व मोंगलांची लढाई सुरू होऊन मोंगलानें देशीं येऊन पुणें जाळून लुटून फस्त केलें. पुण्याचे रहिवासी मावळांत डोंगराडोंगराच्या आसऱ्यास दडून बसले होते. नानांच्या ताब्यांत लोहगड किल्ला होता त्याच्या पायथ्यास ते व पुण्याचे इतर हजारों रहिवाशी राहिले होते. या दडणीच्या जागा परक्यांस सांपडावयाच्या नव्हत. परंतु इकडील घरभेदे मोंगलास मिळाले असल्यामुळें त्यांच्या सहाय्यानें त्यानें सुगावा लावलावून ठिकाठिकाणचे लोक लुटले. लोहगडच्या पायथ्यास शत्रूचा छापा आला तेव्हां तेथील सर्व लोक नागवले गेले. इतरांबरोबर नानांची मालमत्ता लुटली जाऊन त्यांस एक वस्त्रानिशीं लोहगडावर पळून जावें लागलें. इतकी दुर्दशा झाली तरी मोंगलानें पुण्याचा नाश न करावा म्हणून सामोपचाराच्या खटपटी करण्यास नाना चुकले नाहींत ! त्या खटपटींत त्यांस यश आलें नाहीं हें निराळें. पुढें मोंगलांशीं तह होऊन दादासाहेबांनीं माधवराव पेशव्यांच्या हातीं पुनः राज्यकारभार दिला. फडनविशीचें काम रायरीकर यांजकडून काढून पुनः पूर्वीप्रमाणें नाना व बाबूराव यांजकडे देण्याविषयीं पेशव्यांच्या आग्रहावरून वाटाघाट सुरू झाली. तेव्हां दादासाहेबांनीं आग्रह धरिला कीं, फडनवीस यांनीं दरसाल एक लाख रुपये घेऊन फडनविशी करावी. यापेक्षां ज्यास्त उत्पन्न येईल तें सरकारांत द्यावें. पण हें बोलणें फडनविसांनीं साफ नाकारलें. त्यांच्या मध्यस्थींत गोपाळराव पटवर्धन हे होते. त्यांनीं सक्त रदबदली केल्यामुळें व पेशव्यांनींही नेट

घरिल्यामुळें दादासाहेबांचें कांहीं चालनासें होऊन, त्यांनीं ता. ५ आक्टोबर १७६३ रोजीं नाना व मोरोबा यांस फडनविशीचीं वस्त्रें दिलीं.

यानंतर माधवराव पेशव्यांनीं नऊ वर्षे राज्य केलें. त्या अवधींत त्यानीं मोठमोठाल्या अनेक मोहिमांत यश मिळवून आपल्या मर्दुमीचा व मुत्सद्दीपणाचा लौकिक चोहोंकडे गाजविला, शत्रु जेरीस आणिले, आणि पानपतच्या स्वारीमुळें हीनबळ झालेल्या मराठी राष्ट्रांत पुन्हां जोम उत्पन्न केला. नानाफडनवीसांवर त्यांचा पूर्ण विश्वास असे. ते दूर परदेशीं मुलुखगिरीस जात तेव्हां किल्लेकोट, मुलूख, अठरा कारखाने, परराज्याचीं नाजुक कारस्थानें हें सर्व नानांच्या हवालीं करून जात. पाऊण पाऊण लाख फौज बरोबर घेऊन पेशवे कर्नाटकांत जात; आणि अवाढव्य प्रमाणावर सैन्याच्या हालचाली, लढाया, वेढे, छापे वगैरे मसलती स्वतःच्या मेहनतीच्या, मर्दुमीच्या आणि शहाणपणाच्या बळावर ते तडीस नेत हें खरें आहे, तरी त्यांस मिळालेल्या यशाचा कांहीं वाटा नाना फडनवीस यांस देणें वाजवी आहे. कारण कीं, एवढ्या मोहिमांस लागणारें कोट्यवधि द्रव्य राज्यांतून दक्षपणानें वसूल करून श्रीमंतांकडे फौजेच्या खर्चाकरितां वेळचे वेळीं नाना फडनवीस पाठवीत होते, दारूगोळा वगैरे सामानाचासुद्धां देशाहून तरतुदीनें पुरवठा करीत होते आणि मुख्यत्वें स्वदेशीं बंदोबस्त उत्तम रीतीनें राखीत होते म्हणूनच पेशव्यांस सर्व मोहिमा निर्विघ्नपणें पार पाडतां आल्या.

अंतर्गत कारभारांत नानांचा केवढा दरारा होता याविषयीं एक आख्यायिका आहे. श्रीमंत रावसाहेब हैदरअल्लीवर पहिली मोहीम करण्यास गेले तेव्हां त्यांचें वय सुमारें एकोणीस वर्षांचें होतें व त्यांचें कुटुंब रमाबाईसाहेब यांचें वय पंधरा वर्षांचें असावें. त्यांस पुण्यांत ठेवून श्रीमंत स्वारीस निघून गेल्यावर पहिल्याच आठवड्यांत बाईसाहेबांकडील कारकून खर्चाची याद घेऊन रीतीप्रमाणें मखलाशी करून घेण्याकरितां नानांकडे आला, तेव्हां त्यांनीं ती पाहून तींतून विड्यांच्या पानांचें कलम काढून टाकलें. कारकुनास आश्चर्य वाटून त्यानें तकरार केली, तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं, घरीं श्रीमंत परत येतपर्यंत बाईसाहेबांस विड्यांच्या पानांचें प्रयो-

जन नाहीं, हा खर्च गैरवाजवी सबब बंद केला आहे! बाईचें वय त्यावेळीं लहान होतें. त्यांस फार राग आला. त्यांनीं ती गोष्ट श्रीमंत परत आल्यावर त्यांच्या कानावर घातली. परंतु श्रीमंतांनीं सांगितलें कीं, नानांचें म्हणणें वाजवी आहे. या कामीं तुमच्या भिडेमुळेंसुद्धां मला त्यांस दोष देतां येत नाहीं.

इ. स. १७६८ सालीं दादासाहेबांनीं बंड केलें तेव्हां पेशव्यांनीं त्यांचा पराजय करून त्यांस धरून आणून पुण्यांत शनवारच्या वाड्यांत कैदेंत ठेवलें. त्यानंतर श्रीमंत परमुलखीं स्वारीस गेले म्हणजे दादांचा बंदोबस्त राखण्याचें हें एक नवीनच काम नानांच्या शिरावर येऊन पडलें. हें काम मोठें नाजूक व फारच जोखमीचें होतें, पण तें त्यांनीं मोठ्या दक्षतेनें बजावलें. या कामीं त्यांजवर दादासाहेब व तत्पक्षीय लोक यांचा सहजींच रोष झाला; तथापि त्यांनीं त्यास कधीं जुमानलें नाहीं.

इ. स. १७७२ सालीं रावसाहेब पेशवे क्षयाच्या विकारानें अत्यवस्थ झाले. त्यावेळीं त्यांच्या प्रेमांतली व विश्वासू मंडळी रात्रंदिवस जवळ असे. त्यांत नाना फडनवीस व हरीपंत फडके हे असत. जिवास किंचित् आराम वाटे तेव्हां नाना व हरीपंत यांजवळ श्रीमंत राज्यकार-भारासंबंधें पुढील तरतुदीच्या नेहमीं गोष्टी बोलत. पण त्या सर्व तर-तुदी सफळ होणें हें नारायणराव यांच्या वर्तनावर सर्वस्वीं अवलंबून होतें. नारायणरावांविषयीं तर श्रीमंतांचा ग्रह चांगला नव्हता. आपल्या पाठी-मागें हा हेकेखोरपणानें आपला नाश करून घेईल असें रावसाहेब नेहमीं म्हणत असत. ता. १८ नोव्हें. स. १७७२ रोजीं रावसाहेब पेशवे कैलासवासी झाले. मरणापूर्वीं दादासाहेब यांस कैदेंतून मुक्त करून त्यांच्या आणि सखारामबापूंच्या हातीं नारायणराव यांचा हात देऊन पेशव्यांनीं पुढील राज्यकारभारासंबंधीं यथास्थित निरवानिरव केली होती.

श्रीमंत रावसाहेब यांचें उत्तरकार्य झाल्यावर तेरावे दिवशीं दादासाहेब व नारायणराव या चुलत्या पुतण्यानीं संकल्प केला कीं, उभयतानीं निद्रा मात्र पृथक् स्थळीं करावी, परंतु जेवणखाण, बसणें उठणें एकत्र व्हावें, परस्परांनीं तिळप्राय विकल्प न आणितां प्रेमानें परस्परांचें मनोधारण रक्षून

रहावें. परंतु हा उभयतांचा समेट महिना दोन महिनेही घडपणें टिकला नाहीं!

हा द्वैतभाव वाढतां वाढतां अविचारी लोकांच्या सल्ल्यावरून नारायणरावांनीं दादांस पुनः प्रतिबंधांत घातलें. हें कृत्य करूं नये म्हणून नाना फडनवीस व सखारामबापू यानीं श्रीमंतांस सांगितलें परंतु त्यांनीं ऐकिलें नाहीं. कैदेंतून सुटून जाण्याविषयीं दादानीं हैदरअल्लीकडे, व नागपूरच्या भोसल्याकडे कांहीं कारस्थान केलें. तें कारस्थान उघडकीस आल्यामुळें श्रीमंतांनीं दादासाहेब व आनंदीबाई याजवर कैदेची सक्ती अधिक अधिक करून त्यांचा छळ केला. नारायणरावसाहेब आपल्या थोरल्या भावाची तरतरी व तापटपणा यांचें प्रत्येक कामांत अनुकरण करीत, पण थोरल्या भावाचे उदार व प्रौढ विचार त्यांच्या अंगीं लेशमात्र नव्हते. पुढचें मागचें धोरण व माणसांची किंमत हींही त्यांस कळत नव्हतीं. सारांश त्यांच्या स्वभावांतील पोरपणा अजून गेला नव्हता. त्यांनीं सखारामबापूंचा भरदरबारांत शिवीगाळ करून उपमर्द केला! मुख्य कारभाऱ्याची ही दशा. तेव्हां इतर मुत्सद्यांच्या सल्ल्यास श्रीमंत कितपत मान देत असतील हें सहज लक्षांत येण्याजोगें आहे. नानांसारखे श्रीमंतांचे खरे हितचिंतक शहाणे मुत्सद्दी होते ते अब्रूच्या भयानें उदासीन राहूं लागले व हलक्या लोकांचें श्रीमंतांजवळ प्राबल्य होऊन त्यांच्याच मतानें राज्यकारभार चालूं लागला.

श्रीमंत दादासाहेब व तत्पक्षीय लोक यांनीं नारायणरावसाहेब यांस कैदेंत घालण्याचा कट केला. सखारामबापूंची या बेतास गर्भित संमति होती. नानांसही या कटाची कुणकुण कळली होती, परंतु श्रीमंतांजवळ उघड बोलण्याची चोरी! कारण कीं, श्रीमंतांजवळ अष्टौप्रहर राहणाऱ्या लोकांपैकींही कांहीं या फितुरांत सामील झाले होते. खुनापर्यंत मजल येईल ही अटकळ नानांच्याच काय, पण कोणाच्याच स्वप्नीं येण्याजोगी नव्हती. श्रीमंतांस कैद करण्याचीच फक्त मसलत चालली आहे एवढें मात्र नानांस कळलें होतें व त्याविषयीं त्यांनीं श्रीमंतांस आगाऊ इशारत दिली होती. "श्रीमंत नारायणरावसाहेब हूड होते. कारभारी यांचा बहुमान रक्षीत

नसत. एके दिवशीं पर्वतीस स्वारी गेली. तेथें सारे बोथाट्या खेळत होते. याप्रमाणें खेळत असतां श्रीमंतानीं नाना फडनवीस यांचें पागोटें बोथाटीनें पाडलें, आणि हसूं लागले जे, नाना, तुमचें पागोटें खालीं पडलें! तेव्हां नानांनीं उत्तर केलें कीं, मी कारकूनच आहे. माझें पागोटें पडलें यांत कांहीं आश्चर्य नाहीं. स्वामींनीं आपलें पागोटें संभाळावें! असें उत्तर केलें. पण त्यांत नानानीं ( सावधपणा धरण्याविषयीं ) सूचना केली हें कांहीं श्रीमंतांस कळलें नाहीं! श्रीमंत माधवराव यानीं मरणापूर्वी एकांतीं श्रीमंत नारायणरावसाहेब यांस सांगितलें होतें कीं, जे काय करणें तें हरीपंत यांचे विचारें करीत जा, तर कांहीं दिवस वांचशील. नाहीं तर तुझ्या जीवास काठिण आहे. असा बहुत बोध केला होता. ( फडक्यांस श्रीमंत ) कांहीं विचारीत कांहीं न विचारीत. कोणती गोष्ट पोटांतही फारशी रहात नव्हती यामुळें हरीपंत फारशी लगट करीत नव्हते.[1]" या वागणुकीचा परिणाम दादासाहेब व तत्पक्षीय मंडळी यांचा फितूर व त्या फितुराचें पर्यवसान नारायणरावसाहेबांचा खून हें होय! ( ३० आगष्ट १७७३ ).

---

## प्रकरण चवथें.

### बारभाईंचें कारस्थान व शिंदे होळकरांचें लपंडाव.

पेशव्यांचा खून होतांच पुण्याच सर्वच मुत्सद्दी व सरदार आश्चर्यमूढ झाले. काळावर नजर देऊन सर्वांनीं दादांचा अधिकार मुकाट्यानें कबूल केला. परंतु त्यांच्या हातून खुनासारखें भयंकर पाप घडलें असावें असा मात्र प्रत्येकाला संशय वाटत होता. या सार्वत्रिक असंतोषामुळेंच बारभाईंचें

---

१ हरिवंशाची बखर पान ४०

कारस्थान उभें राहिलें. पुणें दरबारांत त्यावेळीं दोन पक्ष होते. त्या दोन पक्षांना जुना पक्ष आणि नवा पक्ष अशीं नांवें देतां येतील. जुन्या पक्षांत पुरंदरे, राजेबहाद्दर, विंचूरकर, गंगाधर यशवंत चंद्रचूड, चिंतो विठ्ठल रायरीकर वगैरे सरदार व मुत्सद्दी होते. या पक्षाचे पुढारी सखारामबापू होते. बापू हे अनेक वर्षें पेशवाईचा कारभार गाजविलेले नाणावलेले मुत्सद्दी होते. सावकार व जुने शिलेदार यांजवर त्यांचें पराकाष्ठेचें वजन होतें. शिवाय हैदर, निजाम, करवीरकर, नागपूरचे भोसले यांकडे त्यांचीं सूत्रें होतीं. नव्या पक्षाचे पुढारी नाना फडनवीस हे होते. माधवराव पेशव्यांनीं ऊर्जितावस्थेला आणलेले पटवर्धन, रास्ते, पेठे, फडके वगैरे सर्व सरदार व मुत्सद्दी हे नानांचे कट्टे अनुयायी होते. नानांच्या ताब्यांत सिंहगड, पुरंदर, लोहगड वगैरे किल्ले होते. शिवाय पेशव्यांची खासगी मालमत्ता आणि सातारा संस्थानचा कारभार हींही सर्वस्वीं त्यांच्याच हातांत होतीं. शिंदे होळकर हे बापूपेक्षां नानांनाच अनुकूळ होण्याचा जास्त संभव होता. दादांना पदभ्रष्ट करण्याविषयीं दोन्ही पक्ष सारखेच उत्सुक होते. परंतु या बाबतींत पुढाकार घेण्याचें मात्र धाष्टि नानांस होईना. आपण एखादी गोष्ट करूं जावें तर बापू काय करतील असें त्यांस भय वाटत होतें. शेवटीं बापूंनींच पुढाकार घेऊन बारभाईच्या कारस्थानाची उभारणी केली. अर्थात् या कारस्थानांत बापू मुख्य असून नाना दुय्यम होते. या 'बारभाई' मध्यें बाराच असामी होते असें मात्र नाहीं. ज्यांत एकाहून अधिक जणांच्या हातांत सत्ता असते आणि विशेषतः ज्याच्या धोरणांत कांहींच ताळतंत्र नसतें त्या कारभाराला पूर्वीं 'बारभाई' असें म्हणत असत. दादा व त्यांचे पक्षपाती यानीं बापू नानांच्या या कारस्थानाला त्यावेळीं 'बारभाई' असें निंदाव्यंजक नांव ठेवलें आणि अजूनही तेंच प्रचारांत आहे! या 'बारभाईचा' पुढील बोजवारा लक्षांत घेतला म्हणजे दादांच्या पक्षपाती लोकांचें भविष्यज्ञान अचुक होतें हें मात्र मोठ्या कष्टानें कबूल करावें लागतें!

नारायणरावांचा खून झाला तेव्हां त्यांची स्त्री गंगाबाई दीड महिन्याची गरोदर होती. तिलाही मारून टाकावें, निदान तिचा गर्भपात तरी

करावा याबद्दल आनंदीबाईनें आटोकाट प्रयत्न केले परंतु या प्रयत्नांना यश न येतां तिचा गर्भ दिवसेंदिवस वाढूं लागला, तेव्हां या गुप्त कारस्थानाला जास्तच जोर आला. दादांना अधिकारभ्रष्ट करून तूर्त गंगाबाईच्या नांवानें कारभार चालवावा, पुढें तिला सुदैवानें मुलगा झाला तर ठीकच, तसें न होईल तर तिच्या मांडीवर दत्तक बसवून त्याच्या नांवानें पेशवाई चालवावी. बापूंनीं मुख्य आणि नानांनीं दुय्यम कारभारी या नात्यानें कामें करावीं अशी बारभाईची मसलत पक्की ठरली आणि त्यांना अनुकूळ अशी संधीही लवकरच प्राप्त झाली.

नागपूरचे साबाजी व मुधोजी भोसले हे भाऊ सरदारीबद्दल आपापसांत भांडत होते. दादांनीं मुधोजीला हाताशीं धरून साबाजीचें पारिपत्य करण्याचें ठरविलें. इ० स० १७७३ च्या नोव्हेंबरांत दादा पुण्याहून स्वारीवर निघाले. साबाजी भोसले हा निजामाच्या पाठीशीं पडला होता, सबब त्या दोघांचें पहिल्यानें पारिपत्य करावें, आणि नंतर कर्नाटकांत जाऊन हैदरापासून खंडणी उकळावी आणि नंतर त्याच्याच सहाय्यानें अर्काटकर नबाब महमदअली व त्याचे दोस्त मद्रासकर इंग्रज यांजवर स्वारी करून पुष्कळशी लूट मिळवावी अशी उमदी मसलत दादांच्या मनांत त्यावेळीं घोळत होती. ही भव्य मसलत तडीला नेण्यासाठीं पराक्रम, अमूप द्रव्य आणि अलौकिक बुद्धिमत्ता यांची जरूर होती. दादांच्या अंगीं पराक्रम थोडाबहुत होता, बाकी द्रव्य आणि अकल त्यांजवळ बिलकुल नव्हती! जवळच्या शागीर्दांच्या तंत्रानेंच त्यांचा सर्व कारभार चालत असे! सखारामबापू, नाना वगैरे मुत्सद्दी आजारीपणाच्या मिषानें दादांच्या स्वारींतून निघून पुण्यास परत आले आणि नंतर त्यांनीं चोंहोंकडे गुप्त पत्रें पाठवून राजकारणाचीं पुढील सूत्रें पक्कीं करण्यास सुरवात केली. निजाम व साबाजी हे या कारस्थानांत आनंदानें सामील झाले. पटवर्धन, रास्ते, पेठे, घायगुडे, पुरंदरे वगैरे सरदार दादांच्या स्वारीबरोबर होते, त्यांनाही पुण्याहून सर्व कच्चा मजकूर लिहिण्यांत आला. हे सरदार कारस्थानाला आंतून पूर्णपणें सामील होतेच. बाह्यात्कारें मात्र त्यांनीं ज्वलज्वल्य राजनिष्ठेची वर्तणूक ठेविली होती त्यामुळें दादांना असा भरंवसा वाटे कीं,

आपल्या जिवास जीव देणारे जर कोणी एकनिष्ठ सेवक असतील तर ते हेच सरदार होत!

दादांनीं त्रिंबकरावमामा पेठे यांजबरोबर पंधरा हजार फौज देऊन त्यांची साबाजी भोसल्यावर रवानगी करून दिली आणि ते स्वतः निजामाचा बंदोबस्त करून कर्नाटकांत हैदरअल्लीवर चालून गेले. त्यांची स्वारी रायदुर्गपर्यंत जाते तोंच त्यांना बारभाईच्या फिसालतीची वार्ता समजली. पुण्याहून इशारा येतांच रास्ते, पटवर्धन वगैरे सरदार दादांपासून फुटून निराळे झाले. इकडे साबाजी भोसले व मामा पेठे एकत्र झाले आणि निजामही त्यांना सामील होणार असा रंग दिसूं लागला. याप्रमाणें चोहोंकडून काहूर उठलेलें पहातांच दादांनीं हैदराला एक कोट रुपये उत्पन्नाचा मुलूख देऊन त्याची मैत्री संपादन केली. हैदराशीं केलेल्या या तहाला कल्याणदुर्गचा तह असें म्हणतात. रावसाहेब पेशव्यांनीं अविश्रांत मेहनत करून तुंगभद्रेपलीकडे राज्य संपादिलें होतें तें सर्व दादांनीं या तहांत हैदराला देऊन टाकलेंच, इतकेंच नव्हे तर, कृष्णा व तुंगभद्रा या नद्यांमधील खास स्वराज्याचा मुलूखही दिला! रास्ते, पटवर्धन वगैरे बंडखोर सरदारांच्या जहागिरी वर लिहिलेल्या स्वराज्याच्या मुलखांत होत्या, सबब तो अजीबात प्रांतच शत्रूला देऊन त्यांना जमीनदोस्त करण्याची दादांनीं ही अशी अजब युक्ति शोधून काढली! उलटपक्षीं हैदरानें कबूल केलें कीं, दादासाहेब मात्र पेशवाईचे योग्य व खरोखरीचे अधिकारी असून त्यांनाच मी दरसाल सहा लक्ष रु. खंडणी देत जाईन, बाकी गंगाबाई किंवा तिचा मुलगा किंवा पुण्याचे कारभारी हे सर्व थोतांड आहे असें मी याउप्पर मानीत जाईन!

दादासाहेबांची स्त्री आनंदीबाई ही यावेळीं नवऱ्याबरोबर स्वारींत होतीच. तिला पुण्यांत चाललेल्या कारस्थानाचा सुगावा लागतांच तिनें तेथून गंगाबाईवर मारेकरी पाठविले! ते शनवारवाड्याच्या विशेष बंदोबस्ताकरितां म्हणून राजरोसपणेंच लष्करांतून आले होते. परंतु सहजगत्या त्यांचा दुष्ट बेत उघडकीस आल्यामुळें त्यांस मारझोड करतांच त्यांनीं आनंदीबाईचें नांव घेतलें! कारभाऱ्यांनी तत्काळ जलदी करून पुण्याचा

बंदोबस्त केला आणि गंगाबाईला पुरंदरावर नेऊन ठेवून तिच्या नांवानें राज्यकारभार सुरू केला. कारभारी " गंगाबाईच्या नांवच्या सनदापत्रें व नारायणरावराव यांच्या नांवचे शिक्के करितात. चहूंकडे फौजांसही बोलावणीं गेलीं आहेत. पुण्यांतील अवघ्या सावकारांस (शनवारवाड्यांत) बोलावून नेलें होतें. त्यांनीं सखारामबापूंचे नांवचीं खतें घ्यावीं व लागेल तितका पैसा द्यावा, हें कबूल केलें. कारभाऱ्यांनीं सर्वस्व मरीस घालावें पण दादासाहेबांचें पुरतें पारिपत्य करावें, हें चित्तावर धरिलें आहे." कारस्थान इतक्या रंगरूपाला येतें तों इ. स. १७७४चा जानेवारी महिना संपत आला.

बारभाईच्या फौजेचें सेनापत्य त्रिंबकरावमामा पेठे यांजकडे होतें. हैदराशीं तह केल्यावर दादा परत फिरले ते पंढरपूरच्या सुमारें येऊन पोंचले. ता. २६ मार्च रोजीं कासेगांवच्या मुक्कामीं मामांनीं दादांच्या फौजेशीं गांठ घातली. त्या लढाईत मामांच्या फौजेची दाणादाण होऊन ते जखमी होऊन शत्रूकडे सांपडले आणि दुसरे दिवशीं मरण पावले. नंतर मामांच्या जागीं हरीपंततात्या फडके यांची नेमणूक झाली. फडके हे फडनवीसांचे मुख्य कारकून असून नानांचे बाळपणाचे खेळगडी आणि अत्यंत विश्वासू मित्र होते. माधवराव पेशव्यांच्या सर्व स्वाऱ्यांत ते फडनवीसांच्या तर्फे हजर असत, त्यामुळें त्यांना लष्करी कामाचा अनुभवही बराचसा होता. तात्यांनीं पराजित फौजेला धीर भरंवसा देऊन पुनः एकत्र केलें आणि निजाम व भोंसले यांशीं राजकारण करून त्यांस आपणाकडे मिळवून घेऊन दादांस पुनः गांठलें. या त्रिवर्गापुढें आपला निभाव लागत नाहींसें पाहून दादा शिंदेहोळकरांचा आश्रय मिळविण्याकरितां माळव्याकडे निघाले आणि हरीपंत त्यांचा पाठलाग करूं लागले. हरीपंतांची फौज संख्येनें शत्रूपेक्षां तिप्पट असूनही त्यांच्या हातून पाठलागाचें काम झपाट्यानें होऊं शकलें नाहीं. त्यांचे सोबती भोसले व निजाम हे मनांतून दादांच्या पारिपत्याविषयीं उदासीन होते. साबाजी भोसले हे मुधोजीचा बंदोबस्त करण्यापुरतेच कारभाऱ्यांना अनुकूळ झाले होते.

१ ऐ. ले. सं. नं. ११३०

निजाम तर बोलून चालून परकी. मराठी राज्यांत दादांचें खूळ उभें राहिलें आहे तोंपर्यंत आपलें यथेच्छ प्रस्थ वाढवून घ्यावें एवढाच त्याचा उद्देश होता. असे हे सोबती म्हणजे 'असून खोळंबा आणि नसून अडचण' असाच अनुभव हरीपंतांस प्रत्यहीं येऊं लागला. चारदोन कोसांची मजल होतांच मोंगली फौज मुक्काम करी आणि नंतर चारदोन दिवस तात्यांनीं आर्जवें करावींत आणि शेवटीं थोडासा नैवद्य समर्पण करावा तेव्हांच ती फौज पुढें चालूं लागे! अशा नाठाळ सोबत्यांना सोडून आपण एकट्यानेंच पुढें जाऊन शत्रूशीं गांठ घालावी तर आपल्या पाठीमागें हे सोबती काय करतील हें एक भय, शिवाय त्रिंबकरावमामा-प्रमाणें आपलीही दशा होईल हें दुसरें भय, अशीं दोन भयें तात्यांच्या डोळ्यांसमोर उभीं रहात! फडक्यांच्या फौजेंतील बहुनायकीचा दादांना चांगलाच फायदा मिळाला. वाटेनें मुलुख लुटीत ते कोठेंही अडथळा न येतां बऱ्हाणपुरास सुखरूप जाऊन पोंचले आणि तेथून त्यांनीं शिंदेहोळ-करांकडे बोलणें करण्याकरितां वकील पाठविले. इकडे पुरंदरावर ता. १८ एप्रिल १७७४ रोजीं गंगाबाई प्रसूत होऊन सवाई रावसाहेब जन्मास आले. याप्रमाणें पेशवाईच्या गादीला योग्य वारस उत्पन्न झाल्यामुळें दादांच्या धामधुमीला आतां निव्वळ बंडाचें स्वरूप प्राप्त झालें!

नर्मदेपलीकडील मराठी राज्याचे शिंदे होळकर हे प्रमुख आधारस्तंभ समजले जात असत. त्या दोघांपैकीं महादजी शिंदे हे विशेष कर्तृत्ववान असल्यामुळें तुकोजी होळकर बहुतेक त्यांच्याच तंत्रानें चालत असत. महादजी व तुकोजी या दोघांही सरदारांना माधवराव पेशव्यांनीं हाताशीं धरून ऊर्जितावस्थेला आणिलें होतें. दादांनीं आतांपर्यंत त्यांच्या सरंजामांत अनेक घालमेली करून त्यांचें शत्रुत्वच संपादन केलें होतें. या पूर्व इतिहासावरून ते आपल्या मसलतीला पूर्णपणें अनुकूल आहेत असा बापू व नाना यांचा ग्रह झाला होता. परंतु त्यांना अनुभव दिवसेंदिवस निराळाच येऊं लागला! शिंद्यांनीं याप्रसंगीं पूर्वापार संबंध न जाणतां दुटप्पीपणाचें राष्ट्रघातकी धोरण स्वीकारलें! असें हें धोरण स्वीकारण्याचें कारण कांहीं भय व कांहीं आपमतलबीपणा हें होय. भय असें कीं बापू

व नाना यांनीं सर्व सरदारांचें एकचित्त करून आणि निजामाला मिळवून घेऊन हें बारभाईचें कारस्थान उभें केलें आहे आणि सवाई रावसाहेब यांच्या जन्मामुळें तूर्त त्याला बहुत तेजी आली आहे हें सर्व खरें. परंतु या भरावर जावें तर उद्यां मोंगल बिथरल्यामुळें किंवा एखाद्या सरदारानें फितूर केल्यामुळें किंवा दादांना एखाद्या बलिष्ठाचें पाठबळ मिळाल्यामुळें हें सर्व पारडें फिरलें तर आपली गति काय होईल ! या राज्यक्रांतीच्या काळांत उद्यां काय होईल याचा काय नेम ! या भयाच्या युक्तिवादांत थोडेसें तथ्य होतें हें खरें. परंतु शिंदे होळकरांनीं मनावर घेतलें असतें तर त्यांना दादांचा कायमचा बंदोबस्त करण्याचें कांहींच अगाध नव्हतें. परंतु तसें न करितां त्यांनीं दुटप्पीपणाचें विपरीत धोरण स्वीकारलें याचें मुख्य कारण स्वार्थपरायणता हेंच होय. या स्वार्थसाधनाच्या बाबतींत महादजी शिंदे हे मल्हारराव होळकराचे असे पट्टशिष्य बनले होते कीं, गुरूची करामत अधिक कीं शिष्याची अधिक असा कोणालाही अचंबाच वाटावा ! जेथें धन्याच्या घरांत दुफळी तेथें नोकरांची चंगाळी हा व्यवहारिक न्याय त्यांना पूर्णपणें समजत होता. धन्याचा घरांत हें दादांचें खूळ उभें राहिलें आहे तें शक्य तोंपर्यंत तसेंच रेंगाळत ठेवावें—दोन्ही पक्षांना सामील असल्याचा देखावा मात्र दाखवावा परंतु नाखूप एकालाही करूं नये—या प्रकरणांत आपण मध्यस्थी पतकरून त्या निमित्तानें कारभाऱ्याकडून आपल्या मागील हिशेबाचे मनाप्रमाणें फडशे करून घ्यावें आणि या बंडाचा बंदोबस्त करण्याच्या मिषानें पुणें दरबारकडून नवीन सरंजाम आणि पुष्कळसें द्रव्य उपटावें—आणि इतकेंही करून ऐनवेळीं तटस्थ राहून दादासाहेब आणि पुण्याचे कारभारी यांची परभारें गांठ घालून द्यावी आणि नंतर ज्याचा जय होईल त्याला राजनिष्ठापूर्वक मुजरा ठोकावा असा पाटिलबावांनीं आपल्या पुढील धोरणाचा नकाशा ठरविला ! असा नकाशा ठरविण्यांत शिंद्यांनीं अशी सोय पाहिली होती कीं, दादांचा जय झाला तरी आपलें नुकसान नाहीं आणि तसें झालें नाहीं तरी आपला फायदाच ! शिंद्याच्या या धोरणामुळें मराठी राज्यावर कशी अनर्थ परंपरा कोसळली हेंच आतां सांगावयाचें.

दादा बऱ्हाणपुरास पोंचतात तों हरिपंतांनीं शिंदे होळकरास पत्रें पाठविलीं कीं, श्रीमंत माळव्यांत येऊं पहात आहेत, याकरितां तिकडे येण्याचे मार्ग बंद करून त्यांस अडवावें; तों आम्हीं येऊन गांठ घालतों. शिंद्यांनीं यावर साळसूदपणानें उत्तर दिलें कीं, 'श्रीमंतांस इकडे येण्यास हांड्याचा घांट किंवा बडव्याचा घांट असे दोन मार्ग आहेत. त्यापैकीं हांड्याच्या घांटाचा बंदोबस्त आमच्यानें होणार नाहीं. तो तुम्हीं जलद करावा. बडव्यांच्या घांटाचा बंदोबस्त आम्हीं यथास्थित केला आहे. त्या मार्गानें श्रीमंतांस इकडे येऊं देत नाहीं.' त्याप्रमाणें हरीपंतांनीं केलें तों दादा नेमके बडव्यांच्याच घाटानें कांहीं हरकत न होतां थेट इंदुरापर्यंत गेले!. नंतर तेथें त्यांनीं शिंदे होळकरांच्या गांठी घेतल्या. शिंद्यांनीं हरीपंतास हा पहिला हिसका दिला!

दादा इंदुरास पोंचतात तो त्यांचा पाठलाग करीत हरीपंत नर्मदेपर्यंत जाऊन पोंचले. आतां ते नदी उतरून होळकराच्या मुलखांत शिरणार असें पाहतांच शिंद्यांचें तात्यांस पत्र आलें कीं, "तुम्हीं आहां तेथेंच मुक्काम करून असावें. पुढें याल तर आमच्या मुलखाची फुकट नासाडी होईल. दादांचा पराजय करण्याचें काम आतां बिलकुल कठीण नाहीं. परंतु लढाई करण्यांत 'असल खैर आणि सरकार काम' हे तुमचे दोनी हेतु एकाचवेळीं साध्य होणार नाहींत. लढाईच्या गर्दीत दादा कदाचित् मारले जातील किंवा कदाचित पळून जाऊन भलत्याच्याच आश्रयाला जातील. याकरितां हें प्रकरण सामोपचारानेंच मिटविलें पाहिजे. मी या कामांत मध्यस्थ आहे. तुम्हीं निश्चिंतपणें स्वस्थ असावें." तात्यांनीं हा निरोप मान्य करून नर्मदेअलीकडेच मुक्काम केला. पुढें शिंद्यांच्या मार्फत समेटाची पुष्कळ बाटाघाट झाली, परंतु दादांस कोणताच समेट मान्य करावयाचा नव्हता. हैदर किंवा इंग्रज अशासारख्या परक्यांचा आश्रय करून आपण पुण्याच्या कारभाऱ्यांचें बंड मोडूं अशी त्यांना अजूनही खुमखुम वाटत होती! शिंद्यांच्या भिडेमुळें हरीपंतांनीं महिनाभर वाट पाहिली. नंतर बोलण्याचा जम बसत नाहींसें पाहून त्यांनीं आपली कांहीं फौज नदीपलीकडे उतरविली.

जून स. १७७४

हें पाहतांच शिंद्यांचा तांतडीचा निरोप आला कीं, या उप्पर एकही पाऊल पुढें टाकाल तर घात होईल! दादांशीं समेटाचें बोलणें आम्हीं पक्कें ठरविलें आहे. तूर्त खर्चासाठीं दादांकडे सात लक्ष रु. पाठवा म्हणजे त्यांना घेऊन आम्हीं पुण्याकडे येतों. तात्यानीं हेंही बोलणें मान्य करून दादांकडे रुपये तत्काळ पटविलें आणि शिंदे होळकर दादांना घेऊन पुण्याकडे येऊं लागले. त्यांचा मुक्काम इंदुराहून हालतांच हरीपंत मागें सरकून नाशीकच्या आसपास तळ देऊन राहिले.

शिंद्यांचें हें 'सर्व कर्म दगाबाजीचें' आहे असा बापू, नाना व तात्या या तिघांचाही ठाम ग्रह झाला होता आणि दिवसेंदिवस त्यांना अनुभवही तसाच येऊं लागला! पुण्याकडे येतांना दादा प्रत्येक मुक्कामास अडून बसत आणि खर्चासाठीं कारभाऱ्यांकडून द्रव्य मागून घेत आणि इतकेंही करून मन मानेल तसा मुलूख लुटीत तो निराळाच! शिंद्याच्या

जुलै स. १७७४ } भिडेमुळें दादांच्या या खेळांकडे कारभाऱ्यांना दुर्लक्ष करावें लागे. इकडे शिंद्याचे वकील पुरंदरास बापू व नाना यांजवळ बोलूं लागले कीं, "दादासाहेबांस दहा लक्षांची जहागीर व तीन मध्यम प्रतीचे किल्ले स्वदेशीं द्यावे. त्यांची मध्यस्ती आम्हांकडे आहे तशीच असावी. तुम्हांवर श्रीमंतांचा बिलकूल विश्वास नाहीं. यांच्या बंदोबस्तासंबंधें हरएक काम पडेल तें तुम्ही न करतां आम्हांस सांगावें. आम्ही करीत जाऊं." कारभाऱ्यांनीं ही गोष्ट तत्काळ मान्य केली. शिंद्यानीं या प्रसंगीं स्वतःकरितां लाख पन्नास हजार रुपये आणि शिंदखेड वगैरे दहा पांच गांव मागितले, त्याचप्रमाणें रुपये व गांव कारभाऱ्यांनीं त्यांस दिले. त्यांनीं इतकें केलें तरी शिंद्यांची हांव तृप्त झाली नाहीं! आगष्ट महिन्यांत शिंद्याचा कारभाऱ्यांस निरोप आला कीं, दादांना घेऊन आतां आम्ही खानदेशांत आलों आहों. पत्रोपत्रीं बोलणें करण्यांत व्यर्थ कालक्षेप मात्र होतो आणि बोलणें कोणतेंच तडीला जात नाहीं. तुम्ही दोघेही येथें समक्ष याल तरच हें समेटाचें प्रकरण तडीला जाईल. नाहीं तर साफ जाणार नाहीं!

शिंदे होळकरांचे असे हे लपंडाव चालू असतांना खुद्द पुण्यांत मोरोबा-

दादा फडनवीस हे दादांतर्फे बापू व नाना यांविरुद्ध फितुराचीं कारस्थानें उघडपणें खेळवीत होते. बारभाईंच्या कटाच्या उभारणींत आपली सल्ला मसलत कोणींच घेतली नाहीं याबद्दल त्यांना मोठेंच वैषम्य वाटत होतें. माधवराव पेशव्यांनीं आपणाला एके काळीं मुख्य कारभारी नेमलें होतें त्या अर्थीं आपण कोणी वडे मुत्सद्दी आहों अशीही त्यांना घमेंड वाटत होती. गंगाबाई व तिचा मुलगा व उभयतां कारभारी हे पुरंदरावर राहून तेथून सर्व राज्यकारभार चालवीत असत. मधून मधून कारभारी मात्र

जून १७७४ } कार्याकारण पुण्यास येत. परंतु काम झाल्याबरोबर तत्काळ परत जात. पुरंदरची हवा पावसाळ्यांत अतिशय गार असल्यामुळें हीं चौघेंही खालीं सासवडास रहावयास आलीं होतीं. एके दिवशीं या चौघांना एकदम कैद करण्याचा मोरोबांनीं व्यूह रचिला; परंतु या बेताचा सुगावा कारभाऱ्यांस आगाऊ थोडा वेळ लागल्यामुळें ते गंगाबाई व नूतन पेशवे यांस बरोबर घेऊन रातोरात पडत्या पावसांत किल्ल्यावर पळून गेले! याप्रमाणें ही मसलत फसली; तरी मोरोबांनीं पुन्हां

सप्टें. १७७४ } यत्न केला. पुरंदर किल्ल्याच्या माचीस सिद्दी लोकांचे पहारे होते. त्यांनीं या सिद्दी लोकांस वश करून घेऊन त्यांच्या मार्फत गडकऱ्यांशीं बोलणें लाविलें कीं, तूर्त तुम्हांस पंधरा हजार रुपये देतों. तुम्हीं उभयतां कारभारी व गंगाबाई व तिचा मुलगा यांस कैद करावें. तसें केलेंत म्हणजे आणखी दोन लक्ष रुपये देईन! गडकऱ्यांनीं हें बोलणें कारभाऱ्यांच्या कानावर घातलें, तेव्हां त्यांनीं तत्काळ त्या सिद्दी लोकांचीं डोकीं मारविलीं; परंतु दस्तैवजी पुरावा न सांपडल्यामुळें त्यांना मोरोबाचें मात्र पारिपत्य करतां आलें नाहीं.

पुणें दरबारच्या अशा या नाजूक परिस्थितींत पेशव्यांस पुरंदरावर एकटेच टाकून दूर जाणें कारभाऱ्यांस परम संकट वाटलें. परंतु न जावें तर

आक्टो. १७७४ } एवढें राजकारण नासल्याबद्दल शिंद्यांचा शब्द येईल व तेवढेंच त्यांस निमित्त पुरेल असें जाणून ते पुरंदरचा कसाबसा बंदोबस्त करून निघाले. त्यांचा शिंदे होळकरांबरचा भरंवसा

अलीकडे अगदींच उडाला होता आणि दादासाहेबांवर प्रथमपासून नव्हताच. आपण कमकुवत आहों असें त्यांच्या नजरेस आलें तर ते भलभलत्या मागण्या करून आपणास संकटांत पाडतील किंवा दादासाहेब कदाचित आपल्या जिवास दगाफटकाही करावयास चुकावयाचे नाहींत, असा विचार करून कारभारी निघाले ते जबरदस्तच होऊन निघाले; कारण कीं, निघतांना त्यांनीं पंधरा हजार फौज बरोबर घेतली होती. शिवाय त्यांनीं सूचना केल्यावरून औरंगाबादेहून मोंगल आणि नागपुराहुन भोसले हेही जंगी सरंजामानिशीं खानदेशाकडे येऊं लागले; आणि हरिपंतांनींही आपल्या फौजेचा तळ हालविला. याप्रमाणें फौजांच्या हालचाली सुरू होतांच

नोव्हेंबर. महादजी शिंद्यांना मोठचि पंचाईत येऊन पडली. कारभारी इतक्या तयारीनिशीं येतात त्याअर्थीं त्यांजकडून आपणास याउपर कांहीं मिळण्याजोगें नाहीं हें त्यांस कळून चुकलें. दादांच्या मनांत जहागीर खाऊन स्वस्थ बसावयाचें नाहीं हें त्यांस पक्कें माहीत होतें. त्यांस धरून कारभाऱ्यांच्या हवालीं करावें तर बदलौकिक, जाऊं द्यावें तर कारभाऱ्यांचा रोष! अशा स्थितींत दादा नित्य नवीं नवीं बोलणीं काढूं लागले आणि तीं सर्व कबूल करण्याविषयीं शिंद्यांचा कारभाऱ्यांस आग्रह पडला! त्या प्रसंगीं बापू व नाना यांनीं शिंद्यांस सांगून पाठविलें कीं, "तुम्ही मध्यस्थींत पडून आजपर्यंत आम्हांकडून दादांस पंधरा लक्ष रुपये देववलेत. श्रीमंतांकरितां किल्ले व जहागीर जी तुम्हीं मागितलीत ती अगदीं तुमच्या म्हणण्याप्रमाणें आम्हीं करार करून दिली! शिवाय तुम्हीं आपल्याकरितां जें जें मागत आलांत तें तें आजपर्यंत आम्ही देत आलों आहों. इतकें असून कराराप्रमाणें श्रीमंतांस वागावयास लावण्याचें तुमच्यानें निभावत नसल्यास त्यांस खुशाल वाटेल तें करूं द्यावें. ते व आम्हीं पाहून घेऊं!" या निरोपापैकीं 'श्रीमंतांस खुशाल वाटेल तें करूं द्यावें. ते व आम्हीं पाहून घेऊं' या वाक्याचा शिंद्यांनीं आपल्या मतलबाकरितां फक्त शब्दार्थ मात्र समजून घेतला आणि मागें पुढें न पाहतां अगदीं अक्षरशः या निरोपाप्रमाणेंच आचरण केलें! शिंदे होळकरांनीं कानाडोळा केल्यावरून दादांनीं एके दिवशीं पुन्हां उत्तरेकडे पलायन केलें! ही

दिसेंबर स. १७७४. } बातमी समजतांच आतां आपण पुढें जाण्यांत कांहीं विशेष अर्थ नाहीं, असें जाणून कारभाऱ्यांनीं आपल्याबरोबरची सर्व फौज हरीपंताकडे पाठविली आणि निजाम भोसले यांना आपापल्या स्थळीं जाण्यास निरोप देऊन ते परत पुण्यास आले.

नंतर फडके व शिंदे होळकर यांच्या फौजा एकत्र होऊन दादांचा पाठलाग झपाट्यानें करूं लागल्या. दादा पळत सुटले ते प्रथम धारेस गेले. आनंदीबाई गरोदर होती सबब तिला तेथें ठेवून ते उज्जनीवरून गुजराथेकडे वळले आणि बडोद्यास जाऊन पोंचले. तेथेंही हरीपंताची फौज समीप आली असें पाहून ते कुच करून अहंमदाबादेकडे निघाले. त्यांचा मुक्काम महीनदीच्या पलीकडे असतां अलीकडच्या तीरावर हरीपंत वगैरे सरदार आले. दादा गुजराथेंत आले ते इंग्रजांचा आश्रय मिळवावा याच हेतूनें आले आहेत ही गोष्ट हरीपंत व महादजी शिंदे या दोघांनाही आतां स्पष्ट दिसत होती. परंतु अशाही स्थितींत शिंदे अजूनही हरीपंतास हिसके देतच होते आणि हस्तें नाहीं तरी परहस्तें दादांच्या बंडाव्याला उत्तेजन देतच होते ! हरीपंत महीनदीच्या पलीकडे जाण्याची तयारी करतात तों शिंदे होळकर आडवे आले. त्यानीं सांगितलें कीं, सल्ल्याचें बोलणें करण्याकरितां दादांकडून आम्हांकडे वकील आले आहेत व आम्ही मध्यस्थ झालों आहों. आमच्यामार्फत चाललेल्या बोलण्याचा निकाल होईपर्यंत तुम्ही नदीपलीकडे बिलकूल जाऊं नये.

यानंतर लढाई तहकूब होऊन शिंद्याच्या मार्फत सल्ल्याचें बोलणें पुनः सुरू झालें. मही नदीच्या अलीकडे पलीकडे उभयतांचीं लष्करें सत्रा दिवस तळ देऊन स्वस्थ राहिलीं होतीं. या अवधींत उभयतांकडील वकीलांचें हेलपाटे मात्र पुष्कळ झाले परंतु समेट होण्याचा रंग मात्र बिलकूल दिसेना !

जाने. १७७५ } दादांनीं या पूर्वींच इंग्रजांकडे मदतीची याचना केली होती आणि त्यांचे करारमदार यावेळीं सुरतेच्या गव्हर्नरामार्फत पक्के ठरत आले होते. मध्यंतरीं हरीपंतांनीं आपणावर हुल्लड करूं नये, यासाठीं दादांनीं शिंद्यांकडे वकील पाठवून ही समेटाची नुसती

हुलकावणी दाखविली होती! हरीपंतानीं हीं मायावीं बोलणीं प्रथमच झिडकारलीं असतीं. परंतु शिंदे होळकरासारखीं डोईजड प्रस्थें मध्यस्थीस पडल्यामुळें त्यांचा निरुपाय झाला. इंग्रजांशीं पक्कें राजकारण ठरण्याचा रंग दिसूं लागल्याबरोबर हरीपंताजवळ दादांच्या अद्वातद्वा मागण्या सुरू झाल्या! आम्हांस वीस लक्षांची व मानाजी फाकड्यास दहा लक्षांची जहागीर द्यावी, सदाशिव रामचंद्र व सखाराम हरि यांस वीस वीस हजार स्वारांची सरदारी द्यावी, गोविंदराव गायकवाडास सबंध गुजराथ द्यावी, अशीं श्रीमंतांची बोलणीं एक ना दोन! त्यांत निदानचा पक्ष म्हणून शिंद्यांनीं सांगितलें कीं, फौजेचें देणें फेडण्यासाठीं श्रीमंतांस सरकारांतून तूर्त बत्तीस लक्ष रुपये द्यावे आणि देशीं गेल्यावर पूर्वी ठरल्याप्रमाणें दहा लक्षांची जहागीर द्यावी. हें तुम्हांस कबूल असेल तर मी तुमचा दादांशीं तत्काळ समेट करून देतों. त्यावेळीं हरीपंतास क्रोध येऊन त्यांनीं हीं सर्व बोलणीं साफ नाकारलीं. यानंतर ता. १७ फेब्रु. १७७५ रोजीं महीनदीच्या पैलतीरीं दादासाहेबांशीं गांठ पडून जें मोठें युद्ध झालें त्यांत शिंदे होळकरांनीं पुढारीपणा घेऊन कोणतीच मेहनत केली नाहीं. लढाईचा सर्व बोजा हरीपंत व फत्तेसिंग गायकवाड यांवरच पडला. त्या लढाईंत दादांचा पूर्ण पराजय होऊन त्यांच्या फौजेची दाणादाण झाली व ते मोठ्या कष्टानें जीव बचावून सुरतेस पळून गेले.

शिंदे होळकरांच्या लपंडावामुळें दादांच्या बंदोबस्ताची मसलत याप्रमाणें बिघडली, ती यानंतर भलतीकडेच वाहवली! दादांनीं यानंतर इंग्रजांचा आश्रय केला. दादांचा बंडावा आतांपर्यंत सर्वांना शेणामेणाचा वाटत होता, परंतु आतां त्याला इंग्रजांच्या मुत्सद्दीपणाचें व लढवय्येपणाचें वज्रकवच चढतांच तो हां हां म्हणतां लोखंडाचा होऊन बसला!

# प्रकरण पांचवें.

## इंग्रजांची पहिली मोहीम—पुरंदरचा तह.

( स. १७७५ मार्च – स. १७७६ मार्च. )

कलकत्ता, मद्रास व मुंबई हीं तीन इंग्रजी सत्तेचीं प्रमुख केंद्रस्थानें होतीं. कलकत्ता येथें हिंदुस्थानचा व्हॉईसरॉय रहात असे आणि प्रत्येक महत्वाच्या बाबतींत त्याची हुकमत मुंबई व मद्रास येथील गव्हर्नरांवर चालत असे. महाराष्ट्रांत आपल्या राज्याचा फैलावा व्हावा अशी मुंबईकर इंग्रजांची स्वाभाविक इच्छा होती. विशेषतः मुंबईजवळच्या साष्टी प्रांतावर त्यांचा बहुत दिवस डोळा होता. मराठी सत्ता जबरदस्त होती, तोंपर्यंत मुंबईकरांनीं आपले राज्यवृद्धीचे बेत मनांतल्यामनांत ठेवून बाह्यतः सौजन्याचा आणि प्रामाणिकपणाचा देखावा कायम ठेवला होता. नारायणरावाचा खून झाल्यावर पुणें दरबारांत गोंधळ माजलेला पाहून मुंबईच्या इंग्रजांनीं सौजन्याचा बुरखा झुगारून दिला आणि साष्टीवर स्वारी करून तो प्रांत आठ पंधरा दिवसांत काबीज केला. त्यानंतर पैक्याची आणि फौजेची मदत मागण्याकरितां दादासाहेबांकडून मुंबईकरांकडे वकील आले तेव्हां तर त्यांच्या आनंदाला पारावारच राहिला नाहीं ! कलकत्तेकरांनीं मुर्शिदाबादेच्या नबाबाला आणि मद्रासकरांनीं अर्काटच्या नबाबाला हाताशीं धरून जसा बंगाल्यांत आणि कर्नाटकांत मन मानेल तसा धुमाकूळ घातला त्याप्रमाणेंच हें दादासाहेबांचें खूळ बगलेंत मारून आपणही लवकरच मराठी राज्य ग्रासून टाकूं असा त्यांना आतां भरंवसा वाटूं लागला. दादांचा पक्ष उचलण्याविषयीं मुंबईकर मनांतून कितीही आतूर असले तरी त्यांनीं या कामीं उतावळेपणा मात्र बिलकूल केला नाहीं. दादांचे सर्व उपाय थकून ते अनन्यगतिक होऊन आपल्या पूर्णपणें आहारीं पडले असें पाहिल्यावरच त्यांनीं त्यांच्याशीं करारमदार पक्के ठरविले. या धिमेपणाचा इंग्रजांना फायदाही चांगलाच मिळाला. फौजेच्या खर्चाकरितां दरमहा दीड लक्ष रुपये इंग्रजांना देण्याचें दादांनीं मान्य केलेंच. शिवाय

इंग्रजानीं पूर्वी साष्टी प्रांत काबीज केला होता तोही दादांनीं त्यांजकडे कायम ठेवून वरती दक्षणा म्हणून सव्वा एकोणीस लक्षांचा नवीन मुलूखही दिला !

याप्रमाणें दादाशीं सर्वस्वी फायदेशीर असा तह होतांच मुंबईकर इंग्रजांनीं कलकत्तेकर लाटसाहेबांच्या परवानगीची वाटही न पाहतां आपल्याच जबाबदारीवर मराठ्याशीं युद्ध सुरू केलें. कर्नल कीटिंग हा इंग्रजी फौज घेऊन मुंबईहून सुरतेस गेला आणि दादांना मिळाला. ही फौज घेऊन श्रीमंत खंबायतेस गेले. चोहोंकडे पांगलेली त्यांची फौज पुनः त्यांस तेथें येऊन मिळाली. नंतर इंग्रजांचीं पलटणें व तोफा व आपली फौज

एप्रिल १७७५. } अशा जय्यत सरंजामानिशीं दादांची स्वारी पुण्यास येण्याच्या इराद्यानें बाहेर निघाली. इंग्रजाशीं लढाई म्हणजे लभ्यांश कांहींच नाहीं आणि तडाख्यांचा मात्र सुकाळ ! ती गोष्ट शिंदेहोळकरांस कसची मानवते ? मोहीम सुरू होण्यापूर्वींच ते दोघे हरीपंताचा निरोप घेऊन माळव्यांत निघून गेले आणि दुरून लढाईचा तमाशा पहात आपापल्या जागीं स्वस्थ बसून राहिले !

शिंदे होळकरांनीं याप्रमाणें आयत्या वेळीं दगा दिला तरी हरीपंतांनीं बिलकूल धीर सोडला नाहीं. फत्तेसिंग गायकवाडाला मिळवून घेऊन त्यांनीं इंग्रजांशीं गनिमी काव्यानें लढाई सुरू केली. हरिपंताजवळ फौज कमी नव्हती; परंतु कारभाऱ्यांजवळ पैसा नाहींसा झाला व त्यांचीं सावकारांजवळ तूर्त पतही चालेना, त्यामुळें हरिपंतांच्या फौजेचे रोजमुरे तटले व तिला उपास पडूं लागले. अर्थात् ती फौज लढाईच्या कामास नालायख होत चालली. त्यांतून ती फौज फितविण्याचा उद्योग दादासाहेब नेहमीं करीत होते, व इंग्रजांची मर्दुमीही विशेष, यामुळें हरीपंतांस यश येणें दुरापास्तच होतें. तथापि त्यांनीं असल्याही बेदील फौजेचा आव राखून इंग्रजांशीं कशीबशी लढाई सुरू ठेविली. या अवधींत पांचचार झटापटी झाल्या त्यांत इंग्रजांचें जें नुकसान होत गेले त्या मानानें त्यांस फायदा कांहींच झाला नाहीं. नावालिनपाड्याच्या लढाईत तर मराठ्यांनीं

१८ मे १७७५ { त्यांस चांगलीच ठोकर दिली. या लढाईचें वर्णन वामनराव पटवर्धन यांनीं लिहिलें आहे तें असें—

" वैशाख वद्य चतुर्थीस श्रीमंतांशीं लढाई मातबर जाली. हुजरात व साऱ्या फौजांनीं घोडीं घातलीं. तीनचारशें इंग्रज व गारदी मिळोन जिवेंच मारिले. तीनचारशें जखमी जाले. इंग्रजांची हिंमत बरीच मोडली. हुजरात वगैरे मिळोन शेंदीडशें घोडे सरकारचे जायां जाले. मालोजी घोरपडे यांणीं शिपाईगिरीची शर्त केली! त्यांकडील खाशांच्या घोड्यांसहित दहा पांच घोडे ठार जाले. त्यांचे बंधु राणोजी घोरपडे ठार जाले. खाशास गोळीची व तरवारेची जखम लागली, परंतु खैर आहे. घोड्यास व खाशास मिळोन बेवीस जखमा लागल्या! घोडा ठार जाला. मालोजी बाबांनीं आपल्या लौकिकाप्रमाणें शिपाईगिरी केली! × × × हरीपंत भिडे श्रीमंतांकडील यांस इंग्रजांनीं जिवें मारिलें. याचें कारण, इंग्रजांची कैद अशी कीं, श्रीमंतांकडील स्वारांनीं तमाम झाडपाल्याचे तुरे लावावे म्हणजे आपले ओळखीचे अशी खूण करावी म्हणून सांगितलें होतें. लढाईचे दिवशीं हरीपंत भिडे लढाई पहावयासाठीं इंग्रजांजवळ आले. तों आम्हांकडील स्वार झाडपाल्यांचे तुरे लावून इंग्रजांचे फौजेंत शिरले, तों इंग्रजांनीं हे स्वार कोणाचे म्हणून विचारलें. तों हे स्वार आपलेच असें ( हरीपंत भिडे ) बोलले. तों आमचे स्वारांनीं जाऊन इंग्रजांस मारिलें. तेव्हां हरीपंतांनींच दगाबाजी केली म्हणून दादासाहेबांस सांगून त्यांचे रुबरू इंग्रजांनीं श्रीमंतांचें म्हणणें मान्य न करितां हरिपंत भिडे यांस जिवें मारलें! + + + सय्यद गोलंदाज सरकारचा चांगला होता तो ठार जाला. त्यांचें इंग्रजानें डोचकें कापिलें! लढाईचे दिवशीं बाडगीचें रान अडचणीचें होतें. मैदानांत गांठ इंग्रजांची पडती तर फडशाच होता! + + + इंग्रजांस धमक बरीच होती, परंतु त्यास ( आमच्या ) फौजेची कवाईत समजली!"

लढाईच्या या कटु अनुभवानें कर्नल कीटिंग याची धमक बरीच जिरली. गुजराथेंतून मुलूख तुडवीत थेट पुण्यापर्यंत चालून जाण्याच्या त्याच्या वल्गना आतां आपोआपच थंड पडल्या! पावसाळा जवळ आला तेव्हां

इंग्रज भडोच येथें छावणीस राहिले व हरीपंत थोडीशी फौज गुजराथेच्या बंदोबस्तास ठेवून बाकी फौजेसह खानदेशांत तळ देऊन राहिले.

जमिनीप्रमाणें दर्यावरही इंग्रज व मराठे यांचें युद्ध सुरू होतें. एका जलयुद्धांत मराठ्यांच्या 'समशेरजंग' नांवाच्या लढाऊ जहाजानें चांगलेंच शौर्य प्रकट केलें. इंग्रजांच्या 'रिव्हेंज आणि बांबे' या दोन लढाऊ जहाजाशीं त्यानें तीन तास मोठ्या मर्दुमीनें लढाई दिली. शेवटीं इंग्रजांच्या दोन जहाजांच्या माऱ्यापुढें निरुपाय होऊन समशेर जंगावरील तांडेल व खलाशी यांनीं स्वहस्तानें दारूच्या कोठाराला आग लावून दिली आणि शत्रूला लाचार होऊन शरण जाण्यापेक्षां मरणच श्रेयस्कर असें जाणून त्या सर्व शूर वीरांनीं जहाजाबरोबर जलसमाधी घेतली!

मराठे शिपायांनीं व्यक्तिशः कितीही शौर्य दाखविलें तरी मुख्य राज्याधिकारावर असलेले बापू व नाना हे मुत्सद्दी फक्त लेखणीबहाद्दरच असल्यामुळें पुणें दरबारचें राजकारण दिवसेंदिवस फिकें पडूं लागलें आणि त्यांवर नानाप्रकारचीं संकटें येऊं लागलीं. मराठी फौज इंग्रजांशीं लढण्यांत गुंतली आहे ही संधि साधून हैदरानें तुंगभद्रेपलीकडील मराठी राज्य आक्रमण करण्याची सुरवात केली आणि करवीरकर छत्रपति यांनींही भोंवतालच्या पेशवाई मुलुखांत लुटालूट सुरू केली. वऱ्हाडांत साबाजी व मुधोजी भोसले यांचें युद्ध होऊन साबाजी ठार झाला आणि दादांचा पक्षपाती मुधोजी भोसले हा विजयी झाला. निजामाचा दिवाण रुकनुद्दौला हा याच सुमारास मृत्यु पावला. रुक्नुद्दौलाचा बारभाईंच्या कारस्थानाला मोठाच पाठिंबा होता. या दिवाणजीच्या मृत्यूनंतर निजामानें दादांच्या पक्षाला सामील होण्याचें भय दाखविलें तेव्हां कारभाऱ्यांना अठरा लक्षांची नवीन जहागीर देऊन त्याची समजूत काढावी लागली!

आनंदीबाई गरोदर असल्यामुळें दादांनीं तिला धारेस ठेविल्याचें पूर्वी सांगितलेंच आहे. ती बाई तेथें ता. १० जाने. १७७५ रोजीं प्रसूत होऊन मराठी राज्य बुडविणारे दिवटे बाजीरावसाहेब जन्मास आले. बाईनें नानाफडनविसांकडे साखर पाठविली होती. ती साखर नानांस परिणामीं किती कडू लागली! बाळंतपणांतून उठल्याबरोबर आनंदीबाईनें हजारों

भिल्ल व गारदी चाकरीस ठेवून भोंवतालच्या प्रांतांत लूटमार सुरू केली. अहिल्याबाई व महादजी शिंदे खर्चाकरितां तिला गुप्तपणें द्रव्य पुरवितात असे पुण्यास बारंवार बोभाटे येऊं लागले. उलटपक्षीं महादजीबाबांनीं पुकारा केला कीं, बाईनें माझें घर फोडून माझी सरदारी भगीरथराव शिंद्यास देऊं करून मजशीं भांडावयास तयार केलें आहे! शेवटीं कारभाऱ्यांनीं वर्ष दीड वर्ष सक्त मेहनत करून हें आनंदीबाईचें बंड मोडलें आणि तिला नर्मदातीरीं मंडळेश्वर येथें मोठ्या बंदोबस्तानें ठेवलें.

याप्रमाणें बापू व नाना यांवर अरिष्टें कोसळत असतां, त्यांचे प्रतिस्पर्धी जे इंग्रज त्यांचे उच्चीचे ग्रह अजून कायमच होते. हरीपंत दूर गेलेले पाहून, त्यांनीं भर पावसाळ्यांत बाहेर पडून सबंध गुजराथ व्यापली! शिवाय त्यांनीं मध्यस्थी पतकरून दादासाहेब व फत्तेसिंग गायकवाड यांचा समेट घडवून आणिला. या मध्यस्तीबद्दल फत्तेसिंगाकडून सव्वादोन लक्षांचा आणि दादासाहेबांकडून पावणेतीन लक्षांचा नवीन मुलुख इंग्रजांस मिळाला. आतांपर्यंत मराठी राजकारणांत ढवळाढवळ करून मुंबईच्या इंग्रजांनीं सुमारें पंचवीस लाखांचा मुलूख मधल्यामध्येंच संपादन केला.

याप्रमाणें परिस्थिति प्रतिकूल असतांही 'सर्वस्व भरीला घालावें परंतु दादांचें पुरतें पारिपत्य करावें' हा बापू व नाना यांचा निश्चय खंबीर होता. पावसाळा संपल्यावर पुनः इंग्रजांवर मोहीम सुरू व्हावयाची, तिची तरतूद आतां कशी करावी याबद्दल शिंदेहोळकरांनीं नांवसुद्धां काढलें नाहीं.
नोव्हेंबर १७७५ } हरीपंत मात्र दसरा झाल्यावर फौजेसह कूच करून गुजराथेकडे चालले. गेल्या खेपेप्रमाणें याही खेपेस इंग्रजांस गनिमी कावा दाखवून बेजारगतीस आणण्याचा हरीपंताचा विचार होता. परंतु या दुसऱ्या मोहिमेस सुरवात होणार तोच कलकत्त्याहून वॉरन हेस्टिंग्स यांनीं बापू व नाना यांजकडे तहाचा संदर्भ लाविला कीं, 'मुंबईकर इंग्रज हे आमच्या हाताखालचे असून आम्हांस न विचारतां त्यांनीं दादासाहेबांचा पक्ष स्वीकारून तुम्हांशीं लढाई आरंभिली आहे; सबब ती आम्हीं आतां मना केली आहे. तुम्हीही लढाई मना करावी. तहाचे करारमदार

ठरविण्याकरितां आम्ही तुम्हांकडे वकील पाठवितों.' कारभाऱ्यांनीं काल-देशवर्तमानाकडे नजर देऊन हें बोलणें मान्य केलें; आणि लढाई उभय-पक्षीं तहकूब झाली.

वर सांगितल्याप्रमाणें तह ठरविण्याकरितां इंग्रजांचा वकील कर्नल अपटन् हा कलकत्त्याहून पुरंदरास आला; तेव्हां पेशव्यांनीं दरबा-रांत समारंभानें त्याची भेट घेतली. पेशव्यांचें वय त्यावेळीं फक्त दीड वर्षाचें होतें! इंग्रज लोकांचे विचित्र पोषाख व गोरें तोंड पाहून हें मूल दरबारांत

२८ डिसेंबर १७७५

घाबरून रडूं लागल्यास फार विरुद्ध दिसेल व दरबारची इज्जत जाईल ही नानांस पंचाईत पडली! तसा प्रकार न घडावा म्हणून त्यांनीं आधीं चार आठ दिवस श्रीमंतांजवळ नेहमीं रहाणारे हुजरे, कार-कून, मानकरी वगैरे लोकांस इंग्रजांसारखीं कुडती व टोप्या वापरावयास लावून श्रीमंतांच्या नजरेस संवय लावून ठेविली होती, त्यामुळें इंग्रज लोक भेटीस आले तेव्हां दरबारचा थाट यथास्थितपणें पार पडला. पुढें तहा-विषयीं इंग्रजांशीं खलबतें सुरू झालीं, त्यांत सखारामबापू, नानाफडनवीस बारामतीकर कृष्णराव बल्लाळ काळे, कर्नल अपटन् व त्याचे सोबती दुसरे दोन इंग्रज व एक दुभाष्या याप्रमाणें सायंकाळीं बसत तों मध्यान मध्यान्ह रात्रपर्यंत खलबतें चालत. इंग्रजांस फार वेळ जमिनीवर बस-ण्यांत श्रम होऊं लागले म्हणून कारभाऱ्यांनीं त्यासाठीं खुर्च्या आणविल्या. मग त्यांनीं खुर्च्यांवर बसावें व आपण खालीं बसावें हें नीट न वाटून हेही खुर्च्यांवर बसूं लागले. पण थांस तरी ती संवय कोठची! पुरुषोत्तम-राव दाजी लिहितात कीं, "कारभारी खुर्चीवर बसून फार भागले म्हणजे भुईवरही बसत असतात!" आणखी त्याच पत्रांत ते लिहितात कीं इंग्रज बोलतात यांत सला करावा संवरावा अशीं निर्मळपणाचीं बोलणीं बोलतात. परंतु (तो कोणत्या शर्तीवर याचा) गवस गवसूं देत नाहींत व कारभारीही त्यास गवस गवसूं देत नाहींत!" प्रथमदर्शनीं हे वकील कितीही साळसूद दिसले तरी मुंबईकर इंग्रजांपेक्षां हे नवीन आलेले कल-कत्त्याचे इंग्रज लबाडी व लपंडाव करण्यांत कमी नाहींत हें नानाफडनवीस

यांस लवकरच कळून आलें. तुम्ही आम्हाशीं बिघाड कां केलांत या प्रश्नावर इंग्रज वकिलांनीं जबाब दिला कीं, राज्याचे मालक दादासाहेब असतां तुम्ही कारभारी बंड करून त्यांच्या पाठीस लागलां असें आम्हांस कळ-ल्यावरून आम्ही त्यांची कुमक करून तुम्हांशीं लढाई केली. परंतु सवाई रावसाहेब जन्मास आले व तेच राज्याचे खरे वारस असें आम्हांस कळल्यावरून लढाई मना करून आम्ही तह ठरविण्यास आलों! सवाईराव-साहेबांचा जन्म सन १७७४ च्या एप्रिलांत झाला. इंग्रजांनीं दादांशीं सन १७७५ च्या मार्चांत करार पक्के केले. मध्यंतरीं दहा महिने गेले तरी या अवधींत हें वर्तमान आपणांस कळलेंच नाहीं असा इंग्रजी वकि-लानें आव आणिला! नानांनीं ही चूक वकिलाच्या पदरांत घातल्यावर त्यानें उत्तर केलें कीं, मुंबईच्या इंग्रजांनीं तुम्हाशीं लढाई केली ती अन्यायानें केली हें आम्ही कबूल करतों, पण त्या लढाईपासून झालेले व होणारे फायदे मात्र आम्हीं सोडणार नाहीं! पटवर्धनांच्या वकिलानें ता. ७ जानेवारी १७७६ च्या पत्रांत इंग्रजांच्या म्हणण्यांतील आशय लिहिला आहे तो असा— "कैसेंही असो. आम्ही त्यांचा (दादांचा) पक्ष धरिला तो वाजवी असो वा गैरवाजवी असो, परंतु आम्ही सावकार; आम्ही नफातोटा पाहतों." आम्ही इंग्रज लोक सावकार असल्यामुळें आमचा नफाच झाला पाहिजे, तुम्ही सावकार नसल्यामुळें तुमचा तोटा झाला तरी चालेल असें इंग्रजी वकीलानें नाना व बापू यांस उत्तर दिलें तें अत्यंत विचार करण्यासारखें आहे. कारण या सावकाराच्या कल्पनेंतच इंग्र-जांच्या भावी उत्कर्षाचा महामंत्र सांठविला आहे! पुढें मार्च महिन्यांत तह ठरला. तेव्हांचा प्रकार पटवर्धनांच्या वकीलानें लिहिला की, "पैरवां सिद्धांत ठरोन यादी जाल्या. पहिल्यापासून वकील आल्यावर (त्यांनीं) अहमुद्दे फारच घातले होते. 'साष्टी घेतलीच आहे, वसई द्यावी, श्रीमं-तासमागमें (पायदळ तोफा वगैरे) सामान आणलें आहे त्यास चाळीस पन्नास लक्ष रुपये लागले आहेत ते द्यावे, (श्रीमंतांनीं दिलेले) सुरत अठाविशीचे वगैरे महाल व राजश्री फत्तेसिंग गायकवाड यांजपासून महाल

१ ऐ. के. सं. नं. १७६१ २ ऐ. के. सं. नं. १८६२

त्यांच्या बचावासाठीं त्यांनीं दिलेले आहेत त्यांचा गुंताच नाहीं, ( ते-आमचे झालेच आहेत ! ) अशा प्रकारें त्यांचा फारच फैलावा होता. चार वेळां मध्यें रुसवेही जाले. ( परत जावयास ) निरोपही मागत होते, कारभारी यांनीं निरोप दिला ! जितकें त्यांनीं ओढावयाचें तितकें त्यांनीं ओढून पाहिलें. याणीं थांग लागूं दिला नाहीं ! आणखी ओढून त्यांस कांहीं न देतां तह करावा असें मानस कारभारी यांचें होतें. परंतु (बोलणें सुरू होऊन) फार दिवस जाले, फौजेस पोटास नाहीं. दिवस अखेरीस येत चालले, याजकरितां कांहीं इंग्रजांचें ऐकावें, इतका विचार चित्तांत आणून तह करून घेतला." इंग्रज वकीलांची खरोखरी वर्तणूक या प्रकारची असून ग्रांट डफसाहेब त्याच्या नेमस्तपणाबद्दल, खरेपणाबद्दल स्वभावाच्या सरळपणाबद्दल साक्ष भरतात व म्हणतात कीं, दक्षिणी ब्राम्हण बडे कावेबाज ! त्यांच्याशीं बोलण्यास तो बिचारा कसचा टिकतो.

१ शिवाजीपंताच्या पत्रांतून उतारे वर दिले आहेत त्यांशीं डफच्या इतिहासांतील मजकूर ताडून पाहिल्यास गंमत वाटण्याजोगी आहे, सबब तो येथें उतरून घेतो—

—" As Brahmins in politics, misconstrue moderation and attribute concession solely to fear, they assumed a high tone of demand and menace, which Colonel Upton, judging by himself, believed to be firm and sincere......Colonel Upton's correspondence bears ample testimony of sincerity and moderation but he was ill-qualified to conduct a negotiation with Maratha Brahmins...... They seconded their arguments with threaths, and mistook the mild remonstrances of the envoy for timidity. Colonel Upton conceiving the negotiation at an end, expressed this opinion to the Governor-General and council in a letter, dated 7th February, when they immediately determined to support the cause of Raghoba with the utmost vigour. They prepared troops for embarkation, etc. etc. etc...... but the ministers almost immediately after they had carried their menaces to the highest pitch, acceded at once to the greater part of Colonel Upton's original demands. "

ता० १ मार्च १७७६ रोजीं पुरंदरचा तह ठरला त्यांतील मुख्य कलमें १ इंग्रजानीं साष्टी घेतली आहे ती त्यांजकडे असावी. जर साष्टीप्रांत परत देण्यास गव्हर्नर जनरल साहेब कबूल झाले तर साष्टीबद्दल तीन लाखांचा मुलूख पेशव्यांनीं इंग्रजांस द्यावा, २ भडोच शहराजवळचा तीन लक्ष रुपये उत्पन्नाचा मुलूख पेशव्यानीं इंग्रजांस स्नेहाखातर द्यावा. इंग्रजांस आतांपर्यंत फौजेचा खर्च पडला त्याबद्दल पेशव्यांनीं त्यांस बारा लक्ष रुपये द्यावे. ३ इंग्रजांनीं आपली फौज परत आपल्या मुलखांत न्यावी आणि दादांनीं एक महिन्याच्या मुदतींत आपल्या फौजेस फांटा द्यावा. दादा कारभाऱ्यांशीं लढाई सुरू ठेवतील तर त्यांस इंग्रजांनीं मदत करूं नये. ४ दादा परत आल्यावर त्यांनीं गोदावरीतीरीं कोपरगांव येथें रहावें. तेथें त्यांच्या दिमतीस एक हजार स्वार व दोनशे चाकरमाणसें रहातील. वरील स्वार व नोकर यांच्या खर्चाशिवाय दादांच्या चालू खर्चाकरितां पेशवे त्यांस महिना पंचवीस हजार रुपये देत जातील. ५ दादासाहेब किंवा पेशव्यांच्या प्रजेपैकीं कोणी बंड करील तर त्यांस इंग्रजांनीं मदत करूं नये.

---

# प्रकरण सहावें.

## १ शिंदे होळकरांची समजूत. २ राज्य स्थिति. ३ हैदर व करवीरकर यांच्या स्वाऱ्या. ४ आपपासांत द्वेष. ५ किरकोळ दंगे, बंडें, फितूर वगैरे.

( स. १७७६ मार्च – स. १७७८ फेब्रु. )

इंग्रजांशीं तहाचें बोलणें लागलें आहे तें कोणत्या पल्ल्यावर जातें इकडे शिंदे होळकरांचें लक्ष लागून राहिलें होतें. आतां तह ठरणार असें पक्कें वर्तमान कळल्यावर त्यांनीं विचार केला कीं, मराठी राज्याचा बंदोबस्त कितीही विस्काळित झाला असला तरी पुण्याचे कारभारी अजूनही निग्रहा-

नुग्रह करण्यास बरेच समर्थ आहेत. त्यांच्याशीं केवळ फटकून वागून आपला निभाव लागणार नाहीं. असा विचार करून आणि देशीं येण्याविषयीं पुण्याहून वारंवार पत्रें येत होतीं त्यांस मान दिल्यासारखें करून उभयतां सरदार देशीं येण्यास निघाले. पण त्यांतल्या त्यांत आज निघतो, उद्यां निघतों, दोन मजली आलों, चार मजली येणार अशा थापा मारून त्यांनीं माळवा प्रांतींच दोन तीन महिने घालविले. प्रथम सन १७७६ च्या जून महिन्यांत तुकोजी होळकर पुढें येऊन वाफगांवास राहिले. तेथून त्यांनीं आपल्या मागण्यांची लांबच लांब याद कारभाऱ्यांकडे पाठविली. त्या सर्व मागण्यांना बापूनीं एकच उत्तर दिलें. तें हें कीं– "श्रीमंतांनीं कोणासही उणें केलें नाहीं. श्रीमंतांनीं आपल्या बरोबरीचे आणलेले सरदार आहां. तुम्हीच बंदोबस्त करावा. ( दौलतींत ) आहे नाहीं पाहून जें करणें तें करावें. आपणास इच्छा कारभाराची नाहीं. समजोन म्हणेल त्याशीं समजोन उत्तर करूं. न समजोन म्हणेल त्याशीं उत्तर तसेंच केल्याशिवाय परिणाम नाहीं !" या उत्तरानें होळकर बरेच नरम पडले आणि पुण्यास येऊन जुलैच्या सत्ताविसाव्या तारखेस त्यांनीं श्रीमंतांची भेट घेतली. पुढील महिन्याच्या सतराव्या तारखेस श्रीमंत व शिंदे यांचीही भेट झाली. कारभाऱ्यानीं उभयतां सरदाराशीं खलबतें करून त्यांचें इमानप्रमाण घेतलें.[1]

हे इमानप्रमाण देण्याघेण्याचे प्रकार केवळ दरबारी होते. अजूनही पुणें दरबाराशीं सरळपणें वागावयाचें शिंद्याच्या मनांत बिलकूल नव्हतें. इंग्रजांशीं तह झाल्यामुळें आतां कसें तरी तूर्तातूर्त कारभाऱ्याशीं गोड करून घ्यावें एवढाच त्यांचा उद्देश होता. शिंद्यांच्या सांगण्यावरून मिरजेचे पांडुरंगराव पटवर्धन यांनीं या 'समजुत' प्रकरणीं मध्यस्थी करण्याची इच्छा दर्शविली; तेव्हां नानांनीं त्यांना उत्तरें दिलीं त्यांवरून त्यांचें शिंद्याविषयीं काय मत होतें हें समजून येतें. त्यांपैकीं कांहीं उत्तरें– "ते[2] ( शिंदे ) बहुचाल आहेत. त्यांच्या वर्तणुकीप्रमाणें त्यांशीं वागणें करावें लागेल. याजकरिता मध्यस्थींत पडों नये. + + + दोन सालचा

१ अधिकार योग पृ. ३५. २ ऐ. ले. सं. न. १५०२.

सरंजामाचा पैका ( शिंद्यांनीं ) फौज न ठेवितां बुडाखालीं घातला आहे. तत्राप आज आम्ही जसें ते म्हणतील तसें कबूल करूं. परंतु पुढें जसा प्रसंग येईल तसें बोलूं व करूं! " अंगेजणी ( पराक्रम ) करून दाखविल्यावरी रदबदलीस जागा होते. दार ( करार ) मदाराचा प्रकार करून द्यावा तरी मसलतीच्या उपयोगी न पडतां भांडावयासी जागा करून ठेवावी हे प्रकार त्यांचे! यास्तव त्यांची पत एकनिष्ठतेची राहिली नाहीं " " गुदस्तांपासून आम्ही त्यांजकडील लक्ष कोणे तऱ्हनें राखिलें, देऊं घेऊं केलें, कांकीं सर्वप्रकारें आमच्या लगामीं लागतील. मातबर सरदार, मर्द माणूस, इतक्या गोष्टी समजोनच करीत होतों. तीन चार मध्यस्थही जाले. त्यांच्या हातच्या स्वदस्तुरच्या चिठ्या आम्हांस आल्या त्या भरंवशावर श्रीमंतांस पंधरा लक्ष रुपये त्यांच्या भरंवशावर दिले. त्यांच्या (शिंद्यांच्या) खर्चाची ओढ म्हणून लाख पन्नास हजार त्यांसही दिले. असें असतां आपल्या गुणास चुकले नाहींत! + + तेथील क्षणभंगुर विचार. + + ते बेइमानी करीत असतां त्यांस थोडेंबहुत दिलेंच आहे. आपणास त्यांच्या वचनाचा भरंवसा कशावरून ती खातरजमा करून घ्यावी आणि ( नंतर ) आमची तुम्ही करावी. उपरांत समर्पक सांगणें तें सांगों."

एकंदरींत शिंद्यांनीं कृतकर्माबद्दल प्रायश्चित्त घेऊन आपली चांगलीच समजूत काढावी अशी पुण्यांच्या कारभाऱ्यांची अपेक्षा होती. राज्ययंत्र सुरळीत असतें तर त्यांची ही अपेक्षा सफळ झाली असती, आणि तसें असतें तर शिंद्यांनीं हे असले चाळे केलेच नसते! या लेखणीबहाद्दर कारभाऱ्यांना आपली यापुढें वारंवार जरूर लागत राहणार हें शिंद्यांस पक्कें माहीत होतें. यामुळें ते कारभाऱ्यांची समजूत काढण्याच्या भरीस न पडतां उलट त्यांनींच आपली वाटेल तर समजूत काढावी अशी अपेक्षा धरीत पुण्यांतच शांतपणें दरबारी कामांत ढवळाढवळ करीत स्वस्थ बसून राहिले!

---

१ ऐ. ले. सं. नं. १४८७३. २ ऐ. ले. सं. नं. १४५४

इ. स. १७७६-७७ हीं दोन्हीं सालें नानांस आणि तदनुषंगानें सर्वच महाराष्ट्राला अत्यंत नुकसानीचीं गेलीं. इंग्रजांशीं वर्ष दीड वर्ष लढाई चालू ठेवण्यांत तीस चाळीस हजार फौज कायमची ठेवावी लागली आणि त्यापायीं कोट्यावधि रुपये खर्च झाला. शेवटीं पुरंदरचा तह झाला त्यांत इंग्रजांस सहा लक्ष रुपये उत्पन्नाचा मुलूख द्यावा लागून शिवाय खर्चासाठीं बारा लक्ष रुपये देण्याचें कबूल करावें लागलें आणि निजामानें 'बारभाईना' साह्य करण्याचें नुसतें सोंग आणून फुकटाफुकटीं तीस लक्षांची जहागीर उपटली हें पूर्वी सांगितलें आहेच. एवढ्यानेंच मराठी राज्याच्या नष्टचर्याची याद संपते असें मात्र नाहीं. मराठी जबाबदार मुत्सद्दी व सरदार यांच्या दुहीचा फायदा घेऊन अंतःस्थ व बहिःस्थ सर्वच शत्रूंनीं एकसमयावच्छेदेंकरून गिधाडासमाणें मराठी राज्य छिन्नविच्छिन्न करण्यास प्रारंभ केला ! खुद्द पुण्यांत मोरोबाचा फितूर–मुंबईहून दादांचा फितूर–मंडळेश्वराहून आंनदीबाईचे फितूर–शिंदे होळकरांची उदासीनता–सखाराम बापूंचा अंतःस्थ कुढेपणा–हैदरअल्ली व करवीरकर छत्रपति यांच्या स्वाऱ्या–कर्नाटकांत कित्तूरकर देसाई व सुरापूरकर बेरड संस्थानिक यांचे दंगे–नाशीकप्रांतीं कोळ्यांचा दंगा–कृष्णाकांठीं प्रतिनिधींचा दंगा–कोंकणांत तोतयाचें बंड–चोहोंकडे फितूर, बचनभ्रष्टता आणि विश्वासघात यांचें पसरलेलें साम्राज्य अशीं अरिष्टें किती म्हणून वर्णावीं ! या सर्वांचे धक्क्यावर धक्के बसत असतांही ज्या मराठी राज्याच्या कर्णधारानें कारभाराचें सुकाणूं शहाणपणानें व एकनिष्ठेनें सतत सुयंत्रपणें चालविलें त्या नाना फडनवीसांची योग्यता कोण वर्णूं शकेल !

माधवराव पेशव्यांसारख्या कर्तृत्ववान पेशव्याची खरी किंमत आतां रयतेला पूर्णपणें समजून चुकली. त्यांच्या कारकीर्दींत हेच शिंदे होळकर कसे साळसूदपणें बर्तत होते ! हैदर, निजाम यांसारख्या परकी राजांना त्यावेळीं मराठी राज्याकडे वांकड्या नजरेनें पाहण्याची छातीच होत नव्हती उलट मराठ्यांची स्वारी आपणावर झाली तर आपली कशी दशा होईल याच काळजींत ते चूर होऊन गेलेले असत ! त्यावेळचें राज्ययंत्र असें खंबीर होतें कीं, कित्तूरकरांसारख्या लुंग्यासुंग्यांची काय मगदूर कीं ते

डोकें वर काढतील ! परंतु ती स्थिति आतां पार पालटून गेली होती ! कोणीही एखाद्या उपटसुंभानें चार सोटभैरव हाताशीं धरून रयतेला खुशाल लुटावें किंवा मारावें ! मराठी रयतेला ना त्राता ना वाली ! याप्रमाणें चोहोकडे धुंद माजून कोठूनही वसूल धडपणें येईना—खर्च तर शुक्लेंदुप्रमाणें वाढूं लागला आणि कर्जही पर्वतप्राय चढूं लागलें ! हिंदुस्थानभर अजिंक्य ठरलेली मराठी सेना घुढाऱ्याच्या अभावीं आणि पोटानें हैराण होऊन अवघ्या पांच चार वर्षांच्या अवधींत आतां बाजार बुणग्यांत रूपांतर पावली होती !

या सर्व अनर्थाला प्रत्यक्ष किंवा परंपरेनें महादजी शिंदेच कारणीभूत झाले होते. अजूनही ते असे नवीन नवीन आणि विलक्षण बखेडे निर्माण करीत कीं, त्यांचें निराकरण करण्यांत कारभाऱ्यांची अक्कल गुंगच होऊन जावी ! अशा या बिकट प्रसंगीं नानांनीं जी मसलत योजिली तिजवरून त्यांच्या राजकीय धोरणाचें गूढ रहस्य उमगूं लागतें. शिंदे हे कर्ते व शूर सरदार खरे, पण ते इतके डोईजड होऊन आतांपर्यंत राज्यनाशास कारण झाले आहेत ते होळकराच्या मदतीमुळेंच होत. याकरितां ही डोईजड झालेली शिंदेहोळकरांची जोडी फोडून त्या दोघां सरदारांत किंचित् तेढ उत्पन्न करावी व दोघांपैकीं कोणातरी एकास नेहमीं आपले लगामीं लावून ठेवावें, याप्रमाणें मसलत योजून तिच्याच अनुरोधानें नाना आमरणांत वागत गेले. हल्लीं त्यांनीं महादजी शिंद्यांस पूर्णपणें अनुकूल करून घेतलें. शिंदे स्वतःकरितां स्वदेशीं नवीन दहा लक्षांची जहागीर आणि असीरगडचा किल्ला मागत होते. नानांनीं यावर त्यांची समजूत घातली कीं, ' तुम्ही जें जें मागतां तें सर्व मी तुम्हांस सोई सोईनें मिळवून देईन. आजच अडवाल तर सखारामबापू ऐकणार नाहींत. थोडें दमानें घ्या.' नाना म्हटल्याप्रमाणें करतील असा शिंद्यांस पूर्णपणें भरंवसा होता त्यामुळें शिंदे व नाना यांची मैत्री जुळण्यास बिलकूल उशीर लागला नाहीं. नानांच्या मेणवली दप्तरांत शिंद्यांचें एक पत्र आहे तें याच प्रसंगास अनुलक्षून असावें. तें पत्र असें:—

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसी.

सकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य-स्नेहांकित महादजी शिंदे दंडवत विनंति उपरी. आम्हाकडील अर्थ, राजश्री रामचंद्र शिवदेव यांनीं आपणांस सांगितल्यावरी आपण शपथपूर्वक खातरजमा करून श्रीवरील तुळशी देतों असें निश्चयपूर्वक बोलला आणि 'सरदारी माझी आणि फडणिशी त्यांची. बंधुत्वाप्रमाणें वर्तन करूं. ज्यांत सरदारीचें कल्याण तें संधान चालवूं. जो अनिष्ट चिंतील त्याचें पारिपत्य करूं.' म्हणून बोलला. तो मजकूर मशारनिल्हेंनीं लिहिला तो सर्व समजोन चित्तास परम संतोष जाला. आम्हीं श्रीवरील बेलभंडार पाठविला आहे व हें शपथपूर्वक लिहिलें आहे. आपण बंधुत्वाविषयीं संशय न मानावा. म॥ निल्हे बोलतील ते आमचें बोलणें जाणावें. ही सरदारी आपली व फडणिशी आमची असा निश्चय जाहला. जेथें आपण आहां तेथें मी आहें हें शपथपूर्वक जाणावें. रवाना छ० २१ सफर. बहुत काय लिहिणें ? लोभ कीजे हे विनंती.

नानांनीं शिंदे-होळकरांत द्वैतभाव उत्पन्न केला याचा अर्थ त्यांनीं त्या उभयतांत शत्रुत्व उत्पन्न केलें असा मात्र कोणी समजूं नये. 'सारीं एकाच आईचीं लेकरें' ही समजूत नाना, महादजी व तुकोजी या तिघांची कायमच होती. बाह्यात्कारें ते पूर्ण सलोख्यानें वागत. अंतस्थ वर्तनांत थोडा डावा उजवा प्रकार होता इतकेंच ! शिंदे होळकरांत दुही उत्पन्न केल्याबद्दल पुष्कळ लोक नानांस दोष देतात; परंतु त्यांस त्यावेळीं घडलेल्या पूर्वापर गोष्टींचा संदर्भ ठाऊक नसतो. शिंद्याची वागणूक कसकशी होत गेली याविषयीं आतांपर्यंत नवीन माहिती देऊन आम्हीं हा संदर्भ दाखवून दिला आहे. यावरून पाहिलें तर राज्याच्या बचावासाठीं त्या दोघां सरदारांत दुही उत्पन्न करणें नानांस भाग पडलें व तोंच त्या प्रसंगास योग्य उपाय होता असें विचारी मनुष्याच्या लक्षांत येईल. राजकारणांत साम, दाम, दंड आणि भेद असे चार उपाय सर्वमान्य झालेले आहेत. त्यांपैकीं सामाच्या गोष्टींना शिंदे दाद देईनात आणि दंडाचें सामर्थ्य नानामध्यें नव्हतें. शिंदे हे बलिष्ठ सरदार, पेशवे हे स्वतः मालक

१ या चरित्राची आवृत्ति दुसरी पा. १६.

असल्यामुळे त्यांना शिंद्यांस दंडाचें भय दाखवितां आलें असतें. नाना हे बोलून चालून पेशव्यांचे कारकून, त्यांना मालकाचें अवसान कुठून येणार आणि त्यांनीं अवसानाचा आव आणिला असतां तरी त्याला शिंदे थोडेच भिणार होते! राहतां राहिले दाम आणि भेद. त्या उपायांचाच अवलंब करून नानांनीं शिंद्यांस लगामीं लावून घेतलें.

नाना फडनवीस यांस धरावें अगर मारून टाकावें असा या सुमारास पुण्यांत गारद्यांनीं बेत केला होता, पण नानांस वेळेवर सूचना मिळाल्यामुळें ते सावध झाले. आपल्या जीवित्वाचा बचाव होईल इतक्या बेताचा

स. १७७७ मे. } त्यांनीं गारद्यांचें पारिपत्य करून बंदोबस्त केला, पण हें कृत्य कोणी करविलें याचा सुगावा लागला असूनही त्यांस प्रसिद्धपणें चौकशी करतां येईना! याचें कारण शिवाजीपंत असें लिहितो कीं, हें कर्म कोणीं करविलें याचें-" ठिकाण लावावें, चौकशी करावी, तेव्हां त्याचा बंदोबस्त ज्यांनीं करविलें त्यांसुद्धां करावा तेव्हां ठीक! ती गोष्ट या प्रसंगीं करतां येत नाहीं." शिवाय मारेकरी घालणाऱ्यांची नांवें कागदोपत्रीं लिहितां येत नाहींत असें कळवून तो इतका मात्र इशारा करतो कीं-" या खेळांत बहुतेक दामोदर मंडळीच आहेत!" पण ही 'दामोदर' मंडळी तरी कोण? 'दामोदर' हें सांकेतिक नांव पैक्यांस लावतां येईल व तसें क्वचित् लावलेलें आमच्या पाहण्यांतही आहे. पैका म्हणजे लक्षणेनें पैकेकरीही घेतां येतील. सराफ, व्यापारी, सावकार हे लोक असल्या फंदांत कधींच पडणारे नव्हत. तेव्हां ते पैकेकऱ्यांतून वजा केले म्हणजे दरबारी मुत्सद्दीच शिलक राहतात. पण नानांस दगा करावयास झटणारे हे दरबारी तरी कोण असावे! मोरोबादादा कीं बजाबा पुरंदरे कीं चिंतो विठ्ठल कीं दुसरे कोणी लुंगेसुंगे होते! कोण असतील ते असोत!

एकंदरींत शिंद्यांशीं समेट झाल्यामुळें नानांच्या मनाला बरीच स्वस्थता प्राप्त झाली मराठी राज्यांत यावेळीं चोहोंकडे अंदाधुंदी माजली होती. तिचा बंदोबस्त त्यानीं कसा केला हेंच आतां सांगावयाचें. किरकोळ दंगे, बंडें आणि असंतोष त्यावेळीं पुष्कळच बोकाळले होते, परंतु स्थलाभावामुळें त्यांकडे विशेष लक्ष न देतां ज्यांचा पुढील राजकारणाशीं विशेष संबंध

आला आहे त्यांचाच परामर्श आम्ही येथें संक्षेपानें घेणार आहों.

तोतयाचें बंड—पानिपतांत मृत्यु पावलेल्या सदाशिवराव भाऊंचें नांव धारण करणारा एक तोतया पूर्वी माधवराव पेशव्यांच्या कारकीर्दीत उत्पन्न झाला होता. त्यावेळीं त्याची चौकशी होऊन त्याला कैदेची शिक्षा झाली होती. हल्लीं हा तोतया रत्नागिरीच्या किल्ल्यावर कैदेंत होता. रत्नागिरीचा मामलेदार रामचंद्रनाईक परांजपे हा पेशव्यांचा आप्त असून अत्यंत श्रीमान् सावकार होता. मराठी फौजा गुजराथेंत आणि कर्नाटकांत मोहिमेवर गुंतल्या आहेत आणि राज्यांत चोहोकडे धामधूम उडाली आहे, या संधींत आपण तोतयाची मुक्तता करून आणि त्याज-करवीं दंगा करवून खूपसा पैका मिळवावा अशी त्या लोभी रामचंद्रनाईकास वासना झाली, आणि त्यानें तोतयाची मुक्तता करून त्याच्या नांवाची चोहोंकडे द्वाही फिरविली. याप्रमाणें तोतयाची कैदेंतून सुटका झाल्यावर त्याचा बोलबाला अत्यंत झपाट्यानें झाला. हजारों पोटभरू शिलेदार त्या-भोंवती गोळा झाले आणि पेशव्यांचें आरमारही त्याला वश झालें. पांच चार महिन्याच्या अवधींत त्यानें सुवर्णदुर्गापासून मुंबईपर्यंत सर्वच कोंकण हस्तगत केलें. हैदर, व इंग्रज वगैरे शत्रूंनीं तोतयाची कुमक करण्याची तयारी मोठ्या आनंदानें दर्शविली. सपटेंबर अखेरीस तोतयाची वीस हजार फौज बोरघाटा-पर्यंत आली आणि त्याच्या चौक्या घांट चढून राजमाचीपर्यंत बसल्या. आतां तो पुण्यावर चालून येण्याच्या गोष्टी बोलूं लागला आणि याच वेळीं सिंहगडावरील गडकऱ्यांतही कांहीं डळमळ दिसून आली! तोतयाजवळ कोणती वशीकरण विद्या होती न कळे! व्यंकटराव घोरपडे इचलकरंजीकर पार्वतीबाईचा भाऊ रघुनाथराव कोल्हटकर, गंगाबाईचा मामा नारो शंकर असले पेशव्यांचे जवळचे आप्तसुद्धां त्याला वश झाले; इतकेंच नव्हे, तर खुद्द पार्वतीबाईलाही हा तोतया आपला खरोखरीचा नवरा कशावरून नसेल असा शेवटपर्यंत भ्रम वाटत होता!!

स. १७७६ जून ते सपटें.

तोतयाचें बंड इतक्या थराला पोचलें, तेव्हां मात्र त्याच्या बंदोबस्ताची कारभाऱ्यांना जलदी करावी लागली. भिवराव पानशे पांच सहा हजार फौज

घेऊन तोतयावर चालून गेले आणि पांच चार लढायांत त्यांनीं त्याचा दम

आक्टोबर } बराच मोडला. इतक्यांत खुद्द महादजी शिंदेच पानशांच्या मदतीला आले. नंतर एक मोठी लढाई होऊन तोत-

याच्या फौजेची वाताहत झाली आणि त्यानें काबीज केलेला मुलूख पेश-वाई फौजेनें पुन्हां हस्तगत केला. तोतया जीव घेऊन जलमार्गानें मुंबईस जात असतां, वाटेंत रघोजी आंग्र्यांनीं त्यांस पकडलें आणि पुण्यास पाठ-विलें. नंतर पंचाईत बसून तोतयाची चौकशी झाली. तींत त्यानें कबूल केलें कीं, " छत्रपुराजवळ कन्नोल गांव आहे तेथील आपण. आपलें नांव सुखलाल. बापाचें नांव महानंदा. आईचें नांव अन्नपूर्णा. आजीचें नांव मन्मथा. जात कनुजा ब्राह्मण. " याप्रमाणें तोतया खोटा ठरल्यावर त्याला " गाढ्यावर घालून बाजारांतून फिरविला. ज्यांस ज्यांस संशय

१८ डिसेंबर } राहिले होते त्यांस त्यांस दाखविलें. शेवटीं उंटावर बसवून फिरविला आणि चार घटका दिवसास मेखसूनें

डोकें फोडून मारिला."

नंतर तोतयाच्या बंडांत सामील झालेल्या लोकांचीं पारिपत्यें सुरू झालीं. या कामीं नानांनीं बराच कडकपणा धरला होता असें दिसून येतें. कारण कीं, ' बंडखोर ब्राह्मण असले तरी दया न धरितां त्यांस मारून टाकावें, त्यांची मालमत्ता सरकारांत घेऊन बायकापोरें कैदेंत टाकावीं ' अशीं ते परशुरामभाऊंस ताकीद करतात व ' आमच्या सरदारांचीं सत्वेंच जात चाललीं ' असा भाऊंस टोमणा मारतात ! व्यंकटराव घोरपडे इचलकरंजीकर हे पेशवाईचे मूळ संपादक बाळाजी विश्वनाथ यांचे पणतू होते. असें असतांही या बंडांत सामील झाल्याबद्दल त्यांजकडून एकसालीं साठ हजार रुपये आणि गुन्हेगारी सव्वालक्ष रुपये असा जबर दंड नानांनीं वसूल केला. बिचाऱ्या रामचंद्र नाईकाचे हाल तर पुसूंच नयेत. त्याची सर्व मालमत्ता सरकारजमा होऊन कुटुंबांतल्या मुलामाणसासुद्धां सर्वांच्या पायांत बिड्या पडल्या ! तोतयाचा संसर्गदोष ज्यांना ज्यांना घडला त्यांना त्यांना सरकारी अधिकाऱ्यांमार्फत सर्व राज्यांत एकाच दिवशीं

---

१ ऐ. ले. सं. नं. १९१२.

सक्तीनें प्रायश्चित्त देण्यांत आलीं !

हैदरअल्लीच्या स्वाऱ्या—कल्याणदुर्गच्या तहांत दादांनीं हैदराला एक कोट रुपये उत्पन्नाचा मुलूख दिला हें मागें सांगितलेंच आहे. या तहांत मिळालेला मुलूख ताब्यांत घेण्याची घाई हैदरानें बिलकूल केली नाहीं. अनुकूल संधि सांपडेल तसतसा मराठी मुलूख काबीज करण्याचा त्यानें क्रम स्वीकारला. प्रथम स. १७७४च्या पावसाळ्यांत त्यानें शिरें, मदगिरी, बाळापूर, होसकोटें, गुरमकोंडा, चेनरायदुर्ग वगैरे ठाणीं घेतलीं आणि त्या वर्षाच्या डिसेंबरपर्यंत तुंगभद्रेपलीकडील सर्व मराठी राज्य काबीज केलें. सन १७७५च्या नोव्हेंबरांत त्यानें पुनः मोठी फौज तयार केली आणि अकस्मात् पांच दिवसांची दौड करून येऊन बल्लारी, कडपें, कर्नूल हीं संस्थानें घेतलीं, अदवानीकरांवर छापा घालून त्यांचा धुव्वा उडविला व त्या संस्थानापासून एक लाख होन खंडणी घेतली. डिसेंबर महिन्यांत त्यानें मुरारराव घोरपडे सेनापति यांशीं युद्ध सुरू केलें. तें युद्ध पुढील वर्षाच्या मार्चअखेरीपर्यंत चाललें होतें. या तीन महिन्यांत मुरारराव सेनापतींनीं शत्रूशीं अशा जवामर्दीनें टक्कर दिली कीं, शत्रु, मित्र सर्वच त्यांची वाहवा करीत राहिले ! परंतु सर्व महाराष्ट्र पाठीशीं असूनही त्या प्रसंगीं सेनापतींची कोणीच कुमक केली नाहीं ! नानांनीं गुत्तीकडे फौज पाठवावी म्हणून पुष्कळ खटपट केली, परंतु राज्यांत चहूंकडे एकाच वेळीं धामधूम उडाल्यामुळें त्यांचाही निरुपाय झाला ! शेवटीं हैदरानें गुत्ती काबीज करून मुराररावांच्या पायांत सहा मण वजनाच्या बिड्या ठोकल्या आणि त्यांची कपालदुर्गावर रवानगी केली. यानंतर हैदराच्या फौजेनें तुंगभद्रेअलीकडे येऊन हल्याळ सांवराणीपर्यंत मुलूख मारिला आणि धारवाडच्या किल्ल्यास वेध लाविला. हैदराचा दंगा असाच वाढूं दिला तर तो मनोळीची बारी ओलांडून कृष्णेपर्यंत मुलूख काबीज करणार असा संभव दिसूं लागला !

हैदराचें पारिपत्य एकट्यानेंच करण्याचें सामर्थ्य आतां पुणें दरबारांत राहिलें नव्हतें. सबब कारभाऱ्यांनीं निजामअल्लीशीं तह करून त्याला या मसलतींत मिळवून घेतलें. मराठे व मोंगल या दोघांनीं मिळून

हैदरावर स्वारी करावी आणि तुंगभद्रेपलीकडे जितका मुलूख व खंडणी मिळेल त्याची समसमान वांटणी उभयतांनीं घ्यावी असा करार ठरला. या कराराप्रमाणें उभयतां सरकारें स्वारीची तयारी करतात तों कोन्हेरराव व पांडुरंगराव पटवर्धन आणि शिवराव घोरपडे गुत्तीकर हे सहा सात हजार फौजेनिशीं धारवाड प्रांतीं होते त्यांशीं हैदराचा सरदार महंमदअल्ली

जाने. १७७७ } कुमदान यानें सावशी येथें लढाई दिली. त्या लढाईंत मराठ्यांचा पूर्ण पराजय होऊन त्यांच्या फौजेची वाताहत झाली. कोन्हेरराव लढाईंत ठार पडले आणि पांडुरंगराव पटवर्धन व शिवराव घोरपडे हे जखमी होऊन शत्रूकडे पाडाव सांपडले. परशुराम-भाऊ पटवर्धन हे यावेळीं करवीरच्या मोहिमेवर गुंतले होते. त्यांना या पराजयाचें वर्तमान समजतांच ते ती मोहीम तशीच अर्धवट टाकून टाको-टाक कर्नाटकांत गेले आणि नंतर त्यांनीं शत्रूला गनिमी कावा दाखवून कसाबसा धारवाडप्रांताचा बचाव केला.

हरीपंत फडक्यांच्या हाताखालीं फौज देऊन त्यांची हैदरअल्लीवर रवा-नगी करावी असा नानांचा संकल्प होता. हरीपंताबरोबर गुजराथेच्या स्वारींत फौज गेली होती तिचें दोन वर्षांचें देणें अजून कारभाऱ्यांनीं द्यावयाचें होतें. या देण्याचा घोळ आज सहा महिने चालला होता परंतु शिलेदारांची समजूत पडेना. प्रत्यक्ष रोख द्रव्य दिल्याशिवाय त्या उपाशी शिलेदारांची समजूत तरी कशी व्हावी ? द्रव्य उभें करण्याकरितां नानांनीं यावेळीं पुण्याच्या सावकारांपासून सक्तीनें कर्ज वसूल करण्याची शिस्त धरली. त्यासंबंधीं माहिती–[1] " पुण्यांत प्रस्तुत कर्जपट्टीचा कडाखा जाला आहे. चौसष्ट लक्षांची पट्टी सराफ वदंता, परंतु तीस चाळीस-पावेतों असेल. वल्लभसुंदर याची तीन लक्षांची निशा जाहली. बाळोबा नाईक लक्ष देतो, परंतु ऐकत नाहींत. चौकी बसली आहे. याचप्रमाणें जोग, गद्रे, ताटके, थत्ते, भावे, रामाजी नाईक दातार, त्रिंबक विनायक चाबुकस्वार, तापीदास काशीदास, वाघोजी बगाडे, भुतकर, कहानदास, यांच्या घरीं चौक्या बसल्या आहेत. " भोकरे, वानवळे, हरिभक्ति या

१ अधिकारयोग पृ. ५०.

बड्या सावकारांचीं नांवें या यादींत नाहींत, कारण ते यापूर्वीच कर्ज देऊन गुंतले होते. नानांनीं इतकी सक्ती केली तरी या कर्जपट्टीचा ऐवज बारा पंधरा लाख पावेतों जमा झाला! असो. यानंतर नानांनीं फौजेच्या देण्याची कशीबशी तोडमोड केली आणि हरीपंतांची स्वारी एकदांची मोहिमेवर बाहेर पडली. परंतु ती स्वारी स. १७७६ च्या सप्टेंबरांत बाहेर पडावयाची ती पुढच्या वर्षाच्या मार्चांत बाहेर पडली! बाहेर निघतांनाच हरिपंतांनीं ताडिलें कीं, दरबारची स्थिति ठीक नाहीं. त्या अर्थीं आपण दूर गेल्यावर नानांवर कांहीं तरी संकट येईल. ३१ मार्चच्या पत्रांत ते परशरामभाऊंस इशारा देतात कीं– " नानाप्रकारचीं राजकारणें घाटत आहेत. यजमानांस सावध करतों. तेही सावध आहेत. परंतु फितूर फार! काय करतील!"

एप्रिलअखेरीस हरीपंत कर्नाटकांत जाऊन पोंचले. तिकडे ते आतांच निजामाचा सरदार जावीतजंग घोशा हा जय्यत सरंजामानिशीं त्यांना सामील झाला. पण इतक्या उशीरां निघालेल्या फौजा मुलुखगिरी कसच्या करतात! पुढील मसलती ठरविण्यांत आणि इकडे तिकडे करण्यांत महिना दोन महिने सहज निघून गेले. नंतर पावसाळ्यांकरितां मराठे व मोंगल यांच्या फौजा कर्नाटकांत छावणीस राहिल्या. पावसाळ्यांत हरीपंत व परशुरामभाऊ स्वस्थ बसले नाहींत. पुंड पाळेगारांपासून त्यांनीं मोठमोठ्या खंडण्या उकळल्या आणि तुंगभद्रेपर्यंत तमाम ठाणीं बसवून त्यांनीं शत्रूचा अंमल उठवून लाविला.

तुंगभद्रेपलीकडे पेशव्यांच्या आश्रयाखालचें चित्रदुर्ग एवढें एकच संस्थान आतां शिल्लक राहिलें होतें व तेंहि काबीज करण्याकरितां हैदर चित्रदुर्गास वेढा घालून बसला होता. चित्रदुर्गाची कुमक करावी या उद्देशानें मराठी फौजा पावसाळा संपतो न संपतो तोंच तुंगभद्रेपलीकडे गेल्या आणि अदवानीच्या रोखें खंडण्या वसूल करीत चालल्या. हरीपंतांनीं घोशाला लौकर निघून येण्याविषयीं निकडीचीं पत्रें पाठविलीं; परंतु मोंगल येऊन सामील होण्यापूर्वीच राराबी प्रांत अदवानी येथें हैदरानें

१ जाने. १७७८ } पन्नास हजार फौजेनिशीं मराठ्यांवर छापा आणला. शत्रु आल्याची वर्दी येतांच हरीपंत व परशुरामभाऊ यांनीं बाजार बुणगें व तोफखाना तुंगभद्रेकडे लावून दिला आणि ते स्वतः फौजेच्या अघाडीस जाऊन नौबत वाजवीत शत्रूच्या तोंडावर ठांसून उभे राहिले. याप्रमाणें मराठी फौज बेगुमानपणें शत्रूच्या तोंडावर उभी राहिली; त्यामुळें बुणगें वगैरे सामान सुरक्षितपणें पार पडलें. मराठ्यांवर चालून यावें किंवा बुणग्यावर लगट करावी असे शत्रूच्या मनांत होतें. परंतु पहिली गोष्ट करण्यास त्यास धीर झाला नाहीं व दुसरी करण्यास त्यास संधि सांपडली नाहीं. आपला विशेष लाग साधत नाहीं असें पाहून हैदर सायंकाळचे सुमारास थोडासा मागें सरला, आणि हरीपंतही परत फिरून आपल्या बुणग्यास येऊन मिळाले.

शत्रू एवढ्या धिटाईनें आपणावर चालून आला त्याअर्थीं आपल्या लष्करांत कोठें तरी फितूर असला पाहिजे अशी हरीपंताची खात्री झाली होती. मुक्कामास आल्यावर दुसरे दिवशीं त्यांनीं चौकशी केली तों मानाजी फाकड्याचा भयंकर फितूर उघडकीस आला! मानाजीनें शत्रूकडून लाख होन घेऊन ते मराठी फौजेंत वांटले होते आणि लढाईच्या गर्दीत हरी-पंतांच्या मुसक्या आवळून त्यांच्यासह शत्रूकडे पळून जाण्याचा त्यानें बेत केला होता! फाकड्याचें पारिपत्य करण्याकरितां हरीपंत व परशु-रामभाऊ यांनीं अकस्मात् त्याच्या गोटावर हल्ला केला तेव्हां मानाजी मात्र मारामार करीत शत्रूकडे पळून गेला परंतु फौजेनें तो गोट लुटून फस्त केला. नंतर हरीपंतांनीं म्हसवडकर यशवंतराव माने या फितुरी सरदाराला तोफेच्या तोंडीं दिलें त्यामुळें वचक बसून फितुराचा तूर्त बीमोड झाला. फाकड्यानें वांटलेले लाख होन हरीपंतानीं माग लावलावून सरकारांत घेतले आणि तें द्रव्य फौजेच्या चालू खर्चास आयतेंच उपयोगी पडलें!

हरीपंतांच्या लष्करांत वारंवार फितूर होत याचें कारण त्यांना पुण्याहून वेळेवर द्रव्याचा पुरवठा होत नव्हता हेंच होय. द्रव्याच्या अभावामुळें मराठी फौजेचा यावेळीं अगदीं गळाठा झाला होता. कुजलेल्या फाटक्या राहुट्यांत भरपावसाळ्यांत परशुराम भाऊंचा स्वयंपाक व जेवण! कां

तर नवी राहुटी घेण्यास जवळ पैसा नाहीं! हरीपंतांस विड्याचीं पानें मिळेनात आणि रात्रीं दिवट्यांत तेल मिळेना! जनावरांस व माणसांस नित्य एकादशी असें होऊं लागलें म्हणजे शिलेदारांनीं वैतागून या दोघां सरदारांच्या दारांत धरणें द्यावें आणि त्यांस दोन दोन दिवस उपास पाडावे, जीव देतों किंवा घेतों, नाहीं तर पोटास घाल म्हणून तरवारी उपसाव्या असेंही होत होतें! सैन्याची शिस्त व त्यावर कदर राखण्याविषयीं ज्यांचा बाणा ते हरीपंत उद्विग्न होऊन लिहितात कीं–"कोणाचे डोळ्यांत मर्यादा राहिली नाहीं!" मराठी फौजेच्या अशा दुर्दशेमुळेंच शत्रूच्या फितुराला वाव सांपडे हें उघडच आहे.

असो. यानंतर घोंशाच्या फौजेला मिळवून घेऊन शत्रूवर पुनः

स. १७७८ फेब्रु } चालून जाण्याचा हरीपंतांनीं यत्न केला. परंतु एका प्रसंगामुळें ही मोहीम तशीच अर्धवट टाकून परत फिरण्याचें त्यांच्या नशीबीं आलें! तो प्रसंग कोणता याचा खुलासा पुढील प्रकरणीं केला जाणार आहे.

करवीरकरांच्या स्वाऱ्याः– नारायणराव पेशव्यांच्या खुनानंतर आपलें राज्य वाढवावें या हेतूनें करवीरकर छत्रपतींनींही भोंवतालच्या पेशवाई मुलखांत स्वाऱ्या घालघालून मोठाच दंगा मांडिला. या करवीरच्या मोहिमेवर कारभाऱ्यांनीं आतांपर्यंत वेळोवळ फौजा पाठविल्या परंतु त्यांच्या हांतून करवीरकरांचा विशेषसा बंदोबस्त होऊं शकला नाहीं. स. १७७७ च्या प्रारंभीं परशुरामभाऊ पटवर्धन व रामचंद्र गणेश कानडे हे सरदार पेशव्यांतर्फे करवीरकराशीं लढत होते. सावशीच्या पराजयामुळें परशुरामभाऊंना कर्नाटकांत जावें लागलें आणि करवीरच्या मोहिमेचा सर्व भार रामचंद्र गणेशावर पडला. कवठें हिंगणगांवच्या लढाईंत रामचंद्र-

३० मे } पंतानें शत्रूचा पूर्ण पराजय करून पुष्कळशी लूट मिळविली. पावसाळ्यानंतर नानांच्या आग्रहावरून महादजी शिंद्यांनीं करवीरची मसलत आपल्या शिरावर घेतली. शिंदे फौज जमा करीत कर-

सप्टेंबर } वीराकडे निघाले ते वाटेंत रहिमतपुरापर्यंत आले आणि तेथेंच त्यांनीं चार महिने मुक्काम ठोकला. त्यानीं कारभाऱ्याशीं

हट्ट धरिला कीं, तुम्ही मला स्वदेशीं दहा लक्षांची जहागीर व अशीरगडचा किल्ला देण्याचें कबूल केलें आहे त्याच्या सनदा मला या मुक्कामींच मिळाल्या पाहिजेत. सनदा हातीं पडल्याशिवाय आपण एकही पाऊल पुढें टाकणार नाहीं!

शिंदे दक्षिणेंत जहागीर मागत होते ती गोष्ट घडून येणें अशक्यप्रायच होतें. बरीच वाटाघाट होऊन शेवटीं नानांनीं तडजोड सुचविली कीं, शिंद्यांना जहागीर द्यावयाची ती दक्षिणेंत न देतां माळवा प्रांतांत द्यावी आणि दक्षिणेंतील कामें आटपून शिंदे हिंदुस्थानाकडे जावयास निघतील तेव्हां त्यानीं अशीरगडचें बोलणें बोलावें. ही नानांची तडजोड शिंदे व सखारामबापू यांनीं अत्यंत नाखुषीनें मान्य केली. शिंदे नाखूष होण्याचें कारण त्यांना फक्त स्वदेशींच जहागीर पाहिजे होती आणि बापू नाखूष झाले त्याचें कारण त्यांना दक्षिणेंत किंवा माळव्यांत शिंद्यांना नवीन जहागीर बिलकूल द्यावयाची नव्हती हेंच होय! असो. आपल्या मागणीचा याप्रमाणें निकाल लागल्यावर शिंद्यांनीं आपल्या फौजेचा मोर्चा करवीराकडे वळविला. वाटेनें वडगांव, कडोली, हेरलें, आळतें वगैरे शत्रूचीं ठाणीं लागलीं तीं काबीज करून शिंद्यांनीं खुद्द करवीरास वेढा घातला. शिंद्यांनीं करवीरावर महिना दीड महिना तोफांचा भडिमार करतांच करवीरकर लाचार होऊन वीस लक्ष रुपये खंडणी देण्याच्या करारावर तह करण्यास कबूल झाले. आतां तह ठरणार इतक्यांत करवीरकरांनीं एकाएकीं तहाचें बोलणें फेटाळून लावून शिंद्यांशीं पुनः जोराचें युद्ध सुरू केलें! करवीरकरांना हें एकाएकीं नवीनच अवसान कुठून आलें याचा खुलासा पुढील प्रकरणीं करण्यांत येईल.

सन १७७८ जाने.–फेब्रु.

इंग्रजांचे लटांव— कलकत्त्याच्या लाटसाहेबानें मध्यें पडून मराठ्यांशीं पुरंदरचा तह ठरविला ही गोष्ट मुंबईच्या इंग्रजांस बिलकूल आवडली नाहीं. लॉटसाहेबांनीं ठरविलेल्या तहाविरुद्ध उघडपणें जाण्याची त्यांची छाती नव्हती. तथापि तहांतील शब्दांच्या अर्थाबद्दल घासाघीस सुरू करून तह निष्फळ ठरविण्याचा त्यांनीं प्रयत्न चालविला. इंग्रजांनीं दादांना आश्रय

देऊं नये हें तर त्या तहांतलें मुख्य कलम होतें. तें कलम पाळण्याची इंग्रजांनीं टाळाटाळ चालविली आणि शेवटीं तर दादांना दरमहा दहा हजार रुपये पेन्शन देऊन त्यांना उघडपणें मुंबईसच ठेवून घेतलें. तोतयाच्या बंडांत सामील झालेल्या हजारों लोकांस त्यांनीं मुंबईस आश्रय दिला इतकेंच नव्हे, तर तोतयाला प्रत्यक्ष मदत करण्याचीही त्यांनी तयारी दर्शविली! इंग्रजांनी स्वतः तहाचें एकही कलम घडपणें पाळलें नाहीं आणि उलट साळसूदपणाचा आव आणून त्यांनीं पुणें दरबारकडे मागणी केली कीं, आम्ही तहाच्या शर्ती प्रामाणिकपणें पाळल्या आहेत, परंतु तुम्ही मात्र तहांत ठरल्याप्रमाणें बारा लक्ष रुपये आणि तीन लक्ष आकाराचा मुलूख अजून आम्हांला दिला नाहीत. तहाच्या शर्ती उभयपक्षीं प्रामाणिकपणें पाळल्या जाणें हेंच खऱ्या सभ्यपणाचें लक्षण होय!

इंग्रजानीं याप्रमाणें शब्दार्थाची ओढाताण सुरू करतांच 'शठंप्रति शाठ्यं' या न्यायानें नानानींही त्याच प्रकाराचा अवलंब केला! बारा लक्ष रुपये देण्याची त्यानीं टाळाटाळ चालविली आणि तीन लक्षांचा मुलूख देण्याबाबत त्यानीं एक नवीनच कोडें निर्माण केलें! त्यांनीं इंग्रजांस उत्तर दिलें कीं, पुरंदरच्या तहांत तुम्हांस तीन लक्ष आकाराचा मुलूख देण्याचें आम्हीं कबूल केलें आहे हें खरें, परंतु तो आकार कमाली कीं वसुली हें कांहीं तहांत स्पष्टपणें दर्शविलेलें नाहीं. तह ठरवितांना आम्हीं तुम्हांस कमाली आकाराचा मुलूख देऊं असें कबूल केलें होतें, आणि ती गोष्ट अजूनही आम्हांस मान्य आहे. आम्हीं तुम्हांस तीन लक्ष कमाल आकाराचा मुलुख देतों तो घ्या. कमाली आणि वसुली हे दोन्हीं शब्द जमाबंदीपैकीं आहेत आणि त्यांच्या अर्थांत पुष्कळच फरक आहे. एखाद्या प्रांताचा कधीं काळीं जास्तींत जास्त वसूल झालेला दप्तरीं नमूद असेल तो त्या प्रांताचा कमाल आकार होय आणि आज प्रत्यक्ष जो वसूल येत असेल तो त्या प्रांताचा वसुली आकार होय. या हिशेबानें पाहिलें तर तीन लक्ष कमाल आकाराचा मुलुख कांहीं अस्मानीं सुलतानीमुळें हल्लीं केवळ एक लक्ष वसूली आकाराचा असूं शकेल किंवा कदाचित् ओसाड मैदानही असूं शकेल! इंग्रजांना दप्तरीं बेरीज नमूद असलेला असला हा

कमाल आकाराचा मुलूख नको होता. त्यांना अर्थात् वसुली आकाराचा मुलुख पाहिजे होता. इंग्रजांचे लपंडाव ओळखून नानांनीं कमाली कीं वसुली हा शब्दार्थाचा वाद निर्माण केला आणि ते तो वाद इंग्रजांशीं सतत दोन वर्षेंपर्यंत उगाळीत राहिले!

नानांनीं इंग्रजांविरुद्ध दुसरी एक गोष्ट केली, तीवरून 'व्यापार हें इंग्रजांचें मर्मस्थान आहे' हें त्याकाळीं दुसऱ्या कोणाच्याही लक्षांत न आलेलें प्रमेय त्यांना पूर्णपणें अवगत झालें होतें असें स्पष्ट दिसतें. इंग्रजांशीं लढाई सुरू होतांच नानांनीं कोंकणच्या घाटांच्या नाकेबंद्या करवून इंग्रजांचा व्यापार सक्तीनें बंद पाडिला. मुंबईची वस्ती निव्वळ व्यापारी लोकांची असल्यामुळें तिच्या नाड्या तत्काळ आंखडल्या! सावकारा व सराफा ठार बुडाला आणि व्यापाऱ्यांचीं दिवाळीं वाजलीं. विलायतेहून व चिनाहून मालानें भरून आलेलीं तारवें मुंबईच्या बंदरांत तटून राहिलीं. या कारणामुळें मुंबई सरकारची तिजोरी अर्थात् रिकामी पडून लढाईचा खर्च चालविण्याचें त्या सरकारावर मोठें संकट येऊन पडलें. त्यावेळीं पुण्याचे व्यापारी सरकारांत लाख रुपये नजराणा देतों, मुंबईशीं व्यापार करण्याची परवानगी द्या असे नानांस वारंवार अर्ज करीत होते. व्यापार बंद करण्यांत सरकारचें जकातीचें जबर नुकसान होत होतें तरीही नानांनीं व्यापाऱ्यांचा अर्ज मान्य केला नाहीं! यावरून घ्यावयाची गोष्ट एवढीच कीं, लाख रुपये फक्त नजराणा भरण्याइतका किंमतीचा त्यावेळीं एकट्या पुण्याचाच मुंबईशीं व्यापार होता! असो. पुरंदरचा तह झाल्यावर आतां तह झाला संवरला, अजून पुण्याशी व्यापार कां सुरू होत नाहीं! असा मुंबई सरकारनें आपल्या पुण्याच्या वकीलास प्रश्न केला. त्यावर त्या वकीलानें त्यांची समजूत घातली कीं, आतां व्यापारास दरबारची आडकाठी नाही, पण दरबार कर्ज मागेल या भयानें यंदा आतां व्यापारी पैका बाहेर काढीत नाहींत!

इंग्रजांना वठणीवर आणण्याकरितां नानांनीं तिसरा एक उपाय योजिला तो मात्र इंग्रजांच्या काळजासच जाऊन भिडला! सॅटल्युबिन नांवाचा फ्रेंच सरकारचा वकील यावेळीं पुणें दरबाराकडे आला. चौलचें बंदर आणि

रेवदंड्याचा किल्ला देऊन पुणें दरबारनें आपणाशीं दोस्तीचा तह करावा म्हणजे आपण इंग्रजांविरूद्ध पेशवे सरकारला फौजेचें साह्य करूं असें या फ्रेंच वकीलाचें म्हणणें होतें. इंग्रज काय किंवा फ्रेंच काय, दोघेही आपणाला शत्रूस्थानींच आहेत हें नानांस पूर्णपणें समजत होतें. फ्रेंच वकीलाची एकही मागणी नानांस मान्य करावयाची नव्हती तथापि फ्रेंच व इंग्रज हे एकमेकांचे जन्मसिद्ध वैरी आहेत या गोष्टीचा आपण तूर्त फायदा करून घ्यावा असा नानानीं डाव योजिला. इंग्रजांना भेडसावण्याकरितां नानानीं फ्रेंच वकिलाचा असा थाटमाट आणि बडेजाव ठेवला कीं नाना व फ्रेंच यांची गट्टी पूर्णपणें जुळली असाच सर्वांना भ्रम उत्पन्न व्हावा ! पुणें दरबारीं फ्रेंच वकिलाचा असा बोलाबाला झालेला पाहून इंग्रज चडफडूं लागले कीं, फ्रेंच वकिलाला आणण्याकरितां नाना बोरघाटापर्यंत अंबारीचा हत्ती, स्वार, पालख्या वगैरे राजाच्या स्वारीला शोभेसा लवाजमा पाठवितात आणि आमच्या वकिलाला माड्याचें तट्टू सुद्धां मिळत नाहीं ! फ्रेंच वकील दरबारांत येतो तेव्हां नाना व बापू हे उभयतां कारभारी दरवाज्यापर्यंत सामोरे जातात आणि फरांसिसांच्या बादशहाचा वकील या नात्यानें त्याला आपल्याजवळ सन्मानानें बसवून घेतात, आणि त्याच दरबारास आमचा वकील जातो तेव्हां कोणी तरी तिसऱ्या दर्जाचा खप्पड मुत्सद्दी सामोरा येऊन त्याला कुठें तरी कोंपऱ्यांत नेऊन बसवितो, आणि घटकाभरानें बोळवण करितो ! केवढा हा अन्याय ! काय हा आमच्या राष्ट्राचा उपमर्द ! इंग्रजांनीं भयभीत होऊन पुरंदरच्या तहाचीं कलमें शब्दशः पाळावींत एवढ्यासाठींच नानांनीं हें फ्रेंच वकिलाचें बुजगावणें इंग्रजांसमोर आणून उभें केलें होतें. नानांचा हा कावा इंग्रजांनाही पूर्णपणें समजत होता; परंतु आपल्या मतलबाकरितां चहूंकडच्या इंग्रजांनीं एकच आरोळी ठोकली कीं, नाना व फ्रेंच एकसूत्र झाले. फ्रेंचांचीं पलटणें येऊन नानांस सामील होण्यापूर्वीच नानाचा चुराडा केला तरच आपली धडगत आहे !

नाना व इंग्रज यांनीं यावेळीं एकमेकांविरुद्ध जे डावपेंच लढविले, त्यामुळें त्या उभयतांत कायमचें शत्रुत्व निर्माण झालें. सखारामबापू हे मुख्य

कारभारी असूनहि त्यांवर इंग्रजांचा बिलकूल रोष नव्हता. नानांनीं इंग्रजांबद्दल वाईट मत बनविलें तें त्यांनीं मरेपर्यंत सोडलें नाहीं, आणि इंग्रजांनीं त्यावेळीं नानांबद्दल प्रतिकूळ ग्रह करून घेतला त्याचा प्रतिध्वनि अजूनही कोठें कोठें ऐकूं येतो !

असो. पुरंदरचा तह मोडल्याची आगळीक पहिल्यानें मुंबईकरांकडून घडलेली आहे हें लक्षांत न घेतां, विलायतेंतील लोभी डायरेक्टर आणि शिष्टपणाचा आव आणणारा तो कलकत्तेवाला लॉट साहेब यांनीं मुंबई सरकारचाच पक्ष उचलून धरला आणि कलकत्तेकरांचीं सहा पलटणें मुंबईकरांना सामील होण्याकरितां यमुना उतरून काल्पीपर्यंत येऊन दाखल झालीं. आतां मुंबई सरकार मराठ्यांशीं उघडपणें युद्ध पुकारणार तोंच एक फिसालत उद्भवून त्यांनीं युद्धाचा बेत एकाएकीं तहकूब केला ! ती फिसालत कोणती याचा खुलासा पुढील प्रकरणीं केला जाणार आहे.

स. १७७८ फेब्रु.-मार्च.


सखारामबापूचा असंतोष—बारभाईचें कारस्थान उभें करण्यांत बापूनींच पुढाकार घेतला होता, परंतु त्या कारस्थानामुळें राज्यावर अनेक संकटें आलीं त्यांचें निराकारण करण्यांत त्यांचा किंवा त्यांच्या पक्षाच्या मंडळीचा विशेषसा उपयोग होऊं शकला नाहीं. त्या कामीं नाना व त्यांच्या पक्षाचे रास्ते, फडके, पटवर्धन वगैरे सरदार व मुत्सद्दी यांनाच सर्व अंगमेहनत करावी लागली, आणि आतांपर्यंत या मसलतीला कोट्यावधि द्रव्य लागलें, तें सर्व नानांनींच आपल्या जबाबदारीवर उभें केलें. याचा साहजिकच असा परिणाम झाला कीं, बापू राज्यकारभारांत दिवसेंदिवस फिके पडूं लागले आणि नानांचें महत्व त्याप्रमाणानें वाढूं लागलें. निजाम, भोसले, गायकवाड यांचीं दरबारें आजपर्यंत बापूंच्या शब्दाला मान देत असत. परंतु आतां तीं तिन्हीं दरबारें सर्वस्वी नानांच्याच तंत्रानें चालूं लागलीं. पेशव्यांची सर्व फौजही हरीपंत आणि परशुरामभाऊ यांच्यामार्फत नानांच्याच लगामीं लागली. याप्रमाणें नानांचा राज्यकारभारांत वर्चष्मा झालेला पाहून, बापूंच्या मनांत असूया उत्पन्न झाली आणि ते नानांच्या कामांत विघ्नें आणूं लागले. बापू हे मूळचे

दादासाहेबांचे पक्षपाती असल्यामुळें रावसाहेब पेशव्यानीं ऊर्जितावस्थेला आणलेले सरदार व मुत्सद्दी यांचें व बापूंचें पूर्वींचें वितुष्ट होतेंच. बापू आतां मुख्याधिकारावर आल्यावर त्यांनीं पूर्वींचे द्वेष मनांत वागवून त्या त्या लोकांच्या कामांना आंतून आंतून हिसके देण्याची सुरवात केली. नाना व बापू यांचीं धोरणें स्वभावतःच भिन्न होतीं. सर्वस्व गमावूनही राज्याचें कल्याण साधावें असें नानांचें धोरण होतें. उलटपक्षीं बापूंना राज्याच्या कल्याणापेक्षां स्वतःचें महत्वच अधिक प्रिय वाटत होतें. मुख्याधिकारावर असलेल्या या दोघां मुत्सद्यांच्या भिन्न भिन्न धोरणामुळें राज्यकारभाराची गाडी वेळोवेळ जागजागीं अडखळूं लागली. बापूंचा असंतोष वृद्धिंगत होण्याचें एक नवीनच कारण यावेळीं उद्भवलें तें असें:—

पेशवाईत नक्त पैसा, कापड किंवा जमीन वगैरे सरकारांतून कोणास कांहीं द्यावयाचें झालें तर एक कागद तयार होत असे, त्याला 'देणें यादी' म्हणत. या यादीवर 'द्यावें' असा शेरा मालकानें करावा आणि नंतर त्याच्या कारभाऱ्यानें 'देवावें' असा शेरा करावा असा प्रघात असे. अगदीं जरूरीच्या प्रसंगीं नुसता 'देवावें' असा शेरा करून मालकाच्या 'द्यावें' या शेऱ्याशिवाय आपल्याच जबाबदारीवर एखाद्या कामाचा निकाल कारभारी करीत असत. गंगाबाईची स्थापना झाल्यापासून सखारामबापूकडे * 'वडीलकी' चा म्हणजे पर्यायानें मालकाचा दर्जा गेला. 'अखत्यारी'चें म्हणजे कारभाऱ्यांचें काम नानाकडे आलें. प्रत्येक 'देणें-यादी'वर बापूंचा 'द्यावें' हा शेरा व्हावा लागे त्यामुळें सर्व लोकांची नाकें बापूंस आपल्या मुठींत ठेवतां येत होतीं. आपल्या मसलतीस बापूंकडून वारंवार अडथळा येऊं लागला, तेव्हां त्याचें निवारण करण्याच्या बुद्धीनें नानांनीं नुसता देवावें असा शेरा मारून किरकोळ कामांचा निकाल करण्याची सुरवात केली. अद्यापि प्रत्येक महत्वाचें काम बापूंकडे नेणें आणि सर्व कारभार त्यांचेच हुकमानें चालतो असें लोकांस दाखविणें, यांत नाना तिळप्राय कसूर करीत नव्हते. किरकोळ कामें मात्र एखादे

---

* 'वडीलकी' व 'अखत्यारी' यांस इंग्रजींत शब्द अनुक्रमें The power of Veto व power of executive असें लावतां येतील.



नाना फडनवीस यांचें अक्षर.

वेळीं ते 'देवावें' असा शेरा मारून निकालास लावीत. तो रोख त्या पाताळयंत्री बापूंनीं तात्काळ ओळखला ! ते जळफळूं लागले कीं, 'देवावें' या शेऱ्यावर जर लोकांचीं कामें होऊं लागलीं तर आम्हांकडे 'द्यावें' करून घेण्यासाठीं कोण येणार ? आणि असें झाल्यावर आमची वडीलकी ती कसली ? 'देवावें' या शेऱ्याबद्दल अशी धुसफुस चालू असतांना नानांनीं शिंद्यांशीं मैत्री करून त्यास आपणांकडे ओढून घेतलेलें पाहतांच बापूंची बालंबाल खात्री झाली कीं, पुढें मागें प्रसंग पडल्यास आपलें उच्चाटण करतां यावें म्हणूनच नानांनीं ही शक्कल योजून ठेविली आहे !

होळकरांचा रुसवा—स. १७७६ च्या जुलैंत होळकर पुण्यांत आले ते वर्ष दीड वर्ष स्वस्थ बसूनच होते. या अवधींत त्यांच्या लौकिकास साजेशी एकही कामगिरी त्यांनीं करून दाखविली नाहीं. आतां कारभारी शिंद्यांस जहागीर देतात असें पाहून होळकर गुरगुरूं लागले कीं, आम्हांलाही दहा लक्षांची जहागीर आणि असीरगडासारखा एक किल्ला मिळाला पाहिजे. कारण आम्हीं व शिंदे बरोबरीचे सरदार ! यावर कारभारी आधीं शिंद्याप्रमाणें कामें करून दाखवा आणि नंतर काय मागणें तें मागा असें म्हणूं लागले. परंतु या उत्तरानें होळकराचें समाधान कसचें होतें ! ते उलट ज्यास्तच हट्टाला पेटून दरबारी कामांत मनमानेल तशी ढवळाढवळ करूं लागले. गोविंदराव व फत्तेसिंग गायकवाड या भावाभावांचा सरदारीबद्दल आज बरेच दिवस तंटा चालला होता. अठरा लक्ष रुपये नजराणा देण्याच्या करारावर फत्तेसिंगासच सरदारी द्यावी असें कारभाऱ्यांनीं ठरविलें. नारो शंकराचे दोन दत्तक पुत्र त्र्यंबकराव व रघुपतराव यांचाही राजेबहादुरांच्या जहागिरीबद्दल असाच तंटा चालला होता. या तंट्याचा कारभाऱ्यांनीं असा निकाल लावला कीं, दोघांनिळून सरकारांत दहा लक्ष रुपये नजराणा भरावा आणि जहागीर निम्मेनिम वांटून घ्यावी. या दोन कामांबद्दल एकंदर अठावीस लक्ष रुपये पेशवे सरकारांत यावयाचे होते, परंतु होळकरांनीं ढवळाढवळ करून या रुपयांना खो बसविला ! त्यांनीं कारभाऱ्यांशीं हट्ट धरिला कीं, गायकवाडांची सरदारी फत्तेसिंगास न देतां गोविंदरावासच द्यावी आणि राजे-

बहादरांच्या जहागिरीची वांटणी न करतां ती सर्व एकट्या रघुपतरावासच द्यावी. सरदाऱ्या देण्याच्या कामांत होळकर व कारभारी यांची हासाधीस चालू आहे असें पाहतांच फत्तेसिंग गायकवाड आणि उभयतां राजेबहादर यांनीं नजराणे भरण्याचे बाबतींत तत्काळ खाका वर केल्या ! कर्नाटकांत जाऊन हरीपंताची कुमक करण्याबद्दल कारभाऱ्यांनीं सांगितलें, तेव्हां आज निघतों, उद्या निघतों अशा होळकरांनीं कित्येक महिने थापा मारल्या आणि शेवटीं फारच निकड बसली तेव्हां त्यांनीं उत्तर दिलें कीं, शिंदे येतील तरच त्यांबरोबर आपण कर्नाटकांत मोहिमेवर जाऊं. एकटे साफ जाणार नाहीं ! याप्रमाणें वागून आणि उलट कारभाऱ्यांवरच रूसून होळकर पुण्याहून निघून वाफगांवास जाऊन राहिले ! त्यांची समजूत करण्याकरितां कारभाऱ्यांनीं सरदार विसाजी कृष्ण बिनीवाले यांस पाठविलें, परंतु त्यांची समजूत पडली नाहीं.

सन १७७८ जाने.

बापूंचा असंतोष आणि होळकरांचा रुसवा यांतच एका मोठ्या राजकारणाचें बीज सांठविलेलें आहे. आतांपर्यंत या प्रकरणांत जागोजाग पुढील सातव्या प्रकरणाचे हवाले दिले आहेत त्यावरून वाचकांच्या आतां लक्षांत आलेंच असेल कीं, नाना फडनवीस, हरीपंत फडके, महादजी शिंदे, परशुरामभाऊ पटवर्धन, सखारामबापू, करवीरकर, होळकर आणि इंग्रज या सर्वांच्या हालचालीवर एकाच राजकारणाचा परिणाम झालेला आहे. असें हें सर्वव्यापी राजकारण म्हणजे मोरोबा दादांचें कारस्थान हें होय. या कारस्थानाच्या उभारणींत आणि संहारणींत भाग घेणाऱ्या प्रमुख घटकांच्या रागलोभाचे धागेदोरे आतां खुलासेवार उलगडून सांगितल्यामुळें यापुढें त्याच्या पुढील हकीगतीकडे वळणें जास्त सोईचें झालें आहे.

# प्रकरण सातवें.

## मोरोबादादांचें कारस्थान.

( सन १७७८ फेब्रु.–जून. )

मोरोबादादांनीं आतांपर्यंत निरनिराळे फितूर केले त्यांचा थोडा बहुत उल्लेख पूर्वी केला आहेच. त्यांची कांहीं तरी समजूत काढावी म्हणून नानांनीं बरेच प्रयत्न केले. स. १७७७ सालीं मोरोबांनीं साडेचार लक्षांचा सरंजाम घेऊन फौजेचा कारभार पहावा अशी नाना व मोरोबा यांमध्यें तडजोड ठरली, परंतु बापूंना ती तडजोड मानवली नाहीं. कारण हे भाऊ भाऊ एक होऊन आपलें उच्चाटण करतील असें त्यांना भय पडलें! स. १७७८ जानेवारींत बापूंनीं या तडजोडीला मान्यता दिली, परंतु मोरोबांनींच आतां तें बोलणें फेटाळून लाविलें! बापूकडून गुरुमंत्र मिळाल्यामुळें ते आतां म्हणूं लागले कीं, बापू व नाना हे दोघेही कारभारांत नकोत. त्यांनीं स्वस्थ घरीं बसून मी जें जें करीन त्याला नुसतें हूं हूंच म्हणत रहावें. सर्व राज्याचा कारभार मी एकटाच अखत्यारीनें करणार!

नानांचे सोबती हरीपंत आणि परशुरामभाऊ हे कर्नाटकांतील मोहिमेवर आणि महादजी शिंदे करवीरच्या मोहिमेवर गुंतले आहेत, ही संधि साधून नानांच्या नाड्या आवळाव्यांत आणि आपणच सर्व राज्यकारभार बळकवावा अशी मोरोबांनी मसलत योजिली. त्यांनीं योजिलेल्या मसलतींत मुख्य चार मुद्दे होते. १ पंतप्रधानांचें पद सवाई रावसाहेब यांजकडे आहे तें त्यांजकडे तसेंच असावें. त्यांत ढवळाढवळ करावयाची नाहीं. २ पेशवे अल्पवयी असल्यामुळें ते सज्ञान होईपर्यंत श्रीमंत दादासाहेब यांजकडे वडीलकी चालावी. सर्व कारभार त्यांच्याच हुकमानें चालावा. ३ सखारामबापूकडे मुख्य कारभारीपणा आहे तो तसाच

त्यांजकडे कायम रहावा. ४ अखत्यारीचें काम म्हणजे दुय्यम कारभाऱ्याचें काम नानांकडे आहे तें आपणाकडे असावें. नानांचा कारभारांत कोणताही संबंध असूं नये. मोरोबांनीं ही जी मसलतीची आंखणी केली त्यांत त्यांचें बरेंच चातुर्य दिसून येतें. सखारामबापूकडे मुख्य कारभारीपणा राहिल्यामुळें ते व त्यांच्या पक्षाची मंडळी खूष—सवाई रावसाहेब यांकडे पेशवे पद आणि दादांकडे वडीलकी चालावयाची असल्यामुळें दादांना अनुकूळ असणारी मंडळीही खूष—एकूण नाना व त्यांच्या पक्षाची मंडळी यांशिवाय बाकी सर्वांनीं मोरोबाच्या कारस्थानीपणावर खूष मर्जी दाखवावी अशी त्यांत मोठी सोय केली होती!

बापू, होळकर आणि इंग्रज यांचा नानांवर रोष कां झाला होता त्याचें विवेचन गेल्या प्रकरणांत केलेंच आहे. अर्थात् त्या तिघांनीं मोरोबाला आनंदानें पाठिंबा दिला. चिंतो विठ्ठल, सदाशिव रामचंद्र वगैरे दादांचे जुने अनुयायी मोरोबाला पूर्णपणें अनुकूल झाले. नानांनीं आज बरींच वर्षें मराठी राज्याचा अखत्यारीनें कारभार केला होता, त्यामुळें त्यांना साहाजिकच पुष्कळांचें शत्रुत्व संपादावें लागलें होतें. शिवाय पुण्यांत त्यावेळीं सुखवस्तु आणि मुत्सद्दीपणाची घमेंड बाळगणारे असे बरेच लब्धप्रतिष्ठित लोक होते. ते लोक कोणत्याही नवीन मसलतींत सामील व्हावयास नेहमीं एका पायावर तयार असत! अर्थात् मोरोबांचें अनुयायीमंडळ हां हां म्हणतां फुगत चाललें यांत काय नवल!

कोणत्याही मसलतीला सैन्यबळाची अनुकूलता जरूर पाहिजे मोरोबांनीं रघुपतराव राजेबहादूर यांना पन्नास हजार आणि दुसऱ्याही कोणा कोणास कांहीं रुपये देऊन त्याजकरवीं सैन्य जमाविण्याची व्यवस्था केली. शिवाय त्यांनीं मोंगलाईंत बरेच गारदी व पठाण चाकरीस ठेविले होते. सैन्यबळाचे बाबतींत मोरोबाचा मुख्य भार होळकरांवर होता. शिंद्याप्रमाणें तुम्हालाही दहा लक्षांची जहागीर आणि अशीरगडासारखा एक किल्ला देतों असें मोरोबांकडून वचन मिळाल्यावरून आणि सैन्याच्या उभारणीसाठीं आगाऊ पांच लक्ष रुपये पदरांत पडल्यावरून होळकरांनीं या मसलतीसाठीं जरूर पडेल तेवढें सैन्य पुरविण्याची जबाबदारी आपल्य

शिरावर घेतली.

त्या सालच्या जानेवारींत नाना व बापू हे पुरंदरावर एकत्र जमले. क-
स. १७७८ नर्नाटकांत हरिपंताकडे कुमक पाठविणें आणि मोरोबाची कांहीं समजूत निघाली तर काढणें हीं दोन कामें कारभाऱ्यांना आतां तांतडीनें करावयाचीं होतीं. पहिल्या कामाबद्दल आपा बळवंत व बाजीपंत अण्णा यांजबरोबर सात आठ हजार फौज देऊन त्यांची कर्नाटकांत रवानगी करावी असें नानांनीं सुचविलें. नानांच्या प्रत्येक कामांत विघ्नें आणावयाचीं असें बापूंनीं अलीकडे व्रत स्वीकारलें होतें. परतु या वेळीं मात्र बापूंनीं नानांस बिलकुल विरोध केला नाहीं, कारण त्यांना कसेंही करून ही फौज नानांपासून दूर घालवावयाचीच होती! या प्रसंगीं बापूंना हरीपंतांबद्दल इतका कळवळा आलेला दिसूं लागला कीं, त्यांच्य मदतीकरितां आपण स्वतःच कर्नाटकांत जाणार असा त्यांनीं चोहोंकडे पुकारा केला. स्वारीची तयारी करवून बापूंनीं डेरेसुद्धां बाहेर देवविले इतक्यांत कांहीं अपशकून झाल्याचें निमित्त होऊन बापूंची ही स्वारी एकाएकींच थंड पडली! असो. बापूंकडून कोणताच विरोध न आल्यामुळें आपा बळवंत व बाजीपंत अण्णा हे फौजेसह पुण्याहून निघून कर्नाटकाची वाट चालू लागले. दुसरें काम मोरोबाची समजूत करण्याचें. पण ती तर आतां कशानेंच होईना! नानांकडून सामोपचाराचें बोलणें येतांच मोरोबा रुसून बारामतीस जाऊन राहिले! मोरोबाच्या बोलण्याचा पाचपेंच पाहतां त्यांच्या मनांत कोणती तरी मोठीच मसलत घोळत असावी असा नानांस सुमार दिसू लागला. सर्व बखेड्यांचें उगमस्थान सखारामबापू हे असावयाचे हें जाणून नानांनीं त्यांच्या मनाचा ठाव घेऊन पाहिला. परंतु तो वृद्ध मुत्सद्दी ‘ प्रसन्नसलिलो गूढनक्र इव ह्रदः ’ असा असल्यामुळें त्यांच्या मुखांतून प्रेमाचीं आणि विश्वासाचीं भाषणें आणि इमानाबद्दल वाटेल तसल्या आणाशपथा यांशिवाय कांहींच बाहेर पडेना! बापू आपणाला प्रतिकूल नाहींत त्या अर्थी आपणावर कोणाचें कांहीं चालणार नाहीं असें मानून नाना आपल्या जागीं निश्चिंत राहिले. या सुमारास शिवाजीपंत लिहितो—“ राजश्री मोरोबादादांच्या मनांतील भाव अनेक

प्रकारचे आहेत. कोणी अनुकूल जाल्यास मांडी थापटण्यास चुकणार नाहींत ! स्वतः अंगेजणी होणें न होणें कळतच आहे !" बापूंची अनुकूळता मिळून मोरोबादादा मांडी थापटतील हा तर्क मात्र त्यावेळीं कुणालाच झाला नाहीं !

मोरोबाचें कारस्थान झपाट्यानें उत्कर्ष पावत होतें तरीही त्याचीं सूत्रें इतक्या गुप्तपणें खेळवलीं जात होतीं कीं, शत्रूंच्या बातम्या काढण्यांत त्यांचा हातखंडा त्या नानांनाही त्याचा अंदाज स्पष्टपणें बांधतां येईना ! शेवटीं मोरोबा व होळकर यांच्या हालचालीवरून या कारस्थानाचा थोडासा अंदाज बांधून नानांनीं निजामाकडे फौजेची मदत मागितली. निजामानें नानांच्या या मागणीला मोठ्या आनंदानें मान्यता देऊन त्यांस आश्वासन दिलें कीं, तुम्हांवर कसलाही प्रसंग पडला तरी मी तुमचें साह्य करीन ही खात्री बाळगा. तुमची सूचना येतांच मी स्वतः सर्व फौजेसह पुण्यास येतों आणि तुमच्या मनाप्रमाणें बंदोबस्त करून देतों. इतक्यांत मोरोबानीं गुप्तपणें चाकरीस ठेवलेले गारदी व पठाण मोंगलाईतून पुण्याकडे येऊं लागले. त्यांजजवळ सरकारचें दस्तक अर्थातच नव्हतें, त्यामुळें नानांनीं ते बंडखोर आहेत असें जाणून त्यांवर फौज पाठवून त्यांस कैद केलें व कांहींस मारून टाकिलें. चौकशी करतां हे मोरोबाचे लोक असा छडा लागला ! इतका प्रकार होतांच बापूंनीं मोरोबाकडे गुप्तपणें इशारा पाठविला कीं—" आतां मंत्र फुटला यास्तव त्वरा करावी !"

(फेब्रु.–मार्च.)

मोरोबाच्या कारस्थानाचा हा पहिला धक्का बसतांच नानांनीं चोहोंकडे पत्रें पाठवून आपल्या पुढील कारस्थानाचीं सूत्रें पक्कीं करण्यास सुरवात केली. नानांच्या सूचनेवरून आठ पंधरा दिवसांतच निरनिराळ्या ठिकाणीं फौजांच्या हालचाली सुरू झाल्या आणि नानांचें सामर्थ्य सर्वांच्या प्रत्ययाला येऊं लागलें. मुधोजी भोसले हे नागपुराहून कूच करून माहुरच्या सुमारें फौजेसह तळ देऊन राहिले. निजामानेंही फौजेची सिद्धता करून बाहेर डेरे दिले. हरीपंत फडके

(मार्च)

१ अधिकारयोग पृष्ठ ६८.

आणि परशुरामभाऊ हे हैदरावरची मोहीम तशीच अर्धवट टाकून तुंगभद्रेअलीकडे आले आणि महादजी शिंद्यास मिळवून घेण्याकरितां मिरजप्रांताकडे येऊं लागले. महादजी शिंद्यानीं करवीरकरांशीं तह ठरवून त्या मसलतींतून मोकळे होण्याची घाई चालविली. बाजीपंत अण्णा व आपा बळवंत हे कर्नाटकांत जाण्याकरितां कृष्णेपर्यंत गेले होते, परंतु ते आतां त्या प्रांताचा रोंख सोडून एकाएकीं घाईघाईनें पुण्याकडे कूच करून निघाले.

इकडे बापूंकडून मंत्र फुटल्याची सूचना येतांच मोरोबा बारामतीहून निघून होळकराकडे वाफगांवास गेले. आठ पंधरा दिवसांत रघुपतराव राजेबहादर, पांडुरंगराव बारामतीकर, बजाबा पुरंदरे, सदाशिव रामचंद्र, चिंतो विठ्ठल, गोपाळ नाईक तांबवेकर, विसाजीपंत बिनीवाले, बाळाजीपंत दामले वगैरे मोरोबाचे साथीदार होळकराच्या छावणींत गोळा झाले. नंतर ही सोळा सतरा हजार फौज एकदम पुण्यावर चालून आली. यावेळीं मोरोबाच्या सपाट्यांत नाना सांपडते तर ते तत्काळ कैदेंत पडते किंवा कदाचित् प्राणासही मुकते. परंतु मोरोबा पुण्यावर चालून येतो असें पाहतांच नाना घाईघाईनें पुरंदरावर निघून गेले. इकडे मोरोबानें पुणें ताब्यांत घेतलें आणि शनिवार वाड्यांत मरणास टेकलेली पार्वतीबाई होती तिजकडून त्यांनीं दिवाणगिरीचीं वस्त्रें, मुतालिकीची शिक्केकट्यार, जरीपटका व नौबत हीं घेतलीं. नंतर ते व होळकर पुरंदरावर चालून येण्यास निघाले.

२६ मार्च

मोरोबाच्या कारस्थानामुळें नानांवर मोठाच पेंच येऊन पडला. त्यांच्या मुत्सद्दीपणाच्या कसोटीचीच ती वेळ होती! त्यांना या प्रसंगीं दोन मार्गांच्या अवलंब करतां आला असता. मोरोबाजवळ पंधरा वीस हजार फौज जमली आहे आणि त्याला इंग्रजांचें पाठबळ आहे हें आतां त्यांना स्पष्टपणें दिसत होतें. उलटपक्षीं नानांचेंही सामर्थ्य बरेंच मोठें होतें. निजाम, भोसले, शिंदे, हरीपंत, परशुरामभाऊ, आपा बळवंत या सर्वांची मिळून कमींत कमी पन्नास हजार फौज पुण्यास आणवून मोरोबा, होळकर आणि इंग्रज यांशीं युद्ध करावें हा स्वार्थसाधनाचा पहिला धोपट मार्ग

होता. हा मार्ग पंडितापासून पामरापर्यंत सर्वांनाच सहज सुचण्याजोगा होता. या मार्गाचा अवलंब नानांनीं केला असता तर उभयपक्षांचे मोठेंच युद्ध जुंपलें असतें आणि त्या रणधुमाळींत मोरोबाचें कपाळ फुटलें असतें किंवा कदाचित् नानांचेंही फुटलें असतें ! नानांचा जय झाला असता तर निजाम व भोंसले यांनीं पेशवाई मुलखाचा मला मोठा लचका तोडला असता आणि मोरोबाचा जय झाला असता तर इंग्रजांनीं सर्व मराठी राज्यच गिळंकृत केलें असतें !

स्वार्थसाधनाचा दुसरा मार्ग म्हणजे राज्याच्या कल्याणासाठीं तूर्त अधिकार गमवावा व पड घ्यावी. पुढें समय साधेल, तेव्हां युक्तीच्या वाटेनें अधिकार मिळवावा तो राज्याच्या कल्याणासाठींच मिळवावा. त्यांत राज्याचें काहीमात्र नुकसान होऊं नये व महाराष्ट्र वीरांच्या रक्ताचा थेंबही भूमीवर पडूं देऊं नये. हा दुसरा मार्ग छातीचा अकलेचा आणि धोरणाचा होता. खऱ्या देशाभिमानी मुत्सद्याची तारीफ यांत होती. नानांनीं हा दुसरा मार्ग पतकरला ! बापूंच्या मध्यस्थीनें त्यानीं मोरोबाशीं समेट करून घेतला आणि आपखुषीनें सर्व राज्याधिकार शत्रूच्या स्वाधीन केला ! नाना व मोरोबा यांमध्यें समेट घडून आला त्यांत पांच कलमें मुख्य होतीं तीं अशीं— १ नानांकडे किल्लेकोट व सरंजाम आहे तो सर्व यथापूर्व चालावा. पुरंदरचा बंदोबस्त व पेशव्यांचें संरक्षण हीं कामें नानाकडे आहेत; तीं त्यांजकडे तशींच कायमचीं चालावीं. २ सखारामपंतांनीं 'देणें' करावें. 'वडीलपण' आहे तसेंच त्यांजकडे असावें. त्यांस पुसल्याशिवाय काम कारभार करूं नये. ३ अखत्यारी राजश्री मोरोबादादांनीं करावी. नानास संमतांत घ्यावें. 'देविणें' नानांनीं करूं नये. ४ सर्वत्रांचें यथापूर्व चालवावें. कोंकणस्थ देशस्थ हें चित्तीं आणूं नये. ५ दादासाहेबांस तूर्त आणूं नये. पुढें आणिलें तर आणावें.

हा समेट ठरवितांना नानांनीं पेशव्यांचा बंदोबस्त शत्रूच्या हातीं दिला नाहीं आणि दादांना मुंबईहून आणण्याचें कारस्थान लांबणीवर पाडलें, या दोन गोष्टी विशेष ध्यानांत ठेवण्याजोग्या आहेत. मोरोबाच्या कारस्थाना-

संबंधीं नानांनीं आपल्या मनाशीं जें धोरण ठरविलें होतें त्याचे हे दोन प्रमुख आधारस्तंभच होत !

नाना व मोरोबा यांमध्यें समेट घडून येतांच सखारामबापू, मोरोबादादा, चिंतो विठ्ठल, बजाबा पुरंदरे आणि होळकर हे पुरंदरावर आले आणि त्यांनीं श्रीमंतांस भेटून नजरा केल्या. सर्वांच्या समक्ष गांठी पडून बाह्यतः सर्वांची दिलसफाई झाली. आतांपर्यंत दोन कारभारी होते ते आतां त्रिवर्ग झाले एवढाच फरक, बाकी राज्यकारभाराची गाडी पुनः सुरळीतपणें चालू लागण्यास कोणताच प्रत्यवाय राहिला नाहीं. नानाकडे कारकून होते ते चट सारे दप्तरें गुंडाळून मोरोबाकडे येऊन बसले. प्रांतोप्रांतींच्या फिर्यादी घेणें, अंमलदारांस ताकीदपत्रें लिहिणें, सर्व खात्यांच्या वर्द्या घेणें व नवीन हुकूम सोडणें, पंचाइती नेमणें, हरएक प्रकारच्या मुलकी व फौजदरी खात्यांवरील बंदोबस्त राखणें अशीं कामें एक ना दोन ! नानांकडे जितकीं म्हणून कामें होतीं तीं सारीं आतां मोरोबादादा करूं लागले. होळकरांच्या दपटशामुळें असा कडेकोट बंदोबस्त होऊन गेला कीं, मोरोबाच्या हुकमाशिवाय राज्यांतलें पान सुद्धां हालूं नये ! मोरोबाच्या घरीं दररोज दरबार भरे, त्यांत राज्यांतले तमाम सरदार व सुभेदार यांचे व परकी राजेरजवाडे यांचे वकील हजर राहून आपल्या कामाविषयीं विनंति करीत. प्रत्येक काम अखेर निकालाकरितां नानाप्रमाणें मोरोबाही बापूंकडे नेत, पण तें आतां बापू तत्काळ मोरोबाच्या मर्जीप्रमाणें करीत ! नानाप्रमाणें त्यास खोळंबवून पाडीत नसत ! एकंदरींत सारें राज्य हातीं येऊन मोरोबाची अधिकाराची हौस परिपूर्ण झाली !

सर्व अधिकार हातीं आला तरी मोरोबाचे डोळे दिपून मात्र गेले नाहींत. दादांना मुंबईहून आणून त्यांची अधिकारावर स्थापना करावी हा त्यांचा मूळ उद्देश होता. परंतु बापूंना ही गोष्ट बिलकूल पसंत नव्हती. 'बारभाई'ची उभारणी करण्यांत दादांच्या दृष्टीनें बापू हे अव्वल दर्जाचे गुन्हेगार आणि नाना हे दुय्यम दर्जाचे गुन्हेगार होते. दादा अधिकारावर आले तर ते सर्वांआधीं आपलेंच पारिपत्य करतील असें बापूंस भय वाटत होतें. मोरोबांसही मनांतून दादा नको होते.

सर्व राज्य दादांच्या विरुद्ध आहे ही गोष्ट त्यांसही समजत होती. आपला अधिकार जर स्वतंत्रपणें अबाधित चालण्यासारखा असेल तर दादांना आणूं नये आणि तसें होण्यासारखें नसेल तर मात्र दादा व इंग्रज यांस आणून नाना व त्यांच्या पक्षाची मंडळी यांचीं हाडें मऊ करावीत असा त्यांचा विचार होता. नानांशीं समेट ठरवितांना बापू व नाना यांच्या भिडेमुळें दादांना आणावें कीं न आणावें हा मुद्दा मोरोबांनीं तसाच मोघम ठेवून दिला होता तो यासाठींच होय. असो. मोरोबाची तूर्तची मसलत कसेंही करून नानांचें सामर्थ्य नष्ट करणें हीच होती.

नाना फडनवीस कोठें जातात, काय करितात, कोणाशीं बोलतात याची मोरोबादादा पाळत ठेवूं लागले. ते श्रीमंतांस घेऊन शिंद्याकडे अगर अन्यत्र पळून जातील ही काय ती तूर्तच्या प्रसंगीं मोरोबास भीति पडली होती ! एकीकडे गोड बोलायचें, आणि एकीकडे पाळतही ठेवायची, असें करितां करितां पुरंदरच्या पायथ्यास नानांची पांच सहा हजार फौज होती तींत फितूर करून होळकराकडून. त्यांस कैद करविण्याचाहि एकदां मोरोबानीं यत्न केला ! परंतु नाना नेहमीं सावधपणानें रहात असल्यामुळें ते किल्ल्यावर तत्काळ पळून गेले व तेव्हांपासून ते किल्ल्यावरच राहूं लागले. कार्याकारण मात्र खालीं येऊन ते लगेच वर जात असत. पुरंदराभोंवतीं चौक्या बसवून मोरोबांनीं नानांचें चिठीचपाटीचें दळणवळण बंद पाडलें. येऊन जाऊन पुरंदर, पेशवे व हजार पंधराशें स्वार एवढेंच काय तें आतां त्यांच्या ताब्यांत राहिलें. आणखी एखादा फितूर होऊन हेंही हातांतून जावें, आणि मग प्राण तरी जावे अगर सर्वस्व जाऊन कारागृह तरी पहावें लागावें, असें दुर्धर संकट नानांस प्राप्त झालें !

मोरोबाचा झेंडा पुणें दरबारांत उभा राहतांच इंग्रजांना पराकाष्ठेचा हर्ष झाला. दादांना पेनशन देऊन त्यांनीं मुंबईस ठेवून घेतलें होतें. आपल्या गळ्यांतलें हें लोढणें परमारें मोरोबा काढून घेणार आणि राज्याधिकारावर स्थापणार—या मसलतीमुळें मराठी राज्यांत वर्षानुवर्ष दुही माजून राहणार आणि त्या दरबारांत ढवळाढवळ करावयास वाव सांपडून आपल्यावर रुपयांचा पाऊस पडणार अशीं सुखस्वप्नें त्यांना पडूं लागलीं ! दादा

एप्रिल } आतां मुंबईहून निघून साष्टीस तळ देऊन राहिले. इंग्रजांचीं चार पलटणें व सत्रा तोफा असा सरंजाम स्वारीच्या तयारीनें त्यांजबरोबर सज्ज होऊन निघाला होता. कांहीं इंग्रज साष्टीची खाडी उतरून उरणास आले आणि पेशवे सरकारचा एखाददुसरा महालही त्यांनीं ताब्यांत घेतला! एकूण मोरोबाकडून सूचना जातांच दादा व इंग्रज तत्काळ पुण्यास येणार ही गोष्ट नानास स्पष्टपणें दिसूं लागली.

याप्रमाणें चोहोंकडची स्थिति लक्षांत घेऊन नानांनीं मसलत ठरविली तिचा नकाशा पुढें लिहिल्याप्रमाणें होता:--मोरोबा व सखारामबापू या दोघांच्याही मनांतून दादासाहेब व इंग्रज यांस आणावयाचें नाहीं. आपण जरब दाखवून त्यांस भाग पाडूं तर मात्र ते त्यांस आणतील. याकरितां त्यांशीं वागण्यांत हल्लीं आपण लीनता धरली आहे ती अशीच आणखी कांहीं दिवसपर्यंत कायम ठेवावी. आपण दुर्बल झालों, तुम्हांपुढें आपलें कांहीं चालत नाहीं, तुमचा अधिकार आम्ही शिरसा मान्य केला, असेंच सोंग आणावें. तेणेंकरून बापू व मोरोबा निर्धास्त राहतील आणि त्यांना दादा व इंग्रज यांस आणावयाची जरूर भासणार नाहीं. एप्रिल व मे या दोन महिन्यांतच इंग्रज आले तर येऊं शकतील. पुढें जून पासून पावसाळा सुरू झाल्यावर लष्कराचें अनिवार लटांबर बरोबर घेऊन इंग्रजांच्यानें बोरघांट चढवणार नाहीं हें खास. पुढें त्यांची ती मसलत आक्टोबर नोव्हेंबरावर जाणार. तेथपर्यंत शिंदे फडके व पटवर्धन यांच्या फौजा आणून आपण मोरोबाचें खूळ मोडून टाकूं. याप्रमाणें राज्यांत शांतता होऊन घरभेद्यांचा नायनाट झाल्यावर इंग्रजाशीं वर्षानुवर्षं लढावें लागलें तरी तें काम तितकेंसें कठीण नाहीं!

या धोरणास अनुसरून नानांनीं मोरोबापुढें 'दीन झालों, शरण आलों' असा बहाणा सुरू केला त्यामुळें महाराष्ट्रांत भ्रमाच्या भोपळ्याचें पीक सडकून आलें! मोरोबांनीं नानांस चांगलेंच नरम पाहलें आहे त्याअर्थीं त्यांची जखडबंदी करून मोरोबा त्यांचा आणि पेशव्यांचा प्राण घेणार–मोरोबा, इंग्रज व दादासाहेब यांस आणणार त्याअर्थीं नाना व तत्पक्षीय सरदार व मुत्सद्दी यांचीं टाळकीं आतां चांगलीच सडकलीं

जाणार अशा चोंहोंकडे भूमका उठूं लागल्या ! नानांकडील कांहींच बातमी न समजल्यामुळें खुद्द परशुरामभाऊ किती उदासीन आणि चिंताग्रस्त झाले होते हें त्यांच्या निरनिराळ्या तारखांच्या पत्रांतील उतारे देऊन आम्हीं येथें नमूद करतों—

४ एप्रिल, प्रातःकाळ—" आतां श्रीगजाननानें श्री. रा. रावसाहेबांचा व नानांचा बचाव करावा. (पुरंदर) किल्ल्याचा बंदोबस्त असावा म्हणजे सर्व जोड पावली !"[1]

४ एप्रिल, तिसरा प्रहर—" पुण्याहून नानांचीं पत्रें आलीं त्यांवरून सर्व आशा मोडली ! श्री. रा. दादासाहेबांचा टेंभा उभा राहिला ! श्रीमंतांची व नानांची काय अवस्था होत्ये श्रीहरी जाणे ! श्री.रावसाहेबांस सलामत असावी म्हणजे बाकी फिकीर करीत नाहीं."[2]

१४ एप्रिल—" विनी ज्यांनीं राजकारण केलें त्यानीं शिंद्यांस टाकून केलें असेल असें नाहीं. जेथें होळकर तेथें शिंदे यांत संशयच नाहीं ! हरकसेंहीकरून श्रीमंतांचें व नानांचें संरक्षण होतें म्हणजे बरें होतें."[3]

२१ एप्रिल—" श्रीमंतांस ममईहून आणविणार हा तर सिद्धांतच दिसतो, तेव्हां बाकी काय राहणार ! प्राणाशींच गांठ आहे ! नानांस मनसबा करणें असता तर फौजेस खर्चास पाठविते, पत्रें न येत तर विप्र एकामागून एक रवाना करते. तें नाहीं. तेव्हां सर्व कळलेंच आहे ! श्री० रावसाहेबांस कसाबांच्या हातीं देतील इतकाच खेद ! बरकड ते तर आपले जिवावर उदारच आहेत ! पुढें पैका कोण खाणार श्रीहरी जाणे !"[4]

२८एप्रिल—"श्रीमंत इंग्रजमुद्दां येतात. त्यापक्षीं कोणाचे जीव राहतात असा अर्थ नाहीं. श्रीमंताशीं घांसलें नाहीं असें राज्यांत कोणी राहिलेंच नाहीं. सर्व त्यांच्या नजरेंत आहेत ! ....... ( मोरोबांनीं ) इंग्रजांस छत्तीस लाख रुपये देऊं केले ते कोणत्या मोहिमेंत मिळवून देणार ? तेव्हां ( आम्हांसारख्या ) चार गोरगरीबांपासूनच घेतील !"[5]

---

१ ए. ले. सं. नं. २२७९. २ ए. ले. सं. नं. २२८०. ३ ऐ. ले. सं नं २३००. ४ ऐ. ले. सं. नं. २३१५. ५ ऐ. ले. सं. नं. २३१७.

इकडे नानांस सामर्थ्यहीन करण्याचा मोरोबाचा यत्न जोरांत चालू होता. 'शिल्लक सांखळी समजावून देणें' म्हणून ते नानांस हुकूम फर्मावीत, उघडपणें त्यांचा पाणउतारा करीत, तुम्ही आपल्या अमदानींत अमुक गोष्ट अशी कां केलीत म्हणून जाब विचारीत! नानाचें संमत पडल्याखेरीज कोणताही कारभार करूं नये असें समेटाच्या यादींत कलम होतें तरी ते कांहीं गोष्टी नानांस विचारीत व कांहीं न विचारीत! नानांनीं इतकेही अपमान मुकाट्यानें सहन केले आणि तोंडांतून ब्रसुद्धां न काढतां मोरोबा, चिंतो विठ्ठल वगैरे प्रतिस्पर्ध्यांशीं हास्यमुद्रेनें सलोखा कायम ठेविला!

आपा बळवंत व बाजीपंत अण्णा हे फौजसह धुण्याजवळ किकवीच्या सुमारें आले. रामचंद्र गणेश कानडे हे नामांकित सरदार यापूर्वींच करवीरच्या मोहिमेहून पुण्यास परत आले होते. या तिनी फौजांना घरोघर लावून देण्याविषयीं मोरोबाचा नानांस तगादा बसला. या फौजांचें देणें पुणें दरबारनें अजून द्यावयाचें होतें. परंतु या फौजा नानांच्या तर्फेच्या असल्यामुळें तें देणें मागण्याची आतां सोय नव्हती! मोरोबांस एवढेंच निमित्त पुरेल आणि ते व होळकर कलागतीला सुरवात करतील हें नानांस स्पष्ट दिसत होतें. सबब त्यांनीं या देण्याचा प्रश्नच मुळीं उपस्थित केला नाहीं. नानांचा इशारा जातांच रामचंद्र गणेशानीं जरीपटका मोरोबांच्या हवालीं केला आणि या तिनी फौजांतील शिलेदार पगाराच्या बाकीबद्दल बिलकूल कुरकूर न करितां जादूनें भारल्याप्रमाणें घरोघर निघून गेले! शिलेदारांचे देणें न देतां त्यांना घरोघर हांकून देण्यांत मोरोबांनीं मोठाच अन्याय केला. दुसरा एखादा प्रसंग असता तर याबद्दल रक्तपातापर्यंत मजल गेली असती!

एप्रिल.

हरीपंत आणि परशुरामभाऊ हें तुंगभद्रेच्या अलीकडे आल्याचें पूर्वीं सांगितलेंच आहे. मोरोबास या फौजेची अतिशय भीति वाटत होती. आपापल्या फौजांस निरोप देऊन भाऊंनीं परस्पर तासगांवास जावें आणि हरीपंतानीं मात्र एकटेंच पुण्यास निघून यावें असा मोरोबांचा या दोघांस हुकूम सुटला. द्रव्याच्या अभावामुळें या फौजेचा कसा गळाठा झाला होता याचें दिग्दर्शन गेल्या प्रकरणांत केलेंच आहे.

एप्रील.

पोटास न मिळाल्यामुळें या फौजेंतील शेकडों शिलेदार निराश होऊन होऊन आपोआपच उठून जात होते ! कांहीं राहिले होते त्यांस फितवून एकीकडे हैदर आपणाकडे ओढूं पहात होता तर दुसरीकडे मोरोबाही तेंच करीत होता ! नरसिंगराव घायगुड्यामार्फत मोरोबानें या फौजेंत बराच पैसा पेरून ठेविला होता. मोरोबाचा फितूर दोन प्रकारानीं सुरू होता. कांहीं लोकांस ते फौजेंतून 'उठून जाणें' म्हणून चिथावून देत आणि कांहींस 'हरीपंतास पुढें घालून घेऊन पुरंदरास येणें' म्हणून पत्रें पाठवीत ! अशा विपत्तींतही हरीपंताजवळ अजून दहा पंधरा हजार फौज शिल्लक राहिली होती आणि तिनें मोरोबाच्या फितुराला विशेषशी दाद दिली नाहीं. "हुजरातीची फारकरून श्री० रावसाहेबांच्या पायांवर दृष्ट आहे." असें परशुरामभाऊ अभिमानानें लिहितात. दुसऱ्या एका पत्रांत ते म्हणतात कीं,–"हलके हलके येतों यास्तव लोकांची कटकट पडती. 'उपवासी मरत मरत हलकी मजल कां नेतां ! लांब मजल करून लवकर घरास तरी जाऊं!' असें लोक बोलतात. पोटास मागावयाचें लोक विसरले !" बिचारे भोळे शिलेदार ! साष्टीस व काल्पीस तयार असलेलीं इंग्रजी पलटणें व तोफा हरीपंत व परशुरामभाऊ यांच्या डोळ्यासमोर उभ्या होत्या त्या या अडाणी शिलेदारांना कोठें दिसत होत्या !

मोरोबाला सर्वांत ज्यास्त भय महादजी शिंद्याचें वाटत होतें. हरीपंताच्या फौजेंत त्यांच्या फितुरीला थोडी तरी वाव सांपडली. परंतु शिंद्यांच्या लष्करांत तो उपाय योजण्याची सोयच नव्हती. बाळाराव गोविंद, राणेखान भाई, हरि बाबाजी, इंगळे, कदम, ताकपीर वगैरे शिंद्यांचे सरदार एकनिष्ठ असल्यामुळें तेथें फितुराची डाळ शिजण्याजोगी नव्हती. शिंदे स्वतः मर्द व मसलती सरदार, हाताखालचे सेनापति शूर व विश्वासू, त्यांवर पंचवीस हजार फौज आणि तोफखान्याचा जय्यत सरंजाम इतकें असल्यावर मोरोबाच्यानें त्यांचें काय नुकसान होण्याजोगें होतें ! तथापि त्यांच्यानें स्वस्थ बसवेना. कारण कीं, प्रथमपासून शिंदे हे आपणाला प्रतिकूळ आहेत हें मोरोबास ठाऊक होतें. मार्च महिन्यांतच शिंद्यांनीं होळकरांस उद्देशून निरोप पाठविला होता कीं, तुम्हीं

मोरोबास बगलेंत मारून राज्यांत बखेडे करण्याच्या विचारांत आहां ही गोष्ट बरी नव्हे. आम्ही तुम्हांस या कामीं सामील होणार नाहीं. यामुळे शिंद्यांच्या मार्गांत शक्य तेवढ्या अडचणी उभ्या करणें मोरोपंतास भागच होतें. करवीरकरांना चिथावून देऊन शिंद्यांना त्या मोहिमेवरच वर्ष सहा महिने अडकवून पाडावें असा त्यांनीं डाव योजिला. परंतु त्या डावाला विशेषसें यश आलें नाहीं. त्यांच्या चिथावणीवरून करवीरकर छत्रपतींनीं ठरत असलेला तह मोडून शिंद्याशीं पुनः निकरानें युद्ध सुरू केलें, परंतु शिंद्यापुढें त्यांचा कसचा निभाव लागतो ? शिंद्यानीं आठ पंधरा दिवस तोफांचा मार देतांच ते छत्रपति शुद्धीवर आले आणि त्यानीं शिंद्याशीं तह करून आपली सुटका करून घेतली. यानंतर मोरोबांनीं शिंद्यांविरुद्ध दुसरें एक कारस्थान केलें. मानाजी फाकडे हैदराकडे पळून गेला होता त्याला पुण्यास आणून शिंद्याची सरदारी द्यावी आणि त्याचें आणि महादजींचें झोंबट लावून द्यावें असा त्यांनीं बेत केला. परंतु शिंद्यांनीं मोरोबाचा हाही व्यूह ढांसळून पाडिला ! त्यांचें हैदराकडेही सूत चांगलेंच होतें. महादजीबावांचें पत्र जातांच मानाजी फाकडे तिकडच्या तिकडेच हैदराच्या कैदेंत पडला !

या दिवसांत नाना फडनवीस कसे वागत होते हें लक्षपूर्वक अवलोकन केलें म्हणजे त्यांच्या धारिष्टाची तारीफ करावी तेवढी थोडीच असें वाटूं लागतें. मोरोबादादा बेसावध व स्वस्थ कसे राहतील या तजविजेंत रात्रंदिवस असावयाचें व त्यांस उलथून पाडण्याकरितां गुप्तपणें एकसारखा यत्न सुरू ठेवावयाचा, अशीं हीं दोन कामें त्यांस एकाच वेळीं करावयाचीं होतीं ! ज्या दिवसांत पुढच्या घटकेस काय होईल याचा नेम नव्हता अशाही दिवसांत नाना कारणपरत्वें किल्याखालीं येतच होते आणि मोरोबा, चिंतो विठ्ठल वगैरे प्रतिस्पर्ध्यांशीं खलबतें करीतच होते ! आणि त्याच वेळीं निजाम, भोसले वगैरेंशीं राजकारणें करीत होते आणि शिंदे, फडके, पटवर्धन यांजकडे पुढील मसलतीसंबंधें गुप्तपणें निरोपही पाठवीत होते ! दारूच्या कोठारांत उभें राहून कोलिताचा खेळ खेळण्यापैकींच हा प्रकार होता. एखादी कुडें ठिणगी पडती तर सर्वस्वाचा होम होण्यास

उशीर लागला नसता !

नाना आपलीं सर्व कारस्थानें निरोपानिरोपींच चालवित होते. कोणी लेख मागितला तर 'या प्रसंगीं लेख द्यावयाचा नाहीं' असें ते उत्तर देत. मोरोबाच्या कारस्थानासंबंधें छापलेलीं शेकडों पत्रें आतां उपलब्ध आहेत परंतु त्यांत नानांच्या हातचें एकही नाहीं ! इतरांनीं पत्रें लिहिलीं आहेत त्यांतूनही सांकेतिक शब्दांची योजना अतिशय मोठ्या प्रमाणावर केली आहे. हेतु हा कीं, पत्र शत्रूच्या हातीं पडलें तरी त्याला त्याचा अर्थबोध होऊं नये ! कांहीं सांकेतिक शब्द थोड्याशा तर्कानें कळण्याजोगे आहेत. 'कपी' 'वृद्ध' 'जांबुवंत' हीं बापूंचीं नावें त्यांच्या वार्धक्यावरून आणि उत्पाती स्वभावावरून. 'लेखक' म्हणजे वाक्याच्या धोरणावरून नाना किंवा मोरोबा त्यांच्या फडनिशीच्या दरकावरून. 'विदुर' व 'तांडवकृष्ण' हीं महादजी शिंद्यांचीं नांवें. तो दासीपुत्र व लंगडा होता म्हणून. 'अजापालक' म्हणजे होळकर तो धनगर होता म्हणून ! कित्येक शब्द समजण्यास दूरचे संबंध ठाऊक असावे लागतात. कांहीं संकेत आतां मुळींच कळण्याजोगे नाहींत.

याप्रमाणें उभयपक्षीं एकमेकांच्या नाशावीं कारस्थानें चाललीं असतां बाह्यतः मात्र सलोख्याचा देखावा चालूच होता. त्रिवर्ग कारभाऱ्यांच्या वारंवार बैठकी होत; त्यांमधून दादांना आणण्याविषयीं मोरोबा पुनः पुनः बोलणें काढीत, परंतु प्रत्येक खेपेस नाना तें बोलणें मोडून काढीत आणि मोरोबाची समजूत घालीत. मोरोबा तरी या बाबतींत फारसे उत्सुक नव्हतेच. दादांना आणून त्यांच्या हाताखालीं दुय्यम कारभार करण्यापेक्षां सध्यां राज्याचा सर्व अखत्यारच हातीं आला आहे तो काय वाईट असें वारंवार त्यांच्या मनांत येई. तथापि शिंदे, फडके, पटवर्धन हे सरदार आपणाला विरुद्ध आहेत, त्याअर्थीं आतां दादा व इंग्रज यांना आणल्यावांचून आपला तरणोपाय नाहीं, अशी मोरोबाची शेवटीं खात्री झाली. मोरोबानें बापूस चिठी पाठविली कीं, 'पटवर्धनांचे वडिलांचे (वयानें वडील नाना यांचें) व शिंद्यांचें पारिपत्य नाहीं तरी सर्वच

मे.

---

१ अधिकारयोग पृ. ८६.

बुडतों. सर्व दौलत नानांचे हातीं ( जाईल ) याचा विचार केला पाहिजे. याजकरितां बिसाजीपंत व दादोपंत वाघोलकर असे पाठवावे. त्यांसी बोलोन आपणाकडे पाठवितों. ते सविस्तर सांगतां कळेल. बातम्या काढण्यांत नानांची कांहीं पराकाष्ठा होती ! त्यांनीं ही चिठी बापूंच्या दप्तरांतून ' कोणें द्वारें खर्चवेंच करून ' लांबविली व पुढें कांहीं दिवसांनीं ती शिंदे व परशुरामभाऊ यांस दाखवून मोरोबाच्या दुष्ट हेतू-बद्दल त्यांची पक्की खात्री करून दिली !

असो. या चिठीचें कांहीं अक्षर मोरोबाच्या हातचें व कांहीं गोपाळ नाईक तांबवेकर याच्या हातचें होतें. या तांबवेकराला मुंबईस पाठवून इंग्रजांना आणवावें असें मोरोबाच्या मनांत होतें. आणि या बेताचाच उपक्रम त्यानें या चिठीच्या द्वारें बापूंकडे केला होता. परंतु बापूंनीं या प्रसंगीं आयत्या वेळीं मोरोबास दगा दिला आणि ही इंग्रजांना आणण्याची मसलत हाणून पाडिली ! तो प्रकार समजण्यासाठीं इंग्रजाकडील थोडीशी हालहवाल येथें नमूद केली पाहिजे.

इंग्रजांचीं पलटणें साष्टीस आल्याचें पूर्वी लिहिलेंच आहे. मोरोबां-कडून इशारा जातांच या पलटणांनीं पुण्यास यावें असा मोरोबा व इंग्रज यांमध्यें करार ठरला होता. मोरोबांनीं या कामगिरीबद्दल इंग्रजांस छत्तीस लाख रुपये देऊं केले होते ! परंतु नानांनीं इंग्रजांस हें छत्तीस लाखांचें घबाड पचूं दिलें नाहीं. त्यांनीं आपखुषीनें मोरोबांच्या हातीं राज्यकारभार दिला ही गोष्ट इंग्रजांस बिलकूल आवडली नाहीं. त्यांचा वकील मि. मॉस्टिन् हा खेदानें मुंबईसरकारास लिहितो कीं, इतक्या सुलभ रीतीनें मोरोबाचें काम झाल्यावर तो आतां दादाची किंवा आमची आठवण कशास काढील ? त्याचें काम झालें. अखत्यारी मिळाल्याबरोबर नानांस धरून कोठें पाताळांत गाडून टाकावें तें न करितां मोरोबानें नानाकडे पेशवे, पुरं-दर आणि फौज राहूं दिली आहे हा त्याचा केवढा मूर्खपणा ! नानांची अखत्यारी जाऊन आमचा काय फायदा झाला ? कारभाऱ्यांच्या कौंसि-लांत नाना अजून मेंबर आहेतच आणि फ्रेंचांचा वकील अजूनही पुण्यास बसलाच आहे !

असो. सबंध एप्रिल महिनाभर इंग्रज वकिलानें दादांना आणण्याविषयीं मोरोबाकडे जिकीर चालविली होती. परंतु त्याची दाद लागली नाहीं. मे महिन्यांत मोरोबा इंग्रजांना पुण्यास येण्याविषयीं घाई करूं लागला. ही पडत्या फळाची आज्ञा समजून इंग्रज तत्काळ पुण्यास येते तर त्यांचें काम झालें असतें. सखारामबापू त्यांच्या येण्याकडे कानाडोळा करिते आणि आपल्या वित्तविषयाचे सुरक्षितपणाबद्दल त्यांची हमी घेऊन स्वस्थ घरीं बसते. किंवा न बसते तरी इंग्रजापुढें त्यांचें काय चाललें असतें ! नानांचेंही कांहीं चाललें नसतें हें उघडच आहे. श्री० दादासाहेबांस पुण्यास नेऊन त्यांची तेथें अधिकारावर स्थापना मात्र करूं. पुढें तो अधिकार आपणाकडे कायम राखणें हें काम श्रीमंतांचें आहे. कारभारी व सरदार यांशीं मिलाफ करून तें त्यांनीं साधून घ्यावें किंवा काय पाहिजे तें करावें, त्याबद्दल आपण जबाबदार नाहीं, एवढेंच इंग्रजांचें म्हणणें होतें. या पलीकडे त्यांच्या मसलतीची धांव आजपर्यंत केव्हांही गेली नव्हती, आणि इतकें तडीला जाण्यास ती वेळ उत्तम होती. परंतु या वेळीं इंग्रजांचा बेसुमार लोभीपणा त्यांस आडवा आला ! त्यांनीं अशा अटी घातल्या कीं, श्रीमंतांस पुण्यास आणून अधिकारावर स्थापण्याच्या कामगिरीबद्दल वसईचा किल्ला व परगणा आम्हांस बक्षीस मिळावा. मागच्या तहांत पेशवे सरकारांतून गुजराथेंत मुलूख देऊं केला आहे तो आम्हांस नको. त्याच्या मोबदला वसई परगण्यास लागून तितक्याच आकाराचा मुलूख आम्हांस द्यावा. शिवाय स्वारीच्या खर्चाबद्दल छत्तीस लाख रुपये द्यावे. या सर्व शर्ती कबूल करून सखारामबापूंनीं मुख्य कारभारी या नात्यानें सहीशिक्यानिशीं आम्हांस लिहून द्यावें कीं, आमच्या बोलावण्यावरून तुम्ही श्री० दादासाहेबांस घेऊन येत आहां ! म्हणजे इंग्रजांस इतक्या गोष्टी पाहिजे होत्या—१ कारभारांतून नाना फडनवीस निघाले पाहिजेत. २ फ्रेंचांचें उच्चाटण होऊन त्यांस पुनः आसरा न मिळेल असा बंदोबस्त झाला पाहिजे. ३ आपल्या गळ्यांत दादासाहेबांचें लोढणें अडकलें आहे तें निघून शिवाय त्यांची अशा अधिकारावर योजना झाली पाहिजे कीं, जेणेंकरून पुढें त्यांपासून आपणांस

अनेक फायदे करून घेतां येतील. ४ या तिन्ही गोष्टी पेशवे सरकारच्या खर्चानें होऊन त्यांतही आपणांस चार रुपये किफायत राहील अशी सोय असली पाहिजे. ५ शिवाय बक्षीस व मोबदला मिळून अशा सोईचा मुलूख मिळावा कीं, जेणेंकरून खुशाल घांटापर्यंत पाय पसरतां यावे. ६ आणि सर्वांत ध्यानांत ठेवण्याजोगी गोष्ट ही कीं, बापूंनीं लेखी आमंत्रण द्यावें. ही आमंत्रणाची शर्त ठरविण्यांत बाहेरून दाखविण्याचा हेतु हा कीं, पुरंदरच्या तहावर बापूंची मुख्य कारभारी म्हणून सही आहे, याकारितां त्यांनीं आमंत्रण केलें म्हणजे पूर्वीचा तह कायम राहून हा नवीन तह त्याची पुरवणी मानतां येईल आणि तह मोडल्याचें अपेश न घेतां सारवसुरतपणें येण्यास आम्हांस ठीक पडेल. पण पोटांतील मतलब असा कीं, बापूंनीं आमंत्रण केलें म्हणजे मोरोबानें देऊं केलेल्या छत्तीस लाखांस तरी एक भरभक्कम जामीन मिळाला! राज्याच्या कल्याणासाठीं मुख्य कारभारी या नात्यानें तुम्ही आम्हांस बोलावलेत, याकरितां आम्हांस खर्च लागला आहे तो राज्यांतून वसूल करून द्या; असें म्हणावयास मोकळीक ! पण याप्रमाणें ' आखूडशिंगी, बहुदुधी, अल्पमोली ' ची चोहोंकडून ओढाओढ सुरू होतांच ती लाथा मारून उधळून गेली ! इंग्रज मागत होते त्याप्रमाणें बापूंनीं लिहून द्यावें तर इकडे आड तिकडे विहीर ! इंग्रजांची मसलत नासली तर नाना फडनवीस प्राण घेणार, साधली तर छत्तीस लाखांचें सुदर्शन पाठीस लागणार आणि प्रसंग इंग्रजांशीं ! बापूंनीं साफ सांगितलें कीं, असलें लिहून बिहून आपण कांहीं एक देणार नाहीं ! !

बापूंनीं आयत्यावेळीं दगा दिला आणि मोरोबानेंही अजून फ्रेंच वकिलाला पुण्यास ठेवून घेतलें आहे असें पाहून मुंबई सरकारनें ठरविलें कीं, हे पुण्याचे तिघेही कारभारी महालबाड आहेत! मुंबईकर इंग्रजांनीं पुण्यास खलिता रवाना केला कीं, आम्हीं म्हणतों त्याप्रमाणें पुरंदरच्या तहांतील कलमांचा चौदा दिवसांत फडशा करून द्या, नाहीं तर इतउत्तर इंग्रज सरकारनें मराठी राज्याशीं युद्ध सुरू केलें आहे असें समजा ! परंतु इतकें होईतां मे महिना संपत आला होता, त्यामुळें इंग्रजांनीं कितीही डरकण्या

फोडल्या तरी तिकडे चार महिने लक्ष देण्याचें नानांस कारण राहिलें नाहीं !

इंग्रजांना आणण्याच्या मसलतीचा असा बोजवारा उडाल्यामुळें मोरोबाच्या कारस्थानाचें पेंकाट मोडल्यासारखेंच झालें. मोरोबाची धडगत नाहीं असें पाहून बापूनीं भिवराव पानशांच्या मार्फत नानांशीं पुनः सख्य जोडलें. जून महिना जवळ येत चालला तसतसा नानांच्या कारस्थानाला झपाट्यानें रंग भरत चालला. फडके व पटवर्धन यांच्या फौजा आतां घाईघाईनें पुण्याकडे येऊं लागल्या. या फौजा शंभुमहादेवाच्या सुमारें येतात तों मोरोबांनीं सरदार नरसिंगराव घायगुडे यांना मध्यस्थ घालून त्यांच्यामार्फत हरीपंत व परशुरामभाऊ यांशीं सख्य जोडण्याचा यत्न केला. परंतु त्या उभयतांनीं मोरोबाला दाद दिली नाहीं.

मोरोबाचें बंड मोडण्याचें काम नानांनीं मुख्यत्वें महादजी शिंद्यावर सोंपविलें होतें. मोरोबा व इंग्रज यांसंबंध नानांनीं जें धोरण ठरविलें होतें त्यास अनुसरून या प्रसंगीं शिंद्यांच्या वर्तनांत जो सावधपणा व मुग्धपणा दिसून येत होता तो लक्षांत ठेवण्यासारखा आहे. मोरोबाचें बंड पुण्यास प्रकट झाल्याबरोबर त्यानीं कर्नाटकांत हरीपंत व परशुरामभाऊ होते त्यांस विचारिलें कीं, ‘ कोठें आहां ? काय मनसबा ! ’ त्यांनीं उत्तर लिहिलें कीं, ‘ आम्ही माघारे फिरलों. तुम्ही श्रीमंतांचे एकनिष्ठ सेवक व नानांचे लक्षांतील. याकरितां तुम्ही आम्ही मिळून हें खूळ मोडूंया. ’ त्याचें उत्तर त्यावेळीं कांहींच न देतां शिंद्यांनीं कांहीं दिवस गेल्यावर त्यांस ‘पुण्याकडे येण्याची फारशी गडबड करूं नये’ एवढा मात्र इशारा दिला! नानांस मात्र त्यांनीं प्रथमच खात्रीपूर्वक वचन दिलें होतें कीं, मी पुण्यास येऊन सर्व बंदोबस्त यथास्थित करून देतों तें वचन त्यांनीं योग्य प्रसंगीं पार पाडून दाखविलें. पण तेथपर्यंत मी अमुक पक्षास अनुकूळ किंवा प्रतिकूळ हा कोणास कांहीं सुगावा लागूं दिला नाहीं ! असो. शिंदे करवीरची मोहीम आटपून पुण्याकडे निघाले ते मेच्या शेवटच्या तारखेस लोणंदच्या मुक्कामास गेले. शिंदे हे मोरोबालाच अनुकूळ आहेत असें इंग्रजांचा वकील मि. मॉस्टिन् हा अजूनही समजत होता ! ता० २ जून रोजीं सखारामबापू, मोरोबादादा व त्या पक्षांतील इतर मुत्सद्दी हे शिंद्यांच्या

भेटीकरितां परिच्यास आले. शिंदे जेजुरीस जाऊं लागतील तेव्हां वाटें-तच त्यांची भेट घ्यावी असा या मंडळीचा विचार होता. मोरोबानें चार दिवसापूर्वी इंग्रजांना आणण्याकरितां चिंतो विठ्ठलास मुंबईस पाठविलें आहे ही गोष्ट आतां सर्वत्र मशहूर झाली होती. त्यामुळें मोरोबाची भेट घेण्याचें टाळून शिंदे जेजुरीस न जातां मोरगांवच्या मुक्कामीं गेले, व तेथें त्यांस फडके व पटवर्धन यांच्या फौजा सामील झाल्या. सखाराम-बापू एकटेच त्या मुक्कामीं शिंद्यांच्या लष्करांत आले आणि त्यांनीं बहुत गयांवयां करून शिंद्याकडून आपल्या गुन्ह्याबद्दल माफी मिळविली. नंतर बापूंच्या मिडेमुळें शिंद्यांनीं मोरोबाचीही भेट घेतली, परंतु त्या भेटींत ते मोरोबाशीं एकही शब्द बोलले नाहींत! त्यावरून लोक समजले कीं, मोरोबाचें कपाळ फुटलें!

शिंदे, फडके व पटवर्धन हे यानंतर पुरंदरास गेले आणि ता. ८ जून रोजीं सर्वांनीं श्रीमंतांची भेट घेऊन नजरा केल्या. शिंद्यांच्या मध्यस्थीनें नाना व बापू यांची आतां पुनः दिलसफाई घडून आली आणि पूर्ववत्-प्रमाणें राज्यकारभार चालण्यास कोणतीच हरकत उरली नाहीं. नंतर शिंद्यांनीं स्वतः होळकराकडे जाऊन त्यांची परोपरीनें समजूत घातली, त्यामुळें ते मोरोबाचा पक्ष सोडावयास तयार झाले. फौजेच्या खर्चासाठीं नानाकडून नऊ लक्ष रुपये घेऊन ते फौजेसह शिंद्यांजवळ येऊन राहिले. विंचू-वाले, आनंदराव गोपाळ वगैरे सरदारही होळकरांबरोबरच मोरोबापासून फुटून निघाले.

बजाबा पुरंदरे आणि पांडुरंगराव बारामतीकर आणि हजार दोन हजार स्वार एवढेंच काय तें आतां मोरोबांजवळ शिल्लक राहिले. अजूनही त्यांचीं राजकारणें चाललींच होतीं. हैदर किंवा इंग्रज यांकडे पळून जावें असें त्यांच्या मनांत होतें; परंतु नानांनीं चोहोंकडे नाकेबंदी केल्या-मुळें तिकडूनही त्यांचा उपाय चालेना. शेवटीं निराश होऊन त्यांनीं नानांस निरोप पाठविला कीं, तुम्ही बापूंस मिळवून घेतां त्यापेक्षां मला मिळवून घ्या. तुम्ही आम्ही मिळून बापूंचें उच्चाटण करूं या! नानांनीं अर्थात् या बोलण्याचा धिक्कार केला. आपलें कोणतेंच काम तडीला

जात नाहीं असें पाहून मोरोबांनीं मोठाच वीरश्रीचा आव आणिला! ‘ माझी कांहीं तरी समजूत काढा, नाहीं तर मरून जाईन, परंतु जरी-पटका हवालीं करणार नाहीं ’ असा त्यांनीं नानांस शेवटचा निरोप पाठविला! पुरंदरे व बारामतीकर हेही मोरोबास म्हणूं लागले कीं, प्राण गेला तरी बेहत्तर, परंतु नानांपुढें दीनवाणें होऊन करुणा भाकणें आमच्यानें साफ होणार नाहीं! या त्रिवर्ग सुखवस्तु मुत्सद्यांची ही वीरश्रीची ऐट पाहून शिंदे पटवर्धन वगैरे फौजांतल्या शिलेदारामध्यें मोठाच हशा पिकला! मोरोबानें आपल्या फौजेंतील शिपायांस जेवण घातलें. ‘ आपले मरणाचे सोबती असतील त्यांनीं मात्र जेवायास यावें ’ ही जेवणाची शर्त होती. भाऊ विनोदानें लिहितात– “ हजार बाराशें पात्र भोजनास झालें. मग किती मरतात पहावें ! ”

असो. ता. २० जून रोजीं मोरोबांनीं निरुपाय होऊन जरीपटका नानांच्या हवालीं केला आणि ते बहुलास जाऊन राहिले. तेथेंही ते फंद फितूर करूं लागले, सबब नानांनीं त्यांस धरून आणून त्यांची नगरच्या किल्ल्यावर रवानगी केली. तेथें ते बावीस वर्षें कैदेंत होते.

यानंतर फितुरी लोकांचीं पारिपत्यें करण्याचें काम झपाट्यानें सुरू झालें. बापू व होळकर यांच्या मनांतून आपापल्या पक्षांतील लोकांचा बचाव करावा असें होतें. परंतु नाना व शिंदे यांनीं त्यांची भीड न धरितां जबरदस्तीनें सर्व गुन्हेगार सारखेच भरडून काढले! यांप्रसंगीं तांबवेकर पांच लक्ष, बिनीवाले पांच लक्ष, होळकराचे दिवाण नारो गणेश दहा लक्ष रु. असे जबर दंड वसूल करण्यांत आले. रघुपतराव राजेबहादूर यांचा वडिलार्जित जहागिरीवरचा वारसा बुडाला. पुरंदरे, बिनीवाले, घायगुडे यांचे सरंजाम जप्त होऊन शिवाय त्यांना कैदेंतही पडावें लागलें! आपाजीपंत गोंधळेकर, कचोबा पाळंदे. बाळाजीपंत दामले, दादोपंत बाघोलकर, बाबाजी जामदार, आनंदराव वगैरे त्रिवर्ग खासगीवाले, सदाशिव रामचंद्र, बाळाजीपंत सप्रे वगैरे किरकोळ गुन्हेगारांपैकीं कोणाकोणास मार बसला आणि हिरण्यश्राद्ध मात्र सर्वांनाच करावें लागलें! राज्यनाशाला प्रवृत्त झालेलें मोरोबाचें बंड आतां परिणामीं द्रव्य वसुलीचें खासें साधन होऊन

बसलें ! पुण्यांतले सर्वच बखेडेखोर या बंडाच्या जाळ्यांत एकदम सांपड-ल्यामुळें त्यांना निर्धन आणि तेजोहीन करण्याची संधि नानांस आयतीच प्राप्त झाली. एकूण मोरोबाचें शिराळशेटीचें राज्य फार जणांस भोवलें म्हणावयाचें !

---

# प्रकरण आठवें.

**१ हैदरअल्लीच्या स्वाऱ्या. २ किरकोळ दंगे व बंडें. ३ दरबारची डळमळ. ४ इंग्रजांशीं लढाई-वडगांवचा तह. ५ सखारामबापूंस कैद. ६ इंग्रजांशीं पुनः बिघाड-सालबाईचा तह.**

[ स. १७७८ जून–स. १७८३ फेब्रु. ]

मोरोबाच्या बंडाचा बंदोबस्त झाला तरी नानांस बिलकूल स्वस्थता प्राप्त झाली नाहीं. त्या बंडापासून इंग्रजांनीं कोणत्या अपेक्षा बाळगिल्या आणि शेवटी त्यांची कशा निराशा झाली याचें सामान्य दिग्दर्शन गेल्या प्रकरणांत केलेंच आहे. इंग्रजांनीं मराठी राज्यांत आतांपर्यंत अनेक फितूर व बंडें करविलीं, नानाप्रकारचीं कारस्थानें उभीं केलीं, बोलणें, लिहिणें, आणि वागणें यांत हरएक लपंडाव लढविले, परंतु नानांनीं त्या त्या बाबतींत शत्रूवर ताण करून त्यांचे सर्व बेत हाणून पाडिले, आणि त्यामुळें त्यांजवर इंग्रजांचा मोठाच घुस्सा झाला होता ! मुंबई सरकारच्या

स. १७७८ जून ते दिसें. } सिलेक्ट कमिटीची गुप्त बैठक भरून पावसाळा संपताच पुण्यावर चालून जाण्याची योजना मुकरर करण्यांत आली. मुंबईस घडणारी प्रत्येक गोष्ट—मग ती कितीही गुप्त असो—नानांस गुप्त हेरांमार्फत तत्काळ समजत असे. नानांनींही इंग्रजांच्या पारिपत्याची तयारी मोठ्या प्रमाणावर चालविली होती. इंग्रजांची स्वारी एवढें एकच संकट असतें तर नानांनीं त्याबद्दल विशेषशी फिकीर बाळगिली नसती. परंतु याचवेळीं इतरत्रही अनेक बंडें व फिसा-

लती निर्माण झाल्या होत्या आणि प्रत्यहीं नवीन होत होत्या तिकडेही लक्ष देणें त्यांना आवश्यक होतें. त्याबद्दलची माहिती—

**हैदराच्या स्वाऱ्या**—मोरोबाच्या फितुरामुळें फडके व पटवर्धन हे हैदरावरची मोहिम तशीच अर्धवट टाकून घाईघाईनें पुण्याकडे निघून आल्याचें मागच्या प्रकरणांत सांगितलेंच आहे. त्यांच्या पाठोपाठ हैदरही तुंगभद्रेच्या उत्तरतीरास आला आणि कर्नाटकचें रान मोकळें पाहून त्यानें त्या प्रांतांत मोठाच धिंगाणा घातला ! कडपेकर नबाब आणि चित्रदुर्गकर संस्थानिक यांचीं राज्यें त्यानें अजीबाद खालसा केलीं. कर्नूळ, सावनूर, अदवानी येथील नबाब आणि डंबळ, रायदुर्ग, हरपनहळ्ळी येथील संस्थानिक यांच्यावर स्वाऱ्या घालघालून त्यानें लक्षावधि रुपये खंडणी वसूल केली. खुद्द पेशवाई मुलखांतील कोपळ, बदामी व धारवाड हे नामांकित किल्ले त्यानें काबीज केले आणि मलप्रभेपलीकडील सर्व मराठी राज्य जिंकून घेतलें. यानंतर त्याच्या अघाडीच्या फौजेतील एक टोळी मनोळीची बारी ओलांडून अलीकडे आली आणि तिनें यादवाड, तेरदाळ, जमखिंडी हीं पटवर्धनांचीं ठाणीं हल्ला करून घेतलीं आणि भोंवतालच्या मुलखांत अशी भयंकर लुटालूट आणि हाणामार सुरू केली कीं, शेजारच्या मिरज प्रांतांतील रयतही घाबरून सैरावैरा पळत सुटली !

स.१७७८मार्च ते स. १७७९दिसें.

हैदराच्या स्वारीचें हें बलाढ्य परचक्र मराठी राज्यावर आदळलें होतें त्याचा प्रतिकार करणें नानांस जवळ जवळ अशक्यप्रायच होतें. त्यांचे सर्व लक्ष यावेळीं इंग्रजांच्या पारिपत्याकडे गुंतलें होतें. स. १७७५ सालीं म्हैसूर व मराठी राज्य यांची सरहद्द तुंगभद्रानदी असावी असें हैदरानें पुणें दरबारकडे बोलणें लाविलें होतें, परंतु नानांनीं आतांपर्यंत त्या बोलण्याला मान्यता दिली नव्हती. आतां स. १७७८ सालीं नानांनीं कालदेशवर्तमानावर नजर देऊन हैदराचें हें मागणें मान्य केलें. परंतु हैदरच आतां बिथरून बसला ! तुंगभद्रेच्या तीनशे मैल पुढें सरकून तो आतां म्हैसूर व मराठी राज्य यांची सरहद्द कृष्णानदी असावी असें म्हणूं लागला !

किरकोळ दंगे व बंडें—श्रीमंत दादासाहेब यांसारखे आचरट देशबुडवे आणि इंग्रजाप्रमाणें कावेबाज शत्रु यांची फूस मिळाल्यामुळें मराठी राज्यांत चोहोंकडे दंगे व बंडें उद्भवलीं यांत काय नवल ? कर्नाटकांत करवीरकर छत्रपति आणि कित्तूरकर देसाई यांचे दंगे, विजापूर प्रांतीं सुरापूरकर बेरडांचा दंगा, सोलापूरकर प्रांतीं नरसो गोविंद याचें बंड, मिरज प्रांतीं राणोजी नाईक निंबाळकर याचें बंड, कोळवणांत कोळ्यांचा दंगा, भिल्लाणांत भिल्लांचा दंगा, खानदेशांत गुलजारखानाचें बंड अशा फिसालती एक ना दोन ! या सर्व दंगेखोरांना इंग्रजांकडून प्रत्यक्ष उत्तेजन मिळत होतें आणि या सर्वांमिळून कमींत कमी पन्नास हजार फौज महाराष्ट्रभर मोकाटपणें धुडगूस घालीत होती !

दरबारची डळमळ--पुणें शहर व भोंवतालचा प्रांत हा पुणें दरबारच्या प्रत्यक्ष अंमलाखालचा होता. परंतु तेथेंही उघडपणें फितूर चालूच होते ! चिंतो विठ्ठलाचीं मुलें माणसें नानांनीं पुण्यांत अटकेंत ठेविलीं होतीं. परंतु एका रात्रीं तीं माणसें सर्वांची नजर चुकवून एकाएकीं मुंबईस पळून गेलीं ! शिवनेरी किल्ल्यावर मोरोबाचा कारकून होता त्यानें फौज जमा करून पुण्याभोंवतालचा प्रांत मारण्यास बेधडक सुरवात केली ! नगरच्या किल्ल्यावर फितूर करून मोरोबानें मुंबईस पळून जाण्याचा यत्न केला परंतु किल्लेदार वेळींच सावध झाल्यामुळें त्यानें फितुरी लोकांची कत्तल करून तत्काळ बंदोबस्त केला. खुद्द पेशवे रहात असलेल्या पुरंदर किल्ल्याच्या पहारेकऱ्यांतही मोरोबानें एकदां फितूर केला होता, परंतु नानांनीं बंडखोरांना देहांत शासन देऊन तें बंड तावडतोब मोडलें.

स. १७७८ जून ते दिसें.

पुणें दरबारच्या अंतस्थ स्थितीकडे लक्ष दिलें तर ती या बाह्य फितुरांपेक्षां ज्यास्तच भयंकर होती ! मोरोबाच्या बंडांत सांपडलेले आपले सर्व साथीदार नानांनीं नामशेष केले, विशेषत: तें बंड मोडतांना आपला वेळोवेळ अपमान करण्यांत आला या गोष्टीचें सखारामबापू व होळकर यांस पराकाष्ठेचें वैषम्य वाटत होतें. त्या दोघांचीही इंग्रजांशीं गुप्तपणें फितुराची कार-

स. १७७८ जून ते दिसें.

स्थानें चालू होतीं. होळकरांनीं तर इंग्रजांस विश्वासानें आश्वासन दिलें होतें कीं, तुम्ही बोरघांट चढून वर आल्याबरोबर आपण तुम्हांस फौजे-सह सामील होतों! महादजी शिंदेही अजून नानांशीं रुसव्यानेंच वागत होते. असीरगड हातीं आल्यावेरीज आपण फौजेला निरोप देत नाहीं असा त्यांनीं नानांशीं हट्ट धरिला. शिंदे फौजेस निरोप देईनात म्हणून होळकरही देईनात! आणि हे दोघे सरदार फौजबंद राहिल्यामुळें हरी-पंततात्यांसही आपली सर्वच फौज दूर करतां येईना. याप्रमाणें या बड्या लोकांच्या लीला चालल्या होत्या परंतु लष्करच्या पायमल्लीमुळें पुणें प्रांत ओस पडत चालला होता तिकडे कुणाचेंच लक्ष जाईना! रयतेचें चिर-गूट पांघरूण तर प्रत्यहीं चोरीला जातच होतें, शिवाय मिळेल तेथून वैरण लुटून आणावी आणि लांकूड फाट्यासाठीं रयतेचीं घरें खुशाल मोडावीं हा शिंदे होळकरांच्या फौजांचा चार सहा महिने क्रम अव्याहत चालू होता! या सर्व अनर्थाला प्रत्यक्ष किंवा परंपरेनें सखारामबापूच कारणी-भूत होते. परशुरामभाऊ त्रासून लिहितात-" कपी (बापू) तर राज्यास किडाच ईश्वरें निर्माण केला आहे!"

अशा या बिकट परिस्थितीशीं टक्कर खेळूनच नानांस आपल्या राज्य-कारभाराचा पुढील मार्ग नीट चोखाळून दुरुस्त ठेवावयाचा होता. त्या-वेळीं महादजी शिंदे व परशुरामभाऊ पटवर्धन हे मराठी राज्याचे दिग्गज समजले जात असत. कसाही बिकट प्रसंगीं हजारों सैनिकांवर वोज ठेवून आणि हुकमत चालवून सरकार काम हटकून करावें अशीच त्यांची इभ्रत होती. या दोघांपैकीं परशुरामभाऊ हे नानांस लवकर वश होण्या-जोगे होते, कारण त्या उभयतांत्ता जिव्हाळा परंपरागतच होता. कर्ना-टकांत बेबंदशाही माजली होती तिच्या बंदोबस्ताचें काम नानांनीं भाऊंचे गळ्यांत अडकविलें. नानांच्या सांगण्यावरून भाऊंनीं आतांपर्यंत दोन तीन वर्षें कर्नाटकांत सतत मोहीम सुरू ठेवली होती आणि त्यापायीं त्यांना लाखो रुपये कर्ज झालें होतें. हें त्यांचें कर्ज पुण्य दरबारनें अजून फेडावयाचें होतें. अशा स्थितींत भाऊंनीं ही नवीन मोहीम पतकरली याचें कारण नानांनीं त्यांना तशी पराकाष्ठेची मीड घातली हेंच हो/

असो. स. १७७८ च्या सपटेंबर अखेरीस परशुरामभाऊ आठ दहा हजार फौज व तोफखाना बरोबर घेऊन पुण्याहून निघाले आणि कर्नाटकाकडे कूच करून चालले.

यानंतर नानांनीं इंग्रजांच्या पारिपत्याकडे लक्ष वळविलें. रास्ते, प्रतिनिधि, अक्कलकोटकर भोसले वगैरे सरंजामी आणि हुजरातेंतील मानकरी यांची कशीबशी समजूत करून दसरा झाल्याबरोबर पंचवीस तीस हजार फौज गोळा होईल अशी त्यांनीं व्यवस्था केली. सखारामबापू व होळकर हे आयत्या वेळीं फितूर करून मराठी राज्यावर कोणतें नवीन गंडांतर आणतील याचेंच नानांस सर्वांत जास्त भय वाटत होतें. सबब त्यांनी शिंद्यांची मनधरणी करून त्यांची मर्जी पुनः प्रसन्न करून घेतली. पुनः म्हणावयाचें कारण हेंच कीं, पैशाच्या लोभानें रोग्याच्या प्रकृतींत चढउतार घडविणाऱ्या वैद्याप्रमाणें त्यांची मर्जीही बेसुमार चंचल होती! नवीन मुलूख मिळाल्याशिवाय कारभाऱ्यांचें कोणतेंही काम करावयाचें नाहीं असा जणु काय त्यांचा निश्चयच ठरला होता! असो. ब्ऱ्हाणपुरचा ताजा नैवेद्य नानांनीं दाखविल्यामुळें शिंद्याची आतां पुणें दरबारावर पुनः खूषमर्जी झाली आणि इंग्रजांचा पराजय करण्याची त्यांनीं प्रतिज्ञा केली. इंग्रजांवरील मोहिमेचीं लष्करी सूत्रें आतां शिंद्यांच्या मार्फत चालूं लागलीं.

मुंबईकर इंग्रजांना मराठ्यांच्या मर्दुमकीविषयीं सामान्यतः तिरस्कार वाटत होता. त्यांतून यावेळीं पुणें दरबारांत बजबजपुरी माजली होती त्यामुळें तर त्यांना जास्तच उत्तेजन आलें. बोरघांट चढून आपण वर गेल्याबरोबर नाना घाबरून आपल्याला बिनशर्त शरण येतील असाच त्यांना भ्रम उत्पन्न झाला! बंगाल खात्याचीं सहा पलटणें त्यांना सामील होण्याकरितां काल्पीपर्यंत आलीं होतीं. परंतु हीं पलटणें येऊन मिळण्यापूर्वीच आपण पुण्यावर चालून जावें आणि पेशवाई पदावर दादांची स्थापना करून त्या मसलतीचें सर्व यश आपण एकट्यानेंच उपटावें अशी मुंबईच्या इंग्रजांना अनावर हांव सुटली. या बेतास अनुसरून दादासाहेब व त्यांचे दिवाण चिंतो विठ्ठल यांना बरोबर घेऊन चार पांच हजार इंग्रजी

फौज पुण्यावर चालून निघाली. होळकर वगैरे फितुरी सरदारांची वीस पंचवीस हजार फौज आपणाला सामील होईल, नानांना आर्धी फौज जमा करतां यावयाची नाहीं–त्यांतून काय चार भुरटे शिलेदार त्यांच्या भोंवती गोळा होतील ते कवाईती पलटणें पाहतांच जीव घेऊन पळत सुटतील, आणि आपली ही पुण्यावरची मोहीम एखाद्या वनभोजनाप्रमाणें आल्हादकारक भासेल असा इंग्रजांस दृढ विश्वास वाटत होता. परंतु त्यांचा हा सर्व अजमास परिणामीं चुकीचा ठरला ! शिंद्यांच्या जबरदस्तीमुळें फितुरी सरदारांना शत्रूला मिळण्याचें धैर्य झालें नाहीं आणि नानांनीं जमा केलेल्या पन्नास हजार फौजेशीं लढण्याचा प्रसंग या चिमुकल्या इंग्रजी सेनेवर येऊन पडला. इंग्रज बोरघाट चढून वर येतात तोंच भिवराव पानशे यांची व त्यांची झगडाझगड सुरू झाली आणि त्याचवेळीं दहा पंधरा हजार मराठी फौज कोंकणांत उतरली आणि तिनें इंग्रजांच्या पिछाडीवर लगट सुरू केली. पानशाशीं लढत लढत इंग्रज तळेगांवापर्यंत चालून आले आणि तेथें शिंद्याशीं गांठ पडतांच त्यांची प्रगति थांबली आणि ते घाईघाईनें गावांत शिरले. इंग्रज तळेगांवांत जातात तों तेथें त्यांना मूठभर धान्य किंवा वैरणीची पेंडीसुद्धां दृष्टीस पडली नाहीं ! सर्व गांव जळून भस्मसात् झाला होता ! पुण्यापर्यंत वाटेंतलीं सर्व गांवें आणि खुद्द पुणें शहरही याचप्रमाणें जाळून फस्त करण्याविषयीं नानानीं तजवीज केल्याची बातमी इंग्रजांस लागली. ती बातमी अगदीं खरी होती. पुणें शहर रिकामें करवून नानांनीं शनवार वाड्यांत कडबाही भरून ठेवला होता ! नानांचा इंग्रजांबद्दल द्वेष निस्सीम होता. शत्रूच्या हातीं नांदती राजधानी लागूं द्यावयाची नाहीं असा त्यांचा निर्धार ठरला होता. नानांचा हा निर्धार पाहून आणि पानशे व शिंदे यानीं लढाईची चुणूक दाखविली त्यावरून इंग्रज पस्ताव्यांत पडले आणि त्यांनीं मुंबईस परत जाण्याचा निश्चय ठरविला. या निश्चयास अनुसरून इंग्रज तळेगांवाहून निघून वडगांवापर्यंत जाऊन पोंचतात तोंच मराठ्यांनीं हल्ल्यावर हल्ले चढवून त्यांची अगदीं गाळण उडवून दिली. शिवाजीपंत लिहितो— " इंग्रजांचा मोड जाला. पांच चारशे

९ जाने. १७७९

माणूस मारिलें. पांच तोफा व दोन गरनाळा सरकारांत पाडाव आणिल्या.[1] शिवाय दोन हजार बंदुका वगैरे लूट सांपडली." यापुढील हकीगतही शिवाजीपंताच्याच शब्दांत येथें नमूद करतों—

"इंग्रजे[2] वडगांवावर जात तोंच फार करून लुटले गेले. पुढें परिणाम नाहींसें समजोन थैली पाठविली कीं, (या) पत्राचें उत्तर येतांच भल्या माणसास पाठवूं. (इकडून) पत्राचें उत्तर गेलें. त्यांजकडून भला माणूस आला. त्यानें लिहून पाठविलें त्यावरून इंग्रजांकडून अखत्यारी आला. त्याचें नांव मेस्टर होम. (Mr. Holmes) त्याणें ठराव केला कीं, 'साष्टी, उरण जंबूसर वगैरे गुजराथेचे महाल सरकारचे व गायकवाडाकडील घेतले आहेत त्यांसुद्धां झाडून सोडून देऊन श्री. नानासाहेब व माधवरावसाहेबांपासून तहनामा चालत आला त्याप्रमाणें चालावें. श्री. राजश्री दादासाहेबांस हवालीं करून द्यावें. कलकत्त्याहून (बुंदेलखंडांत) कंपू आले आहेत त्यांस इकडून दस्तक द्यावें म्हणजे ते परत जातील.' येणेंप्रमाणें ठराव जाला. साष्टी वगैरे ठाण्यासाठीं इष्टुर फाकड्याचा पुतण्या (Lieut. Charles Stuart) ओलीस राहिला आणि दुसरा फारमार (Mr. Farmer) म्हणून इंग्रजच. येणेप्रमाणें ओलीस राहिले.........(इंग्रज) इतके दमानें आले असतां असें कसें झालें असें आपण म्हणतील, त्यास मुख्यत्वें श्रीमंतांचें पुण्य विचित्र, अवतारी पुरुष, त्यासारखे योग घडले! ज्या मास्टिमानें (मॉस्टिन) मसलत केली तो घाटावर देतांच समाधान नाहीं म्हणून तो मुंबईस गेला तेव्हां मृत्यु पावला. इष्टुर फाकडा[3] मोठा लढाव. तो गोळा लागोन ठार जाला.

---

१ मराठ्यांनीं तोफा व गरनाळा पाडाव केल्याचें इंग्रज इतिहासकार लिहीत आहेत. २ ऐ. ले. सं. नं. २४६४

३ पेशवाईंत तीन फाकडे प्रसिद्ध होते. कान्हेर त्रिंबक एकबोटे हा कान्हेर फाकडा, मानाजी शिंदे हा मानाजी फाकडा, ले. स्टुअर्ट हा इष्टुर फाकडा। ज्याची शौर्याबद्दल विशेष ख्याति असेल त्यालाच फाकडा ही पदवी मिळत असे. ले. स्टुअर्ट याला फाकडा ही पदवी देऊन मराठ्यांनीं शत्रूच्याही गुणाबद्दल आदर व्यक्त केला हें त्यांस भूषणावह आहे.

कर्णेल की ( Lieut. Colonel Kay ) म्हणोन होता त्यास बाण लागोन जेर जाला. आकारिक होते त्याची अशी अवस्था जाली. इकडून फौज तिकडे येईल म्हणून ( त्यांस ) भरवसा होता, ( पण ती ) फौज मिळाली नाहीं. इकडील फौजेंत देण्याघेण्याचा दंगा, यास्तव फौज ( एकत्र ) मिळणार नाहीं असा त्यांचा समज; त्यास उभयतां सरदारसुद्धा पन्नास हजार फौज जमा जाली. चोहोंकडून फौजांचे भार पाहतांच छाती तडकली ! तेव्हां माघारें कूच केलें. सारांश श्रीमंतांचा प्रताप हें खरें ! ''

या तहालाच वडगांवचा तह असें म्हणतात. हा तह झाल्यावर मराठ्यांनीं इंग्रजांस मुंबईकडे परत जाण्याची परवानगी दिली. श्रीमंत दादासाहेब तीनशें स्वार, हजार बाराशें गारदी तेरा तोफा इतक्या सरंजामानिशीं शिंद्यांच्या स्वाधीन झाले. त्यांच्या गोटांत चिंतो विठ्ठल व खरकसिंग होते त्यांस शिंद्यांनीं निराळें कैदेंत ठेविलें. नारायणराव पेशव्यांचा खून करण्यांत सुमेरसिंग, खरकसिंग, महंमद युसफ आणि तुळ्या पवार हे चार मारेकरी प्रमुख होते. स. १७७५ सालीं हरीपंत फडके गुजराथेंत मोहिमेवर होते तेथें त्यांच्या हातीं महंमद युसफ सांपडला होता आणि त्याला त्यावेळीं डोक्यांत मेखसूं घालून देहांतशासन देण्यांत आलें होतें. नानांनीं आतां खरकसिंगालाही तीच शिक्षा दिली. सुमेरसिंग आणि तुळ्या पवार यांचीं पारिपत्यें अजून व्हावयाचीं होतीं. त्यांपैकीं पहिला खानदेशांत एका बंडखोराकडे चाकरीस राहिला होता आणि दुसरा हैदरअलीच्या आश्रयास होता. चिंतो विठल आणि मोरोबाच्या बंडांत सांपडलेला सदाशिव रामचंद्र हे दोन अपराधी शिंद्यांनीं यावेळीं नानांच्या हवालीं केले नाहींत. ते दोघे गुन्हेगार त्यांच्या हातीं येण्यास दोन वर्षे लागलीं. पण ते हातीं येतपर्यंत त्यांनीं शिंद्यांस असीरगड दिला नाहीं ! नानांची कैद चुकावी म्हणून चिंतो विठ्ठलांनीं शेवटीं सर्वसंगपरित्याग करून संन्यास घेतला ! परतु असल्या या संन्यासग्रहणानें इहलोकावरील पापाचें प्रायश्चित्त कसचें चुकतें ! अर्थात् त्याला त्या स्थितींतच जन्मभर कैदेंत रहावें लागलें !

इंग्रज मुंबईस परत गेल्यावर मराठी लष्कराचा एक महिनाभर मुक्काम

तळेगांवासच होता. त्या अवधींत दादांचें पुढें काय करावें याबद्दल पुणें दरबारांत बरीच चर्चा झाली. शेवटीं असें ठरलें कीं, दरसाल पांच चार लक्ष रुपये घेऊन श्रीमंतांनीं झांशी येथें रहावें आणि तेथें शिंद्यांनीं त्यांचा बंदोबस्त ठेवून पुनः त्यांबद्दल दरबारांत बोभाट देऊं देऊं नये. परंतु ही साधी जबाबदारीही पतकरण्याचें शिंद्यांनीं साफ नाकबूल केलें. ते तकरार सांगूं लागले कीं, श्रीमंतांच्या बंदोबस्ताकरितां मला झांशीस दोन हजार स्वार नेहमीं बाळगावे लागतील त्यांचा खर्च मी कुठून द्यावा? याप्रमाणें ते अडूनच बसले, तेव्हां त्यांच्या इच्छेप्रमाणें झांशी प्रांतीं भांडार म्हणून पांच लक्ष रुपये उत्पन्नाचा तालुका नानांनीं त्यांस जहागीर देऊं केला, तेव्हां पाटीलबुवांची समजूत झाली! नंतर दादांची स्वारी स्वतःचा लवाजमा व तोफा व गारदी बरोबर घेऊन झांशीकडे रवाना झाली. त्यांच्याबरोबर शिंद्यांनीं आपला हरि बाबाजी नांवाचा सरदार दोन हजार स्वार देऊन पाठविला.

स. १७७९ मार्च

राज्यांतले फंदफितूर मोडण्याचें सत्र नाना व महादजी यांनीं वर्षभर सुरू केलें होतें त्याची पूर्णाहुति होण्याची आतां वेळ आली. चिंतो विठ्ठल शिंद्यांच्या कैदेंत होता त्याला सखारामबापूंचा सोवळेपणा चव्हाट्यावर आणावयाचाच होता. तो शिंद्यांस म्हणूं लागला कीं, मी फितूरी म्हणून जर मला कैदेंत टाकणार तर तुम्ही याच अपराधाबद्दल हीच शिक्षा बापूंस कां करूं नये? कारण तेही मजप्रमाणेंच फितूरी आहे हें मी दाखवून देतों! श्री. दादासाहेब यांस विचारतां त्यांनींही ही गोष्ट खरी आहे असें सांगितलें. मग त्या मतलबी पाटीलबावांनीं गोड गोड बोलून त्यांच्या पोटांत शिरून बापूंचे दस्तऐवज त्यांजवळ होते तेवढे काढून घेतले! हे दस्तऐवज म्हणजे बापूंच्या दोन चिठ्या, इंग्रज बोरघांट चढून आल्यावर एक चिंतो विठ्ठलास व दुसरी श्रीमंतास लिहिलेली अशा होत्या. चिंतो विठ्ठलाच्या चिठींत पुढील मजकूर होता—" विनंति उपरी. दक्षिणेकडे (हैदरअलीकडे) सूचना केली आहे. आम्हीही पाय पसरून बसलों आहों. अशांत जलदी कराल तितकी उपयोगीं आहे!" श्रीमंतांच्या चिठींतही

१ अधिकारयोग

जवळ जवळ हाच मजकूर होता. योग्य संधि येईपर्यंत नाना व शिंदे यांनीं या चिठ्यांच्या प्रकरणाबद्दल तोंडांतून एक अवाक्षर काढलें नाहीं. आतां चोहोंकडे स्थिरस्थावर झाल्यावर शिंद्यांनीं पुरंदरास जाऊन सखा-

स. १७७९ एप्रिल. } रामबापूंस त्यांच्या हातच्या चिठ्या दाखविल्या आणि तत्काळ कैद करून सिंहगडास रवाना केलें.

बापू सिंहगडावर सुमारें वर्षभर होते. नंतर प्रतापगडावर कांहीं दिवस ठेवून शेवटीं त्याची रवानगी रायगडावर करण्यांत आली. तेथेंच शके १७०३ श्रावण शु. १३ गुरुवार ता. २ आगष्ट १७८१ या दिवशीं त्या प्रसिद्ध मुत्सद्याचें देहावसान झालें. सखारामबापू व पटवर्धन यांचा द्वेष बहुत दिवसांचा. असें असतांहीं त्यांस कैद केल्याचें वर्तमान ऐकतांच परशुरामभाऊंनीं त्याविषयीं जें मत दिलें आहे तें आज मितीच्या लोकांसही न्याय्य वाटेल. ते लिहितात–" गोष्ट वाईट जाहली. चांगला कर्ता पुरुष होता. परंतु खेळ न जात त्यामुळें हें प्राप्त जालें. होणार सुटत नाहीं !" बापू कैदेंत पडल्यावर जवाहीर, घोडों वगैरे त्यांच्या सर्व अजबाब सरकारजमा करण्यांत आला. नाना आतां मुख्य कारभारी झाले आणि त्यांना ' वडीलकीचा ' मान प्राप्त झाला. दुय्यम कारभाऱ्याचें म्हणजे अखत्यारीचें काम हरिपंत फडक्यांना सांगण्यांत आलें.

नाना व शिंदे यांचें याप्रमाणें राज्याच्या बंदोबस्ताचें काम उत्साहानें चाललें असतां तिकडे परशुरामभाऊंनीं कर्नाटकांत असेच मोठमोठे विजय

स. १७७९ जाने. ते स. १७८० जूनअखेर. } संपादन केले. त्यांनीं नरसो गोविंद व मुरापूरकर बेरड संस्थानिक यांच्या फौजांची दाणादाण उडवून दिली आणि मुरापूरकरांकडे खंडणीची बाकी थकली होती ती वसूल करून शिवाय वीस हजार रुपये गुन्हेगारीही घेतली. नंतर हंडी,

---

१ चाकटे, शाहू राजे यांचें चरित्र पृ. ४९-५० यांवर बापूच्या पायांत चाळीस शेरांची बेडी घातली होती आणि त्याचे खाण्यापिण्याचें फार हाल झाले असें लिहिलें आहे. परंतु ती माहिती बरोबर नाहीं नानांनीं बापूंची कैदेंत अव्वल दर्जाची बरदास्त ठेवली होती. ( सवाई माधवराव रोजनिशी पृ. २५३-२५५ पहा. ) २ पेशव्यांचें टिप्पण.

तांबे, आलमेलें वगैरे मोंगलाई तालुक्यांतून घांसदाणा घेत घेत भाऊंची स्वारी विजापूर प्रांतांतून कर्नाटकांत उतरली. हैदरानें मलप्रभेपलीकडील सर्व मराठी राज्य काबीज केलें होतें. परंतु भाऊंनीं तीन चार महिने सक्त मेहनत करून हणमसागर, होनगुंदे, केळूर, बसरगी, मुदलावी वगैरे नामांकित ठाणीं हल्ला करून घेतलीं आणि बदामीच्या किल्ल्याखेरीज त्या बाजूचें सर्व मराठी राज्य शत्रूच्या तावडींतून सोडविलें. नंतर भाऊ मिरजप्रांताकडे वळले. वाटेनें कित्तूरकरांचें पारिपत्य करून त्यांनीं त्या देसायास कैदेंत घातलें आणि नंतर करवीरकरांच्या राज्यांत धामधूम सुरू केली.

स. १७८० जून } करवीरकरांची शिरोळ, अकीवाट, हुकेरी व सेंडूर हीं बळकट ठाणीं भाऊंनीं हस्तगत केलीं आणि बाघापूरच्या लढाईत त्यांनीं शत्रूची अशी दुर्दशा उडविली कीं, पुढें चार वर्षेंपर्यंत करवीरकरांना दंगा करण्याचें अवसानच राहिलें नाहीं !

वडगांवचा तह झाला तरी इंग्रजांच्या लढाईचें झेंगट कायमचें सुटणार नाहीं असा नानांचा तर्क होता तोच अखेरीस खरा ठरला. वडगावच्या अपयशानें चिडून जाऊन हिंदुस्थानांतील सर्व इंग्रज एक झाले आणि त्यांनीं मराठ्यांविरुद्ध हत्यार उपसलें. त्यांना उत्तेजन मिळण्यासारखी आणखीही एक गोष्ट या सुमारास घडून आली ती अशी–हरि बाबाजी या शिंद्यांच्या सरदाराच्या देखरेखीखालीं दादांची रवानगी झांशीकडे झाल्याचें पूर्वीं सांगितलेंच आहे. चोळी महेश्वराजवळ नर्मदा उतरत

स. १७७९ जून. } असतां दादांनीं बिथरून हरि बाबाजीवर एकाएकीं छापा घालून त्याला ठार मारिलें आणि लांब मजली करीत त्यांनीं गुजराथेंत जाऊन पुनः इंग्रजांचा आश्रय स्वीकारला ! दादा शूर व मर्द होते परंतु अकलेच्या अभावीं त्यांचे हे सद्गुणच वेळोवेळ राज्यनाशास कारणीभूत होत गेले. दादांना इंग्रजांकडून आश्रय मिळाला इतकेंच नव्हे, तर या पराक्रमाबद्दल त्यांच्या पेनशनींत बढतीही करण्यांत आली ! दादांना पूर्वीं इंग्रजांकडून दरमहा दहा हजार रु. पेनशन् मिळत होतें तें आतां दरमहा पन्नास हजार रु. मिळूं लागलें ! एक पैशाचाही व्यापार करतांना कंजुषपणानें भयंकर घासाघीस घालणाऱ्या इंग्रज कंपनीनें

पूर्वींचे करारमदार आणि सौजन्य गुंडाळून ठेवून इतकें औदार्य दाखविलें त्याचें कारण उघडच आहे. लोभमूलानि पापानि !

बंडखोरांना उत्तेजन देणें, मराठमंडळांत फूट पाडणें आणि पुणें दरबाराशीं शिष्टरणानें तहाची वाटाघाट करणें या तिन्ही गोष्टी इंग्रजांनीं (स. १७७९ जून ते दिसें) एकाच वेळीं सुरू ठेवल्या होत्या. त्यापैकीं पहिल्या व तिसऱ्या गोष्टींचीं प्रत्युत्तरें नानांनीं तत्काळ रोखठोक दिलीं. साष्टीप्रांत व श्री० दादासाहेब यांस हवालीं केल्याशिवाय आम्हाला तुम्हाशीं सलोख्याचा एकही शब्द बोलतां येत नाहीं असा त्यानीं इंग्रजांस स्वच्छ जबाब दिला. [1]मराठमंडळांत फूट पाडण्याचे इंग्रजांचे प्रयत्न चालू होते; परंतु नानांच्या धूर्तपणामुळें त्यांनाही विशेषसें यश प्राप्त झालें नाहीं. फत्तेसिंग गायकवाड इंग्रजांना वश झाला आणि त्यामुळें गुजराथेंत इंग्रजांचा बोलबाला होणार असा रंग दिसूं लागला. परंतु फत्तेसिंग शत्रूला सामील होतांच नानांनीं गोविंदराव गायकवाडाला हाताशीं धरून त्याला गायकवाडांची सरदारी देऊं केली आणि त्यामुळें त्या भावाभावांचें झोंबट सुरू होऊन इंग्रजांना फत्तेसिंगाच्या सहाय्याचा फायदा मिळूं शकला नाहीं. नागपूरचा मुधोजी भोसले हाही इंग्रजांना मिळाला होता. नानांस ही बातमी समजतांच त्यानीं त्याचा धाकटा भाऊ बिंबोजी भोसले यास चाळीस लक्षांची जहागीर व बऱ्हाणपुरचा किल्ला देऊं करून वडील भावाशीं तंटा करण्यास उभें केलें. नानानीं हा नाजुक चिमटा काढतांच मुधोजीनें घाबरून त्यांची समजूत करण्याकरितां आपला दिवाण देवाजीपंत

---

१ पेशवाईंत साडेतीन शहाणे आणि साडेतीन राव प्रसिद्ध होते. साडेतीन शहाणे = सखारामबापू, भोसल्यांचा दिवाण देवाजीपंत चोरघोडे, निजामाचा दिवाण विठ्ठल सुंदर हे तीन सबंध शहाणे आणि अर्धे शहाणे नाना फडनवीस. साडेतीन राव=गोपाळराव पटवर्धन, भवानराव प्रतिनिधि, मुरारराव घोरपडे हे तीन सबंध राव आणि शेवटचे अर्धे राव माधवराव पेशवे. शेवटची अर्धी संख्या सर्वांत श्रेष्ठ असेल त्याच्या वांटणीला जात असे हे आतां वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. त्यावेळीं साडेतीन ही संख्या बरीच लोकप्रिय होती असें दिसतें. उदा.— साडेतीन मुहूर्त, साडेतीन वज्रें.

यास पुण्यास पाठविलें. देवाजीपंतास नाना बोलले कीं,—" तुमचें लक्ष इकडे असावें तें एकीकडेस राहून इंग्रजबहादुराशीं सख्यत्व ठेवतां, इंग्रज बहादुराचे मनांत दादासाहेबांस पुढें करून दक्षिण घ्यावी ( असें आहे ), या विचारांत तुम्ही आहांत, यावरून तुमचे घरांत आम्हीही शकटभेद करून कळेल तसा विचार केला आहे !" नानांच्या या उत्तरानें मुधोजी शुद्धीवर आला आणि त्यानें इंग्रजांचा पक्ष सोडला.

सरकारांतून दादासाहेबांचा बंदोबस्त शिंद्याकडे सोंपविला असतां ते त्यांच्या ताब्यांतून पळून गेले, सबब त्यानींच त्यांस धरून सरकारच्या हवालीं करावें असें नानांचें म्हणणें पडलें. श्रीमंत आपल्या ताब्यांतून पळून गेले हें पाहून शिंदे खजील झालेच होते. त्यांत नानांची याप्रमाणें टोंचणी लागतांच त्यांस चीड येऊन दोघांतलें सौरस्य कमी झालें. दरबारच्या कामांत शिंद्यांची ढवळाढवळ सुरूच होती. नाना व हरीपंत यांस ही गोष्ट आवडत नसे. इंग्रजांशीं होणाऱ्या मोहिमेंत शिंद्यांनीं पुढाकार घ्यावा असें नानांचें म्हणणें पडलें. परंतु ही सरळ गोष्टही शिंदे सुखेपणानें कबूल करीनात. ते नानांस म्हणूं लागले कीं, तुमच्या म्हणण्याप्रमाणें आम्हीं इंग्रजांची मोहीम पतकरतों. परंतु त्यापूर्वीं तुम्ही आमच्या दोन गोष्टी कबूल केल्या पाहिजेत. पहिली गोष्ट अशी कीं, श्रीमंतांच्या बंदोबस्ताकरितां तुम्ही आम्हांस पाच लक्षांची जहागीर देऊं केली होती, ती यद्यपि श्रीमंत आमच्या ताब्यांतून पळून गेले आहेत तरी सुद्धां आम्हांस आगाऊ आत्तांच मिळाली पाहिजे. कारण श्रीमंत ज्यांच्या आश्रयास गेले आहेत त्या इंग्रजांवर स्वारी करण्याचें आम्हीं कबूल केलेंच आहे. आमची दुसरी गोष्ट अशी आहे कीं, तुम्हांजवळ हरीपंत फडके आहेत त्यांचें व आमचें वांकडें आहे. ते नानाप्रकारें तुम्हांस आम्हांविषयीं कुबुद्धि शिकवितात, सबब त्यांस कारभारांतून काढावें. याविषयीं उत्तरें प्रत्युत्तरें होऊन जिकीर वाढत चालली आणि कुतर्क उत्पन्न होऊं लागले. शिंद्याचा मुक्काम त्यावेळीं जांबगांवास होता. त्यांच्या लष्करांत एक दिवस अशी हूल उठली कीं, हरिपंत व परशुरामभाऊ हे लष्कर लुटण्याकरितां

१ नागपूरकर भोसल्यांची बखर पृ. १२६.

येत आहेत ! ही बातमी पसरतांच मोठी गडबड होऊन सारें लष्कर तयार होऊन हल्ला होण्याची वाट पहात उभें राहिलें ! ही बातमी अजी-बात खोटी होती; त्यामुळें ही सारी गडबड आपोआपच शांत झाली हें सांगणें नकोच. हेंच निमित्त करून शिंदे फौज जमवूं लागले तेव्हां नानां-सही हुजरातीच्या पथक्यांस बोलावणीं पाठविणें भाग पडलें. याप्रमाणें बाह्यतः भांडणाचा देखावा कितीही झाला तरी सुमेटाचा केंद्रबिंदु कशांत आहे तें नाना व शिंदे यांस पूर्णपणें माहीत होतें. नानांनीं शिंद्यांस जहा-

स. १७७९ दिसें. } गीर देऊं केली तेव्हां पाटीलबावांची समजूत पडून त्यांनीं हरिपंतांविषयींचा आपला आग्रह सोडून

दिला आणि होळकरांसह पंचवीस हजार फौज घेऊन ते इंग्रजांशीं लढण्या-करितां गुजराथेकडे निघाले.

इंग्रजांच्या वागणुकीतील रागरंग पाहतां त्यांच्याशीं यापुढें युद्ध होणार तें अतिशय मोठ्या प्रमाणावर होणार ही गोष्ट नानांस कळून चुकली.

सन १७८०. } उलटपक्षीं त्यांनीही इंग्रजांच्या प्रतिकाराची तयारी अशाच मोठ्या प्रमाणावर चालविली होती. दक्षिणेकडून

हैदर आणि उत्तरेकडून इंग्रज असे दोन शत्रु एकाच वेळीं सोसणार नाहींत असें समजून नानांनीं नुकसान सोसून हैदराशीं तह ठरवून टाकिला. या तहांत असें ठरलें कीं, तुंगभद्रा व मलप्रभा या नद्यांमधील मुलूख हैदरानें घेतला आहे तो त्याकडेच पेशव्यांनीं कायमचा ठेवावा. हा तह होतांच आज अनेक वर्षें महाराष्ट्र व म्हैसूर येथील सरकारांत जो युद्धप्रसंग सुरू होता तो बंद पडून एकोपा झाला. या एकोप्याच्या पायावर नानांच्या प्रयत्नानें एक प्रचंड कारस्थान उभारलें गेलें. या कारस्थानातील मुख्य सूत्रधार निजामअली हे असून त्याचें स्वरूप असें होतें कीं, पेशवे, भोसले, निजाम व हैदर या चौघांनीं एकसंकेतानें एक-दम स्वाऱ्या करून हिंदुस्थानांतून सर्व इंग्रज लोकांस कायमचें घालवून द्यावें ! त्यांत पेशव्यांनीं मुंबई, गुजराथ व अंतर्वेदी येथील इंग्रजांस पादाक्रांत करावें, भोसल्यांनीं बंगाल्यावर स्वारी करावी, निजामानें चिका-कोल राजमहेंद्रीकडे जाऊन तो प्रदेश घ्यावा आणि हैदरानें मद्रासेवर

चालून जाऊन तो मुलूख काबीज करावा, अशी या चौघां सरकारांत कामाची वांटणी ठरली.

कारस्थानें व तहाची वाटाघाट यांतच स. १७७९ हें साल निघून गेलें. पुढील वर्षाच्या प्रारंभापासून इंग्रजांच्या मोहिमेस खरीखुरी सुरवात झाली. कलकत्तेकरांचीं सहा पलटणें यापूर्वींच मुंबईकरांना सामील झालीं होतीं. इंग्रजी फौजेंत हार्टली, मूर, क्यामॅक वगैरे सेनापति होते आणि सरसेनापतीचा हुद्दा जनरल गादर्द याजकडे होता. मराठ्यांच्या बाजूनें महादजी शिंदे, तुकोजी होळकर, हरीपंत फडके, परशुरामभाऊ पटवर्धन, बाजीपंत अण्णा, गणेशपंत बेहरे वगैरे सरदार लढत होते. हें युद्ध स. १७८० च्या जाने. पासून पुढील वर्षाच्या जूनपर्यंत जोरात चालूं होतें. या युद्धाचीं सर्व सूत्रें नाना पुण्यास बसून हालवीत होते. रणभूमिवर मराठे व इंग्रज यांचीं मोठमोठीं युद्धें झालीं; परंतु त्यांचा नानांच्या चरित्राशीं प्रत्यक्ष असा फारसा संबंध येत नाहीं, सबब ती हकीकत येथें संक्षेपानें देतों.

मुंबई व गुजराथ या दोन रणक्षेत्रांवर युद्धाची पहिल्यानें सुरवात झाली. स. १७८० } गुजराथेंत डभई व अहंमदाबाद हीं शहरें जन. गादर्द यानें काबीज केलीं आणि ता. २३ एप्रिल रोजीं गणेशपंत बेहऱ्यावर छापा घालून त्याची फौज उधळून लाविली. शिंदे-होळकरांनीं जन.गादर्द याला गनिमी कावा दाखवून पुष्कळ त्रास दिला आणि त्या प्रांतांत इंग्रजांचा विशेषसा फैलावा होऊं दिला नाहीं. इकडे मुंबईकरांनीं कल्याण शहर हस्तगत केलें आणि नंतर सर्व उत्तर कोंकण काबीज करून बोरघांटापर्यंत चौक्या बसविल्या. बाजीपंत अण्णानें बोरघाटांतल्या इंग्रजांच्या चौक्या कापून काढल्या आणि नंतर कोंकणांत उतरून कल्याणला वेढा घालण्याची तयारी चालविली. इंग्रजांनीं ता. २४ मे रोजीं बाजीपंतावर छापा घालून त्याचा पराजय केला. नंतर पावसाळ्यामुळें युद्ध उभयपक्षीं तहकूब राहिलें.

पावसाळ्यानंतर जन.गादर्द मुंबईकडे वळला, त्यामुळें गणेशपंत बेहरे व होळकर हे गुजराथेंतून तळ हालवून खानदेशांत आले आणि दिसेंबर

महिन्यांत त्यांनीं गुलजारखानाचें बंड मोडलें. नंतर ते दोघे सरदार पुण्यास आले. जन. गादर्द यानें मुंबईकरांशीं खलबत करून वसईच्या

नोव्हेंबर } किल्ल्यास वेढा दिला. मराठ्यांनीं तो किल्ला महिनाभर मर्दुमीनें झुजविला, परंतु इंग्रजांनीं ता. ११ दिसेंबर रोजीं निकराचा हल्ला करून तो किल्ला घेतला. वसईचा वेढा उठविण्याकरितां नानांनीं बाजीपंत व रामचंद्र गणेश या दोन सरदारांची दहा हजार फौजेसह रवानगी केली. ही फौज कोंकणांत उतरते तोंच कर्नल हार्टली यानें तिची वाट अडवून धरली. कर्नल हार्टली व ही मराठी फौज यांचीं महिनाभर गनिमी युद्धें होत होतीं. शेवटीं ता. १२ दिसें. रोजीं मोठें युद्ध झालें त्यांत रामचंद्र गणेश ठार पडला आणि मराठ्यांचा पराजय झाला. हरीपंत फडके हे टाकोटाक मोठी फौज घेऊन कोंकणांत उतरले त्यामुळें इंग्रजांना या विजयाचा फायदा मिळूं शकला नाहीं आणि युद्ध तसेंच नेटानें चालूं राहिलें.

वसई काबीज झाल्यावर जन. गादर्द यानें पुण्यावर चालून जाण्याचा निश्चय ठरवून बोरघांटाकडे मोर्चा वळविला. वाटेंत वज्रजोगणीस त्याचा बरेच दिवस मुक्काम पडला. इंग्रजांच्या तोंडावर हरीपंत फडके दहा हजार फौजेनिशीं दहिवलीस आणि बाजीपंत पांच सहा हजार फौज घेऊन बदलापुरावर तळ देऊन राहिले होते. मराठ्यांशीं लढत लढत जन. गादर्द बोरघाटांच्या पायथ्याशीं आला तेव्हां नानांनीं तुकोजी होळकरांसही हरीपंतांच्या मदतीस पाठविलें. परंतु या सर्वांशीं मारामार करीत जनरल

२७ फे. १७८१. } गादर्द शेवटीं बोरघांट चढून वर आला! ही बातमी पुण्यास समजताच सर्व शहर गडबडून गेलें आणि जो तो आपला वित्तविषय घेऊन वाट फुटेल तिकडे पळूं लागला! "तीस हजार स्वार व चार साडेचार हजार पायदळ तुम्हांबरोबर असतां तुम्हीं इंग्रजांस घांटावर कसें येऊं दिलें!" अशीं नानांनीं फडके व होळकर यांस रागानें पत्रें पाठविलीं. हरीपंतांनीं आपल्या पत्राचें उत्तर पाठविलें त्यांत आपल्या हातून चूक झाली अशी त्यांनीं कबुली दिली. होळकरांचें उत्तर आलें त्यांत हरीपंतांच्या पत्रावरून सर्व मजकूर श्रुत होईल

एवढाच मजकूर होता!

इंग्रजांचा पुण्यावर चालून येण्याचा-रोख दिसतांच नानांनीं परशुराम-भाऊस पुण्यास निघून येण्याविषयीं तांतडीनें पत्रें पाठविलीं. त्याप्रमाणें भाऊ तासगांवाहून निघून टाकोटाक पुण्यास गेले आणि तेथें त्यानीं नानांची गांठ घेऊन मसलतीविषयीं चर्चा केली. नंतर ते बोरघांटांतील

२८ फेब्रु. अघाडीच्या फौजेंत येऊन दाखल झाले. भाऊनीं तीन चार दिवस रणभूमीचें सूक्ष्म निरीक्षण केलें; परंतु शत्रूवर हल्ला करण्याचा लाग त्यांस कुठें दिसेना. सबब कोंकणांत जाऊन इंग्रजांची रसद मारावी असा त्यांनीं बेत केला. या बेतास अनुसरून त्यांनीं आपलें बुनगें वगैरे जडसामान राजमाचीस ठेवलें आणि ते सड्या स्वारीनें घाटाखालीं उतरून खोपवली परगणें नसराबाद येथें तळ देऊन राहिले. आठ पंधरा दिवसांत तुकोजी होळकरही त्यांस त्या मुक्कामीं सामील झाले. कोंकणांत भाऊंचा महिना दीड महिना मुक्काम होता. त्या मुदतींत त्यानीं इंग्रजांच्या रसदेवर हल्ले करकरून शत्रूचीं शेकडों माणसें ठार मारलीं आणि रिताडाचे आणि भरताडाचे हजारों बैल लांबविले! याप्रमाणें भाऊंनीं मुंबईहून मिळणारी कुमक बंद पाडून नाक दाबतांच तिकडे बोरघांटावर जन. गादर्द याचें तोंड उघडलें! पुण्यावर चालून जाण्याच्या इंग्रजांच्या वल्गना आपोआपच बंद पडल्या आणि ते बोरघांट

ता. २०–२३ एप्रिल. उतरून मुंबईकडे परत निघाले. पनवेलीस पोचेपर्यंत वाटेंत दोन तीन दिवस मोडले. त्या मुदतींत अघाडीस पटवर्धन व होळकर आणि पिच्छाडीस फडके यांचे शत्रूवर सतत हल्ले सुरू होते. इंग्रजांनीं आपली फळी फुटूं न देतां पनवेल गांठली. परंतु त्या प्रयत्नांत त्यांचें चार पांचशें माणूस ठार पडलें आणि हजार पंधराशें जखमी झालें. शिवाय मराठ्यांनीं शत्रूचें बरेंचसें सामान लुटून घेतलें. पुण्यावर चालून जाण्याचा इंग्रजांनीं हा दुसऱ्यानदां प्रयत्न केला; परंतु याही खेपेस त्यांचा असा बोजवारा उडाला!

स. १७८० च्या आगष्टांत कर्नल क्यामॅक हा मोठी फौज बरोबर घेऊन यमुनेच्या दक्षिणतीरीं आला आणि गोहदच्या राण्यास अनुकूल

करून घेऊन त्यानें लाहार व ग्वालेर हे मराठ्यांचे नामांकित किल्ले काबीज केले. आपल्या जहागिरीचा बचाव करण्याकरितां महादजी शिंद्यांनीं भर-पावसाळ्यांतच शत्रूशीं गांठ घातली. कर्नल क्यामॅक हा शिंद्यांशीं लढत लढत दक्षिणेकडे चाल करीत माळवाप्रांतांत आला आणि एप्रिल महि-

स. १७८१ } न्यांत कर्नल मूर यांची फौजही त्याला सामील झाली. नंतर भोपाळच्या नवाबाला अनुकूल करून घेऊन इंग्रजांनीं शिंदे होळकरांच्या जहागिरींत दंगा सुरू केला. महादजी शिंदे व इंग्रज यांचीं त्या प्रांतांत गनिमी युद्धें पांच सहा महिने सतत होत होतीं. इंग्रजांनीं शिंद्यांवर छापे घालून त्यांचें पुष्कळ नुकसान केलें, परंतु पाटीलबावांनीं हिंमत न सोडतां अशा मर्दुमीनें शत्रूशीं टक्कर दिली कीं, शेवटीं इंग्रज

आक्टोबर. } टेकीला आले आणि युद्ध बंद ठेवण्याविषयीं ते शिंद्यांची विनवणी करूं लागले. ही बातमी नानांस समजतांच त्यांनीं शिंद्यांस लिहिलें कीं—" माघारे जाऊं द्या म्हणून इंग्रजांचा संदर्भ आला आहे. त्यास ते दगेबाज आहेत, त्यांचें कदापि ऐकूं नये. संदर्भ लावून फौज चोहोंकडे गेली म्हणजे मागती चाल करतील. आयते मैदानांत सांपडले आहेत. पारिपत्यच होय तें करावें. " शिंदे व कर्नल मूर हे लढाईच्या इराद्यानें पावसाळ्याकरितां माळवाप्रांतींच छावणी करून राहिले.

काकोलुकीय युद्धाप्रमाणें मराठे व इंग्रज यांची रणभूमीवर प्रत्यक्ष अशी विशेषसी गांठ पडत नसे, त्याचें कारण त्या दोघांचीं युद्धाचीं साधनें वेगवेगळीं होतीं हेंच होय. मराठी फौजेंत मुख्य भरणा घोडदळाचा तर इंग्रजी लष्करांत सर्वच पायदळ—मराठ्यांचें मुख्य हत्यार तरवार व भाला तर इंग्रजांचें मुख्य हत्यार बंदूक व तोफ! मराठे इंग्रजापेक्षां शौर्यामध्यें तिळप्राय कमी नव्हते, परंतु साधनांच्या वैगुण्यामुळें ते होतां होईतों शत्रूशीं गांठ घालीत नसत. दिवसां शत्रूभोंवतीं घिरट्या घालघालून मराठी घोडदळ शत्रूला बेजार करी, परंतु रात्र पडल्यावर इंग्रजी पलटणांना जोर चढून तीं मराठ्यांवर वारंवार छापे घालीत आणि त्यांना उधळून लावीत. इंग्रजांच्या लढाईसंबंधें परशुरामभाऊंच्या पत्रांतून जागोजाग उल्लेख आले

१ या चरित्राची आवृत्ति दुसरी पृ० १००

आहेत ते अत्यंत समर्पक आहेत. ते लिहितात—" त्यांनीं ( इंग्रजांनीं ) निशाचरी विद्या आरंभिली आहे ! त्याचा काळ साध्य त्यास जें करावें तें साध्य आहे ! " " तोफेपुढें ( आमची ) गोडी फौज झटल्यानें फौजेचा नाश होतो. ते ( इंग्रज ) जागा धरून उभे राहून लढूं लागल्यानंतर फौजेचा काट चालत नाहीं. नासाडीच होईल. + + + थोडीं इरेनें जायां होतात. असें आणखी एक दोन वेळ इरेनें लढावें म्हटलें तर सरदारी बसावयाचा प्रकार ! ( शत्रूचें ) कूच होऊन लांबण पडल्यानंतर मग साधेल तें साधेल. " इंग्रजांनीं मराठ्यांचे किल्ले घेतले आणि त्यांना वारंवार हुसकून लावलें परंतु तेवढ्यानें या युद्धाचा जयापजयाचा कायमचा निर्णय लागण्यासारखा नव्हता. नानांनीं हरप्रयत्न करून मराठमंडळाची जूट फुटूं दिली नाहीं आणि सरदारांनीं हिंमत धरून युद्धप्रसंगीं आपलें अवसान घालविलें नाहीं, त्यामुळें इंग्रजांस कोणत्याही विजयाचा फायदा घेतां आला नाहीं किंवा मराठी फौजांची मगरमिठी त्यांच्या भोंवतीं पडली होती तीही त्यांना दूर सारतां आली नाहीं.

पेशवे, हैदर, निजाम व भोसले यांनीं संगनमत करून इंग्रजांना हिंदुस्थानांतून कायमचें हुसकून लावण्याचें कारस्थान केलें होतें हें पूर्वीं सांगितलेंच आहे. या चौघांपैकीं भोसले व निजाम हे आयते वेळीं शत्रूकडेच फितूर झाले ! मुधोजी भोसल्यांनीं नानांच्या समजुतीकरितां आपले चिरंजीव चिमणाराजे यांना जंगी सरंजाम देऊन बंगाल प्रांतावर पाठविलें; परंतु कलकत्त्याच्या लाटसाहेबांकडून सोळा लक्ष रुपयांचा लांच मिळतांच ही भोसल्यांची फौज मुकाट्यानें नागपुरास परत आली ! भोसल्यांनीं लढाईचें नाटक करण्याकरितां फौजेची हालचाल तरी केली, परंतु निजामाच्या हातून तेंसुद्धां घडून आलें नाहीं. लढाईचा तमाशा पहात ते भागानगरास आपले जागीं स्वस्थ बसून राहिले इतकेंच नव्हे, तर मद्रासकर इंग्रजांशीं कांहीं फायदेशीर तह ठरवून घेण्याकरितां त्यांचा उद्योग याच वेळीं गुप्तपणानें सुरू होता ! हैदरानें मात्र आपलें काम चोखपणानें बजावलें. त्यानें नव्वद हजार फौज गोळा करून मद्रास प्रांतावर स्वारी केली आणि तो प्रांत

१ ए. के. सं. नं. २६०१. २ ए. के. स. नं. २६०६.

जाऊन लुटून फस्त केला. वाटेंत कर्नल मनरो आणि कर्नल बेली यांच्या फौजा त्याच्या तावडींत सांपडल्या. त्यापैकीं पहिल्या फौजेची त्यानें दाणादाण उडविली आणि दुसऱ्या फौजेंतील सर्वच शिपाई त्यानें ठार मारिले! इंग्रज बोरघांट चढून वर आल्याची वर्दी लागतांच हैदरानें नाना फडनवीसांस निरोप पाठविला कीं, मद्रासकर इंग्रजांचें पारिपत्य करून आपण जनरल गादर्द याचा समाचार घेण्याकरितां पुणें प्रांतीं येणार आहों! उलटपक्षीं जन. गादर्द यानेंही जाहिर केलें कीं, आपण पुणें काबीज करून त्याच वाटेनें पुढें सरकून म्हैसूरराज्यावर स्वारी करणार आहों!

याप्रमाणें उभयपक्षीं युद्धाची गर्जना चालू होती तरी यापुढें मराठे व हैदर हे एकत्र राहतील तर त्यापुढें आपला निभाव लागणार नाहीं ही गोष्ट इंग्रजांना कळून चुकली आणि त्यामुळें निरनिराळ्या द्वारांनीं वशिले लावून त्यांनीं तह करण्याविषयीं नानांची मनधरणी चालविली. जनरल गादर्द, मुधोजी भोंसले, अर्काटकर नवाब यांचे वकील या तहाबद्दल नानांची विनवणी करीत होतेच. शिवाय या सर्व प्रयत्नांच्या पुष्ट्यर्थ मद्रासकर इंग्रजांनीं नानांस तह करण्याविषयीं पत्र लिहिलें. या पत्रावर सरसेनापति सर आयर कूट, रियर अॅडमिरल सर एडवर्ड ह्यूजेस, मद्रासचा गव्हर्नर लॉर्ड म्याक कार्तनी, व कलकत्याच्या लॉटसाहेबांच्या कौंसिलांतील मेंबर म्याकफर्सन याच्या सह्या होत्या. त्यांनीं नानांस लिहिलें कीं—"तुमचे हेतु काय आहेत हें साधारणरीत्या आम्हांस ठाऊक आहे. आम्ही स्वतःच्याच तर्फेनें केवळ नव्हे, तर गव्हर्नर जनरल व त्याचें कौंसिल यांच्या तर्फे व आमचा धनी इंग्लंडचा राजा यातर्फे आपापल्या इभ्रतीची खात्रीपूर्वक हमी देऊन तुम्हांस असें कळवितों कीं, जेणेंकरून तुमचें पूर्ण समाधान होईल त्या रीतीनें आम्ही तह करून देऊं. हा तह मनःपूर्वक पाळला जाईल व तो कोणाही इंग्रजांस फिरवितां येणार नाहीं." इतकें सारें झालें खरें, परंतु मराठे व इंग्रज यांमध्यें तह ठरविण्यास आयते वेळीं निराळाच माणूस पुढें यावयाचा होता! महादजी शिंदे व कर्नल मूर हे लढाईच्या इराद्यानें माळवा प्रांतींच छावणी करून राहिल्याचें पूर्वी

१ Selections from state papers Bombay Page. 462.

सांगितलेंच आहे. त्या उभयतांनीं युद्धास कंटाळून अपापसांत असें ठरविलें कीं, कर्नल मूर यानें सैन्य घेऊन यमुना उतरून परत जावें आणि महादजी बावानीं इंग्रज कंपनी व पुणें दरबार यांमध्यें तह घडवून आणण्याकरितां मध्यस्थी करावी. त्याप्रमाणें कर्नल मूर तत्काळ परत गेला आणि शिंद्यांनीं नानांशीं तहप्रकरणीं चर्चा सुरू केली. शिंद्यांनीं मध्यस्थी पतकरल्यामुळें स. १७८२ च्या सुरवातीपासून मराठे व इंग्रज यांचें युद्ध तहकूब झालें.

तहप्रकरणीं शिंद्यांनीं मध्यस्थी पतकरतांच नानांनीं त्यांस इशारा दिला कीं--' इंग्रजांशीं तहनामा करणें तो फार विचार करून करावा लागतो. त्यांचे बोलण्यांत व लिहिण्यांत एका अक्षरांत फार पेंच असतात. ही पुरी माहितगारी येथें आहे. पाटीलबावांस ही माहितगारी असावी याकरितां येथून पूर्वी हपटनच्या तहनाम्याच्या नकला व कलमाकलमांचे अर्थ सविस्तर लिहून पाठविले होते. + + + + असो. इंग्रजांशीं तहनामा करणें त्यास पुढील मागील गुणदोष फार पहावे लागतात. व एकेक अक्षरास जपावें लागतें. याकरितां पूर्वील ( व ) हल्लीं लिहिलेले अर्थ सविस्तर ध्यानास चांगले आणून करावे." ता. १७ मे १७८२ रोजीं पुणें दरबार व इंग्रज कंपनी यांमध्यें शिंद्यांच्या मध्यस्थीनें तह ठरला त्यास सालबाईचा तह म्हणतात. त्या तहांत इंग्रजांनीं मराठ्यांचा जितका मुलूख घेतला होता तितका सर्व त्यांस परत दिला. एक साष्टीचें बेट मात्र परत दिलें नाहीं. श्री० दादासाहेब यांनीं दरमहा पंचवीस हजार रुपये नक्त नेमणूक घेऊन गोदातीरीं वाटेल तेथें स्वस्थ रहावें असेंही कलम त्या तहांत होतें. आणखीही बरींच कलमें होतीं परंतु तीं विशेष महत्वाचीं नसल्यामुळें येथें दिलीं नाहींत.

तहावर मखलाशी करण्यास नाना फडनवीस यांनीं पुष्कळ आढेवेढे घेतले व दिवसही पुष्कळ घालविले. याचें कारण असें कीं. इंग्रजांशीं तह व्हावा हें शिंदे व नाना या उभयतांसही मान्य होतें तरी या तहापासून उभयतांसही भिन्न भिन्न कार्यें साधून घ्यावयाचीं होतीं. शिंद्यांच्या मनांत दिलीस पुनरपि मराठ्यांचें वर्चस्व होऊन बादशहा व त्याची दौलत आपले

हातीं रहावी व बादशहाचें नांव पुढें करून त्या बळावर दुसरीं मोठमोठीं कामें करून घ्यावीं असें होतें. बादशहाचा वजीर नजबखान जेथपर्यंत जिवंत होता तेथपर्यंत मराठ्यांचा प्रवेश होण्याचा संभव नव्हता; परंतु तो इमानी व पराक्रमी वजीर स. १७८२ च्या एप्रिल महिन्यांत मृत्यु पावला. त्यामुळें पुष्कळ दिवस मनांत घोळत असलेला आपला बेत आतां तडीला न्यावा असें शिंद्यांच्या मनांत आलें. हा त्यांचा बेत हाणून पाडण्याचें जर इंग्रजांच्या मनांत असतें तर तें त्यांनीं सहज केलें असतें. कारण कीं, दिल्लीच्या बादशहा पूर्वीं पुष्कळ वर्षे इंग्रजांचें पेनशन् खाऊन त्यांच्याच आश्रयास राहिला होता. बंगाल, बहार, अयोध्या, रोहिलखंड या सर्व प्रांतांत इंग्रजांची सत्ता प्रस्थापित झाली होती. परंतु हल्लीं वॉरन् हेस्टिंग्स यानें महादजी शिंद्यास स्पष्टपणें सुचविलें कीं, तुम्ही पुणें दरबाराशीं आमचा तह ठरवून द्या आणि दिल्लीस जाऊन वाटेल तसा बादशहाच्या दौलतीचा बंदोबस्त करा. आपण कांहीं त्यास आड येणार नाहीं.

आपल्या राष्ट्राचें दिल्लीस वर्चस्व असावें हें नानांसही पाहिजेच होतें. परंतु तहांतल्या दोन कलमामुळें तो तह कबूल करण्यास शिंद्याइतके नाना आतुर झाले नव्हते. हीं दोन कलमें साष्टी व दादासाहेब या संबंधाचीं होतीं. इंग्रजांचें म्हणणें, साष्टीशिवाय तुमचा बाकीचा सर्व मुलूख परत देऊं. आमच्या मुंबईच्या वसाहतीला साष्टीच्या बेटाची अत्यंत जरूर आहे, सबब तें आम्ही परत देणार नाहीं. शिंद्यांचें म्हणणें दिल्लीस आपली मसलत साधते तर साष्टीसाठीं अडून बसावें हें ठीक नाहीं. नानांचें म्हणणें कीं, साष्टीसुद्धां सर्व मुलूख परत मिळाला पाहिजे. नानांचें म्हणणें इंग्रजांनीं दादासाहेबांस आधीं हवालीं करावें आणि मग तहाची गोष्ट बोलावी. इंग्रजांचें म्हणणें कीं, दादासाहेबांना आम्ही आश्रय दिलेला आहे. त्यांना धरून आतां तुमच्या हवालीं करावें तर आमच्या इभ्रतीस बट्टा येतो. आम्ही त्यांना याउपर साह्य देणार नाहीं आणि ते आपखुषीनें तुम्हांकडे येतील तर त्यांस हरकत करणार नाहीं. शिंद्यांचें म्हणणें, दादासाहेबांस स्वाधीन करण्याविषयीं इंग्रजाशीं आग्रह धरण्याचें प्रयोजन नाहीं. श्रीमंतांस आम्ही परस्परच आपणाकडे आणवून घेतों. या दोन कलमांसं-

बंधें तिघांचे तीन भिन्न अभिप्राय पडले होते. त्यांची आपल्या मनाप्रमाणें एकवाक्यता व्हावी याकरितां नानांनीं शिंद्यांशीं पत्रव्यवहार करण्यांत सहा महिने घालविले.

या टाळाटाळीच्या वर्तनांत नाना फडनवीस यांस आणखीही एक फार महत्वाचा मुद्दा साधावयाचा होता. सालबाईच्या तहांत एक कलम असें होतें कीं, हैदरअल्लीनें इंग्रजांचा मुलूख घेतला आहे तो सोडून देण्याविषयीं मराठ्यांनीं त्यास सांगावें. तो त्यांचा मांडलिक असल्यामुळें तो हें म्हणणें मान्य करीलच. न करील तर मराठे व इंग्रज यांनीं एक होऊन त्यास इंग्रजांचा मुलूख परत देणें भाग पाडावें. आपण व हैदर एक झालों आणि हैदरानें मद्रासप्रांतीं इंग्रजांस बेजार केलें; यामुळेंच ते तहाला उत्सुक होऊन हैदराची व आपली जूट फोडूं पहात आहेत हें नानांस पक्कें कळलें होते. यामुळें ते इंग्रजांशीं बोलतांना असा रोंख दाखवीत कीं, हैदराची व आमची कायमची दोस्ती झालेली आहे; तेव्हां त्याला सोडून आम्ही तुम्हांशीं एकस्यानीं तह कसा करावा ? तथापि साष्टी व दादासाहेब यासंबंधें आमचें म्हणणें तुम्ही मान्य करीत असाल तर आम्ही तह करूं. नाहीं तर आह्मीं तह करीत नाहीं व हैदराची दोस्ती सोडीत नाहीं. इकडे हैदराशीं बोलतांना ते असा रोंख दाखवीत कीं, शिंद्यांच्या विद्यमानें इंग्रजांशीं तह ठरला आहे तो आम्हाला नाकबूल करतां येत नाहीं. तिगस्ता कृष्णा व तुंगभद्रा यामधला धारवाड, बदामी वगैरे मुलूख आम्ही तुम्हांस दिला आहे तो परत देत असाल तर मात्र आम्ही इंग्रजांशीं तह कबूल करणार नाहीं ! याप्रमाणें एकाला एक आणि दुसऱ्याला दुसरेंच सांगून दोघांसही अडचणींत पाडून दोघांकडूनही आपलें म्हणणें मान्य करवावें, असें हें नानांचें कारस्थान होतें. कारण मराठ्यांच्या मैत्रीची हैदर व इंग्रज या दोघांसही जरूर होती. अशा स्थितींत हें तहाचें घोंगडें बरेंच दिवस भिजत पडलें असतां ता. ७ दिसेंबर स. १७८२ या दिवशीं हैदरअल्ली मृत्यु पावला. ही बातमी नानांस समजतांच आतां या पुढें आढेवेढे घेण्यापासून कांहीं निष्पन्न होण्याजोगें नाहीं असें जाणून ता. २४ फेब्रु. १७८३ रोजीं नानांनीं तहाच्या कागदावर पेशव्यांकडून मखलाशी करून शिक्के मोर्तब करून तो

कागद इंग्रजांच्या हवालीं केला.

सालवाईचा तह झाल्यावर श्री. दादासाहेब हे सुरतेहून निघाले आणि गोदावरीतिरीं कोपरगांव येथें जाऊन राहिले. तेथें त्यांची प्रकृति बिघडत

११ दिसें. १७८३ जाऊन त्या दुखण्यांतच त्यांचा अंत झाला. त्यांनीं एकंदर तीन लग्नें केलीं होतीं. त्यापैकीं पहिली व तिसरी या त्यांच्या स्त्रिया मूलबाळ न होतां लहानपणींच वारल्या. त्यांची मधली स्त्री आनंदीबाई ही इतिहासप्रसिद्धच आहे! दादांना बरेच दिवस मूल झालें नाहीं, सबब त्यांनीं भुसकुटे घराण्यांतील एक मुलगा दत्तक घेतला आणि त्याचें नांव अमृतराव असें ठेवलें. नंतर त्यांना दोन औरस मुलगे झाले. त्यापैकीं थोरल्याचें नांव बाजीराव आणि धाकट्याचें नांव चिमाजी आपा. त्यांना एक मुलगी होती ती पांडुरंगराव बारामतीकर यांस दिलेली होती. नानांच्या कारकीर्दीच्या प्रारंभीं श्री. दादासाहेब यांजकडून त्यांना किती त्रास झाला याचें वर्णन आतांपर्यंत करण्यांत आलें आहे. त्यांच्या कारकीर्दीच्या शेवटीं श्री. दादासाहेबांच्या चिरंजीवांनीं त्यांची कशी दुर्दशा केली हेंही पुढें यथाप्रसगीं सांगण्यांत येईल.

मराठे व इंग्रज यांमध्यें तह होऊन जमिनीवर युद्ध बंद झालें; तरी दर्यावर त्या उभयतांचें युद्ध पुढें कांहीं कालपर्यंत चालूच राहिलें. इंग्रजांची तीन व्यापारी व एक लढाऊ अशीं चार जहाजें मलबाराकडे जात असतां वाटेंत त्यांची व आनंदराव धुळप यांच्या आरमाराची गांठ पडून लढाई झाली. त्या लढाईत धुळपानें तीं चारीं जहाजें व त्यावरचे तिघे सरदार व चारपांचशें माणूस कैद करून विजयदुर्गास नेलें. तह झाला असतां शत्रूकडून ही आगळीक घडून आल्यामुळें इंग्रजांस अतिशय राग आला आणि त्यांनीं नानांकडे तकरार केली. तह झाल्याची बातमी धुळपास न समजल्यामुळें ही गोष्ट घडून आली असें इंग्रजांस सांगून नानांनीं त्यांची समजुत काढली आणि मालमत्ता व कैदेंत पडलेलीं माणसें यांसुद्धां तीं चारी जहाजें धुळपाकडून परत देवविलीं. मग इंग्रजांनींही साष्टीखेरीज वसई, अहमदाबाद व इतर सर्व घेतलेलीं ठाणीं पुणें दरबारच्या हवालीं केलीं.

# प्रकरण नववें.

## गंगाबाई व सवाई रावसाहेब पेशवे.

नारायणराव पेशव्यांचा खून झाला तेव्हां गंगाबाई दीड महिन्याची गरोदर होती. पेशव्यांच्या घराण्यापैकीं दुसऱ्या चार पांच विधवा होत्या त्याप्रमाणेंच गंगाबाई ही शनवार वाड्याच्या एखाद्या कोंपऱ्यांत पडून रहावयाची, परंतु बारभाईंच्या कारस्थानामुळें तिला अतिशय महत्व प्राप्त झालें. सवाई माधवराव यांच्या जन्मापूर्वी तीन चार महिने या बाईच्याच नांवानें सर्व राज्यकारभार चालला होता. ही बाई अतिशय धोरणी आणि समंजस होती त्यामुळेंच आनंदीबाईच्या तावडींतून तिचा गर्भ सुरक्षित राहिला. पेशव्यांच्या लहानपणीं शत्रूंच्या मारेकऱ्यांपासून त्यांचा वेळोवेळीं बचाव होत गेला याचें कारण या बाईचा दक्षपणा हेंच होय. राज्यकारभाराचीं गुप्त खलबतें होत तेव्हां गंगाबाई हजर रहात असे आणि प्रत्येक महत्वाच्या कामीं कारभारी तिची अनुमति घेत असत. स. १७७७ च्या जुलै महिन्यांत या बाईला नवज्वराच्या विकारानें देवाज्ञा झाली.[1]

डफ साहेबांनीं आपल्या इतिहासांत गंगाबाई व नाना फडनवीस यांवर एका नीच दोषाचा आरोप केला आहे. ते लिहितात—"[2]नाना फडनवीसांनीं ज्या एका गोष्टीचा आपल्या महत्वाकांक्षेस उपयोग करून घेतला होता, ती गोष्ट पुष्कळांस माहित नव्हती. ती हीच कीं, गंगाबाईचें मन नानांनीं स्वाधीन करून घेतलें होतें. ती तरुण विधवा नानाविषयीं फारच आतुर झाली होती, हें एक त्यावेळचें अत्यंत गूढ रहस्य होतें. त्या थेरड्या कारभाऱ्यास [ सखारामबापूस ] बळविण्यास उत्तम उपाय कोणते हें नानांनींच गंगाबाईस शिकविलें होतें." "गंगाबाईस तिच्याच

---

१ पेंढशांचें टिप्पण आणि ऐ. ले. सं. नं. २१४१. २ या चरित्राची आ. दुसरी पृ. १०६.

झालें मृत्यू आला, या गोष्टीच्या खरेपणाविषयीं त्यावेळच्या मुंबईच्या गव्ह-र्नरानें कांहींशी शंका प्रदर्शित केली आहे. पण ती गोष्ट अगदीं खरी होती. गंगाबाईनें नाना फडनवीसाशीं जारकर्म केलें व त्याचा परिणाम [गर्भ] लपवावा म्हणून तिनें औषध घेतलें होतें. त्या औषधापासून तिला मृत्यु आला." गंगाबाईला गर्भपाताच्या औषधापासून मृत्यु आला असें त्यावेळचा मुंबईचा गव्हर्नर भीत भीत तरी म्हणत होता, पण डफसाहेबानीं ती गोष्ट अगदीं खरी करून टाकली एवढेंच नव्हे, तर त्या आधारावर एक अद्भुत कादंबरीही रचली ! एकूण डफसाहेबांच्या मतें नाना फडन-वीस हा धनिनीशीं जारकर्म करणारा इतकेंच नव्हे, तर आपल्या स्वार्था-साठीं तिला दुसऱ्यांशीं जारकर्म करण्यास लावणारा असा कृतघ्न आणि नीच मनुष्य होता, सखारामबापू हा कामवासनेनें चुळावलेला भ्रष्ट म्हातारा होता, आणि गंगाबाई ही एक उल्लु झालेली निर्लज्ज अवदसा होती ! शिव शिव !!

मेजर म्याकडोनेल्ड यानें तर डफसाहेबांवर ताण केली आहे. तो म्हणतो कीं, " नाना व धाकटे माधवराव पेशवे यांच्या तसबिरी आहेत त्या तसबिरीमध्यें दोघांची अगदीं साम्यता आहे, ही गोष्ट मोठी चम-त्कारिक आहे; नाना गंगाबाईशीं आसक्त होते असें जें लौकिकांत प्रसिद्ध आहे त्यास हें सबळ कारण आहे. " एकूण या हडेलहप्पांच्या मतें नारा-यणराव जिवंत असतांच नानांनीं गंगाबाईशीं सूत जमविलें होतें ! चेहरा किंवा इतर अंगलट यांच्या सादृश्यावरून एखाद्याच्या आईबापांचा निर्णय करणें हें अत्यंत भ्रामक आणि धाडसाचें आहे. या पद्धतीचा स्वीकार केला तर कोण प्राणी कुणाच्या पितृस्थानीं येऊन बसेल याचा कांहींच नेम सांग-वत नाहीं ! तथापि वादासाठीं ही पद्धति गृहीत धरली तरीसुद्धां मेजर म्याकडोनेल्ड यांचें विधान टिकण्यासारखें नाहीं. इंग्रजाचा रेसिडेंट सर चार्लस म्यालेट यानें सवाई रावसाहेब व नाना फडनवीस यांच्या तसबिरी काढविल्या आहेत, त्या अस्सल प्रती भेणवली येथें असून त्यांच्या नकला पुण्याच्या कौन्सिलहालांत आहेत. या तसबिरी कोणालाही पहातां येण्या-

१ मेजर म्याकडोनेल्ड यांची ' नानांची बखर ' पृ० ३३.

जोग्या आहेत. माणसा माणसांच्या चेहऱ्यांत जें साम्य असावयाचें, त्यापेक्षां अधिक साम्य या दोन तसबिरींत आम्हांस तर कोठें दिसलें नाहीं !

पेशव्यांच्या घरांतील स्त्रियांविषयीं आपली किती पूज्यबुद्धि आहे हें नानांनींच प्रसंगवशात् ऐके ठिकाणीं लिहून ठेविलें आहे. या चरित्राच्या दुसऱ्या प्रकरणांत सांगितलेली कायगांव टोकें येथील थोरल्या बाजीरावांच्या श्राद्धाच्या दिवशीच्या भोजनाची हकीगत वाचकांच्या स्मरणांतून गेली नसेलच. तेथें नानांनीं लिहिलें आहे कीं,— " श्राद्धाचे ब्राह्मण यांचीं भोजनें जाहलियावर खासा भोजनास बसले. एकीकडे श्री० माधवराव व एकीकडे मला बसविलें, आणि दुसरे स्त्रीकडून वाढविलें. तिला वाढण्याची शिक्षा दाखविली. अर्थात् मातुश्रीकडून लेंकरास वाढविलें."

इंग्रज इतिहासकारांच्या या विधानांना मराठी आणि मुसलमानी ग्रंथांतून कोठेंच आधार सांपडत नाहीं. इंग्रजांनीं दादासाहेबांचा पक्ष स्वीकारला होता त्यामुळें दादांना विरोध करणारे हे सर्व लुच्चे, हलकट, आणि बदमाष आहेत हें सिद्ध करण्याकरितां त्यांनीं त्यावेळीं नाना प्रकारच्या कंड्या उठविल्या. " गोपिकाबाईनें दादासाहेबांचा व सखारामबापूंचा खून करविण्याचा यत्न केला होता. " " सवाई माधवराव हा मुळीं गंगाबाईचा मुलगाच नव्हे, " " सखारामबापू अक्षरशत्रू होता, त्यास लिहितां वाचतां देखील येत नव्हतें, " या इंग्रजांनीं उडविलेल्या कंड्या बऱ्याच मनोरंजक आहेत. गंगाबाईविषयीं त्यांनीं कंडी उठविली ती मात्र सर्वांत ' अपूर्वविशेष ' आहे खरी. कारण तींत दुष्टपणाचा कळस झाला असून शिवाय बीभत्सरसाचा परिपाकही पूर्ण उतरला आहे !

त्या काळचे लोक अतिशय भाविक होते. सवाई माधवराव हा दुष्टांच्या शासनाकरितां प्रत्यक्ष परमेश्वरच भूलोकीं अवतरला आहे असा त्यावेळीं सार्वत्रिक समज होता ! श्रीमंतांच्या पुण्यप्रभावामुळें गर्भपाताचीं औषधें निरुपयोगी ठरलीं, मारेकऱ्यांच्या तरवारी बोथट झाल्या, देशांत अनेक बंडें व दंगे उद्भवले परंतु त्या सर्वांचा बीमोड झाला, इंग्रजांसारखे दुर्जय

१ Selections from State papers Bombay. P. P. 251, 253, 254, 257.

शत्रूही हतवीर्य झाले या गोष्टीमुळें लोकांना श्रीमंतांच्या जन्माचें कृष्णावताराशीं साम्य दिसूं लागले! या ' अवतार ' कल्पनेमुळें नानांना मोठेंच नैतिक पाठबळ मिळालें असेल यांत शंका नाहीं. लोकांची ही भावना आणि श्रीमंतांचा स्वभाव, शिक्षण वगैरेविषयीं तत्कालीन पत्रव्यवहारांत जागोजाग उल्लेख आढळतात त्यापैकीं काहीं येथें उतरून घेतों.

" डेऱ्यांत सरकारच्या भेटी जाहल्या. श्रीमंतांनीं आपलें हातें सर्वांस विडे दिले. मुजरा सर्वत्रांचा घेतला. ब्राह्मण मंडळीस नमस्कार करा म्हटलें म्हणजे नमस्कार करावा. एक प्रहर पावेतों मोठी दाटी जाहली. सर्वांस पहावें अशी आस्था. याकरितां पंढरपुराप्रमाणें दाटी असतां मधीं उठावें व मातोश्रीकडे जावें हें नाहीं. एक आसनीं प्रहरपावेतों बसले होते. अवतारी होत ! अंतर्ज्ञान ! "[1]

वाचकानीं हें ध्यानांत घ्यावें कीं, ही सर्व वागणूक अवघ्या दोन वर्षांच्या मुलाची आहे !

" चार घटका श्रीमंत डेऱ्यास बसून मुजरा लोकांचा घेऊन विडे दिले. धनियाचे पाय पाहिले. आनंद जाहला तो कोठवर लिहावा ! लोक कसाला सोसून आले, श्रीमंतांस पाहून बहुत संतोष जाहला. श्रीमंतांची बसावयाची व बोलावयाची व देखणेपणाची तारीफ काय लिहावी ? अति उत्तम आहे ! श्रीमंतांची बाल-लीला काय लिहावी ! केवळ ईश्वरस्वरूपी आहेत ! "[2]

" ( श्रीमंत दरबारांत ) दोन तीन घटका बसले होते. तेथें तीर कमान आणविली. होळकर व सर्वत्रांस म्हणूं लागले, ' आमची तिरंदाजी पहा.' दहा बारा बोथाटीचे तीर हशमनिशीचे दप्तरचे भिंतीस मारिले. सर्वत्रांस आश्चर्य दाखविलें. उपरांत आपले पुस्तीचे अक्षरा बंद लिहिले होते ते आणून दाखविले......श्रीमंत दादांस म्हणूं लागले कीं, ' आम्ही कारंज्याची चादर दाखवूं मग निरोप देऊं.' इतक्यांत भोजनही केलें. दुसरा पोषाख पांढरा केला. तसेंच दिवाणखान्यांत

१ ऐ. ले. सं. नं. १८५३. २ ऐ. ले. सं. नं. २३६०. ३ ऐ. ले. सं. नं. २५७६.

आरसेमहालांत गेले......कारंज्याची चादर सोडविली ते पावसापेक्षां अधिक तमासा दाखविली ! केशरी रंग आणून सर्वत्रांचे अंगावर घातला. आपले अंगावर विपुल रंग वारंवार घाला म्हणून सांगून घालविला. गवईही आणविले. गाणें दोन घटका जालें."

"श्रीमंत रावसाहेब लग्न जाल्यानंतर नऊ वर्षांचे झाले. तेव्हां श्रीमंताच्या मनांत आलें कीं नानातऱ्हेचे खेळ खेळावे, शिकारखाने बाळगावे, असा मजकूर जवळच्या मंडळीनें नानांच्या कानावर घातला. त्याजबरोबर नानांनीं तऱ्हेतऱ्हेचीं श्वापदें व पक्षी मिळविले. सात आठ मैना बंगाली बोलणाऱ्या, तसेच बोलणारे पोपट, यांचे पिंजरे चांगले मिळविले. तसेंच चंडोल पक्षी यांचे पिंजरे सात आठ आणिले. तशींच बदकें पाणकोंबडी, मोरांच्या जोड्या दहा पांच आणून ठेविल्या. तशींच हरणें शेदोनशें, काळवीटसुद्धां वाड्यांत आणून ठेविलीं. चित्ते दोन चार आणून बांधिले. पांच सातशें ससे काळे, पिवळे, अबलक असे पर्वतीच्या वाटेवर बागेंत तळ्याचे काठीं खोली बांधून तींत ठेविले.... तसेंच दहा वीस वाघ पर्वतीवर मोठा सोपा बांधोन त्यामध्यें साखळदंडानें बांधून ठेविले.... गेंडे हिंदुस्थानांतून महादजी शिंद्यांनीं पाठविले. दहा वीस जोड्या एडक्यांच्या ठेविल्या. पहिलवान कुस्त्या घेणारे सरकारांत चाकर ठेविले. तसेंच वज्रमुष्टी यांच्या जोड्या सरकारांत पांच सात चाकरीस ठेविल्या. छडी खेळणेवाले व दांड खेळणेवाले असे नेहमीं हुजूर ठेविले. तिरंदाजी खेळणारेहि असामी दोन चार श्रीमंतापाशीं हुजूर ठेविले. तिरंदाजी व दांडछडी यांचा अभ्यास थोडा श्रीमंतांनीं केला. संध्याकाळीं तालीमखान्यामध्यें सरकारची स्वारी जाऊन तोही अभ्यास थोडा करी. मुद्गल पेलणें व लेजीम खेळणें खेळे ...... घोडीं फिरविणें व बोथाट्या खेळणें हाही अभ्यास श्रीमंतांनीं केला. हत्तीवर हत्तीच्या किलव्यांत बसून हत्ती चालविणें हाही अभ्यास श्रीमंतांनीं केला."

स. १७७९ च्या मे महिन्यांत श्री. सवाई रावसाहेब यांची मुंज झाली.

---

१ पेशव्यांचे खेळ व बोलणारे पक्षी यांसंबंधें थोडी बहुत माहिती सवाई माधवराव पेजनिशी पृ. ११७-११८ यावर आहे. २ पेशव्यांची बखर.

स. १७८३ च्या फेब्रु. महिन्यांत त्यांचें लग्न झालें. या पहिल्या स्त्रीचें नांव रमाबाई असें होतें. ही स्त्री वारल्यावर स. १७९३ च्या मार्च महिन्यांत त्याचें दुसरें लग्न झालें. या दुसऱ्या स्त्रीचें नांव यशोदाबाई असें होतें. या सर्व कार्यांत शिंदे होळकरांसुद्धां राज्यांतले तमाम सरदार हजर होते. नानांनीं लक्षावधि रुपये खर्चून हीं सर्व कार्यें अत्यंत थाटानें केलीं. श्रीमंतांच्या लग्नांच्या बखरी उपलब्ध आहेत त्यांवरून नानांनीं या समारंभाप्रीत्यर्थ ठेवलेली व्यवस्था व टापटीप आणि त्या समारंभाचा टोलेजंगपणा या गोष्टी उत्कृष्टपणें समजून येतात. पटवर्धनांसारखे सत्तावीस लक्षांचे जहागीरदार या कार्यामधून पाणी भरण्याच्या कामावर होते !

पेशव्यांस बोधप्रद, मनोरंजक व पौराणिक गोष्टी वाचावयास सांपडाव्या व त्यांस मोडी वाचण्याचाही सराव व्हावा, म्हणून नानांनीं बापूजी गोविंद गोखले नांवाच्या व्युत्पन्न गृहस्थ कडून मुद्दाम भारत व भागवत यांच्या सारांशरूपानें मराठींत बखरी[1] लिहविल्या व वेताळपंचविशी व शुकबहात्तरी प्रमाणें 'सारिकाशतक' नांवाचा चमत्कारिक गोष्टींचा ग्रंथ रचविला. पेशवे हळू हळू वयांत येऊं लागले तसतसे त्यांस नाना दररोज सायंकाळीं चार घटका दरबारांत घेऊन बसूं लागले. त्या ठिकाणीं परराज्यांतील वकील येऊन आपापल्या सरकारच्या तर्फें विनंती करीत, व त्यांस नाना पेशव्यांकडून यथोचित उत्तरें देववीत. दरबारांत जीं जीं कामें होत तीं तीं पेशव्यांच्या नजरेखालून जात असत. कांहीं महत्वाच्या मसलतीबद्दल मुत्सद्दी व सरदार लोकांचीं खलबतें चालत त्यावेळीं श्रीमंत हजर रहात. श्रीमंतांची समजूत वयाचे मानानें अत्यंत प्रौढ होती आणि त्यांची बुद्धि तरतरीत असून ग्रहणशक्तीही जबर होती, त्यामुळें नानांना केवढी कृतकृत्यता वाटली असेल !

---

१ या बखरी कांहीं वर्षांपूर्वी मेणवलीस होत्या. तेथून त्या कोणी नेल्या हें कळत नाहीं. त्या ज्यांनीं पाहिल्या आहेत अशांपैकीं एका गृहस्थानें आम्हांस असें सांगितलें आहे कीं, या बखरींत मधून मधून पांच पांच दहा दहा ओळी मजकूर नानांनीं स्वतः लिहिला आहे. 'सारिकाशतक मात्र अजून तेथें आहे. भागवताच्या बखरींत घालण्याकरितां त्या ग्रंथांतले श्लोक निवडून त्यांची नानांनीं स्वदस्तुरची याद तयार केली ती ऐ. ले. सं. नं. २६५३ यांत छापली आहे.

# प्रकरण दहावें.

## टिपूचें पारिपत्य.

१ पहिली मोहीम ( स. १७८४ एप्रिल ते १७८७ एप्रिल ).
२ दुसरी मोहीम,( स. १७९० जाने. ते १७९२ फेब्रु. ).
३ किरकोळ राज्यकारभार. ४ घाशीराम प्रकरण.
( स. १७८४ एप्रिल-स. १७९२ जून. )

स. १७७४ सालीं नानांनीं बारभाईंच्या कारस्थानाला सुरवात केली. या कारस्थानामुळें इंग्रज, निजाम व हैदर यांनीं निरनिराळ्या मिषानें मराठी राज्याचे लचके कसे तोडले, चोहोंकडे दंगे व बंडें कशीं उद्भवलीं, आपापसांत द्वेष, फितूर आणि विश्वासघात कसे माजले आणि इतक्याही संकटांना न जुमानतां नानांनीं त्यांचा वेळोवेळ परिहार कसा केला याचें वर्णन आतांपर्यंत करण्यांत आलें आहे. सुरवातीच्या वेळचे त्यांचे बहुतेक सोबती मेले, गळाले किंवा फितुरांत सांपडून कैदेंत पडले आणि प्रतिज्ञात कार्यावर अढळ दृष्टि अशी फक्त नानांचीच तेवढी राहूं शकली. आतांपर्यंत त्यांचें एकच धोरण होतें. तें धोरण म्हणजे सर्वस्व भरीला घालावें परंतु दादांचें पुरतें पारिपत्य करावें आणि मराठी राज्यांत इंग्रजांचे पाय शिरुं देऊं नयेत' हेंच होय. सालबाईच्या तहानें हे त्याचे दोनी हेतु परिपूर्ण झाले. या अवधींत मैत्रीचा आव आणून निजामानें मराठ्यांकडून तीस लक्षांची जहागीर उपटली आणि हैदरानें तरवारीचें भय दाखवून-पन्नास साठ लक्षांचा मराठी मुलूख हाताखालीं घातला हें पूर्वीं सांगितलेंच आहे. हा गमावलेला मुलूख पुनः कमावण्याचा नानांनीं कसकसा उद्योग केला हेंच आता सांगावयाचें.

सालबाईच्या तहांत एक कलम अशा स्वरूपाचें होतें-' हैदरानें इंग्रज व अर्काटकर नबाब यांचा मुलूख घेतला आहे तो सोडून देण्याविषयीं मराठ्यानीं त्यास सांगावें. तो त्यांचा मांडलीक असल्यामुळें हें बोलणं मान्य करीलच. न करील तर मराठे, मोंगल व इंग्रज यांनीं एकत्र

होऊन त्यावर स्वारी करावी आणि त्यास तसें करण्यास भाग पाडावें.' हैदरासंबंधींचें हें कलम त्याचा मुलगा टिपू सुलतान यासही लागू होतें. दक्षिणहिंदुस्थानांत त्यावेळीं पेशवे, निजाम, म्हैसूरकर व इंग्रज अशीं चार प्रमुख सरकारें होतीं. गेल्या दहा पंधरा वर्षांत म्हैसूरकरांचें सामर्थ्य अतिशय वाढलें आणि सर्वांमध्यें जबरदस्तपणाचा मान पटकावून त्यांनीं बाकीच्या सरकारांचा बराचसा मुलुख काबीज केला. म्हैसूरकरांच्या तावडींतून आपापला मुलूख सोडवून घ्यावा आणि त्या सरकाराला कमजोर करावें याच हेतूनें सालबाईच्या तहाच्या निमित्तानें मराठे, मोंगल व इंग्रज हें त्रिकूट एकसूत्र झालें होतें. परंतु टिपूनें सालबाईच्या तहाचा हा सर्वच डाव उधळून लाविला! हा तह ठरल्यावर इंग्रजांशीं चालू असलेली लढाई बंद ठेवून त्यांचा घेतलेला मुलूख परत देण्याविषयीं नाना व शिंदे यांनीं टिपूकडे तगादा बसविला. पुणें दरबारच्या या म्हणण्याकडे दुर्लक्ष करून टिपूनें एक लक्ष फौज बरोबर घेऊन मद्रास व मलबार येथील इंग्रजी मुलखावर स्वारी करून तो प्रांत जाळून लुटून फस्त केला आणि एक दोन लढायांत इंग्रजी फौजेचा धुव्वा उडवून दोन तीन हजार इंग्रज कैदेंत घातले! म्हैसुरच्या वाघाचा हा रुद्रावतार पाहून मद्रासकर इंग्रज भयभीत झाले आणि टिपूची मनधरणी करून त्यांनीं त्याशीं आपल्यापुरता स्वतंत्र तह करून घेतला. याप्रमाणें 'सालबाई' च्या त्रिकूटापैकीं टिपूनें इंग्रजांना फोडून त्यांची अशी दुर्दशा केली!

इंग्रजांनीं याप्रमाणें हातपाय गाळल्यामुळें टिपूच्या मसलतीचा सर्व भार मराठे व मोंगल यांवरच पडला. पुणें दरबार व मोंगली दरबार यांमध्यें हिशेबासंबंधीं अनेक लढे उत्पन्न झाले होते. टिपूची मसलत व हे हिशेबाचे लढे यांची समक्ष चर्चा करण्याकरितां नाना व निजाम यांची कृष्णा-भीमेच्या संगमावर यादगीर

स. १७८४ एप्रिल

येथें मोठ्या समारंभानें भेट झाली. नानांबरोबर हरीपंत फडके, तुकोजी होळकर, परशुरामभाऊ पटवर्धन वगैरे सरदार व मुत्सद्दी असून शिवाय पंधरा वीस हजार फौजही होती. तिकडून निजामही अशाच समारंभानें आला होता. या भेटींत बरीच खलबतें होऊन पुढील गोष्टी उभयपक्षीं

मान्य करण्यांत आल्या- (१) निजामाकडे चौथसरदेशमुखीची बाकी बरेच वर्षांची तुंबली होती. त्या बाकीपैकीं दोन वर्षांची रक्कम निजामानें रोखीनें तत्काळ पेशव्यांस द्यावी. त्या पूर्वीच्या हिशेबांत थोडेबहुत लढे होते, सबब त्याची आकारणी स्वस्थपणानें मागील दाखले पाहून करावी. जेथें शंका येईल तेथें माधवराव बल्लाळ पेशवे किंवा निजामुल्मुल्ख यांच्या वेळची वहिवाट पहावी. ही वहिवाट उभय पक्षांनीं मान्य करावी. (२) निजामाच्या राज्यांत मराठ्यांचीं ठाणीं होतीं तीं अलीकडे निजामानें उठवून लावलीं होतीं. निजामानें तीं ठाणीं पुनः मराठ्यांच्या स्वाधीन करावीं. (३) मराठे व मोंगल या दोघांनीं मिळून टिपूवर स्वारी करावी. टिपूकडून खंडणी व मुलूख मिळेल त्याचे तीन समसमान हिस्से करावे. एक हिस्सा निजामाचा, एक हिस्सा पेशव्यांचा, व एक हिस्सा शिंदे होळकरांचा. या तीन कलमांपैकीं शेवटचें कलमच अत्यंत महत्वाचें होतें आणि त्यासाठींच नानांनीं हा भेटीचा समारंभ घडवून आणला होता. मराठे व मोंगल यांची तूर्त तयारी नसल्यामुळें टिपूवरची ही मोहीम पुढील वर्षावर तहकूब राहिली.

ही यादगिरीची भेट म्हणजे टिपूला एक प्रकारचा इशाराच होता. परंतु नाना व निजाम यानीं कोणत्याही मसलती ठरविल्या तरी त्यांना टिपू थोडाच भीक घालीत होता! या यादगिरीच्या भेटीला टिपूनें आपल्या तर्फेचें उत्तर रोख ठोक देऊन ठेविलें. परंतु तें सरळ न देतां खेकड्याच्या चाली प्रमाणें वांकडेंतिकडें दिलें एवढाच फरक ! त्यानें खंडणीचा ठराव करून समेट करण्याकरितां पाहिल्यानें नानांकडे वकील पाठविला आणि नंतर

सन १७८५ जाने.-जून } मागून लवकरच नरगुंद संस्थानावर पंचवीस हजार फौजही पाठविली! या फौजेवर टिपूचा मेहुणा बुराणुद्दीन हा सरदार होता. टिपूच्या फौजेनें नरगुंदास वेढा घातला तो पांच सहा महिने चालू होता. नरगुंदकरांचा कारभारी काळो बहिरव पेठे हा मराठी राज्याचा कट्टा अभिमानी आणि टिपूचा कट्टा द्वेष्टा होता. तो टिपूकडील बित्तंबातमी पेशव्यांस वारंवार कळवीत असे. हें नरगुंदचें संस्थान बुडवून खालसा करावें असा टिपूचा निश्चय ठरला होता. टिपूच्या

फौजेनें नरगुंदावर वारंवार हल्ले केले परंतु काळोपंतानें प्रत्येक खेपेस शत्रूचे शेकडो लोक ठार करून ते हल्ले परतवून लाविले. मार्च महिन्यांत परशुरामभाऊ पटवर्धन व गणेशपंत बेहरे हे पेशवे सरकारची वीस हजार फौज घेऊन नरगुंदच्या रक्षणाकरितां धांवून आले. परंतु या मदतीचा काळोपंतास विशेषसा उपयोग होऊं शकला नाहीं. पेशवाई फौज जवळ येतांच टिपूची फौज वेढा उठवून मागें सरकली आणि जवळच बेणिहाळ नांवाच्या ओढ्यावर तळ देऊन राहिली. महिना पंधरा दिवसांत या फौजेला पट्टणाहून आणखी दहा हजार फौजेची कुमक येऊन मिळाली. ही कुमक सामील होतांच बुराणुद्दीन यानें परशुरामभाऊंवर बेजरब चालून घेतलें; परंतु भाऊ लढाई न देतां नानांच्या हुकमावरून शत्रूसमोर व्यवस्थित पीछेहाट करूं लागले ! भाऊ पिछेहाट करीत कृष्णातीरपर्यंत येतात तों तिकडे टिपूच्या फौजेनें नरगुंद घेतलें ! नंतर काळोपंत पेठे व त्यांचे यजमान व्यंकटराव भावे व त्या उभयतांचीं मुलेंमाणसें या सर्वांच्या पायांत बिड्या पडून त्यांची रवानगी श्रीरंगपट्टणास करण्यांत आली. काळोपंताची लग्न झालेली एक सुंदर मुलगी होती तिला टिपूनें आपल्या जनानखान्यांत खेंचलें !

या नरगुंद प्रकरणांत परशुरामभाऊ व नाना फडनवीस यांमध्यें मोठाच मतभेद उत्पन्न झाला. नानांच्या सांगण्यावरून भाऊ व बेहरे वीस हजार फौजेनिशीं नरगुंदच्या रक्षणाकरितां गेले. परंतु लढाईच्या ऐन प्रसंगीं नानांच्या हुकमावरून त्यांना पीछेहाट करावी लागली, हें पूर्वीं सांगितलेंच आहे. याबंधें नानांचें म्हणणें पडलें कीं, ' टिपूशीं युद्ध सुरू करण्याची पेशवे व निजाम या दोनी सरकारांची तूर्त तयारी नाहीं. टिपूचें सामर्थ्य मोठें आहे. त्यांशी युद्ध सुरू करावयाचें तें बहुत तरतुदीनें आणि मोठ्या तयारीनेंच केलें पाहिजे. नरगुंदचा बचाव जरूर केलाच पाहिजे. परंतु त्या कामीं होतां होईतों युद्धापर्यंत मजल आणूं नये. फौजेचा बागुलबावा दाखवून जेवढें काम होईल तेवढेंच करावें. शत्रूची फौज चालून आली तरी सुद्धां मराठी फौजेनें पीछेहाट करावी, परंतु युद्धप्रसंग करूं नये. टिपूचा वकील तह ठरविण्याकरितां पुण्यास आला आहे. अशा वेळीं एखाद्या मारा-

मारीची कागाळी त्याच्या कानीं पडेल तर तो तत्काळ बिथरून बसेल आणि तहाला हिसका बसेल! उलटपक्षीं भाऊंचें म्हणणें पडलें कीं, 'टिपूला कारभारी इतके कां भितात? मराठी राज्याच्या सामर्थ्यापुढें त्याचा काय पाड आहे! तूर्त आम्हांजवळ वीस हजार फौज जमली आहे. निजामाचीही दहा पंधरा हजार फौज कायमुल्मुल्ख या सरदाराबरोबर विजापूरप्रांतांत आली आहे. ती फौज इकडे आणवून घ्यावी आणि शत्रूशीं बेजरब लढाई द्यावी. लढाईंत शत्रूचा रेंच मोडल्याशिवाय त्याची गुर्मी जिरावयाची नाहीं.' टिपूच्या सामर्थ्याबद्दलचा भाऊंचा अजमास चुकीचा होता आणि नानांचाच बरोबर होता. नरगुंद प्रकरणापुरताच विचार केला तर 'लढाईंत शत्रूचा रेंच मोडल्याशिवाय त्याची गुर्मी जिरावयाची नाहीं' हें भाऊंचें म्हणणें सर्वस्वीं बरोबर होतें. नरगुंदप्रकरणीं नानांनीं थोडासा नेट दाखविला असता तर नरगुंदचा बचाव होण्याचा बराच संभव होता. परंतु तसें न करितां त्यानीं टिपूच्या वकिलाच्या नादीं लागून घरसोडीचें आणि पीछेहाटीचें धोरण स्वीकारलें त्यामुळें भाऊंना मानभंग सहन करावा लागला आणि नरगुंदकरांचा सर्वस्वीं नाश होऊन त्या अपेशाचें खापर नानांच्या माथीं फुटलें!

यानंतर टिपूनें कित्तूर संस्थानही बुडविलें आणि दोडवाड, खानापूर वगैरे मराठ्यांचीं नामांकित ठाणीं काबीज केलीं. बेळगांवच्या किल्ल्याखेरीज त्या प्रांतांतला सर्व मराठी मुलूख आतां टिपूच्या ताब्यांत गेला. हा दंगा असाच वाढूं दिला तर शत्रूच्या अघाडीची फौज कृष्णातीराकडे वळून मिरजप्रांतांतही उपद्रव सुरू करणार असा रंग दिसूं लागला. इतकें होईतों स. १७८५ सालचा दिसेंबर महिना संपत आला.

इकडे पुण्यास टिपूच्या पारिपत्याची तजवीजही मोठ्या प्रमाणावर चालू होती. होळकर, पटवर्धन, रास्ते वगैरे सरदारांस फौजा तयार करण्याविषयी नानांचे हुकूम सुटले होते आणि त्याप्रमाणें सर्व महाराष्ट्रभर ठिकठिकाणीं फौज जमा होत होती. गणेशपंत बेहरे हे दहा हजार फौजेनिशीं नानांच्या हुकमावरून यापूर्वीच कृष्णातीरावर तळ देऊन राहिले होते. इंग्रजांच्या लढाईंत नागपूरकर भोसल्यांनीं अंगचोरपणा केला

होता आणि त्यामुळें नानांचा त्यांवर राग झाला होता. नानांचा हा राग शांत करण्याकरितां मुधोजी भोसल्यांनीं या टिपूवरच्या स्वारींत पंधरा हजार फौज पाठविण्याचें कबूल केलें. अघाडीच्या दहा हजार फौजेची टोळी

स. १७८६ जाने. फेब्रु. } घेऊन हरीपंत फडके व तुकोजी होळकर पंढरपुरावरून विजापुराकडे निघाले. त्यांच्या पाठोपाठ लवकरच खुद्द नाना फडनवीसही मुख्य फौज बरोबर घेऊन त्याच मार्गानें कर्नाटकाची वाट चालूं लागले. नानांचा मुक्काम पंढरपुरावर आला आणि त्या मुक्कामीं भोसले व पटवर्धन यांच्या फौजाही त्यांना सामिल झाल्या. नंतर ही सर्व मराठी फौज यादगीरच्या मुक्कामास गेली, तों त्यांच्यापूर्वीं निजाम आपल्या फौजेसह त्यांची वाट पहात त्या मुक्कामीं आगाऊच तळ देऊन राहिला होता.

मार्च व एप्रिल हे दोन महिने मराठी फौजेचा तळ यादगीर येथेंच पडला. निजामसाहेब हे दक्षिणेंतल्या सहा सुभ्यावरचे बादशाही सुभेदार —तें बडें मोंगली दरबार—सबब त्यांच्या तब्येतीप्रमाणें भेटी, परतभेटी, खलबतें व पुढील मसलतीची चर्चा वगैरे गोष्टींचा समारंभ करण्यांतच नानांचे हे दोन महिने फुकट गेले नंतर हरीपंताच्या हाताखालीं निजामांनीं आपली पंचवीस हजार फौज दिली आणि ते स्वतः भागानगरास परत गेले. निजाम परत गेल्यावर मराठी व मोंगली फौजेनें टिपूच्या बदामी किल्ल्याकडे मोर्चा वळविला.

कित्तूर प्रांतांत टिपूचा सय्यद बुराण नांवाचा सरदार पंचवीस हजार फौजेनिशीं राहिला होता. त्याच्या पारिपत्याकरितां नानांनीं तुकोजी होळकर व गणेशपंत बेहरे यांची रवानगी यापूर्वींच केली होती. एप्रिल महिन्यांत बाजीपंतअण्णा यांच्या हाताखालीं दुसरी एक मराठी फौजेची टोळी तुंगभद्रेकडे चालून गेली. बाजीपंतानें जातां जातां वाटेंत हणमसागरची पेठ झाबडली आणि केंचनगुड्डचें ठाणें हल्ला करून घेऊन आंतील टिपूच्या लोकांची सरसकट कत्तल केली. नंतर कनकगिरी व अनागोंदी या संस्थानांत लुटालूट करून बाजीपंत परत फिरले आणि बदामीच्या वेढ्यांत सामील झाले.

नानांनीं इंग्रजांची कुमक मिळविण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. परंतु टिपूचा व आमचा तह झाला आहे, त्यामुळें आम्हीं लढाईत प्रत्यक्ष भाग घेणार नाहीं, अप्रत्यक्ष मदत तुम्हांस देतां येण्याजोगी असेल ती देऊं असें इंग्रजांचें म्हणणें पडलें. इंग्रजांच्या या बोलण्याची शुष्क वाटाघाट चालू ठेवून नानांनीं त्यांचा वकील मि० म्यालेट याला स्वारीबरोबर समारंभानें बाळगिलें होतें. हेतु हा कीं, पेशव सरकारची व इंग्रजांची दोस्ती आहे असा भास उत्पन्न होऊन टिपूला दहशत वाटावी. परंतु टिपूनें नानांचा हा कावा ओळखला होता !

मे महिन्याच्या पहिल्या तारखेस मराठ्यांनीं बदामीच्या किल्यास वेढा दिला. या वेढ्याच्या सर्व तरतुदी खुद्द नानांच्या देखरेखीखालीं चालल्या होत्या. शत्रूच्या तोफेच्या माऱ्यांतच त्यांनीं आपला तंबू दिला होता. हें वेढ्याचें काम तीन आठवडे चालून शवटीं ता. २० मे रोजीं मराठ्यांनीं हल्ला करून तो किल्ला काबीज केला. हा किल्ला अतिशय बळकट असल्यामुळें तो काबीज करतांना मराठ्याचें पुष्कळ नुकसान झालें. फक्त शेवटच्या हल्ल्यांतच त्यांचें हजार पंधराशें माणूस ठार व जखमी झालें !

बदामीची फत्ते झाल्यावर नाना पुण्यास जाण्याकरितां परत निघाले. त्यांबरोबर परशरामभाऊही तासगांवास जाण्याकरितां निघाले. या टिपूवरच्या मोहिमेंत भाऊंनीं प्रथमपासूनच उदासीनपणा धरला होता. नरगुंदप्रकरणांत नानांनीं आपणाला तोंडघशीं पाडलें आणि त्यामुळें नरगुंदकराचा नाश झाला ही गोष्ट त्यांच्या मनांत डांचत होती. नाना व हरीपंत यांनीं लष्करांत राहण्याविषयीं भाऊंची परोपरीनें समजूत घातली, परंतु त्यांनीं आपला हट्ट सोडला नाहीं. असो. नाना व भाऊ लष्करांतून निघाले ते मिरज प्रांतांत आले. कुरुंदवाड, मिरज, तासगांव या तीन पटवर्धन घराण्यांच्या मेजवान्या घेऊन नंतर नानांची स्वारी पुण्यास दाखल झाली. पंढरपुरावरून पुण्यास परत जाण्याचा त्याकाळीं रूढ असलेला सरळ मार्ग सोडून नाना मुद्दाम लांबचा मार्ग पतकरून भाऊंबरोबर मिरज प्रांतांत आले आणि पटवर्धनांच्या मेजवान्या घेऊन नंतर पुण्यास गेले या गोष्टी दिसतांना साहजिक घडलेल्या दिसतात. परंतु असें करण्यांतही

नानांचा एक राजकीय हेतु होताच. परशुरामभाऊ लष्करांत न राहतां रुसवा करून घरीं परत गेले असा बोभाटा होऊं नये आणि भाऊंचा व आपला पूर्ण मिलाफ आहे हें सर्वत्र जाहीर व्हावें, एवढ्यासाठींच नानांना हा द्राविडी प्राणायाम करावा लागला !

नाना परत गेल्यावर मराठी फौजेचें सेनापत्य हरीपंत फडक्यांकडे आलें. हरीपंत तुकोजी होळकरांच्या सल्ल्यानें आपलीं सर्व लष्करी धोरणें ठरवीत असत. या मोहिमेच्या यापुढील वृत्तांताचा नानांच्या चरित्राशीं प्रत्यक्ष असा विशेषसा संबंध येत नाहीं सबब तो आम्ही येथें संक्षेपानें नमूद करतों. तुकोजी होळकर व गणेशपंत बेहरे हे चाळीस हजार फौजेनिशीं कित्तूर प्रांतांत सय्यद बुराण याच्या तोंडावर होते. त्यांनीं एक दोन महिने सक्त मेहनत करून धारवाड व सावनूर या प्रांतांतलीं शत्रूचीं ठाणीं उठवून लाविलीं. इकडे हरिपंत फडक्यांनीं गजेंद्रगड व बहादुरबिंडा हे शत्रूचे नामांकित किल्ले हल्ला करून घेतले. टिपूनें अदवानीला वेढा घातला

स. १७८६ मे—डिसें. } होता, परंतु तात्यांनीं फौज पाठवून तो वेढा उठवून लाविला आणि तेथील नबाबाला सुरक्षितपणें बाहेर काढलें. पावसाळा नजीक येऊन ठेपला त्यामुळें तुंगभद्रेपलीकडे आपला निभाव लागणार नाहीं असें समजून ही अदवानीची मराठी फौज नबाबाला बरोबर घेऊन त्या नदीच्या उत्तरतीरीं आली; तों टिपूनें तिकडे अदवानीला पुनः वेढा घातला आणि तें स्थळ घेतलें. बरसातीमुळें शत्रूला आतां तुंगभद्रा ओलांडून अलीकडे येववणार नाहीं, सबब त्या नदीच्या उत्तरतीरावरील शत्रूचा सर्व मुलूख स्वस्थपणानें काबीज करावा असा हरीपंतांनीं बेत ठरविला. त्या बेतास अनुसरून त्यांनीं कोपळच्या किल्ल्यास वेढा दिला. या वेढ्याचें काम चालूं असतां टिपू सुलतान ऐंशीं हजार फौजेनिशीं एकाएकीं गलगनाथाजवळ नदी ओलांडून अलीकडे आला आणि त्यानें थेट सावनुरावर चाल केली. तात्यांना ही बातमी समजतांच ते कोपळच्या वेढ्याचें काम तसेंच अर्धवट टाकून घाईघाईनें सावनूरकर नबाबाच्या रक्षणाकरितां धांवून गेले. सावनूरच्या आसपास हरीपंत व टिपू सुलतान यांचीं रेटारेटीचीं युद्धें पांच सहा

महिने चालूं होती. त्या अवधींत कोणत्याही पक्षाला मोठासा विजय मिळवितां आला नाहीं. तथापि रणमैदानावर एकंदरींत टिपूच जास्त सामर्थ्यवान् ठरला. त्यानें मराठ्यांवर वेळोवेळ छापे घालून त्यांचें बहुत नुकसान केलेंच, शिवाय एक लक्ष शत्रूची फौज समीप असतां तिच्या देखदेखत त्यानें सावनूर काबीज केलें! नंतर टिपूनें मराठ्यांशीं तहाचें बोलणें लाविलें आणि एकीकडे हें बोलणें चालू असतां दुसरीकडे विश्वासघात करून त्यानें बहादुरबिंडा मराठ्यांपासून पुनः हिसकून घेतला!

हरीपंताच्या हाताखालीं या मोहिमेंत एकंदर सव्वा लक्ष फौज होती. या फौजेंत पेशवे, भोसले व निजाम असे तीन स्वतंत्र भाग होते. तात्यांची हुकमत पेशवाई फौजेवर जेवढी चालत असे तेवढी भोसले व निजाम यांच्या फौजांवर अर्थातच चालत नव्हती. खुद्द पेशवाई फौजही निरनिराळ्या सरदारांच्या हाताखालीं होती आणि त्या सरदारांचें परस्परांत ऐकमत्य नव्हतें. सारांश हरीपंतांची फौज संख्येनें मोठी असली तरी ती एकसूत्री नसल्यामुळें तिचें सामर्थ्य विशेषसें नव्हतें. उलटपक्षीं टिपूचीही एक लक्ष फौज होती आणि त्या सर्व फौजेवर त्याची एकट्याचीच हुकमत चालत असे आणि त्यामुळेंच लढाईत त्याची वेळोवेळ सरशी होत गेली. परिस्थिति प्रतिकूळ असतांही हरीपंतांनीं धिमेपणाचें व बचावाचें धोरण स्वीकारून रणमैदानावर आपलें अवसान घालविलें नाहीं यांतच त्यांच्या सेनापत्याचा उत्कर्ष सांठविलेला आहे.

टिपूची याप्रमाणें युद्धांत थोडीबहुत सरशी झाली तरी त्यामुळें तो चढून मात्र गेला नाहीं. पेशवे, निजाम व भोसले हीं तीन बलिष्ठ सरकारें आपणावर चालून आलीं आहेत, त्याअर्थी कांहीं देऊं घेऊं करून त्यांची समजूत काढल्याशिवाय हें लढायांचें झेंगट सुटणार नाहीं, हें त्यास पक्कें ठाऊक होतें. शिवाय याच वेळीं इंग्रजी फौजेंतही थोडीशी हालचाल दिसूं लागल्यामुळें टिपूनें मराठे व मोंगल यांशीं तह ठरवून घेतला. या तहानें मराठे व मोंगल यांना फायदे झाले ते असे— (१) टिपूकडून अठ्ठेचाळीस लक्ष रुपयांची खंडणी मिळाली. (२) गजेंद्रगड, बदामी, नरगुंद व कित्तूर

स. १७८७ एप्रिल

हीं संस्थानें व किल्ले मराठ्यांना मिळाले. अदवानीचें संस्थान निजामाला मिळालें. (३) सावनूरकर नबाबाचें राज्य टिपूनें त्या नबाबाला परत दिलें. (४) नरगुंद व कित्तूर येथील बंदीवानांची शत्रूच्या कैदेंतून मुक्तता झाली.

टिपूवर दुसरी मोहीम [ स. १७९० जाने–१७९२ फेब्रु. ]— टिपूवरच्या पहिल्या मोहिमेंत मराठ्यांना विशेषसा फायदा झाला नाहीं किंवा त्यांना शत्रूचें मनाजोगतें पारिपत्यही करतां आलें नाहीं. पहिल्या मोहिमेंतलें हें उर्वरित कार्य नानांनीं दुसऱ्या मोहिमेंत सिद्धीस नेलें. स. १७९० सालच्या प्रारंभापासूनच मराठे, मोंगल व इंग्रज या तिघांनीं मिळून टिपूवर मोहीम करावी अशी चर्चा पुणें, हैदराबाद व कलकत्ता या ठिकाणीं एकाच वेळीं सुरू झाली. इंग्रजांना मिळवून घेण्यासाठीं नाना उत्सुक झाले होते आणि त्यांनींच प्रथम हें बोलणें सुरू केलें असा डफसाहेबांच्या लिहिण्याचा रोख आहे, परंतु ती माहिती बरोबर नाहीं. या मोहिमेंत इंग्रजच पुढारी होते आणि तेच मराठे व मोंगल यांना मिळवून घेण्याकरितां जास्त उत्सुक झाले होते. असो. निजाम व पेशवे यांच्या तर्फे नाना फडनवीस व इंग्रजांच्या तर्फे मि० म्यालेट यांनीं पुणें मुक्कामीं या मोहिमेसंबंधें करारमदार ठरविले त्यांचें तात्पर्य—(१) मराठे, मोंगल व इंग्रज यानीं एकसूत्रानें टिपूवर स्वारी करावी. (२) टिपूकडून खंडणी व मुलूख मिळेल तो तिघानीं सारखा वांटून घ्यावा. (३) इंग्रजांना जरूर पडेल तेव्हां पेशवे व निजाम यांनीं त्यांस प्रत्येकीं दहा दहा हजार स्वारांची कुमक द्यावी. या वीस हजार स्वारांचा खर्च इंग्रज सोसतील. पेशवे व निजाम यांपैकीं प्रत्येकाच्या दिमतीस इंग्रज आपलीं दोन पलटणें देतील. पेशवे व निजाम यांनीं आपापल्या दिमतीच्या पलटणांचा खर्च सोसावा. (४) टिपूशीं तह झाल्यानंतर पुनः कधीं काळीं तो सहरहू तीन सरकारांपैकीं कोणास उपद्रव देऊं लागेल तर तिघांनीं एकत्र होऊन त्याचें पारिपत्य करावें. याप्रमाणें हा तह ‘ चढावाचा आणि बचावाचा ’ Offensive and defensive अशा स्वरूपाचा होता.

---

१ ग्रांट डफकृत मराठ्यांचा इतिहास ( इंग्रजी आ. तिसरी ) पृ. ४८२

सालबाईच्या तहांत हैदरासंबंधीं जें कलम होतें त्याचीच सुधारलेली नवी आवृत्ति म्हणजे हा तह होय. इंग्रज व टिपू यांमध्यें पराकाष्ठेचा द्वेष माजला होता. या मोहिमेच्या निमित्तानें त्याचा समूळ उच्छेद करावा असा इंग्रजांचा संकल्प ठरला होता. टिपूचा चढेलपणा मोडावा ही गोष्ट नानांसही इष्ट अशीच होती. परंतु टिपू हा इंग्रजांच्या उरावरची कट्यार आहे, ती कट्यार नाहींशी झाली तर ते फारच शिरजोर होतील, असें त्यांस भय वाटत होतें. त्यामुळें इंग्रजांनीं कितीहि हातपाय झाडले तरी टिपूला समूळ बुडूं द्यावयाचा नाहीं, अशी नानांनीं आपल्या मनाशीं आगाऊच खूणगांठ बांधून ठेविली होती.

या तहाच्या निमित्तानें नानांनीं इंग्रजांना भीड घातली कीं, सांप्रत काशीक्षेत्र तुमच्या ताब्यांत आहे. तेथें श्रीविश्वेश्वराच्या देवालयाचा सभामंडप पाडून त्या जागीं औरंगजेबानें पूर्वीं मशीद बांधिली आहे. ती मशीद पाडून पुनः मंडप बांधावा असें आमच्या मनांत आहे. त्याप्रमाणें आह्मांस करूं द्यावें.' थोरले बाजीरावसाहेब यांच्या कारकीर्दीपासून मराठ्यांनीं या गोष्टीचा ध्यास घेतला होता. या संधींत आपला हा फार दिवसांचा हेतु सिद्धीस न्यावा असा नानांचा विचार होता. परंतु इंग्रजांनीं गुळचट थापा मारून वेळ मारून नेली आणि त्यांचें हें बोलणें युक्तीनेंच रहित कराविलें.

श्री. पंतप्रधान किंवा नाना फडनवीस यांनीं स्वतः या मोहिमेवर निघावें असा इंग्रज आणि मोंगल यांचा आग्रह पडला; परंतु ती गोष्ट नानांनीं कबूल केली नाहीं. परशुरामभाऊंचा सल्ला घेतल्याशिवाय आणि त्यांना स्वारींत गुंतविल्याशिवाय आपणाला कोणत्याही मोहिमेंत यश यावयाचें नाहीं, हें मागच्या स्वारींतच त्यांच्या लक्षांत आलें होतें. सबब त्यांनीं भाऊंस पत्र पाठविलें कीं—" आपली भेट जरूर जाली पाहिजे. कित्येक मोठमोठ्या मसलतींचे विचार दरकार येऊन पडले आहेत. येविशींचा ठराव आपणाशीं बोलून जाला पाहिजे व नबाब व इंग्रज यांसी उत्तरें लौकर गेलीं पाहिजेत. याकरितां आपण पत्र पावतांच लौकर निघून यावें."

---

१ ऐ. ले. सं. नं. ३१७९.

या पत्राप्रमाणें भाऊ पुण्यास आल्यावर नानांनीं त्यांजकडे या मोहिमेचें सेनापत्य सोपविलें. पटवर्धन, रास्ते, प्रतिनिधि, मेहेंदळे यांच्या सरंजामी फौजा आणि हुजुरात मिळून पंचवीस हजार फौज भाऊंबरोबर देण्याची नानांनीं तजवीज केली.

मराठ्यांस इंग्रजांच्या कूटांतून फोडावें याबद्दल टिपूनें पुष्कळ यत्न केला. स्वारी निघण्याच्या ऐन गर्दींत त्याचे वकील खंडणीचें द्रव्य व हत्ती वगैरे नजराणा घेऊन पुण्यास आले आणि ते दोनचार महिने रास्त्यांच्या विद्यमानें दरबारांत खटपट करीत होते. मराठी फौज गोळा होण्यास अद्यापि थोडा अवकाश होता. त्या अवधींत टिपूकडे थकलेल्या खंडणीपैकीं वसूल झाल्यास बरेंच झालें असें समजून नाना या टिपूच्या वकिलाशीं सलोख्याचीं कोरडीं मिष्ट भाषणें करीतच होते! शेवटीं इंग्रजांनीं फार जिकीर लावली तेव्हां नानांनीं या वकीलाला निरोप दिला.

भाऊ फौजेची जमवाजमव करण्याकरितां पुण्याहून तासगांवास आले. कराराप्रमाणें इंग्रजांचीं दोन पलटणें जून महिन्यांतच त्यांना त्या मुक्कामीं

सन १७९० } सामील झालीं. या पलटणांवर कॅ. लिटल् नांवाचा अंमलदार होता. यालाच मराठे लोक 'लिटली' असें म्हणत असत. लिटलीच्या हाताखालीं दुसरे इंग्रज अंमलदार होते त्यांचीं नांवेंही मराठ्यांनीं उच्चारसौकर्याकरितां अशींच दुरुस्त करून घेतलीं होती. सार्टोरियस याचें नांव 'सरताऊस' तर मॅकडोनेल याचें नांव 'मेघडालन!' फ्रेडरिक व थॉमसन् हीं नांवें मात्र या मराठीकरणाच्या तडाख्यांतून तशींच शाबूत राहिलीं! असो. आगष्ट अखेरीस भाऊंजवळ सहा सात हजार फौज गोळा झाली. आणखी फौज गोळा होईपर्यंत वाट पहावी असें त्यांच्या मनांत होतें. परंतु पुणें, हैदराबाद वगैरे ठिकाणांहून त्यांस इशारा आला कीं,—"आतां रहावें है सल्लाह वख्त नाहीं. कोईमतूर वगैरे जागे इंग्रजांनीं घेतले. इंग्रज गालब पडेल. आपण सत्वर ( कृष्णानदी ) उतरावें" हा इषारा पोंचतांच भाऊ टाकोटाक कृष्णा उतरून शत्रूच्या राज्यांत शिरले. सपटेंबर महिन्यांत त्यांनीं धाडरहेवळी, नवी व जुनी

---

1 ए. के. सं. नं. ३२०९.

हुबळी, मिश्रीकोट व दोडवाड वगैरे ठाणीं काबीज केलीं, आणि पुढील महिन्यांत धारवाडच्या किल्ल्यास वेढा दिला. या किल्ल्यांत बद्रीजमालखान नांवाचा टिपूचा शूर सरदार पंधरा वीस हजार फौजेनिशीं राहिला होता. त्या खानानें सात महिनेपर्यंत किल्ल्याचा मोठ्या मर्दुमीनें बचाव केला. शेवटीं भाऊंनीं सक्त मेहनत करून चोहोंकडे नाकेबंदी केल्यामुळें

ता. ५ एप्रिल १७९१

तो किल्ला मराठ्यांच्या हातीं पडला. या वेढ्याचें काम चालू असतां भाऊंनीं फौजेच्या टोळ्या पाठवून तुंगभद्रेअलीकडील सर्व मुलूख शत्रूपासून सोडवून घेतला. धारवाडची फत्ते झाल्यावर दुसरेच दिवशीं भाऊ त्या नदीच्या दक्षिणतीरास गेले. महिना पंधरा दिवसांत संतीबिदनूर, मायकोंडा, हुपेगिरी, चेनगिरी वगैरे ठाणीं त्यांनीं काबीज केलीं. या धांदलींत त्यांच्या लष्करांतील लुटारू लुच्यांनीं शृंगेरीकर शंकराचार्यांचा मठही दरोबस्त लुटला ! मठांतील जडजवाहीर, देवांच्या मूर्ति आणि खुद्द स्वामींचा दडकमंडलूसुद्धां या लुटारूंनीं लांबविला ! स्वामींची मालमत्ता परत मिळून त्यांचा राग शांत करावा म्हणून नानांनीं बहुत यत्न केला. परंतु लष्करांतील अनिवार लुटारूंवर नाना किंवा खुद्द भाऊ यांची हुकमत विशेषशी चालत नव्हती. पुढील वर्षी स्वामींनीं पुण्यास जाऊन नाना फडनवीस व पेशवे यांच्या दारीं पुष्कळ त्रागा केला, परंतु त्यांची दाद लागली नाहीं.

एप्रिल महिन्यांत हरिपंत फडके दहा पंधरा हजार फौज घेऊन पुण्याहून निघाले आणि विजापुर मार्गानें कर्नाटकांत चालले. वाटेंत पानगल येथें

स. १७९१

निजाम व हरीपंत यांची भेट झाली. या भेटींत हरीपंतांनीं 'टिपूला समूळ बुडूं द्यावयाचें नाहीं' हा नानांचा कानमंत्र निजामाच्या मनावर बिंबवला. नंतर ते कर्नूळावरून श्रीरंगपट्टणाकडे चालले. पट्टणापासून आठ दहा मैलांवर मेलकोट्याजवळ हरिपंत व परशुरामभाऊ यांचीं लष्करें एकत्र झालीं. जमिनीवर मराठी लष्कराची याप्रमाणें चढाई चालू असतां नानांच्या हुकमावरून मराठी आरमारानें विजयदुर्गाहून निघून कारवारप्रांतावर स्वारी केली आणि त्या प्रांतांतला शत्रूचा अंमल उठवून लाविला.

इकडे मराठ्यांची अशी धामधूम चालली असतां तिकडे मोंगल व इंग्रज यांनींही बरीच आघाडी मारली. मोंगलांनीं कोपळ व बहादुरबिंडा हे किल्ले घेतले आणि नंतर ते इंग्रजांना सामील झाले. इंग्रजांनींही टिपूचा मुलूख काबीज करण्याचा सपाटा चालविला होता. बिदनूर, बंगलोर व श्रीरंगपट्टण हीं स्थळें अजिंक्य आहेत, वर्ष सहा महिने वेढा घालून बसवें तेव्हांच तीं स्थळें साध्य होतील, असा मराठे व मोंगल यांचा ग्रह होता. परंतु इंग्रजांनीं बिदनूर घेतलें एवढेंच नव्हे, तर टिपू ऐंशी हजार फौजेसह समीप असतां त्यांनीं त्याच्या देखदेखत बंगलोरही घेतलें! नंतर इंग्रजांनीं पट्टणाकडे मोर्चा वळविला. इंग्रजांची ही

सन १७९१ } घडाडी पाहतांच पुणें व हैदराबाद येथील दरबारें आश्चर्यानें स्तंभित झालीं! नानांनीं हरीपंत व भाऊ यांना तातडीनें पत्रें पाठविलीं कीं–' ज्या इंग्रजांनीं बिदनूर व बंगलोर असलीं स्थळें घेतलीं ते महिना पंधरा दिवसांत पट्टणही घेतील आणि टिपूचा समूळ नाश करतील. सबब तुम्ही जलदी जलदीनें पट्टणाकडे कूच करावें.' नानांचें हें पत्र येण्यापूर्वीच इंग्रजांचा गव्हर्नर जनरल लॉर्ड कॉर्नवॉलिस यांचेंही हरीपंतांस पत्र आलें होतें कीं,: ' आम्ही अंबूरच्या घांटाकडे रसद मिळवून घेण्याकरितां आलों आहों. आम्हांला ती रसद मिळाली असून आम्ही आतां पट्टणाकडे मोर्चा वळविला आहे. मलबारांतून जनरल आबर-क्रांबी हाही तिकडून त्या स्थळावर चालून येत आहे. तुम्हींही तत्काळ पट्टणाकडे कूच करावें.' या पत्रांच्या आधारावरच मराठे पट्टणाकडे कूच करून चालले; परंतु त्यांना पुढें इंग्रजांकडून कोणतीच बातमी कळेना. मराठ्यांनीं इंग्रजांकडे पुष्कळ जासूद पाठविले, परंतु ते सर्व टिपूनें वाटेंतच मारून टाकले! अशा संशयित स्थितींतच हरीपंत व भाऊ यांचीं लष्करें मेलकोट्याजवळ एकत्र झालीं होतीं.

इकडे मोंगल व इंग्रज यांनीं घाई करून पट्टणापर्यंत मजल गांठली, परंतु तेथें गेल्यावर त्या स्थळास वेढा देण्याचें अवसान त्यांना राहिलें नाहीं. टिपूनें पट्टणाभोंवतालचा मुलुख ओस पाडला–पाणी नासलें–धान्य व वैरण यांचा नाश केला आणि झाडें तोडून रस्त्यावर आडवींतिडवीं घातलीं; त्या-

मुळें तीं लष्करें उपासमारीनें बेजार झालीं ! लॉर्ड कॉर्नवॉलिस यानें पट्टणला वेढा घालण्याचा नाद सोडून दिला आणि तोफा व दारूगोळा यांचा नाश करून इंग्रज व मोंगल मरत झडत बंगलोरकडे परत निघाले. वाटेंत मराठ्यांची व त्यांची गांठ पडली.

२६ मे १७९१

त्यांच्या लष्करांची दीन स्थिति लक्षांत घेऊन मराठ्यांनीं उदारपणानें त्यांना वाटेल तो जिन्नस विकण्याबद्दल आपल्या बाजारांत ताकीद फिरविली. मग मोंगल व इंग्रज यांचा आनंद काय वर्णावा ? " इंग्रेजांची फौज व मोंगलांची फौज याणीं दाणे वगैरे जिन्नस सांपडला तितका नेला. पेढे, फुटाणे वगैरे खोबऱ्याची वाटी आदिकरून रुपयेस दोन वाट्या घेऊन इंग्रजांनीं खादल्या ! दह्याचीं मडकीं गवळ्यांपासून दोन दोन रुपये द्यावें व गाडगेंच घ्यावें असें जाहलें ! " असो. यानंतर पावसाळ्यामुळें इंग्रज व मोंगल व हरीपंत बंगलोरास तळ देऊन राहिले आणि परशुरामभाऊ चित्रदुर्गास छावणीस राहिले.

या अवधींत नानांनीं राज्यकारभाराच्या इतर गोष्टी केल्या त्याही येथें नमूद केल्या पाहिजेत. जुलै महिन्यांत जंजिरेकर हबशानें कोंकणांत धामधूम सुरू केली, परंतु नानांनीं पुण्याहून पायदळ पाठवून तो दंगा तत्काळ मोडला. तुकोजी होळकरांचा मुलगा मल्हारराव हा बापाशीं भांडून याच वेळीं दक्षिणेंत आला, आणि पांच सहा हजार फौज जमा करून त्यानें पेशवाई व मोंगलाई मुलखांत आवाढाव सुरू केली. मुलाला कैद करण्याबद्दल होळकरांचें नानांस पत्र आलें, त्यावरून त्यांनीं रंगराव राजेबहादर यांना पाठवून मल्हाररावाला धरून पुण्यास आणलें आणि आपल्याजवळ नजरकैदेंत ठेविलें.

सन १७९१

कन्यागतानिमित्त श्री. सवाई रावसाहेब व नाना फडनवीस यांच्या स्वाऱ्या कृष्णास्नानास पुण्याहून वांईस गेल्या. वांई व महाबळेश्वर या क्षेत्रांतून त्या उभयतांनीं बहुत दानधर्म केला. नंतर श्रीमंतांनीं साताऱ्यास जाऊन छत्रपतींचें दर्शन घेतलें. नंतर वाटेनें मेजवान्या घेत घेत श्रीमंत व नाना पुण्यास परत आले.

सन १७९१ नोव्हें.

१ ऐ. ले. सं. नं. ३३७१.

त्या सालचा श्रावणमासाचा दक्षिणेचा समारंभ नानांनीं मोठ्या प्रमाणावर केला. या दक्षिणेच्या निमित्तानें घाशीराम कोतवालाचें एक क्रूर कर्म उघडकीस आलें. त्या संबंधाची माहिती—

" पुण्याहून द्रविड ब्राह्मण आपल्या देशास जाण्याकरितां निघोन असामी पसतीस श्रावण वद्य १४ रविवारीं प्रहर दिवसास सायंकाळीं घाशीराम कोतवाल यांचे बागांत जाऊन उतरले. तेथें ब्राह्मणांनीं कणसें मळ्यांतील मक्याचीं दहा तोडलीं. त्यावरून माळ्याचा व त्यांचा कजिया जाहला. माळ्यानें शिवीगाळ केली त्यावरून ब्राह्मणांनीं त्यास मारिलें. त्याजवरून माळी फिर्याद घेऊन कोतवाल यांजकडे आला आणि सांगितलें कीं, फितवेकरी चोर कोमटी वगैरे आहेत, मळ्यांत दंगा करतात, मला मारिलें, त्यांचें पारिपत्य केलें पाहिजे, असें सांगितलें. त्याजवरून कोतवाल याणें पंचवीस प्यादे पाठवून ब्राह्मणांस मारामार करोन बांधोन भवानी पेठेंत त्याचा वाडा आहे तेथें भुयारामध्यें रविवारीं प्रहर रात्रीस घातलें. आंत जात ना, तेव्हां मारून घातलें. रविवारची रात्र, सोमवारचा दिवस रात्र, मंगळवारीं भाद्र. शु. १ प्रातःकाळीं मानाजी फाकडे याजला वर्तमान कळलें. त्यांणीं तेथें जाऊन जबरदस्तीनें कुलपें तोडून भुयार उघडून ब्राह्मण ओढून बाहेर काढले त्यांत अठरा ब्राह्मण मेलेले! तीन ब्राह्मणांस जीव मात्र होता. तेही बरती काढल्यावर सायंकाळीं मेले. सहा ब्राह्मण मात्र वांचले. हें वर्तमान फाकडे यांणीं श्री. राजश्री रावसाहेब [ पेशवे ] यांस सांगोन पाठविलें, रावसाहेबांनीं नानांकडे सांगोन पाठविलें. त्यांजवरून कोतवाल याजला बोलावून आणून पुसिलें. त्याणें सांगितलें कीं, कोमटी वगैरे जातींचे फितव्यामध्यें कांहीं होते व चोरीही करीत होते. ते बातमी पक्की लावून त्याजला पेठेंत ठेविलें. त्यांणीं कांहीं जणांनीं अफू व सोमल खाऊन मेले. असें कोतवाल याणें नानांस समजाविलें. नानांनीं मेलेल्यांस जाळण्याची परवानगी दिली. कोतवाल याणें कारकून मुदे

(३० आगष्ट १७९१.)

१ ए. ले. सं. न. ३३७४. २ हा स्वारी हैदराच्या कैदेतून सुटून नानाच्या परवानगीनें आतां पुण्यास येऊन राहिली होती.

जाळावयास पाठविला. तो मुर्द्यांजवळ गेला. तेथें फाकडे बसले होते ते त्यास मुर्दे नेऊं देईनात. कीं, ' रावसाहेब यांची परवानगी आल्याशिवाय जाऊं देत नाहीं. कोतवालाचें ऐकत नाहीं.' साफ सांगोन कारकून याजला पाठविलें. आणि फाकडे यांणीं आपला कारकून रावसाहेबांकडे पाठविला कीं, ' एकवीस ब्राह्मण मृत्यु पावले. कोतवाल जाळावयास नेतो त्यास तूर्त मी नेऊं दिलें नाहीं. याची चवकशी करावी.' ऐसें सांगोन पाठविलें. त्याजवरून कोतवाल याजला बोलावून आणून नानांनीं पुसिलें तेव्हां त्याणें पाहिल्यासारखें सांगितलें. त्याजवरून नानांनीं चौकीमध्यें बसविला आणि चौकशीस कारकून पाठविला. तों मंगळवारीं चार घटका दिवसपावेतों हा मजकूर जाहला. तों हजार ब्राह्मण तेलंग मिळोन एकच आकांत केला ! नानांनीं दरवाजा लाविला ! सहा घटका रात्र जाली. वे॥ राजश्री अय्याशास्त्री यांस बोलावून आणिलें. ते नानांचे वाड्यापुढें येतांच ब्राह्मणांनीं मारामार करून शास्त्रीबोवांची शालजोडी व पागोटें फाडिलें ! नंतर वाड्यांत गेले. नानांचें त्यांचें बोलणें जालें. याजला पारिपत्य देहांत असें शास्त्रीबोवांनीं साफ सांगितलें. ब्राह्मणांचा कट बहुत ' कोतवाल याजला जीवें मारावें. ' तेव्हां मग रात्रीस हत्ती आणून त्याचे पाठीवर उपडा बांधोन चार पेठा फिरवून रात्रीस रमण्यामध्यें बिडी घालून चौकी देऊन ठेविला. तेथेंही ब्राह्मण दोनशेंपावेतों चौकीस राहिले ! बुधवारीं प्रातःकाळीं ब्राह्मण जमा झाले. रावसाहेबांचा नेट भारी कीं, याचें पारिपत्य करून डोकें मारावें. निकर्ष फार, तेव्हां मग बुधवारीं दोन प्रहरीं चावडीवर कोतवाल याजला आणून उंटावर बसवून अवघें शहर फिरवून सायंकाळीं दोन घटका दिवसास भवानी पेठेच्या पलीकडे अदकोसावर नेऊन सोडला. बसला राहिला. हातास काढणी लावून म्हारांनीं धरली होती. तों समागमें द्रविड ब्राह्मण होते त्याणीं दगड उचलून मस्तकावर घालून जिवें मारिला. + + + भृगुवारीं कोतवालीकडील कारकुनांस बिड्या फडणीस मजमदार याजवेगळे सगळ्यांस घातल्या. दोघा लेकांसही बिडी घातली. घराचीही जप्ती जाहली. कुटणी कोतवाल यानें ठेवल्या होत्या त्यांचे व माणसें कोतवालीकडील

यांचे हात, पाय, नाक, कान काढावे ऐशी बोलवा आहे. कोतवालाचे शरीरास आग नाहीं. अद्यापि पडलें आहे. नदींत टाकलें नाहीं."

या घाशीराम प्रकरणाची चर्चा आम्ही पुढील प्रकरणांत करणार आहों. पावसाळ्यानिमित्त परशुराम भाऊ चित्रदुर्गास छावणीस राहिल्याचें पूर्वी सांगितलेंच आहे. पावसाळ्यानंतर भाऊ पट्टणाकडे न जातां बिदनुराकडे वळले आणि त्या कामीं त्यांना नानांनीं उत्तेजन दिलें. बिदनूरप्रांत हा शिवकालीन मराठी स्वराज्यापैकीं होता आणि तो काबीज करण्याकरितां थोरले रावसाहेब पेशवे यांनींही पुष्कळ खटपट केली होती. या स्वारीच्या निमित्तानें हा प्राचीन मराठी मुलुख काबीज करून पुनः मराठी राज्यास जोडावा असा नानांचा संकल्प होता. भाऊंनीं बिदनूर मुलुखांतलीं सर्व ठाणीं आणि अनंतपूरचा किल्ला हस्तगत केला. त्या प्रांतांत टिपूचा रेझासाहेब उर्फ बांकी नबाब नांवाचा शूर सरदार वीस हजार फौजेनिशीं संरक्षणाकरितां राहिला होता, त्याची दाणादाण करून नंतर भाऊंची स्वारी बिदनुराकडे वळली. भाऊ पट्टणाकडे न येतां बिदनुराकडे वळले ही गोष्ट लॉर्ड कॉर्नवॉलिस यांस बिलकुल आवडली नाहीं. त्यांनीं भाऊंस निघून येण्याविषयीं वारंवार पत्रें पाठविलीं आणि त्यांचा पुण्याचा वकील मि. म्यालेट यानेंही याबद्दल नानांकडे जिकिरीचा तगादा बसविला. इंग्रजांची फारच भीड पडली तेव्हां नानांनीं 'आतां विलंब न करितां बिदनूर घेण्याचें काम तसेंच टाकून देऊन त्वरेनें इंग्रजांस जाऊन मिळावें, असें भाऊंस पत्र पाठविलें, या पत्राप्रमाणें भाऊ बिदनुरचा रोख सोडून

स. १७९२ फेब्रु. } परत फिरले आणि झपाट्यानें लांब मजली करीत शिवमोग्यावरून पट्टणाकडे चालले. ते पट्टणास पोचण्यापूर्वीच मोंगल सेनापति दाराजहांबहादुर, हरिपंत फडके, लॉर्ड कॉर्नवॉलिस, जनरल आबरक्रांबी यांनीं त्या स्थळाला तिन्ही बाजूंनीं वेढा दिला होता. चवथी दक्षिणेची बाजू मोकळी होती तीही आतां भाऊंनीं जाऊन बंद करून टाकली. याप्रमाणें श्रीरंगपट्टणास चोहोंकडून घेरा पडून आंत टिपू सुलतान अडकून पडला.

याप्रसंगीं टिपूचा खात्रीनें नाश झाला असता. परंतु केवळ नानांच्या

धोरणामुळेंच त्याचा बचाव झाला. इंग्रजांनीं टिपूचा समुळ नाश करण्याविषयीं पराकाष्ठेचा हट्ट धरला, परंतु नानांच्या प्रेरणेवरून हरिपंत फडके आणि मोंगलाचा सरदार दाराजहां यांनीं टिपूबद्दल सक्थ रदबदल चालविल्यामुळें लॉटसाहेबांना शेवटीं आपला हट्ट सोडावा लागला. यानंतर तह झाला त्यांत टिपूनें तीन कोट रुपये आणि अर्धे राज्य द्यावें असा ठराव झाला. खंडणीपैकीं एक कोट रुपये आणि मुलूखापैकीं चाळीस लक्षांचा मुलूख पेशव्यांच्या वांटणीला आला. हा मुलूख कृष्णा व वर्धा या नद्यांमध्यें पसरलेला होता. एकंदरींत बारभाईच्या कारस्थानानंतर हैदरानें व टिपूनें जेवढा मराठी मुलूख घेतला होता तो सर्व आतां पुनः मराठी राज्यास जोडला गेला.

ही टिपूवरील मोहिम संपते न संपते तोंच नानांस अशुभसूचक भासणारी एक नवीनच गोष्ट घडून आली. ती गोष्ट म्हणजे महादजी शिंदे हे ता. ११ जून १७९२ रोजीं पुण्यास आले आणि संगमावर तळ देऊन राहिले हीच होय. एका प्रकरणामुळें शिंद्यांचा नानांवर मोठाच राग झाला होता. शिंदे व नाना यांमधील स्पर्धा हा एक तत्कालीन लोकांच्या चर्चेचा प्रमुख विषय होऊन बसला होता आणि अजूनही इतिहासलेखकांमध्यें या विषयाच्या तपशिलाबद्दल आणि स्वरूपाबद्दल बराच मतभेद आहे. सबब नाना व शिंदे यांमध्यें कसें वितुष्ट वाढत गेलें आणि शिंद्यांच्या पुण्याच्या मुक्कामांत काय काय गोष्टी घडल्या याची हकीकत थोड्याशा जास्त विस्तारानें आम्ही पुढील प्रकरणीं देणार आहों आणि नाना व पाटीलबाबा यांमधील स्पर्धेच्या तात्विक स्वरूपाविषयींही चर्चा करणार आहों.

---

# प्रकरण अकरावें

## नाना व पाटीलबावा यांमध्यें स्पर्धा.[1]

( स. १७९२ जून–स. १७९४ जून. )

शिंदे होळकरांच्या कूटापैकीं नानांनीं शिंद्यांस फोडून आपल्या लगामीं लावून घेतल्याचें पूर्वीं सांगितलेंच आहे. त्यांची ही मैत्री स. १७७५ पासून स. १७८२ पर्यंत अबाधित चालू होती. त्या अवधींत इंग्रजांच्या लढाया, तोतयाचें बंड, मोरोबाचा फितूर, करवीरची मोहीम वगैरे मसलतींमधून शिंदे नानांच्या अतिशय उपयोगीं पडले आणि सखारामबापूंस कैद करून त्यांनीं नानांच्या कारभाराचा मार्ग निष्कंटक करून दिला. त्या उभयतांचें सख्य कायमचें टिकणें मात्र दुरापास्त होतें. प्रत्येक कामांत आपलाच उप्पर दुसऱ्यावर ठेवावा, एखाद्या साध्या गोष्टीबद्दल तर्क कुतर्क लढवून हमरीतुमरीवर यावें असा शिंद्यांचा स्वभाव होता.[2] नाना हें आपल्या हातांतलें मेणाचें बाहुलें आहे, त्याला आपण जो आकार देऊं तोच त्यानें धारण केला पाहिजे असा त्यांचा समज होता. परंतु हा त्यांचा भ्रम लवकरच दूर झाला. चोहोंकडे एकाच वेळीं दंगे व बंडें उद्भवलीं, त्यामुळें नानांना शिंद्यांच्या ओंजळीनें वेळोवेळ पाणी प्यावें लागलें आणि प्रसंगावर नजर देऊन त्यांनीं तसेही दिवस काढिले. परंतु या बौद्धिक गुलामगिरींतच सतत राहून कारभारीपणाचें वैभव भोगावें ही गोष्ट त्यांच्या स्वाभिमानास पटण्याजोगी नव्हती. भोसले, गायकवाड, निजाम, टिपू व इंग्रज यांकडे त्यांनीं आपलीं स्वतंत्र राजका-

---

१ हें प्रकरण तयार करतांना भा. इ. मंडळाच्या अहवालांतून प्रसिद्ध झालेल्या रा. दत्तोपंत आपटे व प्रो. भानु यांच्या लेखांचा आम्हांला पुष्कळ उपयोग झाला आहे.

२ शिंदे वेळोवेळ कसे वर्दळीवर येत आणि नंतर त्यांची समजूत करितां करितां नानांची कशी त्रेधा उडत असे याबद्दल का. सं. पत्रें यादी नं. १९३, १९५, २२१, २४८, २५६, २९१, ३०१।२।३, ३०६, ३१८ हे लेखांक वाचकांनीं जरूर वाचावेत. या चरित्राच्या दुसऱ्या आवृत्तींत यांपैकीं कांहीं लेखांकांचे उतारे दिले होते परंतु विस्तारभयास्तव ते उतारे या आवृत्तींत गाळले आहेत.

रणें राखलीं आणि शिंद्यांची जबरदस्ती कमी होऊन त्यांना शह बसावा या हेतूनें त्यांनीं आतां तुकोजी होळकराशीं सख्य जोडलें. नाना व होळकर घराणें यांचें हें सख्य जमलें तें मात्र आमरणांत टिकलें. नाना-होळकरांच्या या सख्यांतच नाना व शिंदे यांमधील स्पर्धेचें बीज सांठविलेलें आहे!

सालबाईच्या तहामुळें दोन राजकारणें मराठ्यांच्या डोळ्यासमोर उभीं राहिलीं. एक टिपूचें पारिपत्य आणि दुसरें दिल्ली दरबारांतील वर्चस्व. यांपैकीं पहिल्या राजकारणाची जबाबदारी नानांनीं आपल्या शिरावर घेतली. सतत आठ नऊ वर्षे परिश्रम करून नानांनीं टिपूचें पारिपत्य कसें केलें, याचें विवेचन आतांपर्यंत करण्यांत आलें आहेच. दुसऱ्या राजकारणाचें जोखीम शिंद्यांनीं स्वतःकडे पतकरलें. नानांचेही या मसलतींत त्यांना पूर्ण पाठबळ होतें. या दिल्लीच्या स्वारींत शिंद्यांना काय काय अनुभव आले आणि शेवटीं त्यांचें व नानांचें कसें वैमनस्य आलें हें येथें संक्षेपानें नमूद करतों.

नजबखानाच्या मृत्यूमुळें दिल्लीदरबारांत यावेळीं अंदाधुंदी माजली होती, त्यामुळें शिंद्याचें काम बरेंच सुकर झालें. स. १७८४ च्या जून महिन्यांत शिंदे व पातशहा यांची आग्र्यास भेट झाली. त्या भेटींत सर्व पातशाही दौलतीचा मराठ्यांनीं बंदोबस्त करावा या गोष्टीस पातशहानें मोठ्या आनंदानें मान्यता दिली. पुढील वर्षाच्या मे महिन्याच्या पहिल्या तारखेस बादशहानें मोठा दरबार भरवून पेशव्यांस वकील मुतलखीचें पद आणि शिंद्यांस त्या पदाचीं नायबगिरीचीं वस्त्रें दिलीं. महंमद बेग हमदानी वगैरे पठाण सरदार, जयपूर, जोधपूर येथील रजपूत राजे, राघोगड, रामगड येथील गिराशिये यांना मराठ्यांचा हा बोलबाला सहन झाला नाहीं आणि त्यांनीं एकमतानें मराठ्यांविरुद्ध हत्यार उपसलें. ता. २८ जुलै १७८७ रोजीं जयपुराजवळ लालसोट येथें शिंद्यांचें रजपूत पठाणांशीं तुंबळ युद्ध झालें. त्या युद्धांत महंमद बेग ठार पडला आणि रजपूत पठाणांचा मोड झाला. परंतु लढाईनंतर शिंद्यांचें बहुतेक सैन्य फितूर होऊन शत्रूकडे मिळालें, त्यामुळें पाटीलबावांना जीव घेऊन ग्वालेरीपर्यंत मागें हटावें लागलें.

शिंद्यांच्या पराजयाचीं कारणें— [ १ ] फौजेंत परदेशी शिपायांचा भरणा जास्त होऊन देशी मराठ्यांची भरती कमी पडली. [ २ ] लष्करांतील हुद्यांच्या जागा मराठ्यांना न देतां शिंद्यांनीं परदेशी हिंदुस्थानी लोकांना दिल्या. बक्षीगिरीचा हुद्दा नौबतराय खत्री याजकडे दिला. [ ३ ] चोहोंकडे एकाच वेळीं मोहिम सुरू केली, त्यामुळें शिंद्यांचें सैन्य चोहोंकडे पांगलें गेलें. या तीनी गोष्टींबद्दलचा इशारा नानांनीं पुण्याहून मुद्दाम माणूस पाठवून शिंद्यांस दिला होता; परंतु त्यांनीं त्याकडे दुर्लक्ष केलें. 'येविशीचा बंदोबस्त आहे, काळजी न करावी.' असें त्यांनीं नानांस मोघम अश्वासन दिलें. शेवटीं लालसोटच्या अनुभवामुळें खिन्नता वाटून 'हिंदुस्थानवासीयांच्या विश्वासावर गेलों त्याचें फळ पावलों' असें शिंदे वारंवार ह्मणूं लागले. असो. शिंद्यांची हलाखी पाहून नानांनीं अली-बहाद्दर व तुकोजी होळकर यांची तावडतोब पुण्याहून हिंदुस्थानांकडे रवानगी केली.

लालसोटच्या पीछेहाटीमुळें दिल्ली दरबारांतले मोंगलिये, रजपूत, जाठ, गिराशिये आणि पंजाबांतले शीख यांना मोठेंच अवसान चढलें, आणि मराठी गद्दारांना चमेलीपार हुसकून लावावें अशा त्यांच्या वल्गना सुरू झाल्या; परंतु पाटीलबावांची कर्तृत्वशक्ति या सर्वांना पुरून उरण्याजोगी जबरदस्त होती. पुण्याहून कुमक येत होती तिची वाट न पाहतां शिंद्यांनीं वर्ष दीडवर्षांतच आपलें वर्चस्व उत्तरेकडे पुनः स्थापिलें. इस्माईल बेग, गुलाम कादर, झाबिताखान रोहिला, तमाम रजपूत राजे व गिराशिये संस्थानिक यांना शिंद्यांनीं जमीनदोस्त केलें, आणि बंगाल व अयोध्या या शिवाय सर्व पातशाही मुलूख ताब्यांत घेतला. शिंद्यांच्या जबरदस्तीबद्दल जोधपूरच्या राजानें नानांकडे तक्रारीचें पत्र पाठविलें. त्यांत तो लिहितो कीं, "पाटिलांनीं[१] दक्षिणच्या सरदारांची वाट सोडून बहुतांची खानखराबी[२] केली...... ( त्याजविरुद्ध ) तमाम उमदे सरदार मुत्तफिक[३] व एकदिल झाले आहेत......पाटलांस चार गोष्टी चांगल्या त्याहाव्या. ही गोष्ट

१ भा. इ सं. मं. सप्तम संमेलन वृत्त पृ. १५ २ खानखराबी = घरादाराचें वाटोळें. ३ एकविचाराचे.

ही आग भडकली तर चिनगाऱ्या [ ठिणग्या ] दक्षणपावेतों जातील; अखेरीस याचें विझणें आपणांसही कठिण पडेल. " जोधपुरकरांच्या या धमकीला नानांनीं तसेंच बाणेदार उत्तर पाठविलें. ते लिहितात—

" ज्या आजिथुबान[2] पर्वतावर अफजाले इलाहीच्या[3] मेघाची वृष्टि सर्वकाळ सदोदित अशी कीं, ज्या उदकापासोन कित्येक दर्या होऊन आलमांत[4] मुहीत जाले, त्या उमद्या पर्वतास फितने अंगेजांच्या[5] चिनगारियानें काय व्हावयाचें हें आपणांसही समजत आहे; व हमेश दक्षिणेकडोनच प्रताप समुद्राचे लोट व तरंग चहूंकडे अक्सर[6] हिंदुस्थानांत असे पोहचत गेले कीं, शायद ( साक्षात् ) फितन[7] व फिसादाची[8] आग कोठें राहिली नसावी. आयंदा[9] नेकनियती[10] रास्तरवी म्हणजे दोस्तानवाजी[11] व दुष्मनगुदाजी[12] सरकारचा स्वभाव आहे. त्याच्या बरकतीनें सर्व चीजा खुबीनें जहुरांत[13] येतील. हिंदुस्थानांतील तमाम सरदारांचा आपल्यांत इत्यफाक[14] अगर खिलाफ[15] यांची बारीकी सरकारांत पुरतेपणें समजली आहे. याचा अंदेशा सरकारांतही नाहीं. "

नानांच्या हुकमावरून तुकोजी होळकर व अलीबहाद्दर हे शिंद्यांच्या साह्याकरितां पुण्याहून निघून माळवा प्रांतांत गेले, परंतु तेथून पुढें दिल्लीकडे जाण्याविषयीं होळकर टाळाटाळ करूं लागले. त्यांच्या मनांत शिंद्यांच्या हाताखालीं काम करण्याचें बिलकूल नव्हतें. शेवटीं नानांचीं वारंवार पत्रें येऊं लागलीं आणि शिंद्यांचा सरदार अंबोजी इंगळे हाही त्यांना नेण्यासाठीं दाराशीं धरणें देऊन बसला, तेव्हां बापू होळकर व अलीबहाद्दर हे मात्र दिल्लीकडे जाऊन शिंद्यांना सामील झाले. नानांचा तगादा आणि शिंद्यांचीं आर्जवें यांना न जुमानतां तुकोजीराव रजपुतान्यांतच खंडण्या वसूल करीत स्वस्थ राहिले. शिंदे व होळकर या घराण्यांचें

१ भा. इ. सं. मं. सप्तम संमेलन वृत्त पृ. १६. २ मुसलमानांच्या पुराणांतील एक पर्वत. ३ अफजाले इलाहीच्या = परमेश्वरी कृपेच्या. ४ आलमांत मुहित जाले = पृथ्वीला वेष्टून राहिले. ५ फितने अंगेजांच्या = फितुराच्या पराक्रमाच्या. ६ सर्व. ७ फितूर. ८ दंगा. ९ पुढील तर्जुमा. १० इमानदारी. ११ मैत्रीचें पालन. १२ शत्रूचें शासन करणारा. १३ समजून १४ मैत्री. १५ खिलाफ = विघाड.

परंपरागत वितुष्ट होतेंच, त्यांतून दक्षिणेंतल्या मसलतींतून शिंद्यांनीं आतां-पर्यंत होळकरांना बहुत वेळ तोंडघशीं पाडलें होतें, आणि तें शल्य तुकोजीरावांच्या मनांत सतत बोंचत होतें. शिवाय याच वेळीं अहिल्याबाई व तुकोजीराव यांमधील तंटाही बराच विकोपास गेला होता. बाईकडून फौजेच्या खर्चाकरितां पैसा वेळेवर मिळत नाहीं, फौज इकडे उपाशी मरत असतांही तिकडे बाई भटाभिक्षुकांच्या नादीं लागून सर्व द्रव्य दानधर्मांत उधळून टाकते, अशी तुकोजीरावांची तकरार होती, तर उलट-पक्षीं आपण दिलेला पैसा फौजेच्या खर्चाकडे न लावतां तुकोजी वाईट व्यसनांत उडवून टाकतो असें अहिल्याबाईचें म्हणणें होतें! तुकोजीरावांच्या तकरारींत बराच सत्यांश होता. बाईनें फक्त खाजगीचा मुलूख आपल्याकडे ठेवून घेऊन बाकीचा सर्व सरंजामी मुलूख फौजेच्या खर्चाकरितां तुकोजीरावांच्या हवालीं करावा अशी नानांनीं बहुत खटपट केली. ही त्यांची खटपट सिद्धीस जाती तर होळकरी लष्कराची दैन्यावस्था दूर होऊन तें अधिक कार्यक्षम झालें असतें. परंतु शिंद्यांनीं अहिल्याबाईचा पक्ष स्वीकारल्यामुळें ही मायलेकांची धुसफूस तशीच कायम राहिली आणि शिंदे होळकरांमधील वितुष्ट वाढण्यास हें नवीनच कारण होऊन बसलें!

तिकडे शिंदे व अलीबहादर यांमध्येंही अशीच चुरस लागून राहिली. शिंद्यांनीं एखादी गोष्ट करावी आणि प्रत्येक वेळीं अलीबहादरांनीं त्यांना मोडता घालावा असें प्रत्यहीं होऊं लागलें. ही मराठे सरदारांमधील दुही शिंद्यांच्या वाईटावर असलेल्या रजपूत पठाण सरदारांच्या आयतीच पथ्या-वर पडली! रजपूत व पठाण सरदारांविषयीं शिंदे व होळकर या घरा-

---

१ दिल्लीच्या बादशहातींत वर्चस्व गाजविण्याच्या इच्छामुळें मराठी राजकार-णांत वेळोवेळ कशा चुका घडत गेल्या याचा प्रपंच हातीं घेतलेल्या विषयाला गैर लागू असल्यामुळें आम्ही या ठिकाणीं करीत नाहीं. इतकें मात्र नमूद करणें जरूर आहे कीं, होळकरांच्या या धोरणालाही इतिहास, परंपरा आणि मुत्सद्दीपणा यांचा मोठाच पाठिंबा होता. पानिपतानंतरचें मराठ्यांचें सामर्थ्य लक्षांत घेतलें तर स्थानिक लोकांना होता होईतों न दुखवितां त्यांना ताबेदारींत वागवून त्यांजपासून द्रव्य तेवढा फायदा करून घ्यावा हें होळकरांचें धोरण चुकीचें नव्हतें,

ण्यांचीं धोरणें भिन्न भिन्न होतीं. या लोकांत फूट पाडून नंतर त्यांचा कायमचा नायनाट करावा असें शिंदे घराण्याचें धोरण होतें आणि तेंच नानांसही मान्य होतें. उलटपक्षीं या लोकांना जिवंत ठेवूनच त्यांवर वर्चस्व गाजवावें असें होळकर घराण्याचें धोरण होतें. या मतवैचित्र्याचा फायदा घेऊन होळकरांच्या मिलाफीमुळें रजपूत राजे शिंद्यांविरुद्ध एकसूत्र होणार असा रंग दिसूं लागला. होळकर एवढेंच करून थांबले नाहींत, तर त्यांनीं शिंद्यांचा कट्टा शत्रु इस्माईल बेग यालाही गुप्तपणें आश्रय दिला! अलीबहादरानें तर शिंद्यांविरुद्ध फितूर करणाऱ्या अनुपगीर हिंमतबहादर नांवाच्या सरदाराला उघडपणें आपल्या लष्करांतच हट्टानें आश्रय देऊन ठेवून घेतलें. नानांना या गोष्टी अर्थातच पसंत पडल्या नाहींत. या संबंधींचीं त्यांचीं धोरणें त्यांच्या खालील पत्रांवरून चांगलींच व्यक्त होतात. नाना लिहितात

[ पत्र होळकरांस ] " परस्परें राजेरजवाडे यांत फूट असल्यानें यांत सरकार उपयोग असें आहे......दिल्लीचा बंदोबस्त जो करील त्यांस हे सारे एक असल्यानें ठीक पडणार नाहीं. कोणे समयीं काय करतील हा भरंवसा नाहीं. यांत फूट असल्यानें चांगलें असें आहे. आपण पहिल्यापासून यांचें रीतीस व चालीस माहीतच आहेत......तर कोठेकर यांस उपद्रव लागूं नये. व उदेपूरकर व कोठेकर यांची एकी असूं नये असें करावें. ......तिकडे पाटीलबावांवर मसलत. फौजेच्या बळाखेरीज त्यांनीं तरी काय करावें? आपण व ते एक होऊन फौजेचा जमाव होऊन सर्वांवर दाब बसोन कामच होईल. बखेडा लौकरच मोडेल. सरकारचा नक्ष राहील. याकरितां लौकर जाण्याचें करावें. याउप्पर दिवसगत लावल्यानें सरकारकाम बिघडेल."

( पत्र अलीबहादरांस ) " याउपर कोठें खटला न करतां व पाटीलबावांचे लक्षांत आहेत त्यांशीं राजकारण न करतां उगीच मुक्काम करून रहावें. ... त्यांजकडे जाऊन गोसावी हवालीं करावा आणि पूर्वींचे करारप्रमाणें बंदोबस्त करून देतील तो घ्यावा व रहावें. यांतून कांहीं न घडे त्याअर्थीं तेथें राहून फळ नाहीं. पूर्वींचे लिहिल्याप्रमाणें देशीं

१ भा. इ. सं. मं. अष्टमसंमेलन वृत्त पृ० ३२. २ सदर पृ. ४१.

यावें. पाटीलबावांस वाईट वाटे असें करूं नये."

सरदारांमधील यादवी मोडून सरकारकाम व्हावें याबद्दल नानांनीं खरमरीत पत्रें लिहून आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा करून पाहिली; परंतु त्याचा कांहींच उपयोग न होतां हें प्रकरण दिवसेंदिवस चिघळत चाललें. होळकर अंगचोरपणा करून आणि शत्रूला सामील होऊन आमचा नाश करूं पाहतात अशी शिंद्यांची तकरार, तर उलटपक्षीं शिंदे अरेरावीनें वागतात व पूर्वपरंपरा न पाहतां मन मानेल तसा कारभार करतात अशी होळकरांची तकरार! अलीबहादराचें तर असें म्हणणें होतें कीं, शिंदे व होळकर हे दोघेही सरदार चोर आहेत! ते आम्हांला न विचारतां परभारें संस्थानिकांच्या खंडण्या घेऊन गिळंकृत करतात आणि सरकारांत एक पैसा देखील जमा करीत नाहींत! याप्रमाणें तिघांची आपापसांत चुरस होती तरी शिंद्यांविरुद्ध एखादी गोष्ट करायची तर मात्र बाकीचे दोघे तत्काळ एक होत! शेवटी दुर्जय शत्रूंनाही कर्दनकाळ भासणारे पाटील-बावा या यादवीपुढें हताश झाले आणि या सर्व घोटाळ्याचें खापर त्यांनीं नानांच्या माथीं फोडलें! नानांची फूस मिळाल्यावरूनच हे दोघे अशी बदचाल धरतात अशी त्यांची ठाम समजूत झाली. आतांपर्यंत शिंद्यांची प्रत्येक अडचण दुरुस्त करण्याचा नानांनीं आपल्याकडून शक्य तो प्रयत्न केला. असें असतांही शिंद्यांनीं असा ग्रह करून घेतला कीं,—"इतकें केलें नानांनीं. अलीबहादर याचें सामर्थ्य किती! नानांनीं असें करवावें असा ऋणानुबंध नानांचा माझा नव्हता. परंतु गोसाव्याच्या (अनुपगीर) योगें करून अलीबहादर यांणीं करविला. याचे जाबसाल पुण्यास गेल्यावर नानांचे माझे रुबरू (समक्ष) होतील."[1]

याप्रमाणें नानांविषयीं शिंद्यांचा वाईट ग्रह होतांच त्यांनीं दिल्लीची मसलत होळकर व अलीबहादर यांजवर सोंपविली आणि ते रागारागानें पुण्याकडे निघाले. शिंदे दक्षिणेंत येणार ही वार्ता पसरतांच हिंदुस्थानांत चहूंकडे तर्ककुतर्कांची जाळीं माजूं लागलीं. टिपू, निजाम व इंग्रज यांपैकीं

---

१ भा. इ. सं. मं. सप्तम संमेलनवृत्त पृ. ४४.

प्रत्येकाला असा संशय वाटूं लागला कीं, आपल्याविरुद्ध मोहिमेची वाटाघाट करण्याकरितांच शिंदे पुण्यास येत आहेत! खुद्द महाराष्ट्रांत असा तर्क पसरला कीं, पेशवे व नाना यांची गठडी वळण्याकरितांच शिंदे येत आहेत! स्वतः शिंद्यांनीं दक्षिणेंत येण्याचें असें कारण जाहीर केलें होतें कीं, पातशहाकडून वकील मुतलखीचीं वस्त्रें मिळालीं आहेत तीं पेशव्यांना जाहीर दरबारांत अर्पण करण्याकरितांच आपण पुण्यास जात आहों. शिंद्यांचें हें सांगणें वरकरणी मात्र होतें. दक्षिणेंत येण्याचा त्यांचा खरा पोटांतला हेतु म्हणजे नानांशीं समक्ष सडकून भांडावें एवढाच होता, आणि हा त्यांचा हेतु नानांनीं आगाऊच ताडला होता! असो. शिंदे दिल्ली प्रांतांतून निघाले ते इंदुरास आले आणि त्यांनीं अहिल्याबाईशीं खलबत केलें. आणि नंतर त्यांनीं मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें ता. ११ जून १७९२ रोजीं पुण्यास येऊन संगमावर तळ दिला.

शिंदे आपल्याशीं भांडण्याकरितां आले आहेत हें नानांस कळलें होतें, परंतु हें भांडणच कोणत्या थराला जाईल याचा मात्र त्यांना कांहींच अंदाज लागेना. शिंदे हे आधींच शूर, अनुभवी आणि मसलती सरदार, त्यांतून ते पुण्यास आले ते बरोबर सोळा सत्रा पलटणें घेऊन जबरदस्त होऊनच आले होते. अशा स्थितींत पाटीलबावा जुलमानें आपणांस एखादी गोष्ट करावयास भाग पाडतील किंवा कदाचित् आपला द्रव्यापहार आणि मानभंगही करतील असें नानांस भय पडलें. शिंदे पुण्यास येतात तोंच आपणही तुमच्या साह्याकरितां दक्षिणेंत येतों असें होळकरांचें नानांस पत्र आलें. होळकर पुण्यास आले तर त्या मानानें शिंदे कमजोर होतील ही गोष्ट स्पष्ट होती. तथापि त्या दोघां सरदारांत भयंकर वितुष्ट वाढलें होतें, त्यामुळें ही मदत स्वीकारण्यांत थोडासा धोकाही होता. तसाच निर्वाणीचा प्रसंग पडला तर मात्र होळकरांना दक्षिणेंत आणवावें असा नानांनीं बेत ठरविला. नुकत्याच संपलेल्या पट्टणच्या स्वारींत इंग्रजांनीं आपलीं दोन पलटणें मराठ्यांच्या दिमतीस दिलीं होतीं. शिंद्यांचा मुक्काम दक्षिणेंत असेपर्यंत हीं पलटणें तशींच पेशवे सरकारच्या दिमतीस पुण्यास रहावीं असें नानांनीं इंग्रजांशीं बोलणें


लाविलें; परंतु इंग्रजांनीं हें बोलणें मान्य केलें नाहीं. स. १७९२ च्या नोव्हेंबरांत परशुरामभाऊ पट्टणच्या स्वारीचा हिशेब समजावण्याकरितां पुण्यास गेले. नानांनीं हा हिशेब समजून घेतांना भयंकर घासाघीस चालविली आणि त्या निमित्तानें भाऊंस वर्ष सहा महिने पुण्यासच अड-कून पाडिलें ! यांत त्यांचा असा हेतु होता कीं, शिंदे जबरदस्ती करूं लागतील तर आपल्याला अनुकूल असणारा तसाच एखादा जबरदस्त आपल्याजवळही असावा !

शिंदे व नाना यांची याप्रमाणें चित्तशुद्धता नव्हती तरी उभयतांनीं पर-स्परांशीं बाह्यतः सौजन्याची आणि प्रेमाची वागणूक ठेविली होती. शिंदे तर आपल्या बाजूनें इतकी लीनता स्वीकारीत कीं, ते नानासमोर गादीवर सुद्धां बसत नसत ! एका दरबारांत तर त्यांनीं पेशव्यांचे जोडे उचलण्याचें काम स्वतः केलें ! पुण्यास आल्याबरोबर शिंद्यांनीं पुणें दरबारास विनंती केली कीं, श्रीमंताकरितां वकील इ मुतलखीचा आणि मीर बक्षीगिरीचा बहुमान मी दिल्लीच्या पातशहाकडून मिळविला आहे तो श्रीमंतांनीं भर-दरबारांत जाहीरपणें स्वीकारावा. त्यांच्या या म्हणण्यावर नाना फडनवीस व हुजरातींतील मराठे मानकरी यांनीं अशी दिक्कत घेतली कीं, पादशहा-कडून या अधिकारांचीं फर्मानें आलीं आहेत त्यांत श्रीमंतास ' महाराजा-धिराज ' ही पदवी लाविलेली आहे. पेशव्यांनीं या पदवीचा स्वीकार केला तर त्यायोगें छत्रपतींचा अपमान होईल. अशी दिक्कत घेण्यांत येईल हें शिंद्यांनीं आगाऊच ताडलें होतें. त्यांनीं छत्रपतींकडून तत्काळ परवानगी मिळविली कीं, पातशहाकडून मिळालेली ' महाराजाधिराज ' ही पदवी पेशव्यांनीं घेण्यास आपली बिलकूल हरकत नाहीं ! यानंतर पेश-

स. १७९२ जून २२ — त्यांनीं मोठ्या समारंभानें दरबार भरवून या पादशाही हुद्यांचा स्वीकार केला. या हुद्यांबरोबरच पातशहानें पेशव्यांस पदवी दिली वी–" वकील इ मुतलख, अमीर उल उमरा, मुख्त्यारुल मुमालीक, मदारुल महाम, मसलत लजत उमेद आरा किनेखास, फात फार बफा-

---

१ ऐ. ले. सं. नं. ३४८२. या पदवीचें लांबीरुंदीचें क्षेत्रफळ लक्षांत घेतलें म्हणजे अलिकडील इंग्रजी पदव्या अगदींच क्षुद्र व आंखूड भासूं लागतात.



हरिपंत फडक्यांचें अक्षर.

दार, शीर्द साकार सादत मंद, ब्रजया दे बम फर्जंद खासूल खास, वालाजा, महाराजाधिराज राव पंडितप्रधान सवाई माधवराव नारायण बहादुर !

या समारंभानंतर शिंद्यांनीं आपले हिशेब पुणें दरबारास समजावण्याकरितां आणले होते त्याचें काम चालीस लागलें. स. १७८३ पासून स. १७९२ पर्यंत त्यांनीं हिंदुस्थानांत मोठमोठ्या मोहिमा केल्या आणि त्यापायीं त्यांना हजारों फौज बाळगावी लागली आणि कोट्यवधि रुपयांचें कर्ज उभें करावें लागलें होतें. त्या मानानें त्यांना फायदाही तसाच मोठ्या प्रमाणावर झाला होता. गेल्या नऊ वर्षांत त्यांनीं सुमारें कोट दीड कोट रुपये उत्पन्नाचा नवीन मुलूख संपादन केला. त्यांच्या या कर्जांत व मुलखांत पेशवे, शिंदे व होळकर अशा तीन वांटण्या होत्या. पाटीलबावांनीं आतां नऊ सालांचा जमाखर्च दाखविला त्यांत त्यांनीं पेशव्यांच्या वांटणीला सात कोट रुपये कर्ज दाखविलें होतें! कर्ज कांहीं आपण मागत नाहीं; पण सरकारच्या हिस्शाचा मुलूख आहे तो मजकडे रहावा म्हणजे मी त्यांत सारें समजून घेतों, असें त्याचें म्हणणें होतें. उलट पक्षीं नाना फडनवीसांनीं श्रीमतांस असें दाखवून दिलें कीं, शिंद्यांनीं आणलेला हिशेब बराचसा पोकळ आहे. सरकारच्या वांटणीला इतकें कर्ज मुळींच निघत नाहीं, सबब नवीन मुलूख सरकारांत ठेवून घेऊन शिंद्यांचें वाजवी कर्ज निघेल तें सोईसोईनें वारावें. या हिशेबसमजावणीच्या बाबतींत नाना व शिंदे यांचीं उत्तरें प्रत्युत्तरें होऊन तंट्यास खरी खुरी सुरवात झाली.

नाना आपल्याविरुद्ध जातात असें पाहतांच पाटीलबावांनीं एकदम रुद्ररूप धारण केलें! मागच्या सर्व उखाळ्या पाखाळ्या त्यांनीं उकरून काढल्या आणि नानांविरुद्ध अद्वातद्वा वल्गना सुरू केल्या. विशेषतः त्यांनीं एका गोष्टीबद्दल हट्ट धरला तो तर नानांच्या काळजासच झोंबला! मोरोबादादांची कैदेंतून मुक्तता करून त्यांचा अधिकार पुनः त्यांजकडे द्यावा अशी शिंद्यांनीं श्रीमंताजवळ पराकाष्ठेची रदबदल चालविली. फडनवीसांच्या दरकाला किफायत बरीच मोठी होती. शिवाय ‘ दरबारखर्च ’

म्हणून स्वराज्यांतून किंवा परराज्याकडून जी रक्कम पुणें दरबारला मिळे तींतही फडनवीसांचा हिस्सा मोठा असे. या सर्व उत्पन्नाचा उपभोग आज चौदा वर्षे एकटे नानाच घेत असत. या त्यांच्या उत्पन्नांत मोरोबाचाही निम्मा हिस्सा होता. मोरोबाची पुनः अधिकारावर स्थापना करून त्या उपकाराबद्दल त्यांच्या हिश्शाची बाकी नानांकडे येणें निघेल ती त्यांजकडून सक्तीनें वसूल करून स्वतःकडे घ्यावी असा आतां शिंद्यांनीं डाव योजिला. शिवाय मोरोबा मोकळा झाल्यावर त्याचा नानांना पायबंद बसून ते तेजोहीन होतील असाही त्यांचा कयास होता, व तो सर्वस्वीं बरोबर होता. पूर्वी सखारामबापूंनीं मोरोबाला चिथावून नानाविरुद्ध

इ. स. १७९२ सपटें. ते इ. स. १७९३ फेब्रु.

असेंच कारस्थान केलें होतें. परंतु त्यावेळीं शिंद्यांच्या जोरावर त्यांना त्या संकटांतून पार पडतां आलें. आतां खुद्द शिंद्यांनींच त्या कारस्थानाची पुनः उठावणी केलेली पाहतांच नानांचें धाबें दणाणलें !

शिंद्यांनीं असा हा जोर धरलेला पाहतांच ' आपणाला कारभार नको, आपण काशीयात्रेला निघून जातों ' असा नानांनीं श्रीमंताजवळ हट्ट

इ. स. १७९२ सपटें. ते इ. स. १७९३ फेब्रु.

धरला. नानांनीं असा हा हट्ट धरतांच परशुरामभाऊही आपण सरदारी सोडून नानाबरोबरच काशीयात्रेला जाणार असें म्हणूं लागले ! शिंदे नानांचा कारभार बळकावणार आहेत अशी त्यावेळीं पुण्यांत दाट भुमका पसरली होती. या बातमींत कांहीं सत्यांश असता तर नानांची ब्याद आयतीच काशीयात्रेला जात आहे असें पाहून त्यांना बहुत आनंद झाला असता. परंतु उलट शिंदे या काशीयात्रेला जोराचा विरोध करूं लागले ! वस्तुतः शिंदे किंवा परशुरामभाऊ यांना नानांचा हा त्रागा केवळ श्रीमंतांना भेडसावण्याकरितांच चालला आहे हें पक्कें ठाऊक होतें. हा ' काशीयात्रे ' चा घोळ पांच सहा महिने जोरांत चालू होता आणि त्या अवधींत नानांच्या त्राग्याचा त्यांना इष्ट असाच परिणाम घडून आला. कृतज्ञ श्रीमंतांनीं मोरोबाप्रकरणीं शिंद्यांना स्पष्ट नकार दिला आणि त्यामुळें नानांची बाजू चांगलीच सांवरली.

या प्रकरणांत अपयश आलें तरी कारभारांत ढवळाढवळ करण्याचा आणि लोकप्रीति संपादन करण्याचा शिंद्यांचा उद्योग सतत सुरूच होता. ज्या कोणाचीं गाऱ्हाणीं दूर होत नसतील त्यांची दाद शिंदे श्रीमंतांजवळ तत्काळ लावीत असत. श्रीमंतांनाही पाटीलबावांचा शब्द मोडणें जरा जडच वाटत असे. सातारकर छत्रपति बंदींत होते हें प्रसिद्धच आहे. आपणांस कांहीं मोकळिक मिळावी म्हणून त्यांनीं पाटीलबावाकडे बोलणें लाविलें तेव्हां शिंद्यांनीं छत्रपतींची श्रीमंतांकडे तत्काळ दाद लाविली! शिंद्यांनीं विनंति केल्यावरून छत्रपतींवरील नजरबंदीची सक्ती सौम्य करण्यांत आली आणि त्यांना माहुलीसंगमापर्यंत फिरावयास जाण्याची मोकळीक मिळाली!

लोकप्रीति संपादन करण्याच्या कामांत या छत्रपति प्रकरणापेक्षां पंतसचिवांच्या प्रकरणांत पाटीलबावांना उत्तम यश आलें. या सचिवप्रकरणाची हकीगत—रघुनाथराव चिमणाजी सचिव हे स. १७९१ सालीं वारले व त्यांचे जागीं त्यांचे पुत्र शंकरराव यांची स्थापना झाली. ते अल्पवयी होते सबब पेशवे सरकारांतून बाजीराव मोरेश्वर नांवाचा दिवाण त्यांच्या दिमतीस देण्यांत आला. सचिवांची सापत्न माता होती तिचें व त्यांचें वितुष्ट होतें. नवरा गेल्यावर ही बाई तशीच सकेशा राहिली आणि लवकरच तिचें व बाजीराव दिवाणाचें रहस्य जमलें. सचिवांना या गोष्टीचा राग येऊन त्यांनीं एके दिवशीं सापत्न मातेचे जबरदस्तीनें केस काढविले! या गोष्टीमुळें प्रकरण जास्तच चिडून एकीकडे पंतसचिव व दुसरीकडे त्यांची सापत्न माता व बाजीराव दिवाण असे पंतांच्या दौलतींत दोन पक्ष निर्माण झाले. एके दिवशीं पंतांच्या अन्नांत विष असल्याचें उघडकीस आलें त्यामुळें ते तावडतोब घराबाहेर पडले आणि जेजुरीस येऊन एका देवळांत राहिले. बाजीराव दिवाणानें नानांच्या विश्वासांतला शंकर जोशी नांवाचा एक तेलंग होता त्याला चाळीस हजार रुपये लांच देऊन त्याच्या मार्फत नानांस समजाविलें कीं, पंतांनीं सरकारची कैद मोडून बंड केलें आहे! त्यावरून नानांनीं हें बंड मोडण्याकरितां हिवरेकरांची पागा बाजीरावाच्या मदतीस दिली. नंतर या दिवा-

णजीनें हिवरेकर व त्यांच्या हाताखालचे पांच चार जमातदार यांना भरपूर लांच चारून त्यांच्या सहाय्यानें ता० २५ मार्च १७९३ रोजीं पंतावर एकाएकीं छापा घातला व त्यांना कैद केलें ! त्या गर्दीत थोडीबहुत कराचलीची मारामार होऊन पंताकडील दहा वीस असामी ठार पडले. खुद्द पंतांना चार जखमा लागल्या आणि त्यांची स्त्री म्हणजे प्रसिद्ध मुत्सद्दी सखारामबापू यांची कन्या—हिलाही एक जखम लागली.

मागच्या प्रकरणांतला घाशीराम कोतवाल व हा बाजी मोरेश्वर एकाच जातीचे क्रूरकर्मे होत. हे ' सद्गृहस्थ ' नानांच्या विश्वासास पात्र झाले त्यामुळें नानांस बहुत लोकापवाद सहन करावा लागला. सरकारांतून नेमून दिलेल्या कारभाऱ्यानें परभारें एखादा अत्याचार केला तर त्याचा दोष नानांच्या अंगीं लावणें हा उघड उघड अन्याय आहे. घाशीराम-प्रकरणांतही नानांच्या शिरावर कोणताच दोष येऊं शकत नाहीं. घाशी-राम सावळादास याला स. १७८२ सालीं पुणें शहरची कोतवाली मवत्यानें मिळाली. घाशीरामाचें पुणें दरबाराकडे कर्ज येणें होतें, शिवाय त्यानें त्या दरबाराच्या दुसऱ्या एका सावकाराचा हवाला घेतला, त्यामुळेंच त्याला हा हुद्दा देण्यांत आला होता. एरवीं घाशीरामाचा नानांकडे दुसरा कोणताच वशिला नव्हता. पांडुरंग कृष्ण सरअमीन याला विचा-रल्याशिवाय कोतवालानें कोणताही कारभार करूं नये अशी नानांची सक्त ताकीद होती. असें असतां घाशीरामानें आपलें कृत्य इतक्या गुप्तपणें केलें कीं, त्याचा सुगावा खुद्द सरअमीनालाही लागला नाहीं. मग नानांस कोठून लागणार ! या बाबतींत हलगर्जीपणाचा कांहीं दोष देतां येण्या-सारखा असेल तर तो घाशीरामाचा जोडीदार पांडुरंग कृष्ण सरअमीन यालाच देणें वाजवी आहे. असें असतां स्वकीय अज्ञ जनांनीं व परकीय तज्ज्ञ इतिहासकारांनीं या घाशीराम प्रकरणाचें सर्व खापर नानांच्याच माथीं फोडलें आहे ! त्यांचें म्हणणें, दिल्ली कलकत्ता अशा दूरदूरच्या सूक्ष्म बातम्या मिळविणाऱ्या नानांना पुणें प्रांतांतल्या किंवा खुद्द पुण्यांतल्या बातम्या कशा कळल्या नाहींत ! नानांची संमति असल्याशिवाय पुण्यांत

१ स. मा. रोजनिशी भाग तिसरा पृ० १४९.

दिवसाढवळ्या असले गुन्हे घडतील कीं काय? यावरून त्यांचा कारभार ढिलें व जुलमी होता हें निर्विवाद सिद्ध होतें! परंतु हा युक्तिवाद चुकीचा आहे. नानांना अतींद्रियदृष्टि नव्हती त्यामुळें हाताखालच्या लोकांचीं दुष्कृत्यें त्यांना एखादे वेळीं ओळखतां आलीं नाहींत तर तो त्यांचा दोष मानतां येत नाहीं. शिवाय अशा एक दोन उदाहरणावरून त्यांचा सर्वच कारभार जुलमी होता असें अनुमान काढणें हा घडघडीत सत्यविपर्यास होय! हल्लींसुद्धां इतका कडेकोट बंदोबस्त असतांही सरकारनें नेमलेल्या कारभाऱ्यानें संस्थानांत मन मानेल तसा धुमाकूळ घालावा किंवा एखाद्या सरकारी अधिकाऱ्यानें शिस्तीच्या नांवाखालीं वाटेल तितके खून पाडावेत असेही प्रकार क्वचित् होऊं शकतात हे वाचकांना आतां नव्यानें सांगावयास नकोच! नानांच्या कारभाराचें वैशिष्ट्य हेंच कीं, त्यांनीं अशा अपराध्यांना देहांतप्रायश्चित्तें दिलीं. परंतु आतां मात्र अशा गुन्हेगारांना एखादे वेळीं कोणतीच शिक्षा होत नाहीं!

या सचिव प्रकरणाचा पाटीलबावांनीं मात्र चांगलाच फायदा घेतला. त्यांनीं नानांच्या कारभाराची मनःपूत निंदा केली आणि भरदरबारांत "असें होऊं नये. चाकरानें धन्याची अब्रू घ्यावी हें चांगलें नव्हे. याविशींचा बंदोबस्त स्वामींनीं करावा अथवा मला आज्ञा जालीया मी करीन.'[1] असा त्यांनीं श्रीमंतांस खडसून अर्ज केला. शिंदे इतकें बोलूनच थांबले नाहींत, तर त्यांनीं जेजुरीस पलटण पाठवून सचिवांची कैदेंतून मुक्तता केली आणि त्यास बहुत गौरवानें आपल्याजवळ ठेवून घेतलें. शिंद्यांनीं याप्रमाणें नेट धरतांच सरकारांतून गुन्हेगारांचीं पारिपत्यें तावडतोब करण्यांत आलीं. परंतु त्यांचें तेवढ्यानें समाधान झालें नाहीं. त्यांचा दिवाण आबा चिटणीस यानें हीं पारिपत्यें अमुक स्वरूपाचींच झालीं पाहिजेत असा श्रीमंतांजवळ दोन चार वेळां दाटून अर्ज केला. तेव्हां पेशव्यांनीं "जें[2] केलें तें सरकारांतून समजून केलें. तुम्ही दाटका करून विचारल्यास काम पुरशीस (!) होईल" असें उत्तर केलें. एकंदरींत या सचिव-प्रकरणांत श्रीमंतांना नानांची बाजू चांगलीच सांवरावी लागली.

---

१ ऐ. ले. सं. नं. ३५०६. २ ऐ. ले. सं. नं. ३५०९.

नाना व शिंदे यांमधील स्पर्धेला दिवसेंदिवस जास्तच भयंकर स्वरूप प्राप्त होऊं लागलें. शिंदे पुण्यास येणार असें पाहतांच मोंगलांचा दिवाण मैनुद्दौला ऊर्फ मशीर-उल्मुल्ख यानें हरिपंत फडक्याशीं हळूच बोलणें काढलें कीं, 'शिंद्यांचें व नानांचें वाकडें आहे. शिंदे पुण्यास आल्यावर कांहींतरी कुरापत काढून नानांच्या जीवास अपाय करतील असें आम्हांस भय वाटतें. नानांची व आमची पुरातन दोस्ती, आम्ही या प्रसंगीं वाटेल ती कुमक द्यावयास तयार आहों. फक्त बेदर सुभ्याचा चौथाई-वरील मराठ्यांनीं आपला हक्क सोडावा एवढेंच आमचें म्हणणें आहे. नानांनीं आमचें हें मागणें मंजूर केलें तर शिंद्यांकडून त्यांना आम्ही कोणताही उपसर्ग लागूं देणार नाहीं.' नानांनीं त्या वेळीं निजामाचें हें मायावी बोलणें झिडकारलें होतें. परंतु आतां खुद्द शिंद्यांचीच फूस मिळाल्यामुळें निजाम पन्नास हजार फौज बरोबर घेऊन भागानगराहून निघून बेदरास तळ देऊन राहिला. आणि त्यानें पुण्यावर स्वारी करण्याचा रोख दाखविला. पाटीलबावांनीं निजामाचें प्यादें इरेस घालून हा जो नवीन राजकीय डाव टाकिला, त्यामुळें पुणें दरबार भीतीनें गडबडून गेलें. या डावाची माहिती खुद्द नानांच्या शब्दांतच येथें देतों.— "शिंदे[1] येथें आहेत त्यांची चाल सुधी नाहीं. नबाबाकडे त्यांचें राजकारण आहे. बेदर सरकारच्या चौथेचा अंमल स्वराज्याचा आहे तो ( शिंद्यांनीं ) नबा-बास द्यावा, नबाबांनीं शिंद्यांस बीड परगणा अगदीं द्यावा व ( पुण्यास येऊन ) आमचा बंदोबस्त करावा. आपण श्रीमंताजवळ राहून दौल-तीचा कारभार करावा असाही डौल आहे." शिंद्यांनीं नबाबापासून बत्तीस लाख रुपये खाल्ले आहेत अशीही त्या वेळीं पुण्यांत दाट वदंता पसरली होती. याप्रमाणें पडद्याआड या पुण्याच्या स्वारीची पूर्व तयारी जारीनें चालूं असतां बाह्यतः मात्र निजामानें एका नवीनच दरबारी उप-नाटकाला सुरवात केली. त्याचा नानांस निरोप आला कीं, 'श्रीमंतांचें पहिलें कुटुंब वारल्यामुळें त्यांचें आतां दुसरें लग्न होणार अशी आम्हाला बातमी लागली आहे. श्रीमंताबद्दल आम्हांस पुत्रवत् प्रेम वाटतें सबब

१ ऐ. ले. सं. नं. ३६३२.

त्यांचें हें लग्न पुण्यास न होता आम्हांसमक्ष बेदरास व्हावें. आम्ही सर्व समारंभ मोठ्या थाटाचा करणार आहों.' यावर नानांचें उत्तर गेलें कीं, 'आमच्या जातींत दुसऱ्या लग्नाचा मोठासा समारंभ करण्याचा दस्तुर नाहीं. शिवाय ज्याचा आपण समारंभ करणार तें श्रीमंतांचें दुसरें लग्न होऊन सुद्धां गेलें आहे !' यावर निजामाचा पुनः निरोप आला कीं, 'दुसरें लग्न झालें तरी कांहीं बिघडलें नाहीं. आम्ही आतां पुण्यासच येतों. आमच्या संतोषाकरितां श्रीमंतांचें आणखी तिसरें लग्न करावें !' एकूण नबाबाच्या दृष्टीनें लग्न म्हणजे पानसुपारीच्या समारंभाइतकीच साधी गोष्ट होती म्हणावयाची !

इकडे निजामाची याप्रमाणें धामधूम चालूं असतां तिकडे माळव्यांत मोठाच अनर्थ घडून आला ! त्या प्रांतांत शिंदे होळकरांच्या फौजा खंडणीच्या निमित्तानें फिरत असतां त्यामध्यें चुरस वाढून लाखेरीच्या मुक्कामीं उभयपक्षाचें तुंबळ युद्ध झालें. त्या युद्धांत शिंद्यांच्या फौजेनें तुकोजी होळकरांचा सर्वस्वीं नाश केला. ही लढाई इतक्या चुरशीची झाली कीं, होळकराकडील शेवटचा शिपाई मारला जाईपर्यंत उभयपक्षीं हत्यार थांबलें नाहीं! या पराजयानें चिडून जाऊन होळकरांनीं उज्जनीवर स्वारी करून ती राजधानी लुटून फस्त केली ! खुद्द अहिल्याबाई ही डेरेदाखल झाली आणि तुकोजीरावांच्या साह्याकरितां फौज जमा करूं लागली. या अनर्थाचीं वर्तमानें पुण्यास आल्यावर तेथें मोठीच चळवळ उडाली. शिंदे असला एखादा चमत्कार पुण्यासही करून दाखवितात कीं काय अशी सर्वांना भीति पडली ! परंतु नाना व शिंदे दोघेही समजूतदार असल्यामुळें तसा कोणताच प्रकार घडून आला नाहीं. शिंदे-होळकरांनीं लढाई बंद ठेवून आपापल्या हद्दींत स्वस्थ रहावें, त्यांच्या तंट्याचा निर्णय पुणें दरबार करील तो उभयतांनींही मान्य करावा असा पेशव्यांचा हुकूम झाला आणि तो शिंद्यांनीं मोठ्या आनंदानें मान्य केला. नंतर अहिल्याबाई व तुकोजीराव यांची समजूत घालण्याकरितां नानांनीं देवराव हिंगणे यांची इंदुरास रवानगी केली.

स. १७९३ मे.

या लाखेरीच्या लढाईचा नानांच्या मनास मोठाच धक्का बसला. आपल्या पक्षांतील तुकोजी होळकर यांची शिंद्यांनीं अशी दुर्दशा केली त्याअर्थी ते आतां आपलीही गठडी वळवणार आणि दिल्लीच्या पातशहा-प्रमाणेंच पेशवेही शिंद्यांच्या हातचें मेणाचें बाहुलें बनणार असें त्यांना भय पडलें. निजाम व शिंदे एक झाल्यावर त्यापुढें नानांचेंच काय, पण खुद्द पेशव्यांचेंही कांहीं चालण्यासारखें नाहीं ही गोष्ट सर्वांनाच स्पष्टपणें दिसत होती. शिंद्यांच्या जबरदस्तीमुळें पुणें दरबारचें राजकीय वातावरण या-प्रमाणें निराशा, असंतोष, उद्वेग, संशय आणि संताप या कालमेघांनीं अगदीं व्याप्त होऊन गेलें होतें. त्यांतच नाना व शिंदे यांमधील कल-हाग्नीचें घर्षण सुरू झालें असतें तर विजा कडकडून मोठाच अनर्थ झाला असता ! परंतु तसा प्रकार मात्र बिलकुल घडून आला नाहीं. परशु-रामभाऊ लिहितात-" श्रीमंतांचें पुण्य विचित्र आहे. ते पक्षीं कांहीं घडणार नाहीं. राजश्री नानांचा व शिंद्यांचा ऋणानुबंध चांगला. ते ते स्वच्छतेनें आहेत ते पक्षीं सर्वही नीटच होईल. बांकडें व्हावयाचें नाहीं. उगीच आभाळें येतात जातात असा प्रकार आहे." ' उगीच आभाळें येतात जातात ' हें भाऊंचें निदानच शेवटीं शब्दशः बरोबर ठरलें. नाना व शिंदे यांनीं हरीपंत फडक्यांच्या मध्यस्थीनें आपापसांतील द्वेगाला काय-मची मूठमाती दिली. पेशवाईचा कारभार गाजविण्याची हांव शिंद्यांनीं सोडून दिली, त्यामुळेंच त्यांचें व नानांचें सख्य जमून आलें. शिंद्यांच्या सहाय्यानें निजाम पुण्यावर स्वारी करणार असा देखावा दिसत असतां आयत्यावेळीं नाना व शिंदे हे एकाएकीं एकसूत्र झाले आणि त्यांनीं एक मतानें उलट निजामावरच स्वारी करण्याचा बेत कायम ठरविला ! या निजामाच्या स्वारीला स्पष्ट रंगरूप येण्यापूर्वींच पाटीलबावा ता. १२ फेब्रु. १७९४ रोजीं नवज्वराच्या विकारानें एकाएकीं देवाधीन झाले. शिंद्यांच्या मृत्यूनें मराठी राज्याची हानि झाली ती पुढें कधीं भरून निघालीच नाहीं.

वरील विवेचनावरून एक गोष्ट स्पष्ट होते. ती अशी कीं, नाना व शिंदे या दोन राष्ट्रपुरुषामध्यें एकमेकाविषयीं सरासरा आदरभाव नांदत

१ ऐ. ले. सं, नं, ३६३२,

होता. गेल्या वीस वर्षांत नानांनीं राजकारणाचीं जीं जीं धोरणें ठरविलीं त्यांना शिंद्यांनीं मनःपूर्वक पाठिंबा दिला आणि शिंद्यांनीं ज्या ज्या मसलती केल्या त्यांना नानांनीं प्रामाणिकपणें हातभार लाविला. प्रत्येक महत्वाची गोष्ट दोघेही एकमेकांना विचारल्याशिवाय करीत नसत. दोघांमध्यें वारंवार मतभेद उत्पन्न होत-भांडणें होत-दोघेही वर्दळीवर येत-शिंद्यांच्या बाजूनें खूपशी बडबड होई त्यामुळें या मतभेदांचा बभ्राही अतीशय होत असे! परंतु इतकें होऊनही या यादवीचा शत्रूला मात्र कोणताच फायदा मिळत नसे. बुद्धीच्या जिवंतपणामुळें तीव्र मतभेद उत्पन्न होत. परंतु ते कितीही तीव्र झाले तरी प्रखर राष्ट्राभिमानामुळें त्यांना औचित्याची मर्यादा ओलांडून पलीकडे जाववत नसे. 'नानांचा व माझा भाऊपणा, फडणिशी माझी आणि सरदारी नानांची' असें शिंदे वारंवार म्हणत असत. या भाऊपणाच्या कल्पनेंतच नाना व शिंदे यांमधील तंट्याचें बीज सांठवलेलें आहे. शिंद्यांची हजारों फौज समीप असतां नानांस स्वसंरक्षणाची जरूरी बिलकूल भासली नाहीं. ते एकटे दुकटे निर्भयपणानें कोठेंही खुशाल वावरत असत. पुढें सात वर्षांनीं पाटीलबावांच्या चिरंजीवाशीं म्हणजे दौलतराव शिंद्याशीं नानांचीं गांठ पडली तेव्हां त्यांना स्वसंरक्षणार्थ सहा हजार आरब जवळ बाळगावे लागले आणि इतकेंही करून शेवटीं त्यांचे धिंडवडे व्हावयाचे ते झालेच! बंधुत्वाचें भांडण आणि शत्रुत्वाचा द्वेष यांमध्यें फरक आहे तो असा!

नाना व शिंदे यांमधील स्पर्धेला जास्त भडक रंग देण्यांत तत्कालीन इंग्रज मुत्सद्यांनीं व इंग्रज इतिहासकारांनीं बराच पुढाकार घेतला आहे. मराठामंडळांत नवीन फाटाफूट उत्पन्न करणें किंवा असलेली फाटाफूट ज्यास्त विस्तृत करणें हें इंग्रजांच्या राजनीतिचें प्रधान अंगच होतें. याच्या पुढची पायरी म्हणजे आपल्याला इष्ट असलेली गोष्ट आगाऊच घडून आलेली आहे असा चहूंकडे डांगोरा पिटणें ही होय. शिंदे पेशव्यांची सत्ता झुगारून देऊन स्वतंत्र राज्य स्थापणार आहेत आणि नाना व शिंदे यांमध्यें भयंकर द्वेष माजलेला आहे अशा काल्पनिक गोष्टींचें इंग्रजांनीं अवास्तव स्तोम माजविलें तें याच हेतूनें होय. वस्तुतः शिंदे व नाना हे

दोघेही इंग्रजांना शत्रुस्थानींच वाटत होते. त्यातल्यात्यांत नानांविषयीं त्यांचा द्वेष निस्सीम होता. शिंदे नवज्वारानें मृत्यु पावले ही गोष्ट प्रसिद्ध असतां नानांनीं केलेल्या विषप्रयोगामुळें शिंद्यांना मरण आलें असें फ्रेजर साहेबानीं आपल्या इतिहासांत दडपून लिहून ठेवलें आहे ! इंग्रजांनीं शिंदे व नाना यांविषयीं असल्या या कंड्या उठविल्या त्यांना ऐतिहासिक सत्याचा काडीमात्र आधार नाहीं.

स. १७९४ हें साल नानांना अगदींच वाईट गेलें. कारण शिंद्यांच्या पाठोपाठ निर्दय काळानें हरीपंत फडक्यांवरही झडप घातली. अलीकडे पांच चार वर्षें फडक्यांची प्रकृति पोटशूळाच्या विकारानें बरीच हैराण होती. तोच विकार बळावत जाऊन ता. २० जून १७९४ रोजीं सिद्धटेक येथें तात्यांचें देहावसान झालें. हरीपंतांच्या मृत्यूमुळें नानांचा उजवा हात गळाला आणि त्यांच्या कारस्थानीचें तेज यापुढें पदोपदीं फिकें पडूं लागलें.

---

# प्रकरण बारावें.

## खर्ड्याची स्वारी.

[ सन १७९४ सपटें.–सन १७९९ जून. ]

शिंद्यांनीं दिल्लीच्या पातशहास अंकित केलें ही गोष्ट हैदराबादेच्या मुसलमानांस रुचली नाहीं. मोंगल बादशहा व त्याच्या कुटुंबांतील माणसें यांनींच फक्त नालखी हें वाहन वापरावयाचें असे. हें वाहन वापरण्याचा मान आणि वकील मुतलखीचा किताब पूर्वी एकदां महंमदशहा बादशहानें निजामुल्मुल्ख यांस दिले होते. आतां तेच बहुमान शहाअलम बादशहाकडून सवाई रावसाहेब पेशवे याकरितां महादजी शिंद्यांनीं मिळविले ही गोष्ट निजामअलीस असह्य झाली.

बारभाईच्या कारस्थानानंतर दादासाहेबांचा बंदोबस्त व टिपूचें पारिपत्य या दोन मसलतींतच नानांचीं वीस बावीस वर्षें मोडलीं. या अवधींत या मसलतींच्या पेंचामुळें त्यांना निजामास तीस लक्षांची जहागीर देऊन त्याची मर्जी वेळोवेळ खूष ठेवावी लागली. कोणत्याही प्रसंगीं निजामाच्या सहाय्याचा नानांना विशेषसा उपयोग होऊं शकला नाहीं, तथापि त्यानें शत्रुपक्षास मिळूं नये एवढ्याकरितांच त्यांना ही तरतूद करावी लागली. निजामाची व मराठ्यांची ही दोस्ती कायमची टिकणें मात्र अशक्यप्रायच होतें. बाळाजी विश्वनाथ पेशवे यांनीं पूर्वी बादशहाकडून दक्षिणच्या सहा सुभ्यांच्या चौथ सरदेशमुखीच्या सनदा मिळविल्या होत्या व त्या सनदांच्या जोरावर मराठे निजामाच्या राज्यांतून या हक्कांचा वसूल आतांपर्यंत सक्तीनें घेत असत. मराठ्यांनीं मोंगलांवर जें हें खोगीर लादलें होतें तें त्यांना असह्य झालें होतें. गेल्या पाऊणशें वर्षांत मराठे व निजाम यामध्यें जे युद्धप्रसंग घडून आले त्यांच्या मुळाशीं हा चौथ सरदेशमुखीचा तंटाच होता. नारायणराव पेशव्यांच्या खुनानंतर मराठमंडळांत यादवी माजली तिचा फायदा घेऊन निजामानें हा मराठ्यांचा वसूल तहकूब ठेवला. मराठ्यांची ही बाकी तुंबतां तुंबतां आतां तिची बेरीज तीन कोट रुपयेपर्यंत वाढली होती! निजामाची मर्जी संभाळण्याची जरूरी होती तोंपर्यंत नानांनीं त्याच्या या कारवाईकडे डोळेझांक केली, परंतु टिपूवरची मोहीम संपल्यावर पुणें दरबारास थोडीशी स्वस्थता लाभली आणि निजामानें पेशवेसरकारची सर्व बाकी एकदम चुकती करावी अशाबद्दल नानांनीं निजामाच्या दरबारांत तगादा बसविला. दिल्लीदरबारांतलें वर्चस्व आणि चौथ सरदेशमुखीची बाकी हींच खड्यांच्या स्वारीचीं प्रमुख कारणें होत.

नाना फडनवीस ही बाकी आपणांस कधीं तरी ओकावयास भाग पाडतील हें भय निजामाच्या डोळ्यासमोर आज बरींच वर्षें उभें होतें. इंग्रज, फ्रेंच व टिपू यांची मराठ्यांविरुद्ध मदत मिळवावी अशी निजामानें आतांपर्यंत बरीच खटपट केली, परंतु त्याच्या या खटपटीस कोठेंच यश आलें नाहीं. नाना व शिंदे यांच्या तंट्यांत आपणाला कांहीं लभ्यांश

होईल अशीही त्याला बरीच आशा वाटत होती, परंतु या बाबतींत त्याची कशी निराशा झाली हें मागच्या प्रकरणांत सांगितलेंच आहे.

मैनुद्दौला उर्फ मशीरुल्मुल्ख नांवाचा उमराव यावेळीं निजामाचा दिवाण होता. या दिवाणाला मराठ्यांबद्दल पराकाष्ठेचा द्वेष वाटत असे. पुणें दरबारचा बाकीबद्दल तगादा बसला तेव्हां त्यानें आपल्या धन्यास बोध केला कीं, 'मराठे तीस लक्षांची जहागीर व तीन कोट रुपये मागतात. एवढी रक्कम देऊन त्यांची मर्जी संपादन करण्यापेक्षां त्या पैशाच्या जोरावर फौज उभी करून नशीबाची परीक्षा कां पाहूं नये ! महादजी शिंदे व हरीपंत फडके यांच्या मृत्युमुळें आतां मराठमण्डळांत कोणी कर्ता पुरुष राहिला नाहीं. एकटा नाना फडनवीस अजून जिवंत आहे, तो थोडीबहुत टुरटुर लावील, परंतु आपण याप्रसंगीं थोडासा नेट धरला तर आपणाला त्याच्या नाड्या सहज आवळतां येतील ! आपले सर्व प्रयत्न या प्रसंगीं एकवटून मराठ्यांचें जोखड कायमचें झुगारून देण्याची ही नामी संधि आलेली आहे.' निजामाला हा सल्ला मानवला आणि त्यानें मराठ्यांविरुद्ध एक एक कुरापत काढण्यास सुरवात केली. वऱ्हाडांत नागपूरकर भोंसल व निजाम यांच्या वांटण्या होत्या, परंतु आतां निजामानें त्या प्रांतांतला भोसल्यांचा अंमल उठवून लाविला. कांहीं पठाण सरदार पुण्यास आले आणि त्यांनीं मराठी फौजेंत फंद फितूर सुरू केला. मशीरानें तर हैदराबादेहून नाना फडनवीसांवर मारेकरी पाठविले ! नाना नेहमीच सावध रहात असल्यामुळें या मारेकऱ्यांचा कांहीं एलगार चालला नाहीं ही गोष्ट निराळी.

इतकें झालें तरी निजामाचीं समेटाचीं बोलणीं पुणें दरबाराशीं शेवटपर्यंत चाललींच होतीं. पण तीं बोलणीं मनापासूनचीं नव्हतीं हें सहज लक्षांत येण्याजोगें होतें. पेशव्यांचे वकील गोविंदराव काळे यांनीं निजामअलीस भर दरबारांत कळविलें कीं, तुम्हांकडे पेशवे सरकारचें देणें दोन कोटी साठ लक्ष रुपये निघतें. त्याबद्दल या यादी पहा आणि देण्याचा फडशा करा. यावर दिवाण मशीरुल्मुल्ख यादी पाहून बोलला कीं, या हिशेबाच्या मानगडी आम्हांस समजत नाहींत व तुम्हांसही समजावून देतां

येत नाहींत. खुद्द नाना फडनवीसांनीं येथें यावें आणि आमची कशी ती समजूत घालावी. यावर काळ्यांनीं उत्तर केलें कीं नानांस फार कामें आहेत. ते येथें कसे येणार ? यावर मशीर आवेशानें म्हणाला, कसे येणार ? आत्तां दाखवितों तुम्हाला कसे येणार ते ! असलीं उत्तरें प्रत्युत्तरें ज्या दरबारांत झालीं त्या दरबारांत समेटाची गोष्ट कोठून घडून येणार ! हैदराबादेच्या मुत्सद्यांनीं पेशवे व नाना यांची सोंगें दरबारांत आणवून त्यांचा उघड उघड उपमर्द केला. मोंगल सरदार वल्गना करूं लागले कीं, आतां आपण पुण्यावर स्वारी करून तें जाळून टाकूं आणि पेशवे व नाना फडनवीस यांना लंगोट्या नेसवून आणि त्यांच्या हातीं भोपळे देऊन त्यांची काशीस रवानगी करूं !

निजामाकडून इतकी आगळीक झाल्यावर नानांनींही त्याच्या पारिपत्याची तयारी तशाच मोठ्या प्रमाणावर केली. महादजी शिंदे मरण पावल्यावर त्यांची सरदारी त्यांचे दत्तक पुत्र दौलतराव यांस मिळाली होती. दौलतरावांनीं श्रीमंतांच्या हुकमावरून आपले कंपू व फौज हिंदुस्थानांतून दक्षिणेंत आणविली. त्याशिवाय नागपूरकर भोसले, होळकर, पटवर्धन, रास्ते वगैरे मराठी राज्यांतले तमाम सरदार व हुजरातींतील समस्त पागे व पथके यांच्या फौजा नानांनीं या मोहिमेकरितां एकत्र केल्या. पानिपतच्या स्वारीनंतर फक्त या खड्यांच्या स्वारींतच मराठी राष्ट्राचें सर्व सैन्यबळ एकवटलें होतें. पेशवे व नाना हे स्वतः या स्वारीवर निघाले. पेशव्यांची स्वारी फौज जमा करीत करीत पुण्याहून निघाली तिचा मुक्काम विंचरणा नदीवर फकिराबाद घानोरें येथें येतो तों मराठी फौजेची संख्या एक लक्ष तीस हजारावर गेली ! अघाडीस शिंदे, भोसले व हुजरात अशी साठ सत्तर हजार फौज चालत होती. या अघाडीच्या फौजेवर बाबा फडके हे मुख्य सरदार होते.

तिकडून निजामही सव्वा लक्ष फौज बरोबर घेऊन मराठ्यांवर चालून आला. त्याच्या फौजेंतल्या एका टोळीनें जोगाईचें आंबें या क्षेत्राचा विध्वंस केला. लढाईच्या ऐनवेळीं निजामाचें गोविंदराव काळ्यांच्या मार्फत सल्ल्याचें शेवटचें बोलणें झालें. त्यांत चौथाईची बाकी व तीस

लक्षांची जहागीर परत देण्याविषयींचे मुद्दे होते. या बोलण्यावर पेशवे व नाना फडनवीस यांनीं एकच उत्तर केलें कीं, मशीरुल्मुलूख यास कारभारांतून काढून कैदेंत ठेवावें व आमच्या सल्ल्यानें नबाबानें कारभार करीत जावा. या दोन गोष्टी नबाबास कबूल असतील तर बाकीच्या कलमांचा फडशा कसा तरी होईल. मराठ्यांच्या या दोन अटी निजामाला पटल्या नाहींत व तो मोहोरीचा घांट उतरून खर्ड्याच्या किल्यानजीक खैरा नदीवर येऊन उतरला. नबाबाची स्वारी आतां परांड्याच्या रोखानें चालून जाणार असा संभव दिसतांच शिंदे व भोसले हे मोंगलांवर चालून गेले. कलागतीला आतां खरीखुरी सुरवात होणार असें पाहून श्रीमंतांनीं परशुरामभाऊंची अघाडीवर रवानगी केली आणि लढाईच्या सर्व तरतुदी त्यांच्या आज्ञेस अनुसरून व्हाव्या असा अघाडीच्या सर्व सरदारांस हुकूम पाठविला.

ता. ७ मार्च १७९५ रोजीं मराठे व मोंगल यांची थोडीशी चकमक होऊन तींत मोंगलाची सरशी झाली आणि निजामाचा मुक्काम आणखी एक कोस पुढें आला. ता. १० मार्च रोजीं खर्ड्याची मोठी लढाई झाली. त्या दिवशीं मोंगल कूच करून चालला असतां परशुरामभाऊंनीं त्याशीं गांठ घातली. भाऊंबरोबर फडके, शिंदे, होळकर, भोसले यांच्याही फौजा व कवाइती पायदळ वगैरे सरंजाम होता. उभयपक्षाचीं सैन्यें युद्धास सज्ज होऊन राहिलीं असतां परशुरामभाऊ पुढें एक टेकडी होती तेथपर्यंत जाऊन टेहळणी करीत होते. इतक्यांत मोंगलाकडील सरदार भारामल व असदअलीखान यांनीं अकस्मात् भाऊंवर चालून घेतलें. त्या ठिकाणीं मोठी लढाई होऊन भाऊंस जखमा लागल्या व पुष्कळ लोक ठार व जखमी झाले. ते मोंगल सरदार भाऊंस टेकडीपासून अर्धा कोसपर्यंत मागें सारून त्याच टेकडीवर जागा कायम करून राहिले. हें पाहतांच मोंगलांची इतर फौज व मुसा रेमूचीं पलटणें यांनीं भाऊंच्या डाव्या बाजूस शिंदे होते त्यांवर चाल केली. त्यावेळीं शिंद्यांनीं तोफांचा व भोसल्यांनीं बाणांचा भडिमार मोंगलांवर मनस्वी केला. तेव्हां मोंगलाई फौज व पलटणें कचकरून मागें हटूं लागलीं. शत्रूची फौज

याप्रमाणें थोडीशी विस्कळीत होतांच भाऊंनीं आपली सर्व फौज त्यावर उठविली. ' सरकारची चाळीस हजार तरवार उठली ' तेव्हां असद-अलीखानाच्या फौजेची दाणादाण उडाली. मागून रेमूची पलटणें व इतर मोंगल फौज यांचीही तीच दुर्दशा झाली. तों अस्तमान होऊन अंधार पडूं लागला, त्यामुळें मोंगलाई लष्करांत पराकाष्ठेची अव्यवस्था व तारांबळ होऊन तें लष्कर लुटलें गेलें. ती दशा पाहतांच निजाम घाबरा होऊन खड्यांच्या गढींत शिरला. रात्रभर त्याच्या लष्कराची एकसारखी लुटालूट सुरूच होती.

लढाईची खरी हकीगत अशी असतां डफसाहेब आपल्या इतिहासांत लिहितात कीं, निजामअली उगीच घाबरून पळून गेला, जय मिळाल्याबद्दल मराठ्यांची फुशारकी अगदीं व्यर्थ होती, साऱ्या लढाईत उभयपक्षीं दोनशेसुद्धां माणूस दगावलें नसेल! मराठे व मोंगल यांविषयीं इंग्रजांच्या मनांत सामान्यतः तुच्छबुद्धि वाटत असे तीच डफसाहेबांच्या या लिहिण्यांत पूर्णपणें प्रतिबिंबित झाली आहे![1]

मोंगलांचें लष्कर लुटलें गेल्यावर सर्व मराठी फौजा खड्यांच्या किल्ल्यास घेरा देऊन बसल्या तेव्हां निजाम बहुत घाबरा होऊन त्यानें नाना फडनवीसांकडे तहाची याचना केली. यानंतर थोडीशी वाटाघाट होऊन मराठे व मोंगल यांमध्यें तह ठरला त्यांतील प्रमुख कलमें—(१) पूर्वी सदाशिवराव भाऊसाहेबांनीं उदगीरच्या लढाईत मुलूख जिंकला होता त्यापैकीं परांड्यापासून तहत तापीपर्यंतचा जितका मुलूख गेल्या पसतीस वर्षांत निजामास परत देण्यांत आला असेल तो सर्व त्यानें पेशव्यांस परत द्यावा. (२) गंगथडीमध्यें घासदाण्याचा भोसल्यांचा हक्क आहे त्याबद्दल भोसल्यास निजामानें तीन लक्ष अठरा हजार रुपये उत्पन्नाचा मुलूख निराळा तोडून द्यावा. भोसल्यांची वऱ्हाडच्या वांटणीपैकीं बाकी तुंबली आहे तीबद्दल निजामानें त्यांस एकुणतीस लक्ष रुपये द्यावे व पुढें वऱ्हाडांत भोसल्यांचा अंमल मामूल वहिवाटीप्रमाणें सुरळीत चालूं द्यावा. (३) चौथ सरदेशमुखीच्या बाकीबद्दल निजामानें पेशव्यांस तीन कोट रुपये द्यावे.

1 डफकृत मराठ्यांचा इतिहास. इंग्रजी आ. तिसरी पृ. ५१७.

(४) निजामानें आपला दिवाण मशीरुल्मुल्ख यास पेशव्यांच्या हवालीं करावें.

शेवटच्या कलमाखेरीज निजामानें बाकीचीं सर्व कलमें कुरकुर न करितां मान्य केलीं. परंतु आपला दिवाण पेशव्यांच्या हवालीं करणें त्याच्या जिवावर आलें. तेव्हां तो दिवाण आपण होऊनच पेशव्यांच्या स्वाधीन झाला. पेशव्यांनींही त्याचा आदरसत्कार करून त्यास इतमामानें नजरकैदेंत ठेविलें.

याप्रमाणें खर्ड्यांची फत्ते झाल्यावर श्रीमंत परत फिरले आणि ता. २ मे रोजीं त्यांनीं मोठ्या समारंभानें पुण्यांत प्रवेश केला. "सरकारचे वाड्यांत खासा स्वारी दाखल होण्याचा मुहूर्त छ० ११ सवाल वैशाख शु॥ त्रयोदशी भृगुवारीं पूर्वरात्रीचा ठरला. श्रीमंतांची स्वारी शहरांत आली ते वेळीं शहरच्या बायका आरत्या घेऊन रस्तोरस्तीं दुमजल्या तिमजल्यावरून उभ्या होत्या. सोन्या रुप्याचीं फुलें उधळलीं. चिराखदान केलें होतें. श्रीमंतांची स्वारी भवानी पेठेंतून शुक्रवारांतून, खासगीवाले यांचे वाड्याचे पूर्वेस बुधवारचे रस्त्यास मिळोन नाना फडणीस यांच्या वाड्यापुढून सरकारचा वाडा उजवा घेऊन दिल्ली दरवाज्यानें सरकारवाड्यांत दाखल जाली. सरदार, मुत्सद्दी यांनीं नजराणा केल्या. तुर्गीच्या तोफांची सरबत्ती जाहली. मोठा समारंभ जाला. पुराणांतरीं श्रीरामचंद्रजींनी लंका घेऊन अयोध्येस आले ते समयीं जाहला तद्वत् जाहला."[1] एकंदरींत या खर्ड्यांच्या स्वारींत नानांच्या उत्कर्षाचा कळस झाला असें म्हणावयास बिलकूल हरकत नाहीं.

---

१ सांगळीकरांचा बांका पृ. ३०

# प्रकरण तेरावें.

## सवाई रावसाहेब यांचा मृत्यु.

( स. १७९५ जून-आक्टो. )

सन १७७४ पासून वीस बावीस वर्षे नाना फडनवीस यांनीं पेशवाईचा कारभार चालविला. त्या अवधींत अनेक वेळां त्यांच्या जिवावरचे प्रसंग येऊन गेले. वेळीं अवेळीं भयंकर फितूर होऊन राज्यांत अंतःक्षोभही अनेक प्रसंगीं झाला. राजकारणाच्या निमित्तानें शत्रूसद्धां मुलूख द्यावा लागला व शत्रूंनीं कांहीं जबरदस्तीनेंही घेतला. परंतु केवळ आपल्या अकलेच्या जोरावर वरील सर्व संकटांचें निरसन करून पेशवाई राज्य नानांनीं आजपर्यंत निभावलें इतकेंच नाहीं, तर कालमानाप्रमाणें तें राज्य ऊर्जितावस्थेला आणलें असेंच म्हटलें पाहिजे. नारायणराव पेशव्यांच्या ताब्यांत जितका मुलुख होता तितकाच मुलूख हल्लींसुद्धां पुनः सवाई रावसाहेब यांच्या अंमलाखालीं आला होता. त्यावेळीं शिंदे, होळकर, भोसले, गायकवाड वगैरे राज्यांतले सर्व सरदार जसे तत्कालीन पेशव्यांचे आज्ञानुसारी होते तसेच याही वेळेस झाले होते. इंग्रज, टिपू वगैरे परकीय सरकाराशीं तहनामे होऊन परस्परांच्या राजकीय वर्तनाच्या मर्यादा ठरून गेल्या होत्या. इतकें सर्व सिद्ध झाल्यावर पेशवाईच्या पदाची भरभराट व्हावयाची ती आणखी कोणती राहिली! आणि हें सर्व नाना फडनवीस यांनीं घडवून आणलें हें मनांत आलें म्हणजे त्यांच्या कर्तृत्वाची कीर्ति महाराष्ट्राच्या इतिहासांत खरोखरच चिरस्थाई होण्याच्याच योग्यतेची आहे ही खात्री होते.

दादासाहेबांचें कुटुंब कोपरगांव येथें रहात होतें. तेथें आनंदीबाईच्या जिवास समाधान नाहींसें झालें, त्यामुळें तिच्याच इच्छेवरून नानांनीं तीस व तिच्या मुलास आनंदवल्लीस नेऊन ठेविलें. आनंदीबाई तेथें गेल्यावर थोड्या दिवसांनीं मरण पावली. तिचा थोरला मुलगा बाजीराव याचें वय त्यावेळीं एकोणीस वर्षांचें होतें. धाकटा चिमाजीआपा बारा वर्षांचा होता.

त्याशिवाय दादांचा दत्तक मुलगा अमृतराव हाही आनंदवल्लीसच होता. बाजीराव हा रूपानें बहुत सुंदर असून त्याचें भाषण तर असें मोहक असे कीं, जेणेंकरून मनुष्य कितीही शहाणा व सावध असला तरी त्यास भूल पडावी! याखेरीज त्याच्या अंगांत नांव घेण्यासारखा एकही सद्गुण नव्हता. दुर्गुण मात्र इतके होते कीं, त्यांचें वर्णन करायचें तर त्याचा एक स्वतंत्र मोठाच ग्रंथ होईल!

या बाजीरावाचें नानांस अतिशय भय वाटत असे. खर्ड्यांच्या स्वारीस निघतांना मागें एखादा फितूर होईल अशा भयानें नानांनीं दादासाहेबांचें कुटुंब आनंदवल्लीहून काढून शिवनेरीच्या किल्ल्यावर आणून ठेवलें होतें. कोठें फितूर अगर दगाफटका होईल या भयानें नाना संशयाच्या जागीं अधिक कडक बंदोबस्त ठेवीत असें डफसाहेब लिहितात. परंतु बारभाईच्या कारस्थानापासून मराठी राज्यांत पदोपदीं कसे फितूर झाले व त्यामुळें राज्यावर केवढीं संकटें ओढवलीं हें आतां वाचकांस नवीन सांगावयास नकोच. राजकीय परिस्थिति जर इतकी बिघडलेली होती हें सिद्ध आहे तर कडक बंदोबस्ताबद्दल नानांस दोष कसा देतां येईल! बाजीराव वगैरे मंडळी शिवनेरीस कडक बंदोबस्ताच्या कैदेंत होती आणि खर्ड्याच्या स्वारीनंतर त्यांना पूर्वीइतकीसुद्धां मोकळीक मिळाली नाहीं हें डफसाहेबांचें लिहिणेंही वस्तुस्थितीस सोडून आहे. आधीं मुळीं बाजीराव यास शिवनेरी किल्ल्यावर कैदेंत ठेविलें या वाक्याचा अर्थ किल्ल्यावरच्या कैदखान्यांत त्यास ठेविलें होतें असा नाहीं. बाजीराव वगैरे मंडळीचा मुक्काम शिवनेरीस नसून जुन्नरास होता. शत्रूची फौज जवळपास आली तर मात्र त्यांनीं किल्ल्यावर जावयाचें होतें. कैदी शब्दाचा अर्थ फौजदारी किंवा दिवाणी किंवा फार झालें तर राजकीय कैदी एवढाच आपले लक्षांत येतो. पण बाजीराव व त्यांचे बंधु यांचे बाबतींत हा अर्थ मुळींच लागू नाहीं. ते जुन्नरास होते ते हत्ती, घोडे, पालख्या, स्वार, शिपाई, दासदासी अशा सरंजामानिशीं होते. नानांनीं त्यांच्या राजकीय वैभवांत कांहीं कमतरता ठेवली नव्हती. फक्त त्यांनीं कोठें पळून जाऊं नये किंवा फितूर करूं नये, एवढामात्र नानांनीं बंदोबस्त

ठेवला होता आणि तो सर्वस्वीं यथायोग्यच होता. बाजीरावास शिवनेरीस ठेवल्यामुळें आपणाला निश्चितपणें राहतां येईल असा नानांचा समज होता तो मात्र परिणामीं अगदींच चुकला!

कोणत्याही समाजांत खुशालचेंडू लब्धप्रतिष्ठित लोकांचा वर्ग नेहमींच मोठ्या प्रमाणावर असतो. नानांच्या कारभारामुळें चोंहोकडे शांतता होऊन मराठी रयतेला मानसिक स्वास्थ्य आणि शारिरीक सौख्य मिळूं लागलें ही गोष्टच आतां या लोकांच्या निंदेचा विषय होऊन बसली! कारभाराची नवी घडी बसली तर राज्याची यापेक्षां ज्यास्त भरभराट होईल आणि आपल्याला कोणत्या तरी वाशिल्यानें चंगळ करावयास सांपडेल अशीहि आशा त्यांस वाटूं लागली! सबब या लोकांनीं चोंहोंकडे चळवळ सुरूं केली कीं, पेशवाईपद आणि पेशवाई राज्याचा कारभार हीं दोन्हीं आजपर्यंत एकाच घराण्यांत चालत आलीं आहेत. पेशवाईचा कारभार करण्याचा अधिकार वस्तुतः बाजीरावसाहेबांचा आहे. ते वयानें लहान होते तोंपर्यंत नानांनीं कारभार केला हें ठीकच झालें. परंतु ते आतां प्रौढ वयाचे झाले असूनही त्यांचा अधिकार त्यांजकडे अजून दिला जात नाहीं हा नानांचा केवढा हावरेपणा! बाजीरावसाहेब मोठे धर्मपरायण, अत्यंत कुशाग्रबुद्धीचे, सच्छील वर्तनाचें आणि सिंहाप्रमाणें महापराक्रमी आहेत. त्यांच्या तोडीचे सद्गुणसंपन्न पुरुष आजपर्यंत झाला नाही व पुढेंही होणार नाहीं! अशा नरशार्दूलाला प्रतिबंधांत ठेविलें जात आहे हा नानांचा केवढा अन्याय! बाजीरावांच्या हातीं अधिकार देऊन नानांनीं फडनिशीचें काम संभाळून हरी हरी म्हणत स्वस्थ कां बसूं नये! नानांच्या निंदकापैकीं हा सामान्य लोकांचा वर्ग झाला. दुसरा वर्ग दादासाहेबांच्या प्राचीन अनुयायांचा. या लोकांना बाजीरावाचा उत्कर्ष होणें हें साहजिकच प्रिय होतें.

पौर्णिमेच्या दिवशीं चंद्र पूर्णावस्थेला गेला म्हणजेच त्यास ग्रहण लागत असतें. त्याच नियमास अनुसरून नानांचा पूर्ण उत्कर्ष झालेला पाहतांच त्यांच्या वैभवाचा ऱ्हास व्हावा म्हणून वर सांगितलेल्या दोन्ही वर्गांतले त्यांचे प्रतिस्पर्धी चोंहोंकडे त्यांजविरुद्ध गवगवा करूं लागले यांत काय

आश्चर्य ! नानांची निष्कारण निंदा आणि बाजीरावाची अवास्तव स्तुति या दोन गोष्टींचा फैलावा त्यांनीं सुरू केला. असला प्रकार यापूर्वी अनेक वेळां झाला होता इतकेंच नव्हे, तर आनंदीबाई जिवंत असतां तिच्या प्रोत्साहनावरून ही मंडळी एकदां याहीपलीकडे गेली होती व त्यांनीं सवाई रावसाहेब यांस गादीवरून काढून त्यांच्या जागीं बाजीरावाची स्थापना करण्याचा व्यूह रचला होता ! नानांच्या दक्षतेमुळें या निंदकांचे आजपर्यंत कांहीं चाललें नाहीं आणि यावेळींही नानांनीं त्यांस थोडीच भीक घातली असती ! परंतु एक अकल्पित संकट उद्भवून त्यांचें मन चिंतेनें व्याप्त झालें. नानांच्या या नवीन संकटाचे उत्पादक खुद्द सवाई रावसाहेब पेशवे हे होते !

पेशव्यांस नांवाचे मात्र धनी करून पेशवाईचा सर्व अधिकार आपल्याच हातीं ठेवावा असा नानांचा हेतु होता; व यामुळेंच त्यांनीं लहानपणापासून पेशव्यास आपल्या जरबेंत ठेवलें, ते वयांत आल्यावर देखील त्यांच्या हातीं तिलप्राय सत्ता दिली नाहीं असा जो पुष्कळ लोकांचा समज आहे तो चुकीचा आहे. पेशवे वयांत आल्यावर नानांनीं सर्व राज्यकारभार त्यांच्या हातीं सोंपविला होता आणि पुष्कळ प्रसंगीं नाना विरुद्ध असताही पेशवे आपलेंच म्हणणें तडीला नेत असत ही गोष्ट आतां ऐतिहासिक पुराव्यानें पूर्णपणें सिद्ध झाली आहे. श्रीमंतांची बुद्धि तरतरीत होती. त्यांची वागणूक गंभीर असून त्यांचे विचार प्रौढ असत. नानांनीं स्वार्थत्याग करून मराठी राज्य उजगारीला आणलें या गोष्टीची त्यांना उत्तम प्रकारची जाणीव होती. प्रसंगीं थोडासा वाईटपणा पतकरूनही नानांची बाजू सांवरून धरण्यांत श्रीमंत नेहमीं तत्पर असत. असें असतांही हल्लींच्या प्रसंगीं कधींही न घडून येणारी एक गोष्ट घडून आली. ती गोष्ट हीच कीं, बाजीरावाच्या अनेक सद्गुणाविषयींची तारीफ सवाई रावसाहेबांच्या कानावर गेली असतां ती त्यांस रुचली इतकेंच नाहीं. तर अशा स्वकुलोत्पन्न सद्गुणसमुच्चयालंकृत पुरुषपुंगवाचा आपणास नेहमीं सहवास घडावा अशी त्या पेशव्यांस इच्छा उत्पन्न झाली ! मानवी मन हें सृष्टींतलें फारच विलक्षण कोडें आहे व त्याची लीला अगम्य आहे असें म्हणत

असतात त्याचें हें ठळक उदाहरण होय! बाजीरावाच्या हातीं कारभार देणें म्हणजे नानांशीं कृतघ्न होऊन त्यांनीं केलेल्या सर्व गोष्टींस हरताळ फांसणें व राज्यांत नवीन अनर्थांची परंपरा उत्पन्न करणें हें होय, या गोष्टी त्या पेशव्यांस समजत नव्हत्या असें वाटत नाहीं; इतकें असून बाजीरावाविषयीं त्यांचें मन स्निग्ध व दयार्द्र कां व्हावें याचा उलगडा करितां येणें अशक्य आहे!

बाजीरावसाहेबांचा स्वभाव फार उपद्व्यापी होता. सवाई रावसाहेबांचा ग्रह आपणास फार अनुकूळ असल्याचें त्यांच्या कानीं येतांच त्यांच्या बंदोबस्ताकरितां बळवंतराव नागनाथ वामोरीकर नांवाचा सरदार नानांनीं नेमला होता, त्यास त्यानीं प्रथम अनुकूळ करून घेतलें व त्याच्या द्वारें सवाई रावसाहेबाशीं गुप्तरूपें पत्रव्यवहार सुरू केला. इकडून तिकडे व तिकडून इकडे एक दोन चिठ्या चपाट्या गेल्या आल्या असतील नसतील तोंच ती गोष्ट नानांच्या कानावर गेली. त्यांनीं तत्काळ बळवंतराव यास पकडून कैदेंत ठेविलें व या मूर्खपणाच्या कृत्याबद्दल पेशव्यांचा फार निषेध केला आणि असा फितूर पुन्हां होऊं नये म्हणून बाजीरावासंबंधानें जितका बंदोबस्त करतां येणें शक्य होतें तेवढा त्यांनीं केला. आपण मालक असतां बाजीरावाच्या बाबतींत नानांनीं आपणांस स्वच्छंदानें वागूं दिलें नाहीं ही गोष्ट श्रीमंतांच्या मनास फारच झोंबली; व त्यामुळेंच त्यांस दुखणें आलें; असा लोकप्रवाद आहे.

निम्मा आक्टोबर होईतों म्हणजे आश्विन महिन्यास सुरवात होईतोंपर्यंत रघोजी भोसले पुण्यासच होते व नंतर ते पुण्याहून निघून नागपुराकडे निघाले. तेथपर्यंत श्रीमंतांच्या प्रकृतीस उत्तम प्रकारचें स्वास्थ्य असून सर्व गोष्टी यथास्थित चालल्या होत्या. नवरात्रांत श्रीमंतांस ज्वर येऊं लागला व त्या ज्वरानंतर त्यांस वेडाचे झटके येऊं लागले. वाताच्या लहरींत त्यांच्या हातून भलतेंच कांहीं न घडावें म्हणून रात्रंदिवस त्यांभोंवतीं पहारा असे. दसऱ्याचे दिवशीं ते शिलंगणास गेले होते तथापि त्यांची प्रकृति बिघडलेलीच होती. आश्विन शु. द्वादशी ( ता. २५ आक्टोबर १७९५ ) रोजीं सकाळच्या प्रहरीं श्रीमंत शनवार वाड्यांत

गणपतीच्या दिवाणखान्यांत एकटेच बसले होते. त्याभोंवतीं रात्रंदिवस माणसाचा घोळका रहात असतां त्यावेळीं दैववशात् तेथें एकही माणूस नव्हतें ! तशा स्थितींत त्यांस वायूचा झटका आला व त्या भरांत दिवाणखान्याच्या पूर्वेच्या अंगचें कवाड उघडून त्यांनीं खालीं उडी टाकली. खालीं हौद होता त्यांतील कारंज्यावर त्यांची उडी पडल्यामुळें मांडीस व इतर ठिकाणीं जबर दुखापत झाली. तशा स्थितींत ते दोन दिवसपर्यंत होते. त्यांच्या इजेवर पुष्कळ उपचार झाले, परंतु त्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. चतुर्दशीच्या दिवशीं सायंकाळीं श्रीमंतांचें प्राणोत्क्रमण झालें.

सवाई रावसाहेब यांच्या मरणाचे बाबतींत डफ साहेबांनीं दोन विधानें केलीं आहेत, तीं अशीं—(१) अधिकाराचा हावरेपणा नानांनीं धरिल्यामुळें श्रीमंतांचा मृत्यु घडून आला, व नानांनीं बाजीराव प्रकरणीं केलेली कानउघाडणी श्रीमंतांच्या मनास झोंबल्यामुळें त्यांनीं त्रासून प्राण दिला. (२) श्रीमंतांनीं मरण समयीं बाजीरावास गादीचे धनी करावें म्हणून बाबा फडक्यास सांगितलें. साहेबांच्या या दोन्हीं विधानांत सत्यांश दिसत नाहीं. पटवर्धनांच्या दौलतींतील माणसें प्रसंग साधल्यास नानांची आंतून आंतून कुचेष्टा करणारीं होतीं. त्यांचीं व पटवर्धन सरदारांचीं शेकडों पत्रें ऐ. ले. संग्रहांत छापलीं आहेत. या पत्रांतून या विधानांना पोषक असा कोणताच उल्लेख आढळत नाहीं.

असो. ज्या श्रीमंतांच्या नांवावर नानांनीं आजपर्यंत मोठमोठे व्यूह रचले व आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर ते पार पाडले त्या श्रीमंतांचा देह याप्रमाणें अपघातानें नष्ट होतांच नानांच्या मनोरथांचा आणि कर्तृत्वाचा डोलारा एकदम कोसळून जमीनदोस्त झाला ! आजपर्यंतचे त्यांचे सर्व श्रम मातीमोलाचे ठरले आणि सुकाणूं मोडलेल्या गलबताप्रमाणें ते स्वतः भवितव्यतेच्या तरंगावर विनाधार हेलकावे खाऊं लागले ! राष्ट्रसंवर्धनाला आवश्यक असणाऱ्या सर्व सद्गुणांचा एकाएकीं नाश होऊन रावबाजीच्या राज्यनाशाच्या नवीन मन्वंतरास सुरवात झाली ! हा प्रकार कसकसा घडून आला हें आतां सांगावयाचें.

# प्रकरण चौदावें.

## घोटाळा व तारांबळ.

( स. १७९५ आक्टो.-स. १७९६ जून. )

सवाई रावसाहेब यांच्या मृत्यूनंतर पेशवाईच्या गादीचा वारसा रघुनाथराव दादासाहेब यांच्या मुलांकडे वाजवी रीतीनें येत होता. तथापि त्यांपैकीं कोणास गादीवर बसवावें तर मागच्या गोष्टींमुळें सरदार व मुत्सद्दी यांशीं त्यांचें पटणार नाहीं हें उघडच दिसत होतें. दादा व त्यांचा वंश यांचा विटाळ पेशवाईच्या गादीला होतां होईतों होऊं द्यावयाचा नाहीं असा नानांचा निश्चय ठरला होता. माजी पेशव्यांचें कुटुंब यशोदाबाई यांच्या मांडीवर कोणी गोत्रजापैकीं दत्तक देऊन त्यास गादीचा धनी करावें असा विचार नानांच्या मनांत आला. पण सरदार लोकांची या गोष्टीस मान्यता घेतल्याखेरीज ही गोष्ट त्यांस करतां येईना. सबब पेशवे मरण पावल्याबरोबर पुढें काय करावयाचें हें ठरविण्याकरितां शिंदे, होळकर, भोसले, पटवर्धन वगैरे सरदारांस त्वरेनें पुण्यास येण्याविषयीं त्यांनीं पत्रें पाठविलीं. पेशव्यांच्या सुतकांतच परशुरामभाऊ पुण्यास दाखल झाले. होळकरांचा मुक्काम पुण्याच्या आसपासच होता. भोसल्यांनीं आपला वकील पाठविला. शिंद्यांचा मुक्काम अद्यापि जांबगांवासच होता. त्यांनीं आपले कारभारी जिऊबादादा बक्षी व बाळोबा तात्या पागनीस यांस पुण्यास पाठविलें.

नंतर या सर्व प्रमुख लोकांचें कौंसिल भरून पुष्कळ भवति न भवति झाली. व शेवटीं बाजीराव व त्यांचे बंधु यांस गादीचे धनी न करितां यशोदाबाईस दत्तक देऊन त्याच्या नांवानें राज्य चालवावें, हा नानांचा विचारच सर्वांच्या पसंतीस उतरला; व याप्रमाणेंच करावें अशा अभिप्रायाचीं यशोदाबाईच्या नांवचीं पत्रें सर्व सरदारांनीं लिहून दिलीं. नानांनीं या प्रकरणीं निजामअल्लीस सल्ला विचारला होता. त्याचेंही मत दत्तकाला अनुकूल असेंच पडलें. नंतर नाना दत्तकासाठीं मुलाची निवड करण्याच्या

उद्योगास लागले.

पण दत्तकाच्या नांवें राज्य चालविण्याची नानांची मसलत पुण्याच्या लोकांस बिलकूल नापसंत होती. पुण्याबाहेर रहाणाऱ्या व राज्यांतील प्रमुख लोकांसही ती फारशी आवडत नव्हती. सरदार लोकांनीं नानांच्या भिडेमुळें त्यांनीं सांगितल्याप्रमाणें पत्रें लिहून दिलीं हें खरें, पण औरसाचा वाजवी हक्क बुडवून कुठला तरी दत्तक आणून त्याला गादीचा धनी करावें हें ठीक नाहीं, असें ज्याला त्याला वाटत होतें. पटवर्धन, रास्ते व खुद्द नाना हे कै. दादासाहेबांचे पक्के द्वेषी असल्यामुळें त्यांना स्वतःच्या सुरक्षितपणासाठीं दत्तकाचीच उभारणी करणें प्राप्त होतें. पण बाकीच्या लोकांचें त्यांस या कामीं मनापासून पाठबळ मिळण्याचा संभव जितक्यास तितकाच होता. तात्पर्य मागें नानांनीं बारभाईचें कारस्थान उभें केलें, त्यावेळीं लोकमताचा पाठिंबा होता तो यावेळीं नसल्यामुळें या दत्तक प्रकरणाची घडी प्रथमपासूनच नीटशी बसली नाहीं.

बाजीरावसाहेब वयानें अजून एकवीस वर्षांचेसुद्धां झाले नव्हते, तरी कारस्थानें करण्यांत ते नानापेक्षां तिळप्राय कमी नव्हते. नानांचा हा दत्तकाचा सर्वच डाव उधळून लावण्याविषयीं त्यांनीं आतां कंबर बांधली. सर्व मराठी राज्यांत शिंद्याइतका जबरदस्त सरदार दुसरा कोणी नव्हता. शिंदे दरबारांत जिऊबादादा बक्षी, बाळोबातात्या पागनीस, लखबादादा लाड, सदाशिव मल्हार वगैरे शेणवी सरदारांचें प्राबल्य अतिशय होतें. दौलतराव शिंदे हे वयानें लहान असल्यामुळें ते या शेणवी मंडळीच्याच ओंजळीनें पाणी पिणारे होते. बाजीरावांनीं बहुत प्रयत्न करून या शेणवी सरदारांस पूर्णपणें वश करून घेतलें आणि त्यांच्या मार्फत शिंद्यांशीं एक करार ठरविला. तो करार असा कीं, शिंद्यांनीं बाजीरावास पेशवाईची गादी मिळवून द्यावी, व त्याबद्दल श्रीमंतांनीं शिंद्यास एक कोट रुपये रोख व पंचवीस लक्षांची जहागीर द्यावी. याप्रमाणें उभयपक्षीं करार ठरून इमानप्रमाण व बेलभंडार झाला. बाजीरावांनीं धूर्तपणानें हें शिंद्याचें प्यादें इरेस घालतांच नानांचा दत्तकाचा डोलारा एकाएकीं कोलमडून खालीं पडला.

वर सांगितलेला करार ठरतांच शिंद्यांनीं हिंदुस्थानांत जाण्याचा बेत तहकूब करून एकाएकीं पुण्याकडे मोर्चा वळविला. त्यांचे कारभारी बाळोबातात्या व जिऊबादादा हे पुण्यास होते त्यांना या मसलतीचा इशारा पोचतांच ते एकाएकीं बिथरले, व नानांशीं निष्कारण हमरी तुमरी करून आणि उलट त्यांवरच रागावून ते पुण्याहून निघाले, आणि शिंद्याच्या लष्करांत सामील झाले. शिंद्यांच्या या वर्तनाचा खुलासा न झाल्यामुळें नाना वगैरे मंडळी बुचकळ्यांत पडली. बाजीरावांनीं शिंद्याशीं कारस्थान केल्याची बातमी नानांस प्रथम कळली ती निजामअलीकडून!! त्यानें नानांस साफ लिहिलें कीं, तुमच्या घरांत असलीं कारस्थानें घाटतात व तुम्ही जागे होत नाहीं! मग आयत्यावेळीं धांवाधांव करूं लागाल आणि आम्हांजवळ फौजेची कुमक मागाल तर त्यावेळीं आम्ही फौज कोठली पाठवावी! काय ते आतांच सांगा तर तरतूद करूं. हा इशारा येतांच नाना खडबडून जागे झाले व त्यांनीं नबाबास पत्र पाठविलें कीं, आम्हीं बोलावूं तेव्हां आमच्या कुमकेस पंधरा हजार फौज व पंधरा हजार कवाइती पायदळ पाठवावें.

इतक्यांत शिंद्यांच्या लष्करी हालचालींच्या बातम्या व शेणवी कारभाऱ्यांच्या अद्वातद्वा वल्गना कानावर येऊं लागल्या. किती तांतडीनें बोलावणें गेलें तरी नबाब, भोसले किंवा इंग्रज यांजकडून वेळेवर कुमक येण्याचा संभव दिसेना. पुण्यांत होळकरासुद्धां पंचवीस हजार फौज होती, पण तीतही शिंद्यांच्या कारभाऱ्यांनीं जागोजाग फितूर केल्याचें याच वेळीं नानाच्या दृष्टोत्पत्तीस आलें. तेव्हां त्यांची छाती दडपून गेली व पुढें काय करावें हें त्यास सुचेनासें झालें. शिंदे तर पुण्याचा रोख धरून त्वरेनें चालून येत होते. आधीं जुन्नरास जाऊन बाजीराव वगैरे त्रिवर्ग बंधूस बरोबर घेऊन पुण्यास येण्याची त्यांची मसलत स्पष्ट दिसत होती. अशा स्थितींत रास्ते व पटवर्धन यांचा सल्ला घेऊन नानांनीं अशी योजना ठरविली कीं, पूर्वी ठरल्याप्रमाणें यशोदाबाईंनीं दत्तक हा घ्यावयाचाच, परंतु तो इतर कोणी न घेतां बाजीरावाचा धाकटा भाऊ चिमाजी आपा हाच दत्तक घ्यावा म्हणजे तंटाच मिटला! बाजीरावाला पुढें करण्यांत औरसाच्या

बाजवी हक्काचें नैतिक पाठबळ शिंद्यांना मिळण्यासारखें आहे. आपण चिमाजीला गादीवर बसविलें तर आपणालाही हें नैतिक पाठबळ आपो-आपच मिळेल. कारण बाजीरावाप्रमाणें चिमाजीही गादीचा वारस आहेच. शिंद्यांनीं थोरल्या भावाला हाताशीं धरलें आहे तर आपण धाकट्या भावाला हाताशीं धरून शिंदे पुण्यास येण्यापूर्वीच त्याची पेशवाईपदावर स्थापना करूं या. इतक्याही उप्पर शिंद्यांनीं नेट धरल्यामुळें बाजीराव व चिमाजी या दोन वारसांचा तंटा लागलाच तर तो मजकूर पुढें पाहून घेतां येईल !

चिमाजीआपा हा यशोदाबाईचा चुलत सासरा होत होता. कोणतेंही धर्मशास्त्र झालें तरी सासऱ्यास सुनेचा मुलगा करूं शकत नाहीं. अर्थात् नानांनीं योजिलेलें चिमाजीचें दत्तविधान बोलून चालून राजकीय स्वरूपाचें होतें. 'चिमणाजी माधवराव' याच्या जागीं 'बाजीराव माधवराव' असें दत्तविधान करतां आलें असतें तर तेंही नानांस नकोसें होतें असें नाहीं. बाजीराव रघुनाथ-चिमणाजी रघुनाथ—यांनीं आपल्या जन्मसिद्ध हक्कानें स्वतंत्रपणें पेशवाईचे धनी होणें मात्र त्यांस अनिष्ट होतें. याचें कारण असें कीं, माधवराव नारायण यांच्या कारकीर्दींत त्यांच्या नांवावर सावकारांकडून कोट्य-वधि रुपये नानांनीं कर्ज काढलें होतें व त्या पेशव्यांच्या नांवें सनदा लिहून देऊन पुष्कळांस जहागिरी, तैनाना व इनामें दिलीं होतीं. एकट्या परशुराम-भाऊंचेंच म्हैसूरच्या व इतर स्वाऱ्यासंबंधें पेशव्यांकडे चाळीस लक्ष रुपये कर्ज तुंबलें होतें ! बाजीराव रघुनाथ हे स्वयंसिद्ध हक्कानें पेशवाई पदावर बसले तर ते मागच्या पेशव्यांच्या वेळीं झालेला कारभार आपण कांहीं एक जाणत नाहीं असें म्हणणार ! व पुढें पेशवाई मिळाल्यावर बाजीरावांनीं तसें म्हटलेंही !! तेच बाजीराव व चिमाजी माधवरावाचे पुत्र या नात्यानें गादीवर बसले तर माधवरावांनीं जें जें केलें तें ते सर्व कबूल करण्यावांचून त्यांस सुटकाच नव्हती. एवढ्यासाठींच सासऱ्यास सुनेच्या मांडीवर दत्तक देण्याचा हा द्राविडी प्राणायाम नानांस पतकरावा लागला.

बाजीराव मूर्ख होते तरी त्यांच्या मूर्खपणांतही एकप्रकारचें शहाणपण पण होतेंच ! आपल्याला शिंद्यांचा आधार मिळाल्यामुळें नानांची त्रेधा

उडाली आहे आणि आपण म्हणून त्या गोष्टी कबूल करण्यावांचून त्यांस गत्यंतर उरलें नाहीं हें त्यांस पुरतें समजलें होतें. नानांच्या सांगण्यावरून ता. १५ फेब्रु. रोजीं परशुरामभाऊ जुन्नरास गेले व त्यांनीं चिमाजीस हवालीं करण्याविषयीं बाजीरावांशीं बोलणें लाविलें. यावर श्रीमंतांनीं भाऊंस स्पष्ट उत्तर दिलें कीं, 'बाळाजी बाजीराव यांचा वंश समाप्त झाला त्याला आम्ही काय करावें ! दत्तकविषय चिमाजीस किंवा आम्हांला घडावयाचा नाहीं. आम्ही वडील भाऊ असतां आम्हांला बाजूस सारून तुम्ही चिमाजीस गादीवर बसवाल तर तेंही आम्ही चालू देणार नाहीं. आम्हींच गादीवर बसणार आणि तेही बाजीराव रघुनाथ या नांवानेंच बसणार !' प्रसंगविशेषीं बाजीरावावर जुलूम करूनही चिमाजीस ताब्यांत घ्यावें असें नानांचें भाऊंस सांगणें होतें. परंतु शिंद्यांचा एक कारभारी रामजी पाटील हा आगाऊच जुन्नरास येऊन बसला होता, त्यामुळें भाऊंस तसें करण्याचें धैर्य होईना. सामोपचाराच्या पुष्कळ गोष्टी भाऊंनीं सांगून पाहिल्या, परंतु त्यांना बाजीराव कसचे दाद देतात ! असो. ही भानगड दहा बारा दिवस चालली होती. त्या अवधींत शिंद्यांनीं जुन्नरास येऊन पोचावें अशी बाजीरावाची इच्छा होती, परंतु तो योग मात्र जमून आला नाहीं. जिऊबादादा बक्षी यांच्या मृत्यूमुळें शिंद्यांचें येणें लांबणीवर पडलें असें पाहून श्रीमंतांनीं स्वपराक्रमानें नानांच्या कटांतून दुसरा एक नामांकित सरदार फोडला ! एके दिवशीं परशुरामभाऊंना एकांतीं नेऊन श्रीमंतांनीं त्यांच्या पायांवर डोकें ठेविलें आणि डोळ्यांस अश्रु आणून आपल्याला गादीवर बसविण्याविषयीं त्यांचें मन वळविलें इतकेंच नव्हे, तर तशी त्यांजकडून शपथही घेवबली !

स. १७९६.

याप्रमाणें आंतून सिद्धता होतांच भाऊंनीं नानांस निरोप पाठविला कीं, 'चिमाजीस ताब्यांत घेण्याविषयींचे आपले सर्व प्रयत्न थकले ! बाजीरावापुढें आपलें कांहींच चालत नाहीं ! शिंदे तर त्वरेनें जुन्नरच्या रोखानें येत आहेत. पुढें काय करावें याबद्दल काय ती आपली आज्ञा यावी.' भाऊसारख्या मर्द सरदारानें याप्रमाणें हातपाय गाळलेले पाहतांच नानां-

चाही धीर खचला. त्यांनीं उलट भाऊंस निरोप पाठविला कीं, ' आतां घासाघीस घालण्यास सवडच उरली नाहीं. बाजीराव म्हणेल त्या अटी कबूल करून त्याला पुण्यास घेऊन यावें. शिंद्यांच्या ताब्यांत ती मंडळी जाऊं देऊं नयेत. ' याप्रमाणें नानांची परवानगी आल्यावर भाऊ बाजीराव व चिमाजी यांस बरोबर घेऊन ता. ३ मार्च रोजीं पुण्यास आले आणि खडकीच्या मुक्कामीं तळ देऊन राहिले. यानंतर भाऊंच्या विद्यमानें नाना व बाजीराव यांच्या भेटी झाल्या आणि पूर्वीच्या सर्व गोष्टी विसरून नानांनीं इमानानें कारभार करावा आणि श्रीमंतांनीं नानांचें यथापूर्ण चालवावें, अशाबद्दल त्या उभयतांमध्यें लेखी करारमदार झाले.

नाना आपण होऊन बाजीरावास गादीवर बसवितात असें पाहून आपणांला आतां कराराप्रमाणें सव्वा कोट रुपये आणि पंचवीस लक्षांची जहागीर मिळणार नाहीं असें शिंद्यास भय पडलें! त्यांचे कारभारी बाळोबातात्या हे तर रागानें बेफाम होऊन नानांवर दांतओठ खाऊं लागले! नानांनीं आपणावर मारेकरी घातले असा खोटाच पुकारा करून बाळोबा वल्गना करूं लागले कीं, नानांनींच राज्यकारभार करावा असें शास्त्र कोठें आहे! आजपर्यंतचा सरकारचा सर्व पैसा नानांनीं बुडाखालीं दाबून ठेवला आहे. तो त्यांना आतां ओकावयास लावलें पाहिजे! नानांना द्रव्यमदानें मस्ती आली आहे त्यामुळेंच आम्हांवर मारेकरी घालण्याचें दुष्ट कर्म त्यांनीं केलें. आमचा प्राण घेऊं पाहणारे कितीही मोठे असले, तरी आम्ही त्यांची बेअब्रु करूं आणि पुण्याच्या रस्त्यांतून त्यांची धिंड काढूं! एकंदरींत शिंदे व बाळोबा पुण्यास आले तर आपल्या जिवास अपाय होईल ही नानांची खात्री होऊन चुकली.

बाजीराव मनानें खंबीर असते तर नानांनीं शिंद्यांचें तादृश भय मानलें नसतें परंतु तिकडूनही त्यांची पूर्ण निराशा झाली. नानांशीं वागतांना श्रीमंत अत्यंत नम्रता स्वीकारीत आणि नानांविषयीं बोलतांना ते स्तुतीखेरीज एकही शब्द बाहेर काढीत नसत! श्रीमंतांचा हा सौजन्याचा दखावा बाह्यतः मात्र होता. मनांतून त्यांना नानांविषयीं पराकाष्ठेचें भय वाटत होतें. पेशवाईच्या या डोईजड कारभाऱ्याला चांगलेंच

नरम पाडून रेशमासारखें मऊ करून सोडलें पाहिजे असें त्यांच्या मनानें घेतलें होतें! पहिल्या भेटींतच श्रीमतांनीं नानांस बजावलें कीं, सवाई रावसाहेब तुमच्या ओंजळीनें पाणी पीत होते, परंतु ती गोष्ट आपल्या हातून होणार नाहीं. आम्ही राज्याचे खरेखुरे मालक होणार. आमची इच्छा हेंच राज्यकारभाराचें मुख्य धोरण, आणि आमचा शब्द हाच शेवटचा हुकूम, असेंच यापुढें सर्वांनीं मानलें पाहिजे!

या विचित्र वागणुकीमुळें श्रीमंतांविषयीं नानांस कोणताच भरंवसा वाटेना. शिंद्यांचा मुक्काम तर प्रत्यहीं जवळ जवळ येत चालला होता. शिंद्यांनीं पुण्यास येऊं नये म्हणून नानांनीं पुष्कळ खटपट केली, परंतु ती सर्व व्यर्थ गेली. तेव्हां पुढील अनर्थ लक्षांत घेऊन परशुरामभाऊंच्या सल्ल्यानें त्यांनीं स्थलांतर करण्याचा बेत ठरविला. त्यांनीं स्वपक्षीय लोकांस आपलीं मुलेंमाणसें व वित्तविषय पुण्याहून काढून दूर पोचविण्याविषयीं सूचना केली, व आपल्या स्त्रीची रायगडास रवानगी केली. नंतर श्रीमंतांचा निरोप घेऊन नाना पुण्याहून निघाले आणि सातान्यास जाऊन

२२ मार्च १७९६.

राहिले. नानांबरोबर त्याचें स्वतःचें पथक व रास्ते व प्रतिनिधि यांची तीन हजार फौज व आणखी किरकोळ पागा मिळून एकूण पांच सहा हजार स्वार होते. नानांबरोबर जावयास कोणी शिलेदार फारसे खुषी नव्हते. गाडद्यांनीं तर बरोबर जावयाचें साफच नाकारलें! पांच सहा हजार फौज नानांबरोबर गेली हें केवळ परशुरामभाऊंच्या खटपटीचें फळ होय! इतकीं वर्षें मुखत्यारीनें पेशवाईचा कारभार हाकणारे नाना फडनवीस त्यांची ही दशा! विपत्तीच्या काळांत कोणी कोणाचा नव्हे एवढें मात्र खरें!

सातान्यास गेल्यावर नानांनीं महाराजांची गांठ घेऊन 'तुम्हास कोट रुपये खर्चास देतों, फौज जमा करा, व राज्यांत आपला अंमल बसवा' वगैरे त्यांस सांगितल्याचें बखरींत लिहिलें आहे त्या सान्या गप्पाच दिसतात! राज्यांत बखेडे माजले होते तेच आवरणें त्यांच्या शक्तीबाहेर होतें. असें असतां महाराजांचा दगा नवीनच उपस्थित करून आणखी घोटाळा माजविण्यांत त्यांस कांहींच फायदा नव्हता. छत्रपतींची मर्जी

खूष ठेवण्याकरितां त्यांनीं त्यांस कांहीं पैकारुका दिला असेल ही गोष्ट मात्र संभवते.

नानांनीं पुण्याहून पलायन केल्यामुळें बाजीरावांना मोठाच हर्ष झाला. शिंदे व नाना यांच्या भांडणांत दोघांच्याही उपकाराचें ओझें न पडतां आपल्याला मधल्यामध्येंच फुकटाफुकटीं पेशवाईची गादी मिळाली असा त्यांना भ्रम उत्पन्न झाला! नाना निघून गेल्यावर दुसरेच दिवशीं श्रीमंतांनीं पुणें शहरांत आपल्या नांवाची द्वाही फिरविली आणि सर्व राज्यकारभार हातीं घेतला. नंतर श्रीमंतांची स्वारी सातान्यास पेशवे पदाचीं वस्त्रें घेण्याकरितां निघाली. आतांपर्यंत श्रीमंताच्या मनाप्रमाणेंच सर्व गोष्टी घडून आल्या. शिंदे व नाना यांच्या मदतीशिवाय त्यांस पेशवाई राज्य मिळालें-त्यांचा हुकूम प्रत्येक जण शिरसामान्य करूं लागला-मोठमोठे शूर फौजबंद सरदार त्यांजपुढें हात जोडून उभे राहूं लागले! तात्पर्य, आतांपर्यंत श्रीमंतांनीं दौलतवंतास प्राप्त होणारें दूध मात्र पाहिलें. बडगा अजून त्यांस दिसावयाचा होता! व तो बडगा लौकरच त्यांस दाखविण्याचा बाळोबातात्यांनीं योग घडवून आणिला!

ज्या दिवशीं श्रीमंतांची पुण्यास द्वाही फिरली, त्याच्या दुसरेच दिवशीं शिंद्यांचा मुक्काम पुण्यास आला. नंतर लागलीच शिंद्यांनीं श्रीमंतांच्या दाराशीं दोन गोष्टींबद्दल तगादा बसविला. त्या गोष्टी अशा—(१)गादी मिळवून देण्याबद्दल आम्हांला सव्वा कोट रुपये व पंचवीस लक्षांची जहागीर देण्याचा पूर्वी करार ठरला आहे त्याप्रमाणें रुपये व जहागीर आम्हाला मिळाली पाहिजे.(२)नाना फडनवीस हा मोठा कारस्थानी आणि दुष्ट मनुष्य आहे! त्याला कारभारांतून काढावें. त्याला पकडून आणून त्याचें सर्व द्रव्य आम्ही हिसकून घेणार आहों, त्याबद्दल सरकारची परवानगी असावी! श्रीमंतांना शिंद्यांच्या या उर्मट मागण्यांचा मोठा राग आला. शिवाय नानांचें मन दुखवावें ही गोष्टही त्यांस पसंत नव्हती. सातारचे छत्रपति हे सर्वस्वीं नानांच्या मुठींत आहेत. नाना बिथरले तर छत्रपतींकडून आपणाला वस्त्रें मिळावयाचीं नाहींत असें त्यांस भय वाटत होतें. या सर्व गोष्टींचा विचार करून श्रीमंतांनीं शिंद्यांस धीटपणानें उत्तर

दिलें कीं, 'तुम्ही आम्हांस गादीवर बसविलें नाहींत सबब तुम्हांशीं केलेला करार आतां रद्द झाला आहे. फौजेच्या खर्चासाठीं तुम्हांस कांहीं दिलें पाहिजे हें खरें. परंतु आम्हांजवळ फुटकी कवडीसुद्धां नाहीं. नानांजवळ द्रव्य मुबलक आहे. त्यांच्याशीं सख्य जोडा म्हणजे पैशास काय तोटा ? नानांवर जुलूम कराल तर ती गोष्ट मात्र आम्ही चालूं देणार नाहीं' श्रीमंतांचें हें उत्तर अर्थातच शिंद्यांस पटलें नाहीं आणि त्यामुळें एका निराळ्याच कारस्थानाचा बनाव जमून आला. तो प्रकार असा.

बाजीराव हा नादान आणि दुष्टबुद्धीचा मनुष्य आहे अशी आतां सर्वांची हळूं हळूं खात्री होत चालली होती. श्रीमंतांचा मुक्काम थेऊरावर आल्यावर दौलतराव शिंदे, सदाशिव मल्हार दिवाण, बाळोबा तात्या पागनीस आणि परशुरामभाऊ पटवर्धन या चौघांचें खलबत होऊन सर्वानुमतें विचार ठरला कीं, बाजीरावास कैदेंत ठेवून पूर्वी ठरल्याप्रमाणें चिमाजीअप्पांस यशोदाबाईच्या मांडीवर दत्तक द्यावें आणि त्याच्या नांवें सर्व राज्यकारभार परशुरामभाऊंनीं चालवावा. या बेताप्रमाणें शिंद्यांनीं बाजीरावाला कैद केलें आणि भाऊंनीं चिमाजीचें दत्तविधान करून त्याच्या नांवें सर्व राज्यकारभार आपल्या हातीं घेतला.

पुढें नानांना धरून आणून त्यांचें सर्व द्रव्य हिसकून घ्यावें असें बाळोबातात्या प्रतिपादन करूं लागले, परंतु ती गोष्ट मात्र परशुरामभाऊंच्या मनास येईना. त्यांचे म्हणणें, 'नानांना कारभारांत घेत नाहीं तर घेऊं नका, परंतु त्यांचा फडणिशीचा दरक त्यांजकडे चालला पाहिजे, आणि त्यांच्या अब्रूस किंवा पैशास धक्का लागतां उपयोगीं नाहीं. ते मर्जीस येईल तेथें स्नानसंध्या करून सुखरूप राहतील.' भाऊंनीं याप्रमाणें सक्त रदबदल चालविली तेव्हां बाळोबा प्रसन्न झाले आणि बोलले कीं, भाऊसाहेब ! तुमच्या मोहबतीखातर नानांचे सर्व अपराध मी पोटांत घालतों आणि त्यांच्या अब्रूस किंवा पैशास धक्का न लावण्याचें कबूल करतों. मात्र त्यांनीं याउप्पर कोणत्याही राजकारणांत न पडतां सातारा सोडून दूर कोठें तरी स्वस्थ रहावें, आणि त्यांच्या ताब्यांत किल्ले व सरंजामाचा

मुलूख आहे त्याच्या सोडचिठ्या त्यांनीं बिनतकरार सरकारच्या हवाली कराव्या!

भाऊंना बाळोबाच्या या शर्ती पटल्या आणि नानांची समजूत पाडण्याकरितां त्यांनीं आपले दिवाण चिंतोपंत लिमये यांना सातान्यास पाठविलें. नानांनीं लिमयांचें बोलणें शांतपणें ऐकून घेतलें आणि बोलण्या चालण्यांत पुष्कळच नम्रता दर्शविली. परंतु त्यांनीं बाळोबाच्या एकाही शर्तीला स्पष्टपणें मान्यता दिली नाहीं. हें पाहतांच बाळोबा भाऊंस म्हणूं लागले, तुम्ही भलेपणानें नानांचें कल्याण करावयास जातां हा तुमचा मोठेपणा आहे. परंतु सोईनें एखादी गोष्ट सांगितली तर सरळपणानें ऐकणारा मनुष्य नाना नव्हे! त्याला पकडून आणून त्याचीं हाडें चांगलींच नरम केलीं पाहिजेत! इतकें बोलून बाळोबांनीं नानास धरण्याकरितां नारायणराव बक्षी यांची दहा हजार फौजेसह सातान्याकडे रवानगी केली. आतां नानांच्या जिवास कांहीं अपाय होणार असें भाऊंस भय पडलें, आणि त्यांनीं बाळोबाच्या शर्ती कबूल करून सातारा सोडण्याविषयीं बहिरोपंत मेहंदळयाबरोबर नानांस निकडीचा निरोप पाठविला. इतक्या पल्ल्यावर गोष्टी आल्या तेव्हां नानांनीं सातारा सोडला आणि ते वांईजवळ मेणवली येथें जाऊन राहिले. नाना दूर सरल्यावर भाऊंनीं चिमाजी अप्पासाठीं छत्रपतींकडून पेशवेपदाचीं वस्त्रें मिळविलीं.

मेणवलीसही नानांचा मुक्काम फार दिवस होऊं शकला नाहीं. बाळोबाच्या शर्तीप्रमाणें त्यांनीं किल्ले व मुलूख यांच्या सोडचिठ्या दिल्या नाहींतच; आणि उलट चिमाजीस गादीवरून काढून त्या जागीं बाजीरावाची स्थापना करावी अशाबद्दल त्यांनीं निजाम व भोसले यांशीं राजकारण सुरू ठेविलें. ही बातमी बाळोबा व भाऊ यांस लागतांच त्यांस पराकाष्ठेचा संताप आला. त्यांनीं असा ठराव केला कीं, याउपर नानांस दक्षिणेंत राहूं देणें धोक्याचें आहे. तूर्त त्यांनीं टोक्यास जाऊन रहावें. व चातुर्मास झाल्यावर काशीस जाऊन रहावें! असा ठराव करून भाऊंनीं चिंतोपंत लिमये व विसाजीपंत वाडदेकर या दोघांबरोबर नानांस निरोप पाठविला कीं, तुम्ही तूर्त टोक्यास जाऊन रहावें. तुम्हांस आणण्या-

करितां आमचे चिरंजीव महादाजीपंत दाजी यांची सहा हजार फौजेसह रवानगी केली आहे; ते तुम्हांस टोक्यास पोचवून देतील व पुढेंही तुम्ही सांगाल तितके दिवस ते तुम्हांजवळच राहतील. तुमचें वित्त, जीवित आणि अब्रू यांना कोणाकडून धक्का लागणार नाहीं याबद्दल आम्ही जामीन आहों. तुम्ही खुशाल आमच्या फौजेच्या स्वाधीन व्हावें!' एकंदरींत भाऊंचा स्वभाव फारच भोळसर होता म्हणावयाचा! परंतु नानांनीं असलीं हीं सौजन्याचीं सोंगें आतांपर्यंत पुष्कळच पाहिलीं होतीं! आपल्याला कैदेंत पकडण्यासाठींच ही सर्व खटपट चालली आहे हें त्यांनीं तत्काळ ताडलें! दाजींचा मुक्काम सातारा जिल्ह्यांत खंडाळ्यापर्यंत आला अशी बातमी लागतांच नानांनीं ता. ४ जूनच्या रात्रीस भेणवलीहून निघून पांच चार हजार फौजेसह रायगडाकडे पलायन केलें!

शिंदे व नाना या दोन राष्ट्रपुरुषांत कलागत लागून त्यामुळें मागच्या प्रकरणाच्या शेवटीं सुचविल्याप्रमाणें फितूर विश्वासघात आणि वचनभंग हे राज्यनाशाचे प्रमुख भालदार आतां मराठी राजकारणांत राजरोसपणें वावरूं लागले आणि त्यामुळें अनेक चमत्कार घडून आले. परशुरामभाऊ व नाना यांमध्यें परंपरागत मैत्री असतां आतां त्यांमध्यें हाडवैर निर्माण झालें आणि नाना व बाजीराव यांमध्यें परंपरागत हाडवैर असतांही त्यांचें आतां सख्य जमणार असा रंग दिसूं लागला! शिंदे, भाऊ व बाजीराव असल्या अव्वल दर्जाच्या गृहस्थांनीं आणाशपथा देऊनही दुसऱ्यांस फसविलें आणि तिघांनीं मिळून नानांसही फसविलें! प्रारंभीं दत्तकाच्या नावें गादी चालावी असें नाना म्हणत होते तर त्यावेळीं औरसाच्या म्हणजे बाजीरावाच्या वतीनें शिंदे भांडत होते. आतां अवघ्या पांच महिन्यांत राजकारणाच्या ओघाबरोबर वाहतां वाहतां सर्वच प्रकार उलटा होऊन शिंदे दत्तकालाच गादी चालावी असें म्हणूं लागले आणि नाना औरसाच्या म्हणजे बाजीरावाच्या वतीनें खटपट करूं लागले! 'राजकारण हें वेश्यांगनेप्रमाणें अनेकरूप असतें.' अशा अर्थाचें संस्कृतांत एक सुभाषित आहे तें शब्दशः खरें आहे!

---

# प्रकरण पंधरावें.

## महाडचें कारस्थान.

( स. १७९६ जुन–नोव्हेंबर. )

नानांचा रायगडास एक दोन दिवसच मुक्काम पडला. पावसाळ्याची सर्द हवा त्यांच्या प्रकृतीस मानवेना, त्यामुळें ते तेथून महाडास गेले. तेथें मात्र त्यांचा चार महिने मुक्काम पडला होता. पावसाळा संपेपर्यंत पुण्याहून त्यांवर फौज येण्याचें भय राहिलें नव्हतें. कारण तिकडून येण्याचे मढा, शेवता वगैरे पांच सहा घांट आहेत ते त्यांनीं माणसें लावून खणून काढिले होते, व मोठमोठे वृक्ष आडवे तिडवे घालून वाटा बुजवून टाकिल्या होत्या. कोंकणांत उतरल्यावर त्यांनीं हजार पंधराशें गाडदी व शेदोनशें स्वार एवढाच सरंजाम जवळ बाळगिला आणि बाकीच्या सर्व फौजेस निरोप दिला.

बाळोबातात्या आणि परशुरामभाऊ यांस हतवीर्य करून पुनः आपलें वर्चस्व स्थापन करण्याकरितां या प्रसंगीं नानांनीं आपल्या आयुष्यांतील शेवटचें कारस्थान रचिलें; त्यांत त्यांची परिपक्वदशेस आलेली तारतम्यबुद्धि, दूरदृष्टि, मनुष्यस्वभावाची पारख, आपले हेतु सिद्धीस नेण्याकरितां योजलेल्या साधनांचें औचित्य व वैपुल्य, महाराष्ट्रांत त्यांच्या नांवाचें वजन व दरारा, या सर्व गोष्टी व्यक्त होतात. एखाद्या कुशल कारागिरानें निर्मिलेल्या सुंदर इमारतीप्रमाणें या कारस्थानाचे सर्व भाग एकमेकांस आधारभूत असून इतके पूर्ण व नीटनेटके होते कीं, नानांची विलक्षण बुद्धिमत्ता पाहून सर्व लोक चकित होऊन गेले. व त्यावेळीं हिंदुस्थानांत असलेले युरोपियन लोक त्यांस ‘ मराठा म्याकियाव्हेल ’[1] असें म्हणूं लागले. आतां या कारस्थानाची घटना कशी होत गेली हें आम्हीं यथानुक्रम वर्णन करूं.

शिंद्यांच्या जबरदस्तीमुळें बाजीरावांना कारागृहांत आणि नानांस अज्ञातवासांत दिवस काढणें भाग पडलें, त्यामुळें समदुःखी या नात्यानें त्या

---

१ म्याकियाव्हेल नांवाचा इटाली देशांत एक नामांकित मुत्सद्दी होऊन गेला.

दोघांचें सख्य जमण्यास बिलकूल उशीर लागला नाहीं. बाळोजी कुंजर नांवाच्या एका शिलेदारामार्फत श्रीमंत व नाना यांमध्यें थोडासा पत्रव्यवहार होऊन शेवटीं श्रीमंतांनीं नानांस करार लिहून दिला कीं, तुम्ही आम्हांस गादीवर बसवाल तर आम्हीं यापुढें सर्व राज्यकारभार तुमच्या सल्ल्यानेंच करीत जाऊं. शिवाय आमची स्थापना करण्याकरितां तुम्ही शिंदे, भोसले, निजाम, इंग्रज वगैरेंशीं जे जे करार ठरवाल ते ते सर्व आम्ही इमानानें पाळूं आणि त्या करारांचा अंमल तुमच्या म्हणण्याप्रमाणेंच शब्दशः करण्यांत येईल. श्रीमंतांशीं हा करार ठरल्यामुळें नानांचा पुढील मार्ग पुष्कळच सोपा झाला.

बाळोबा व भाऊ यांचें मुख्य सामर्थ्य शिंद्यांच्या फौजेंत होतें, म्हणून आधीं दौलतरावासच वश करण्याचा नानांनीं यत्न चालविला. या कामीं त्यांनीं साम, दाम आणि दंड या त्रिविध उपायांची योजना एकाच वेळीं चालू केली. या उपायांपैकीं दंडाचें म्हणजे शिंद्यांस भेडसावण्याचें कामच अत्यंत महत्वाचें होतें आणि तें काम इंग्रजांनीं नानांच्या तर्फेनें उत्कृष्टपणानें बजावून दाखविलें! नानांची सूचना जातांच त्यांना राहण्याकरितां इंग्रजांनीं साष्टीचा किल्ला आपला माल काढून मोकळा केला. त्यानंतर इंग्रजी पलटणें मुंबई, कलकत्ता व लखनौ येथें जमूं लागलीं; आणि 'इंग्रज दिल्लीवर स्वारी करून त्या दरबारांतून शिंद्यांचें उच्चाटण करणार' अशा भूमका मराठी राज्यांत चोहोंकडे पसरू लागल्या. इंग्रजी लष्कराच्या या हालचाली पाहून शिंद्याचा मुख्य सेनापति डी बॉईन हा घाईघाईनें दिल्लीकडे निघाला. याप्रमाणें भयप्रदर्शनाचें काम चालूं असतां इंग्रजांच्या पुण्याच्या वकिलानें शिंद्यांशीं बोलणें लाविलें कीं, 'तुम्ही नानांस उपद्रव करणार नाहीं याबद्दल आमची कशी खातरी करणार ती करा, म्हणजे कारभारांत ढवळाढवळ न करितां नानाही स्वस्थ राहतील याबद्दलची हमी आम्ही घेतों.' नानांच्या बाजूनें इंग्रजांचें प्रत्यक्ष दंड थोपटून उभें राहिलेलें पाहतांच शिंदे भयभीत झाले. शिवाय याचवेळीं नानांच्या प्रेरणेवरून महादजी शिंद्यांच्या वेळचे जुने मुत्सद्दी रामजी पाटील व रायाजी पाटील हेही दौलतरावास म्हणूं लागले कीं, 'तुम्ही शेणव्यांच्या नादानें भलती-

कडेच वाहवत चाललां! नानांस इंग्रज, मोंगल व भोसले यांचें पाठबळ आहे. एकीकडून मोंगल, दुसरीकडून इंग्रज आणि तिसरीकडून नाना असा तिहेरी शह लागल्यास आपल्या सरदारीची दशा काय होईल? याकरितां आतां शेणव्यांचा नाद सोडून देऊन नानांशीं मिलाफ करून घ्यावा.' महादजी शिंद्यांची राख केशरी म्हणून होती, ती उजनीस रहात असे. तिजकडे नानांनीं प्रेष केल्यावरून तिनेंही नानांशीं सख्य जोडण्याविषयींच दौलतरावास बोध केला. याप्रमाणें चोहोंकडून तणावे लागतांच शिंद्यांचें अवसान गळालें आणि रायाजी पाटलाच्या मध्यस्थीनें शिंदे व नाना यांमध्यें एक करार ठरला. तो करार असा कीं, शिंद्यांनीं बाळोबा व भाऊ यांचें पारिपत्य करावें, आणि बाजीरावास गादीवर बसविण्याविषयीं व नानांच्या हातीं पूर्वींप्रमाणें राज्यकारभार सोंपविला जाण्याविषयीं जितका प्रयत्न करतां येईल तितका झटून करावा. श्रीमंत गादीवर बसले व नाना कारभार करूं लागले म्हणजे शिंद्यांनीं कूच करून हिंदुस्थानांत जावें. ते जांबगांवास गेले म्हणजे नानांनीं त्यांस पन्नास लक्ष रुपये द्यावे, व गोदावरी उतरून गेल्यावर आणखी पन्नास लक्ष रुपये द्यावे. शिवाय नानांनीं श्रीमंतांकडून शिंद्यांस अहंमदनगरचा किल्ला व दहा लक्षांची जहागीर देववावी.

यानंतर नानांनीं निजामअल्ली व भोसले यांचीही आपल्या मसलतीस अनुकूलता मिळविली. नानांनीं निजामाशीं करार ठरविला तो असा— बाजीरावास पेशवाईचा अधिकार मिळावा, व नानांची पूर्वींप्रमाणें कारभारावर स्थापना व्हावी, या दोन गोष्टी घडवून आणण्याकरितां निजामानें सैन्याची लागेल तसतशी नानांस कुमक करावी; व त्याबद्दल नानांनीं बाजीरावाकडून त्यास खर्ड्यांच्या तहांत ठरलेली खंडणी व बत्तीस लक्षांचा मुलूख माफ करवावा. भोसल्यांशींही नानांनीं याच शर्तींवर करार ठरविला होता, त्यांत त्यांस बाजीरावाकडून पंधरा लक्ष रुपये व गढेमंडळ प्रांत देवविण्याचें ठरविलें होतें. शिंद्यासारखा कार्यकर्ता सरदार अनुकूल झाल्यावर नबाब व भोसले यांस एवढाल्या देणग्या देऊन नानांनीं त्यांची अनुकूलता कां मिळविली? अशी कोणी शंका घेईल, तर त्यावर उत्तर असें आहे कीं, असल्या बाब-

सांत राजेरजवाड्यांशीं करार होत असतात ते दोन हेतूनें होत असतात. एक हेतु त्यांनीं आपणास मदत करावी हा असतो व तो प्रधान हेतु असतो हें खरेंच; पण त्यांनीं एक वेळ आपली कुमक न केली तरी चालेल परंतु आपल्या प्रतिस्पर्ध्यास तरी त्यांनीं मिळूं नये; असा गौण हेतूही अशा करारांत असूं शकतो. शिंदे व बाजीराव यांचें आपण कितीही कल्याण करूं गेलों तरी ते आपणाशीं बरेपणानें वागतीलच असा भरंवसा नानांस येईना. सबब वरील दोन्ही हेतु लक्षांत घेऊन त्यांनीं नबाब व भोसले यांशीं वर सांगितल्याप्रमाणें करार ठरविला होता. इंग्रजांस त्यांनीं कांहीं देऊं घेऊं केलें नाहीं. पण बाजीरावास गादीवर बसविण्याविषयीं तुमची कांहीं हरकत आहे कीं काय ? ' असा प्रश्न करून त्यांजकडून अनुकूल उत्तर त्यांनीं मिळवून ठेवलें होतें.

नबाब व भोसले यांना दिलेल्या देणग्या दिसतांना मोठ्या दिसतात. परंतु त्या देण्यांत नानांनीं सरकारचें प्रत्यक्ष नुकसान मात्र कोणतेंच केलें नव्हतें. सवाई रावसाहेब यांच्या कारकीर्दींत खर्ड्यांच्या स्वारीच्या वेळीं भोसल्यांना गढेमंढळ प्रांत देण्याचा करार ठरला होता. त्या पेशव्यांच्या मृत्यूमुळें भोसल्यांना हा प्रांत आतांपर्यंत मिळूं शकला नाहीं. या कारस्थानाच्या निमित्तानें नानांनीं हा जुना करार पुरा करण्याचें ठरविलें इतकाच प्रकार. सारांश, नानांनीं भोसल्यास नवीन असें कांहींच दिलें नाहीं. नबाबा-कडून खंडणी व मुलूख घ्यावयाचा तो नानांनीं माफ केला हा तर केवळ कागदी जमाखर्च होता ! खर्ड्यांच्या तहाप्रमाणें मुलूख किंवा खंडणी यापैकीं पेशव्यांना अजून कांहींच मिळालें नव्हतें, आणि खर्ड्यांच्या मोहि-मेप्रमाणें आणखी एखादी मोठी मोहिम केल्याशिवाय नबाबाकडून कांहीं मिळण्याचा संभवही नव्हता. पेशवे सरकारांत आतां तसें सामर्थ्य राहिलें नाहीं हें जाणूनच नानांनीं नबाबाशीं हा 'माफी'चा करार ठरविला होता.

परशुरामभाऊंस शह देण्याकरितां नानांनीं करवीरच्या महाराजांशीं राजकारण करून त्यांस सांगितलें कीं, भाऊंच्या सरंजामी मुलखावर स्वारी करून तुम्ही तो प्रांत खुशाल ताब्यांत घ्यावा. पेशवाई मुलखास मात्र तुम्ही काडीमात्र उपद्रव देऊं नये. यावर महाराज म्हणाले कीं, आज

भाऊंत व तुम्हांत वांकडें आहे म्हणून तुम्ही आम्हांस असें करावयास सांगतां. पण उद्यां तुम्ही व भाऊ एक झालांत आणि भाऊंनीं आम्हांवर स्वारी केली तर आमची काय वाट ! यावर नानांनीं त्यास आश्वासन दिलें की, भाऊंची तुम्हांवर स्वारी होईल तर आम्ही तुमचा बचाव करूं. फौज ठेवण्याकरिता महाराजांनीं याप्रसंगीं नानांजवळ दोन लाख रुपये उसनवार मागितले तेही नानांनीं त्यांस तत्काळ दिले.

नानांचे लेही बाबा फडके, नारोपंत चक्रदेव, घोंडोपंत नित्सुरे वगैरे पुण्यांतच राहिले होते, त्यांनीं पुण्यांत आणि पुण्याबाहेर फितूर उत्पन्न करण्याचा क्रम नेटानें चालू ठेवला. शिवाय याच वेळीं नानांनीं पटवर्धन भाऊबंद मंडळींत तेढ उत्पन्न केली त्यामुळें मिरजकर व कुरुंदवाडकर या दोन पटवर्धन घराण्याचें भाऊंशीं वांकडें पडलें. नानांचें सर्व द्रव्य जप्त करण्याविषयीं भाऊंची पुण्यास घडपड चालली असतां, इकडे मिरजेस त्यांचे चुलतबंधु गंगाधरराव गोविंद मिरजकर यांनीं तें द्रव्य गुप्तपणें आपल्याजवळ संभाळण्याचें काम पतकरलें होतें ! असो. या भाऊबंदी तेढीमुळें परशुरामभाऊ अर्थातच कमजोर झाले.

याप्रमाणें नानांच्या कारस्थानाचा उत्कर्ष झपाट्यानें चालू असतां भाऊ व बाळोबा हे आपल्या घमेंडीतच स्वस्थ राहिले. नानांशीं शत्रुत्व दाखविण्यांत त्यांनीं आतां कोणतीच बाकी ठेवली नाहीं. नानांचें खास पथक दीड हजार स्वारांचें होतें त्याच्या सरंजामाचा मुलूख तर त्यांनीं जप्त केलाच; पण त्याशिवाय खर्ड्यांच्या स्वारींत दरबारखर्चाऐवजीं नबाबाकडून त्यांस मिळालेली तीस हजारांची जहागीर व इनामगांवही जप्त केले ! पुण्यांतील नानांच्या वाड्यावर जप्ती आली, तेव्हां त्यांत जवाहीर व रोकड फारशी सांपडली नाहीं, परंतु कापड मात्र लाखों रुपयांचें सांपडलें तें भाऊंनीं सरकार जमा केलें.

निजामाचा दिवाण मशीरुल्मुल्ख हा खर्ड्याच्या स्वारींत पेशव्यांच्या कैदेंत सांपडला होता हें वाचकांच्या स्मरणांत असेलच. या मशीरानें आतां भाऊ व बाळोबा यांशीं बोलणें लाविलें कीं, ' माझें व नानांचें वांकडें आहे ही गोष्ट तुम्हांस माहीतच आहे. खर्ड्यांचा तह ठरतांना नानांनीं

आकसानें माझी हुरमत घेतली आहे आणि मला कैदेंत ठेविलें आहे. मला नानांचा सूड जरूर घ्यावयाचा आहे आणि तुम्हालाही तेंच करावयाचें आहे. तुमचें व माझें सख्य जमण्यास कांहींच हरकत दिसत नाहीं. माझी कैदेंतून मुक्तता कराल तर मी तुमचा व नबाबाचा स्नेह जमवून देतों, आणि खर्ड्यांच्या तहाप्रमाणें नबाबाकडून खंडणी व मुलूख यावयाचा आहे त्याचा फडशाही मी तुमच्या म्हणण्याप्रमाणेंच करून देतों. शिवाय नानांच्या पारिपत्याकरितां तुम्ही सांगाल तेवढी फौज मी स्वतःच्या खर्चानें उभी करतों ! तुम्ही व मी मिळून नानांस झोडपून काढूं या!' भाऊ व बाळोबा यांस मशीराचा हा सल्ला सोळा आणे मानवला आणि त्यांनीं त्याची कैदेंतून सुटका केली. यानंतर मशीरानें महिना पंधरा दिवसांत सात आठ हजार फौज गोळा केली आणि पुण्याशेजारीं गुलटेकडीजवळ यानें आपला स्वतंत्र गोट दिला.

मशीर यास मुक्त करून आपण निजामाची मर्जी खूष केली व त्याशीं नानांचें कारस्थान घाटत होतें तें बंद पाडलें, असें भाऊ व बाळोबा मानीत होते. पण ती त्यांची चूक होती! कारण मशीर हा यापूर्वीच नानांचा हस्तक बनला होता! मशीरानें आपल्या सुटकेबद्दल खटपट केली तीही नानांच्याच प्रेरणेवरून आणि त्यानें फौज गोळा केली तीही नानांनीं पुरविलेल्या पैशाच्या जोरावरच! भाऊ व बाळोबा यांच्या नाशाकरितां मशीराच्या हाताखालीं नानांची ही फौज पुण्यास उघडपणें जमत होती आणि त्या गोष्टींत भाऊ व बाळोबा हे अज्ञानानें आनंद मानीत होते हा केवढा चमत्कार!

राजकीय स्थितींत याप्रमाणें क्रांति घडून आल्यामुळें शिंद्यांनीं श्रीमंतांचा प्रतिबंध थोडासा ढिला केला आणि त्याचा फायदा श्रीमंतांनीं तत्काळ घेतला! मानाजी फांकडे त्यांजवळ होते त्यांचें मराठी शिलेदारांवर पराकाष्टेचें वजन होतें. श्रीमंतांच्या सांगण्यावरून फाकड्यांनीं नानांकडून पैका आणून शिलेदारांस नालबंदी वाटली. व शिंद्यांच्या गोटांतच पांच सहा

स. १७९६ } हजार फौज चाकरीस ठेवली. याप्रमाणें फौजेची सिद्धता
आगष्ट } झाल्यावर श्रीमंतांनीं पळून जाण्याची मसलत ठरविली! पण

बाळोबास ती बातमी लागल्यावरून त्यांनीं ती फौज घालवून लाविली. तेव्हां त्या शिलेदारांशीं फांकड्यांनीं गुप्त संकेत केला कीं, आतां तुम्ही घरोघर निघून जा, व पुढें मी सांगेन त्या ठिकाणीं मला भेटा! याप्रमाणें होऊन ती फौज निघून गेल्यावर बाळोबांनीं बाजीरावांचा प्रतिबंध सक्तीचा केला.

ही फिसाद मोडते तों ता. २६ आगष्ट रोजीं दुसरा एक कट उघडकीस आला. हा कट होण्यासही नानांचा पैकाच कारण झाला. बाबा फडके व नारोपंत चक्रदेव यांनीं नानांकडून ऐवज आणून हुजरातीच्या लोकांस वांटला व कांहीं होळकरांसही दिला; आणि हुजरात व होळकर यांचा एकोपा करून असें ठरविलें कीं, भाऊंस कैद करून आणि चिमाजीस पदच्युत करून त्या जागीं बाजीरावांस बसवावें. परंतु हाही कट लवकरच उघडकीस आल्यामुळें परशुरामभाऊंनीं तावडतोब धरपकडीस सुरवात केली. फितुरी प्रमुख लोकांपैकीं मालोजी राजे घोरपडे व नीळकंठराव प्रभु हे मारामार करीत वांईकडे पळाले आणि नारोपंत चक्रदेव हे मशीराच्या गोटांत लपले. बाबा फडके मात्र भाऊंच्या कैदेंत सांपडले.

स. १७९६

याप्रमाणें पुण्यांत जागजागीं बंडें व फितूर यांचा प्रादुर्भाव होऊं लागला असें पाहून भाऊ व बाळोबा यांनीं कयास ठरविला कीं, बाजीरावाचा मुक्काम येथें आहे त्यामुळेंच हे सर्व बखेडे उत्पन्न होतात. याकरितां त्यांस येथून काढून कोठें तरी दूर नेऊन ठेवलें पाहिजे. याप्रमाणें विचार ठरवून बाळोबांनीं बाजीरावांची हिंदुस्थानकडे रवानगी करून दिली. श्रीमंतांच्या बंदोबस्ताकरितां बाळोबांनीं सखाराम घाटगे सर्जेराव नांवाचा आपला एक विश्वासू सरदार पांच सहा हजार फौजेसह बरोबर दिला. श्रीमंतांची स्वारी पुण्याहून निघाली ती वाटेंतच जांबगांवास थांबली आणि तेथें बसून बसून त्यांनीं शिंद्यांशीं एक विचित्र करार ठरविला! हा करार एकट्या नानांसच नव्हे तर पुढें सर्व मराठी राज्यास भोंवला! या कराराची माहिती अशी—

बाजीरावांस नानाविषयीं पराकाष्ठेचें भय वाटत होतें हें पूर्वी सांगितलेंच आहे. नानांनीं त्यांची गादीवर स्थापना करण्याकरितां इतकी खट-

पट चालविली होती, त्यामुळें हें भय वास्तविकरीतीनें कमी व्हावयास पाहिजे होतें. परंतु तसें न होतां श्रीमंतांचें भय आतां सहस्रपटीनें वाढलें नानांची मूर्ति आतां श्रीमंतांस कर्दनकाळाप्रमाणें भयप्रद भासूं लागली त्यांच्या मनांत विचार घोळूं लागला कीं, नाना यःकश्चित कारकून असतांही त्यांच्या सांगण्यावरून दिल्ली, कलकत्ता, लखनौ, श्रीरंगपट्टण, हैदराबाद अशा दूरदूरच्या ठिकाणीं फौजांच्या हालचाली सुरू होतात आणि आम्ही मालक असतां आम्हाला कुणीसुद्धां विचारीत नाहीं! नानाजवळ द्रव्य मुबलक आहे आणि राज्यांतील सरदार व निजाम व इंग्रज वगैरे परकीय सरकारें हींही त्यांस पूर्णपणें अनुकूळ आहेत. नानांच्या साह्यानें आज आपण गादीवर बसलों आणि उद्यां त्यांची मर्जी बिघडून ते आमच्या नाशास प्रवृत्त झाले, तर त्यांचा हात धरणारें माणूस शिंद्याशिवाय पृथ्वीच्या पाठीवर कोणीच दिसत नाहीं. सबब शिंद्यांचीं पलटणें पुण्यास नानांच्या उरावर कायमचीं ठेवून घेऊन नंतरच नानांनीं देऊं केलेल्या पेशवेपदाचा स्वीकार करावा!

बाळोबांनीं आपल्या विश्वासाचा म्हणून जो मनुष्य श्रीमंतांच्या बंदोबस्ताकरितां बरोबर दिला होता तो सर्जेराव घाटगेच आतां श्रीमंताकडे फितूर झाला आणि त्यानें श्रीमंत व शिंदे यांचें सूत्र जमवून दिलें! घाटग्याची मुलगी बायजाबाई ही फार सुंदर असून उपवर होती. शिंद्यांच्या मनांतून तिजशीं लग्न लावावयाचें होतें. परंतु शिंद्याची जातकुळी हीन असल्यामुळें आपण त्यांस मुलगी देणार नाहीं असें सर्जेराव म्हणत असे. हें त्यांचें बोलणें बाह्यात्कारी मात्र होतें व आंतून इच्छा अशी होती कीं, पुष्कळ दौलत व अधिकार मिळाला तर मुलगी द्यावयाची! हा त्याचा मनोदय बाजीरावास माहीत असल्यामुळें त्यांनीं शिंद्यांची दिवाणगिरी देऊं करून मुलगी देण्याविषयीं घाटग्याचें मन वळविलें आणि नंतर त्याच्या मार्फत शिंद्यांशीं बोलणें लाविलें कीं, ' नानांच्या कारस्थानामुळें आम्हांस गादी मिळाल्यावर तुम्ही नानांच्या सांगण्याप्रमाणें हिंदुस्थानांत जाऊं नये. आम्हांस नानांचें अतिशय भय वाटतें, सबब आमच्या रक्षणाकरितां तुम्ही सर्व फौजेसह पुण्यासच रहावें. या तुमच्या

कामगिरीबद्दल आम्ही तुम्हांस दोन कोट रुपये बक्षीस देऊं आणि आमच्या सांगण्यावरून जितके दिवस तुम्ही पुण्यास रहाल तितके दिवस तुमच्या फौजेचा खर्च आम्ही चालवूं. नाना जिवंत असेपर्यंत तुम्ही आम्हांस सोडून दूर जाऊं नये.' कनक व कांता यांच्या लोभानें शिंद्यांनीं हें बोलणें मोठ्या आनंदानें मान्य केलें. शिंदे व श्रीमंत यांमध्यें झालेला हा करार गुप्त असल्यामुळें नानांस तो कळला नाहीं हें सांगावयास नकोच.

बाजीरावाची स्वारी शिंद्याच्या छावणींतून निघून गेल्यावर मानाजी फाकडे पुण्याहून निघून चांभारगोंद्यास गेले व तेथें पूर्वसंकेताप्रमाणें फौज जमा करूं लागले. ती बातमी पुण्यास समजतांच फांकड्याच्या पारिपत्याकरितां कोणास पाठवावें, या विवंचनेंत बाळोबा व भाऊ पडले. कारण होळकर व हुजरातीचे पथके पूर्वीच बिथरलेले असल्यामुळें त्यांस पाठवावें तर ते शत्रूसच मिळण्याचा संभव होता. मशीरावर मात्र त्यांचा विश्वास असल्यामुळें त्यांनीं त्याची फौज फांकड्यावर पाठविली. मशीर सुद्धां नानांच्याच मसलतींत मिळाला आहे हें त्यांस शेवटपर्यंत कळलेंच नाहीं! मशीराची फौज पाठीवर आली असें पाहतांच फांकडे लांब मजली करीत वांईकडे आला. तेथें मालोजी घोरपडे व नीळकंठराव प्रभु हे शूर सरदार होतेच. त्यांची व फांकड्याची गांठ पडल्यावर नानांकडून पैका आणून त्यांनीं सात आठ हजार फौज गोळा केली. या नव्या फौजेवर नानांनीं बजाबा शिराळेकर यास मुख्य सरदार नेमिलें.

बाळोबातात्या व परशुरामभाऊ यांस नानांच्या कारस्थानांनीं बाहेरून घेरलें होतें आणि आंतूनसुद्धां ते आपोआपच दुर्बळ होत चालले होते! त्यांच्या साऱ्या उड्या फौजेच्या बळावर होत्या, परंतु ती फौजही त्यांच्या कह्यांतून दिवसेंदिवस सुटत चालली. बाळोबाचें शिंद्याच्या फौजेवर विलक्षण वजन होतें, त्यामुळें दौलतरावही त्यांस वचकून वागत. परंतु नाना गेल्या दिवसापासून या फौजेस बाळोबाकडून एक पैसाही प्राप्त झाला नव्हता. त्यामुळें ही फौज बिथरतां बिथरतां आतां तिची मजल उघडपणें दंगे करण्यापर्यंत आली होती! द्रव्याच्या अभावामुळें भाऊंच्या फौजेचीही अशीच दुर्दशा झाली होती. भाऊ व बाळोबा यांचा

पूर्व लौकिक मोठा आणि त्यांच्या नांवाचा दराराही विशेष. त्यामुळें राज्य-कारभाराची गाडी कशी बशी रेंगाळत चालली होती. लक्ष्मीची अनुकूळता हें सर्वांत मोठें सामर्थ्य आहे. तें सामर्थ्य भाऊ व बाळोबा यांजजवळ नसल्यामुळें त्यांचा कारभार फार दिवस टिकणें अशक्यप्रायच होतें.

दसरा झाल्याबरोबर नानांच्या कारस्थानाला झपाट्यानें रंग चढूं लागला. निजामाची फौज मोंगलाई सरहद्दीवर जागजागीं जमूं लागली व तिजपैकीं एक टोळी घेऊन इसामिय्या नांवाचा सरदार पुण्याकडे येऊं लागला. नागपूरकर भोसलेही नागपुराहून निघून वऱ्हाडांत आले व तेथून त्यांनीं आपला मोर्चा पुण्याकडे वळविला. बाळोबाचें शिंद्याच्या फौजेवरचें वर्चस्व नाहींसें झालें. होळकर व हुजरात व इतर सरदार नानांच्या हुकमाप्रमाणें वागण्यास तयार झाले. मशीर तर नानांचाच हस्तक होता. पुण्याहून चालून येण्याकरितां वांईस मानाजी फांकडे आतुर झाले होते. येऊन जाऊन भाऊंची स्वतःची तीन चार हजार फौज व शेणवी कारभाऱ्यांची काय चार पांच हजार फौज असेल ती मात्र नानांच्या विरुद्ध लढणारी होती. पण तेवढ्या फौजेनें नानांच्या मसलतीस धक्का बसण्याचा संभव राहिला नव्हता.

याप्रमाणें नानांचें राजकारण रंगास आल्यावर ता० २६ आक्टोबर रोजीं रात्रीं दौलतराव शिंद्यांनीं बाळोबातात्या, सदाशिव मल्हार व धोंडो रामचंद्र या त्रिवर्ग कारभाऱ्यांस एकाएकीं कैद केलें. या धरपकडीची बातमी भाऊंस लागतांच ते चिमाजी आपास घेऊन टाकोटाक जुन्नराकडे पळाले.

स. १७९६ } तेथेंही त्यांच्या पाठलागावर फौज आली, तेव्हां ते माधवराव रास्त्यांच्या स्वाधीन झाले. रास्त्यांनीं भाऊंस मांडवगणाच्या किल्ल्यावर कैदेंत ठेविलें. भाऊंच्या पाठलागावर फौज गेली असतां इकडे मशीर व होळकर यांच्या फौजांनीं त्यांचा गोट कात्रजेस होता तो लुटून फस्त केला व पुणें शहराची नाकेबंदी करून जागोजाग चौक्या ठेवून बंदोबस्त केला. मशीराच्या गोटांत लपलेले नारोपंत चक्रदेव हे आतां अज्ञातवासांतून बाहेर पडले आणि त्यांनीं भाऊ व बाळोबा यांच्या कटांत सामील असलेल्या गृहस्थांचा माग लावलावून त्यांना कैद करण्याचा

सपाटा चालविला. मोरोबाच्या फितुराप्रमाणेंच या बंडाचाही बीमोड नानांनीं रक्तपाताशिवायच करून टाकिला."

शिंद्यांनीं बाळोबा वगैरे कारभाऱ्यांस कैद केलें, त्याच वेळीं बाजीरावांस जांबगांवाहून परत आणण्याविषयीं सर्जेराव घाटग्यास पत्र लिहिलें, आणि त्याच वेळीं नानांसही पत्र लिहिलें कीं, तुमचें आमचें अकृत्रिम सख्य असतां आमच्या कारभाऱ्यांनीं वांकडी नजर धरून भलभलत्या गोष्टी केल्या; सबब त्या कारभाऱ्यांस कैद करून आम्ही तुम्हांस हें पत्र लिहीत आहों. तुम्ही कांहीं एक संशय न धरतां सत्वर पुण्यास येऊन राज्यकारभार हातीं घ्यावा व पेशवाईच्या गादीवर बाजीरावाची स्थापना करावी.

शिंद्यांचें पत्र आल्यावर मशीर व रघोजी भोसले यांचींही निशंकपणें पुण्यास निघून येण्याविषयीं नानांस पत्रें आलीं. हीं पत्रें व पुण्यास घडलेल्या गोष्टींच्या बातम्या नानांस पोचतांच ते महाडाहून निघून मेणवलीस आले. तेथें थोडे दिवस राहून ते सासवडास आले. तों भोसले व इसामिय्या यांच्या फौजाही पुण्याजवळ येऊन पोचल्या. नंतर नानाही सासवडाहून निघून पुण्यास आले व आपल्याच बागेंत मुक्काम करून राहिले.

या महाडच्या कारस्थानाचा विचार करतांना त्यांतील प्रमुख घटक म्हणजे शिंदे, इंग्रज, होळकर, भोसले, निजाम व नाना हे सहा सत्ताधारी डोळ्यांसमोर उभे राहतात. या घटकांचीं नांवें वाचतांना सर्कशींत वाघ, सिंह आस्वल, हत्ती वगैरे जंगली क्रूर जनावरांचें संमेलन भरवितात त्याची आठवण झाल्याशिवाय रहात नाहीं. कारण या सहा घटकांपैकीं प्रत्येकजण इतर पांचांशीं वक्रदृष्टीनें पाहाणाराच होता. इंग्रज व नाना यांमध्यें तर हाडवैरच होतें. तीच स्थिति निजाम व भोसले या जोडीची. शिंदे होळकरांचें वैर तर इतकें तीव्र होतें कीं, त्यानें यापूर्वीच रक्तपातापर्यंत मजल गांठली होती! अशा या आपणाशीं आणि परस्परांशी शत्रुत्वानीं असणाऱ्या सत्ताधाऱ्यांना ज्या सूत्रधारानें एकसूत्रित केलें त्या नाना फडनवीसांच्या बुद्धिमत्तेची तारीफ काय वर्णावी!

या कारस्थानाचा दुसराही एक विशेष आहे. तो असा कीं, या कारस्थानाच्या बनावांत नानांनीं प्रत्यक्ष असा भाग कोणताच घेतला नाहीं.

'तटस्थः स्वानर्थान् घटयति च मौनं च भजते' या उत्कृष्ट सुसत्राच्या कसोटीस नाना पूर्णपणें उतरतात. कारण ते महाडास तटस्थपणें स्वस्थ बसले होते आणि त्यांच्या प्रेरणेवरून सर्व कामें परभारेंच बजावलीं जात होतीं! इंग्रजांनीं शिंद्यांस भेडसावलें, मशीरानें भाऊ व बाळोबा यांस फसविलें, फडक्यांनीं फितूर उत्पन्न केले, फांकड्यांनीं फौज जमा केली, निजाम व भोसले यांनीं पुण्यावर चालून घेतलें, आणि शेवटीं शिंद्यांनीं भाऊ व बाळोबा यांचें पारिपत्य केलें, या सर्व गोष्टी जो तो आपल्याच इच्छेनें व सत्तेनें करीत आहे असाच सार्वत्रिक देखावा दिसत होता. या सर्वांचे प्रेरक नाना फडनवीस आहेत ही गोष्ट सामान्य लोकांसच काय, पण खुद्द परशुरामभाऊ व बाळोबातात्या यांस शेवटपर्यंत कळलीच नाहीं!

---

# प्रकरण सोळावें.

## बाजीरावाची सुरवात व कैद.

[स. १७९६ दिसें.—स. १७९७ दिसेंबर अखेर.]

मराठी राज्य काबीज करण्यासाठीं इंग्रज लोक अगदीं टपून बसले आहेत. राज्यांत दंगेधोपे माजून राहिले तर तें इंग्रजांच्या घशाखालीं उतरण्यास फार अवधि लागणार नाहीं, या गोष्टी नानाखेरीज इतर कोणास त्या काळीं दिसत होत्या असें वाटत नाहीं. राज्याचा कारभार आपल्या हातीं राहिला तरच राज्यांत स्वस्थता नांदून त्याचा उत्कर्ष होणें शक्य आहे, अशी जी नानांची समजूत होती ती केवळ स्वार्थमूलक होती असेंही ह्मणवत नाहीं. इंग्रजांच्या वर्चस्वाची आपत्ति टळावी व मराठी राज्याचें स्वातंत्र्य कायम रहावें म्हणून मागच्या प्रकरणांत वर्णिलेलें महाडचे कारस्थान नानांनीं रचिलें, आणि त्यांत त्यांचें अपूर्व बुद्धिकौशल्य दिसून आलें, हें निर्विवाद आहे. मात्र या कारस्थानाचें पुढें काय झालें हें पाहिलें तर असें म्हणावें लागतें कीं, महाडच्या कारस्थानापासून मराठी राज्यास अथवा खुद्द नानांसुद्धां कांहींएक फायदा झाला नाहीं! उलट

तेजोभंग, द्रव्यापहार, कारागृहवास आणि अखंड चिंता यांचें चक्र जें एकदां त्यांच्या पाठीस लागून राहिलें त्यांतून मृत्यूनें त्यांची सुटका केली! इतक्या शहाणपणानें लढविलेल्या मसलतीचें असें विपरीत पर्यवसान कां व्हावें याचा शोध करूं जातां असें दिसून येतें कीं, यांत नानांच्या बुद्धीचा दोष नसून तो राज्याच्या ऱ्हासकाळाचा प्रताप होय! कारण कीं, नानांच्या ऐन अमदानींतले त्यांचे सहाय्यकारी हरिपंत, पाटीलबावा व तुकोजी होळकर हे परलोकवासी झाले होते. आणि परशुरामभाऊ कैदेंत पडले होते. अशा लोकांशीं व्यवहार करण्याऐवजीं यापुढें ज्या इसमांशीं वागणें नानांच्या कपाळीं आलें ते बाजीराव व दौलतराव शिंदे हलक्या कानाचे, हलक्या मनाचे नादान मनुष्य असून शिवाय ते दगलबाज पाजी लोकांच्या मसलतींत गुरफटले गेले होते! स्वतःच्या मनगटाचें सामर्थ्य हें नानांचें बळ कधींच नव्हतें! येऊन जाऊन अकलेवर आणि जवळच्या द्रव्यावरच त्यांची सर्व मदार! पाजी लोकांशीं प्रसंग पडतांच त्यांची अकल गुंग होऊन गेली आणि द्रव्यापहार होऊन त्यांचे हाल झाले ते निराळेच! या पुढच्या नानांच्या सर्व खटपटी म्हणजे बोक्यानें धरलेल्या उंदरानें निसटून जाण्याचे यत्न करावे त्यासारखाच प्रकार होय! नानांचें चरित्र जें यापुढें यावयाचें आहे त्याचें हें सामान्य स्वरूप आधींच सांगून ठेविलें आहे. ज्याला तपशील पहावयाचा असेल त्याला तो यापुढच्या प्रत्येक प्रकरणांतून पहावयास सांपडेलच!

बाजीराव व दौलतराव हे आपणाशीं सुधेपणानें वागणार नाहींत असा नानांचा तर्क होता, त्याप्रमाणें पुण्यास आल्याबरोबरच त्यांस अनुभव येऊं लागला. इतर पेशव्यांप्रमाणें बाजीरावांनींहि आपल्या हुजरातीच्या फौजेंत येऊन रहावें आणि सर्व राज्यकारभार स्वतः पहावा अशी नानांनीं इच्छा प्रदर्शित केली; परंतु श्रीमंतांना नानांचा विश्वास वाटेना. यद्यपि वानवडीवर शिंद्यांचा आणि खराडीवर श्रीमंतांचा गोट होता तथापि श्रीमंतांच्या गोटावर शिंद्यांच्या पलटणांचा पहारा अजून कायमच होता! हुजरातींत येऊन रहाण्याविषयीं नाना ज्यास्त ज्यास्त आग्रह करूं लागले तसतसा श्रीमंतांना संशय वाटूं लागला कीं, आपल्याला कैद करण्याकरतांच

नानांची ही सर्व धडपड चालली आहे ! पुढें श्रीमंत शनवार वाड्यांत रहावयास आले तेव्हांही त्यांनीं तेथचे जुने पहारेकरी काढून टाकले आणि त्या जागीं शिंद्यांच्या कंपूतले लोक नेमले. श्रीमंतांची ही वृत्ति पहातांच नानांनींही आपल्या वाड्याभोंवतीं चार पांच हजार आरबांचा पहारा बसविला. पेशव्यांचा शनवारवाडा आणि फडनवीसांचा वाडा हे एकमेकाशेजारींच होते. पहिल्या वाड्यांतले शिंद्यांच्या कंपूतले लोक नानांचा छापा येईल या भयानें रात्रंदिवस बंदुकीचे तोडे शिलकावून मारामारीच्या तयारीनें उभे राहूं लागले, तेव्हां दुसऱ्या वाड्यांतले आरबही एका हातांत नंगी तरवार व दुसऱ्या हातांत भाला घेऊन आणि घोड्यावर जिनें ठेवून रात्रंदिवस लढाईच्या पवित्र्यांत पहारा करूं लागले ! नाना व श्रीमंत यांमध्यें असा हा द्वैतभाव वाढला, तेव्हां त्यांच्या गांठी पडाव्या कशा ? नानांनीं श्रीमंताकरितां साताऱ्याहून पेशवाईचीं वस्त्रें आणविलीं होती, परंतु वर सांगितलेल्या कारणामुळें त्यांचा व श्रीमंतांचा शिलशिलाच जर बंद झाला तर श्रीमंतांस वस्त्रें मिळण्याची गोष्ट घडून यायची कशी ? अशी अडचण उपस्थित झाली तेव्हां शिंदे, रघोजी भोसले व मशीर यांनीं नानांकडे समक्ष येऊन तुम्हांस दगाफटका होणार नाहीं अशी त्यांची खातरजमा केली. तेव्हां ठरलेल्या तारखेस म्हणजे ता. ४ दिसेंबर १७९६ या दिवशीं बाजीराव गादीनशीन झाले व नाना त्यांचे कारभारी झाले !

पेशवाईचीं वस्त्रें मिळविण्याकरितां शिंदे व श्रीमंत यांनीं नानांशीं तात्पुरतें सख्य जोडलें, परंतु आंतून त्यांचा असा निश्चय ठरला होता कीं, नानांचा कारभार कोणताच चालूं द्यावयाचा नाहीं आणि त्यांचें सर्व द्रव्य मात्र हिरावून घ्यावयाचें ! या बेतास अनुसरून शिंद्यांनीं नानाकडे मागणें केलें कीं, ' श्रीमंतांस गादीवर बसविण्याकरितां तुम्ही आम्हांस एक कोट रुपये देऊं केले आहेत. त्यापैकीं जांबगांवच्या मुक्कामीं पन्नास लक्ष आणि गोदावरी उतरल्यावर पन्नास लक्ष असे त्या रकमेचे दोन हप्ते ठरलेले आहेत. आम्हांस रकमेची तूर्त नड आहे, सबब जांबगांवचा पहिला हप्ता आम्हांला पुणें मुक्कामींच द्या.' यावर तुमचा पुण्याहून मुक्काम हाल्ल्याशिवाय तुम्हांला एक कवडीही मिळणार नाहीं, असें नानांनीं स्पष्ट

उत्तर दिलें. या उत्तरानें शिंदे एकदम गरम झाले आणि नानांनीं सर्व रक्कम पुण्यासच दिली पाहिजे आणि तीही तावडतोब दिली पाहिजे असा त्यांनीं सूर ओढला! एकानें अद्वातद्वा मागावें आणि दुसऱ्यानें तळ हालवि-ल्याशिवाय कांहीं देत नाहीं म्हणावें; असें होतां होतां चार आठ दिवसांत भांडण इतक्या विकोपास गेलें कीं, आपणांवर शिंद्यांचा केव्हां घाला येईल याचा नेम नाहीं, असें समजून नाना फडनवीस घोड्यावर जिनें ठेवून व आरब वगैरे पायदळ सज्ज करून हुशारीनें राहूं लागले! हें प्रकरण इतक्या विकोपाला गेलें तेव्हां श्रीमंतांनीं मध्यस्थी करून नानांस सल्ला दिला कीं, 'शिंदा हा बहुत खराब मनुष्य आहे! कांहीं शेपन्नास लाखांचा तुकडा त्यांच्या तोंडावर टाका म्हणजे तो हिंदुस्थानांत निघून जाईल! त्याची ब्याद एकदां दूर गेल्यावर मग सर्व गोष्टी तुमच्या मना-प्रमाणेंच घडून येतील! नानांना श्रीमंतांच्या या सांगण्यापैकीं एकही शब्द खरा वाटला नाहीं, तथापि पैशाच्या हट्टामुळेंच शिंद्यांचें जाणें लांब-णीवर पडूं नये या हेतूनें त्यांनीं शिंद्यांस यावेळीं वीस लाख रुपये दिले!

श्रीमंतांची गादीवर स्थापना होतांच निजाम व भोसले यांशीं ठरवि-लेले करार पुरे करून देण्याविषयीं नानांनीं त्यांकडे तगादा बसविला. नानांचा हा तगादा बसतांच शिंद्यांनीं श्रीमंतास बोध केला कीं, 'नानांनीं लांच खाऊन नबाब व भोसले यांशीं मलभलते करार ठरविले आहेत! भोसल्यांस गढेमंडळ प्रांत व पंधरा लक्ष रुपये द्यावयाचा करार आहे. त्यापैकीं रुपये परभारें नानांकडून देववावयाचे असल्यामुळें त्या गोष्टीस हरकत नाहीं. परंतु भोसल्यांस गढेमंडळ प्रांत कां म्हणून द्यावयाचा? आम्ही सरकारचे एकनिष्ठ सेवक आहों. सबब तो प्रांत आम्हालाच मिळाला पाहिजे. नबाबास खंडणी व मुलूख माफ करावयाची गोष्ट तर बोलाव-यासच नको! कारण खर्ड्यांच्या स्वारीस निघतांना त्या दोन्हीं कलमांत पेशवे सरकारची व आमची वांटणी ठरलेली आहे. पेशवे सरकारच्या वांट णीवर तुळशी पत्र ठेवायला नाना तयार झाले हा मजकूर ठीकच आहे! परंतु आम्ही आमची वाटणी कां बुडवावी? नबाबाला ठोक देऊन मुलूख व खंडणी वसूल करण्याचें आमच्या मनगटांत अजून सामर्थ्य आहे.

सबब नानांनीं ठरविलेले हे दोन्ही करार रद्द करण्यांत यावेत!' शिंद्याची इतकी फूस मिळाल्यावर श्रीमंतही उघडपणें बोलूं लागले कीं, 'भोसले व नबाब यांच्या शर्ती फार जबर असून त्या नानांनीं आपल्या स्वार्थावर नजर देऊन ठरविलेल्या आहेत! त्या मान्य करण्याचें पूर्वी आम्ही वचन दिलें असलें तरी आतां तें वचन आम्ही पाळणार नाहीं!' नानांनीं श्रीमंतांची पुष्कळ समजूत घालून पाहिली, परंतु श्रीमंतांनीं त्यांना नन्नाचा पाढा एवढें एकच उत्तर दिलें! आपल्या सर्व खटपटींचें असें हें पर्यवसान झालेलें पाहून नानांस अतिशय विषाद वाटला आणि त्यांनीं राज्यकारभार सोडून काशीस निघून जाण्याचा बेत ठरविला. स. १७९७ च्या पहिल्या महिन्याच्या पहिल्या तारखेस श्रीमंत व नाना यांमध्यें एक कराराची यादी ठरली, ती अनेक दृष्टीनें महत्वाची आहे. सबब ती यादी येथें समग्र देतों—

सेवेशीं विज्ञापना ऐसीजे, स्वामींची कृपा मजवर. माझें लक्ष स्वामीपाशीं, हें कित्येकांस असह्य होऊन त्यांनीं राज्यांत बखेडा करून आचरूं नये तें कर्म स्वामींशीं अमर्यादेचें आचरिलें. मी महाडास राहून राजकारणें वगैरे करून राजश्री दौलतराव शिंदे व सेवकानें करावयाचें तें करून, स्वामींचे पुण्य मदत होऊन, सर्व गोष्टी मनोदयानुरूप घडल्या; येणेंकरून सेवकास कृतकृत्यता झाली. पुढें सेवा करावी अशी शरीरांत ताकद व शक्ति राहिली नाहीं. यास्तव मागणें हेंच कीं, कृपा करून स्वस्थ स्नानसंध्या करून स्वामींस अभीष्ट चिंतून राहण्याविषयीं आज्ञा व येविषयीं करार करून देण्याचीं कलमें—

१ दत्तपुत्र घेणेची आज्ञा आहे, त्याप्रमाणें घेणेंत येईल. त्याचे हातून पूर्ववत्प्रमाणें फडनिशीचें दरकाचें वगैरे काम घेऊन लोभानें सरंजाम वगैरे चालत आल्याप्रमाणें चालवावा. किल्ले लोहगड सरकारांतून व किल्ले केळंजा पंत सचिवांकडून आहे, त्याप्रमाणें असावें. माझेविषयीं चित्तांत संशय नसावा. कोणी घालूं लागल्यास ठेवूं नये.

(श्रीमंतांची मखलाशी)— येणेंप्रमाणें करार.

---

या चरित्राची आवृत्ति दुसरी पृ. १०५

१ पहिला सरंजाम स्वारांचा आहे. हल्लीं हजार गाडदी यांचा जाजती देऊन जेथें राहणें होईल तेथें त्यांनीं चौकी पहाऱ्यास असावें. याची परवानगी.

( मखलाशी )– येणेंप्रमाणें करार.

१ परभारां गांव जहागीर मिळविली त्यांपैकीं सरकारांत घेऊन सरकारांतून पंचवीस हजारांचे गांव सोईचे इनाम करून द्यावे. कै० राव यांनीं कृपा करून सर्फराज केलें तसें चालावें.

( मखलाशी )– येणेंप्रमाणें करार.

१ श्रीकाशीस जावयाचा बेत आहे. यास्तव इंग्रजांस सरकारचीं पत्रें व दौलतराव शिंदे यांचीं पत्रें द्यावीं कीं, संतोषानें निरोप दिला. संतोषानें तेथें राहतील. हरएकविशीं साहित्य करीत जावें.

( या कलमावर श्रीमंतांची मखलाशीच नाहीं ! )

१ राजकारणसंबंधें शिंदे, नबाब व भोसले व पन्हाळेकर वगैरे जागां करार व वचनें गुंतलीं त्याच्या तोडी व्हाव्या. राजकारणांत ज्याचा जसा उपयोग पडला असेल त्याप्रमाणें तोड पडावी.

( मखलाशी )- येणेंप्रमाणें करार.

१ सरकारचे कामांत मसलत करून कारणसंबंधें खर्च जाला तो सरकारांतून उगवे असें व्हावें.

( मखलाशी )–येणेंप्रमाणें करार.

१ हरीपंत फडके यांणीं राज्यांत सेवा केली. त्यांचे पुत्रांचें चालवावें.

( मखलाशी )–चालविलें जाईल. येणेंप्रमाणें करार.

१ महाडास सोबत दिली. ते समयीं त्यांस वचनें दिलीं आहेत. आबाजी कृष्ण शेलूकर, दादा गद्रे, बजाबा शिरवळकर, धोंडोपंत नित्सुरे मिळून चार. सदरहू मिळोन दोन हजार स्वारांचा सरंजाम सरकारांतून देऊन सेवा घ्यावी.

( मखलाशी )–येणेंप्रमाणें करार.

१ दादा गद्रे व आबाजी कृष्ण शेलूकर यांजकडे वसई सरसुभा व किल्ले रायगड व अहंमदाबादचा सुभा व पागा सरकारांतून आहे, त्याप्र-

माणें कृपा करून चालवावें. तेही एकनिष्ठपणें सेवा करतील.

( मखलाशी )-येणेंप्रमाणें करार.

१ धोंडोपंत नित्सुरे यानीं सेवा चांगली केली, यास्तव विसापूरचें काम त्यांस सांगावें.

( मखलाशी )-येणेंप्रमाणें करार.

१ राघो विश्वनाथ गोडबोले यांजकडे सरकारांतून तोफखाना व चार हजार गाडदी यांचें काम होतें. त्यास हल्लीं हजार गाड्यांचा रिसाला सांगून बंदोबस्त करून देणेची आज्ञा व्हावी.

( मखलाशी )-येणेंप्रमाणें करार.

१ स्वराज्य व परराज्य याशीं करार व तहनामे आहेत त्याप्रमाणें चाल असावी. मोठी मसलत पडेल त्यास बरोबरीचे सरदार शिंदे, होळकर वगैरे यांचे सल्ल्यानें चांगलें तें होत असावें.

( मखलाशी )— येणेंप्रमाणें करार.

१ नारोपंत चक्रदेव व गोविंदराव पिंगळे यांनीं श्रमसाहस करून सेवा केली. त्यांस सर्फराज करून पुढें बंदोबस्त स्वरूप वाढवून व्हावा.

( मखलाशी )— श्रमानुरूप स्वरूप होईल.

एकूण कलमें ( तेरा पैकीं काशीस जाण्याचें कलम खेरीजकरून बाकी) बारा.

वर दिलेल्या करार यादीपैकीं आपल्या हाताखालीं ज्यांनीं आजपर्यंत मोठमोठीं कामें करून सरकारची किफायत केली त्यांचें ऊर्जित सरकारांतून व्हावें, परराज्याशीं तहाप्रमाणें वर्तणूक व्हावी, मोठी मसलत पडेल तेव्हां बरोबरीच्या सरदारांच्या सल्ल्यानें सर्व गोष्टी व्हाव्या वगैरे नानांच्या किरकोळ मागण्या श्रीमंतांनीं तूर्त मान्य केल्या, परंतु काशीयात्रेच्या परवानगीची मुख्य मागणी मात्र श्रीमंत व शिंदे यांनीं सपशेल नाकारली! कारण त्यांच्या मनांत नानांचा सर्वस्वीं नाश करावा असें होतें! परंतु नानांचा नाश करणें हें तितकेसें सोपें नाहीं हेंही एका प्रकरणामुळें त्यांच्या लवकरच प्रत्ययास आलें. तें प्रकरण असें—

श्रीमंत व शिंदे यांनीं आपणांस हिसका देण्याचा बेत केला आहे असें

पाहतांच निजाम व भोसले यांस अतिशय संताप आला. मशीरानें भागानगराहून चाळीस हजार फौज व मुसारेमूचीं पलटणें पुण्याकडे बोलाविलीं आणि त्याप्रमाणें मोंगलाई फौजा आपल्या सरहद्दीवर जागजागीं जमूं लागल्या. भोसल्यांचीही नवीन वीस हजार फौज नागपुराहून निघून माहूरच्या सुमारें आली आणि नंतर तिनें पुण्यावर चालून येण्याचा रोंख दाखविला. निजाम व भोसले यांची ही तयारी पाहतांच शिंद्यांनींही हिंदुस्थानांतून अंबोजी इंगळ्याची फौज व एक कंपू पुण्यास आणविला. मशीरुलमुलूख हा रागारागानें पुण्याहून निघून भागानगराकडे परत निघाला आणि त्याच वेळीं शिंदे व भोसले यांचा तंटा ऐन रंगांत येऊन त्यांची पुणें मुक्कामीं लढाई जुंपणार असा रंग दिसूं लागला. याप्रमाणें हें किटाळ उभें राहिलेलें पाहतांच शिंदे तत्काळ शुद्धीवर आले आणि पुण्याशेजारी हाणामारी सुरू होणार हें पाहून श्रीमंतांची तर भीतीनें अगदीं गाळणच उडाली! शेवटीं निरुपाय होऊन त्या दोघांनीं नानांची पायधरणी करून त्यांची मर्जी प्रसन्न करून घेतली आणि नंतर त्यांच्या मार्फत नबाब व भोसले यांशीं समेट घडवून आणला. श्रीमंतानीं भोसल्यांची सर्व देणगी मंजूर केली, परंतु नबाबाच्या देणगीवर मखलाशी करतांना मात्र त्यानी आपला धनीपणा गाजविल्याशिवाय सोडला नाहीं! नबाबास परत द्यावयाचा मुलूख बत्तीस लक्ष रु. उत्पन्नाचा होता आणि खंडणी माफ करावयाची तिची बेरीज दोन कोट रुपये होती. परंतु यादीवर मखलाशी करतांना श्रीमंतांनीं चौथाई मुलूख परत दिला नाहीं आणि चौथाई खंडणी माफ केली नाहीं! म्हणजे चोवीस लक्षांचा मुलूख परत दिला आणि दीड कोट रुपये खंडणी माफ केली! असो. याप्रमाणें देणग्या पदरांत पडल्यावर नबाब व भोसले यांच्या फौजा पुण्याहून निघाल्या आणि आपापल्या मुलखाकडे परत चालल्या. पुण्याहून निघण्यापूर्वी नानांचा कारभार सुरळीतपणें चालवूं अशा मजकुराचें नबाब व भोसले यांनीं श्रीमंताकडून करारपत्र लिहून घेतलें होतें.

सन १७९७ जून

नबाब व भोसले यांच्या फौजा गेल्यावर नानांचें पारडें पुष्कळच हलकें झालें आणि त्यांचें पुढें कसें होणार अशी ज्याला त्याला काळजी वाटू

लागली. नाना व शिंदे यांचें भांडण हा त्यावेळच्या रिकामटेकड्या लोकांच्या चर्चेचा एक मुख्य विषयच होऊन बसला होता. त्यांपैकीं कांहींजण जोरजोरानें प्रतिपादन करीत कीं, नवाब व भोसले यांच्या फौजा पुण्याहून हालल्या, आतां नानास त्राता कोण आहे ? शिंदे त्यांना हट-कून कैदेंत बसविणार ! उलटपक्षीं दुसरे कित्येक तितक्याच जोरानें प्रतिपादन करीत कीं, नाना हे कसलेले बिलंदर मुत्सद्दी आहेत ! ते बाजीराव, दौलतराव असल्या पोरांना कसची दाद देतात ! त्यांनीं आगाऊच चहूंकडे फितूर करून ठेवला आहे आणि ते लवकरच शिंदे व श्रीमंत या दोघांनाही कैद करणार आहेत !

नबाब व भोसले यांच्या देणेंघादीवर श्रीमंतांची मखलाशी झाली तेव्हां अर्थातच पूर्वीच्या कराराप्रमाणें शिंद्यांस अहमदनगरचा किल्ला व दहा लक्षांची जहागीर देण्याचा ठराव श्रीमंतांनीं केला त्यास नानांनीं हरकत घेतली नाहीं. नगरच्या किल्यांत मोरोबादादा कैदेंत होते. शिंद्याच्या ताब्यांत किल्ला जाण्यापूर्वी त्यांस तेथून काढून दुसरीकडे ठेवणें नानांस जरूर पडलें. मोरोबा हे दादासाहेबांचे पक्षपाती असल्यामुळें त्यांविषयीं श्रीमंतांस बरेंच ममत्व वाटत होतें. मोरोबांना नगराहून हालवूं नये याबद्दल त्यांनीं पुष्कळ खटपट केली, परंतु शिंदे यावेळीं नानांस प्रतिकूळ नसल्यामुळें त्यांना या बाबतींत उघडपणें कांहीं करतां आलें नाहीं. किल्यांतून बाहेर न निघण्याबद्दल त्यांनीं मोरोबाकडे हळूच इशारा मात्र पाठ-विला आणि त्या इशाऱ्याच्या आधारावर मोरोबांनीं मोठाच त्रागा केला ! बजाबा शिराळेकर व दादा गद्रे हे चार हजार फौजेसह नानांच्या हुकमाव-रून त्यांस आणण्याकरितां नगरास गेले, तेव्हां मोरोबांनीं त्यांस स्पष्ट उत्तर दिलें कीं, मी किल्यांतून साफ बाहेर निघणार नाहीं. मला जबरदस्तीनें बाहेर काढाल तर प्राणत्याग करीन किंवा संन्यास घेईन ! त्यांच्या या धम-कावणीस न भितां दादा गद्रे यांनीं त्यांस जबरीनें किल्याबाहेर काढलें, तेव्हां मोरोबांनीं वस्त्रें टाकून व जानवें तोडून खरोखरीच परमहंसदीक्षा घेतली. परंतु राजनीति ही निष्ठुर असल्यामुळें त्यांच्या या त्रागाचा कांहींच उप-योग झाला नाहीं. त्यांनीं रागानें संन्यास घेतला आहे असें समजू

तो रद्द ठरविण्यांत आला आणि त्यांची रतनगडच्या किल्ल्यावर रवानगी करण्यांत आली !

जहागीर व किल्ला पदरांत पडल्यामुळें शिंदे आतां हिंदुस्थानांत निघून जातील असा नानांचा अजमास होता. परंतु तसें कांहीं न घडतां ते पैशाचा तगादा करीत पुण्यासच राहिले आणि तेथें बसून बसून नानांच्या प्रत्येक कामांत व्यत्यय आणूं लागले. होळकर प्रकरणांत शिंद्यांचा चढेलपणा नानांस चांगलाच जाणवला. तो प्रकार असा— स. १७९६ च्या पावसाळ्यांत तुकोजी होळकर मृत्यु पावले. त्यांना काशीराव, मल्हारराव, विठोजीराव व यशवंतराव असे चार पुत्र होते. त्यापैकीं शेवटचे दोघे दासीपुत्र होते. औरसापैकीं वडील मुलगा काशीराव हा वेडसर होता आणि धाकटा मल्हारराव हा मात्र शूर व होतकरू सरदार होता. या मल्हाररावालाच सरदारीचीं वस्त्रें द्यावीं असें नानांच्या मनांत होतें. होळकर घराणें हे नानांच्या कुटांतून फोडून आपल्या लगामीं लावून घ्यावें असें शिंद्यांच्या मनांत होतें, सबब त्यांनीं श्रीमंतांजवळ हट्ट धरून सरदारीचीं वस्त्रें वेडसर काशीरावासच देवविलीं ! होळकरांच्या सरदारीवर शिंद्यांनीं याप्रमाणें आपल्या वर्चस्वाचें खोगीर लादलें, ही गोष्ट बाकीच्या तिघा पुत्रांस पटली नाहीं आणि त्यांनीं एकविचारानें फौज जमा करून मुलखांत धामधूम करण्यास सुरवात केली. या तिघांस नानांचें आंतून पाठबळ होतें.

'नानांचा सासुरवास आपणाला सोसणार नाहीं, आम्ही वाटेल तसें वागणार' असें श्रीमंत आजपर्यंत चारचौघांत उघडपणें बोलत असत. आणि आतां शिंद्यांचें पाठबळ मिळाल्यामुळें त्यांनीं आपले शब्द शब्दशः खरे केले ! पेशव्यांचा शनवारवाडा हें आजपर्यंत मराठी राजकारणाचें केंद्रस्थान होतें. त्या ठिकाणीं आतां श्रीमंतांनीं नाचरंग आणि तमाशे सुरू केले ! नायकिणीचे शृंगारयुक्त हावभाव पाहण्याचा आणि त्यांच्या मुरकेबाज लावण्या ऐकण्याचा तर श्रीमंतांना अतिशयच षोक होता ! बदफैली वर्तन एवढा एकच दोष श्रीमंतांमध्यें नव्हता. धार्मिक कर्मठपणा मिरविण्याचीही त्यांना मोठी हौस होती. ते स्वतः मोठमोठीं अनुष्ठानें करीत आणि त्या-

प्रीत्यर्थ ब्राम्हणांचीं लक्षभोजनें घालीत ! स. १७९७ सालच्या श्रावण-मासच्या दक्षिणेंत तर मोहरा, पुतळ्या, मोतीं, पाच व माणकें अशी पंच-मेळ खिचडी करून तिची खैरात श्रीमंतांनीं ओंजळी भरभरून ब्राम्हणांस वाटली ! या भरमसाट वागणुकीमुळें श्रीमंतांचा खजिना अर्थात् लवकरच रिकामा पडला, परंतु या गोष्टीची त्यांना कांहींच फिकीर वाटली नाहीं. पैशाची नड दूर करण्याकरितां त्यानीं आतां पुण्यांत पट्यांची झोड उठविली ! त्या पट्या— १ कर्जपट्टी, २ सरंजामपट्टी, ३ वेतनपट्टी, ४ सावकारपट्टी, ५ उंबरेपट्टी, ६ भाडेपट्टी, आणि सर्वांत असंतोषकारक अशी ७ संतोषपट्टी ! शेवटच्या संतोषपट्टीची कल्पना मोठी मार्मिक आणि सर्वव्यापी होती. श्रीमंत गादीनशीन झाले त्याबद्दल प्रजेला संतोष वाटला असला पाहिजे अशी कल्पना बसवून तिच्या जोरावर ही पट्टी सर्वांकडून सक्तीनें वसूल करण्यांत आली ! ज्याला घरदार नाहीं असे दरिद्री लोक बाकीच्या पट्यांचा तगादा सहज चुकवीत, परंतु संतोषपट्टीपुढें मात्र सर्वांनाच हात टेकावे लागत ! बाकीची इष्टेट असो वा नसो, परंतु प्रत्येकाला मन हें असलेंच पाहिजे आणि त्या मनाला श्रीमंत गादीवर बसले याबद्दल संतोष वाटला असलाच पाहिजे. आणि ज्याअर्थी संतोष वाटला असला पाहिजे, त्याअर्थी प्रत्येकानें संतोषपट्टी ही दिलीच पाहिजे, अशा सरकारी अधिकाऱ्यांच्या बिनतोड युक्तिवादापुढें कोणाचें काय चालणार ?

श्रीमंतांच्या गैरवर्तनांत नानांस अनपेक्षित असें कांहींच वाटलें नाहीं. बाजीराव हा मूर्ख आणि नादान मनुष्य आहे हें आतां सर्वांनाच कळून चुकलें होतें ! शिंदे पुण्यांतून हालल्यावर श्रीमंतांचा कसा तरी बंदोबस्त करतां येईल ही गोष्ट नानास समजत होती; परंतु शिंदे अजून दक्षिणेंत कां राहिले आहेत याचा मात्र त्यांस कांहींच उलगडा करतां येईना. श्रीमंत व शिंदे यामध्यें घाटग्यामार्फत जो गुप्त करार ठरला होता त्याची माहिती नानांना शेवटपर्यंत लागलीच नाहीं ! शिंद्यांचें दक्षिणेंत राहणें अशक्य करून टाकण्याकरितां

स. १७०७ जून दिसेंबर. } नानांनीं निरानिराळ्या उपायांची योजना चालविली. त्या उपायांची त्रोटक माहिती—

१ त्यांनीं मल्हारराव होळकराला हाताशीं धरलें. मल्हारराव हा शूर

आणि हिकमती सरदार असल्यामुळें त्याचें व त्याच्या नांवावर होळकर-शाहींतल्या जुन्या सरदारांचें आपणाला मोठेंच पाठबळ मिळेल असा नानांस भरंवसा वाटत होता. नानांच्या द्रव्याच्या जोरावर होळकरानें थोडयाच दिवसांत पांच सहा हजार फौज जमविली आणि तो शिंद्यांच्या तोंडावर खुद्द पुण्यासच तळ देऊन राहिला. नानांनीं होळकर घराण्याची उभारणी केली, या गोष्टीचा शिंद्यांस अतिशय राग आला आणि त्यांनीं ता. १४ सपटेंबर रोजीं भरदिवसां होळकरांच्या गोटावर छापा घातला! त्या गर्दीत मल्हारराव ठार पडला आणि विठोजी व यशवंतराव हे मात्र कसे बसे जीव बचावून निसटले. शिंद्यांच्या या नीच कृत्याचा यशवंत-राव होळकरानें पुढें कसा भयंकर सूड घेतला हें इतिहासज्ञांस विदित आहेच !

२ नानांच्या प्रेरणेवरून अमृतराव हा असें प्रतिपादूं लागला कीं, 'मी पेशव्यांचा भाऊ असल्यामुळें पेशवाईचा कारभार करण्याचा माझाच अधि-कार आहे. आजपर्यंतच्या पेशव्यांचे कारभारी जसे त्यांचे बंधूच असत त्याप्रमाणें मीही बाजीरावांचा कारभारी होणार. नाना माझ्या हाताखालीं दुय्यम कारभाऱ्याचें काम करतील. राज्यकारभारांत मी शिंद्यांची लुडबुड मात्र बिलकूल चालूं देणार नाहीं.' अमृतराव इतकें बोलूनच थांबला नाहीं, तर त्यानें नानांचा पक्ष घेऊन शिंद्यांविरुद्ध उघडपणें भांडण्यास सुरवात केली, आणि नानांच्या पैशाच्या जोरावर सर्व हुजरातीची फौज आपल्या लगामीं लावून घेतली. अमृतरावाची ही उठावणी पाहून श्रीमंत भयभीत झाले, आणि त्यांच्या मनानें पक्कें घेतलें कीं, माझी मुंडी मुरगाळून अमृत-रावालाच गादीवर बसवावें असा यांत नानांचा कावा दिसतो !

३ दौलतरावांच्या लष्करांत महादजी शिंद्यांच्या स्त्रिया रहात असत. या स्त्रियांपैकीं सर्वांत थोरली लक्ष्मीबाई ही महापराक्रमी आणि धोरणी स्त्री होती आणि बाकीच्या स्त्रिया तिच्याच तंत्रानें वागत असत. या बाया म्हणजे मोठींच प्रस्थें होतीं आणि त्यांचें व दौलतरावांचें वांकडें होतें. शिंद्यांच्या लष्करावर त्यांचें पराकाष्ठेचें वजन होतें त्यामुळें खुद्द दौलतरावही त्यांस वचकून वागत असत. बाळोबातात्या वगैरे दोन चार शेणवी सर-

दार जरी कैदेंत पडले होते, तरी बाकीचे पुष्कळ शेणवी सरदार अजून शिंद्यांच्या नोकरींत होतेच आणि ते सर्व या बायांचे कट्टे पुरस्कर्ते होते. दौलतरावांच्या भयानें नाना फडनवीस, शेणवी सरदार व शिंदे बाया या सर्वांचा आतां एक विचार झाला. आणि नानांच्या प्रोत्साहनावरून शिंदे-बाया उघडपणें बोलूं लागल्या कीं, आपला दत्तक मुलगा दौलतराव हा उल्लू आणि दुराचारी आहे. त्याचें व आमचें कधींच बनणार नाहीं. आपण आतां दुसरा दत्तक घेणार आहों आणि त्यांच्याच नांवें पेशवे सर-कारांतून सरदारीचीं वस्त्रें मिळावीं ! एका नाजुक ठिकाणीं दौलतरावानें बदकर्म केलें आहे, अशी शिंदे बायांची यापूर्वीच खात्री झाली होती, आणि त्यामुळें त्यांची आज बरेच दिवस आंतून धुसफूस चालली होतीच. आतां नाना व अमृतराव यांचें पाठबळ मिळाल्यामुळें त्या एकाएकीं दौल-तरावावर उघडपणें बिथरल्या !

४ याच सुमारास निजामाची वीस हजार फौज व मुसा रेमूचीं पल-टणें बेदरच्या आसपास जमूं लागलीं. या फौजेच्या खर्चाकरितां नाना-कडूनच पैशाचा भरपूर पुरवठा होत होता. शिंदे सुखेपणानें दक्षिणेतून हालणार नाहींत तर ही मोंगलाई फौज त्यांच्या उरावर आणून उभी करावी असा नानांचा विचार होता.

अमृतराव, होळकर, शिंदेबाया, शेणवी सरदार, मोंगलाई फौज या-संबंधें नानांच्या काय काय खटपटी चालल्या आहेत हें पेशवे व शिंदे यांस ठाऊक नव्हतेसें नाहीं; मग त्यांनीं नानांस एकदम पकडून कैदेंत कां टाकलें नाहीं ? या प्रश्नाचें उत्तर असें आहे कीं, तसें करणें बहुधा अशक्य होतें ! नानाजवळ स्वार व आरब पायदळ मिळून पांच सहा हजार जमाव होता तो विश्वासू होता. त्यांची व शिंद्याची लढाई झाली असती तर त्यांचा एका घटकेंत धुव्वा उडाला असता हें खरें, व शिंद्याची इच्छाही तीच होती ! पण नानांची फौज लढाईला उभी राहणार कशी ? शिंद्यांचा केव्हां छापा येईल याचा नेम नाहीं हें समजून रात्रं-दिवस सावधपणें ते पळून जाण्याच्या तयारींत असत ! एकदां इतक्या जमावानिशीं ते पुण्यांतून निसटले म्हणजे पुनः हातीं लागण्याचा संभव

मुळींच नव्हता ! सातारा, रायगड प्रतापगड वगैरे किल्ले त्यांच्या ताब्यांत होते, जवळ थोडीबहुत फौजही होती, आणि जवळ मुबलक पैका असल्यामुळें पाहिजे तितकी आणखी फौज चाकरीस ठेवण्याचें व वाटेल त्या सरदारांस वश करण्याचें साधन त्यांजजवळ होतें ! एकदां उघडपणें नानांशीं बिघाड झाल्यावर ती संधि साधून शिंद्यांच्या लष्करांत व पेशव्यांच्या दरबारांत लपून छपून राहणाऱ्या अनेक बंडांनीं निर्भयपणानें फैलावा केला असता यांत संशय नाहीं. तात्पर्य, पेशवे व शिंदे यांचें जरी नानांशीं वांकडें पडलें होतें तरी त्यांस उघडपणें धरण्याचा यत्न करण्याची दोघांसही सोय नव्हती. झालें तर तें काम विश्वासघातानेंच व्हावयाचें होतें, पण नानांच्या सावधपणामुळें तो योगही कोठें जमून येईना !

शिंद्यांचें लष्कर पुण्यास येऊन बसलें त्याला जवळ जवळ दोन वर्षें होत आलीं होतीं. चाळीस हजार स्वार, वीस हजार पायदळ व मुबलग तोफखाना असें म्हणतां या सैन्याचा खर्च अवाढव्य वाढावा यांत नवल नाहीं. जरी हें लष्कर कांहीं अंशीं लुटीवर पोट भरीत होतें व जरी दौलतराव कांहीं ना कांहीं निमित्तानें श्रीमंतांकडून व नानांकडून व इतर लोकांकडून खर्चाकरितां मिळेल तें द्रव्य उकळीतच होते, तरी फौजेचें देणें बेसुमार चढतां चढतां आतां त्याची बेरीज साठ लक्षापर्यंत वाढली होती ! शेवटीं फौजेच्या तगाद्यांनीं फारच हैराणगत झाली, तेव्हां दौलतरावानीं श्रीमंतांस सांगितलें कीं, ' आम्ही तुम्हांस पुण्यास राहण्याचें वचन दिलें आहे हें खरें, परंतु फौजेच्या देण्यापुढें आमचा निरुपाय झाला आहे. तुम्ही पूर्वी कबूल केल्याप्रमाणें आम्हांस दोन कोट रुपये दिलेत तरच आमचें येथें राहणें होईल. नाहीं तर तुम्हांस नानांच्या स्वाधीन करून आम्ही हिंदुस्थानांत निघून जातों. ' यावर श्रीमंतानीं गयावया करून शिंद्यास सांगितलें कीं, ' वचनभंग करणें हें तुम्हांसारख्या सभ्य गृहस्थांस शोभत नाहीं. आतां तुमच्या फौजेचें देणें तुंबलें आहे हें खरें, आणि तें देणें आम्हीच द्यावें हेंही खरें, परंतु आम्ही तरी काय करावें ! आम्ही एवढे मराठी राज्याचे खावंद असतां आम्ही स्वतःच अन्नाला महाग होऊन बसलों आहों ! आमची स्वतःची अशी दुर्दशा असतां

आम्ही तुम्हांस द्रव्य कुठचें द्यावें ! नानांस कैद केलेंत तर तुम्हास अगणित द्रव्य प्राप्त होईल. एवढ्यानेंही तुमची तृप्ति न होईल तर पुण्यांतील मुखवस्तु लोकांचें निसंतान करून तुम्ही वाटेल तितका पैका मिळवा! काय वाटेल तें करा, परंतु नाना जिवंत असेपर्यंत आम्हांला सोडून दूर जाऊं नका!' या समयीं सर्जेराव घाटग्यानें विशेष आग्रह केल्यावरून श्रीमंतांनीं शिंद्यांस स्वच्छपणानें पत्र लिहून दिलें कीं, तुम्ही वाटेल ती हिकमत लढवून नानांस कैद करावें, आणि त्यांचें व त्यांच्या पक्षांतल्या सर्व मंडळीचें द्रव्य घेऊन फौजेचें व सरकारचें देणें फेडावें. या बाबतींत तुम्हांस पूर्ण मुभा दिली आहे !

इतकें झाल्यावर बाजीराव, दौलतराव व त्यांचे दोस्त बाळोजी कुंजर, सर्जेराव घाटगे, फकीरजी गाढवे व बाणाजी शेट्या हुजऱ्या या सर्व शिष्टांची सभा भरून तींत नानांस विश्वासघातानें कैद करण्याचा ठराव सर्वानुमतें पसार करण्यांत आला ! नंतर एका कपटनाटकाच्या संविधानकाची सर्वांच्या विचारें ठाकठीक जुळवाजुळव करण्यांत येऊन त्या नाटकाचा पहिला प्रवेश शिंद्यांनीं नानांस करून दाखविला ! त्यांनीं नानाशीं बोलणें लावलें कीं, 'तुम्हांकडून आम्हांस आतांपर्यंत चव्वेचाळीस लक्ष रुपये मिळाले आहेत. बाकीचे छप्पन लक्ष अजून यावयाचे काहेत. आम्हीं जातों जातों असें सांगून तुम्हांकडून रकमा मात्र उचलल्या, परंतु आम्हाला आमचे शब्द खरे करतां आले नाहींत, याबद्दल आम्हांविषयीं तुमच्या मनांत अविश्वास उत्पन्न झाला आहे. परंतु या गोष्टींस आमचा तरी काय इलाज ? फौजेचें देणें तुंबल्यामुळें फौज येथून कूच करीना. त्यामुळेंच आजपर्यंत आमचें जाणें घडलें नाहीं. अजूनही फौजेचें देणें साठ लक्ष रुपये शिल्लक आहेच. तुम्हांकडे येणें असलेले छप्पन लक्ष आमच्या पदरांत घाला म्हणजे आम्ही हिंदुस्थानांत निघून जातों. या खेपेस आम्ही शब्दाप्रमाणें वागूं ही खात्री बाळगा आणि निःशंकपणें रुपये द्या ! यावर नानांचें उत्तर "तुमचा आमचा करार येथें ऐवज द्यावयाचा नसतां स्नेहानें ऐवज देत आलों. तत्राप अद्याप तुमचें कूच होत नाहीं. येथून कूच करून जावें.

---

१ ऐ. ले. संग्रह नं. ४१०९.

कोणाची पाहिजे त्याची निशा देतों. जांबगांवास गेल्यानंतर निमे व गंगा-पार जाहल्यावर निमे, याप्रमाणें देऊं. " नानांचें हें उत्तर आल्यावर आज पुष्कळ महिने त्यांशी सुरू असलेलें बोलणें हातघाईवर आणण्यास शिंद्यांनीं विलंब केला नाहीं! साठ लक्ष रुपयांची वरात नाना फडनवीस व त्यांचे अनुयायी गद्रे, शिराळेकर, परचुरे, वगैरे दहा असामी यांजवर आपण करणार व त्यांपासून सक्तीनें रक्कम वसूल करणार असें दौलतराव उघडपणें बोलूं लागले. तेव्हां नानांकडूनही उत्तरें प्रत्युत्तरें होत गेलीं. आज छप्पन लक्ष रुपये द्या म्हणजे कूच करून जातों असें दौलतराव शिंद्याचें म्हणणें. नानांचें म्हणणें कीं, पुणें मुक्कामीं तुम्हांस पैका देण्याचा करार नसतां नानाप्रकारचीं निमित्तें दाखवून आजपर्यंत आम्हांकडून चव्वेचाळीस लक्ष रुपये उचललेत. आतां तुम्ही येथून गेल्याशिवाय तुम्हांस छदाम मिळणार नाहीं! दोहीं बाजूंचें म्हणणें निकरावर पडलें, तेव्हां आतां त्याची तडजोड कशी व्हावी!

विश्वासघाताशिवाय नानांस पकडण्याचें दुसरें साधन नव्हतें हें पूर्वी लिहिलेंच आहे. तो विश्वासघात होऊं नये म्हणून नाना जपत असतां शेवटीं शिंद्यांनीं त्याच साधनाचा उपयोग करून त्यांचा नाश केला! बाणाजी शेण्या, फकीरजी गाढवे, सर्जेराव घाटगे हे गृहस्थ शिंद्यांनीं प्रथम मध्यस्थीस घातले. त्यांच्या वचनाचा विश्वास नानांस बिलकूल येईना. तेव्हां त्या कामावर शिंद्यांनीं मुकीर साहेबाची योजना केली! एतद्देशीय राजेरजवाड्यांच्या पदरीं युरोपियन अंमलदार त्या काळांत चाकरीस होते, त्यांनीं वचनाच्या नेकीविषयीं मोठा लौकिक संपादन केला होता. शिंद्यांच्या नोकरींत मुकीर ( Michale Philose ) हा फ्रेंच सरदार होता, त्याची हुकमत आठ पलटणांवर चालत होती. असल्या बड्या युरोपियन अंमलदारानें फलाण्या गोष्टीबद्दल शब्द गुंतवला तर नानांचा त्यावर विश्वास बसण्याजोगा आहे हें ओळखून शिंदे व घाटगे यांनीं दगाबाजी करण्याविषयीं त्या मुकीर साहेबाचें मन वळविलें!

मुकीर साहेबाची मध्यस्थी नानांस कबूल झाली. करार होईल तो उभयपक्षीं पाळला जाईल याबद्दलची हमी मुकीरानें पतकरली. नंतर

एक एक बोलणें निघून निकालांत येऊं लागलें. तों मध्येंच एके दिवशीं शिंदे म्हणूं लागले कीं, नानांनीं निदान चाळीस लाख रुपये दिल्याखेरीज आपण कोणतीच गोष्ट मान्य करणार नाहीं! शिंद्यांनीं हें नवीन बोलणें उपस्थित करतांच त्यांचें व मुकीराचें सडकून भांडण झालें! पुढच्या खोट्या मसलतीस खरेपणाचें स्वरूप दिसावें म्हणून दौलतराव धनी व त्यांचा नोकर मुकीर यांनीं याप्रमाणें वागावयाचें आपसांत पूर्वींच ठरवून ठेवलें होतें!

मुकीराची मध्यस्थी याप्रमाणें रहित होऊन शेटे, घाटगे, गाढवे वगैरे शिंदे यांचे छोटेखानी मुत्सद्दी नानांच्या घरीं पुनः हेलपाटे घालूं लागले. परंतु आतां नानांनीं मुकीराच्या शब्दाखेरीज कोणावरही विश्वास टाकण्याचें साफ नाकारलें! असे आठ चार दिवस गेल्यानंतर आपला निरुपाय झालासें दाखवून शिंद्यांनीं पुनः मुकीर साहेबांचीं आर्जवें करून त्यास पुनः लढा मिटविण्याच्या कामांत घातलें. जो करार होईल त्यांत शिंद्याकडून तजावजा झाल्यास आपण पलटणानिशीं तुम्हांस सामील होऊं अशी मुकीरानें नानांची खात्री केली! नंतर कराराच्या यादी हं हं म्हणतां उभयपक्षीं मान्य होऊन नाना व शिंदे यांचा समेट झाला. शिंद्यांनीं आपल्या लष्कराचा तळ हालविण्याची तयारी जारीनें सुरू केली. त्यांचें कांहीं सामान पुढें जांबगांवास रवानासुद्धां झालें.

आता शिंदे खरोखरीच हिंदुस्थानांत जातात अशी नानांची खात्री झाली. एकमेकांना निरोप देण्याघेण्याच्या शिष्टाचाराच्या भेटी परत भेटी मात्र अजून व्हावयाच्या होत्या. मुकिरसाहेब या मध्यस्थामार्फत शिंदे नानांच्या भेटीस येऊन चार घटका मोकळेपणानें त्यांशीं बोलून परत गेले. नंतर शिंद्यांस निरोप देण्याकरितां नानांनीं त्यांच्या लष्करांत जावयाचें, त्याचा दिवस ३१ दिसेंबर हा ठरला. या प्रसंगीं दगाफटका होणार नाहीं याबद्दल मुकीराची हमी होतीच. तथापि नानांनीं त्याजकडून बायबलावर हात ठेवून इमानानें वागण्याची शपथ पुनः घेववली! नंतर ठरलेल्या दिवशीं कांहीं जुजबी लवाजमा बरोबर घेऊन नाना फडनवीस शिंद्यांच्या लष्करांत गेले. त्यांबरोबर आबा शेलूकर, बजाबा शिरढोकर,

नारायणराव वैद्य व दुसरे कित्येक गृहस्थ होते. तेथें गेल्यावर परस्परें भेटी व आदराचे उपचार होऊन खलबत करण्याच्या निमित्तानें शिंदे, व त्यांचे कारभारी, मुकीर व नाना असे निराळ्या जागेंत गेले, आणि तेथें त्या दगलबाज मुकीर टोपीकरानें नानांस कैद केलें! तें घडतांच नानाबरोबर लोक आले होते त्यांवर शिंदे यांच्या लोकांनीं हल्ला केला आणि तोडातोड करून त्यांस उधळून लाविलें!

ही बातमी पुण्यांत पसरतांच तेथें हाहाकार झाला तो काय वर्णावा? नानांस धरल्याबरोबर घाटग्यानें शहरांत फौजेच्या टोळया पाठवून नानांच्या पक्षाच्या लोकांचीं घरें लुटलीं, तेव्हां कित्येक लोकांनीं घराचे दरवाजे बंद करून खिडक्यांतून व गच्च्यांवरून घाटग्याच्या लोकांवर बंदुकांचा मारा केला. नानांच्या आरबांच्या व शिंद्यांच्या फौजेच्या रस्तोरस्तीं गांठी पडून लढाया होऊं लागल्या. पुण्यांत जिकडे तिकडे गडबड होऊन जसें एखादें शहर शत्रूनें प्रयासानें काबीज केल्यावर तो त्वेषानें आंत शिरून सरसकट कत्तल व लुटालूट करूं लागतो, व शहरवासी लोकांपैकीं कोणी पळतात, कोणी लपतात, कोणी जिवावर उदार होऊन लढतात याप्रमाणें तेथें स्थिति झाली! जिकडे पहावें तिकडे लुटालूट, खून, मारामारी याशिवाय दुसरें कांहीं दिसेना! त्या दिवशीं रात्रीं व दुसऱ्या दिवशीं तोफा व बंदुका यांचे बार सारखे चालले होते! सर्व रस्ते बंद पडले होते. कोणास रस्त्यांतून फिरणें झाल्यास त्यानें सोबतीकरितां पांच पंचवीस स्नेही मंडळी जमा करावीत. मग सर्वांनीं एका हातावर ढाल व दुसऱ्या हातीं नंगी तरवार, अशा तयारीनें रस्त्यांतून जावें! सर्व लोकांस असें वाटलें कीं, आज ज्याअर्थीं नाना फडनवीसांस शिंद्यांनीं कैद केलें त्याअर्थीं आतां यापुढें झोटिंगपातशाहीसच सुरवात होणार!

अलीकडे नाना जरी राज्यकारभाराचे सूत्रधार नांवाला मात्र होते तरी त्यांच्या दराऱ्यामुळें त्या काळचे कित्येक लहानमोठे सत्ताधीश उद्धट, जुलमी क्रूर व हलकट बुद्धीचे असूनही त्यांचे दुर्गुण उघडमाथ्यानें समाजांत वावरू शकले नाहींत. परंतु पेशव्यांनीं शिंद्यांकडून नानांस कैद करविलें त्यामुळें मराठी राज्यास आळा घालणारा आतां कोणी राहिला नाहीं. दरबा

म्हटलें म्हणजे तेथें गांभीर्य, चातुर्य, प्रतिष्ठितपणा, दूरदृष्टि इत्यादि गुणांच्या संभवाचा बोध होतो. परंतु आतां त्या गुणांची व मराठी दरबारची कायमची फारकत होऊन गेली! मग तें दरबार पेशव्यांचें असो, शिंदे यांचें असो, कीं दुसऱ्या कोणाचें असो! या गोष्टी पुण्यांतल्या प्रत्येक माणसाच्या डोळ्यापुढें दिसत होत्या. पटवर्धनांचा एक वकील खेदानें म्हणतो कीं, "येथीलें विधि समाप्तीस गेला. याजउपरी श्रीमंतांच्या राज्याचा आळा गेला. जो जबरदस्त त्याचें पागोटें बांचेल!"

---

# प्रकरण सतरावें

## कारागृहवास व सुटका

(स. १७९८ जाने.-दिसें.)

शिंद्यांनीं नानांस कैद करतांच श्रीमंतांनीं बाबा फडके, नारोपंत चक्रदेव त्रिंबकराव परचुरे, गोविंदराव काळे, गोविंदराव पिंगळे वगैरे नानांच्या पक्षांतील मुत्सद्दी लोकांस विश्वास दाखवून शनवारवाड्यांत बोलावून आणलें आणि कैदेंत ठेविलें! अलीकडे कित्येक दिवस श्रीमंतांना नानांचा हृद्रोग लागला होता, तो आतां दूर झाल्यामुळें त्यांना पुष्कळच हायसें वाटलें. त्यांजवर शिंदेकंपूंचा पहारा होता तो आतां त्यांनीं दूर केला व स्वतःचे नवीन लोक त्या जागीं नेमले. नानांबरोबरच इतर मंडळी शिंद्यांच्या कैदेंत सांपडली होती, त्यांपैकीं बजाबा शिराळेकर, दादा गद्रे व आबा शेलूकर या तीन गृहस्थांची पुढें महिन्यानंतर सुटका करण्यांत आली. परंतु सुटकेपूर्वीं शिराळेकर पन्नास हजार, गद्रे सात लक्ष, शेलूकर पंधरा लक्ष असे पराकाष्ठेचे जबर दंड या त्रिवर्गाकडून वसूल करण्यांत आले.

कारकून व मुत्सद्दी यांवर अरेरावी गाजवितांना श्रीमंतांना मोठी वीरश्री चढत असे. परंतु जबरदस्ताशीं प्रसंग पडला तर त्यांचें सर्व अवसान थंड

---

१ ए. ले. संग्रह नं. ४११२.

पडत असे ! नाना कैदेंत पडतांच त्यांनीं चाकरीस ठेवलेल्या पांच सहा हजार आरब पठाणांनीं आपल्या पगारबाकीबद्दल दंगा करण्यास सुरवात केली. त्या आरबांना कांहींच न देतां शिंदे यांच्या पलटणांकडून धुडकावून लावावें किंवा मारून टाकावें, असा बाजीरावांचा बेत होता. परंतु आरबांनीं तो रंग पाहतांच शहरची नाकेबंदी केली, कित्येक बडे मुत्सद्दी धरून पहाऱ्यांत बसविले, व मरून जाऊं, पण आमची तलब ( पगाराची बाकी) भागवल्याखेरीज शहर सोडून जाणार नाहीं ' असा श्रीमंतांस निरोप पाठविला. शिंदे यांच्या पलटणांची व आरब पठाणांची भरशहरांत व खुद्द आपल्या वाड्याभोंवतीं लढाई सुरू होणार असा संभव दिसूं लागतांच श्रीमंतांनीं घाबरून आरबांचा सर्व पैसा देऊन टाकून त्यांस मार्गस्थ केलें!

सुमारें तीन महिने नाना फडनवीस शिंदे यांच्या लष्करांत पुण्यासच होते. त्या मुदतींत सर्जेराव घाटगे व फकीरजी गाढवे यांनीं त्यांजकडून द्रव्य काढण्याचे पुष्कळ प्रयत्न केले, परंतु नानांनीं त्यांची डाळ शिजूं दिली नाहीं. विश्वासघातानें आपणास धरल्यामुळें नाना फार चिडले होते, सबब त्यांनीं कोणत्याही गोष्टीसंबंधानें या लोकांशीं वाटाघाट करण्याचें साफ नाकारलें. ता. ६ एप्रिल रोजीं नानांची पुण्याहून नगरच्या किल्ल्यावर रवानगी करण्यांत आली. या नगरच्या किल्ल्यावरच त्यांनीं मोरोबांस गेलीं वीस वर्षे कैदेंत ठेविलें होतें हें वाचकांच्या स्मरणांतून गेलें नसेलच. त्याच किल्ल्यावर आणि त्याच स्थितींत दिवस कंठणें आतां नानांस प्राप्त झालें ! नाना नगरास जातात तों त्यांच्या महाडच्या कारस्थानामुळें शिंदे यांच्या कैदेंत पडलेले बाळोबा तात्या वगैरे शेणवी सरदार त्यांची वाट पहात तेथें आगाऊच कैदेंत बसले होते.

स. १७९८

यानंतरची सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे शिंद्यांचें लग्न ही होय. दौलतराव व घाटग्याची रूपवती कन्या बायजाबाई यांचें लग्न पुणें मुक्कामीं अत्यंत थाटानें साजरें झालें. लग्नांत रुप्याचें बहुलें केलें होतें आणि शिवाय सोनेरी चांदवा करून त्या चांदव्याला मोत्याच्या झालरी लावल्या होत्या ! अशा पातशाही थाटानें

स. १७९८ मार्च.

लग्नसमारंभ पार पडल्यावर सर्जेराव घाटगे हा शिंद्यांचा मुख्य कारभारी झाला व त्याचा दोस्त फकीरजी गाढवे हा दुय्यम कारभारी बनला. द्रव्याच्या अभावामुळें शिंदे यांच्या लष्करांत अतिशय असंतोष माजला होता आणि श्रीमंतांकडून शिंदे यांस द्रव्यदर्शन तर बिलकूल होईना. घाटग्यानें श्रीमंतांच्या मुरवतीस्तव आजपर्यंत सबुरी केली, परंतु आतां कोणाचीही दया माया न धरितां पुण्याच्या लोकांकडून आपण मिळेल तेवढें द्रव्य उकळणार असें त्यानें श्रीमंतांस बजावलें. त्याच्या क्रूरपणाची आणि उद्दामपणाची अटकळ श्रीमंतांस अजूनसुद्धां पुरती झाली नव्हती. त्यांनीं त्याच्या म्हणण्यास निरुपायानें रुकार दिला व खंड वसूल करण्याच्या कामावर आपल्या वतीनें बाळोजी कुंजर यास घाटग्याच्या मदतीस नेमलें. इतकें झाल्यावर घाटग्याच्या सैतानी लीलांचा प्रभाव काय विचारावा! तो आतां शिंदे यांच्या लष्करांतून उठून खुद्द नाना फडनवीसांच्या वाड्यांत येऊन राहिला आणि नाना ज्या दिवाणखान्यांत बसत असत त्याच दिवाणखान्यांत घाटग्यानेंही आपली बैठक दिली! नानांच्या देवघरांत घाटग्याच्या भक्षणाकरितां दररोज अजापुत्रांचा वध होऊं लागला! शनवारवाड्यांत नानांच्या पक्षाची बाबा फडके वगैरे कांहीं मंडळी खुद्द पेशव्यांनींच अटकेंत ठेविली होती, सबब प्रथम सरकारच्याच वाड्यांत सरकारच्याच समक्ष त्या दुर्दैवी बंदीवानांची बेअब्रू व हाल हाल करून सर्जेरावानें त्यांजपासून द्रव्य वसूल केलें! नानांच्या वाड्यांत गांवांतले द्रव्यवान् प्रमुख लोक धरून न्यावे, त्यांजवळ अद्वातद्वा पैका मागावा, न देतील तर त्यांस धक्काबुक्की व शिवीगाळ करावी, आणि इतकेंही करून वसूल न होईल तर त्या लोकांस वानवडीवर शिंदे यांच्या लष्करांत फकीरजी गाढव्याकडे पोंचवून द्यावें, तेथें त्या लोकांचा प्राण गेला तरी बेहेत्तर पण द्रव्य मिळेपर्यंत गाढव्यानें त्यांस मारझोड करावी हा घाटग्याचा क्रम दोन तीन महिनेपर्यंत सतत चालला होता! या अनर्थांची कल्पना येण्याकरितां ऐतिहासिक लेखसंग्रहापैकीं थोडेसे उतारे येथें देतों.

(नं. ४१९० )-" राजश्री नारायणराव वैद्य यांस छड्यांनीं मारलें. व बाबूराव केशव याच्या पुत्रास मारलें. राजश्री चिंतोपंत देशमुख यांसही

मारिलें. चाप देशमुख यांजपुढें ठेवले होते. लावले मात्र नाहींत. पांच लक्ष रुपये बाबूराव केशव याचे पुत्रानें कबूल केले. देशमुख यांनीं पन्नास हजार कबूल केले. त्यास त्यांजपाशीं इतका पैसा नाहीं. देवपूजादेखील बाजारांत विकावयास काढली !"

( नं ४१७९ )–" राजश्री भाऊ कापशे व राघोपंत पेंडसे नानाकडील यांजला शिंदे यांनीं लष्करांत नेलें. नानाकडील ऐवजाची माहितगारी पुसली. त्यांणीं आपणास माहितगारी आहे तितका ऐवज दाखविला. भाऊ कापशे गांवात येऊन ज्या ज्यांकडे ऐवज होता तो दाखविला. तितके गृहस्थ शिंदे यांनीं लष्करांत नेले. बाजार वर्तमान–पन्नास साठ, ऐंशी, नव्वद लाखपर्यंत जवाहीरसमेत ऐवज सांपडला असें वर्तमान."

( नं. ४१९२ )–" तूर्त शिंदे याचे घरीं कारभारी एक सर्जा आहे, तेव्हां दौलत चालणें कळतच आहे ! परंतु आज सद्दी त्याचीच उभी राहिली आहे ! पुण्यांत हाणामार चालली आहे त्यांत कोण पार पडतात पहावें ! "

( नं. ४२०० )– " सखाराम घाटगे श्रीमंत राजश्री नानांच्या वाड्यांत येऊन राहिले आहेत. नानांच्या देवघरांत अजापुत्रांचा वध नित्य चालला आहे ! नानांची बैठक होती तेथें कारभारास घाटगे बसत असतात. पुण्यांतील गृहस्थांस दक्षिण दिशेच्या स्वामीप्रमाणें (यमाप्रमाणें) घाटग्याचें भय जाहलें आहे ! "

(नं. ४१९०)–" श्रीमंतांसमक्ष शिवीगाळ सर्जेराव करतात. श्रीमंताचे चित्तांत कांहीं एक येत नाहीं ! "

( नं. ४१९६ )– " राघोपंत गोडबोले, भाऊ कापशे व बळवंतराव बाबूराव यांजवरही प्रसंग कठिणच; प्राणाशीं गांठ; दररोज वस्त्रविरहित करून तापलेल्या तोफेवर बसवितात म्हणून ऐकतों. जे जे ज्याचे कपाळीं संस्कार असतात ते चुकत नाहींत ! "

( नं. ४२१० )– " गंगाधरपंत भानूस[1] पंधरा लक्ष तजकरा ( येणें-बाकी ) व आठ लक्ष खंड मागत होते. ऐवज उत्पन्न न होय तेव्हां

[1] नाना फडनवीसांचे चुलतबंधु विजयदुर्गचे सुभेदार.

हातापायांस दगड बांधले. शेवट वस्त्रविरहित करून दोनप्रहरां तोफ उष्णांत तप्त होते त्या तोफेवर बसविलें. त्याची झळ नाजुक जाग्यास लागली. नंतर ताडणही जाहलें! शेवट काळ जाहला."

शिंद्यांचे लग्न झाल्यापासून पुढे दोन तीन महिनेपर्यंत घाटग्यानें ही हाणामारी चालवून पुण्याच्या लोकांपासून सुमारें दोन तीन कोट रुपये वसूल केले. त्या अवधींत अब्रूदार लोकांस पुणें म्हणजे यमपुरी भासत होती!

नानाच्या पक्षास सामील झाल्याबद्दल शेणवी सरदार व महादजी शिंदे यांच्या बायका यांवर घाटग्याचा मनस्वी राग होता. त्यानें भरदरबारांत शेणवी सरदारांस शिवीगाळ करून त्यांचा उपमर्द केला आणि नंतर त्याची क्रूरदृष्टि शिंदेबायांकडे वळली. या बायांस नगरच्या किल्ल्यावर अटकेंत ठेवावें असें त्याच्या मनांत होतें. परंतु त्या बायांस त्याचा बिलकूल विश्वास नसल्यामुळें त्या आपली चीजवस्त व जवाहीर घेतल्याखेरीज व सुरक्षितपणाबद्दल श्रीमंतांची हमी मिळविल्याखेरीज जाग्यावरून हालेनात! तेव्हां ज्येष्ठ शु. १ ता. १६ मे या दिवशीं सर्जेरावानें जबरदस्तीनें पालख्यांत बसवून पलटणांच्या पहाऱ्याखालीं त्यांची रवानगी केली. त्यांनीं निघतांना मनस्वी आकांत केला तरी त्यास न जुमानतां त्या नरपशूनें त्यांस मारझोड करून पालख्यांत नेऊन कोंबलें! महादजी शिंद्यांच्या प्रत्यक्ष स्त्रियावर सर्जेरावानें केलेला हा जुलूम शिंदेशाहींतल्या जुन्या सरदारांस बिलकूल सहन झाला नाहीं. नारायणराव बक्षी, यशवंतराव शिवाजी, देवजी गवळी, मुजाफरखान पठाण वगैरे सरदारांनीं आपापल्या फौजा तयार करून पलटणांवर वाटेंतच हल्ला करून बायांस सोडविलें. अर्थात् बायांचें हें नवीनच बंड उद्भवून शिंद्यांच्या दौलतींत दुफळी झाली. जुने मराठे व पठाण सरदार व शिलेदार बायांना सामील झाले आणि सर्जेराव घाटगे व फकीरजी गाढवे हे दोन सरदार व कवाइती पलटणें एवढेंच शिंद्यांच्या बाजूस शिल्लक राहिलें. शिंदे बायांनीं लवकरच अमृतरावाचा आश्रय संपादन केला आणि नंतर त्या शिंद्यांच्या तोंडावर पुण्याच्या आसपास तळ देऊन राहिल्या. शिंदे व घाटगे यांच्या चढेलपणास कंटाळलेल्या बाजीरावानें

इ. १७९८

त्यांवर जरब बसविण्याकरितां आपण शिंदे बायांसच अनुकूळ आहों असें ढोंग माजविलें. तेव्हां श्रीमंतांस भेडसावण्याकरितां शिंदे व घाटगे यांनीं साताऱ्याच्या महाराजांस चिथावून दिलें !

सातारकर महाराजांचा दंगा हा मूळचा बाजीरावांच्या उपद्व्यापीपणामुळेंच उत्पन्न झालेला होता. नाना कैद होतांच श्रीमंतांनीं छत्रपतीस विनंतिपत्र पाठविलें कीं, 'आजपर्यंत राज्याचा कारभार नाना फडनवीस करीत होते; परंतु आतां आम्हीं त्यांस कारभारांतून काढलें आहे. याकरितां इतःपर साताऱ्याच्या किल्ल्यावर नानांची हुकमत चालूं देऊं नये. नानांचा हस्तक बाबूराव आपटे हा तेथें किल्लेदार आहे त्यास कैद करावें. म्हणून आमच्या विश्वासाचा कोणी कारकून तेथील बंदोबस्ताकरितां येईल; तोंपर्यंत सर्व संस्थान महाराजांनीं आपल्याच हातीं ठेवावें.' हा निरोप जातांच महाराजांनीं आपट्यास कैद करून सर्व संस्थान आपल्या हातीं घेतलें इतकेंच नव्हे, तर पुन्हां कैदेंत पडण्याचा प्रसंग येऊं नये म्हणून त्यांनीं स्वतः-ची अशी नवीन फौज ठेवण्यासहि सुरवात केली; श्रीमंतांनीं शिंदेबायांस अनुकूल असल्याचें ढोंग सुरू करतांच घाटग्यानें सातारकरांस निरोप पाठविला कीं, तुम्हीं पेशव्यांचें वर्चस्व खुशाल झुगारून द्या ! मी तुमचें व करवीरकर छत्रपतींचें सख्य जमवून देतों आणि पेशवे तुह्यांवर चाल करतील तर शिंद्यांचीं पलटणें पाठवून मी तुमचा बचाव करतों; इतकी फूस मिळाल्यावर हें छत्रपतींचें बंड दिवसेंदिवस वाढत चाललें. श्रीमंतांनीं हें बंड मोडण्याकरितां माधवराव रास्त्यांस साताऱ्यांस पाठविलें; परंतु छत्रपतींनीं मारामार करून रास्त्यांस हं हं म्हणतां हुसकून लाविलें. हें बंड असेंच वाढूं दिलें तर आपणांस कदाचित पेशवाईसही मुकावें लागेल असें श्रीमंतांस भय पडलें. श्रीमंतांची स्वतःची अशी फौज मुळींच नव्हती, त्यामुळें प्रत्येक मसलतींत त्यांना शिंद्यांच्या तोंडाकडे पहावें लागे. परंतु शिंदे आता छत्रपतींना अनुकूल झाले असल्यामुळें त्यांची फौज श्रीमंतांना या मोहिमेवर पाठवितां येईना. शेवटीं निरुपाय होऊन श्रीमंतांना परशुरामभाऊंची तात्पुरती कैदेंतून मुक्तता करावी लागली. नंतर भाऊंनीं फौज जमा करून व दोन तीन महिने सक्त मेहनत करून महा-

राजांचा हा दंगा शांत केला.

छत्रपति प्रकरणाची याप्रमाणें धामधूम चालली असतां घाटग्यानें ता० २५ जून रोजीं पुण्यास खुद्द अमृतरावांवर छापा घालून त्यांच्या फौजेची दाणादाण उडविली ! शिंदे व घाटगे यांच्या अरेरावीबद्दल श्रीमंतांना अलीकडे अगदीं वीट आला होता.

सन १७९८

पूर्वीच्या कोणत्याही पेशव्यांच्या कारकीर्दींत न घडलेल्या अशा अनन्वित गोष्टी आपल्या कारकीर्दींत घडल्या–शेकडों संभावित आणि अब्रूदार कुटुंबांची वाताहत झाली–हजारों गोरगरिबें नाडलीं गेलीं—अनेक ब्रह्महत्यांचें पातक पर्यायानें आपल्या माथीं बसलें या सर्व गोष्टी श्रीमंतांच्या मनांत डांचत होत्याच. त्यांतून आतां घाटग्यानें खुद्द आपल्या भावावर हल्ला केला या गोष्टीचा तर त्यांस अतीशयच संताप आला. कसेंही करून शिंद्यांचें पारिपत्य करून त्याचें दक्षिणेंतून उच्चाटण केलेंच पाहिजे असें आतां त्यांच्या मनानें घेतलें, आणि या कामीं निजाम व भोसले यांची मदत मिळविण्याची त्यांनीं खटपट चालविली. श्रीमंत व निजाम यांमध्यें वाटाघाट चालू झाली त्यांतील मुख्य कलमें—

१ नाना फडनविसांनीं महाड मुक्कामीं निजामाशीं जो करार केला तो पूर्णपणें अमलांत आणावा.

२ बेदर प्रांताचा चौथ आजपर्यंत पेशव्यांस निजामाकडून मिळत होता तो आतां मिळूं नये.

३ निजामानें शिंद्यांच्या पारिपत्याकरितां पेशव्यांस फौजेची मदत करावी. या मदतीबद्दल पेशव्यांनीं निजामास आठ लक्षांचा मुलूख द्यावा.

४ नाना फडनवीस पुढें कधीं कैदेंतून सुटून राज्यकारभार बळकावूं लागतील तर त्यांच्या पारिपत्याकरितांही निजामानें पेशव्यांस फौजेची मदत करावी.

५ शिंद्यांनीं नानांस कैदेंतून सोडलें तर नानांस पेशव्यांनीं एक लाख रुपये पोटगीबद्दल द्यावे.

शिंदे बायांना सामील झाल्याबद्दल दौलतरावांचा श्रीमंतावर राग होताच त्यांतून त्यांनीं आपला नाश करण्याकरितां निजाम व भोसले

यांशीं कारस्थान चालविलें आहे, ही बातमी शिंद्यांस लागली तेव्हां बाजीरावाचें वर्म नाना फडनवीस असें समजून त्यांनीं नानांची मुक्तता करण्याचा बेत केला. असा बेत करण्यांत त्यांचे तीन हेतु होते. बाजीरावाच्या मनांत दहशत उत्पन्न करावी हा पहिला हेतु. नानांच्या मध्यस्थीनें बायांचा तंटा मिटवावा हा दुसरा, व सुटका केल्याबद्दल नानांकडून कांहीं द्रव्य उकळावें हा तिसरा हेतु!

या बेतास अनुसरून शिंद्यांनीं फकीरजी गाढव्यास सहा पलटणें व पांचशें स्वार बरोबर देऊन नगरास पाठविलें. तों बायांची फौजही नानांस मिळवून घेण्याकरितां नगरास गेली! किल्लेदारानें दोघांसही किल्ल्याजवळ येऊं दिलें नाहीं. मग नानांचें मानस आपणांस येऊन मिळण्याचें दिसत नाहींसें पाहून बायांची फौज उठून गेली, व दोन कोट रुपये द्याल तर तुम्हांस सोडतों असें नानाशीं फकीरजीचें बोलणें सुरू झालें. पुष्कळ आढेवेढे घेऊन हो ना म्हणतां म्हणतां शेवटीं दहा लक्ष रुपये देण्यास नाना तयार झाले आणि तेवढ्यावरच शिंद्यांची समजूत झाली! यानंतर गाढव्याच्या मध्यस्थीनें नाना व शिंदे यांमध्यें करारमदार ठरले, त्यांतील प्रमुख कलमें—

१ शिंद्यांनीं नानांस कैदेंतून सोडावें आणि नानांनीं आपल्या सुटकेबद्दल शिंद्यांस दहा लक्ष रुपये द्यावे.

२ श्रीमंतांची नबाब व भोसले यांशीं वाटाघाट चालली आहे ती नानांनीं हरप्रयत्न करून बंद करवावी.

३ नानांनीं शक्य तो प्रयत्न करून शिंदे बायांची समजूत काढावी व त्यांचें व दौलतरावांचें सख्य करून द्यावें.

४ शिंद्यांनीं नानांची पुनः राज्यकारभारावर स्थापना करावी आणि त्याबद्दल नानांनीं त्यांस आणखी पंधरा लक्ष रुपये द्यावे. नानांचा कारभार सुरळीत चालू लागल्यानंतर शिंद्यांनीं पुण्याहून कूच करून हिंदुस्थानांत निघून जावें.

या करारापैकीं पहिलें म्हणजे सुटकेबद्दलचें कलमच नानांच्या दृष्टीनें महत्वाचें होतें. पेशवाईचा कारभार गाजविण्याची हौस आतां त्यांना

तिलप्राय वाटत नव्हती. 'तूर्त सुटका होते आहे, पुढचा मजकूर पुढें पाहतां येईल.' असा विचार करूनच त्यांनीं या करारास मान्यता दिली होती.

असो. हा करार ठरल्यानंतर नाना फकीरजी गाढव्यांबरोबर नगराहून निघाले, ते जुलैच्या सतराव्या तारखेस वानवडीवर शिंद्यांच्या लष्करांत

स. १७९८ } दाखल झाले. दुसरे दिवशीं मोठ्या समारंभानें शिंद्यानीं त्यांची भेट घेतली व खुशालीच्या तोफा केल्या. छावणींत आल्यावरसुद्धां कांहीं दिवस नाना प्रतिबंधांतच होते. परंतु तो प्रतिबंध त्यांच्या रक्षणार्थ त्यांच्याच इच्छेवरून राखलेला होता. आबा शेलूकर, बजाबा शिराळेकर व पिंगळे वगैरे त्यांची मित्रमंडळी त्यांजकडे खुशाल जात येत होती. लोहगडास त्यांचा फौज पायदळ वगैरे जमाव होता तो घेऊन धोंडोपंत नित्सुरे त्यांजवळ रहावयास आले, तेव्हां त्यांनीं शिंद्यांच्या छावणींतच आपला निराळा गोट केला.

कराराप्रमाणें नानांनीं शिंद्यांकडे दहा लक्ष रुपये तत्काळ भरले आणि श्रीमंत व निजाम यांमध्यें वाटाघाट चालू होती, तीही नानांची सुटका होतांच नबाबानें आपण होऊन बंद पाडली. शिंदेबायांची समजूत करणें एवढें एकच काम आतां शिल्लक राहिलें. त्या बायांना घाटग्याबद्दल पराकाष्ठेचा तिरस्कार वाटत होता आणि तो शिंद्यांच्या कारभारांत असेपर्यंत ही समजूत

स. १७९८ } कधींच होण्याजोगी नव्हती. ही अडचण दूर करण्याकरितां शिंद्यांनीं ता. २५ जुलै रोजीं आपल्या सासऱ्यास म्हणजे सर्जेराव घाटग्यास आणि फकीरजी गाढव्यास कैदेंत बसविलें. नंतर नाना शिंदेबाया व दौलतराव यांचा समेट करून देण्याच्या उद्योगास लागले. नानांचा हा उद्योग चालू असतां शिंद्यांनींही आपल्या बाजूनें कराराच्या अटी पूर्णपणें अंमलांत आणण्याची तजवीज चालविली. नानांशीं सख्य जोडून त्यांच्या हातीं सर्व राज्यकारभार सोंपविण्याविषयीं त्यानीं श्रीमंतांस डोळे वटारून विनंति केली! शिंद्यांनीं नानांस सोडून दिलें त्याअर्थी आतां त्यांच्या हातीं कारभार दिल्यावांचून सुटका नाहीं; हें जाणून श्रीमंतांनीं निरुपायानें शिंद्यांच्या म्हणण्यास रुकार दिला. निजामाची फौज आणून शिंद्यांस

दक्षिणेंतून हांकून देण्याच्या व त्याबरोबरच नानांचाही कायमचा बंदोबस्त करण्याच्या त्यांच्या वल्गना आतां आपोआपच थंड पडल्या आणि राज्यकारभार हातीं घेण्याविषयीं त्यांनीं नानांची प्रार्थना केली! पण ज्या श्रीमंतांनीं घाटग्यासारख्या हलकट व क्रूर माणसांकडून नानांच्या मंडळींचा छळ व हालअपेष्टा करविल्या व त्यांपासून कोट्यवधि रुपये उकळले, व ज्या श्रीमंतांनीं शिंद्यांकडून नानांस कैदेंत घालवून त्यांची कोट रुपये नुकसानी केली त्या श्रीमंतांची प्रार्थना कितीही नम्र असली तरी तिच्यावर नानांचा विश्वास कसा बसावा! त्यांनीं श्रीमंतांस साफ उत्तर दिलें कीं, तुमच्या कारभारांत पडल्यानें माझ्या अब्रूस किंवा जीवितास धक्का लागणार नाहीं याबद्दल इंग्रज व निजामअली जर हमीदार होत असतील तरच आपण कारभार पतकरूं! त्या दोघांकडून अशी हमी मिळविणें श्रीमंतांच्या इभ्रतीस बट्टा आणणारें व नुकसानीचें होतें एवढेंच नव्हे, तर तें अशक्यही होतें!

सप्टेंबर महिन्यांत नाना शिंद्यांच्या छावणींतून निघून पुण्यांत आपल्या पेठेंत वानवळ्यांच्या वाड्यांत रहावयास आले. त्यांचा कारभार श्रीमंतांस अत्यंत अप्रिय होता, तरी राज्याच्या बंदोबस्ताचें जोखीम नानांकडे सोंपवून आपण हिंदुस्थानांत जाणार अशी शिंद्यांनीं धमकी दिल्यामुळें आतां नानांच्या हातापायां पडून त्यांची मर्जी प्रसन्न करून घेणें बाजीरावास भागच पडलें! नाना जरी श्रीमंतांस झिडकारीत होते तरी त्यांचें मन हरप्रयत्नानें वळविण्याची आशा श्रीमंतांनीं सोडली नव्हती. लीनतेचें प्रदर्शन, मिष्ट भाषण, आर्जव, स्तुतिपाठ वगैरे कला बाजीरावांस इतक्या लहान वयांतसुद्धां पूर्णपणें अवगत झाल्या होत्या! त्या सर्व कलाकौशल्याचा भडिमार नानासारख्या अनुभवी व चाणाक्ष मुत्सद्यावर करून त्यांनीं आपला हेतु तडीस नेला ही केवळ शिताफीची गोष्ट! नोव्हेंबरच्या चौदाव्या तारखेस आवशींच्या अकरा घटका रात्रीस बरोबर फक्त एक शिपाई घेऊन बाजीराव अकस्मात् वानवळ्यांच्या वाड्यांत नानांच्या भेटीस गेले, आणि त्यांचे घट्ट पाय धरून व डोळ्यांत आंसवें आणून राज्य संभाळण्याविषयीं त्यांनीं त्यांची प्रार्थना केली! बाळाजी विश्वनाथ

भटांच्या वंशजानें आपली पायधरणी करून पेशवाई राज्य बुडतें तें कसेंही करून तारावें अशी परोपरीनें विनवणी करावी, यापेक्षां बाळाजी महादेव भानूंच्या वंशजास अधिक दुर्धर संकट कोणतें वाटणार? श्रीमंतांच्या मागील वर्तनाचे गुणदोष न पाहतां नानांनीं निमूटपणें त्यांचें म्हणणें मान्य केलें! मात्र त्यांत थोडा पर्याय ठरविला. तो एवढाच कीं, नानांच्या वतीनें नारोपंत चक्रदेव यांनीं श्रीमंतांजवळ राहून राज्यकारभाराचीं कामें सांभाळावीं, व त्यांत नेहमीं नानांचा सल्ला घेऊन त्याप्रमाणें वागत असावें. पुढें कांहीं दिवसांनीं फडनवीशीची तेरीखसुद्धां आमच्या वतीनें तुम्हींच घालीत जा असें त्यांनीं चक्रदेवास सांगितलें. कारभार सुरळीत चालावा व श्रीमंतांशीं प्रत्यक्ष संबंध तर फारसा येऊं नये, एवढ्यापुरती नानांनीं योजिलेली ही तजवीज ठीकच होती.

वर लिहिलेल्या भेटींत 'पेशव्यांनीं आपल्या मनोहर भाषणानें नानांस भुरळ पाडली' असें डफसाहेब लिहितात. उलटपक्षीं, पुण्याच्या दरबारीं इंग्रजांचा कर्नल पालमर नांवाचा त्यावेळीं वकील होता, तो तर स्पष्ट म्हणत असे कीं, 'नाना मुळींच फसले नाहींत, ते पेशव्यांचें सर्व कपट ओळखून होते.' नानांनीं ज्या अटीवर कारभार स्वीकारला त्या अटीचा विचार केला तर आम्हाला कर्नल पालमर याचेंच म्हणणें ग्राह्य वाटतें.

---

# प्रकरण अठरावें.

## संकीर्ण माहिती व चर्चा.

१ शरीरप्रकृति—डफसाहेब लिहितात कीं, 'नानांचा बांधा उभार असून सडपातळ होता, वर्ण किंचित काळसर होता व मुद्रा गंभीर होती. त्यांचे डोळे पाणीदार, तीक्ष्ण व चंचल असे होते.' त्यांजकडे पाहतांच कोणालाही त्यांजविषयीं आदरयुक्त भीति वाटत असे. त्यांचें शरीर मजबूत नव्हतें त्यामुळें स्वारी शिकारी करण्याचा मात्र त्यांस कंटाळा येत असे.

त्यांचें शरीर कमकुवत होतें तरी त्यांचे आहारविहारादि व्यापार अति नियमित असल्यामुळें त्यांची प्रकृति निकोप असे. त्यांचे वडील जनार्दन बल्लाळ यांस पोटशुळाची व्यथा होती ती त्यांसही उतारवयांत जडली होती.

२ दिनचर्या—नानांची दिनचर्या पुढें दिल्याप्रमाणें होती—ते नेहमीं अरुणोदयाबरोबर उठत. मुखमार्जन वगैरे आटोपल्यावर थोडा वेळ देवाचें नामस्मरण करून नंतर कांहीं वेळ जरूरीचीं तितकीं कामें पहात असत. नंतर स्नानसंध्या, पूजा वगैरे नित्य कृत्यांत दोन तास घालवीत. याच वेळीं कोणी विद्वान्, शास्त्री, पंडित वगैरे नवीन आले असतील त्यांच्या तारतम्यानें भेटी होत व त्यांची यथायोग्य संभावना होई. इतकें होईतों प्रहर दिवस येई. नंतर ते पालखींत बसून देवदर्शनाकरितां बेलबागेंत जात. तेथें गेल्यावर हातपाय धुवून सोवळें नेसणें होईपर्यंत शहरचे रोजचे वर्दीवाले यांनीं येऊन बाजारजिनसांचे निरख वाचून दाखवावे व शहरांत कांहीं कमज्यास्ती झालेली गोष्ट कळवावी. नंतर देवाची सुमारें घटकाभर पंचोपचारयुक्त पूजा करून सवडीप्रमाणें एखादा विष्णुसहस्रनामाचा पाठ म्हणत. नंतर ते आपल्या वाड्यांत परत जाऊन बाराव्या घटकेच्या अंमलांत भोजन करीत. भोजनोत्तर घटकाभर विश्रांति घेण्याचा त्यांचा परिपाठ असे. नंतर ते कारभारास बसत ते सायंकाळचा घटका दिवस राहीतों जाग्यावरून हालत नसत. सरकारी काम आटोपल्यावर दोन घटका विश्रांति घेत, किंवा कोठें बाहेर देवदर्शनास जावयाचें असल्यास जात, किंवा सरकार वाड्यांत दरबार भरावयाचा असल्यास तिकडे जात. त्यांच्या भरंवशाची कांहीं मुत्सद्दी मंडळी होती व त्यांपैकीं निरनिराळ्या असामींकडे निरनिराळीं कामें वांटून दिलीं होतीं; त्यांची वर्दी घेणें व विचारपूस करून त्यांस दुसरीं कामें सांगणें, हे यानंतर दोन तीन घटका होऊन सायंसंध्या, कांहीं नियमित स्तोत्रपाठ व उपहार होत असे. यानंतर

१ हें दिनचर्येचें वृत्त व या प्रकरणांतील दुसरी खासगीसंबंधाची बहुत माहिती रा. रा. सखाराम रामचंद्र जोशी कारकून नि. श्रीमंत मेणवलीकर यांजकडून मिळाली.

प्रहररात्रीपासून मध्यरात्र होईपर्यंत गुप्त हेरांनीं आणलेल्या बातम्या ऐकणें, कोणाचीं पत्रें आलेलीं असतील त्यांचीं उत्तरें लिहिणें, कारभारी मंडळीशीं खलबतें करणें, हीं कामें होत. यानंतर दीड प्रहर काय तो निद्रा घेण्यांत जात असे. याप्रमाणें त्यांच्या सर्व वेळा बांधलेल्या असल्यामुळें त्यांच्या हातून इतका उद्योग होत असे कीं, तो सांगूं लागल्यास कोणास खरा देखील वाटणार नाहीं!

नानांच्या घराण्याचें उपास्यदैवत गणपति व कुलदेवता जोगेश्वरी आहे. तथापि त्यांनीं शिव व विष्णु या देवांचींच देवळें बांधिली आहेत. यावरून त्यांची भक्ति हरि–हरांवर विशेष होती असें दिसतें. नानांच्या वर्तनांत आस्तिक्यबुद्धि पुष्कळ होती, परंतु त्यांच्या ठायीं धर्मभोळेपणा मात्र बिलकूल नव्हता. धार्मिक कर्मठपणाचें निष्कारण अवडंबर ते कधींही माजवीत नसत. ते चतुर्थी, एकादशी व प्रदोष हीं उपोषणें करीत असत. त्यांचा फलज्योतिषांवर बराच विश्वास होता. ते आपल्या आप्तइष्टजनांस ममतेनें वागवीत असत. तथापि आप्तांपैकीं कोणास त्यांनीं आपल्याजवळ बाळगून ठेविलें नाहीं. आपल्या नातलगांतून जे कोणी बुद्धिवान् असतील त्यांस ते नोकऱ्या देत असत. बाकीच्यांस त्यांच्या गांवींच रहावयास

---

१ ज्योतिषास प्रश्न विचारून ते खरे खोटे कितपत ठरतात हे पहाण्याचा नाना फडनवीसांस नादच लागला होता असें दिसतें. उदाहरणार्थ त्यांच्याच हातची ही खालील याद पहा.

श्री.

प्रश्न खरे उतरले.

१ टोक्यास जाण्याचा मुहूर्त सांगितल्याप्रमाणें स्वस्तिक्षेम येणें झालें.

प्रश्न लटके झाले.

१ टिपू मेला म्हणून सांगितलें. २ हिंदुस्थानांत इस्मालबेगशीं लढाई मातबर होणार नाहीं, तोफा वगैरे यावयाजोग्या नाहींत, असें सांगितलें होतें. परंतु पुढें इस्मालबेग व राजांच्या फौजा बुडवून फत्ते झाली. ३ शरीरप्रकृतीविषयी. ४ औषधास मुहूर्त सांगितल्याप्रमाणें चाललें नाहीं. ५ ज्येष्ठमास. ६ दुसरी लढाई राठोडांची झाला ती सांगितली नाहीं.

सांगून वालीना आपल्या उत्पन्नांतून कांहीं नेमणूक पाठवून देत.

नानांना भोजनांत तिखट पदार्थ बिलकूल खपत नसत. त्यांना स्वतःचें पागोटें बांधतां येत नव्हतें असें एक त्यांचें वैगुण्य म्हणून एका समकालीन गृहस्थानें लिहून ठेविलें आहे ! पेशवाईच्या अखेरीस चहापानाचें व्यसन बऱ्या लोकांत बरेंच बोकाळलें होतें. परशुरामभाऊ पटवर्धन हे चहा पीत असत. नानाही कदाचित् पीत असतील. त्यांना तंबाखू खाण्याचें आणि तपकीर ओढण्याचें व्यसन होतें अशी मात्र खात्रीलायक माहिती लागते. तंबाखू देवतेच्या उपासकांस हा जुना दाखला बहुमोल वाटेल !

३ स्वभाव—नाना पराकाष्ठेचे उद्योगी, अतिशय नियमित, व सचोटीनें वागणारे गृहस्थ होते; त्यांच्या तोंडातून एकदां शब्द गेला आणि पुढें तो खोटा पडला, असें कधीं: झालेंच नाहीं. त्यांची धर्मावर कडक निष्ठा होती. स्वामिभक्ति व स्वदेशाभिमान या दोन गोष्टी त्यांजमध्यें पूर्ण वसत होत्या. त्यांचा स्वभाव दयाळू होता व ते परोपकाराविषयीं

---

१ नानांचें सत्यभाषणाचें व्रत असें कडक होतें कीं, 'न वितथं परिहासकथास्वपि' या वचनाप्रमाणें थट्टेंतदेखील खोटें बोलणें त्यांस आवडत नसे ! एकदां सवाई रावसाहब कांहीं मंडळी घेऊन सोंगट्यांनीं खेळत बसले होते. तेथें नाना फडनवीसही सहज बसले होते. डाव चालतां चालतां अमुक एक दान पडलें तर डाव आपला होईल असें पेशव्यांस कळलें. परंतु तें दान त्यांस किंवा त्यांच्या बाजूस जी मंडळी होती त्यांपैकीं कोणास पडेना. तेव्हां खेळण्याच्या भरांत पेशवे बोलले कीं, जो हें दान घेईल त्यास मी तुरा बक्षीस देईन. त्यावेळीं रघुनाथराव दादा कुरुन्दवाडकर यांस सुदैवानें तें दान पडून डाव झाला. पुढें दुसऱ्या डावास प्रारंभ होऊन खेळ पुढें चालला, पण तुऱ्याची गोष्ट पेशव्यांच्या स्मरणांतदेखील नाहीं, असें पाहून नाना फडनवीस कांहीं निमित्त करून बाहेर उठून गेले व एका तबकांत मोत्याचा तुरा घालून तो घेऊन येण्याविषयीं जामदारास ताकीद करून पुनः आंत येऊन बसले. हुकमाप्रमाणें जामदारानें तबकांत तुरा ठेवून त्यावर सरपोस घालून तें श्रीमंतांजवळ आणून ठेवलें. खेळ संपल्यावर नानांनीं रघुनाथरावदादांस श्रीमंतांकडून तुरा बक्षीस देववून त्यांजकडून आपला शब्द खरा करविला ! हा तुरा कुरुंदवाडकरांजवळ पुष्कळ दिवस होता. आतां मात्र तो मोडला गेला आहे

तत्पर होते. नानांच्या हातून ज्या ज्या परोपकाराच्या गोष्टी झाल्या आहेत, त्या साऱ्या पेशवाईत कोणाच्याही हातून झालेल्या नाहींत.

नानांची वृत्ति जरी गंभीर व भाषण नियमित होतें, तरी त्यांची बोलण्याची ढब मनोहर होती. ते बोलतांना दुसऱ्यावर हं हं म्हणतां आपली छाप बसवीत. त्यांच्या अंगीं विद्वान् लोकांच्या संसर्गानें प्राप्त होणारा बहुश्रुतपणाही बराच होता. पेशव्यांकरितां ज्या मुद्दाम बखरी लिहविल्या म्हणून मागें सांगितलें, त्यांपैकीं भागवताच्या बखरींत घालण्याकरितां त्यांनीं निवडक श्लोकांची याद तयार केली होती ती आमच्या पाहण्यांत आहे. तिजवरून त्या प्रासादिक ग्रंथांतील उत्कृष्ट स्थळें नानांस चांगलीं अवगत होतीं, असें अनुमान काढण्यास चिंता नाहीं.

लहानपणीं नानांवर अनेक दुःखाचे प्रसंग कोसळले, त्यामुळें त्यांच्या मनावर जी एकदां खिन्नतेची छाया पसरली ती पुढें यावज्जीव दूर झालीच नाहीं. ते कधीं हंसत नसत व त्यांस थट्टामस्करी आवडत नसे अशी प्रसिद्धि आहे. पण कोणी खुबीदार भाषण केलें, किंवा एखादें सुभाषित म्हटलें तर त्यापासून त्यांना आनंद होत नसे असें नाहीं. त्यांच्या हाताखालीं तात्या काकिडे या नांवाचा एक कारकून होता. तो बहुश्रुत आणि चतुर असून तत्काळ कविता करण्यामध्यें त्याचा हातखंडा असे. त्यानें तीन निरनिराळ्या प्रसंगीं श्लोक नानांस म्हणून दाखविलेले आमच्या ऐकिवांत आहेत ते असे—

तात्या नोकरी मिळविण्याकरितां प्रथम पुण्यास आला तेव्हां त्यानें बेलबागेंत नानांची गांठ घेऊन खालील श्लोक म्हटला.

अलंकारप्रियो विष्णुर्जलधाराप्रियः शिवः ॥
नमस्कारप्रियो भानुर्ब्राह्मणो भोजनप्रियः ॥ १ ॥

" विष्णूस अलंकार आवडतात, शिवास जलधारांचा अभिषेक आवडतो, भानूस नमस्कार प्रिय आहे, व ब्राह्मणांस भोजन प्रिय आहे ! " यांतील ' भानु ' या शब्दामधला श्लेष वाचकांच्या लक्षांत चटकन येईलच. पुढें नानांनीं तात्यास फडांत कारकुनीची जागा दिली. कांहीं महिने काम केल्यावर तो तेथील कामांत चांगला वाकब झाला. तेव्हां

आपणांस यापेक्षां बढतीची जागा मिळावी या हेतूनें त्यानें नानांजवळ येऊन विनंती केली कीं—

एतावत्सरासि सरोरुहस्य कृत्यं ।
भित्वांभः सपदि बहिर्विनिर्गतं तत् ॥
आमोदो विकसनमिंदिरानिवास— ।
स्तत्सर्वं दिनकरकृत्यमामनंति ॥ २ ॥

" सरोवराच्या पाण्यांतून कमलानें आपलें डोकें एकदांचें वर काढलें म्हणजे त्याचें काम संपलें. पुढें त्यांत सुगंध घालणें, त्याचा विकास करणें, व त्यास लक्ष्मीचें माहेरघर बनविणें, हें सर्व काम दिनकराचें ( भानूचें ) आहे; तें त्यानें करावें ! "

रामशास्त्री मरण पावल्यावर त्यांच्या मरणाचें वृत्त काकिडे यानें नानांस कळविलें तें असें—

वाग्विलासैरनुपमैर्जित्वा भूदेवमंडलं ॥
जेतुं सुरगुरुं शास्त्री रामनामा दिवं गतः ॥ ३ ॥

" आपल्या वक्तृत्वाच्या बलानें भूलोकचे देव म्हणजे ब्राम्हण यांस जिंकून प्रत्यक्ष सुरगुरु बृहस्पति यांस जिंकण्याच्या इर्षेनेंच रामशास्त्री देवलोकास गेले ! "*

नानांचा स्वभाव भित्रा होता अशी सार्वत्रिक समजूत आहे, परंतु आमचे मतें ती चुकीची आहे. नाना हे द्रव्यसंपन्न होते आणि त्या द्रव्यरक्षणासाठीं जरूर लागणारें मनगटाचें सामर्थ्य त्यांजमध्यें नव्हतें, त्यामुळें द्रव्यलोभानें कोणी आपला घात करण्यास प्रवृत्त होईल असें त्यांस नेहमीं भय वाटत असे. त्यांचें हें भय अस्थानीं नव्हतें हें आतां वाचकांस नव्यानें

* ज्या अर्थी नाना फडनवीस आणि कविता या दोन गोष्टींचा यथें उल्लेख आला आहे त्या अर्थी आणखीही एक पद्य येथें देतों. मोरोपंत कवि नानांस पुष्कळ चहात असत. त्यानीं आपल्या ' गंगावाकिलींत ' नानांविषयीं गंगेजवळ अशी प्रार्थना केली आहे—

गंगे संदर्शन दे श्रीविष्णुस्वामिभक्त नानातें ॥
जग तोक माय तूं हें पूर्ण करूं मनोरथास या नातें ॥ १ ॥

सांगावयास नकोच ! दुसऱ्यास अतिप्रसंग करण्याची संधि सांपडूं नये या हेतूनें ते संकटापासून होतां होईतों दूर दूर रहात आणि अतिशय सावधपणानें वागत. इतकेंही करून संकट नजीक येऊन ठेपलेंच, तर मात्र कशाचीही पर्वा न ठेवतां ते त्या संकटाला शांतपणानें तोंड देत ! मोरोबाच्या कारस्थानाच्या वेळीं त्यांचें हें व्यक्तिगत धैर्य चांगलेंच प्रत्ययाला आलें. बाजीरावांच्या सुरवातीनंतर दौलतराव शिंदे यांच्या तावडींत सांपडून नानांचे बहुत हाल झाले. नाना खरोखरीच भित्रे असते तर त्यांच्या मनाला स्वास्थ्य प्राप्त करून देणारें आश्रयस्थान त्यांना कोठें तरी सहज सांपडलें असतें. उदाहरणार्थ, नाना इंग्रजांच्या आश्रयाला गेले असते तर त्यांच्या जोरावर त्यांचा राज्यकारभार सुरळीत चालला असता, त्यांचें द्रव्य सुरक्षित राहिलें असतें, आणि त्यांच्या शत्रूंचेंही समूळ निसंतान झालें असतें ! भ्याड माणसांच्या स्वार्थसाधनाचा हा धोपट मार्ग न पतकरितां नाना जिवाची आशा न ठेवितां पुण्यासच शिंदे यांशीं टक्कर देत राहिले याचें कारण त्यांचें व्यक्तिगत धैर्य तसेंच उच्च प्रतीचें होतें हेंच होय. बदामीच्या वेढ्यांतल्या सर्व लष्करी हालचाली खुद्द नानांच्याच देखरेखीखालीं चालल्या होत्या आणि शत्रूच्या तोफेच्या माऱ्यांतच त्यांनीं आपला तंबू ठोकला होता वगैरे मजकूर दहाव्या प्रकरणांत लिहिला आहे तो वाचकांच्या स्मरणांत असेलच.

नानांच्या ऐन पंचविशीच्या अमलांत त्यांच्या ठिकाणीं अतिरिक्त विषयवासना हा एक मोठाच दुर्गुण होता. बरें, ते जसे विषयी होते तसे भक्तिशीलही होते. हे परस्परविरोधी गुण त्यांच्या ठायीं कसे वसत असतील, याविषयीं पाहूं जातां असें दिसतें कीं, नानासाहेब पेशव्यांच्या वेळेपासून पेशवाईत जी मिजास वाढली होती, तिचाच संपर्क त्यांस लागला असावा, व त्यांचा मूळचा अंकुर वैराग्याकडे वळलेला असावा. खुद्द नाना फडनवीस असें लिहितात कीं, माझ्या मातामहाच्या वंशापासून ही पापबुद्धि माझ्या हाडांत खिळली असावी. नानांनीं बहुत प्रयत्न करून उपासना व धारणा या दोन मार्गांनीं या मनोविकारावर बराचसा विजय मिळविला, त्यामुळें या दुर्वासनेला बळी पडून पुढें त्यांच्या हातून औचित्य व सौजन्य यांचा भंग कधींही होऊं शकला नाहीं. नानांच्या

स्त्रीलंपटपणाविषयीं राघोबादादा यांच्या पक्षीयांनीं व इंग्रजांनीं ज्या कंड्या उठविल्या होत्या त्या सर्वस्वीं निराधार आणि द्वेषमूलक असून त्यांना मराठी किंवा मुसलमानी इतिहास ग्रंथांतून कोठेंच आधार सांपडत नाहीं.

नाना आणि परशुरामभाऊ यांचें वांकडें पडल्यावर पटवर्धनांच्या कारकुनानें एका पत्रांत भाऊंस नानांविषयीं पुढील मजकूर लिहून कळविला—" मुख्य गोष्ट श्री. राजश्री नानांचें बोलणें कोणते समयीं कसें होईल याचा भरंवसा धरावयाचा नाहीं. सारा दिवस बोलत असतां दस्तऐवज बोलण्यांत सांपडावयाचा नाहीं, या चाली बोलावयाच्या आहेत! काम लागलें असतां साखरेपेक्षां गोड बोलायास उशीर नाहीं, काम जाहलेनंतर त्या गांवचे देखील नव्हत! येथील विचार असा आहे." हें वर्णन एकट्या नानांसच काय, पण पृथ्वीच्या पाठीवरील सर्वच मुत्सद्यांस लागूं पडणारें आहे!

४ द्रव्यसंग्रह—आपल्या अंगांत कितीही अक्कल असली तरी आयत्या वेळीं संकटांत हात देणारा पैशाशिवाय दुसरा मित्र नाहीं हें नाना फडनवीस पूर्णपणें जाणत होते. त्यांनीं मोठ्या आस्थेनें पैशाचा संचय केला होता. त्यांच्या श्रीमंतीवरून लोक त्यांस ' नवकोट नारायण ' असें म्हणत. त्यांची दौलत नऊ कोटींचीच असेल असें आम्हांस वाटत नाहीं. तथापि कोट्याधीशांमध्यें त्यांची गणना करण्यास हरकत नाहीं. त्यांनीं हिंदुस्थानच्या बहुतेक भागांत विश्वासू सावकारांच्या हातीं गुप्तपणें ठेवी ठेवल्या होत्या. त्या अशाकरितां कीं, कोणत्याही वेळीं पाहिजे तेथें आपणास जरूर लागल्यास तो आपणास मिळावा. इतक्या पैशाची ते व्यवस्था केव्हां करीत, त्यांच्या ठेवी कोठें कोठें होत्या, या गोष्टींबद्दल लोकांस अजूनही आश्चर्य वाटत आहे. इतकें द्रव्य नानांनीं कसें मिळविलें, याविषयीं शोध करूं जातां असें दिसतें कीं, माधवरावसाहेब पेशव्यांच्या कारकीर्दीच्या प्रारंभींदेखील नानांजवळ संपत्ति फार मोठी होती. अर्थात् नानांचें बरेंचसें द्रव्य वडिलोपार्जित असलें पाहिजे असें स्पष्ट दिसतें. शिवाय नानांच्या स्वतःच्या उत्पन्नाच्या बाबी होत्या त्या अशा—

त्यांच्या फडणिसीच्या दरकाचें उत्पन्न पुष्कळच मोठें होतें. राक्षस-

भुवनच्या लढाईनंतर रावसाहेब पेशव्यांनीं नानांस फडणिशीचीं वस्त्रें दिलीं, त्या वेळीं फडनवीसांनीं फक्त एक लाख रुपये तैनात घेऊन बाकीचें दरकाचें उत्पन्न त्यांनीं सरकारांत जमा करावें असें राघोबादादांनीं बोलणें घातलें होतें वगैरे मजकूर तिसऱ्या प्रकरणांत लिहिला आहे तो वाचकांच्या स्मरणांत असेलच. यावरून त्या दरकाचें उत्पन्न एक लाखापेक्षां पुष्कळच जास्त होतें हें सिद्ध होतें. त्याशिवाय पेशव्यांच्या पदरचे शिंदे, होळकर, पटवर्धन वगैरे सरदारांचे सरंजाम व पेशवाई राज्यांतले शेंकडों किल्ले येथील फडणिशीच्या कामावर कारकून नेमण्याचा हक्क नानांकडेच होता, व त्या त्या जागांवर ते आपले हस्तक नेमीत असत. या हस्तकांकडून नानांस स्वामित्वाबद्दल अजमासें दीड लाख रुपये सालीना येत. एकंदरींत नानांस फडणिशीच्या दरकाबद्दल सालीना चार पांच लाख रुपये मिळत असावेत असा अंदाज केल्यास तो फारसा चुकणार नाहीं.

नानांना पेशवेसरकारांतून दीड हजार स्वारांचा म्हणजे जवळ जवळ पांच लाखांचा सरंजाम होता. त्या सरंजामांत नाशीक व खानदेश या प्रांतीं त्यांना सरकारांतून गांव लावून दिलेले होते. त्याशिवाय लोहगड, पुरंदर, प्रतापगड, रायगड हे चार किल्ले पेशव्यांकडून व वांईजवळचा किल्ला केळंजा हा पंतसचिवांकडून नानांस मिळालेला होता. सरंजामाच्या बेरजेपुरते स्वार बाळगून त्यांस सरकारचाकरी करावी लागे. नानांचें पथक बहुतेक परशुरामभाऊ पटवर्धन यांच्या दिमतीस दिलेलें असे. सरंजामाचें बहुतेक उत्पन्न जरी स्वार बाळगण्यांत खर्च होत असे, तरी त्यांतही इतर सरदारांप्रमाणें नानांसही थोडीबहुत कसर रहात असलीच पाहिजे. पेशवे सरकारांतून स्वारांचा बारमाही पगार मंजूर होत असे, परंतु सरदार शिलेदारांना दसमाही किंवा फार झालें तर अकरमाही पगार देत आणि बाकीचा त्यांचा एक दोन महिन्यांचा पगार स्वतःची कारकुनी उर्फ कसर म्हणून कापून घेत! या हिशेबानें सरंजामी स्वार व किल्ल्यांची शिबंदी यांच्या पगारापैकी कसर म्हणून नानांस सालीना लाख पन्नास हजार रुपये तरी उरत असावे.

पेशवे सरकारांत दरबार खर्च म्हणून जी रक्कम जमा होत असे तींत नाना फडनवीसांचा मोठा हिस्सा होता. दरबारखर्च घेणें म्हणजे लांच घेणें नव्हे हें येथें स्पष्टपणानें नमूद केलें पाहिजे. दरबारखर्च देण्याघेण्याचें बोलणें राजरोज उघडपणें चालें, आणि त्या रकमेचा जमाखर्च पुष्कळ वेळां खुद्द सरकारी कीर्दीला होत असे. या दरबार खर्चाला पेशव्यांची मान्यता होती इतकेंच नव्हे, तर त्यांत त्यांची वांटणीही होती! सरकारचें व प्रजेचें नुकसान केल्याशिवाय कोणा एखाद्याचें दरबारी लोकांनीं कांहीं काम करून दिलें, व त्यानें त्या कामगिरीबद्दल त्या दरबारी लोकांस कांहीं पैका दिला, तर तो घेणें म्हणजे लांच खाणें असें त्यावेळचे लोक समजत नसत. एखादा सरदार किंवा इनामदार मरण पावल्यावर त्याची जहागीर किंवा इनाम त्याच्या वारसास द्यावयाचें असलें, किंवा एखाद्या सरदाराचा गुन्हा माफ व्हावयाचा असला, किंवा एखाद्या राजास कुमक मागावयाची असली, किंवा तह करावयाचा असला तर अशा वेळीं पेशव्यांस व त्यांच्या दरबारी लोकांस दरबारखर्च, गुन्हेगारी, नजराणा अशा कांहीं तरी रूपानें लाखों रुपये मिळत. हैदरानें पेशव्यांशीं एकदां तह केला त्या प्रसंगीं त्यानें शिंदे, हरीपंत फडके, नाना फडनवीस व दुसरे एक दोघे मुत्सद्दी या सर्वांस साडेतीन लक्ष होन दिले, त्यांपैकीं नानांच्या वांटणीस एक लक्ष होन आले होते. खर्ड्यांचा तह ठरतांना निजामाकडून नानांस दरबारखर्चाऐवजीं पन्नास हजार रुपयांची जहागीर मिळाली होती. या दोन सामान्य उदाहरणांवरून मराठी राज्यांत किंबहुना बहुतेक हिंदुस्थानांत जवळ जवळ चाळीस वर्षांमध्यें झालेल्या उलाढालींत ज्या नाना फडनवीसांचा संबंध होता, त्यांनीं कोट्यवधि रुपये मिळविले असल्यास त्यांत काय आश्चर्य!

हा दरबारखर्च घेण्याचा प्रघात मराठे व मोंगल मुत्सद्यांमध्येंच रूढ होता असें नव्हे, तर त्यावेळच्या इंग्रज अंमलदारांमध्येंही तो प्रकार राजरोसपणें चालू होता. सालबाईचा तह ठरविण्याकरितां मि० डेव्हिड अंडर्सन हा शिंद्याकडे आला तेव्हां त्यानें त्यांशीं बोलणें लाविलें होतें कीं, मी नानांच्या इच्छेप्रमाणें तह ठरवून दिल्यास मला पेशवे सरकारांतून दीड

लक्षांची जहागीर मिळावी ! नानांना समकालीन असणाऱ्या लॉर्ड क्लाइव्ह, वॉरन हेस्टिंग्स वगैरे इंग्रज मुत्सद्यांनीं कंपनी सरकारचा कारभार करतां करतां कोट्यवधि रुपयांची दौलत मिळविली ती या दरबार खर्चाच्या जोरावरच होय ! देशी मुत्सद्दी व इंग्रज मुत्सद्दी यांच्या दरबार खर्चांत तात्विक दृष्ट्या मात्र मोठाच फरक होता. देशी मुत्सद्दी द्रव्य घेत तें सरकारच्या परवानगीनें घेत आणि पुष्कळ वेळां त्या द्रव्याची वसुली व जमाखर्च सरकारमार्फतच होत असे. इंग्रज मुत्सद्दी द्रव्य घेत तें सरकारच्या मंजुरीशिवाय गुप्तपणें घेत. त्यामुळें त्यांच्या त्या कृत्याला लांच घेण्याचें स्वरूप प्राप्त होत असे.

असो. याप्रमाणें नानांच्या उत्पन्नाच्या बाबी मोठ्या होत्या, तरी त्या मानानें त्यांजवळ शिल्लक फारशी रहात नसे. कारण त्यांचा खर्चही तसाच अवाढव्य प्रमाणावर होता. स्वार, गारदी, शागीर्द पेशा, दासदासी अशा मोठ्या इतमामानें ते रहात असत. त्यांचा दानधर्मही फार मोठा होता. एखादा याचक त्यांच्या दाराशीं येऊन विन्मुख परत गेला असें कधींही होत नसे. पेशवे श्रावण मासच्या दक्षिणेचा समारंभ करून दोन तीन लक्ष रुपये खर्च करीत, तर त्याच वेळीं नानाही आपल्या वाड्यांत शिष्टांची संभावना करण्यांत दहा वीस हजार रुपये खर्च करीत असत. पेशव्यांच्या वाड्यांत जें जें धर्मकृत्य होत असे, तें तें सर्व नानांच्या वाड्यांतही लहानशा प्रमाणावर केलें जात असे. नानांच्या धर्मकृत्याबद्दल आम्ही पुढें स्वतंत्रपणें विचार करणार आहों. इतमामाची वागणूक, पागा, कोठी वगैरे कारखाने, धर्मादाय, आप्तइष्टजनांच्या नेमणुका वगैरे सर्व खर्च भागूनही नानांजवळ सवाई रावसाहेब यांच्या मरणाच्या वेळीं तीन चार कोट रुपये शिल्लक राहिले होते. पुढें बाजीरावींच्या सुरवातीनंतर सर्वत्र अंदाधुंदी माजून राहिली, ती मोडून राज्यरक्षण व्हावें या हेतूनें नानांनीं जीं जीं राजकारणें केलीं तीं तीं सर्व बाजी-दौलत-सर्जेराव

१ असा उल्लेख नाना फडनवीसांच्या पत्रांत दोनदा आलेला आहे. या संबंधें डफसाहेब कांहींसुद्धां लिहीत नाहींत. कदाचित् ही गोष्ट त्यांस माहित नसण्याचाही संभव आहे.

या त्रिकूटाच्या दुष्टपणानें त्यांच्याच अंगावर उलटलीं, आणि त्यांचें सर्व द्रव्य मात्र फुकटच्या फुकट मधल्यामध्येंच नष्ट झालें ! कोट्यवधींची दौलत संभाळणारे व कोट्यवधींची शिल्लक बाळगणारे नाना फडनवीस अखेर दुष्टांच्या पाशांत सांपडून कफल्लक स्थितींतच मरण पावले !

५ धर्मकृत्यें— नानांनीं खासगी उपयोगाकरितां व परोपकारार्थ ज्या इमारती वगैरे बांधिल्या, त्यांपैकीं आम्हांस माहीत आहेत त्यांचें आम्ही येथें थोडक्यांत वर्णन देतों. त्यांनीं मौजे नऱ्हे-आंबेगांव येथून पक्का चुनेगची पाण्याचा नळ बांधून आणिला, त्याचें पाणी पुण्यांत सदाशिवपेठेच्या व पुष्करणीच्या हौदास मिळत असून त्यापासून शहरच्या लोकांस फार उपयोग होत असे. बेलबागेंतील विष्णुमंदिर बांधण्याची सुरवात त्यांनीं शके १६८७ मध्यें करून चार वर्षांत तें काम संपविलें. देवाच्या उत्पन्नासाठीं त्यांनीं पेशव्यांकडून चार गांव मिळविले व खासगत जमिनींपैकीं कांहीं देवाकडे दिल्या आहेत. सर्वांचें उत्पन्न सालीना पांच हजार रुपये येतें. त्याची व्यवस्था कशी करावयाची, व कोणत्या वेळीं किती खर्च करावयाचा, याबद्दल त्यांनीं तपशीलवार नियम लिहून ठेविले आहेत; त्या प्रमाणें अद्यापि व्यवस्था होते. त्यांनीं शनवारच्या वाड्याजवळ एक विस्तीर्ण व सुशोभित वाडा बांधला होता. आतां तो वाडा पाडून त्या ठिकाणीं इतर इमारती बांधण्यांत आल्या आहेत, तरी त्या जाग्यास अजून नानांचा वाडा असेंच नांव चालत आहे. काळेवावरांत त्यांनीं एक बाग केलेला आहे त्याचा विस्तार अजमासें तीस बिघे आहे. त्या सभोंवतीं विटबंदी कुसूं, व आंत रहाण्याकरितां एक चौसोपी बंगला व नोकर लोकांस रहाण्याकरितां घरें वगैरे इमारती केलेल्या आहेत. शके १७११ सालीं त्यांनीं गणेश पेठ वसविली व तींत एक धर्मशाळा व अहल्ये लोकांस बसण्याकरितां चावडी अशा दोन इमारती बांधविल्या. याशिवाय बेलबागेच्या आसपास लहान मोठे दहा वाडे, व सदाशिवपेठेच्या हौदाजवळचा हल्लीं कुंजर यांच्या ताब्यांत असलेला वाडा, आणि ज्यास सांप्रत रहातेकराची पागा म्हणतात ती व दुसऱ्या कांहीं इमारती त्यांनीं बांधविल्या होत्या. त्यांचें मूळ गांव वेळास येथें काळभैरवाचें देवालय त्यांनींच

बांधविलें आहे. नानांनीं खोंपवलीस पाण्याचा तलाव पक्का चिरेबंदी एक व शंकराचें देवालय व लोकांस उतरण्याकरितां एक धर्मशाळा हीं बांधविलीं. कोंकणांतून घाटावर येण्याचा रस्ता खोंपवलीवरून जातो व त्यावेळी त्या रस्त्यावर मोठी रहदारी असे. प्रवासी लोकांच्या उपयोगासाठीं नानांनीं तेथें एक अन्नसत्र ठेविलें होतें. मौजे आवळस पेटा पौड येथें एक तलाव व एक लहानसा नळ, तलावाच्या कांठीं शंकराचें देवालय हीं त्यांनींच बांधविलीं आहेत. भीमाशंकराचें देवालय बांधण्याची त्यांनीं सुरवात केली होती, परंतु तें काम त्यांच्या हयातींत संपलें नाहीं. पुढें त्यांचें कुटुंब श्रीमती जिऊबाई हिनें साठ हजार रुपये खर्चून तें देऊळ पुरें बांधविलें. कायगांव टोकें येथें एक घाट व एक छानदार चिरेबंदी वाडा, कोपरगांव तालुक्यांत धारी येथें गोदावरीस एक घाट व एक लहानसा वाडा, वेरूळ येथील तटबंदीचा एक भक्कम वाडा, हीं सर्व त्यांचींच कृत्यें आहेत. वांईजवळ मेणवली हा गांव मंत्री यांजकडून नानांस इनाम मिळाला होता. तेथें त्यांनीं कृष्णेच्या तीरास घाट, अमृतेश्वर व लक्ष्मी वासुदेव अशीं दोन देवालयें व राहण्याकरितां एक मोठा वाडा व त्यासभोंवतीं किल्ल्यासारखी तटबंदी, आणि दरवाजाच्या आसपास ब्राह्मणांस राहण्याकरितां घरें वगैरे इमारती तयार केल्या. श्रीक्षेत्र काशी येथें दुर्गाघाटीं त्यांनीं एक मोठा दक्षिणी तऱ्हेचा वाडा बांधिला आहे. तेथें कर्मनाशा नदीच्या पाण्याचा यात्रेकरूंस स्पर्श होऊं नये म्हणून त्या नदीवर एक पूल व पंचक्रोशीच्या वाटेवर आणखी एके ठिकाणीं पूल अशी लोकोपयोगी कामें त्यांनीं करविलीं आहेत. यांखेरीज त्यांचे जेथें जेथें इनाम व जहागीर गांव होते तेथें तेथें वाडे, देवालयें, धर्मशाळा, नळ, तलाव, विहिरी बांधविल्या असून इतर ठिकाणींही मार्गस्थांच्या सोयीसाठीं अन्नसत्रें, तलाव, छायेसाठीं मार्गाच्या दोहीं बाजूंस झाडें इत्यादि परोपकारार्थ शेंकडों कृत्यें त्यांनीं केलीं आहेत. या सर्व कामांस नानांना एक कोट रुपये तरी लागले असावे असा अंदाज आहे.

---

असें सांगतात कीं, जिऊबाईजवळ नानांच्या वेळचा एक पुष्कराजाचा खडा होता. तो साठ हजार रुपयांस विकून त्या द्रव्यानें तिनें हें काम करविलें.

६ कुटुंबसौख्य–गृहसुखाचा वांटा नानांच्या कपाळीं फारच थोडा होता. त्यांनीं एकंदर नऊ लग्नें केलीं त्यांपैकीं सात बायका त्यांच्या ह्यातींत मरण पावल्या, व बाकीच्या दोन अगदीं लहान वयाच्या राहिल्या होत्या त्यांपैकीं एक नानांच्या मरणानंतर पंधरावे दिवशीं वारली. पहिल्या पांच बायका गेल्यावर त्यांचें वय चाळीशीच्या पुढें गेलें असावें, तरी संततीच्या आशेनें त्यांनीं आणखी चार लग्नें केलीं. आपणांस कांहीं अनिष्ट ग्रह असल्यामुळेंच अशा या एका मागून एक बायका मरतात, अशी त्यांची समजूत होती. त्यावेळीं श्रीमान् लोकांच्या बायकांच्या मरणाचें प्रमाण, आणि तेंही तारुण्यावस्थेस प्रारंभ होण्याच्या सुमारास, हल्लींपेक्षां फारच अधिक होतें. याचें कारण काय असेल तें असो! पहा, खुद्द पेशव्यांच्या घरांत रघुनाथराव दादा, सदाशिवराव भाऊ, माधवराव रावसाहेब, सवाई रावसाहेब, दुसरे बाजीराव, दुसरे चिमाजी आपा यांच्या पहिल्या बायका पंधरापासून पंचवीस वर्षांच्या वयाच्या आंतच मरण पावल्या. त्यांत शेवटच्या पेशव्यांच्या तर सात बायका त्यांच्या डोळ्यादेखत मेल्या !

नाना फडनवीस यांच्या स्त्रियांचीं नांवें मेजर म्याकडोनल्ड यानें आपल्या पुस्तकांत दिलीं आहेत, तीं आम्ही येथें शुद्ध करून उतरून घेतों.

१ पहिल्या बायकोचें नांव यशोदाबाई. ही पुण्यांतील सदाशिव रघुनाथ गद्रे यांची मुलगी होती.

२ दुसरी बायको लक्ष्मीबाई. घारप म्हणून सुवर्णदुर्ग किल्ल्यामध्यें सरकारी कामावर होते त्यांची कन्या. तीस कांहीं मूल झालें नाहीं.

३ तिसरी स्त्री अन्नपूर्णाबाई. गाडगीळ म्हणून संपत्तिवान गृहस्थ वांईचे राहणार त्यांची मुलगी. हिजवर नानांचें अतिशय प्रेम होतें. हिला एक कन्या व पुत्र अशीं दोन अपत्यें झालीं होतीं तींही बाल्यावस्थेंतच मृत्यु पावलीं.

४ चौथी स्त्री राधाबाई. ही भिडार (?) म्हणून पुण्यांतील एका गृहस्थाची मुलगी. तीस अपत्य झालें नाहीं.

५ पांचवी स्त्री आनंदीबाई. वैद्य नांवाच्या एका कारकुनाची मुलगी. तिला कांहीं अपत्य झालें नाहीं.

६ सहावी स्त्री यशोदाबाई. पेंडसे नांवाच्या कारकुनाची कन्या. हीस एक मुलगी झाली होती, ती लहानपणींच मृत्यु पावली.

७ सातवी स्त्री अन्नपूर्णाबाई परांजपे म्हणून विजयदुर्ग येथील कारकून यांची मुलगी होती. तिजला कांहीं अपत्य झालें नाहीं.

८ आठवी स्त्री बगाबाई. सुतार म्हणून रत्नागिरीस कारकून होते त्यांची कन्या. ती नाना गेल्यानंतर पंधरावे दिवशीं चौदा वर्षें वयाची असतां मृत्यु पावली. तिला मूल झालें नव्हतें.

९ नववी स्त्री जिऊबाई गोपाळ भट वैशंपायन म्हणून मुरुड तालुका सुवर्णदुर्ग येथील राहणारे यांची मुलगी. स्वरूपानें फारच सुंदर. तीस नाना मृत्यु पावले तेव्हां यौवनदशाही प्राप्त झाली नव्हती.

नाना फडनवीसांस एकंदर तीन मुलें झालीं. त्यांपैकीं दोन मुली व एक मुलगा. हीं सारीं बालदशेंतच मरण पावलीं. नानांस ज्या दोन मुली झाल्या त्यांपैकीं एकीचें सवाई रावसाहेब पेशवे यांशीं लग्न करून द्यावयाचा त्यांचा फार हेतु होता, असें त्यावेळच्या एका मुसलमान गृहस्थाच्या लेखावरून दिसून येतें.

७ राज्यकारभार—बारभाईच्या कारस्थानाच्या सुरवातीपासून म्हणजे सन १७७४ पासून पुढें जवळ जवळ सव्वीस वर्षें नानांनीं राज्यकारभार केला. त्यांपैकीं शेवटचीं पांच वर्षें बेबंदशाहीचीं या सव्वीस वर्षांतून वजा केलीं पाहिजेत. कारण त्या मुदतींतील त्यांचें राजकारणांतील अस्तित्व नाममात्रच असून सर्व घडामोडी बेताल आणि उपटसुंभ लोकांच्या तंत्रानेंच चालल्या होत्या. बाकीच्या एकवीस वर्षांपैकीं पहिलीं आठ वर्षें बहुत धामधुमीचीं जाऊन त्या अवधींत राज्याचें अपरिमित नुकसान झालें, आणि तें नुकसान भरून काढण्यांतच नानांना पुढें तेरा चौदा वर्षेंपर्यंत आपलें शक्तिसर्वस्व खर्च करावें लागलें. राज्यांत खरी सुधारणा करण्यास राजकर्त्यांस शांतता आणि मनस्वास्थ्य प्राप्त व्हावें लागतें. परंतु या गोष्टींची

1 Selections from State papers Bombay Page 729.

अनुकूलता नानांस कधींच मिळाली नाहीं. तथापि त्यांतल्या त्यांत सवड काढून त्यांनीं जमाबंदीची नवीन व्यवस्था लाविली. नवीन वसाहती करविल्या पडजमिनी लागवडीस आणिल्या, पाटबंधाऱ्यांचीं कामें करविलीं, आणि रयतेच्या सुखसोईसाठीं अनेक प्रकारच्या तजविजी केल्या. एकंदरींत नानांच्या कारकीर्दींत रयतेची भरभराट होत जाऊन वित्त, जीवित आणि अब्रू यांविषयीं तिला निश्चिंतपणा वाटूं लागला. नवीन वसाहती, साऱ्याची सूट किंवा तहकुबी वगैरेबद्दलचे नानांचे शेकडों हुकूम हल्लीं छापून प्रसिद्ध झाले आहेत. प्रत्येक हुकमाच्या शेवटीं 'रयतेवर एकंदर जलेली न करणें' असा नानांचा खासदस्तुरचा शेरा दृष्टीस पडतो. या शेऱ्याबरोबरच 'सरकारनुकसान न करितां काम विल्हेस लावणें' असाही त्यांचा इशारा सरकारी अधिकाऱ्यांस दिलेला आढळतो! 'रयतेवर जलेली न करणें' आणि होतां होईतों 'सरकारनुकसान न करितां काम विल्हेस लावणें' या दोन महामंत्रांतच त्यांच्या कारभाराचें सारसर्वस्व सांठविलेलें आहे!

नानांच्या राज्यकारभारांत दक्षता व टापटीप हे दोन गुण प्रामुख्यानें आढळतात. गोष्ट कितीही साधी असो, तिच्यामध्यें अंतर्भूत होणाऱ्या प्रत्येक बाबतीचें अत्यंत सूक्ष्म तपशीलवार टिप्पण नाना आगाऊच करीत असत. सवाई रावसाहेब यांची मुंज व लग्नें यांचीं टिप्पणें छापलेलीं उपलब्ध आहेत. त्या टिप्पणांतून कोणाकडे कोणकोणतीं कामें असावीं यांची वांटणी नमूद केलेली असून, दरबारी समारंभापासून तों थेट रोशनाई, तैवजखर्च म्हणजे पानसुपारी, अत्तर-गुलाब वगैरे, भोजनाच्या वेळा व त्यांचा चटण्या, कोशिंबिरी, पानपत्रावळीसुद्धां सूक्ष्म तपशील वगैरे बाबतींचा सर्व नकाशा आगाऊच ठरविलेला आढळतो. नानांच्या या गुणामुळें त्यांच्या कारभारांत बेतरतुदीची अशी कोणतीही गोष्ट शिल्लक रहात नसे. नानांच्या कारकीर्दींतलें पेशव्यांचें दप्तर म्हणजे पेशवाई राज्यांतल्या सर्व घडामोडींचा आणि बखेड्यांचा अत्यंत विश्वसनीय असा प्रचंड इतिहासच होता! पुढें तें दप्तर इंग्रजांच्या हातीं पडलें तेव्हां मराठी राज्यांतील प्रत्येक गोष्टीचा पूर्वापर संबंध कळण्यास तें दप्तर त्यांच्या अतिशय

उपयोगी पडलें. नानासारख्या स्वराज्यभक्तानें राज्याच्या कायमीकरितां केलेली ही तरतूद पुढें आयतीच शत्रूच्या उपयोगी पडावी हा योगायोग किती विचित्र आहे!

सरकारी कामाला नाना प्राणापलीकडे जपत असत. आपल्या कारकीर्दीच्या शेवटीं त्यांनीं राज्यरक्षणाकरितां खासगी स्वार्थाच्या सर्व नाशाचा अंगिकार कसा केला हें पूर्वीं सांगितलेंच आहे. इंग्रजांशीं वर्षानुवर्ष लढाई चालवून त्यानीं साष्टीशिवाय पेशव्यांचा सर्व मुलूख शत्रूपासून सोडवून घेतला, परंतु त्यांचा मूळ गांव वेळास हा इंग्रजांच्या ताब्यांत गेला होता तो त्यांनीं कसा सोडवून घेतला नाहीं ! असा साहजिक प्रश्न उत्पन्न होतो. त्यास नानांचें उत्तर—" मौजे वेळास हा गांव आमचा वतनी आहे. तो इंग्रजांकडे कोंकणांत बाणकोटाखालीं आहे. तो सोडून घ्यावा असें मनांत होतें, परंतु साष्टी सरकारची सुटली नसतां आपला गांव सोडवून घ्यावा हें ठीक नाहीं. "

हरीपंत फडके, आबाजी कृष्ण शेलूकर, दादा गद्रे, बजाबा देशपांडे शिरवळकर, घोंडोपंत नित्सुरे, राघो विश्वनाथ गोडबोले, नारोपंत चक्रदेव, गोविंदराव काळे, गोविंदराव पिंगळे, देवराव हिंगणे, त्र्यंबकपंत परचुरे वगैरे बरीच मंडळी नानांच्या अगदीं विश्वासांतली होती. या मंडळींपैकीं काळे, पिंगळे व हिंगणे हे तीन गृहस्थ परकीय राजेरजवाड्यांच्या दरबारीं पेशव्यांच्या तर्फेनें वकील असत. दादा गद्रे हे मोठे सावकार असून नामांकित मुत्सद्दीही होते. हरीपंत फडके, आबा शेलूकर, घोंडोपंत नित्सुरे, नारोपंत चक्रदेव हे चार गृहस्थ नामांकित मुत्सद्दी असून शिवाय लढवय्ये सरदारही होते ! नानांचीं हिंदुस्थानभर पसरलेलीं राजकारणें अगदीं गुप्तपणें आणि बिनबोभाट पार पाडलीं जात, याचें बरेचसें श्रेय या त्यांच्या इमानी अनुयायी मंडळालाच दिलें पाहिजे. मराठी राज्याच्या उत्कर्षास या सर्व मंडळींनीं मोठाच हातभार लाविला होता. नानांच्या पडत्या काळांत मात्र या मंडळींचीं हाडें सर्जेरावी वरवंट्याखालीं चांगलींच न[illegible] पाडलीं गेलीं !

देशी मुत्सद्यांमध्यें बातमी ठेवण्याचे कामीं नानांची कमाल होती. राज्य-

कारस्थानाचा जेथें जेथें सुगावा लागेल तेथें तेथें त्यांचे गुप्त बातमीदार असावयाचेच. यासंबंधीं पुष्कळ गोष्टी ऐकिवांत आहेत व कांहीं बखरींतही लिहिल्या आहेत. त्यांत जरी अतिशयोक्ति असली तरी एवढी गोष्ट घेण्यास हरकत नाहीं कीं, त्यांच्या बातमीचा पल्ला फार दूरवर असून त्यांस बातमी फार जलद कळत असे. इंग्रज व फ्रेंच यांशीं मराठी राज्याचा जसा जसा संबंध अधिकाधिक येऊं लागला, तशी तशी नानांस कलकत्ता, मद्रास, मुंबई, पांडिचेरी, माही इत्यादि ठिकाणांहून बारीक बारीक बातमी देखील कळूं लागली. हिंदुस्थानाबाहेर देखील फ्रेंचांच्या व इंग्रजांच्या काय काय चळवळी चालल्या आहेत इकडे नानांचें लक्ष असे. 'फ्रेंचांचा सरदार बुसी हा फ्रान्स देशाहून फौज घेऊन मारिशस बेटांत आला.' 'युरोपांत फ्रेंच, दच, पोर्तुगीज हे इंग्रजांवर उठले आहेत.' असलीं देखील वर्तमानें त्यांस कळत. हिंदुस्थानच्या प्रत्येक भागांत त्यांचे हेर तैलंग, ब्राम्हण, गोसावी व दुसरे पुष्कळ असत.

तत्कालीन राज्यस्थितीची वाचकांस माहिती व्हावी या हेतूनें या चरित्राच्या पहिल्या व दुसऱ्या आवृत्तींत या सदराखालीं जो मजकूर दिला आहे त्यांतच नवीन माहितीची थोडीशी भर घालून तो मजकूर आम्ही पुढें जशाचा तसाच देतों–

परराज्यांतील वकील पुण्यास होते त्यांशीं बोलणें चालणें करण्याकरितां व त्यांच्या कांहीं तक्रारी असतील तर त्या ऐकून घेण्याकरितां नानांनीं निरनिराळे मुत्सद्दी नेमले होते. त्यास अलीकडच्या वहिवाटीप्रमाणें 'परराज्यसंबंधी प्रधान' म्हटल्यास चालेल. जसें, इंग्रजांच्या वकिलास

१ काव्येतिहास संग्रह पत्रें यादी नं. २६५, ३०९ हीं पत्रें इंग्रजांशीं मराठ्यांची लढाई चालली होती त्यावेळीं लिहिलेलीं आहेत. या सुमारास इंग्लंड व अमेरिकेंतील स्वतंत्र संस्थानें यांमध्यें लढाई चालली होती, व फ्रेंच, दच, स्पानिश यांशीं इंग्रज एकाकी लढत होते. स्पेनच्या ताब्यांत पोर्तुगाल देश होता, अर्थात पोर्तुगीझही इंग्रजांच्या विरुद्ध होतेच. हें सर्व लक्षांत आणिल्यास नानांची बातमी ही खरी होती असें दिसून येईल.

कांहीं बोलणें झाल्यास त्यांनीं माधवराव जाधवराव व बहिरोपंत मेहेंदळे यांच्यामार्फत बोलावें, हैदराच्या वकिलांनीं रास्त्यांच्या मार्फत बोलावें वगैरे. परराजांच्या दरबारीं व मोठमोठ्या सरदारांकडे नानांनीं पेशव्यांच्या तर्फे वकील चांगले चांगले मुत्सद्दी पाहून नेमिले होते. हैदराच्या दरबारीं कृष्णराव बळवंत, निजामाच्या दरबारीं गोविंदराव काळे, भोसल्याकडे बाबूराव वैद्य, शिंद्याकडे नारो शिवदेव व होळकरांकडे देवराव हिंगणे हे गृहस्थ होते. हीं सर्व हुषार व पाणीदार माणसें होतीं.

नानांच्या कचेरींत तीन चारशे कारकून असत. या कचेरीस 'फड' असें म्हणत, व तेथें सर्व राज्याच्या जमाबंदीचे, लष्करचे, व जहागिरीकडले हिशेब तपासले जात. हल्लीं पुण्यास पेशवाईचें दप्तर आहे, त्यांत नानांच्या अमदानींतले कागदपत्र जे इतक्या उत्कृष्ट व व्यवस्थेशीर स्थितींत आहेत, तें नानांच्याच बुद्धिमत्तेचें फळ होय.

राज्याची अंतर्व्यवस्था करण्यास नानांस जितकी फुरसत मिळावी तितकी मिळाली नाहीं. तथापि त्यांनीं प्रजेच्या सुखाकरितां कांहीं गोष्टी नवीन केल्या व जुन्या संस्था होत्या त्याच पुढें चालू ठेवून त्यांपासून प्रजेस पीडा न व्हावी याकरितां थोडेबहुत फेरफार केले. नाना कारभार करीत असतां अंतर्व्यवस्था कशी चालत असे याविषयीं येथें थोडासा उल्लेख करूं.

पेशवाईमध्यें अत्यंत महत्वाची संस्था म्हटली म्हणजे 'पंचाईत' ही होय. गांवांत देवघेवीसंबंधें कोणी पाटलाकडे फिर्याद नेल्यास तो प्रथम वादी प्रतिवादींची समजूत स्नेही या नात्यानें करून पाही, त्यांचें न जमल्यास मग तो पंचाईत भरून तिच्या मार्फत तंट्याचा निकाल लावी. पंच नेमण्याचें काम जरी पाटलाकडे असे, तरी अमुक पंच आम्हांस नको, असें वादी किंवा प्रतिवादी यांनीं म्हटल्यास तो पंच नेमला जात नसे. पाटलाकडे किंवा गांवच्या पंचांकडे फिर्याद न न्यावी असा वादीचा हेतु असल्यास तो मामलेदारांकडे जाई. मामलेदारही प्रथम आपसांत तंटा मिट

1 Narrative of the Bombay Inam Commission Page 58.

२ यापुढील मजकूर प्रायः Bombay Gazetteer Vol. XVIII Poona. या पुस्तकाच्या दुसऱ्या व तिसऱ्या भागांच्या आधारानें लिहिला आहे.

विण्याचा यत्न करी. तो यत्न सफळ न झाल्यास तोही 'पंचाईत' भरवूनच निकाल करवी. तेथेंही वादीचें समाधान न होईल तर त्यानें सरसुभेदारांकडे व त्यापुढें रामशास्त्री किंवा खुद्द नाना फडनवीस यांकडे फिर्याद न्यावी. तो कोठेंही गेला तरी निकाल पंचामार्फतच व्हावयाचा. पाटील किंवा मामलेदार यांनीं नेमलेल्या पंचांनीं अन्याय केला आहे किंवा कांहीं लांचलुचपतीचा प्रकार झाला आहे अशी पक्की खात्री झाल्याशिवाय वरिष्ठ अधिकारी असल्या फिर्यादी मनास आणीत नसत.

पंचांची संख्या पांचाहून कमी नसे, व कधीं फार महत्वाचा तंटा असेल तर पन्नासपर्यंत देखील पंच नेमले जात. पंचासमोर प्रतिवादी हजर न होईल तर त्याजवर सक्ती करण्यांत येई. तो हजर झाल्यावर वादीची फिर्याद व तिजवर प्रतिवादीचें उत्तर हें लिहून घेतलें जाई. नंतर खुलाशाकरितां दोघांस प्रश्न विचारले जात व दोहों तर्फांच्या साक्षी होत. साक्षीदारांची तपासणी फार काळजीपूर्वक होई व त्यांस लिहितां येत असल्यास लेखी साक्षी घेण्याची वहिवाट होती. साक्षी पुरावा झाल्यावर पंचांमध्यें 'भवति न भवति' होऊन शेवटीं सर्व खटल्याचा 'सारांश' काढिला जाई. यांत वादीची फिर्याद, प्रतिवादीचें उत्तर, तोंडजबान्यांचें किंवा लेखी साक्षींचें तात्पर्य, पुराव्यासाठीं हजर केलेले कागदपत्र, इतक्यांची नीट छाननी करून शेवटीं पंचाचा निकाल दिलेला असे. या सारांशपत्रकाला महजर असें :नांव असे. धर्मशास्त्रसंबंधीं कांहीं भानगड उपस्थित झाल्यास शास्त्री, पंडित, यांची मदत घेण्यांत येई. पंच जसा निकाल करतील त्याप्रमाणें वादी प्रतिवादीस वागावयास लावण्याचें काम सरकारी अधिकाऱ्यांकडे असे. जातीसंबंधाचे तंटे त्या त्या जातींच्या मुख्यांकडे निकालासाठीं जात व त्या त्या जातींच्या पंचांमार्फत निकाल होत.

पाटील व मामलेदार वगैरे यांशिवाय तंटे तोडण्यासाठीं कित्येक शहरांत सरकारांतून न्यायाधीश नेमलेले असत. सर्व न्यायाधीशांवर मुख्य रामशास्त्री हे नेहमीं पुण्यांत रहात. त्यांपैकीं दोघे असामी तर विद्वत्तेनें, निस्पृहतेनें व चातुर्यानें रामशास्त्र्यांच्या बरोबरीचे होते. खटल्यांची तपासणी

करण्याविषयीं पुष्कळ वेळां पंचांखेरीज रामशास्त्री व त्यांच्या हाताखालचे दुसरे शास्त्री सरकारचे तर्फेनें बसत; त्यावेळीं पंचांचें काम हल्लींवें सरकार ज्यूरर नेमतें त्याप्रमाणें असे.

गुन्ह्याच्या चौकशीचें व गुन्हेगारांस शिक्षा करण्याचें काम पाटील, मामलेदार वगैरे यांजकडे असे. पण अमुक गुन्ह्यास अमुकच शिक्षा द्यावी असा कायदा नसल्यामुळें, अम्मलदारांस गुन्हा कमी किंवा जास्त महत्वाचा वाटेल त्याप्रमाणें तो शिक्षा देई. त्या त्या ठिकाणचा रिवाज हाच काय तो सरकारी अधिकाऱ्यांस आधार! देहान्त शिक्षा देणें झाल्यास मात्र नाना फडनवीसांची व पुढें पुढें पेशव्यांची परवानगी लागे. पण भिल्ल, मांग, रामोशी वगैरे जातींच्या गुन्हेगारांसंबंधें या परवानगीचीही जरूर नसे. मामलेदार त्या लोकांस नुसत्या संशयावरून धरून पाहिजे ती क्रूर शिक्षा देत असत. गुन्ह्याच्या चौकशीसाठीं केव्हां केव्हां पंच नेमले जात. परंतु हा प्रकार सार्वत्रिक नव्हता. सरकारविरुद्ध ज्यानें फंदफितूर केला असेल त्यास मात्र देहांत शिक्षा देण्यांत येई. ज्यांनीं खून केला आहे अशांपैकीं पुष्कळ असामी सरकारास दंड देऊन, व ज्याचा खून केलेला असेल त्याचे कुटुंबांतील माणसांस नुकसानीदाखल द्रव्य देऊन मोकळे होत. गुन्हेगारास शिक्षा देण्याचे कामीं वर सांगितल्याप्रमाणें ढिलाई होती म्हणून त्यावेळीं हल्लींपेक्षां अधिक गुन्हे घडत होते असें नाहीं. गुन्यांची संख्या कमी असण्याचीं कारणें मौंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन यानें दाखविलीं आहेत त्यांतील मुख्य हीं:—

देशांत पिकाऊ जमिनीच्या मानानें लोकसंख्या थोडी होती. लोक सुदृढ, शूर व नेहमीं हत्यारें बाळगणारे होते. कनिष्ठ प्रतीचे लोक खाऊन पिऊन सुखी होते, व वरिष्ठ प्रतीचे लोक तर भरभराटींत होते. स्वदेशामध्यें व मराठ्यांनीं जे दूरदूरचे देश जिंकले होते त्यांमध्यें नोकऱ्या हव्या तितक्या मिळत. मामलेदाराच्या हातांत सर्व अधिकार होता व त्यांच्या कामांत सरकार होतां होईतों हात घालीत नसे. समाजाच्या शांततेस धोका पोचण्याच्या संभव दिसला कीं, असला धोका आणणाऱ्या लोकांस मामलेदार तत्काळ पकडून लागलीच चौकशी करून तेथच्या तेथें शिक्षा

ठोठावी. या रीतीनें केव्हां केव्हां निरपराधी मनुष्यास इजा होत असेल, पण अपराधी निसटून जाण्याची भीति नकोच! मामलेदार हे इभ्रतीचे गृहस्थ असत व आसपास जहागीरदार, इनामदार वगैरे लोकांचें राहणें असे. या बड्या लोकांशीं खालच्या प्रतीच्या लोकांचें दळणवळण असे, आणि पेशव्यांच्या दरबारच्या लोकांमध्यें हे जहागीरदार वगैरे लोक मिसळत. एकूण या लोकसमाजांत एखाद्या गरीब लंगोट्यापासून तों तहत पेशव्यांपर्यंत सांखळी असल्यामुळें अन्यायाची दाद लागणें सोपें होतें.

गांवामध्यें बंदोबस्त ठेवण्याचें काम पाटलाकडे असे व या कामीं त्यांस कुलकर्णी, चौगुला व गांवचा वतनदार म्हार यांची मदत असे. गांवावर धाड आल्यास सर्व गांवकरी मिळून आपलें रक्षण करीत. पण असे प्रसंग क्वचित् येत. कारण कीं, मामलेदारांजवळ शिबंदी व स्वार बरेच असत, ते दरोडेखोरांचा पाठलाग करून त्यांस पकडीत. पुणें शहरची वस्ती त्यावेळीं फार मोठी होती, तेथें नाना देशचे हजारों इत्यारबंद लोक रहात असतां लोकांस आपल्या मालमत्तेच्या व जीविताच्या रक्षणाविषयीं काळजी बिलकूल नसे. इतका त्या शहरचा बंदोबस्त उत्तम होता.

माधवराव रावसाहेब मरण पावले तेव्हां पेशवाईचें उत्पन्न दहा कोटींचें होतें असें म्हणतात, पण निव्वळ उत्पन्न जहागिरीसुद्धां सुमारें साडेसात कोटींचें होतें. त्यांत खुद्द पेशव्यांच्या हाताखालीं अडीच कोटींचा मुलूख होता. नानांच्या कारकीर्दींत राज्याचा वसूल यापेक्षां कमी झाला असेल असें वाटत नाहीं.

जमाबंदीच्या सोईसाठीं मुलखाचे विभाग हल्लींप्रमाणेंच केलेले होते. नावें मात्र निराळीं. पुष्कळ गांव मिळून एक तर्फ. त्यावर अंमलदार असे त्यास शेखदार असें म्हणत. पुष्कळ तर्फ मिळून एक महाल. महालावरच्या अधिकाऱ्यास मामलेदार म्हणत. पुष्कळ महाल मिळून एक सुभा. सुभ्यावरच्या अधिकाऱ्यास सुभेदार म्हणत. गुजराथ, खानदेश, कोंकण व कर्नाटक असे चार, व नीरेपासून गोदावरीपर्यंत एक असे पेशवाईंत पांच सुभे होते. शिवाय गढेमंडळ व बुंदेलखंड वगैरे हिंदुस्थानांत व मध्यप्रांतांत सुभे व महाल होते ते निराळे.

जमाबंदीच्या कामाचा रगडा काय तो मामलेदारांवरच विशेष पडे. त्यांस त्या त्या महालचे देशमुख, देशपांडे व गांवोगांवचे पाटील कुलकर्णी मदत करीत. मामलेदारांचा अंमल गांवावरच चाले असें नाहीं, तर महालांत किल्ले व ठाणीं असत तींही त्यांच्याच ताब्यांत असत. नानांनीं सुभेदारांच्या नेमणुका रद्द करून महालोंमहालीं आपल्या खात्रीचे वर्षास नवीन मामलेदार नेमून जमाबंदीची व्यवस्था ठेवली होती.

पूर्वीं मलिकंबरानें मुलखाची मोजणी करून जमिनीच्या प्रती लावून धाऱ्याचे नियम बसविले होते. अलीकडे सदाशिवराव भाऊसाहेब यांनींही नवीन मोजणी करून जमिनीच्या प्रती लाविल्या व धाऱ्याचे नियम नवीन केले. भाऊसाहेबांची जमाबंदी पुण्याच्या सुभ्यास मात्र सुरू होती. तिजप्रमाणें सर्व राज्याची प्रतबंदी करण्याचा नानांचा विचार होता. त्यांनीं शके १७०२ सालीं कोंकणांत मोजणीचें काम सुरू केलें होतें तें कल्याणापर्यंत येऊन इंग्रजांच्या लढाईमुळें तहकूब राहिलें. पुढें आठ वर्षांनीं त्यांच्याच हुकमावरून परशुराम रामचंद्र परांजपे व रघुनाथ त्र्यंबक बर्वे या दोघा मामलेदारांनीं सुवर्णदुर्ग, अंजनवेल, रत्नागिरी, व विजयदुर्ग या चार महालांची मोजणी केली.

नानांच्या कारकीर्दीत जमिनीवर सारा पुढें दिल्याप्रमाणें असे. बागाईत दर बिघ्यास सहा रुपये, मळी दर बिघ्यास तीन रुपये, काळी जमीन प्रत पहिली दर बिघ्यास दोन रुपये, प्रत दुसरी दर बिघ्यास सव्वा रुपया, प्रत तिसरी दर बिघ्यास एक रुपया, प्रत चवथी दर बिघ्यास बारा आणे. ही भाऊसाहेबांची प्रतबंदी. हिला 'कमाल' असें म्हणत. मलिकंबराच्या प्रतबंदीस तनखा असें म्हणत. पेशवाईत तनखाच पुष्कळ ठिकाणीं चालू असे. तनख्याची आकारणी कमालीपेक्षां पुष्कळ कमी होती. जमिनीपासून येणाऱ्या वसुलास 'ऐन जमा' म्हणत. बाकीचा वसूल 'शिवाय जमा' या सदराखालीं येई.

---

1 Bombay Gazetteer Vol X Ratnagiri Page 217.

२ शिवाय, खेरीज या दोन शब्दांचा पूर्वीं दोन अर्थांनीं प्रयोग होत असे. पहिला प्रयोग 'वगळून, वजा करून' अशा अर्थानें होत असे, आणि तो प्रयोग अजूनही

दर वर्षास मामलेदार बदलावयाचा नानांचा नियम पूर्वी सांगितलाच आहे. हे मामलेदार सचोटीचे, हुशार व कुलीन घराण्यांतले असत. नेमणूक व्हावयाच्या वेळीं त्यांस सनद दिली जाई. त्या सनदेंत सरकाराशीं व प्रजेशीं इमानानें वागण्याबद्दल ताकीद दिलेली असे. मागच्या वर्षाच्या हिशेबावरून महालाच्या जमेच्या व खर्चाच्या बाबी दर्शविणारें एक पत्रक त्यांस सरकारांतून मिळे. या पत्रकाला 'अजमास' (Budget) असें म्हणत. या 'अजमासा' प्रमाणेंच मामलेदारानें वसूल घ्यावा आणि खर्च करावा असें ठरलेलें असे. वर्षअखेरीस मामलेदार सरकारांत हिशेब गुजरी, तेव्हां अजमासाशीं त्याचा ताळा पाहून जमा व खर्च कमजास्त झाला असल्यास त्याची चौकशी होई, व तिजवरून प्रजेची स्थिति कशी आहे याचें अनुमान निघे.

नानांनीं विशेष सुधारणा केल्या त्या ह्या. पहिली, जमिनीवर सारा अमुक मर्यादेपर्यंत बसावयाचा, असा त्यांनीं कायमचा नियम करून टाकिला. दुसरी, पूर्वीच्या कारकीर्दींत अशी वहिवाट असे कीं, गांवास पिकाऊ जमीन जितकी असेल तिजवर सारा लादून तो गांवकऱ्यांपासून वसूल करावयाचा. मग ती जमीन गांवकरी पिकवोत अगर न पिकवोत. ही चाल नानांनीं मोडून टाकून असें ठरविलें कीं, त्या जमिनींत पीक केलें असेल तेवढीबद्दल मात्र सारा घ्यावयाचा. यामुळें प्रथम प्रथम सरकारचें थोडें बहुत नुकसान झालें. पण पुढें राज्यांत जसजशी स्वस्थता होत गेली तसतसे शेतकरी आपोआप गांवची सारी जमीन पिकवूं लागले व सरकारचें उत्पन्नही पूर्वीप्रमाणें येऊं लागलें; व तें प्रजेच्या आबादानीवर अवलंबून राहूं लागलें.

---

रूढ आहेच. या शब्दांचा दुसरा अर्थ 'ज्यादा' 'extra, in addition to' असा होता परंतु तो अर्थ हल्लीं प्रचारांत नाहीं. शिवाय जमा-extra revenue. शिवाय जमेंत कमाविस, मोहतर्फा, वनचराई, चिंच आंबली, जकात, कलाली, अशा अनेक बाबींचा समावेश होत असे. पेशवाईंत दारूचें उत्पन्न अगदींच थोडें असे. लक्ष्मेश्वर तालुक्याचे जुने ताळेबंद आमच्या पहाण्यांत आहेत. त्या वेळीं तो तालुका हल्लींच्या बेळगांव जिल्ह्याएवढ्या मोठा होता. परंतु एवढ्या मोठ्या तालुक्याचें कलालीचें उत्पन्न घड दोनशें रुपयेसुद्धां नव्हतें !

सारा वसूल करण्याचे नियमही रयतेच्या सुखास व सोईस अनुलक्षूनच केलेले होते. लोकांची फारच अडचण दिसली तर त्यांजवर सक्ती करण्यांत येत नसे इतकेंच नाहीं, तर पुष्कळ वेळां सूट देण्यांत येई, व केव्हां केव्हां त्या सालचा सारा माफ करण्यांत येई. शेतकीचीं साधनें नाहींशीं झाल्यामुळें किंवा दुसऱ्या आपत्तीमुळें शेतकऱ्याचें काम नडतें असें दिसून आल्यास, सरकारांतून हलक्या व्याजानें किंवा मुळींच व्याजाशिवाय पैका देण्यांत येई व तो पुढें सोईसोईनें वसूल करून घेतला जात असे. कुळांकडे बाकी थकली तर ती वसूल करण्याकरितां सरकारनें त्यांचें घरदार विकून त्यांस भिकेस लाविलें, असें कधीं झालें नाहीं. सरकारी अधिकारी प्रजेवर जुलूम करतील तर त्याचें निराकरण नाना तत्काळ करीत असत. सारांश शेतकरी, व गरिबगुरीब यांचा मित्र नाना फडनवीसांप्रमाणें क्वचित्‌च झाला असेल. त्यांची जमाबंदीच्या कामांतील वाकबगारी, न्याय करण्याविषयीं तत्परता व दयाभूत अंतःकरण या गोष्टी ते मरण पावल्यावर पुष्कळ वर्षेंपर्यंत रयतेच्या स्मरणांतून गेल्या नाहींत.

नानांच्या कारकीर्दीत प्रजेस सुख मिळून तिच्या अंगांत तकवा होतीयास प्रमाण असें आहे कीं, शके १७१४ सालीं महाराष्ट्र देशांत मोठा भयंकर दुष्काळ पडला होता, त्यावेळीं लोकांस जागच्या जागीं राहून तें वर्ष नेटानें काढतां आलें. कोणास परागंदा होण्याचा प्रसंग आला नाहीं.

८ योग्यता—ऐतिहासिक व्यक्तींची योग्यता ठरवितांना पूर्वग्रहदूषित दृष्टि न ठेवतां तत्कालीन ऐतिहासिक परिस्थितीचें वास्तविक स्वरूप समजून घेतलें पाहिजे. शिवाय ही योग्यता ठरवितांना कार्यक्षेत्राचा विस्तृतपणा किंवा यशःप्राप्तीचा उज्वलपणा यांवर विशेषसा भर न देतां देशाभिमान व स्वार्थत्याग या दैवी गुणांची कसोटी लावूनच तिचा निर्णय केला पाहिजे. परंपरा, स्थल, काल व साधनें यांच्या भिन्नतेमुळें व्यक्तीचें कर्तृत्व बरेंचसें मर्यादित होत असतें. मनुष्याच्या कर्तृत्वाच्या या स्वाभाविक मर्यादा लक्षांत न घेतां कांहीं अतज्ञ लेखक विषम परिस्थितींतल्या दोन व्यक्तींची तुलना करून श्रेष्ठ कनिष्ठपणाचीं भलभलतींच अनुमानें काढीत असतात! एकाच रियासतींतल्या समान दर्जाच्या समकालीन

व्यक्तीशीं तुलना करून एखाद्या व्यक्तीची योग्यता ठरविणें हाच खरा राजमार्ग होय. या दृष्टीनें विचार केला असतां नानांना समकालीन असणाऱ्या सखारामबापू, महादजी शिंदे, तुकोजी होळकर, हरीपंत फडके, परशुरामभाऊ पटवर्धन या पांच व्यक्ति डोळ्यासमोर उभ्या राहतात. या सर्वांचे रागलोभाचे धागेदोरे या चरित्रांत जागोजाग उलगडून दाखविण्यांत आलेच आहेत. मराठी रियासतींतील त्या वेळचीं हीं मोठींच प्रस्थें होतीं. या पंचकांपैकीं हरीपंत फडके हे नानांशीं एकरूपच होते. जें धोरण नानांचें तेंच हरीपंतांचें, जें हरीपंतांनीं केलें तेंच नानांनीं केलें असा त्या दोघांत अभिन्नपणा होता. सारांश हरीपंतांना स्वतंत्र असें राजकीय अस्तित्वच नव्हतें. तुकोजी होळकरांना स्वतत्र राजकीय अस्तित्व मोठें होतें, परंतु नानांशीं स्पर्धा करण्याइतकें अवसान त्यांनीं कधीं दाखविलें नाहीं इतकेंच नव्हे, तर तें त्यांना कधीं दाखवितां आलेंही नाहीं. परशुरामभाऊ पटवर्धनांनीं नानांशीं स्पर्धा करण्याचें अवसान दाखविलें, परंतु त्यांनीं तें अवसान दुसऱ्याच्या म्हणजे बाळोबांच्या चिथावणीवरून आणलें होतें. राहतां राहिले सखारामबापू आणि महादजी शिंदे. बापूंनीं बाळाजी बाजीराव आणि थोरले माधवराव यांच्या कारकीर्दींत पेशवाई राज्याचा कारभार पुष्कळ दिवस केला होता. तथापि त्यांचा स्वभाव स्वार्थी, दुटप्पी, लोभी आणि परोत्कर्षासहिष्णु असल्यामुळें त्यांनीं आपल्या कारकीर्दींत बहुतेकांचें शत्रुत्वच संपादन केलें होतें, आणि त्या दृष्टीनें त्यांची योग्यता नानापेक्षां पुष्कळच कमी प्रतीची होती. महादजी शिंदे व नाना फडनवीस यांमध्यें श्रेष्ठ कनिष्ठपणाची प्रत लावणें मात्र तितकेंसें सोपें नाहीं. स्वदेशाभिमान, स्वार्थत्याग आणि मुत्सद्दीपणा या गुणांत दोघेही एकमेकांना हार जाणारे नव्हते. राज्याच्या शत्रूंचें निवारण दोघांनीं मिळून एकमतानें केलें आणि राज्यविस्ताराच्या सर्व मसलती दोघांनीं मिळून एकमतानें पार पाडल्या. धन्याशीं बेइमानी करण्याचा विचार दोघांच्याही मनाला शिवलासुद्धां नाहीं. राजकीय धोरणांतही दोघांचें सामान्यतः ऐकमत्य असे. शांततेच्या काळीं दोघेही सडकून भांडत आणि एकमेकांच्या नुकसानीला प्रवृत्त होत, परंतु शत्रूशीं गांठ घालण्याचा प्रसंग पडला तर

मात दोघेही पूर्वीचे द्वेष विसरून तत्काळ एक होत ! अशी या जोडीची विचित्र तऱ्हा होती. नाना व पाटीलबावा यांची राजकीय कामगिरी सारखीच महत्वाची होती, तथापि पाटीलबावांनीं आपल्या सरदारीचें हित साधण्याकडे वेळोवेळ फाजील लक्ष दिलें आणि बारमाईच्या कारस्थानाच्या प्रारंभीं त्यांच्या दुटप्पी वर्तनानें मराठी राज्याचें बहुत नुकसान झालें, या गोष्टी कोणासही नाकबूल करतां येण्याजोग्या नाहींत. नानांच्या तीस वर्षांच्या कारकीर्दींत असें एकही उदाहरण कोणास दाखवितां येणार नाहीं. सबब नाना व शिंदे या जोडींत श्रेष्ठपणाचा मान नानांसच देणें वाजवी आहे.

९ राजकीय प्रतिस्पर्ध्यांशीं वागणूकः—दंगे, बंड, फितूर, विश्वासघात वगैरे धामधुमी नानांच्या कारकीर्दींत अनेक झाल्या. परंतु या सर्व धामधुमींचा ग्रंथ लावतांना त्यांनीं अत्यंत व्यापक दृष्टि ठेविली होती. या सर्व धामधुमी म्हणजे तत्कालीन राजकीय पक्ष आणि उपपक्ष होत. एका दृष्टीनें हे राजकीय पक्ष आणि उपपक्ष सरकारला बंडखोर वाटत. परंतु कोणतीही सत्ता न मानणाऱ्या आणि स्वसुख हेंच आधिदैवत मानून सरसकट सर्वांचे गळे कापीत सुटणाऱ्या बंडखोरांत आणि या राजकीय बंडखोरांत महदंतर आहे ही गोष्ट नानांनीं कधींही दृष्टिआड केली नाहीं. आपल्याप्रमाणेंच हे राजकीय बंडखोरही मराठी राज्याचे सन्मान्य घटक आहेत ही गोष्ट ते कधींही विसरत नसत, त्यामुळें पहिल्या जातीच्या बंडखोरांस तत्काळ देहांतशासन मिळत असे. परंतु या राजकीय बंडखोरांस मोठासा दंड किंवा फार तर साधी कैद एवढीच शिक्षा भोगावी लागे. आपल्या राजकीय प्रतिस्पर्ध्यांस हतप्रभ आणि सामर्थ्यहीन करण्याची नाना अवश्य ती काळजी घेत, परंतु त्यांच्या मनाला किंवा शरीराला निष्कारण इजा पोंचेल असें कोणतेंही कृत्य त्यांजकडून होत नसे. आपल्या राजकीय प्रतिस्पर्ध्याला देहांत प्रायश्चित्त दिल्याचें एकही उदाहरण नानांच्या कारकीर्दींत घडलें नाहीं. या बाबतींत 'सखाराम हरी' चें उदाहरण येथें नमूद करण्यासारखें आहे.

सखाराम हरी गुप्ते व त्यांचे बंधु बाबूराव हरि हे नामांकित एकांडे शिलेदार पेशवाईंत प्रसिद्ध होते. नारायणराव पेशव्यांच्या कारकीर्दींत

प्रभूंचें वेदोक्त प्रकरण उद्भवून पेशव्यांनीं प्रमुख प्रभु लोकांकडून वेदोक्तानें धर्मकृत्यें करवणार नाहीं अशा मजकुराचें कबुलीपत्र जुलमानें लिहून घेतलें. या अन्यायानें चिडून जाऊन सखाराम हरि वगैरे प्रभु सरदार राघोबा-दादांच्या पक्षांस मिळाले. पुढें सन १७७५ सालीं हरीपंत फडक्यांनीं मही नदीच्या लढाईत राघोबाच्या फौजेचा मोड केल्यावर राघोबा इंग्रजांच्या आश्रयास गेले. आणि त्यांच्या पदरचे मानाजी फाकडे, सखाराम हरी वगैरे सरदार हरीपंताबरोबर पुण्यास आले. या लोकांच्या तैनाता व इनामें यांवर पेशवे सरकारची जप्ती पडली होती. ती नाना फडनवीसांनीं उठविली आणि त्यांना पेशवे सरकारच्या फौजेंत पुनः सरदाऱ्या दिल्या. परंतु ही इमानाची, मानाची आणि सुखाची भाकरी या राघोबापक्षीय सरदारांना गोड वाटली नाहीं! मानाजी फांकड्याच्या फितुराबद्दल सहाव्या प्रकरणांत उल्लेख आलेला आहे तो वाचकांच्या स्मरणांत असेलच. सखाराम हरी, बाबूराव हरी व त्यांचे दोघे चिरंजीव हेही पुण्यास आल्यावर थोडेच दिवसांनीं अशाच फितुरांत सांपडून कैदेंत पडले. सखाराम हरीबद्दल नानांनीं नगरच्या किल्लेदारास ताकीदपत्र पाठविलें तें असें— छ २० साबान सन सबा सबैन मय्या व अलफ – "सखाराम हरी फितूर करीत होते, सबब बिडी घालून तुम्हांकडे किल्ले नगर येथें अटकेंत ठेवावयास पाठविले आहेत. त्यास पोहचावयास कृष्णाजी भैराळ कारकून व स्वार व गाडदी दिल्हे आहेत. त्यास पक्या बंदोबस्तानें किल्ले मजकुरीं अटकेंत ठेवून भोजन घालीत जाणें. परभू कारकून त्यांजवळ जाऊं न देणें. चौकीस माणसें ठेवाल तीं वरचेवर बदलीत जाणें. मराठा एक माणूस खिदमतगारीस ठेऊन देणें. तो पंधरा दिवसां बदलीत जाणें. धोत्रें अगर शेलापागोटें लागल्यास देणें. जेवणाची व वस्त्रपात्राची आबाळ न करणें. बेडी नेहमीं असों देणें. सखाराम हरी खेळ्या राजकारणी आहे, कोणे गोष्टीस चुकणार नाहीं. याजकरितां एक कोठडी करून त्यांत घालून बाहेरहून कुलूप घालीत जाणें. एकास त्याजवळ जाऊं न देणें. त्यांचे गुण तुम्हांस ठाऊकच आहेत. याकरितां फार चांगला बंदोबस्त करणें."

१ सवाई माधवराव रोजनिशी भाग तिसरा पृष्ठ ७५.

म्हणोन महादाजी नारायण यांचे नावें. परवानगी रुबरु. ( समक्ष )

पुढें सखाराम हरींना कैदेंत दुखणें आलें आणि ते आसन्नमृत्यु होऊन पडले तेव्हां कोणी योग्य जामीन मिळाल्यास त्यांची बिडी काढावी आणि त्यांची व त्यांच्या स्त्रीची भेट करवावी, अशी नानांची परवानगी झाली. सखाराम हरीची स्त्री जामीन मिळविण्याकरितां आपल्या जातभाईच्या दारोदार हिंडली, परंतु गुप्त्यांचीं इनामें पुनः सरकारजप्तींत पडल्यामुळें त्या बिचारीला कोणीच जामीन मिळाला नाहीं. शेवटीं महादजी शिंद्यांनीं मध्यस्थी केल्यावरून त्या दुर्दैवी बंदिवानाची व त्याच्या बायकोची जामीन पटल्याशिवायच भेट करवावी, या गोष्टीस नाना कबूल झाले. परंतु परवानगी मिळविण्याच्या दरबारी दिरंगाईच्या अवधींत सखाराम हरींनीं कैलासवास केल्यामुळें ही पतिपत्नींची भेट होऊं शकली नाहीं.

सखाराम हरी गुप्ते याच्या या कहाणीवरून नानांची आपल्या राजकीय प्रतिस्पर्ध्यांशीं वागणूक खुनशी जुलमाची होती आणि त्यांनीं जातिद्वेषाला बळी पडून सखाराम हरीचे मुद्दाम हालहाल करविले असें कांहीं लेखकांचें म्हणणें आहे; परंतु हें त्यांचें म्हणणें वस्तुस्थितीचा सर्वस्वीं विपर्यास करणारें आहे. राजकारण हा खेळच असा विचित्र आहे कीं, तो खेळतांना पोटचें पोर आडवें आलें तरी तेंसुद्धां कापून काढावें, असा मुत्सद्दी लोकांचा शिरस्ता फार पुरातनचा असून तो अजूनही अबाधित चालू आहे ! नानांच्या हातून या बाबतींत खरोखरीच जुलूम झाला असता तरी तोही या दृष्टीनें क्षम्यच मानला गेला असता. परंतु खरा प्रकार अगदींच उलट आहे ! ‘कोणे गोष्टीस न चुकणाऱ्या एका खेळगा राजकारणी’ माणसाचा जेवढा बंदोबस्त करणें जरूर होतें, तेवढाच नानांनीं केला होता, आणि असें करतांना त्याच्या अन्नवस्त्राची आबाळ न होईल अशीही त्यांनीं काळजी घेतली होती, असें त्यांच्या वर दिलेल्या ताकीदपत्रावरून दिसून येतें. नानांच्या या वर्तनांत जुलूम किंवा जातिद्वेष कोठेंच न दिसतां त्यांजवर असले खोडसाळ आरोप करणाऱ्या लेखकांच्या लिहिण्यांत मात्र त्या जातिद्वेषाच्या भुताचा संचार स्पष्टपणें दिसतो असें मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें !

१० राजकारण—राजकीय दृष्ट्या नानामध्यें एक मोठेंच व्यंग होतें. तें व्यंग म्हणजे त्यांच्या अंगीं लष्करी कसबाचा पूर्ण अभाव होता हें होय. त्यांच्या या वैगुण्यामुळें त्यांना नेहमीं दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी प्यावें लागे. त्यांनीं बारभाईच्या कारस्थानाला सुरवात केली ती सखाराम बापूंच्या आधारावर, त्यांनीं राज्यांतील खुळें मोडलीं तीं महादजी शिंदे व परशुरामभाऊ पटवर्धन या सेनापतींच्या जोरावर. त्यांनीं हैदराला मिळवून घेऊन इंग्रजांची रग जिरविली आणि नंतर निजामाला मिळवून घेऊन हैदरावर स्वाऱ्या केल्या, आणि शेवटीं निजाम व इंग्रज यांशीं सख्य जोडून टिपूचा पुरा मोड केला, असा नानांच्या कामगिरीचा सामान्य आढावा आहे. त्यांनीं आपल्या कारकिर्दींत शेकडों युद्धप्रसंग करविले, परंतु एकाही लढाईंत त्यांनीं कोणताही प्रमुख भाग घेतला नाहीं. लष्करी सामर्थ्याच्या अभावामुळें त्यांचे शेवटीं कसे हाल झाले याचें वर्णन आतां- पर्यंत मागच्या दोन तीन प्रकरणांतून करण्यांत आलेंच आहे.

नानांच्या या वैगुण्याचा दुसरा एक वाईट परिणाम असा होत असे कीं, उंदराची शिकार करावयाची असली तरीसुद्धां त्यांना नेहमीं वाघाच्या शिकारीची तयारी जय्यत ठेवावी लागे! मोरोबादादा व बाळो- बाताल्या यांच्या धामधुमींचा बंदोबस्त करतांना नानांनीं सर्व तयारी एवढ्या प्रचंड प्रमाणावर केली होती कीं, त्या तयारीच्या प्रचंडपणाच्या केवळ भाराखालींच त्यांचे प्रतिस्पर्धी पार चिरडून गेले! नानांच्या इंग्रजांशीं लढाया झाल्या त्यांत इंग्रजांच्या बाजूनें फार तर पांच दहा हजार फौजच गुंतली होती, परंतु या चिमुकल्या फौजेचा पराजय करण्याकरितां नानांस मात्र सतत सात आठ वर्षें पन्नास हजार फौज जवळ बाळगावी लागली! त्यांच्या हैदर व टिपू यांशीं लढाया झाल्या त्यांतही त्यांना लक्षावधि फौजा गोळा कराव्या लागल्या, परंतु अशा फौजा गोळा करूनही त्या मानानें फलनिष्पत्ति मात्र विशेषशी होऊं शकली नाहीं. पेशव्यांच्या कारकीर्दींत मराठी फौजांचा शत्रूवर जो दरारा असे, तो पुढें नानांच्या कारकीर्दींत कधींच दृष्टीस पडला नाहीं. याचें कारण पेशव्यांप्रमाणें नानांस लष्करी ज्ञान नव्हतें व पेशव्यांप्रमाणें ते जातीनें लष्करांत हजर रहात नसत हेंहोचय.

पेशव्यांच्या कारकीर्दीत मराठी राजकारणांत धडाडी, एकसूत्रीपणा, सडेतोडपणा वगैरे गुणांचा प्रत्यय उत्कृष्टपणानें येत असे, पुढें नानांच्या कारकीर्दीत मात्र या गुणाचा प्रत्यय तारतम्यानें बेताबाताचाच दृष्टीस पडतो ! या गोष्टीचें प्रमुख कारण म्हणजे पेशवे व नाना यांच्या राजकीय दर्जांत महदंतर होतें हेंच होय. पेशवे हे एका दृष्टीनें मराठी राज्याचे खावंद होते आणि नाना फडनवीस हे एक त्यांच्या पदरचे यःकश्चित् कारकून होते ! पेशवे हे फौजबंद आणि सर्वसत्ताधीश सरदार असूनही त्यांना आपल्या मालकाचें म्हणजे छत्रपतींचें अवसान प्राप्त करून घेतां आलें नाहीं, तर नानासारख्या कारकुनी दर्जाच्या आणि स्वभावाच्या मुत्सद्याला आपल्या मालकाचें म्हणजे पेशव्यांचें अवसान कसें प्राप्त व्हावें ? नानांचा हा राजकीय दर्जा लक्षांत न घेतां कित्येक लेखक त्यांच्या राजकीय धोरणाविरुद्ध भलभलते आक्षेप घेत असतात. नानांनीं सरंजामपद्धति मोडली नाहीं, आरमार सुधारलें नाहीं, कवाइती पलटणें तयार केलीं नाहींत, लांब पल्ल्याच्या तोफा व दारूगोळा यांचे कारखाने काढले नाहींत, असे हे आक्षेप एक ना दोन ! एका इतिहासलेखकानें तर नानांनीं प्रातिनिधिक स्वरूपाची लोकसत्ताक राज्यपद्धति अमलांत आणली नाहीं याबद्दल तीव्र संताप व्यक्त केला आहे ! नानांनीं विमानविद्या प्रचारांत कां आणली नाहीं असा आक्षेप अजून कोणी घेतला नाहीं हें सुदैवच म्हणावयाचें ! असले हे सर्व आक्षेप अज्ञानमूलक आहेत. मराठी राज्यांत कोणतीही नवीन गोष्ट सुरू करण्याची सत्ता पेशव्यांच्या हातींही फारशी नव्हती, मग ती सत्ता त्यांच्या कारकुनाच्या हातीं कुठून येणार? नानांचे जोडीदार महादजी शिंदे यांनीं कवाइती पलटणें व नवीन पद्धतीची युद्धसामुग्री तयार करविली हें खरें आहे, परंतु ही सर्व उभारणी त्यांनीं परभारें दिल्लीच्या पातशहाच्या दौलतींतून करविली होती ! त्यांच्या मराठी सरंजामांत ही गोष्ट करण्याचें त्यांनीं मनांत आणलें असतें तर तें त्यांनाही करतां आलें नसतें. नाना काय किंवा त्यांचे जोडीदार सरदार काय, या सर्वांचे परंपरेनें हातपाय बांधलेले होते. एखाद्या उपटसुंभाला आपल्या मनगटाच्या जोरावर कोणतीही नवीन गोष्ट सहज करतां येतें. उदाहर-

णार्थ, हैदरअल्लीला कोणतीही जुनी गोष्ट मोडून टाकण्याचा आणि त्या जागीं नवीन गोष्ट रूढ करण्याचा पूर्ण अधिकार होता. कारण त्याची सत्ता परंपराप्राप्त नसून मनगटाचें सामर्थ्य हेंच तिचें मुख्य अधिष्ठान होतें. नवीन घर बांधण्यापूर्वी तें चौकोनी बांधावें किंवा अष्टकोनी बांधावें याचा निर्णय केला तर तो सहज अमलांत आणतां येतो. परंतु एकदां चौकोनी घर बांधून झाल्यावर तें दुरुस्त करीत करीत त्याला अष्टकोनी आकार द्यावा असें मनांत आणलें तर तें जवळजवळ अशक्यप्रायच असतें. सारांश परंपरेचीं बंधनें पाळून आणि तिच्या सर्व अडचणी सोसून हाताशीं असलेल्या साधनांच्या जोरावरच मराठी राज्याची ज्यास्तींत जास्त सेवा करावी एवढीच गोष्ट नानांच्या हातीं होती, आणि ती गोष्ट मात्र त्यांनीं इतक्या उत्कृष्टपणानें पार पाडली कीं, तिचें वर्णन करावें तेवढें थोडेंच ठरणार आहे! स्वतःचा लष्करी ज्ञानाचा अभाव आणि कारकुनी दर्जा, हाताखालच्या सरदारांचा अंगचोरपणा, जोडीदार मुत्सद्यांचे फितूर हीं सर्व कुलंगडीं संभाळून ज्यांनीं केवळ आपल्या अकलेच्या जोरावर—जबरदस्त शत्रूंचा वेळोवेळ पराजय करून मराठी राजसत्तेला परकीय वर्चस्वाचा विटाळ होऊं दिला नाहीं.—आपसांतील यादवीमुळें अवनतीला पोंचलेलें मराठी राज्य पुनः ऊर्जितावस्थेला आणिलें—राज्यांतील दंगे व बंडें यांचा बीमोड करून त्यांत शांतता, सुराज्य आणि सुव्यवस्था यांचें साम्राज्य प्रस्थापित केलें—त्या नाना फडनवीसांची थोरवी काय वर्णावी? नानांची ' खूब शर्तीनें राज्य राखण्याची ' ही कामगिरी मराठ्यांच्या इतिहासांत चिरस्मरणीय होऊन रहावी अशीच तिची योग्यता आहे यांत संशय नाहीं.

---

# प्रकरण एकोणिसावें.

## शेवटचे दिवस व मृत्यु.

( स. १७९९ जाने.—स. १८०० मार्च. )

अमृतरावांचा आश्रय मिळाल्यामुळेंच बायांचें बंड इतकें डोईजड झालें होतें. शिंदे व नाना यांनीं सात लक्षांची जहागीर देण्याचें आमिष दाखवून अमृतरावास बायांच्या पक्षांतून फोडलें, आणि त्यामुळें त्यांचा पक्ष पुष्कळच हलका झाला. नंतर नानांनीं शिंदेबायांस निरोप पाठविला कीं, 'तुमच्या सर्व तकरारी दूर करून तुमच्या म्हणण्याप्रमाणेंच दौलतराव या उप्पर वागत जातील. तुमच्या ज्या मागण्या असतील त्यांचा योग्य तो विचार सरकारांतून जरूर होईल. आमच्या भरंवशावर तुम्हीं लढाई बंद ठेवून जांबगांवास जाऊन रहावें.' नानांच्या या आश्वासनावर भरंवसा ठेवून शिंदे बाया पुण्याहून निघून जांबगांवास जाऊन राहिल्या. एकंदरींत नानांनीं कारभार हातीं घेतल्यावर एक दोन महिन्यांतच हें बायांचें बंड मोडल्यासारखें केलें.

पुण्याहून कूच करून आपल्या मुलखास निघून जाण्याविषयीं नानांनीं बारंवार सांगावें व शिंद्यांनीं जातों जातों म्हणावें, असें पुष्कळ दिवस चाललें असतां, त्यांनीं तिकडे त्वरेनें निघून जावें असें कारण यावेळीं एकाएकीं उपस्थित झालें. काबूलचा बादशहा तैमूरशहा यानें पंजाबावर स्वारी करून तेथील शिख संस्थानिकांचा पराजय केला व दिल्लीवर चालून येण्याचा त्याचा इरादा स्पष्ट दिसूं लागला. त्यावरून शिंद्यांचा तिकडील सरसेनापति मुसा-पिरू यानें युद्धाची तयारी केली व दिल्लीस जलदीनें निघून येण्याविषयीं शिंद्यांस पत्रें पाठविलीं. परंतु शिंद्यांच्या मनांत जावयाचें नव्हतें व जाण्याजोगी त्यांची स्थितीही नव्हती. एक तर फौजेचें देणें फेडावयास त्यांजवळ पैका नव्हता. शिवाय दुसरें असें कीं, माझ्या जिवाची तुम्हांस कांहीं किंमत असेल तर नाना जिवंत असेपर्यंत तुम्ही मला सोडून दूर जाऊं नका, अशी बाजीराव त्यांची गुप्तपणें प्रार्थना करीत होते! अशा स्थितींत सर-

कारांतून म्हणजे मुख्य कारभारी नाना यांजकडून पैका काढायला ही वेळ बरी आहे, असें जाणून शिंद्यांनीं डिसेंबरपासूनच सरकारांत बोलणें लाविलें कीं, ' आपणास दिल्लीकडे जाणें जरूर. आमच्या खानगीस द्रव्य पाहिजे त्याची तरतूद करावी. ' शिंद्यांच्या शब्दावर नानांचा विश्वास नव्हताच. तथापि निमित्त टाळण्याकरितां त्यांनीं त्यांस सांगितलें कीं, तुम्ही कूच करून जावें. आम्हीं तुम्हांस पसतीस लक्ष रुपये देऊं. पण ते एकदम देणार नाहीं. येथून कूच करून जातांना सात

सन १७९९

लक्ष, जांबगांवास गेल्यावर चार लक्ष, तेथून बऱ्हाणपुरास गेल्यावर बारा लक्ष याप्रमाणें तेवीस लक्षांचा भरणा करूं. बाकी बारा लक्ष रुपये राहतात; त्याची वरात बुंदेले व झांशीवाले यांवर देऊं. पुष्कळ भवति न भवति केल्यावर शिंद्यांनीं तेवीस लक्षांबद्दल जामीन मागितले. तेव्हां नानांनीं हरिभक्ति सावकार याचा भाचा दुलभदास व अन्याबा अभ्यंकर यांस शिंद्यांच्या हवालीं केलें. मग जानेवारी अखेरीस सात लक्षांच्या ऐवजीं दहा लक्ष रुपये घेऊन शिंदे हिंदुस्थानांत जाण्याकरितां वानवडीहून निघून तीन कोसांवर मांजरीस गेले, आणि तेथेंच त्यांनीं बैठक मारली! आठ पंधरा दिवस त्या ठिकाणीं मुक्काम करून त्यांचा नानांस पुनः निरोप आला कीं,'फौजेंतल्या देणेदारांनीं अडविल्यामुळें आमचें जाणें तटलें आहे, तेवीस लक्षांपैकीं राहिलेले रुपये पुढें देणार ते येथेंच द्या, म्हणजे निघून जातों!' नानांनीं ती मागणी नाकारल्यामुळें शिंदे पुण्यास परत आले आणि पुनः नानांच्या बोकांडीस बसले!

शिंद्यांनीं निघून जाण्याची धामधूम उठविली ती जरी खोटी होती, तरी त्यांविषयीं श्रीमंतांच्या मनांत कांहींसा अविश्वास उत्पन्न झाला. मला सोडून दौलतराव दूर गेले तर पाठीमागें नाना माझा गळा कापील, हें भय रात्रंदिवस त्यांच्या डोळ्यासमोर उभें रहात असे! शिंद्यांच्या घरांतल्या बाया बिथरलेल्या आहेत तोंपर्यंत कांहीं शिंद्यांस दक्षिणेंतून हालतां येत नाहीं, हे त्यांस पक्कें ठाऊक होतें. सबब त्यांनीं आंतून बायांस चिथावणी देऊन पुनः दंगाधोपा करण्यास प्रवृत्त केलें! नाना फडनवीस व शिंद्यांचे जुने कारभारी आबा चिटणीस यांनीं आतांपर्यंत बहुत

प्रयत्न करून दौलतराव व शिंदेबाया यांमधील तंटा बहुतेक मिटविला होता; परंतु आगलाव्या बाजीरावानें बायांचा बुद्धिभेद करून तट्याचा वेताळ पुनः पूर्वस्थितीस आणला !

पेशवे व शिंदे यांच्या आग्रहावरून नाना फडनवीस कारभारी झाले होते, तरी अजूनसुद्धां त्यांजवर केव्हां कोणता प्रसंग गुदरेल याचा नेम नव्हता ! बायांचा पक्ष सोडून उपद्व्यापी अमृतराव पेशव्यांजवळ रहावयास आले, त्यास तरी कांहीं उपद्व्याप केल्याशिवाय चैन कसें पडणार ? त्यांच्या प्रेरणेवरून गोविंदराव काळे व शिवरामपंत थत्ते हे एके दिवशीं दौलतरावास एकांतीं गांठून बोलले कीं, नाना फडनवीस व नारोपंत चक्रदेव यांस तुम्हीं कैद करावे. त्या कामगिरीबद्दल आम्ही तुम्हांस चाळीस लक्ष रुपये देऊं ! शिंद्यांचें नानाशीं तूर्त सख्य असल्यामुळें त्यांनीं ती गोष्ट नानांस तत्काळ कळविली. ही दगलबाजी खुद्द पेशव्यांचीच असली पाहिजे असा तर्क करून नानांनीं खुद्द पेशव्यांसच याबद्दलचा खुलासा विचारला. तेव्हां या गोष्टीशीं आपला कांहीं एक संबंध नाहीं असें त्यांनीं शपथपूर्वक सांगितलें एवढेंच नव्हे, तर जे अपराधी असतील त्यांचें तुम्ही वाटेल तें शासन करावें अशी परवानगी दिली. नंतर नानांनीं काळे व थत्ते यांस ता. २८ फेब्रुवारी रोजीं शनवारवाड्यांत कैद केलें व त्यांच्या पायांत बिड्या ठोकल्या. चौकशींत उभयतांनीं ' सुभेचें ' (अमृतरावाचें) नांव सांगितलें. नंतर काळे यांची सिंहगडावर व थत्ते याची कोंकणांत कर्नाळ्याच्या किल्ल्यावर रवानगी करण्यांत आली.

आपली बाजू लष्करी दृष्ट्या कमकुवत राहिली त्यामुळेंच आपणास शिंद्यांच्या चढेलपणाचा वारंवार त्रास भोगावा लागतो, या गोष्टीची जाणीव नानांस सतत होत असे. नानांचें मुख्य लष्करी सामर्थ्य परशुरामभाऊ पटवर्धन हे होते. नानांनीं दक्षिणेंत मोठमोठ्या मसलती पार पाडल्या त्या त्यांना बहुतांशीं भाऊंच्या पराक्रमाच्या जोरावरच पार पाडतां आल्या. फडनवीस व पटवर्धन या घराण्यांचें परंपरागत अकृत्रिम सख्य होतें, परंतु मध्यंतरीं बाळोबातात्यांच्या कारवाईमुळें नाना व भाऊ यामध्यें हाडवैर माजलें, आणि त्यामुळें भलभलतीं राजकारणें निर्माण होऊन नाना, भाऊ व

तात्या हे तिघेही कैदेंत पडले. आतां दैवयोगानें नाना व भाऊ यांची सुटका होतांच, बाजीरावांची वक्र राजनीति व शिंद्यांची दंडुकेशाही यांनीं गांजलेल्या त्या उभयतां जुन्या मित्रांचें पुनः सख्य जमण्यास बिलकूल अवधि लागला नाहीं. गंगाधरराव गोविंद मिरजकर यांच्या मध्यस्थीनें नाना व भाऊ यांचा पूर्ण सलोखा जमून आला आणि दोघांनींही एकमेकांना इमानप्रमाण दिलें. शिंदे पुन्हां वर्दळीवर येतील तर आपल्याही हाताशीं फौज असावी या हेतूनें नानांनीं भाऊंकरवीं पंधरा वीस हजार फौज जमविली. नंतर फौजेचें पोट भरण्याकरितां भाऊंनीं कर्नाटक प्रांतावर स्वारी केली.

नाना व भाऊ यांचें सख्य जमून आलें ही गोष्ट श्रीमंतांस बिलकूल आवडली नाहीं. कारण त्यांच्या मनांत भाऊंचा सर्वस्वीं नाश करावा असें होतें ! भाऊंनीं फौज उभी केली आणि सातारकरांचा दंगा मोडून सरकारची कामगिरी बजावून दाखविली तरीसुद्धां श्रीमंतांचा त्यांवरचा क्रोध तिलप्राय कमी झाला नव्हता. भाऊंकडून दंडादाखल थोडी रक्कम घेऊन त्यांच्या सरंजामाची जप्ती मोकळी करावी व त्यांस बहुमानपूर्वक पूर्वींप्रमाणें सरदारीचीं वस्त्रें द्यावीं असें नानांनीं श्रीमंतांशीं बोलणें लाविलें तें तर श्रीमंतांना अतिशयच कडू लागलें ! भाऊंच्या नांवाचा उच्चार कानीं पडतांच ते पुष्कळ दिवसपर्यंत पिसाळल्यासारखीं उत्तरें देत ! नानांनीं या बाबतींत फारच जिकीर लाविली, तेव्हां भाऊंनीं सरकारांत पन्नास लक्ष रुपये गुन्हेगारी भरली तरच त्यांच्या सरंजामाची जप्ती उठविली जाईल असें श्रीमंतांनीं त्यांस उत्तर दिलें. परंतु श्रीमंतांचें हें अवसान फार वेळ टिकलें नाहीं. शिंदे बायांच्या दंग्याचा पुनः फैलावा झाल्यामुळें शिंदे तूर्त नानांच्या लगामीं लागले होते, त्यामुळें श्रीमंतांनाही नानांशीं उघडपणें वांकडें वागतां येईना. भाऊंनीं सरकारांत चौदा लक्ष रुपये गुन्हेगारी द्यावी, आणि तीही रोख न देतां पुढें दोन वर्षांत भाऊंस सरकारांतून कांहीं मोहिमेची कामगिरी सांगावी, व तिच्या खर्चाकरितां पैका द्यावयाचा त्यांत हे चौदा लक्ष वजा घालावे, अशी नानांनीं तडजोड सुचविली आणि तीच श्रीमंतांना अखेर मान्य करावी लागली.

पेशवाई राज्य आपल्या वर्चस्वाखालीं आणावें असा इंग्रजांचा फार दिवसांचा इरादा होता. परंतु नानांनीं आतांपर्यंत त्यांची मात्रा चालूं दिली नाहीं. स. १७९९ सालीं इंग्रजांनीं आपल्या 'पगारी मैत्री' चें (Subsidiary Alliance) खोगीर पेशव्यांवर लादण्याचा पुनः यत्न केला. त्याची माहिती—त्या सालीं इंग्रज व मोंगल यांनीं टिपूवर स्वारी केली. मागच्या मोहिमेप्रमाणें या मोहिमेंतही मराठ्यांनीं आपणांस सामील व्हावें, असें इंग्रजांनीं पुणें दरबाराशीं बोलणें लाविलें. इंग्रजांचें हें बोलणें मान्य करून परशुरामभाऊ किंवा त्यांचे ज्येष्ठ पुत्र रामचंद्रपंत आपा यांच्या हाताखालीं पेशव्यांची फौजही त्या मोहिमेवर रुजू व्हावी, असें नानांचें म्हणणें होतें. परंतु बाजीराव व दौलतराव या दोघां बुभुक्षितांनीं टिपूकडून पैका खाऊन नानांचें म्हणणें मनावर घेतलें नाहीं आणि त्यामुळें या मोहिमेवर मराठी फौज जाऊं शकली नाहीं. इंग्रजांनीं स्वतःच्याच पराक्रमानें ता. ७ मे रोजीं टिपूस मारून त्याचें राज्य काबीज केलें. या मोहिमेचा असा शेवट झालेला ऐकून पेशवे व शिंदे खजील झाले. पण त्यांनीं बाह्यात्कारीं तर आपणांस फार हर्ष झाला असें इंग्रजांच्या वकिलास दर्शविलें. पेशव्यांनीं त्या वकिलास असें समजाविलें कीं, आमच्या मनांत इंग्रजांस मदत करावयाची होती व त्याप्रमाणें आम्ही फौजसुद्धां तयार केली होती, परंतु नाना फडनवीसांनीं हजार अडथळे उत्पन्न केल्यामुळें आमचा तो हेतु पूर्ण झाला नाहीं! पुढें टिपूच्या राज्याच्या वांटण्या होण्याची वेळ आली, तेव्हां पेशवे म्हणूं लागले कीं, मुलखाची वांटणी आम्हांसही मिळाली पाहिजे. त्यावेळीं या वांटणीसंबंधानें इंग्रजांच्या बोलण्यांत पुढें लिहिलेले मुद्दे होते—

१ तहाप्रमाणें पेशव्यांची फौज आमच्या सहाय्याकरितां आली नाहीं इतकेंच नव्हे, तर टिपूशीं लढाई सुरू झाल्यावरही त्याचे वकील पेशव्यांनीं आपल्या दरबारीं ठेवून घेतले होते. यावरून पेशवे टिपूस सामील होते हें स्पष्ट आहे, अर्थात् वांटणी मागण्याचा त्यांस हक्क नाहीं.

२ असें आहे तथापि आम्ही पेशव्यांस दहा लक्ष रुपये उत्पन्नाचा मुलूख देऊं. तो घेण्याची त्यांची मर्जी असेल तर त्यांनीं आमच्या खालीं

लिहिलेल्या शर्ती मान्य केल्या पाहिजेत. त्या ह्या—

१ म्हैसूरच्या[1] राजास पेशव्यांनीं चौथ वगैरे हक्काच्या संबंधानें उपद्रव देऊं नये.

२ निजामाप्रमाणें पेशव्यांनीं आम्हाशीं तह करून आमची सहा हजार फौज आपणाजवळ ठेवून घ्यावी व तिचा खर्च चालवावा.

३ निजाम व पेशवे यांमध्यें तंटा पडला आहे, त्यांत आम्ही मध्यस्थी करूं. आमच्या मताप्रमाणें दोघांनीं चालावें.

४ निजाम व पेशवे व इंग्रज या सर्वांनीं मिळून परचक्र आलें असतां एकमेकांस मदत करावी. सदरहू गोष्टीस नागपूरकर रघोजी भोसले हे कबूल असतील तर त्यांसही या कटांत घ्यावें.

५ सुरत शहरच्या उत्पन्नांत पेशव्यांचा हिस्सा आहे तो त्यानीं इंग्रजांस द्यावा. त्याबद्दल तितक्याच उत्पन्नाचा मुलूख इंग्रजांनीं पेशव्यांस द्यावा.

६ पेशव्यांनीं फ्रेंच जातीच्या लोकांस आपल्या राज्यांत आसरा देऊं नये. व त्या लोकांस आपल्या फौजेंत नोकऱ्या देऊं नयेत.

सदरहू मुद्यांवर पेशव्यांच्या वतीनें नाना फडनवीसांनीं उत्तरें दिलीं तीं अशीं:—

आमच्या राज्यांत अंतःकलह उत्पन्न होऊन घोटाळा झाल्यामुळें फौज पाठवितां आली नाहीं. टिपूचे वकील आमच्या दरबारीं होते[2] एवढ्यावरून आम्ही टिपूस सामील होतों हें सिद्ध होत नाहीं. याचें

१ टिपूच्या राज्यापैकीं इंग्रजांनीं पूर्वीच्या राजकुलांतील एका राजपुत्रास थोडासा मुलूख देऊन त्याला म्हैसूरच्या गादीवर बसविलें. तोच हा म्हैसूरचा राजा होय.

२ नानांच्या या उत्तराचा अर्थ चांगला ध्यानांत येण्यास थोडं स्पष्टीकरण अवश्य आहे. मराठे व मोंगल यांच्या तंट्यांत पडून आपलेंच महत्व वाढवावें अशी इंग्रजांस इच्छा होती ती नाना जिवंत असेतोंपर्यंत पूर्ण झाली नाहीं. अंजि- च्याचें संस्थान घेण्याचा मराठ्यांनीं यापूर्वीं पुष्कळदां यत्न केला, पण प्रत्येक वेळीं इंग्रज मध्यें पडून बोलत असत कीं, हबशी आमचा दोस्त आहे त्याचा नाश तुम्ही करूं नये. भोसले हे स्वतंत्र राजे आहेत असें दर्शविण्याचा इंग्रजांचा इरादा

कारण, या देशचा रिवाजच असा आहे कीं, दोन राजांत लढाई जुंपली असतांही परस्परांचे वकील परस्परांच्या दरबारीं असतात. इंग्रज आम्हांस दहा लक्षांचा मुलूख देत आहेत, तो त्यांनीं दिल्यास आम्ही म्हैसूरच्या राजाजवळ चौथ वगैरे मागणार नाहीं, व त्या मोबदला हा दहा लक्षांचा मुलूख मिळाला असें समजूं. इंग्रजांचीं दोन पलटणें आम्ही ठेवून घेऊं, व यांचा खर्च चालवूं. पण आम्ही सांगूं ती कामगिरी त्या पलटणांनीं केली पाहिजे. आमच्या मनांत जंजिऱ्याचें संस्थान काबीज करावयाचें आहे. त्या कामावरही आम्ही ही पलटणें पाठवूं. आमचा निजामाशीं जो तंटा आहे त्यांत इंग्रजांस पडण्याचें कांहींच कारण नाहीं. एकमेकांच्या रक्षणार्थ निजाम व इंग्रज यांशीं तह करणेंच झाला तर त्यांत भोसल्याचें नांव घालण्याचें कारण नाहीं. भोसले हे आमच्या हाताखालचे आहेत. आमच्या संमतीशिवाय परराज्याशीं तह करण्याचा त्यांस अधिकार नाहीं. फ्रेंच लोकांनीं हिंदुस्थानांवर स्वारी केली तर त्यांस हांकून लावण्याकरितां आम्ही इंग्रजांस मदत करूं. पण त्या जातीच्या लोकांस आमच्या सैन्यांत नोकऱ्या देऊं नयेत असें इंग्रजांचें म्हणणें आहे तें आम्हांस कबूल नाहीं. सुरतेच्या उत्पन्नांत आमचा हिस्सा आहे तो आम्ही कधींही सोडणार नाहीं.

नानांचीं उत्तरें इंग्रजांस अर्थातच पटलीं नाहींत. आणि टिपूच्या राज्याची वांटणी पेशव्यांस मिळाली नाहीं. थोडासा मुलूख देण्याचें आमिष दाखवून पेशवाई राज्य आपल्या काबूंत आणण्याचा इंग्रजाचा हा डाव नानांनीं वेळींच दक्षपणानें उधळून लाविला.

अगदीं साध्या गोष्टींतही आपलाच उप्पर दुसऱ्यावर ठेवण्यासाठीं इंग्रजांची कशी धडपड चालली होती याचें त्या सालचें आणखीही एक उदा

---

होता, व तहाच्या कागदावर भोसल्यांची सही झाली म्हणजे ते पेशव्यांच्या बरोबरीचे झालेच. भोसले, गायकवाड, प्रतिनिधि वगैरे राजपथऱ्यांनीं स्वतंत्र न व्हावें, व त्यांनीं पूर्वीप्रमाणें पेशव्यांच्याच आज्ञेत वर्तावें, असा नानांचा कटाक्ष होता.

इ. १७९९ } हरण देतो. नोव्हेंबर महिन्यांत चौघे इंग्रज पेशव्यांच्या दरबारीं आले आणि त्यांनीं श्रीमंतांस विनंति केली कीं, आम्ही तुम्हांस आमच्या बादशाहाचें फर्मान आणलें आहे, त्याचा तुम्ही गौरवपूर्वक स्वीकार करावा. तो गौरव तुम्ही पांच प्रकारांनीं करावा असें आमचें म्हणणें आहे. ते पांच प्रकार हे कीं, १ या फर्मानाचा स्वीकार करण्यासाठीं श्रीमंतानीं मुद्दाम बाहेर डेरे द्यावे व तेथें दरबाराचा समारंभ व्हावा. २ आम्ही फर्मान घेऊन येऊं तेव्हां श्रीमंतांनीं आम्हांस सामोरें यावें. ३ मागें वकील मुतलखीच्या वेळेस फर्मानबाडीचा समारंभ झाला होता तसा याही वेळेस थाटमाट व्हावा. ४ आम्ही फर्मान दरबारांत हजर करूं तेव्हां सन्मानार्थ श्रीमंतांनीं उभे राहून तें हातीं घ्यावें ५ त्या प्रसंगानिमित्त खुशालीच्या शंभर तोफा माराव्या. याप्रमाणें इंग्रजांनीं डाव टाकतांच बाजीरावांस पंचाईत पडली व त्यांनीं नानांकडे विचारावयास पाठविलें कीं, या प्रसंगीं कसें वागावें व इंग्रजांस काय उत्तर द्यावें? राज्यकारभाराची आस्था नानांस आतां बिलकुल राहिली नव्हती तरी पेशवाईचा अभिमान त्यांच्या मनांत जाज्वल्य होता. त्यांनीं इंग्रजांचा कावा ओळखून पांच कलमाची उत्तरें सांगितलीं. "१।२।३ फर्मान घेण्याकरितां मुद्दाम डेरे देणें वगैरे सन्मान फक्त दिल्लीपतीखेरीज पेशवे सरकार कोणासही देत नाहींत. मागें माधवराव बल्लाळ यांच्या वेळीं असेंच विलायतच्या बादशहाचें फर्मान घेऊन माष्टिन आला होता त्यानें नेहमींच्या दरबारांत तें आणून दिलें, तसेंच याही वेळीं व्हावें. ४ श्रीमंतांनीं पत्र उभे राहून घ्यावें असें इंग्रज म्हणतात, तर जेव्हां श्रीमंत दरबारांत जातील तेव्हां बसण्यापूर्वी इंग्रजांनीं त्यांस पत्र द्यावें म्हणजे झालें! श्रीमंतांनीं तें पत्र घेऊन वाचण्याकरितां मुनशीच्या हवालीं करावें. ५ हा खुशालीचा विशेष प्रसंग समजून शंभर तोफा माराव्यात असें इंग्रज सांगतात, पण तसें करण्याचें कारण नाहीं. खुशालीच्या इतर सामान्य प्रसंगाप्रमाणें तोफांचे वीस बार मात्र करावे." या बाबतींत इंग्रजांनीं पुष्कळ जिकीर केली. तथापि त्यांचें कांहीं चाललें नाहीं; आणि अखेर नानाच्याच म्हणण्याप्रमाणें ता. ७ जाने १८०० रोजीं विलायतच्या बाद-

शहाबेंफर्मान वाचण्याचा समारंभ घडून आला.

शिंदे बायांस श्रीमंतांनीं दंग्यास प्रवृत्त केल्याचें पूर्वी सांगितलेंच आहे. श्रीमंतांच्या उत्तेजनावरून या बायांनीं पुनः फौज जमा करून वऱ्हाड व खानदेश हे दोन प्रांत मारून ताराज केले आणि नंतर त्यांच्या स्वारीची संक्रांत मिरजप्रांत व कर्नाटक यांकडे वळली. हें बंड असेंच वाढूं दिलें तर शिंदेबाया व करवीरकर एक होऊन कर्नाटकांत मोठाच हंगामा माजणार असा रंग दिसूं लागला. करवीरकर व शिंदेबाया यांचें पारिपत्य करण्याविषयीं नानांनीं भाऊंस पत्रें पाठविलीं, आणि शिंद्यांचीं पलटणें व मोंगलाई फौज पंढरपूर प्रांतीं राहिली होती त्यांसही भाऊंस सामील होण्याविषयीं इषारा पाठविला. त्याशिवाय विंचूरकर, रास्ते, प्रतिनिधि व गोखले यांसही भाऊंची कुमक करण्याविषयीं नानांनीं सरकारांतून सक्तीचीं आज्ञापत्रें लिहविलीं. हा सारा कागदोपत्रीं व्यवहार झाला. याप्रमाणें अंमलबजावणी होती तर परशुरामभाऊंजवळ पन्नास हजार फौज जमली असती; मग कुठच्या बाया आणि कुठचे बावा! सर्व दंगेखोरांचा चुराडा झाला असता. पण स. १७९५ मधले नाना निराळे आणि १७९९ मधले निराळे! इतके कागदी घोडे त्यांनीं नाचविले, तरी खरोखरीचा एकही घोडा जाग्यावरून हालला नाहीं! त्यामुळें हें बायांचें बंड वाढतच चाललें. शेवटीं नानांच्या सल्ल्यावरून शिंद्यांनीं बाळोबातात्यांस कैदेंतून मुक्त केलें आणि त्यांच्या हातीं सरदारीचा सर्व कारभार दिला. तात्यांनीं दोन तीन महिने बहुत खटपट करून शिंदेबायांची कशीबशी समजूत पाडली, आणि नंतर त्या लढाईचा नाद सोडून जांबगांवास पुनः जाऊन राहिल्या.

बाळोबातात्यांची कैदेंतून सुटका होतांच परशुरामभाऊंच्या मध्यस्थीनें नाना व तात्या यांचाही पूर्ण सलोखा जमून आला. नाना, भाऊ व तात्या यांचा हा सलोखा बाजीरावांना मात्र धूमकेतूप्रमाणें भयप्रद भासूं लागला काहीं व्यक्तींबद्दलचे रागलोभाचे संस्कार श्रीमंतांच्या मनावर वज्रलेप होऊन बसले होते. बाळोजी कुंजर, बाणाजी शेट्या हुजऱ्या, सर्जेराव घाटगे, फकीरजी गाडवे हे मात्र श्रीमंतांना प्यारे दोस्त वाटत असत! त्यांनीं कितीही लाथा मारल्या तरी त्यांचें श्रीमंतांना कौतुकच वाटत असे! नाना

फडनवीस, परशुरामभाऊ पटवर्धन, बाळोबा तात्या पागनीस या तिघांना मात्र ते प्रत्यक्ष कृतांत समजत असत! त्यांनीं कितीही लोभ दाखविला तरी त्यांत त्यांचा कांहीं दुष्ट हेतु असला पाहिजे असा श्रीमंतांना संशय येत असे! तत्कालीन सांकेतिक पत्रव्यवहारांत 'अंगठीवर हिरा आहे तो काढून नवीन बसवावयाचा आहे' असे मोघम उल्लेख आढळतात. ही नवा हिरा बसविण्याची मसलत म्हणजे बाजीरावास पदच्युत करून त्यांच्या जागीं अमृतरावाचा मुलगा विनायक अमृत यास विनायकराव माधवराव बनवून त्याची पेशवाई पदावर स्थापना करावयाची हीच होय! खरें पाहिलें तर, ही मसलत म्हणजे पुण्याच्या बाजारांत पिकलेली एक 'चिलमी' गप्प होती! नाना किंवा तात्या असल्या जबाबदार मुत्सद्यांच्या मनाला ही राज्यक्रांतीची मसलत शिवलीसुद्धां नव्हती. बाजीरावांना मात्र ही बातमी शब्दशः खरी वाटत होती, आणि त्यामुळें ते अगदीं भेदरून गेले होते! नाना, भाऊ व तात्या हें त्रिकूट आतां एकसूत्र झालें त्याअर्थी आतां आपली खात्रीनें उचलबांगडी केली जाणार असें त्यांच्या मनानें पक्कें घेतलें होतें!

पूर्वीचे रागलोभाचे प्रसंग विसरून नाना, भाऊ व तात्या यांचें सख्य इतक्या लवकर जमून आलें याचें कारण इंग्रजांचें वर्चस्व हेंच होय. गेल्या दोन वर्षांत इंग्रजांनीं निजामाशीं तह करून त्याचें राज्य व्यापलें व टिपूची दौलत अजीबात बुडविली. हा जो इंग्रजी सत्तेचा कल्पनातीत उत्कर्ष झाला त्याचें पर्यवसान शेवटीं मराठी राज्याच्या उच्छेदांत होणार या गोष्टीची मराठी मुत्सद्यांस सारखी चुटपुट लागून राहिली होती. नाना, तात्या, नारोपंत चक्रदेव वगैरे मुत्सद्दी इंग्रजांवर नक्ष राखून राज्याचा बचाव कसा करतां येईल याबद्दलची वाटाघाट करण्यांत गुंतले होते. या वाटाघाटींपासून एखादी मसलत सिद्ध होती तर राज्याचा बचाव होण्याचा पुष्कळच संभव होता. बाळोबा तात्यांच्या हुकमांत शिंद्यांचीं पलटणें वागणार, जुनी शिलेदारी फौज परशुराम भाऊंच्या हुकमतींत चालणार, व राज्यरक्षणाचे कामीं या दोघांस नानांच्या विशाल बुद्धीची प्रेरणा मिळणार! इतकी सामुग्री सिद्ध झाल्यावर इंग्रजांशीं वर्षानुवर्षं टक्कर देण्याचेंही मराठी

साम्राज्यास तितकेसें जड गेलें नसतें. परंतु या तीन राष्ट्रपुरुषांच्या एकीपासून एखादें राष्ट्रकार्य निर्माण व्हावें असा योगायोगच नव्हता, त्याचें कारण असें—

'महाडचें कारस्थान' या प्रकरणांत नानांनीं करवीरकर छत्रपतींस भाऊंच्या जहागिरींत दंगा करण्यास प्रवृत्त केलें वगैरे मजकूर लिहिला आहे तो वाचकांच्या स्मरणांत असेलच. या उत्तेजनाचा फायदा घेऊन करवीरकरानीं भाऊंच्या जहागिरींत स्वाऱ्या घालघालून मनस्वी उपद्रव दिला आणि भाऊंचा तासगांवास भव्य वाडा होता तो तर त्यांनीं जाळून भस्मसात् केला! करवीरकरांचा सूड घेण्याकरितां स. १७९९ च्या मे महिन्यांत भाऊ कर्नाटकांतून परत फिरले आणि करवीरराज्यांत शिरले. 'भाऊ पुढें कधीं काळीं तुम्हांवर स्वारी करतील तर आम्ही तुमचा बचाव करूं' असें करवीरकरांकडे नानांचें वचन आगाऊच गुंतलें होतें, त्यामुळें त्यांनीं करवीरराज्यावर स्वारी न करण्याविषयीं भाऊंस परोपरीनें सांगून पाहिलें; परंतु भाऊंनीं या सांगण्याकडे दुर्लक्ष केलें. पुढें पावसाळा सुरू होऊन शिलेदार घरोघर निघून चालले तरी त्याचीही फिकीर न करतां भाऊंना काय थोडीबहुत फौज जवळ शिल्लक राहिली होती तिच्याच जोरावर ही मोहीम हट्टानें पुढें चालविली. ता. १६ सप्टेंबर १७९९ रोजीं पट्टणकुडी येथें करवीरकर छत्रपति व भाऊ यांमध्यें लहानशी लढाई होऊन तींत पटवर्धनी सैन्याची दाणादाण झाली आणि दैवयोगानें भाऊ जखमी होऊन शत्रूकडे पाडाव सांपडले. नंतर लढाईच्या गर्दींत छत्रपतींनीं त्यांस तशा घायाळ स्थितींतच ठार मारविलें! इंग्रज, निजाम, टिपू अशा शत्रूंसही आपल्या पराक्रमानें नामोहरम करणाऱ्या परशुरामभाऊंचा एका भिकारड्या लढाईंत अशा अधम प्रकारानें शेवट व्हावा हा केवढा दैवदुर्विपाक! असो. भाऊंच्या वधाची बातमी समजतांच नाना व तात्या यांस करवीरकरांचा अतिशय राग आला. नानांनीं पदरचे पांच लक्ष रुपये व तात्यांनीं चार लक्ष रुपये खर्चून फौज उभी केली आणि तिची भाऊंचे ज्येष्ठ पुत्र रामचंद्रपंत आपा यांजकडे रवानगी करून दिली. नंतर रामचंद्रपंतांनीं या फौजेच्या बळावर करवीरकरांचा ठिकठिकाणीं पराजय करून खुद्द कर-

वीरास वेढा घातला.

नाना, भाऊ व तात्या या त्रिपुटीपैकीं आतां नाना व तात्या हे दोघेच शिल्लक राहिले, परंतु ते दोघे अजूनही श्रीमंतांना भारीच होते! राज्यरक्षण करण्याविषयींची या थेरड्या मुत्सद्यांची वटवट अजूनही श्रीमंतांना ऐकावी लागे आणि एखादे प्रसंगीं त्यांची धमकीही सहन करावी लागे! श्रीमंतांच्या रंगेल मनाला या जुन्या लोकांचा आतां पुरा वीट आला होता! बाळोबातात्यांनीं श्रीमंतांस एके दिवशीं भरदरबारांत विनंती केली कीं, "सर्वांस छत्र म्हणजे सरकारची दौलत, त्या दौलतींत तुमचें व नानांचें पटत नाहीं तेव्हां पुढें विचार काय? तुमच्या आत्मघातकी राजनीतीमुळें शिलेदार दारोदार भीक मागूं लागले आणि सरदार दिवाळखोर बनले आहेत. तुम्ही नानांची मर्जी प्रसन्न करून घेतलीत तरच राज्यांतले सर्व वैदे मोडतील. इंग्रज प्रबळ झाले आहेत. या प्रसंगीं आम्हां सर्वांची एकजूट असली तरच इंग्रजांचा रेंच मोडेल. नाहीं तर सर्व दौलत इंग्रजांच्या घरांत जाईल. या गोष्टीचा नीट विचार करून उत्तर द्यावें. तुम्हांकडून योग्य उत्तर न मिळेल तर आमचा आम्हांलाच कळेल तसा विचार करावा लागेल!" बाळोबांची ही धमकी ऐकून श्रीमंत भयभीत झाले. 'आमचा आम्हांला कळेल तसा विचार करावा लागेल' या वाक्याचा अर्थ विनायक अमृताला विनायकराव माधवराव बनवून हे मुत्सद्दी आमचें उच्चाटण करणार असा श्रीमंतांनीं घेतला!

स. १७९९ आक्टो.

दौलतराव शिंद्यांच्या जोरावर श्रीमंत कोणत्याही संकटाची विशेषशी पर्वा बाळगीत नसत. परंतु बायांच्या बंडाची वेसण नाकांत पडल्यामुळें ते दौलतराव नरम पडून तूर्त नाना व तात्या यांच्या आहारीं सापडले होते, त्यामुळें श्रीमंतांना या प्रसंगीं मोठीच पंचाईत पडली. परंतु श्रीमंतांचा मेंदु तरतरीत असल्यामुळें त्यांनीं हातपाय न गाळतां यावेळीं एक निराळीच अजब युक्ति शोधून काढिली. शेणव्यांच्या वर्चस्वाच्या रोगावर त्रैलोक्यचिंतामणीची मात्रा म्हणजे सर्जेराव घाटगे हे ओळखून त्यांनीं घाटग्याची मुक्तता करण्याविषयीं शिंद्यांचें मन वळविलें. परंतु शिंद्यांना तरी बाळोबाविरुद्ध उघडपणें जाण्याची छाती होत नव्हतीच

सबब बाळोबाच्या डोळयांत धूळ फेकण्याकरितां त्यांनाही श्रीमंतांप्रमाणें एक अजब युक्तीच शोधून काढावी लागली ! प्रथम आपल्या बापाची सुटका झाली पाहिजे असा हट्ट धरून बायजाबाईनें अन्नग्रहण वर्ज्य केलें, आणि नंतर आपली लाडकी पत्नी अन्न घेत नाहीं या सबबीवर खुद्द दौलतरावां- नींही तोच प्रकार सुरू केला ! धनी व धनीण यांचा हा त्रागा पाहून तात्यांना लोकलज्जेस्तव घाटग्याच्या सुटकेस मान्यता द्यावी लागली. याप्र- माणें सिद्धता झाल्यावर घाटगेराव ता.४ जाने.१८०० या दिवशीं कैदेंतून मुक्त झाले. आणि लगेच त्यांनीं आपल्या पराक्रमास सुरवात केली ! सुटका झाल्यापासून बाराव्या दिवशींच घाटग्यानें शिंदेबायांवर मारेकरी घालण्याचें महत्कृत्य केलें ! त्या मारेकऱ्यांच्या गर्दीत एक कुणबीण ठार झाली आणि पाटीलबावांची धाकटी स्त्री यमुनाबाई हिला तीन भयंकर जखमा लागल्या. बाकीच्या दोन स्त्रिया मात्र मारामार करीत मारेकऱ्यांच्या तावडींतून कशाबशा निसटल्या. असो, घाटगे मुक्त झाल्यामुळें बाळोबा तात्यांचें तेज अर्थात् दिवसेंदिवस कमी पडूं लागलें.

भाऊ दिवंगत झाले आणि तात्या तेजोहीन बनत चालले; त्यामुळें नानांचेंही तेज कारभारांत पदोपदीं फिकें पडूं लागलें यांत काय आश्चर्य ! परंतु सुदैवानें त्यांना अशा स्थितींत कारभार फार दिवस करावाच लागला नाहीं. कुंजर, घाटगे, गाढवे हे ज्या दरबारांतील कारभारी, बाजीराव हे ज्या दरबारांतील पेशवे, जेथें दुसऱ्यास विश्वास दाखवून त्याचा गळा कापणें हेंच शहाणपण, अन्नदार लोकांस नागविणें हेंच जेथें द्रव्यार्जनाचें साधन, अशा ठिकाणीं इतउत्तर नाना फडनवीसांस कारभार करावयास लावणें म्हणजे त्यांची अधिकाधिक विटंबना करणें होय, असें जाणूनच जणूं काय भगवंतानें सदय होऊन त्यांचा अंतकाळ समीप आणिला !

नगराहून आल्यापासून नानांची शक्ति दिवसेंदिवस क्षीण होत चालली होती. ती इतकी कीं, सरकारवाड्यांत किंवा बाहेर कोठें जाण्यायेण्यानें देखील त्यांस श्रम होत. तथापि त्यांनीं शेवटपर्यंत सरकारी काम आपल्या नेहमींच्या टापटिपीनें व आस्थेनें चालविलें होतें. त्या सालच्या म्हणजे शके १६२१ च्या माघ वद्यांत त्यांस ज्वर येऊं लागला. तो वाढत जाऊन

प्रकृति अधिकाधिक बिघडत चालली. फाल्गुन शु० अष्टमीच्या दिवशीं बाजीराव समाचारास आले होते. फाल्गुन वद्य तृतीया गुरुवार ता० १३ मार्च स. १८०० या दिवशीं मध्यरात्रीस नानांचें देहावसान झालें. नानांचा मृत्यु, त्या मृत्यूपासून तत्कालीन राजकीय उलढालींवर झालेले परिणाम, त्यांच्या मुत्सद्दीपणाचें आटोकाट धोरण वगैरेबद्दलचे ऐतिहासिक लेख संग्रहांतील थोडेसे उतारे येथें देतों.

१३ मार्च—" श्रीमंत नाना यांचा काळ व० ३ गुरुवारीं मध्यरात्रीस जाला. समस्त मुत्सद्दी आले होते. प्राणोत्क्रमणसमयीं श्री० राजश्री अमृतरावसाहेब हेही आले. परंतु भाषण नाहीं. तसेच वाड्यांत गेले. शव माजघरांतून पालखीपुढें आणिलें. गंगेवर न्यावयाची सिद्धता जाली. तों आरबांनीं आपले फडशाकरितां अडथळा घातला. नंतर राजश्री दुलभदास यांनीं हवाला घेतला, तेव्हां शव बाहेर जाऊं दिलें. या खटपटीस सूर्योदय जाला. नदीवर दहा सहस्र माणूस मिळालें होतें. नानांकरितां शहरांत ते दिवशीं हाहाकार जाला तो काय वर्णावा ? मातोश्री बाया सिद्धटेंकास होत्या. त्यांस भृगुवारीं प्रहररात्रीस वर्तमान समजलें. नंतर निघाल्या. सायंकाळचे श्री० राजश्री रावसाहेब, व बाबा फडके, चक्रदेव वगैरे झाडून समाचारास आले होते. "

दुलभदास हा पुण्यांत हरिभक्तीची पेढी होती तिचा मुनीम.

२१ मार्च--" नाना वारले. एक बायकोही वारली. सुतक फिटल्यावर मोरोबादादा पुण्यास येणार. त्यांस नानांची फडणिसी श्रीमंत सांगणार. नानांच्या दोघी स्त्रिया सिद्धटेंकाहून आल्या, त्या तिसरे दिवशीं वाड्यांत आल्या. थोरली बायको चैत्र शु. २ गुरुवारीं वारली. नानांची क्रिया गंगाधरपंताचा भाऊ प्रभाकरपंत भानू आंबेगांवकर यांनीं केली. "

२४ मार्च--" नानांचा काळ जाल्यावर भृगुवारीं सरकारचे हुजरे नानांच्या वाड्यांत येऊन बसले व पागा वगैरे जेथें तेथें हुजरे गेले. दुसरे दिवशीं कापडाची मोजदाद जाली. श्रीमंतांची नजर बांकडी असें दिसून आल्यावर घोंडीबांनीं सरकारांत बोलून हुजरे उठविले. गंगाधरपंत भानूंचा पुत्र चार वर्षांचा आहे. तो दत्तक घ्यावा असें बाळोबातात्या, व फडके

वगैरेंचा मानस आहे."

धोंडीबादादा हे बाळोबातात्यांचे बंधु व जोडीदार कारभारी.

१८ मार्च—"नाना गेले. उपाय नाहीं. याउप्पर कोणेसमयीं काय घडेल न कळे!"

१९ मार्च—"नाना गेल्यामुळें करवीरच्या फौजेंत हाहाःकार उडाला आहे. बुद्धी चालत नाहीं!"

हे लेख रघुनाथराव कुरंदवाडकर यांचे.

२१ मार्च-"नानासारखा मोहरा गेला! फारच वाईट गोष्ट जाली. श्रीमंतांच्या दौलतीस मोठा आळा होता. इकडील तों पूर्वऋणानुसंबंधीं. वर्तमान कळल्यापासून कांहीं सुचत नाहीं. नाना यांचे योगेकरून हेही दिवस पाहिले. येविशींचा विस्तार काय काय लिहावा?"

हा लेख रामचंद्र परशराम यांचा.

२३ मार्च-"नाना गेल्यापासून शिंदे यांचे घरीं दुफळी जाली. सर्जाराव व बाणाजी व यादो भास्कर हे बाळोबा व धोंडीबा यांस (कारभारांतून) काढण्याच्या खटपटींत आहेत. तेही सावध आहेत. रात्रंदिवस खलबतें चाललीं आहेत. बाळोबांनीं बखेड्याचा बंदोबस्त केला आणि काईम राहिले तरच परिणाम. नाहीं तर आजच मालेराई जाली!"

२० मार्च-"पुण्याकडील नाना कैलासवासी जाल्याचें वर्तमान आलें. त्यावरून (करवीरच्या फौजेंत) सर्वांचे उमेदीस उदासीनता जाली त्याचा विस्तार काय लिहावा! इतःपर ब्रम्हसूत्रास त्राता श्री आहे! गेले त्यांचीच पुण्याची सामोग्री उभी राहिल्यास राहील. हें वर्तमान येथें इंदुबारीं आल्यानंतर काल प्रातःकाळीं नानांचे पथकांत रा. मोरोपंत साठे यांचे डेऱ्यास ती॰ राजश्री आपासाहेब गेले होते. तेथून येतेसमयीं (शिंद्यांच्या फौजेंतल्या) इंग्रजांकडे गेले. तेथें त्यांणीं पुण्याकडील वर्तमान विचारिलें. नाना गेले म्हणोन वडिलांनीं सांगितल्यावरोन बराऊननें उत्तर केलें कीं, 'ब्राम्हण्य बुडाले! तुमचे राज्यांतील दाब गेला.' तेव्हां वडिलांनीं अशी गोष्ट घडावयाची नाहीं, (असें म्हणून) विद्यमानीं आहेत त्यांचीं (पेशवे वगैरेंचीं) नांवें घेतलीं. तेव्हां ते सर्व आम्हांस

ठाऊक आहेत असें बोलला. तेव्हां विदुर शिंदे व त्यांचे कारभारी यांचीं वडिलांनीं नांवें घेतलीं. तेव्हां बोलला जे, (बाळोबा) तात्या सुज्ञ, दाबाचे पुरुष खरे. परंतु त्याणीं काळजी वागविली असतां आपले घरची (शिंद्याच्या दौलतीची ) वागवितील. तुमची ( पेशव्यांची ) दौलत पोटीं पडली ! "

नाना वारले त्याअर्थी आतां तुमचें ब्राम्हण्य म्हणजे ब्राम्हणांची सत्ता बुडाली आणि परकी सरकारांस तुमच्या राज्याचा वचक वाटत होता तो नाहींसा झाला, असे वरील उताऱ्यांत ब्राऊनसाहेबानें दोन ठाम सिद्धांत म्हणून सांगितले आहेत ते खरे नव्हेत असें कोण म्हणेल! तें त्याचें एकट्या-पुरतें म्हणणें नसून त्यावेळच्या सर्व इंग्रजांचें तेंच मत होतें. त्यांचा पुण्याचा वकील कर्नल पालमर लिहितो कीं, नाना फडनवीस मेले, आणि त्यांबरोबरच मराठी राष्ट्रांतील शहाणपणा व नेमस्तपणा हीं लयास गेलीं !

२२ मार्च-" यशवंतराव होळकर याणें जाटाचा किल्ला एक आपण ( व ) भोसले मिळून घेतला. द्रव्य बहुत सांपडलें. फौजही हुशार. दीडशें दोनशेंपर्यंत तोफा व पायदळ व स्वार मिळोन पन्नास हजार सांगातें आहे. पुण्याकडे येण्याचा रोख आहे. भोसले यांचीही फौज कांहीं सांगातें आहे. नानांचे सूत्रेंकरून येत आहेत. बंदेलखंडाचे सरदेपर्यंत आला आहे अशी बाजार बोलावा आहे. याउप्पर नानांचें वर्तमान ऐकून पुढें येतो किंवा तेथेंच तूर्त रहातो पहावें ! "

शिंद्यांनीं वेळोवेळ थापा मारमारून नानांकडून मुबलग द्रव्य मात्र उपटलें, परंतु कांहीं केल्या ते पुण्यांतील तळ हालवीनात आणि प्रजेचा संहार थांबेना ! तेव्हां अखेरची तोड म्हणून नानांनीं शिंद्यांशीं झुजण्याकरितां परस्पर यशवंतराव होळकरास उभें केलें होतें असें वरील उताऱ्यावरून स्पष्ट होतें.

नानाच्या विशाल बुद्धीची आणि कर्तृत्वाची छाप लोकांच्या मनावर किती बसली होती हें दाखविण्याकरितां आणि लिहिण्यांतला एक मौजेचा मासला म्हणून पुढील उतारा आम्ही येथे देतों—

२० मार्च—" विदुरशिबिरस्थें सुकृतीय वर्तमान जे, दक्षिणस्थाचा

---

१ शिंद्याच्या लष्करचें. २ पुण्याचें. ३ टपूचा.

नाश गुदस्तां हूणानीं केला, त्या संधींत पैदातीय[2] वगैरे समुदाय पलायित झाला त्या समागमें मुख्यांचा[3] पुत्र निघाला तो श्रेष्ठ नद्दय[4] पूर्वस्थळास[5] आल्यानंतर त्यांसंन्निध प्रविष्ट जाहला. तेव्हां गुप्तवेषें यवनसमुदायीं[6] नद्द-यानीं ठेविला. आणि स्वराज्यरक्षणार्थ व तें[7] राज्यग्रहणार्थ प्रयत्नही आरं-भिला. श्रीरंगनगरस्थ[8] हूणसमुदाय त्यांतील दोन सहस्र यांत्रिकभेद[9] केला. व स्थळोस्थळीं गुप्त संधान राखिलें. निमित्यार्थ दुर्गादिस्थळीं[10] हूणाचें ध्वज-ग्रहण करून या संधानीं असावें असें केलें होतें. व प्राचीन[11] वर्णामध्यें[12] विद्य-मानीं कारभारी होता तेथेंही लक्ष[13] ठेविलें होतें. श्रीइच्छेनें दोन संवत्सर आयुर्मर्यादा नद्दयाची स्थिर असती म्हणजे हूण नाशच जाला असता. हें वर्तमान सर्वांस अश्रुत. नद्दय कैलासवासी जाल्यानंतर संगमस्थ[14] हूणांनीं यवनपुत्राचा शोध लावून श्रीमान्[15] यांस विचारलें. तेव्हां त्याणीं एकंदर[16] न सांगितलें. तेव्हां क्रुद्ध जाहले. नंतर यवनपुत्रांस[17] अधिकारी[18] याणीं हूणहस्तीं दिला. तें वर्तमान संकर्षणांस[19] कळल्यानंतर त्यांणीं पामरनामक हूणाजवळून आपल्याजवळ आणून स्थापन केलें आहे. पुढें श्रीइच्छा! परंतु असे दीर्घ प्रयत्न श्रवणच करावयाचे! अशांचा नाश तेव्हां राज्यस्थिति कठिणतर दिसते!"

झालें. नाना फडनवीसांचें चरित्र येथें संपलें हें चरित्र म्हणजे स.१७७२ पासून पुढें अठ्ठावीस वर्षांचा पेशवाईचा त्रोटक इतिहासच होय. नाना-बद्दलची गुणदोषचर्चा या पुस्तकांत जागोजाग केली आहे तीवरून मराठी परंपरेंतील या शेवटच्या मुत्सद्याच्या मरणानें महाराष्ट्राची केवढी हानि झाली याची कल्पना वाचकांस आतां सहज करतां येण्याजोगी आहे. नानांच्या पश्चात् त्यांचें कुटुंब व मालमत्ता व त्यांचें राजकारण यांची पुढें

---

१ इंग्रजांनीं. २ पायदळ. ३ टिपूचा. ४ नाना फडनवीस. ५ राज्यकारभा-रावर. ६ आपल्या पदरच्या आरबांच्या जमातींत. ७ म्हैसूरचें. ८ श्रीरंगपट्टणचा ९ फितूर. १० चित्रदुर्ग वगैरे स्थळीं. ११ टिपूच्या वेळचा. १२ ब्राम्हण कार भारी पूर्णय्या कर्णिक. १३ फितूर. १४ पुण्याजवळ संगमावर राहिलेल्या इंग्र-जांनीं. १५ बाजीरावास. १६ यथास्थित. १७ टिपूच्या मुलास. १८ बाजी-रावांनी. १९ बाळोबातात्यांस.

काय अवस्था झाली याची हकीगत पुढील प्रकरणांत थोडक्यांत सांगून हें पुस्तक संपवूं.

# प्रकरण विसावें.

## पुरवणी.

नानांच्या पश्चात् पेशवे दरबारच्या राजकारणाची पुढें काय अवस्था झाली हें आम्ही आधीं येथें थोडक्यांत सांगणार आहों. आणि विशेष दुःखाची गोष्ट ही कीं, तो मजकूर पाल्हाळ न लावितां थोडक्यांत सांगावा अशाच जातीचा आहे! नानांच्या मरणानंतर पुढील दोन वर्षांत मराठी राजकारणांत अनेक स्थित्यंतरें घडून आलीं, त्यांतील प्रमुख गोष्टी अशा—

१ सर्जेराव घाटग्यानें सांपडतील ते शेणवी सरदार पकडून कैदेंत घातले आणि नंतर हालहाल करून त्यांस ठार मारविलें! घाटग्याच्या क्रूरकर्मांचा एक सामान्य नमुना-- महादजी शिंद्यांचे सेनापति जिऊबादादा बक्षी यांचे चिरंजीव नारायणराव बक्षी यांच्या अंगास त्यानें दारूचे बाण बांधले. आणि नंतर त्या बाणांस बत्ती देतांच बिचारे बक्षी तत्काळ गतप्राण झाले आणि त्यांचें शरीर बाणांबरोबर आकाशांत उडून छिन्नविच्छिन्न झालें! हा ‘ बक्षी ’ चा ‘ पक्षी ’ बनविण्याचा प्रकार घाटगे व गाढवे यांनीं दृष्टिसुखासाठीं आपल्या समक्षच मुद्दाम करविला!

२ शिंदे बाया जांबगांवास स्वस्थ राहिल्या होत्या, त्या घाटग्याचें शिंद्याच्या दरबारांत पुनः वर्चस्व झालेलें पाहतांच बिथरल्या, आणि त्यांनीं हिंदुस्थानाकडे मोर्चा वळविला. त्या बाया नर्मदेपलीकडे गेल्यानंतर त्यांना लखवा लाड हा पंचवीस हजार फौजेनिशीं सामील झाला. नंतर लाड व शिंदेबाया यांच्या फौजांनीं शिंद्यांच्या जहागिरीवर स्वारी करून तो प्रांत लुटून जाळून फस्त केला!

३ नानांच्या पाठीमागें त्यांच्या राजकीय पक्षाचें धुरीणत्व अमृतरावांनीं स्वीकारलें आणि नंतर त्यांच्या प्रोत्साहनावरून महाराष्ट्रांत दररोज नवीन

नवीन दंगे व बंडें निर्माण होऊं लागलीं. बाजीरावांच्या तावडींतून वांचलेले नानांच्या वेळचे जुने मुत्सद्दी आणि सर्जेरावाच्या तावडींतून शिल्लक राहिलेले शेणवी सरदार यांनींच या धामधुमींत प्रमुखत्वानें भाग घेतला होता. घोंडोपंत नित्सुरे यांनीं तर लोहगड किल्ला बळावून पुण्याभोंवतीं दिवसाढवळ्या लूटमार चालू केली ! खुद्द पुण्यांतही श्रीमंतांच्या अधिकाराला कोणीच विचारीना !

४ अमृतरावाच्या तर्फेनें सर्वांत मोठें बंड यशवंतराव होळकरानें केलें. त्यानें पाऊण लक्ष फौज गोळा करून नर्मदेपासून दिल्लीपर्यंत तमाम मुलूख लुटून ओस पाडिला। होळकर व शिंदेबाया यांचा दंगा शांत करण्याकरितां दौलतराव शिंदे हिंदुस्थानांत गेले, परंतु एक दोन लढायांतच होळकरानें शिंद्यांची फौज व पलटणें यांची दाणादाण उडविली ! नंतर अमृतराव व नानांच्या वेळचे जुने मुत्सद्दी यांच्या सल्ल्यावरून होळकर बाजीरावाला ताब्यांत घेण्याकरितां पुण्याकडे वळला. शिंद्यांच्या वर्चस्वांतून श्रीमंतांना मुक्त करून राज्यकारभाराची विस्कटलेली घडी पुनः दुरुस्त करावी, असा यांत होळकरांचा हेतु होता. होळकराचा मोर्चा दक्षिणेकडे वळतांच शिंद्यांनींही आपली फौज श्रीमंतांच्या मदतीकरितां पुण्यास पाठविली. पुण्यानजीक हडपसरच्या माळावर ता० २५ आक्टोबर १८०२ रोजीं पेशवे व शिंदे यांच्या फौजेचा व होळकर यांचा भयंकर रणसंग्राम होऊन त्यांत पेशवे व शिंदे यांच्या फौजेचा पुरा मोड झाला, आणि ती फौज दशदिशा उधळून पळून गेली. या पराजयानें श्रीमंत घाबरून महाडास पळाले. सुमारें महिना दीड महिना श्रीमंतांचा मुक्काम महाडासच होता. त्या अवधींत श्रीमंतांनीं पुण्यास परत यावें आणि नानांच्या वेळेप्रमाणें राज्यकारभाराची गाडी पुनः सुरळीत चालू लागावी, याबद्दल होळकरानें बहुत खटपट केली. परंतु बाजीरावाना स्वकीय होळकरांचा विश्वास न पटतां त्यांनीं परकीय इंग्रजांचा आश्रय मिळविण्याकरितां महाडाहून मुंबईस पलायन केलें ! स. १८०२ च्या शेवटच्या महिन्याच्या शेवटच्या तारखेस मराठी साम्राज्याचा शेवट करणारा वसईचा तह श्रीमंतांनीं इंग्रजांशीं ठरविला आणि त्या तहानें

सर्व मराठी दौलत इंग्रजांच्या घरांत गेली.

नानांच्या मरणानंतर अवघ्या एकवीस महिन्यांतच मराठी राज्याचा असा दुर्दैवी शेवट व्हावा, हा एक त्यांच्या बुद्धिमत्तेचा व सामर्थ्याचा अप्रत्यक्ष पुरावाच होय!

कुटुंबाची स्थिति--नाना फडनवीस मरण पावले तेव्हां त्यांच्या शेवटच्या दोन स्त्रिया बगाबाई व जिऊबाई या सिद्धटेकास देवसेवेकरितां राहिल्या होत्या, त्यांस नाना मरण पावल्याचें वर्तमान समजतांच त्या तावडतोब निघून पुण्यास आल्या. त्यांस ताब्यांत घेण्यासाठीं पेशव्यांनीं कांहीं फौज पाठविली होती, तिची नानांच्या स्त्रियांबरोबर आरब लोक होते त्यांशीं लढाई झाली; असें म्याकडोनल्ड यानें लिहिलें आहे. नानांच्या मृत्यूनंतर पंधरा दिवसांनीं बगाबाईस देवाज्ञा झाली. राहतां राहिली जिऊबाई. या विचाऱ्या अर्भकाचें वय त्यावेळीं नऊ वर्षांचें होतें! या लहान मुलीला बगलेंत मारून आणि तिच्या मांडीवर दत्तक बसवून नानांच्या वेळचे जुने बिलंदर मुत्सद्दी आपणावर एखादें किचाट आणतील, असें श्रीमंतांस भय पडलें; आणि त्यांनीं जिऊबाईस आपल्याजवळ शनवारवाड्यांतच नजरबंदींत बाळगिलें. नानांच्या मागें त्यांचीं इनामें व जहागीर व इतर सर्व इष्टेट बाजीरावानीं जप्त करविली. नानांच्या स्त्रीच्या मांडीवर दत्तक देऊन त्याच्या नांवें निदान फडणिशीचा दरक तरी चालावा, असें बाबा फडके, नारोपंत चक्रदेव वगैरे मंडळींनीं श्रीमंतांशीं बोलणें लाविलें; परंतु या अपराधाबद्दल त्या सर्व मंडळींना श्रीमंतांच्या कैदेंत पडावें लागलें!

सन १८०२ सालीं यशवंतराव होळकरानें पुण्यावर स्वारी करून शिंदे व पेशवे यांचा पराभव केला. तेव्हां पेशवे इंग्रजांचा आश्रय संपादण्याकरितां कोंकणांत पळून गेले. त्यांच्या बायका व जिऊबाई पुण्यासच होतो. नानांचा आपल्या घराण्याशीं कसा ऋणानुबंध चालत असे, व त्यांचे आपल्या घराण्यावर किती उपकार आहेत, हें स्मरून होळकरांनीं नानांच्या स्त्रियेस बहुत सन्मानानें वागविलें. पुढें पेशवे व इंग्रज एक होऊन पुण्यास येतात असें पाहून होळकर आपल्या मुलुखाकडे निघून गेले. जातांना

त्यांनीं जिऊबाईचें नीट रक्षण व्हावें म्हणून तीस लोहगडास धोंडोपंत नित्सुरे यांजकडे रवाना करून दिलें.

तेथें जिऊबाई दोन वर्षें राहिली होती. नंतर पेशव्यांनीं इंग्रजांशीं जिकीर लाविली कीं, नाना फडनवीसांची बायको बंड करून लोहगड किल्ला बळकावून बसली आहे, तो किल्ला आमच्या ताब्यांत मिळावा व बाईस तेथून काढून लावावें. मग जनरल वेलस्लीच्या मध्यस्थीनें जिऊबाईनें किल्ला खालीं करून दिला. त्या वेळीं नाना फडनवीसांच्या जप्त झालेल्या उत्पन्नांतून पेशव्यांनीं जिऊबाईस दरसाल बारा हजार रुपये देत जावें, असा जनरल वेलस्लीनें पेशव्यांकडून करार करून घेतला. लोहगडाहून निघाल्यावर जिऊबाई इंग्रजांच्या आश्रयानें पनवेल मुक्कामीं सोळा वर्षें राहिली होती. पेशव्यांनीं पुण्यास येऊन राहण्याविषयीं तिला पुष्कळ आग्रह केला व पुण्यास आल्यास तुमची नेमणूक पंचवीस हजार रुपये करूं, व सरकारांत जप्तींत असलेली नानांची मालमत्ताही तुमच्या स्वाधीन करूं, असें पेशव्यांनीं तीस वारंवार सांगितलें, पण तिला पेशव्याच्या दुष्ट स्वभाव पक्का माहीत होता. त्यामुळें पेशव्यांचें राज्य खालसा होईपर्यंत ती पनवेलीहून हालली नाहीं.

बाजीराव ब्रम्हावर्तास गेल्यानंतर, मिस्तर मौंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन् यानें जिऊबाईस पनवेलीहून पुण्यास बोलावून नेलें, व पेशवे सरकार जी नेमणूक देत होतें तीच कायम करून, शिवाय मेणवली गांव जप्तींत होता तोही सोडून तिला दिला. बाजीरावींत बेलबाग संस्थान जप्तींत होतें, तेंही यावेळीं जिऊबाईच्या वहिवाटीस देण्यांत आलें. नंतर जिऊबाई मेणवलीस जाऊन राहिली.

शके १७४९ या वर्षीं जिऊबाईनें दत्तकपुत्र घेण्याचा निश्चय करून त्याप्रमाणें सरकारास कळवून मिरजेचे राहणार, रामकृष्ण गंगाधर भानू यांचे कनिष्ठ चिरंजीव गंगाधरराव यांस दत्तक घेतलें व त्याचें नांव माधवराव असें ठेविलें. आपणांस सरकारांतून नेमणूक बारा हजार रुपये आहे ती व इनामगांव व बेलबाग संस्थानची वहिवाट हीं आपल्या मागें आपल्या दत्तक पुत्रास चालावीं, म्हणून जिऊबाईनें पुष्कळ खटपट केली,

परंतु सरकारनें तिचें कांहीं एक ऐकलें नाहीं. जिऊबाई शके १७७५ या वर्षी फाल्गुन महिन्यांत मरण पावली. ही बाई शहाणी व सदाचरणी होती. तिनें कसे तरी अन्नूनें दिवस काढून आपल्या जगद्विख्यात पतीचें नांव निष्कलंक राखिलें.

जिऊबाई मरण पावल्याबरोबर सरकारनें तिची नेमणूक बंद केली, व इनाम कमिशनच्या द्वारें मेणवली गांव व बेलबाग संस्थान जप्त केलें. पैकीं बेलबाग संस्थान मात्र जप्तींतून लवकरच मोकळें करण्यांत आलें. माधवराव बल्लाळ ऊर्फ रावसाहेब फडनवीस यांनीं मेणवली गांव सुटण्याविषयीं बहुत यत्न केला, तेव्हां मुंबईचे माजी लोकप्रिय गव्हर्नर सर बार्टल फ्रियर यांनीं मेहरबानीनें मेणवली गांव माधवराव बल्लाळ यांस वंशपरंपरा इनाम करून दिला.

नानांस निजाम अल्लीकडून एक गांव जहागीर होता, तो ते मरण पावल्यावर जप्त करण्यांत आला होता. तो परत मिळावा म्हणून रावसाहेब फडनवीस यांनीं पुष्कळ खटपट केली. शेवटीं हें प्रकरण निकालासाठीं थोरले सर सालरजंग यांजकडे गेलें. तेव्हां त्यांनीं ता० ६ माहे जमादिलावल हिजरी सन १२९७ या रोजीं अखेरचा निकाल केला. त्यांतील पांचवें कलम असें आहे—'या मौजाविषयीं आमचें असें मत आहे कीं, अव्वल संपादक बाळाजी जनार्दन ऊर्फ नाना फडनवीस हे या मुलखांत विख्यात व न्यायी पुरुष होते. ××× आणि लगतच्या कागदपत्रांवरून उघड आहे कीं, असा एक समय आला होता कीं, या सरकारास राज्याच्या बेहत्तरीकरितां त्यांची कृपा संपादन करणें जरूर पडलें होतें. जरी सनदेवरून व जाबत्यावरून सदरहू गांव वंशपरंपरा चालविणें बरोबर नाहीं, तरी अशा विख्यात पुरुषाचें नांव या सरकारचे दप्तरांतून काढून टाकणें हें अफसोस आहे. याकरितां शराप्रमाणें औरस आणि शास्त्राप्रमाणें दत्तक वंश जेथपर्यंत कायम आहे तेथपर्यंत गांव चालला पाहिजे. उमेद आहे आणि बल्के जरूर आहे कीं, कृपादृष्टीनें सदरहू गांव नाना फडनवीस यांचे घराण्यांत चालविणें सरकारास अवश्य आहे. याकरितां बहाल ठेवण्यांत आला आहे."

सर सालरजंगांच्या थोरवीचें जें इतकें लोक वर्णन करीत असतात तें उगीच नव्हे !

माधवराव बल्लाळ हे शके १८११ या वर्षी मरण पावले. त्यांस संतान नव्हतें, म्हणून त्यांच्या स्त्रियेनें भानूंच्या घराण्यांपैकीं एका मुलास दत्तक घेतलें आहे, व त्याचें नांव बाळाजी माधव उर्फ नानासाहेब फडनवीस असें ठेविलें आहे.

समाप्त

# महत्वाच्या व्यक्ति व स्थळें यांची सूची.


अदवानीकर नबाब–५४, ८८,१२४-१२७.

अनुपगीर गोसावी हिंमतबहाद्दर–१४१-१४२,

अन्थाबा अभ्यंकर–२९०.

अमृतराव पेशवे–११०,१६१, नाना तर्फे शिंद्यांविरुद्ध खटपट २००, २११–२१३, २४९, २५१, २६६–२६७

अलीबहाद्दर–शिंद्यांशीं भयंकर वितुष्ट १३७-१४२.

असदअलीखान नि. निजाम–१५८-१५९.

अहिल्याबाई होळकर–४१, १४०, १४३, १५१.

अंबोजी इंगळे नि. शिंदे–१३९, १९६.

आनंदराव धुळप–११०.

आनंदीबाई पेशवे–२३, २७, ३५, बंडावा व कैद ४१, ४८, ११०, मृ. १६१.

आपाजीपंत गोंधळेकर–८६.

आपा बळवंत मेहेंदळे–६९, ७७.

आबा चिटणीस नि. शिंदे–१४९.

आबाजी कृष्ण शेलूकर–१९४, २०६ २०७, २१५, २३३.

इंग्रज–दादांना आश्रय देतात ३७, गुजराथेंत मोहीम ३८, ३९, पुरंदरचा तह व लपंडाव ४०-४४, ५९-६३, मोरोबाला सामील होतात ६८-८०, छत्तीस लाखांचें पचाड ८१, लोभीपणा व निराशा ८२-८३, मराठ्यांशीं पुनः बिघाड–वडगांवचा पराजय ८७-९४, मराठमंडळांत फूट पाडण्याचे प्रयत्न ९८, मराठ्यांशीं तिसरा बिघाड १०१-११०, नानाविरुद्ध निंद्य बातम्या पसरवितात १११–११३, मराठे व मोंगल यांस मिळवून घेऊन टिपूवर स्वारी करतात १२६-१३५, लष्कराची दुर्दशा १३१, १४४, नानातर्फे शिंद्यांस धमकी देतात १७९, पेशवाईवर वर्चस्वाचें खोगीर लादण्याचा प्रयत्न २५३–२५६, २६६-२६७, २६८-२७०.

इब्राहिमखान जाबीतजंग धोंशा नि. निजाम–५६-५८.

इस्माईलबेग हमदानी–१३८, १४१.

इसामिय्या नि. निजाम–१८७

कचोबा पाळंदे–८६.

करवीरकर छत्रपति–४०, ४८ ५८, ५९, ७९, ८९, ९७, नानाकडून भाऊंविरुद्ध वियावणी १८२, २५९.

कल्याणदुर्गचा तह -२७.

कर्वंडे हिंगणगांवची लढाई–५८.

कृष्णराव बळवंत काळे ४२, २३९.

काशीराव होळकर १९७.

काळो बहिरव पेठे ११९-१२०.

कित्तूरकर देसाई ४८, ८९, ९७.
कोन्हेरराव पटवर्धन ५५.
खरगसिंग गारदी ९४.
खर्ड्यांची लढाई १५८-१५९.
खंडेराव दाभाडे सेनापती ४.
गणेशपंत बेहरे १०१-११०,१२०-१२७.
गुलजारखान ८९, १०२.
गुलाम कादर १३८.
गोपाळराव पटवर्धन २०.
गोपाळ नाईक तांबवेकर ७१, ८१, ८६.
गोपिकाबाई पेशवे १९.
गोविंदराव गायकवाड १६, ६५, ९८.
गोविंदराव काळे १५२, १५३, २०७, २३३, २३५, २५१.
गोविंदराव पिंगळे १९५, २०७, २१५, २३३.
गंगाधर गोविंद पटवर्धन १८२,२५२
गंगाधरपंत भानू मृ. २१०-- २११.
गंगाबाई पेशवे २५, २७, ह्या नांवानें राज्यकरभार चालतो २८, ३१ मृ. १११.
घाशीराम कोतवाल १३२ -- १३४, १४८ -- १४९.
चित्रदुर्गकर संस्थानिक ५६, ५७, ८८.
चिमाजी आपा पेशवे (दुसरे) ११०, १११, १६७-१७५.
चिंतोपंत लिमये १७६.
चिंतोपंत देशमुख २०९, २१०.
चिंतो विठ्ठल रायरीकर – फडणिशी २०, २५, ५१, ६८, ७१, ७३, ८५, ८९, कैद ९४.
छत्रपती सातारकर १४४, १४७, १७३, २११ – २१२.
जनार्दन बल्लाळ फडनवीस ६-८, मृ. १०.
जानोजी विश्वनाथ पेशवे १.
जिऊबादादा बक्षी नि. शिंदे १६७, १६८.
जिऊबाई फडनवीस २३१, २६८-२७०.
जोधपूरचा राजा १३८--१३९.
जंजिरेकर हबशी-- २, ३, १३१.
झाबिताखान रोहिला १३८.
टिपू सुलतान-वर मराठ्यांची पहिली स्वारी ११७ -- १२६, नरगुंदचा नाश करतो ११९--१२०, वर मराठे मोंगल व इंग्रज स्वारी करतात १२६ - १३५, मृ. २५३.
तुकोजी होळकर-पुणें दरबारांशीं लपंडाव २९-४५, पेशव्यांची भेट ४६, ५०, कारभाऱ्यांशीं दसवा व दरबारी कामांत ढवळाढवळ ६५-६६, मोरोबाला सामील होतात ६८-८४, नानांशीं समेट ८५, इंग्रजांकडे फितूर होतात ८९-९४, १०१-११० टिपूवर पहिली स्वारी ११७- १२६,

शिंद्याच्या साह्याकरितां माळव्यांत जातात १३९. शिंद्याशीं भयंकर तेढ १४० -- १४३, शिंद्यांकडून नाश १५१, १८४, मृ. १९७, २४२-२४३.
तुळ्या पवार ९४.
त्रिंबकराव परचुरे २०५, २०७, २३३.
त्रिंबकराव पेठे-पेशव्यांचे मुख्य कारभारी १९, २०, २७, मृ. २८.
त्रिंबकराव राजेबहाद्दर ६५.
थोतया ( सदाशिवराव भाऊ ) ४८
बहावा केद व मृ. ५२-५३.
दादा गद्रे १९४,१९७,२०७,२३३.
दामोदरराव हिंगणे १५--१६,२३३.
दाराजहां बहाद्दर नि. निजाम १३०-१३५.
दिल्लीचा बादशहा ११,१०८, १३७ १४२.
दुल्लभदास २५०,२६२.
देवराव हिंगणे १५१, २३५.
देवाजीपंत चोरघोडे ९९.
देवजी गवळी नि.शिंदे २११.
दौलतराव शिंदे १५७, नानाविरुद्ध बाजीरावास सामिल होतात १६८--१७५,बाळोबा व भाऊ यांच्या चिथावणीनें बाजीरावास केद करून नानांशीं शत्रुत्व दाखवितात १७६-१७८, नानाशीं समेट १८०, नानांविरुद्ध बाजीरावाशीं गुप्त करार १८५-१८६, नानांचा द्रव्यापहार करतात १९१, निजाम व भोसले यांशीं कटकट १९२-१९६, नानांस विश्वासघातानें केद करतात २०२-२०६, २०८, २०९--२१४, नानांस केदेंतून सोडतात २१५, नानांचा पुनः द्रव्यापहार करतात २५०, घाटग्यास केदेंतून सोडतात २६१, २६७.
धनाजी जाधवराव ३.
धारवाडचा वेढा १२९.
धोंडोपंत नित्सुरे १८२,१९४, १९५ २१५, २३३, २६७, २६९.
धोंडो रामचंद्र नि. शिंदे १८७,२६२ २६३.
नजीबखान वजीर १३७.
नरसिंगराव घायगुडे ७९,८६.
नरसो गोविंद ८९, ९६.
नाना ( बाळाजी जनार्दन )फडनवीस--कुलवृत्त १--६ जन्म ७, शिक्षण ८-९, पदाची वस्त्रें १०, पानिपतचे दुःखद अनुभव ११--१९, लोहगडावर छापा २०, पेशव्यांचे कारभारी २०--२४, बारभाईची उठावणी व अखत्यारीचा अधिकार २५--३६, इंग्रजांशीं युद्धें ३७--४५, शिंदे होळकरांत द्वैतभाव उत्पन्न करतात ४९, वर मारेकरी ५१, राज्याचा बंदोबस्त ४९-६०, कर्जपट्टी ५५, इंग्रजांशीं वैतुष्ट--कमाली कीं वसुली ! व्यापार बंदी व फ्रेंच वकिलात ५९-६२,

सखारामबापूशीं वितुष्ट- 'देवावें' चा तंटा ६३--६५, मोरोबाचा फितूर ६७--७०, पुरंदरास पलायन ७१, दूरदर्शी धोरण ७२–७५, मोरोबाच्या डोळ्यांत धूळफेंक ७५--८०, बंडाचा बीमोड ८१--८६, इंग्रजांशीं दुसरें युद्ध· वडगांवचा तह ८७--९४, दगे. बंडें व दरबारची डळमळ ८८--९०, मुख्याधिकाराची प्राप्ति ९६, मराठ-मंडळाची जूट कायम ठेवतात ९८, शिंद्यांशीं धुसफुस ९९--१००, इंग्रजांच्या उचाटणाची प्रचंड तयारी १००--१०१, वर एक निंद्य आरोप १११--११३, टिपूचें पारिपत्य करतात ११७–१३०, नरगुंदचें लटपटीत धोरण ११९--१२०, इंग्रजांपासून टिपूचा बचाव करतात १३४--१३५, होळकरास लगामीं लावून घेतात १३६, दिल्लीच्या स्वारींत शिंद्यांस साह्य करतात १३७-१४२, शिंद्यांशीं स्पर्धा १४२--१५४, त्रागा १४६, शिंद्यांची दंडेली व चिंता १४६--१५२, शिंद्यांशीं समेट १५३--१५४, निजामाचें पारिपत्य करतात १५४--१६०, लोकांकडून निष्कारण निंदा १६१-१६४, सवाई माधवराव यांचा मृत्यु १६५--१६६, घोटाळा व तारांबळ दत्तकाची निष्फळ वाटाघाट, शिंदे व बाळोबा यांच्या उद्दाम कल्पना, बाजीरावाची कावेबाज लटपट, परशुरामभाऊंचे फितूर यामुळें साताऱ्यास पलायन आणि तेथून रायगडास पलायन १६७--१७७, महाडचें कारस्थान १७८--१८९, बाजीरावाशीं समेट १७९, शिंदे, निजाम, भोसले, इंग्रज यांस वश करून घेतात १८०--१८१, मशीराकडून बाळोबा व भाऊ यांच्या डोळ्यांत धूळफेंक १८२--१८३. कर. छत्रपति, बाबा फडके, नारोपंत चक्रदेव यांचेमार्फत फितूर व दंगे १८३-१८८. शिंद्याकडून भाऊ व बाळोबा यांचें पारिपत्य करवितात १८८, पुनः पुण्यास आगमन १९०, शिंदे व श्रीमंत यांशीं तेढ व शिंद्यांकडून द्रव्यापहार १९१--१९५, शिंद्याची दडेली व चिंता १९६--२०३, मुकीरामार्फत शिंद्यांशीं समेट व विश्वासघातानें कैद २०४-२०६, नगरास रवानगी २०८, कैदेंतून सुटका २१५, पुनः कारभार हातीं घेतात २१६--२१७, शरीरप्रकृति २१७, दिनचर्या २१८--२२०; स्वभाव २२०-२२४, द्रव्यसंग्रह २२४--२२७, धर्मकृत्यें २२८--२२९, कुटुंबसौख्य २३०–२३१, राज्यकारभार २३२–२४०, योग्यता २४१–२४२, राजकीय प्रतिस्पर्ध्यांशीं वागणूक २४३ २४५, राजकारण २४६-२४८, शेवटचे दिवस व मृत्यु २४९--२६५, शिंदे बा-

यांचा दंगा मोडतात २४९, शिंद्याक
डून पुनः द्रव्यापहार २४९--२५०.
भाऊंशीं पुनः सख्य २५२, इंग्रजांचा
डाव फसवितात २५३--२५६, शिं
द्यांकडून बाळोबातात्यांची मुक्तता क
रवितात २५७, बाळोबाशीं पुनः सख्य
२५८, मृत्यु २६१-२६५.
नानासाहेब पेशवे-९, १७, मृ.१८.
नारायणराव पेशवे-२३, खून २४.
नारायणराव बक्षी नि. शिंदे १७६,
२११, २६६.
नारायणराव वैद्य-२०६, २०९.
नारो महादेव भानू१.
नारो शंकर ( गंगाबाईचा मामा )—
फितूर ५२.
नारोपंत चक्रदेव- नानातर्फे फितूर
१८२, १८४, १८७, १९५, २०७
२१७, २३३, २५८, २६८.
नावलिनगाड्याची लढाई ३९.
निजाम-बारभाईस पाठिंबा देतो २५
४८, पुणें दरबारास भेडसावून जहा
गीर उपटतो ४०, हैदराविरुद्ध मरा-
ठ्यांस सामील होतो ५५, ७० १००
इंग्रजांकडे फितूर होतो १०५, टिपू
विरुद्ध मराठ्यांस सामील होतो ११७
१२६ शिंद्यांच्या साह्यानें पुण्यावर
स्वारीचा प्रयत्न १५०, नाना व शिंदे
यांच्या समेटामुळें निराशा १५२, ख
र्ड्यांची स्वारी व पराजय १५४-
१६०. शिंद्यांविरुद्ध नानांस पाठिंबा
देतो १६९-१७१, भाऊ व बाळोबा
यांविरुद्ध नानांस साह्य देतो १८०--
१८९, बाजीराव व शिंदे यांशीं कट-
कट १९२-१९६, २१४.
नीळकंठराव प्रभु १८४, १८६.
परशुरामभाऊ पटवर्धन ५३, ५५-
५८, ६६-७१, ७०-८७, कर्नाट-
कांत स्वारी ९०, ९६, ९७, ९९,
१०१-११०, इंग्रजांचे रसदेची लूट
१०३, टिपूवर पहिली स्वारी ११७
-१२६, टिपूवर दुसरी स्वारी-फौजे-
चें सेनापत्य १२६-१३५, १४४,
१४६, १५२, खर्ड्यांच्या स्वारींत
सेनापत्य १५८--१५९, १६७-१७०
बाजीरावाकडे फितूर होतात १७१--
१७४, नानाविरुद्ध बाळोबाला सामील
होतात १७५, चिमाजीचें दत्तविधान
करून राज्यकारभार हातीं घेतात १७५
-१७६, नानांस कैद करण्याचा प्रयत्न
१७६--१७७, नानांविरुद्ध शत्रुत्व व
कैद १७८--१८७, कैदेंतून सुटका
२१२, २४२--२४३, नानांशीं पुनः
सख्य २५१ २५७-२५८, मृत्यु
२५९.
पांडुरंगराव गोविंद पटवर्धन ४६,५५.
पांडुरंगराव बारामतीकर ७१, ८५,
११०.
पांडुरंग कृष्ण सरअमीन १४८--१४९.
पानिपतचें युद्ध १०-११.
पार्वतीबाई पेशवे १२, तोतयाविषयीं

संशय ५२, ७१.
पुरंदरचा तह ४५.
फकीरजी गाडवे २०३–२०६, २०८, शिंद्यांचा दुय्यम कारभारी होतो २०९ –२१४, कैद २१५.
फत्तेसिंग गायकवाड ३६, ३८, ४१, ६५, ९८.
बजाबा शिराळेकर १८६, १९४, १९७, २०६ २०७, २१५, २३३.
बजाबा पुरंदरे, ५१, ७१, ७३, ८५ –८६.
बदामीचा वेढा १२३.
बळवंतराव नागनाथ १६५.
बळवंतराव मेहेंदळे मृ. १२.
बाहिरोपंत मेहेंदळे १७६, २३५.
बाजीराव (पहिले) पेशवे ६.
बाजीराव (दुसरे) पेशवे. जन्म ४०, ११०, १६१, १६३, पेशव्यांना गुप्त पत्रें पाठवितात १६५, नानांची दत्तकाची मसलत हाणून पाडतात १६७ –१७१, पेशवेपदाची प्राप्ति १७४, बाळोबा व भाऊ यांच्या कारवाईमुळें पदच्युति व कैद १७५, नानाशीं संभेट १७९, कैदेंतून पळून जाण्याचा प्रयत्न १८३–१८४, सर्जेरावाच्या मध्यस्थीनें नानाविरुद्ध शिंद्यांशीं गुप्त करार १८५–१८६, नानांच्या कारस्थानामुळें पेशवेपदाची प्राप्ति १९१, नानाविषयीं भीति व द्वेष १९२–१९५, बदफैली वर्तन १९८–१९९, शिंद्यांकडून नानांस कैद करवितात २०२ --२०६, २०९--२१५, नानांची पायधरणी करतात २१६--२१७, शिंदेबायांस चिथावून देतात २५०, २५१ --२६५, २६६--२६९.
बाजीराव मोरेश्वर १४७--१४८.
बाजीपंतअण्णा जोशी ६९--७१, ७७, १०१--११०, १२२.
बाणाजी शंख्या हुजऱ्या २०३--२०६, २६६.
बापू होळकर ११९.
बाबा फडके १६६, नानातर्फे फितूर १८२, १८४, २०७, २६८.
बाबूराव आपटे २१२.
बाबूराव वैद्य २३५.
बाबूराव रामचंद्र फडनवीस ६, ८, १०, पेशवाईचे मुख्य कारभारी १९--२०.
बाबूराव हरि गुप्ते-२४४--२४५.
बायजाबाई शिंदे १८५, दौलतरावाशीं लग्न २०८, २६१.
बाळाजी विश्वनाथ पेशवे १-४, मृ. ५.
बाळाजीपंत दामले ७१, ८६.
बाळाजी महादेव भानू १--४ मृ. ५.
बाळाजी माधव फडनवीस २७१.
बाळाजी कुंजर १७९, २०३. २०९.
बाळोबातात्या पागनीस १६७, १६८, नानाविरुद्ध उद्दाम वल्गना १६९–१७७, भाऊंस मिळून नानांचें उच्चाटण करतात १७७–१८६, कैद १८७, कैदेंतून सुटका व नानाशीं पुनः

सख्य २५७-२५८, नानातर्फे बाजीरावास धमकी देतात २६०, २६१.
बिंबोजी भोसले-९८.
बुराणुद्दिन नि. टिपू ११९-१२०, १२३-१२४.
भाऊ कापशे २१०.
भिवराव पानशे ५३, ८४, ९२.
मल्हारराव होळकर (दुसरे) १३१. १९७ शिंद्यांचा छापा व खून २००.
मशीरुलमुल्क नि० निजाम १५०, मराठ्यांशीं द्वेष व चढेलपणा १५४-१५८, पेशव्यांच्या कैदेंत पडतो १५९-१६०. नानातर्फे भाऊ व बाळोबा यांस फसवितो १८२-१८९, १९१-१९६.
महादजी शिंदे-पुणें दरबारशीं लपंडाव २९-४६, स्वार्थी धोरण २९-३०, हरिपंतास हिसके देतात ३१-३५, पेशव्यांची भेट ४६-४७, नानाशीं सख्य ४९, ५३, करवीरकरांवर मोहीम ५८-५९, ६६, ७१, ७७-८७, ९०, इंग्रजांविरुद्ध मोहीम ९१-९४, बापूस कैद करतात ९५-९६, नानाशीं धुसफूस ९९-१००, १०१-११०, दिल्लीची दौलत ताब्यांत घेतात १३६-१४२, होळकर व अलीबहादर यांशीं भयंकर विग्रह ११७-१४१, नानांवर राग व दक्षिणेंत आगमन १४२, राज्यकारभारांत ढवळाढवळ, निजामाशीं मिलाफ व नानांची उघड निंदा १४३-१५२, होळकरांचा नाश करतात १५१, नानाशीं समेट व मृत्यु १५२, २४२-२४३.
महादाजी कृष्ण भानू १.
महंमद बेग हमदानी १३७.
महंमदअली कुमदान नि० हैदर ५५.
महंमद हसन गारदी ९४.
माधवराव पेशवे १९-२१, मृत्यु २२.
माधवराव रास्ते १८७, २१२.
माधवराव जाधवराव २३५.
माधवराव बल्लाळ फडनवीस २६९-२७०.
मानाजी फाकडे ३६, फितूर ५७, ७९, १८३-१८९, २४४.
मालोजी राजे घोरपडे ३९, १८४, १८६.
मुकीरसाहेब नि. शिंदे- दगाबाजी २०४-२०६.
मुधोजी भोसले-साबाजीशीं तंटा २६, ४०, ७०, ९८, १०० इंग्रजांकडे फितूर १०५, १२२, १५७.
मुरारराव घोरपडे-अचाट शौर्य ५४.
मुशाफरखान पठाण नि. शिंदे २११.
मुसा रेमू नि. निजाम १५८ १५९, १९६.
मोरोबादादा फडनवीस ८, १०, फितूर १३, ४८, ५१, नानाविरुद्ध कारस्थान स्वरूप ६७-६८, उत्कर्ष ६८-

७०, राज्याधिकार हातीं घेतात ७१-७३, नानांचा पाणउतारा करतात ७७, शिंदे फडके पटवर्धन यांविरुद्ध कारस्थानें ७७-७९, इंग्रजांना आणण्याची मसलत ८०-८३, कारस्थानाचा शेवट व कैद ८४-८७, पुनः फितूर ८९, १४६, त्रागा व संन्यास १९७.
यशवंतराव होळकर १९७, २००, २६४, २६७.
यशवंतराव शिवाजी नि. शिंदे २११.
यशवंतराव माने म्हसवडकर ५७.
यशोदाबाई पेशवे १६७-१७५.
यशोदाबाई फडनवीस १०, १५.
यादगीरची भेट ११८.
यादवराव भास्कर नि. शिंदे २६३.
रखमाबाई फडनवीस ७, १२, मृ. १६
रघुनाथराव पेशवे १९, पुतण्याची कैद २०-२४ पेशवाईची प्राप्ति २५, पदच्युति व बंडावा २९, ३६, इंग्रजांचा आश्रय घेतात ३७-९३ पेशव्यांच्या स्वाधीन होतात ९४, झाशीकडे रवानगी ९५, हरी बाबाजीवर छापा व पुनः इंग्रजांकडे पलायन ९७, १०९, पुनः पेशव्यांच्या स्वाधीन होतात-दुखणें व मृत्यु ११०.
रघुनाथराव कोल्हटकर--फितूर ५२.
रघोजी आंग्रे ५३.
रघुपतराव राजेबहाद्दर ६५, ६८, ७१, ८६.
रघोजी भोसले (दुसरे.) १६५, भाऊ व बाळोबा यांविरुद्ध नानांस पाठिंबा देतात १८०-१८९, बाजीराव व शिंदे यांशीं कटकट १९१-१९६, २१४.
रंगराव राजेबहाद्दर १३१.
रमाबाई पेशवे २१.
राघोपंत पेंडसे २१०.
राघो विश्वनाथ गोडबोले १९९, २१०, २३३.
राणोजी नाईक निंबाळकर ८९.
रामजी पाटील नि. शिंदे १७१, १७९.
रामचंद्र परशराम पटवर्धन २५९, २६३.
रामाजी महादेव भानू १-४ मृ० ५.
रामशास्त्री २२१, २३६.
रामचंद्र गणेश कानडे ५८, ७७, १०२.
रामचंद्र नाईक परांजपे -फितूर ५२, कैद ५३.
रायाजी पाटील नि. शिंदे १७९, १८०.
राराबीचा छापा ५७.
रेझासाहेब बांकी नबाब नि. टिपू १३४
लक्ष्मीबाई शिंदे २००, २११, २१५, २४९, २५७, २६६.
लखबा लाड नि. शिंदे १६८, २६६.
लाखेरीची लढाई १५१.
लालसोटची लढाई--१३७.
लॉर्ड कॉर्नवॉलिस १३०-१३५.
वडगांवचा तह ९४.
वाघापूरची लढाई ९७.
वॉरन् हेस्टिंग्स् ४१; १०८.
विठोजी होळकर १९७, २००.

विनायक अमृत पेशवे २५८, २६०.
विसाजी कृष्ण बिनीवाले ६६, ७१, ८५, ८६,
वेंकटराव घोरपडे इचलकरंजीकर फितूर व दंड ५२, ९३.
वेंकटराव भावे नरगुंदकर १२०.
शंकराजी नारायण पंतसचिव १४७, १४९.
शृंगेरी मठाची लूट १२९.
शिवाजीपंत बाडदेकर ४३,४४,६९, ९२, ९३.
शिवराव घोरपडे गुत्तीकर ५५.
शिवरामपंत थत्ते २५१.
सखाराम हरि गुप्ते ३६,२४४,२४५.
सखारामबापू बोकील १९, २३, बारभाईंची उठावणी व मुख्याधिकाराची प्राप्ति २५-६३, नानाशीं वितुष्ट, मत्सरी स्वभाव, स्वार्थी धोरण, 'देवावें'चा तंटा ६३-६५, मोरोबाची उठावणी करतात ६७-८१, मोरोबास तोंडघशी पाडतात ८३, नानाशीं पुनःसमेट ८८, नानाशीं धुसफूस ८९, फितूर, कैद व मृत्यु ९५-९६ २४२-२४३.
सदाशिव रामचंद्र शेणवी ३३, ३९, ६८, ७१, ८६, कैद ९४.
सदाशिव मल्हार नि. शिंदे १६८, १७५, १८७.
सदाशिवराव भाऊ पेशवे ६, ८, ९, ११, मृ. १३.
सवाई रावसाहेब पेशवे जन्म २९, शिक्षण स्वभाव वगैरे ११३-११६, वकील इ. मुतलखीचा स्वीकार १४५, शिंद्यांविरुद्ध नानांची बाजू सांवरतात १४५-१५०, खर्ड्यांच्या स्वारीवर निघतात १५४-१६०, बाजीरावाविषयीं स्नेह व गुप्तपत्रें १६४-१६५, नानाकडून कानउघाडणी १६५, आजार व मृत्यु १६६.
सर्जेराव घाटगे १८४, १८५, १८८, २०३-२०६ २०८, शिंद्यांचा मुख्य कारभारी होतो २०९, पुण्याची दैना करतो २१०, पाटीलबावांच्या स्त्रियांना मारझोड करतो २११. सातारच्या महाराजांस चिथावून देतो २१२; २१३-२१४.कैद २१५, कैदेंतून सुटून शिंदे बायांवर मारेकरी घालतो २६१, शेणव्यांची कत्तल करतो २६६.
संताजी भोसले ५.
सालबाईचा तह १०७-११०.
साबाजी भोसले २६-२८, मृ. ४०.
सावशीची लढाई ५५.
सुमेरसिंग गारदी ९४.
सुरापूरकर संस्थानिक ४८, ९६.
सेंट ल्युबिन ६१-६२.
हरीपंत भिडे घातकी नजरचूक ३९.
हरीपंत फडके २५, बारभाईचे सेनापति २८-४६, कर्नाटकांत स्वारी ५५-५८, ६६-७०, ७७-८७, ९०, दुय्यम कारभारीपणा ९६, शिंद्यांशीं

धुसफूस ९९-१००; इंग्रजांशीं लढाया १०१--११०, टिपूवर स्वारी ११७-१३५, शिंदे व नाना यांचा समेट करतात १५२, मृ. १५४. २३३, २४२-२४३.

हरि महादेव भानू १-३, मृ. ४.

हरि बाबाजी नि. शिंदे ९७.

हैदरअल्ली--कर्नाटकांत दंगा ४०, ४८, ५४, मराठ्यांवर छापा ५७, ८८, मराठ्यांशीं मैत्री व इंग्रजांवर स्वारी १००--१०५, १०६, मृ. १०९.